दिनांक. २७ जून १८०८ रोजी मुठे खोज्याचा कुलकर्णी बापूजी सोनाजी दिघे यास शाहू राजांनी पत्र लिहिले ते असे, स्वामी परराष्ट्रातून स्वराज्यात आले त्याप्रसंगी तुम्ही, परसोजी भोसले यांची जमेनिशी करीत असता, त्यांचे तर्फेने येऊन लामकनीच्या मुक्कामी स्वामीचे दर्शन घेतले. स्वामीच्या आज्ञेने परसोजी भोसलेस दर्शनास आणले. त्यावेळेस तुम्ही एकनिष्ठेने खूप सेवा केली. पुढेही निष्ठेने रहा. तुमचे कल्याण

करणे स्वामीस आवश्यक आहे.इ.१८ अर्थात वऱ्हाडात परसोजी भोसले व त्यांच्या बंधू साबाजी भोसले हे सरदार कामगिरीवर असता ते आपली फौज घेऊन लगोलग शाहूराजास मिळाले म्हणून शाहूराजांचा चांगला जम बसला त्यामुळे शाहूराजाला पहिला मुख्य आधार मिळाला तो परसोजी भोसले याचा होय. शाहू राज्याधिकारी नाहीत असे ताराबाईनी उत्तर केले असता परसोजी भोसलेंनी पुरतेपणी अंगीकार करुन राज्यासनी बैसविले.१९ यांनीच शाहू राज्याचा खरा वारस अशी खातरजमा केल्यावरुन हैबतराव निंबाळकर नेमाजी शिंदे वगैरे सरदार धर सोडपणा करीत होते ते शाहूराजास मिळाले.२० पिंगळे पेशव्यांचा मुतालिक (उपमंत्री) चिमाणाजी दामोदर त्यास सामील झाला. रखमाजी किन्हळे यास दि. ११ जून १७०७ चे शाहूराजांचे पत्र आहे. त्यात स्वामींच्या अभ्युदय प्रसंग होऊन या प्रांतात आगमन झाले. हे ऐकताचक तुम्ही आपले जमावानिशी येऊन लामकनीच्या मुक्कमी स्वामीसंनिध हजर झाले. आपला सेवाधर्म तो केला.२१

जुलैत शाहूराजे लामकनीहून कुसूंबा येथे आले. याठिकाणी दादाजी निलकंठ नाईक पुरंदरकर शाहूराजास मिळाले.२२ कुसुंब्याहून शाहूराजे धुळे, आर्वी, झोडगे, चाळीसगाव, मार्गे खुलताबादला गेले.२३

**संदर्भ सूची :**

१) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड – ३ पृष्ठ–२६ – २७
२) कुलकर्णी, खरे – मराठ्यांचा इतिहास,खंड –२ पृष्ठ –२
३) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड – ३ पृष्ठ–२७ – २८
४) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड – ३ पृष्ठ – २८
५) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड – ३ पृष्ठ – २८
साने का.ना. – थोरले शाहू महाराज चरित्र,पृष्ठ – ८
बेंद्रे वा.सी. – श्री. छत्रपती राजाराम महाराज, पृष्ठ – ४२९ – ४३०
६) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड – ३ पृष्ठ – ३६
साने का.ना. – थोरले शाहू महाराज चरित्र,पृष्ठ – ८
बेंद्रे वा.सी. – श्री. छत्रपती राजाराम महाराज पृष्ठ – ४२९ – ४३०
७) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३६
८) वाड, पारसनीस – शाहूमहाराजांची रोजनिशी,पृष्ठ – २०२ – २०३
सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३६
९) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३६
१०) साने का.ना. – थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र,पृष्ठ – ९
११) राजवाडे वि.का. – मराठ्याच्या इतिहासाची साधने,खंड ६ लेखांक – ६,पृष्ठ १३२ – १३३
सरदेसाई गो.सं. – मराठी रियासत,खंड ३,पृष्ठ – ३७
१२) सरदेसाई गो.सं. – मराठी रियासत,खंड ३,पृष्ठ – ३७
१३) राजवाडे वि.का. – मराठयांच्या इतिहासाचे साधने,खंड–२० पृष्ठ ६०
सरदेसाई गो.सं. – मराठी रियासत,खंड–३,पृष्ठ – ३७
१४) वाड, पारनीस – श्री छत्रपती शाहू महाराज यांची रोजनिशी खंड–१,पृष्ठ–१९५,१९७,२०३
सरदेसाई गो.सं. – मराठी रियासत,खंड ३,पृष्ठ – ३७
१५) आपटे द.वि. – साधन परिचय अर्थात मराठयांचा पत्ररुप इतिहास, लेखांक–७२ पृष्ठ–७४
सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड–३,पृष्ठ–३७–३७
पुरंदरे कृ.वा. – पुरंदरे दप्तर, भाग–१, लेखांक २१३,पृष्ठ–१६७
१६) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३८ (तळ टीप)
१७) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३८
१८) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३८
१९) पारसनीस द.ब. – इतिहास संग्रह ऐतिहासिक टिपणे,भाग१,पृष्ठ ५८
सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३७
२०) काळे या.मा. – नागपूरकर भोसल्याची बखर,पृष्ठ २५–२६
सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३८
२१) राजवाडे वि.का. – मराठयांच्या इतिहासाची साधने,खंड–६ लेखांक ६, पृष्ठ १३२,
सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३९
२२) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत,खंड –३,पृष्ठ –३९
२३) सरदेसाई गो.स. – पेशवे दप्तरातून निवडलेले कागद,खंड ७, मधील नकाशा

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# मराठ्यांचा गुजरात प्रांतातील सत्ता विस्तार आणि पेशव्यांचे राजकारण

**प्रा.डॉ. शरद कौतिक भामरे**
इतिहास विभागप्रमुख, श्री.शि.वि.प्र. संस्थेचे भाऊसाहेब ना.स. पाटील साहित्य व
मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे.

भारताच्या पश्चिमेस असलेला प्रदेश मध्ययुगात गुजरात प्रांत म्हणून ओळखला गेला. या प्रांताच्या उत्तरेस पाकिस्थान व राजस्थान, पूर्वेस मध्यप्रदेश व महाराष्ट्र, दक्षिणेस महाराष्ट्र व अरबी समुद्र आणि पश्चिमेस पूर्णत: अरबी समुद्र पसरलेला आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ६.१% भाग गुजरात राज्याने व्यापलेला आहे.१ गुजरातचे च्गुर्जरराष्ट्रङ आणि घ्सौराष्ट्रङ असे दोन मुख्य भेद(भाग) आहेत.२ गुजरात हे नाव घ्गुज्जरठ्ठङ या प्राकृत अथवा घ्गुर्जर राष्ट्रङ या संस्कृत नावाचा अपभ्रंशातून आलेले आहे. नवव्या शतकातील एका लेखात या प्रदेशाला गुर्जरराष्ट्र असे म्हटले आहे. मध्य आशियातील हुणांच्या आक्रमणांबरोबर भारतात आलेले गुर्जर लोक पंजाबातून दक्षिणेकडे स्थलांतरित होऊन आबू पर्वताच्या सभोवती राहू लागले. त्यांच्या या प्रदेशालाच दहाव्या शतकापासून गुजरात हे नाव प्राप्त झाले.३

इतिहास काळापासून या प्रदेशात मानवाच्या वस्तीचे अनेक ऐतिहासिक संदर्भ सापडले आहेत. घ्प्राचीन काळी गुजरातेत कोळी व भिल्ल यांचीच वस्ती होती.ङ४ प्राचीन काळापासून गुजरातवर मौर्य, ग्रीक, वल्लभी, चालुक्य, राष्ट्रकूट, चावडा, सोलंकी, वाघेले, सुलतानशाही घराणे अशा विविध घराण्यांनी राज्य केले. मोगल काळात इ.स.१५७३ मध्ये अकबराने गुजरात जिंकून तेथे मोगल सत्तेची स्थापना केली. तेव्हापासून तर १८ व्या शतकाच्या प्रारंभी मराठ्यांच्या गुजरातमध्ये प्रवेश होईपर्यंत मोगलांचेच राज्य गुजरातवर होते.५ याकाळात एकुण ५९ मोगल सुभेदारांनी गुजरातची कारकीर्द चालवली.

मराठ्यांचा गुजरात प्रांतातील प्रवेश छत्रपती शिवाजींच्या काळात इ.स.१६६४ मध्ये सुरतेच्या लुटीच्या स्वरुपात झाला. यावेळी दक्षिणेत शिवाजींचा मोगलांशी सतत संघर्ष सुरु होता. शिवाजी महाराजांची ही गुजरातमधील पहिली स्वारी मोगालंचा शिवाजींचे स्वराज्य नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न आणि त्यास शिवाजींचा प्रतिकार या परस्पर विरोधी संघर्षाचा परिपाक होती. शिवाजी महाराजांना इ.स.१६७० मध्ये गुजरातवर पुनश्च: स्वारी करण्याची संधी मिळाली. शिवाजी आग्राहून सुटून आल्यानंतर पुरंदरच्या तहानुसार मोगलांकडे गेलेले किल्ले परत मिळवण्याचा त्यांनी सपाटा चालवला होता. त्यात सततच्या लढायांमुळे मोठे द्रव्य खर्ची पडले होते. शिवाय शिवाजींना सुरतेची श्रीमंती यापूर्वीच निर्दशनास आलेली होती. तिचा पुन्हा स्वराज्यकार्यासाठी उपयोग करण्याच्या हेतूने शिवाजींनी ही दुसरी स्वारी केली. यावेळी शिवाजींना दख्खनचा सुभेदार मुअज्जम आणि त्याचा मातब्बर सरदार दिलेरखान यांच्या भांडणाचा जास्तीत जास्त उपयोग झाला.६

इ.स.१६७० नंतर शिवाजींची गुजरातवर स्वारी झाली नाही. परंतु मोरोपंत पिंगळे, हंबीरराव मोहिते, प्रतापराव गुजर यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांच्या मोहिमासुरुच राहिल्या. इ.स.१६७२ मध्ये मराठ्यांनी गुजरातच्या वाटेवर असलेला साल्हेरचा किल्ला जिंकून घेतला. याच वर्षी मोरोपंत पिंगळे यांनी रामनगरचा राजा सोमशहा याचा पराभव केला आणि रामनगर हस्तगत केले. घ्कोळी लोकांपासून आपले संरक्षण व्हावे म्हणून दमण प्रांतातील काही लोक रामनगरच्या चोथिया राजास चौथ देत. ती मिळवण्यासाठी शिवाजींनी १० वर्षे वाटाघाटी चालवल्या अखेर त्यात त्यांना यश आले. चोथिया या नावारुनच पुढे या करास घ्चौथाईङ हे नाव पडले.ङ७ असे सांगितले जाते. १८ व्या शतकात याच चौथाईच्या लोभाने मराठी सत्ता गुजरातमध्ये फैलावली. इ.स.१६७३ मध्ये सुरतवर आक्रमण करण्याचा आव आणत मराठा सैन्य नर्मदापार झाले. इ.स. १६७७ मध्ये शिवाजींनी खानदेशातील धरणगाव लुटले त्यावेळीही शिवजी सुरतेवर येण्याची भिती निर्माण झाली. शिवाजींनी रामनगर व पिंडोल घेतल्यानंतर सुरतकरांना शिवाजींची सारखी भिती वाटत राहिली.८ अर्थात मराठा सैन्य १६७० नंतर प्रत्यक्ष सुरतेवर गेले नसले तरी इ.स.१६८० पर्यंत गुजरातच्या आसपास सारखे फिरुन आपला दरारा गाजवत राहिले. शिवाजींच्या मृत्यूनंतर मात्र मराठे मोगलांशी संघर्षात गुंतल्यामुळे गुजरातकडे फिरकू शकले नाहीत. छत्रपती राजारामांच्या काळात खंडेराव दाभाडेंची सेवा बघून राजारामांनी त्यास सेनाधुरंधर हे पद दिले. तसेच गुजरात, बागलाण वगैरे प्रांतात मुलुखगिरीस ठेवले.[९] १८ व्या शतकाच्या प्रारंभापासून खंडेराव दाभाडे यांनी गायकवाड, बांडे यांना हाताशी घेवून गुजरात प्रांतात सतत मुलुखगिरी आरंभली आणि गुजरात प्रांतात सत्तेचा पाया पक्का केला.

छत्रपती राजारामांनी खंडेराव दाभाडेंना गुजरात, बागलाण प्रांताची कामगिरी सांगितली होती. ती पार पाडण्यासाठी खंडेराव दाभाडेंनी लागलीच सुरत जिल्ह्यात चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्याचा प्रयत्न सुरु केला. इ.स.१७०० ते १७०४ या काळात त्यांनी सुरतेस दोनवेळा स्वाऱ्या केल्या. त्यात त्यांना फारसे यश मिळाले नसले तरी इ.स.१७०५ मध्ये खंडेराव दाभाडे सुसज्ज सैन्यासह गर्जत गुजरातमध्ये घुसला आणि नर्मदापार झाला. मार्गातील मोगली सैन्याचा धुव्वा उडवत मिळेल तेवढी संपत्ती लुटली आणि सोनगडास साल्हेरच्या किल्ल्यात परत आला.१० यानंतर धनाजी जाधवानेही इ.स.१७०५ मध्ये आपल्या तुफानी फौजेसह दक्षिण गुजरातमध्ये प्रवेश करुन मोगल फौजेचा ठिकऱ्या उडवल्या. इ.स.१७०६ मध्ये त्याने नर्मदेकडील बाबा प्याऱ्याच्या उतारावर मोगली फौजेचा नि:पात केला.११ इ.स.१७०७ मध्ये औरंगजेबाच्या


**Website :** www.researchjourney.net **Email :** researchjourney2014@gmail.com

ISSN : 2348-7143
Dec. 2018

मृत्यूच्या बातमीबरोबरच मराठा फौज पूर्व गुजरातमध्ये शिरुन तिने गोध्रा गाठले. तेथून खेडा लुटत बेटव्यापर्यंत पोहचली. मराठ्यांच्या या तुफानी संचार वार्तेने अहमदाबाद शहरात एकच हलकल्लोळ उठला. लोक घरेदारे सोडून पळण्याकरिता म्हणून रस्त्यावर उतरले. यावेळी इब्राहिमखान हा गुजरातचा सुभेदार होता. तो स्वत:स सावरण्याच्या उद्योगाला लागला. मराठा सैन्याने त्याच्या जवळून दोन लाख दहा हजारांची खंडणी वसुल करुन ते माघारी परतले.१२

खंडेराव दाभाडे शाहू–ताराबाई यांच्या गृहकलहाच्या समयी शाहू पक्षात सामिल झाल्यानंतर छत्रपती शाहूंनी त्यांची पूर्वीची इनामे वतन पूर्वीप्रमाणे परंपरागत चालवत त्यांनी बागलाण, खानदेश सोबत गुजरात प्रांत सर करण्याचा हुकूम खंडेरावास फर्मावला. याविषयी दाभाडेंच्या हकीगतीमध्ये आलेले वृत्त असे आहे, च्श्रीमंत शाहू महाराज यांणी गुजरातेची मोहिम सांगून आज्ञा केली की, गुजरात काबीज करुन तुम्ही आपल्याकडील फौजेचे खर्चास ऐवज घेवून बाकी ऐवज राहील तो हुजूर भरणा करुन देत जाणे. या प्रो आज्ञा करुन खंडेराव दाभाडे सेनाखासखेल सेनापति यांस गुजराथींत रवाना करुन दिल्हे.छ१३ या वर्णनात खंडेरावांचा उल्लेख घ्सेनाखासखेल सेनापतिङ असा आला आहे. अर्थात यावेळी खंडेराव सेनाखासखेल असले तरी सेनापती नव्हते हे लक्षात घ्यावयास हवे. छत्रपती शाहूंच्या आदेशाप्रमाणे खंडेराव दाभाडेंनी खानदेश, बागलाण, गुजरातच्या मुलुखातील कामगिरी अत्यंत चोख बजावली. बागलाणच्या मुलखात अनेक स्वाज्या केल्या. यावेळी दमाजी गायकवाड हा दाभाडेंच्या चाकरीस होता. याशिवाय बांडे वगैरे सरदारही बेगमीस होते. त्यांनी पुढे नवापूर येथे आपले ठाणे बसवले.१४ खंडेरावांनी पुढे दमाजींच्या मदतीने खानदेश–गुजरातच्या अनेक भागात चौथाई वसुल केली. बव्हाणपूर ते सुरत या मार्गावर आपल्या चौक्या बसवल्या. एकवेळ दाभाड्यांची फौज सोरटी सोमनाथपर्यंत जाऊन पोहचली. इ.स.१७११ मध्ये दाभाडेंची अंकलेश्वर आणि भडोच येथे खडाजंगी झाली. इ.स. १७११ ते १७१३ च्या काळात दाभाडेंनी सुरत, अंकलेश्वर, भडोच येथे सतत मुलुखगिरी करुन लुट मिळविली. या दरम्यानच्या काळात सरबुलंदखान नायब सुभेदारीच्या जागी हजर होण्याकरिता अहमदाबादेस जात असतांना दाभाडेंनी त्यास सागरबाज्याच्या जंगलात गाठून लुटले. इ.स.१७१३ मध्ये महंमद ताब्रीझी हा सुरतहून औरंगाबादकडे खजिना घेऊन जात असतांना सुरतेच्या पूर्वेकडील जंगलात खंडेरावांच्या माणसांनी त्याचा खजिना लुटला. इ.स.१७१६ मध्ये मराठ्यांचा लोंढा तापीतिरी घुसला. झुल्पीकारबेग व मुखमसिंग यांसही मराठ्यांनी धुळ चारली.१५ दाभाड्यांनी सुरत मार्गावर आपली चौकी (बस्तान) एवढे घट्ट बसवले की, या मार्गाने येणाज्या–जाणाज्या यात्रेकरुंना दाभाडयांचा परवाना घेतल्याशिवाय प्रवास करणे अशक्य झाले.१६ दाभाड्यांच्या ताब्यातील सुरत मार्गावरील चौक्या जणुं मोगलांच्या छाताडावर रोखलेल्या बंदुकाच होत्या असे वर्णन या चौक्यांचे वि.गो.खोबरेकरांनी केले आहे.

इ.स.१७१६ नंतर खंडेराव व दमाजीबाबास पुढील दोन–चार वर्षे गुजरातेत जाता आले नाही. परंतु याकाळात दाभाडेंचा विश्वासू सेवक पिलाजी गायकवाडने गुजरातचा बंदोबस्त अत्यंत चोख ठेवला. पिलाजी गायकवाड हा दमाजीचा पुतण्या असून त्यास दमाजीने दत्तक घेतले होते.१७ खंडेराव दाभाडे यांनी त्यास पागेची वस्त्रे देऊन ५० घोड्यांची पागा दिली होती.१८ त्याने सुरत प्रांतावर स्वारी करुन मोगल सेनानी सयीद अकील आणि महमद पन्हा यांचा धुव्वा उडवत इंग्रज व्यापाज्यांसह सर्वांवर चौथ लादून वसुल केला. नवापूरला बांडेशी कटकट होत असल्याकारणाने तेथून दहा कोसांवर सोनगड येथे त्याने किल्ला बांधून आपले ठाणे निर्माण केले आणि येथूनच सुरत अठ्ठाविशीत पुढील दोन वर्षे खंडण्या गोळा केल्या व मराठी अंमल या भागात बसविला. या कामी त्याने जव्हार–रामनगर भागातील कोळी व भिल्ल यांनाही आपल्या बाजूस वळवून घेतले. इ.स.१७१९ मध्ये त्याने सुरतवर पुन्हा स्वारी करुन मोगलांना धूळ चारत खंडण्या वसुल केल्या. पिलाजींच्या या सर्व कारवाया दाभाडयांच्या तर्फेने चालत होत्या. इ.स.१७१९ नंतर मराठ्यांच्या गुजराकडील कामगिरीस वेगळेच तेज आले. कारण याच वर्षी मराठ्यांना मोगलांकडून दक्षिणेतील सहा प्रांताच्या चौथाई सरदेशमुखीच्या सनदा मिळाल्या. परंतु त्यातून गुजरात प्रांत वगळण्यात आला होता. त्यामुळे मराठ्यांनी चोहो बाजूंनी गुजरातचे लचके तोडावयास सुरुवात केली. त्याचा परिणाम दाभाडे–गायकवाड–पेशवे असा पेचप्रसंग निर्माण झाला. याशिवाय मराठे, मोगल सुभेदार, गुजरातेतील मुस्लीम घराणी बाबी व झालोरी आणि भडोच खंबायतचे इंग्लीश गव्हर्नर यांची आपापसात भांडणे निर्माण झाली. ती सर्व मोडीत काढत दाभाड्यांनी गायकवाडांच्या सहाय्याने गुजरातमध्ये मराठी सत्ता स्थापन केली.१९ पुढे सेनापती दाभाडेंचा वृध्दापकाळ झाल्याने त्यांचा मुलगा त्रिंबकराव सेनाखासखेल व दमाजीचा मृत्यू झाल्याने (इ.स.१७२१) त्यांचा दत्तकपुत्र पिलाजी गायकवाड समशेरबहादूर असे गुजरातमध्ये अंमल बसवू लागले.२० पिलाजीने डिसेंबर १७२३ मध्ये महीनदीच्या तिरापर्यंत जाऊन खंडण्या वसूल केल्या आणि तो फिरुन सोनगडास परत आला. जून १७२४ मध्ये त्रिंबकराव दाभाडे व गायकवाड यांनी सुरत अठ्ठाविशीमध्ये अंमल बसवून सबंध गुजरात प्रांतावर चौथाईची खंडणी लागू केली.२१ इ.स.१७२५ मध्ये त्रिंबकराव दाभाडेंनी दमाजीसह सोरठला येऊन खंडणी वसुली केली. ही काठेवाडला मराठ्यांची पहिली भेट होय. दमाजीचा व त्रिंबकराव दाभाडेंचा काठेवाडांत जाण्याचा मुख्य उद्देश तेथील संस्थानिकांवर खंडणी बसविण्याचा होता. त्याप्रमाणे त्यांनी तेथील बहूतेक राजे, नबाब, गिरासिये वगैरे लोकांवर खंडणी बसविली.२२ इ.स.१७२६ मध्ये बाजीराव पेशव्याने उदाजी पवार यासही आपल्या वतीने चौथाई वसुल करण्यासाठी गुजरातेत पाठवले.२३

एकीकडे पिलाजी व कंठाजी यांची गुजरातेत धामधुम चालू असतांना आणि पिलाजीच्या कर्तबगारीने दाभाडे घराण्याची सत्ता

गुजरातमध्ये विस्तार पावत असतांनाच उदाजी पवार हा पेशव्यांचा अधिकारी उत्तरेतून गुजरातेत उतरला. येथूचन खज्या अर्थाने पेशवे-दाभाडे संघर्षास प्रारंभ झाला. उत्तरेतील सत्ताविस्तारासाठी पेशव्यांचा गुजरात प्रांतावर डोळा होता. मोगलांच्या दौर्बल्याचा फायदा घेवून दिल्लीवर धडक मारावी, मोगल सत्तेचा जीर्ण झालेला आणि मुळापासून पोखरला गेलेला वृक्ष खिळखिळा करुन टाकावा आणि उत्तरेच्या राजकारणात मराठ्यांचा प्रभाव निर्माण करावा अशी बाजीराव पेशव्यांची महत्त्वाकांक्षी योजना होती आणि दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणारे मार्ग माळवा व गुजरातेतून जात असल्यामुळे या योजनेत या प्रांतांना विशेष महत्त्व होते.२४ या कारणास्तव सेनापतीस गुजरातच्या मुलुखगिरीची व बाजीरावास माळव्याच्या मुलुखगिरीची अशी महाराजांची वाटणी असतांना बाजीरावाने सेनापतींशी निम्मे गुजरातविषयीचे बोलणे घातले. पेशवा बाजीराव म्हणतात की, च्गुजराथींत महाल तुम्ही निम्मे आम्हाकडे द्यावे व माळव्यांतील आम्ही सर करु त्यात निम्मे महाल तुम्ही घ्यावे.छ२५ पेशव्यांच्या या बोलण्यास सेनापतींनी (त्रिंबकराव दाभाडे) उत्तर केले की, च्श्रीमंत महाराजांनी मोहीम तुम्हास माळव्यातील सांगितली व आम्हास गुजराथीची पेशजीच सांगितली आहे. तुम्ही आपण मुलुख काबीज करावा. आम्ही आपला करावा. तुमचे मुलकात आम्ही वाटणी मागू नये व आमचे मुलकात तुम्ही वाटणी मागू नये. येविशी तुम्ही हुजूर विनंती करावी व आम्हीही हुजूर विनंती करितो.छ२६ त्यावरुन उभयतांनी महाराजांच्या कानावर घातले. महाराजांनी त्यावर दोघांनाही आज्ञा केली की, माळव्यांत तुम्ही अंमल करावा (पेशवा). गुजरातीत त्यांनी अंमल करावा (सेनापती). उभयतांत कलह नसावा. याप्रमाणे उभयतांस ताकीद करुन मोहिमेस रवाना केले. उभयतांही मोहिमेस गेले.२७ परंतु यातच खज्या अर्थाने पेशवे-दाभाडे तंट्यांचे बीज आहे.

छत्रपती शाहूंनी मुलुखगिरीचे प्रांत प्रत्येक सरदारास वेगळे व स्वतंत्र तोडून दिले असतांना ही व्यवस्था पेशव्यांना मान्य झाली नाही यामुळे मराठ्यांची एकजूट राहणार नाही. जो-तो सरदार मध्यवर्ती सरकारातून वेगळा पडेल परिणामी राज्य बलहीन होईल. असा पेशव्यांचा समज होता. वरील आपत्ती टाळण्यासाठी सर्व ठिकाणी मुख्य प्रधानाची देखरेख व हुकमत चालावी आणि सर्वांनी पेशव्यांच्या आज्ञेत चालावे अशी पेशव्यांची वर्चस्ववादी भुमिका होती. त्यांच्या या भुमिकेमुळेच पेशव्यांचे अनेक सरदारांशी वितुष्ट निर्माण झाले. पेशवे-दाभाडे संघर्ष (डभईचे युध्द) हा त्याचाच एक भाग होता. गुजरात प्रांत निम्मे चिमाजी आप्पांकडे मुकासा होता. इ.स.१७२८ मध्ये तो दुर करुन सेनापती दाभाडे यांजकडे बेगमीस दिला.२८ यामुळे पेशवे-दाभाडे संघर्षात अधिकच भर पडली. याच वर्षी म्हणजे इ.स.१७२८ मध्ये पेशवा बाजीरावाने गुजरातचा सुभेदार सरबुलंदखानकडे गुजरातच्या चौथाईच्या मागणीसाठी आपला वकील बाजी शामराव यास पाठविले. तसेच इ.स.१७३० मध्ये चिमाजी आप्पा उदाजी पवारसह माळव्यातून गुजरातेत आला आणि सरबुलंदखानास गुजरात प्रांताविषयी चौथाईचा करार शाहू महाराजांस लिहून देण्यास भाग पाडले. खरे तर सरबुलंदखानानेही या ठिकाणी दाभाडेंविरुध्द पेशव्यांशी राजकारणच केले. सेनापती दाभाडे यांना पेशव्यांचे हे कृत्य म्हणजे गुजरातमधील त्यांची मुजोरी वाटून त्यांनी पेशव्यांच्या या दांडगाईला आक्षेप घेतला. दाभाडे संतप्त झाले आणि त्यांनी पेशव्यांना वेळीच थांबवण्यासाठी संघर्षाचा पवित्रा घेतला. पेशव्यांच्या माळवा भागात लुटालुट सुरु केली तसेच निजामाशी संधान बांधून बाजीरावाचे वर्चस्व नाहीसे करण्याच्या उद्योगास प्रारंभ केला. उदाजी, आनंदाराव पवार या विरोधकांस पेशव्यांकडून काढून आपल्या पक्षात आणले. बाजीरावानेही जशास-तसे वर्तन चालवले. आवजी कवडे, भावसिंग ठोके, मुदाणेकर, दलपतराव ठाके, आभोणेकर, बजाजी आटोळे, सिन्नरचा देशमुख इत्यादी दाभाड्यांच्या पदरची मंडळी बाजीरावाने युक्तीने फोडून आपल्या बाजूस वळवून घेतली.२९ तसेच सरबुलंदखान नंतर आलेला गुजरातचा मोगल सुभेदार अभयसिंग याच्याशीही बाजीरावाने पिलाजी गायकवाड व दाभाडेंविरोधात हातमिळवणी केली. त्रिंबकराव दाभाडेने निजामाशी संगनमताची बोलणी केल्याचे समजताच शाहूंनी बाजीरावास त्यास भेटीस घेवून येण्याचा आदेश दिला. मात्र त्रिंबकराव येण्यास तयार झाला नाही. दोघांमध्येही युध्दाची चिन्हे निर्माण झाली. बाजीराव पेशवाचे सरदार गुजरातमध्ये दाभाडेंविरोधी कारस्थान करीत असता त्रिंबकराव तळेगावास होता. त्यानेही पेशव्यांशी युध्द करण्याचे निश्चित करुन गुजरातकडे कुच केले. ८ ऑक्टोंबर १७३० ला त्रिंबकरावाने तळेगाव सोडले. तो उत्तरेला नारायणगाव मार्गे संगमनेरला गेला. तेथे तुर्कताजखानशी सल्लामसलत करुन तेथून पुढे तो नोव्हेंबरला गिरणा काठी निजामास भेटला. चिमणाजी दामोदर हा करवीरकर संभाजीचा माजी मंत्री ही त्रिंबकरावास येवून मिळाला. त्रिंबकरावाने गुजरामध्ये प्रवेश केल्यावर त्यास पिलाजी गायकवाड, दोन्ही पवार बंधू व इतर सरदार जसे कंठाजी कदमबांडे वगैरे सर्व त्यास सुरतेजवळ भेटले. त्रिंबकरावाने मांडवी किल्ला व परिसरावर १२ मार्च १७३१ ला कबजा केला. त्यानंतर नर्मदा पार करुन २६ मार्चला कर्णाली गाठली.३०

पेशवा बाजीरावानेही आपले त्रिंबकरावाविरुध्दचे व्यूह तयार केले होते. १० ऑक्टोंबर १७३० ला बाजीरावाने पुणे सोडून गुजरातकडे कूच केले. पेशव्यांसोबत आलेले चिमाजी व पिलाजी जाधव हे दाभाडे व निजामाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी खानदेशातच थांबले. डिसेंबर १७३० च्या शेवटी बाजीराव नाशिक, पेन व बन्सदा मार्गे सुरतला पोहचला. त्यानंतर बडोदा, भरुच मार्गे अभयसिंगाच्या आमंत्रणानुसार अहमदाबादला त्याच्या भेटीस जाऊन त्याच्याशी चौथाईचा करार केला. जानेवारी महिन्याच्या शेवटी बाजीरावाचा मुक्काम नाडीयादला होता. इकडे नोव्हेंबर, १७३० ला चिमाजी आप्पास निजाम-त्रिंबकराव गिरणेच्याकाठी भेटण्याचे कळाले. त्यांच्यातील कटाची कोणतीही माहिती

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

नसतांना चिमाजीने निजाम व त्रिंबकराव बाजीरावाशी युध्द करण्यास जात आहेत असा अंदाज बांधून आपले सैन्य मही नदीच्या उत्तरेला मेहमदाबादला आणले तसेच तो स्वत:ही अहमदाबादेत अभयसिंगाला भेटला. मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे हे आधीच माळव्यात होते. रामचंद्र मल्हार, अंबाजी त्र्यंबक पुरंदरे, आवजी कवडे, रघुनाथप्रभू व पेशव्यांचे इतर विश्वासातील सरदार नर्मदेच्या खोज्यात निजामाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास गेले.३१ बाजीरावाने निजामाच्या तोफखाना त्रिंबकरावास येऊन मिळण्यापूर्वीच डभईनजीकचे भिलापूर गाठले. त्रिंबकरावाच्या ३० ते ४० हजार सैन्याविरुध्द बाजीरावाचे २५ हजार सैन्य होते. त्रिंबकरावाच्या सैन्याचा काही भाग त्याचा लहान भाऊ यशवंतरावाच्या अधिपत्याखाली होता. त्रिंबकरावाने स्वत: सोबत ५००० घोडेस्वार ठेवले होते. यावेळी बाजीरावाने जसे पालखेडच्या युध्दात निजामाला गोदावरीच्या काठी त्याच्या मुख्य सैन्यापासून वेगळे केले होते त्याचप्रमाणे दाभाई–भिलापूर येथे धाधार () नदीचा वापर करुन त्रिंबकरावाला त्याच्या मुख्य सैन्यापासून वेगळे करुन त्यावर हल्ला चढवला.३२ परंतु बाजीरावाने त्रिंबकरावाला चाळीस हजार सैन्यापासून कसे वेगळे केले याबद्दल निश्चित ऐतिहासिक माहिती मिळत नाही. १ एप्रिल, १७३१ रोजी भिलापूर–डभई येथे पेशवे–दाभाडे यांत युध्द होऊन त्यात त्रिंबकराव दाभाडे सेनापती मारले गेले.३३ अशा रितीने गुजरात प्रांतावरुन उद्‌भवलेला पेशवे–दाभाडे या दोन मातब्बर मराठा सरदारांमधील संघर्ष अखेर दाभाड्यांच्या पथ्यावर पडून त्याचा शेवट सेनापतीच्या अंताने झाला.

इ.स.१७३१ मध्ये गुजरात प्रांतातील पेशवे–दाभाडे यांच्या वैमनस्यातून सेनापती त्रिंबकराव दाभाडे मारले गेले. त्यानंतर यशवंतराव दाभाडे यांस सेनापती व बाबुराव दाभाडे यांस सेनाखासखेली देण्यात आली. परंतु त्यांच्यात त्रिंबकरावांसारखी धडाडी नसल्याने उमाबाईंनी स्वत: पिलाजी गायकवाडांच्या देखरेखीखाली गुजरातचा कारभार चालवला. मात्र इ.स.१७३२ मध्ये गुजरातचा मोगल सुभेदार अभयसिंगाने पिलाजींचा खून केला त्यानंतर दमाजी गायकवाड हे त्यांच्या जागी अंमल बघू लागले. इ.स.१७३२ मध्ये उमाबाईने अहमदाबादवर चाल केली व अभयसिंगास नामोहरण केले. दुसऱ्याच वर्षी दमाजीने जोधपूरवर त्यानंतर बडोद्यावर हल्ला केला. बडोद्याचा किल्लेदार शेरखान बाबीस हुसकावून लावत बडोदा ताब्यात घेतले व पुढे तेच राजधानी बनवले. आणि येथूनच काठेवाडमध्ये मुलुखगिरी सुरु केली.३४ यशवंतराव आणि बाबुराव यांच्या कर्तृत्वहीनतेमुळे उमाबाईंनी दमाजींकडेच गुजरातचा कारभार ठरवून दिला. या काळात बाबुरावशीही उमाईंचे खटके उडालेले दिसतात. याविषयीची पेशवे दप्तरातील नोंद याप्रमाणे आहे. च्सुध पंचमीस राजश्री बाबुराव (सेना) खासखेल व मातुश्री उमाबाई या उभयतांची खटखट जाली. त्यास सेनाखासखेल तो रुसवा करुन हलदाणीस नेले. मातुश्री उणेन वरशास गेली. राजश्री सेनापति व दमाजी गाईकवाड नवापुरीच राहिले. दुसरे तिसरे दिवशी सेनापति जाऊन मातुश्रीस समजावून आणिले. मग राजश्री बाबुराव यासही घेऊन आले. मग दमाजी गाईकवाडास वस्त्रे मातुश्रीने द्यावी यैसा करार जाला आणि रुपये बावीस लक्ष द्यावे यैसा निश्चय जाला होता.छ३५ या मजकूरावरुन उमाबाईने २२ लाख रुपये खंडणीच्या रुपात गुजरातचा कारभार दमाजीकडे आपला हस्तक म्हणून सोपवला असे दिसते. पुढे इ.स.१७३६ मध्ये बाबुराव दाभाडे मरण पावला तेव्हा सेनाखासखेल हे बहुमानाचे पद दमाजीस देऊन राजाने दमाजीच्या पराक्रमाचा गौरव केला.३६

दमाजीने इ.स.१७३५ व १७३८ मध्ये सोरठपर्यंत मजल मारुन राजेरजवाड्यांवर खंडण्या वसवल्या. इ.स.१७४४–४५ मध्ये दमाजीचा भाऊ खंडेराव याने काठेवाडवर खंडणीकरिता स्वारी केली.३७ याप्रमाणे गायकवाडांचा अंमल दिवसेंदिवस गुजरातमध्ये विस्तारत गेला, परंतु या सर्व कारभारावर उमाबाई दाभाडे यांचा पूर्ण अंकूश व देखरेख होती.३८ पेशवे दप्तरातील विविध पत्रांतील मजकूरावरुन ते आपल्या निदर्शनास येते, तसेच इ.स.१७५१ मध्ये दमाजी गायकवाडाने ताराबाईचा पक्ष घेवून पेशव्यांविरुध्द चाल केली. त्यावेळी पेशव्यांनी दमाजीसह गायकवाड व दाभाडे मंडळीस कैदेत टाकले व गुजरातचे हिशेब आणि तुंबलेल्या बाकीची मागणी केली. त्यावेळी दमाजीने चआपण स्वत: स्वतंत्र सरदार नाही. सेनापतीचा हस्तक सेवक म्हणून कामगिरी केली. उमाबाई धनी आहेत. त्यांसी जे बोलणे ते बोलाछ३९ असे सांगितले. या दमाजीच्या वक्तव्यावरुन आणि विविध कागदपत्रांतील उमाबाईंच्या राज्यकारभाविषयक उल्लेखांवरुन उमाबाईंच्या गायकवाडांवरील अंकूशास दुजोरा मिळतो. मात्र असे असले तरी दिवसेंदिवस गायकवाडांची गुजरातमधील पुंडाई वाढतच गेली. त्यांनी वारंवार गुजरातचा वसुल देण्यास केलेल्या टाळाटाळ वरुन तसेच दमाजीच्या अंबिकाबाई दाभाडे, पेशवे यांच्याशी केलेल्या कारस्थानांवरुन ते दिसून येते. त्याचा परिणाम इ.स.१७५२ मध्ये पेशव्यांनी संधीचा अचूक फायदा घेऊन गायकवाडांशी केलेल्या तहानुसार गुजरातची अर्धी–अर्धी वाटणी करुन दाभाडेंचे सेनापती पद आणि त्यांचा गुजरातमधील कारभार यांस तिलांजली दिली.

**सारांश**

गुजरातसारख्या संपन्न प्रांतामध्ये छत्रपती शिवाजी केवळ लुट करण्याइतकेच यशस्वी ठरले परंतु गुजरात प्रांत मराठा राज्यात समाविष्ठ करण्याचे खरे कार्य दाभाड्यांनी पार पाडले. छत्रपती शिवाजींच्या काळापासून या घराण्याने अमोलीक सेवा करुन सेनापती पदापर्यंत मजल मारली परंतु पेशवाईच्या काळात मात्र पेशव्यांच्या वर्चस्ववादी राजकारणामुळे मराठ्यांच्या राज्यातील एका मातब्बर सरदार घराण्याचा अखेर अंत होऊन मराठा राज्याच्या एकनिष्ठेवर त्याचा विपरीत परिणाम घडून आला. राज्यामध्ये दुहीची बीजे रोवण्यास पेशव्यांचे हे राजकारण काही अंशी निश्चितच कारणीभुत ठरले. त्यामुळे राज्य कमकुवत बनत जाऊन अखेर इंग्रजांच्या वर्चस्वाखाली गेले. अर्थात वर्चस्ववादी राजकारणाने वर्चस्ववादी राज्याची इंग्रजांपुढे पिछेहाट झाली हे तितकेच सार्थ ठरले.

**संदर्भ सूची :**

१. लक्ष्मणशास्त्री जोशी, (संपा.), च्मराठी विश्वकोशछ, खंड ५ वा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७६, पान ५७.
२. लोकहितवादी, च्गुजरात देशाचा इतिहासछ, निर्णयसागर छापखाना, मुंबई, प्रथम आवृत्ती, १८९४, पान १०.
३. उपरोक्त ; लक्ष्णशास्त्री जोशी, घ्मराठी विश्कोशङ, खंड पाचवा, पान ५८.
४. उपरोक्त ; लोकहितवादी पान १३.
५. उपरोक्त ; लक्ष्मणशास्त्र जोशी, घ्मराठी विश्कोशङ, खंड पाचवा पान ५९.
६. अ.रा.कुलकर्णी, ग.ह.खरे, (संपा.) च्मराठ्यांचा इतिहासछ, खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, पुनर्मुद्रण, २०१३, पान २०३.
७. वि.गो.खोबरेकर, च्गुजरातेतील मराठी राजवटछ, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६२, पान ०४.
८. कित्ता ; पान ७-८.
९. गो.स.सरदेसाई, च्मराठी रियासतछ, खंड दुसरा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, नविन संदर्भासह आवृत्ती, १९८९, पान १८३.
१०. वि.गो.खोबरेकर, च्गुजरातेतील मराठी राजवटछ, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६२, पान २२-२३.
११. कित्ता ; पान २३.
१२. तैत्रव ; वि.गो.खोबरेकर.
१३. का.ना.साने, (संपा.), घ्सेनापती दाभाडे व गायकवाड यांची हकीगतङ, पान ७.
१४. कित्ता ; पान ३७.
१५. उपरोक्त ; वि.गो.खोबरेकर, घ्गुजरातेतील मराठी राजवटङ, पान २३-२४.
१६. उपरोक्त ; घ्द इम्पेरियल गॅझेटियर ऑफ इंडियाङ, ., .३१.
१७. भारत इतिहास संशोधन मंडळ, (संपा.), चऐतिहासिक संकीर्ण निबंधछ, खंड ११, घ्त्रैमासिकङ, वर्ष ५१, भा.इ.स.म., पुणे, प्रथम आवृत्ती, १९७२, पान ४२.
१८. उपरोक्त ; का.ना.साने, (संपा.), घ्सेनापती दाभाडे व गायकवाड यांची हकीगतङ, पान ७.
१९. उपरोक्त ; वि.गो.खोबरेकर, पान २५.
२०. लोकहितवादी, च्गुजरात देशाचा इतिहासछ, निर्णयसागर छापखाना, मुंबई, प्रथम आवृत्ती, १८९४, पान २६४.
२१. उपरोक्त ; वि.गो.खोबरेकर, पान २६-२७.
२२. उपरोक्त ; वि.गो.खोबरेकर, पान ४४.
२३. कित्ता ; पान ३२.
२४. अ.रा.कुलकर्णी, ग.ह.खरे, (संपा.), च्मराठ्यांचा इतिहासछ, खंड तिसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २०१०, पान ३७३.
२५. का.ना.साने, (संपा.), च्सेनापती दाभाडे व गायकवाड यांची हकीगतछ, काव्येतिहास संग्रह, डेक्कन कॉलेज, पुणे, प्रथम आवृत्ती, शके १८०९, पान ८.
२६. तैत्रव ; का.ना.साने, (संपा.).
२७. कित्ता ; पान ९.
२८. उपरोक्त ; ग.चि.वाड, (संपा.), पान ७९.
२९. उपरोक्त ; गो.स.सरदेसाई, च्मराठ्यांचा इतिहासछ, खंड ३, पान ३७९.
३०. ग.ह.ओक, घ्दाभाड्यांचा पोवाडा व त्याचे सत्यत्वङ, च्त्रैमासिकछ, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, वर्ष १३ वे , चैत्र १८५५, पान १२९-१३०.
३१. R.D.Plasokar, "Bajirao-I", Reliance Publishing House, New Delhi, 1st Edition, 1995, P.144,146.
३२. कित्ता ; पान १५२.
३३. वि.गो.खोबरेकर, च्गुजरातेतील मराठी राजवटछ, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६२, पान ३७.
३४. कित्ता ; पान ३८-३९.
३५. गो.स.सरदेसाई, (संपा.), च्पेशवे दप्तरछ, खंड १२, घ्पेशवे आणि दाभाडेङ, गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१, पान ४१.
३६. उपरोक्त ; वि.गो.खोबरेकर, पान ४२.
३७. कित्ता ; पान ४४, ४६.
३८. उपरोक्त ; गो.स.सरदेसाई, (संपा.) घ्पेशवे दप्तरङ, खंड १२, पान ७६-८१.
३९. उपरोक्त ; वि.गो.खोबरेकर, पान ५०.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# चित्रकलेचे उपयोजन व जातकचित्र

**आबासाहेब माणिकराव देशमुख**
संशोधक विद्यार्थी, कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
**डॉ.पी.डी. जगताप**
संशोधक मार्गदर्शक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**प्रस्तावना :–**

प्राचीन खान्देशावर राजकिय सत्ता असलेल्या राजघराण्यांचे राजे वैदिक धर्म व संस्कृती यांचे पुरस्कर्ते होते. खान्देशातील त्यांचे मांडलिक राजे मात्र बौद्धधर्म व जैनधर्म यांचे अनुयायी होते आणि तेच धर्मप्रसारकही बनले. हे खान्देशातील कोरलेल्या लेण्यावरून स्पष्ट होते. जगविख्यात अजिंठा लेणी क्रं.–१७ व १९ या लेण्या खान्देशचा कुंभकर्ण घराण्याचा राजा रविसम्बा यांच्या भावाने कोरल्या होत्या असे मत डॉ.टी.टी.महाजन यांनी प्राचीन खान्देशचा इतिहास या ग्रंथात आहे.

कला या शब्दाला लॅटीन भाषेत  असे म्हणतात या शब्दाच्या अर्थात सुतारकी, लोहारकी, शल्यकर्म किंवा एखादे कसब असा होतो. या मध्ययुगीन काळापर्यंत शब्दाचा अर्थ ग्रांथिक शिक्षणाची कोणतीही विशेष शाखा असा घेतला जात होता. परंतु विदयेच्या पुनरूज्जीवनामुळे प्रथम इटलीत व नंतरच्या काळात या शब्दाच्या अर्थाची पुनरूस्थापना झाली. सांस्कृतिक घटक व सांस्कृतिक जीवन व्यक्त करण्याचे एक महत्वपूर्ण साधन म्हणून कलेकडे पाहिले जाते.या कलाप्रकारात काव्य, संगीत, नृत्य यासारख्या गतीमान ललित कला तसेच चित्र, मूर्ती, स्थापत्य, वास्तु यासारख्या स्थिर ललितकला ठरतात. कलांचे विस्तृत स्वरूपात अध्ययन करून स्वरूप व उपयोगितेनुसार उपयोगी व नाजूक तसेच कलाकारीतेपूर्ण सुक्ष्म स्वरूप म्हणून ललित कला असे वर्गीकरण करता येईल. यातीलच एक महत्वपूर्ण कला म्हणून चित्रकलेकडे पाहीले जाते. राष्ट्रातील प्रत्येक घटकाला एक आणण्याचे काम कला करत असतात. त्यामुळे राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक जडण घडणीत कलेची महत्वाची भूमिका आहे. सुंदरतेबरोबर मानवी मनातील भावना उत्स्फर्तपणे व तेवढयाच ताकदीने मांडण्याचे कार्य कलेच्या माध्यमातून होत असते. अशाच चित्रकलेच्या दृष्टीने संपन्न असलेल्या अजिंठा लेणी ह्या (७५० ४५ , २०० ३० ) स्थानी औरंगाबाद जिल्ह्यात सोयगाव तालुक्यात आहे. जागतिक वारसास्थळात स्थान मिळविणाऱ्या या ३० गुफा २  चित्रकलेच्या क्षेत्रात आपले विशिष्ट आस्तित्व टिकवून आहेत. कला, धर्म, विज्ञान, इतिहास , तत्वज्ञान या पाच टप्प्यातून सत्य उलगडत असते. ३  यासाठी व्यक्तीला नितीशिक्षण देण्यासाठी या गुंफेतील जातकचित्र महत्वपूर्ण ठरतात. अजिंठयातील या गुंफा दोन चरणांमध्ये उत्कीर्ण करण्यात आल्या. इ.स.पू. १ ते इ.स.२ तसेच इ.स.४ ते इ.स.६ या दोन टप्प्यातील पहिल्या टप्प्यात लेणी क्रं.८, ९,१०,१२,१३,१५   या हिनयान पंथीय लेणी आहेत. दुसऱ्या टप्प्यातील लेणी या गुप्त व वाकाटक कालीन आहेत. ४  सर्वच लेण्यामध्ये चित्र सुस्थितीत नाहीत मात्र लेणी क्रं.१,२,१६,१७ यातील चित्र इतर लेणींच्या तुलनेत सुस्थितीत आहेत. अजिंठा चित्रशैलीने चीनी व जपानी चित्रशैलीला देखील प्रभावित केले आहे. गुप्त काळात समाजातच चित्रकला महत्वाची मानली जात होती. राजकुमार, राजकुमारी, समाजातील उच्चप्रतिष्ठित लोक यांच्यात चित्रकला विशेष महत्वाची मानली जाती त्यामुळे चित्रकला हे अविष्काराचे सशक्त माध्यम मानले जात होते. चित्रात रूपभेद, लावण्ययोजन, वर्णिकाभंग, साहश्य, प्रमाण हे महत्वाचे भाग मानले जातात या सर्वांचा विचार अजिंठा जातक चित्रात दिसून येतात. अजिंठा येथील कलेला वत्सगुल्य म्हणजेच सध्याचे वाशिम येथील शाखेचा राजाश्रय होता. तर दुसरी शाखा प्रथम नंदीवर्धन म्हणजेच सध्याचे नगरधन येथून आणि प्रवरपूर येथून राज्य करत होती. ६  भौगोलिक विभागवाचक नामाधिनांचा स्विकार करून या कलेला सहाव्या शतकातील 'अपरान्त कला' असे मत अ.प्र.जामखेडकर यांनी नोंदविले आहे. प्रस्तुत संदर्भ दार्शनिकेत आहे. प्रौगेतिहासिक काळापासून नैसर्गिक रंगाचा चित्रकलेत वापर होत असून आजही आास्तित्वाच्या रूपाने आपले अभिजात सौंदर्य टिकवून ठेवले आहे. अजिंठा (इ.स.पू २ ते इ.स.५) पितळखोरे (इ.स.पू–५–७) वेरूळ (इ.स.पू.६ ते इ.स.१०) ही याचीच उदा. आहेत. अजिंठयाच्या लेणीचित्रात आढळून येणाऱ्या चित्रांचा मुख्य विषय हा 'जातककथा' आहेत. जातककथा म्हणजे पूर्वजन्मीच्या पूर्वजन्मासंबंधी कथा होय. बुद्धांनी बोधिसत्व रूपापासून बुद्धत्वाची प्राप्ती करेपर्यंत अनेक जन्मांचा जो प्रवास केला यात मानव, प्राणी वा तत्सम रूपातील केलेले कार्य यांचे वर्णन या जातककथांमध्ये आढळते. यात ५५० जातककथामधील काही ठिकाणी बुद्धाला मध्यवर्ती स्थान काही ठिकाणी सामान्य पात्र त काही ठिकाणी केवळ दर्शकरूपात दाखविले आहे. ७  दहा पारमिता पूर्ण करून जगाच्या कल्याणार्थ कार्य करणारे गौतम बुद्ध अजिंठयातील चित्रकारीतेचा केंद्रबिंदू आहे. या जातककथांनी केवळ कलात्मक रूपच जोपासलेले नाही तर भिक्खु व स्थळास भेट देणाऱ्या तत्कालीन व्यक्तीस धम्मशिक्षण व नीतीशिक्षण देण्याचेही कार्य केले आहे. एनसायक्लोपीडीया ब्रिटानिकानुसार डॉ.जॉन्सन यांनी जे मत मांडले आहे त्यात शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ प्राणी किंवा अचेतन पदार्थ यांना पात्राच्या स्वरूपात कल्पित केले जाते. अजिंठा लेणीचित्रातील या जातककथा नीतीशिक्षण देण्यास फायदेकारक ठरल्या आहेत. वर्तमान परिस्थितीचा विचार करता अनेक समस्यावर तोडगा या जातककथेच्या माध्यमातून मिळू शकतो. सामाजिक, आर्थिक,राजकिय दृष्टीकोनाचा विचार करता भूतकाळातील अनेक

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

नैतिक मूल्य जीवंत ठेवण्यास या जातककथांनी तद्अनुषंगाने जातकचित्रांनी केले आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा–**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने रॉयल एशियाटिक सोसायटी इतिवृत्त (१८२९) बॉम्बे कुरीयर (१८३९) सर जेम्स फर्ग्युसन (१८४३) रॉबर्ट गील (१८४४–१८५७) जॉन ग्रिफीथा (१८७५) लेडी हॅरींगहॅम (१९१५) मि.बिऑन, मि. फर्ग्युसन बर्गेस (१८७२) श्री.मधुकर ढवळीकर, प्रा.जामखेडकर, डॉ.देशपांडे, वाल्टर स्पिंक्झ विद्या दहेजिया, देबाला मित्र, रामचंद्र अप्पा, बिळगी, प्रा.डॉ.पी.डी.जगताप, डॉ.सारंग देशमुख यांनी लेखन केले आहे. प्रस्तुत लेणींच्या अनेक दृष्टीकोनातून विचार करून प्रकाश टाकण्याचे कार्य करण्यात आले आहे.

**गृहीतके–**

१) जातकचित्रांनी नीतीशिक्षण देण्याचे कार्य केले आहे.

२) चित्रकारीतेतील विविध तंत्राचा अजिंठा लेणीचित्रात प्रभावपूर्ण वापर केला आहे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक, ग्रंथालय संशोधन पद्धती, निरीक्षण व क्षेत्रभेट पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रत्यक्ष निरीक्षणाबरोबर प्राथमिक व दुय्यम साधनांचा अवलंब करण्यात आला आहे.

**विवेचन –**

अजिंठा येथील लेणीमध्ये लेणी क्रं.१ मध्ये शिबीजातक, महाजनक जातक, शंखपाल जातक, चांपेयजातक, गुंफा क्रं.२ मध्ये क्षांतिवादी जातक, हंस जातक, रूरू जातक, विधुरपंडीत जातक गुंफा क्रं.१६ सुतसोम जातक, शरभ जातक, मत्स्य जातक, महिष जातक, मातृपोषक जातक, शिबी जातक, मृग जातक यांचे चित्रांकन करण्यात आले आहे. त्याग, ध्यान, उपासना या परीपुष्ठ झालेल्या भावनांना दर्शविण्याचे कार्य लेणीचित्रांनी केले आहे. या कलेचे मनोरम वैशिष्टय म्हणजे माणसाच्या दैनंदिन व्यवहाराला एक प्रकारचा आध्यात्मिक दर्जा बहाल केला आहे. ८ कथेच्या अनुषंगाने रेखाटण्यात आलेली ही जातकचित्र पाहणाऱ्यास तादात्म पावण्यास उद्युक्त करतात. कथानकातील पात्र त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, सुक्ष्मतेने विचार करून कलाकृतींना दिलेला आकार या सर्वच गोष्टीमुळे ही जातकचित्रे व्यक्तीच्या मनावर खोलवर ठसा उमटविण्यात यशस्वी झाली आहेत. ग्रिफीथ यांच्या मतानुसार या लेणीचित्रात वापरलेली चित्रकलेची तत्व ज्यात सामीप्य , दुरत्व, कुशलता व योजकता आकृतीचे आयोजन, प्रयोजन यासर्वच गोष्टींमुळे ही चित्र रम्य ठरली आहेत. संप्रयोजन रचना, कलाकारीता ९ प्रमाणपबद्ध ताल व तोल, प्रकाश, छाया, गडद व शीत रंग यांचा प्रभावीपणे वापर, रंगप्राधान्य, प्रमाणबद्धता, धन व ऋणआकारांचा वापर, कथानकांचा सलग मांडणी या चित्रकलेच्या तंत्रामुळे अजिंठा जातकचित्र अप्रतिम ठरली आहे. निरीक्षणाअंती काही मुद्यांचा उहापोह करणे क्रमप्राप्त आहे. अवधान केंद्रीत करण्यासाठी तांबडा व नारींगी रंगास अग्रहक्क आहे. १० तांबडा, नारींगी, हिरवा असा साधारण क्रम आहे. अवधान केंद्रित करणाऱ्या रंगाचा प्रकर्षाने वापर केलेला आढळून येतो. रंगाच्या वापरांमुळे

भावस्थिती बदलतात बदलणाऱ्या भावांमुळे रंगांना प्रतिकात्मक व सांकेतिक अर्थ प्राप्त होतात. त्यामुळे संकल्पानात्मक रचनेतून मानवी मनावर पकड घेणारी चित्ररचना लेणीत आढळून येते. नैसर्गिक, अलंकारीक, भौमितिक, केवलरूप रचनेमुळे चित्रांचे रेखाटन नाविन्यपूर्ण ठरतात. धम्मसंमत व शिष्टसंमत वागण्याची पद्धत म्हणजे आचार कदाचार निंदय ठरवून सदाचार आचरण्याची शिकवण जातकचित्र देतात. योग्य आचाराबरोबरच भूमी व पारमितांच्या अवलंबनाचा संदेश यातून मिळण्यासाठी चित्रकलेचा प्रभावी वापर आढळून येतो.

**निष्कर्ष –**

१) जातककथांमधुन नितीशिक्षण मिळते. जातककथांनी चित्रकला व स्थापत्यकलेला विषय पुरविण्याचे कार्य केले आहे.

२) कथेच्या माध्यमातून तत्व व्यक्तीच्या ठायी रूजविता येतात. त्यामुळे अनादी काळापासूनची कथाप्रियता हा दृष्टीकोन लेणीचित्रात अंतर्भूत आढळून येतात.

३) अनेक मानसशास्त्रीय दृष्टीकोन व ललित कलेतील स्थिर अशा चित्रकलेत प्रभावीतेच्या दृष्टीने लेणीचित्रात तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**संदर्भ सूची :**

१) कॉलीनवुड आर.जी.अनु. (मालशे स.ग.) कलेची मुलतत्वे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्र.आ.–२००४ पृ.क्र.२१

२) देबाला मित्र : अजिंठा ,भारतीयस पुरातत्व विभाग २००३ पृ.क्र.१

३) कित्ता

४) संपादक पाठक अरूणचंद्र–महाराष्ट्र राज्य गॅझेटियर स्थापत्य व कला खंड १–२ दार्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई–२००८

५) उपाध्याय भागवत शरण गुप्तकाल का सांस्कृतिक इतिहास पृ.क्र.१८५

६) संपादक पाठक अरूणचंद्र–महाराष्ट्र राज्य गॅझेटियर इतिहास प्राचीन काळ खंड–१

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

७) भदन्त आनंद कौसल्यायन : जातक प्रथम खण्ड, हिंदी साहित्य संम्मेलन प्रयाग -१९९४ पृ.क्र.१२
८) खॉजा मोहमंद अहमद- अजिंठा लेणी आणि चित्र, हैद्राबाद सरकारचे आर्षविज्ञान खाते हैद्राबाद व्दि.आ.१९५०
९) कित्ता पृ.
१०) आखाडे शांतिनाथ -दृककला मुलतत्वे आणि आस्वाद, गो.यं.राणे प्रकाशन
११) संस्कृतीकोश पुणे खंड-११० पृ.३१७
१२) महाजन टी.टी. प्राचीन खानदेशचा इतिहास, दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि.पुणे व्दि.आ.२००९

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# पश्चिम खानदेशातल्या साक्री तालुक्यातील सण-उत्सव व त्यासंबंधीची अहिराणी बोलीतील ओवीगीते

**प्रा.डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके**
सी.गो. पाटील महाविद्यालय,
साक्री, ता. साक्री, जि. धुळे.

**प्रस्तावना**

खानदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेला 'अहिराणी' या नावाने ओळखले जाते. अहिराणी ही खानदेशातील कष्टकरी लोकांची मायबोली आहे. ती सहित्याच्या सर्व अंगांनी समृध्द आहे. अहिराणी बोलीत विपुल असे लोकसाहित्य सामावलेले आहे. अहिराणी लोकसाहित्याचा उगम विविध सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीतून झालेला आहे. अहिराणी बोलीभाषेत मौखिक परंपरेने लोकगीते, लोककथा, म्हणी, वाकप्रचार, उखाणे यांचा जन्म होत राहिला व मानवी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यत हा साहित्याचा ठेवा संक्रमीत होत राहीला. अहिराणी लोकांचे सहित्य देव- देवता, सण-उत्सव, रुढी-परंपरा यांच्या अनुषंगाने निर्माण होत राहिले. या साहित्याचा निर्माता कोणीएक असला तरी त्याला प्रातिनिधीक समजून समुहाचा शिक्का असल्यामुळे समुहाचे सहित्य म्हणून अहिराणी लोकसाहित्याचा उल्लेख करता येतो.

अहिराणी ओवीगीते रुढी परंपरेतून अविष्कृत झालेली आहेत. ही ओवीगीते जशी लोकदैवतांची आहेत तशीच लोकसण- उत्सवांच्या संबंधीचीही आहेत. कारण खानदेशात अनेक सण- उत्सव मोठया प्रमाणात साजरे केले जातात. त्या सण -उत्सवांमधूनच खानदेशची सांस्कृतिक जडण- घडण झालेली आहे. हया सण-उत्सवांच्या वेळी आजही खानदेशात विविध लोकगीते-ओवीगीते म्हटली जातात. कारण ही ओवीगीते मानवी जीवनाच्या तालासुरांशी नातं जोडणारी आहेत. या ओवीगीतांनी विविध प्रकारचे अलंकार, रस, छंद, गंध, अर्थ ल्यालेला आहे. त्यामुळे अहिराणी ओवीगीतांमध्ये एकप्रकारची गोडी असून त्यात प्रेम, जिव्हाळा, निर्मळपणा, विचार, भाव- भावना निर्व्याजता असे अनेक गुण ओतप्रोत भरलेले आहेत. अहिराणी ओव्या म्हणजे खानदेशातील स्त्रीच्या मुखातून हदयाच्या गाभाऱ्यातील निघणारे भावमयी शब्द होत. हे शब्द विविध सण-उत्सवांच्या प्रसंगी आजही खानदेशातील स्त्रीच्या मुखातून आपोआपच ओवीरुपाने बाहेर पडत असतात.

**खानदेशातील सण-उत्सव**

खानदेशी जनता ही मुळातच देवभोळी व उत्सवप्रिय आहे.खानदेशात विविध सण- उत्सव मोठया प्रमाणात आनंदाणे व एकदिलाने साजरे केले जातात. त्यातूनच खानदेशच्या संस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले आहे. माणूस समाजशील प्राणी आहे. चाकोरीबध्द जीवन जगत असतांना सर्वांना एकत्र येता यावं, थोड वेगळं जीवन जगता यावं, मन प्रसन्न, उत्साहीत व्हावं जगण्यासाठी नवी उर्जा मिळावी म्हणून वर्षभराच्या कालावधीत गुढीपाडव्या पासून तर थेट होळीपर्यंत विविध उत्सावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. या सण-उत्सावांच्या निमित्ताणे देखील विविध अहिराणी लोकगीतांची निर्मिती झालेली आहे. त्यात अक्षयतृतियेची गौराईची, गुलाबाईची, कानुबाईची, दिवाळी दसऱ्याची व पोळा सणांची ओवीगीते आढळून येतात. काही सण -उत्सावांची माहिती व त्यासंबंधीची ओवीगीते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अक्षयतृतीया**

हा खानदेशातील महत्वाचा सण आहे. साडेतीन शुभ मुहुर्तापैकी हा एक शुभ मुहुर्त मानला जातो. वैशाख शुदध् तृतीयेला हा सण येत असतो. या सणाला खानदेशातील स्त्रियांचे लोकदैवत असलेल्या गौराईची पूजा केली जाते. चैत्र महिण्याच्या चावदसला खानदेशात घरोघरी गौराईची मांडणी केली जाते. गौराई हे पार्वतीचे रुप मानले जाते सासुरवाशिनीला माहेरचे सुख , आनंद देणारी ही देवता आहे. या सणाच्या निमित्ताने सासुरवाशीण मुली माहेरी येतात. हा सण सासुरवाशीनीला प्रिय असतो. चैत्र पौर्णिमेपासून ते अक्षयतृतीया पर्यंत मुली व माहेवाशिनी झोक्यावर बसून गौराईची गाणी म्हणतात. फुगडया खेळतात. टिपऱ्या खेळतात. आखाजी सारखा सन-सन मना टिपरा खेयानां असे म्हणत आखजी सणाचे गाणे गातात. खानदेशात अहिराणी बोलीभाषेत गौराईची गाणी विशेष प्रसिदध् आहेत जसे.-

*चैत्र वैशाखनं ऊनं व माय वैशाखनं ऊनं*
*खडक तापी झायात लाल व माय तापी झायात लाल*
*गौराईना पायले वनात फोड व माय पायले वनात फोडं*
*संकर निंघना घोडयावर व माय निंघना घोडयावर*
*मायले ठेवं फुलेस्वर व माय ठेवं फुलेस्वर*

आखाजीच्या सणाच्यावेळी सगळीकडे आनंदी आनंद आहे. अशा वातावरणात टिपऱ्या खेळण्यासाठी सासुरवाशीन आपल्या नातेवाईक स्त्रियांकडे विविध दागदागिन्यांची मागणी करीत आहे. अशा आशयाचे गाणे पुढील प्रमाणे-

*उना आखाजीना सन वं माय केसर दणदणी*
*वहिणी तुमन्या बांगडया दिशात कावं माय केसर दणदणी*
*काकू तुमना कांकण दिशात कावं माय केसर  दणदणी*

**कानुबाईमातेचा उत्सव**

कानुबाई ही खानदेशची प्रमुख लोकदेवता आहे. किंबहुना कानुबाईचा देश म्हणुन खानदेश ओळखला जातो. असा अभिप्राय सयाजी पगार यंती मांडला आहे. महाराष्ट्रात खानदेश खेरीज कुठेही कानुबाईचा उत्सव साजरा केला जात नाही. शहादा तालुक्यातील प्रकाशा, साक्री तालुक्यातील रुणमळी, बळसाणे आणि कासारे, चाळीगाव तालुक्यातील उंबरखेडे या गावांना कानुबाई मातेची मंदिरेही आढळतात. श्रावण महिन्यात नागपंचमी नंतर येणाऱ्या रविवारी कानुबाईची स्थापना केली जाते व सोमवारी तिचे वाजत – गाजत नाचत विसर्जन केले जाते. कानुबाईचे 'रोट' खानदेशात प्रसीध्द आहेत. ती नवसाला पावणारी देवता आहे. अहिराणी बोलीभाषेत कानुबाईच्या गण्यांचा मोठा खजीना आहे. कानुबाई माय आपल्या घरी कोणत्या रुपात आली आहे तो आशय स्पष्ट करणारे पुढील गीत–

*कसाना मिसे वनी वं मनी कानुबाईमाय –२*
*नारयना मिसे वनी वं मनी कानबाईमाय –२*
*माय तुनं शिर नारयन माय नारयनं –२*
*चौरंग बाजवर बसनी वं मनी कानबाईमाय–२*
*मंडप टाका द्राक्षसना माय द्राक्षसना  –२*
*वाजा वाजे गुरवसना माय गुरवसना –२*

ही  छोटीशी कानुबाई काय – काय करामत करते ते पुढील ओव्यातून लक्षात येते.

*एवढशी कानुबाई ठुमकनी माय ठुमकनी  – २*
*कसाना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*नारयना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*खोयभर नारय तोडी लयनी माय तोडी लयनी  –२*
*एवढशी कानुबाई ठुमकनी माय ठुमकनी ज़् २*
*खारीकना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*खोरभर खारका तोडी लयनी माय तोडी लयनी –२*
*एवढशी कानुबाई ठुमकनी माय ठुमकनी –२*
*सोपारीना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*खोयभर सोपाऱ्या तोडी लयनी माय तोडी लयनी –२*

अशा प्रकारची बहुतांश ओवीगीते कानुबाईच्या उत्सवाच्या वेळी गायली जातात.

**गुलाबाईचा उत्सव**

महाराष्ट्रात इतर ठीकाणी 'भुलाबाई' या नावाने  ओळखल्या जाणाऱ्या देवतेस खानदेशात 'गुलाबाई' म्हणतात. भाद्रपद पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत महिणाभर गुलाबाईचा उत्सव चालतो. शंकराची पत्नी पार्वती तीच गुलाबाई होय. गुलाबाई कुवाऱ्या मुलींची देवता आहे. गुलाबाईची गाणीही खानदेशात खुप प्रसिदध् आहेत.

*सा बाई सू, सा बाई सू*
*बेलाच्या  झाडाखाली महादेव तू*
*हारं गुंप्पीला, वीडा रंगीला*
*गुलाबाचे फूल माझ्या गुलाबाईला*
*मोगऱ्याचे फूल माझ्या गुलाबाईला*
*जास्वंदीचे फूल माझ्या गुलाबाईला*

अशा प्रकारे प्रत्येक कडव्यात एका फुलाचा उच्चार करत तीण–चार कडव्यांचे गाणे गातात व फेर धरुन नाचतात आणि आपला आनंद व्यक्त करतात.

**पोळा**

पोळयाचा सणही खानदेशातील महत्वाचा सण आहे. 'पोया आणि सन करे गोया' अशी एक म्हणच अहिराणी भाषेत प्रसिदध आहे

कारण पोळा हया सणानंतरच सर्व सणांना सुरुवात होते कृषीसंस्कृतीशी तो सण निगडीत आहे व शेती कामासाठी लागणारे बैल हे शेतकऱ्याचे दैवत आहेत त्या बैलांना पूजण्यासाठी वर्षातून एकदा कामातून विसावा देण्यासाठी 'बैलपोळा' हा सण साजरा केला जातो. बैल हा खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचा आसरा असतो तो वर्षभर शेतात राब –राब राबतो म्हणून पोळयाच्या दिवशी त्याची देव म्हणून पूजा करुन त्याला गोडधोड असा पुरणपोळीचा नैवद्य खायला घालून त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली जाते असा आशय पुढील ओवींतून व्यक्त होतो.–

*पोया पोया करु बैल कुनबीना आसरा*
*नंदीले ववायले, सन नहीना दुसरा*
*आज पोयानावं सन ,सासू पोटले कायीमायी*
*धवया पवया आज तुमले , कयी पुरननी पोयी*

वरील सणांप्रमाणेच गुढीपाडवा, गणपती, मकरसंक्रात, होळी आदि सणही खानदेशात साजरे केले जातात व त्या सणांचीही गाणी म्हटली जातात.

अशा प्रकारे खानदेशात विविध सण–उत्सव अतिशय मनोभावे साजरे केले जातात व अहिराणी बोलीतील ओवीगीतातुन त्या सण–उत्सवा बद्दलची महती सांगीतली जाते त्यातून खरोखरच खानदेशची अहिराणी संस्कृती आपल्या दृष्टीस येते.

**दसरा सण**

दसरा हा सण खानदेशातला अतिशय आनंदाचा सण असतो दसऱ्याच्या आधी दहा दिवस देवांच्या रुपाने घट बसवले जातात व ते दसऱ्याच्या दिवशी उठवले जातात. दारात सडा– रांगोळी घातली जाते. खायला गोडधोड खानदेशचा खास आवडता मेनू पुरपपोळीचा स्वयंपाक केला जातो. संध्याकाळी सर्वगावकरी मिळून सिमोल्लंघन करतात. रात्री घरोघरी एकमेकाच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून आपटयांची पाणे (त्या पानांना त्या दिवशी सोने म्हणतात ) वाटले जाते तेव्हा आपल्यापेक्षा मोठयांचा पाया पडून त्यांचा आशीर्वाद घेतला जातो. त्या दिवशी सर्व लहान थोर मंडळी आनंदी असतात म्हणूनच त्या दिवशी, 'दसरा सण मोठा नाही आनंदाचा तोटा' असे म्हटले जाते व त्याचा प्रत्येय सर्वाना येत असतो त्या आशयाच्या अहिराणी ओव्या पुढील प्रमाणे–

*आज दसरा दसरा आज सन सिलांगन*
*दारी घाला वं रांगोया, सकाये सारा व आंगन*
*आज दसरा दसरा ,लुटा जिवशीना तोटा*
*मोठलास्ना पडा पाय, धाकलास्ले भेटे घाटा*

**दिवाळी उत्सव**

दिवाळीचा सणोत्सव हा खानदेशातला ५–६ दिवस चालणारा ( वसुबारस पासून ते भाऊबीजपर्यं ते) मोठा सणोत्सव असतो. हा सण सासुरवाशिणींचा अतिशय प्रिय सण असतो. या सणाच्या निमित्ताणे माहेरचा सहवास तीला अधिक लाभतो. हा सण जवळ आला म्हणजे सासुरवाशीण बहिण आपल्याला घ्यायला येणाऱ्या भावाची आतुरतेने वाट पाहत असते तीला माहेरी जाण्याची फार हुरहुर लागलेली असते. म्हणून ती आपल्या भावाची दररोज वाट पाहत असते ती म्हणते–

*दसरापासीन दिवायी ईस रोज*
*मना बंधुनी वाट दखस मी रोज,*

बहिणीला घ्यायला आलेल्या भावाला परत पाठवू नका सासुबाई असे सांगतांना ती म्हणते–

*दिवायीनं मूय नका परतावा आत्याबाई*
*बहिनना बिगर भाऊ किलवाना जाई*

ही सासुरवाशीण बहिण दिवाळीला माहेरी आल्यावर तीला आई ,वडील, भाऊ, बहिणी असे सर्व गणगोत भेटते त्यामुळे घरात आनंदी वातावरण असते या आशयाच्या ओव्या पुढील प्रमाणे–

*माय दिवायी दसरा आते, दुखले ईसरा*
*आनन कराले सन नहीतवं दुसरा*

दिवाळीला शेतीच्या कामांची लगबग सुरु असते मात्र भावाला ओवाळायला दिवाळीसारखा दुसरा सण नसतो या आशयाच्या ओव्या पुढील प्रमाणे–

*दिवायी दसरा खेतीबाडीना पसारा*
*भाऊले ववायाले सन नहीसे दुसरा*

दिवाळी पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी भाऊबीज असते बहिण भावाला ओवाळते व त्या बदल्यात मला भरजरी साडी चोळी घेऊन दे असे

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

हक्के ने सांगते अशा आशयाच्या ओव्या पुढीलप्रमाणे–

*भाऊबीजना रोज भाऊ मी ववायस तुले*
*नवी भरजरी साडी आणि चोयी शीव माले*

**सण – उत्सवांविषयी माहिती व ओव्यांची प्राप्ती**

१) श्रीमती मंदोदराबाई श्रीराम साळुंके. मु. पो. शेवाळी ता. साक्री जि. धुळे

**संदर्भ सूची :**

१) श्रीमती भागवत दुर्गा – लोकसाहित्याची रुप रेखा – वरदा बुक्स पुणे.
२) डॉ. पगार स. निं. – खानदेशातील ग्रामदैवते व लोकदैवते – का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे.
३) डॉ. बाबर सरोजिनी – मराठीतील स्त्रीधन – कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
४) डॉ. मांडे प्रभाकर – मौखिक वाङमयाची परंपरा स्वरुप आणि भवीतव्य – गोदसवरी प्रकाशन औरंगाबाद.

‘RESEARCH JOURNEY’ *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# प्राचिन, मध्ययुगीन व पेशवेकालीन खानदेशातील राजकिय परिस्थिती

**प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे**
श्रीमती विमलबाई उत्तमराव कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री, जि. धुळे.

**प्राचीन खानदेश**

खानदेशमध्ये तापीच्या परिसरात प्रागऐतिहासिक काळात वसाहती होत्या. ही गोष्ट प्रकाशे येथे झालेल्या उत्खनावरुन सिद्ध झाली आहे. महाभारतात तोरणमाळचा राजा युवानाश्व याचा उल्लेख आहे. त्याने पांडवांचा पक्ष स्वीकारलेला होता. युवानाश्व राजाचे स्वतंत्र राज्य होते. ऐतिहासिकदृष्टया तोरणमाळचा प्रदेश प्राचीन असून या प्रदेशात अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. मौर्यकाळात खानदेशभागापर्यंत सम्राट अशोकाच्या सत्तेचा विस्तार झाला होता. हे देवटेक येथील शिलालेखावरुन स्पष्ट होते. सम्राट अशोकाच्या निधनानंतर दक्षिणेकडील सातवाहनांनी खानदेश प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केले. नाशिक लेण्यातील एका शिलालेखावरुन सातवाहन सम्राट दुसरा याची सत्ता इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात खानदेशावर होती हे स्पष्ट होते.१ इ.स. च्या पाचव्या शतकापासून खानदेशभागावर अभिरांची सत्ता प्रस्थापित झालेली दिसून येते. नाशिक येथील लेण्यातील शिलालेखावरुन विरसेन अभिराची सत्ता नाशिक व खानदेशभागावर होती असे दिसून येते. सुमारे दोन शतके अभिरांची सत्ता खानदेशवर असावी असे दिसते. अभिर राजे खानदेशात गौळीराजे म्हणून ओळखले जातात. अभिर या शब्दाचे रुपांतर अहिर असे असून आजही अहिर, शिंपी, सुतार इत्यादी जाती आहेत. अभिरांचा महाभारतामध्ये उल्लेख सापडतो.२ खानदेशच्या इतर भागात राष्ट्रकुटांची राजवट प्रदीर्घ काळ होती. खानदेशात अनेक ठिकाणी राष्ट्रकुटांचे ताम्रपट सापडलेले आहेत.३ राष्ट्रकुटानंतर खानदेशवर यादवांची सत्ता प्रस्थापित झाली. खानदेशात यादवकालीन हेमांडपंथी मंदिरे अनेक ठिकाणी आहेत. मेथी, बळसाणे, चांगदेव, झोडगे इत्यादी ठिकाणी उत्कृष्ट हेमांडपंथी मंदिरे बांधलेले आहेत. बळसाणे येथील मंदिरे यादवकालीन स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. १३१२ पर्यंत खानदेशवर यादवांची सत्ता होती.४ मुसलमानी राजवटीपूर्वी प्राचीन काळात खानदेशवर मौर्य, शुंग, सातवाहन, अभिर, राष्ट्रकुट, बदामीचे चालुक्य, शिलाहार, देवगिरीचे यादव इत्यादींची सत्ता होती.५ प्राचीन काळातील खानदेशच्या इतिहासाचा प्रारंभ आसिरगड व तोरणमाळ या डोंगरी किल्ल्याच्या संदर्भापासून सुरु होतो. टॉलेमी या ग्रीक भूगोल शास्त्रज्ञाने तोरणमाळचा उल्लेख त्याच्या ग्रंथात घतिआतुराङ या नावाने केलेला दिसून येतो. खानदेशला महाभारतकाळात खांडववनभूमी म्हणून संबोधले जात असे. ही भूमी श्रीकृष्णाची भूमी म्हणूनही ओळखली जात होती. म्हणून या प्रदेशात श्रीकृष्णाची भक्ती करणारे असंख्य लोक वास्तव्य करुन होते.६

**मध्ययुगीन खानदेश**

१२९६ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूरने खानेदशवर स्वारी केली. तेव्हापासून अठराव्या शतकापर्यंत हा भाग मुसलमानी वर्चस्वाखाली राहिला. तुघलक राजवटीच्या अमदानीत फिरोज तुघलकाने खानदेशचा कारभार फारुकीराजा मलिक नासिरखान याच्याकडे सोपविला होता. थाळनेर हे त्याचे केंद्र होते. फारुकी घराण्याची राजवट खानदेशवर जवळपास २०० वर्षे होती. त्यांनी स्वतंत्रपणे कारभार सांभाळला. फारुकी घराण्याचा राजा मलिक नासिरखान व त्यांचे वंशज यांना घखानङ ही पदवी होती. या घराण्यातील नासिरखानाच्या नावावरुन या प्रदेशला घखानदेशङ या नावाने संबोधले जाऊ लागले.७ मध्ययुगीन काळात खानदेशात फारुकी घराण्यातील शासकांचे राज्य होते. ६ जानेवारी १६०१ मध्ये अकबराने खानदेशातील आसिरगड हा महत्वाचा किल्ला जिंकून घेतला व तेव्हापासून खानदेश मोगल साम्राज्यात समाविष्ट करण्यात आला. आणि त्यावर मोगल राजपुत्र दानियलची नेमणूक करण्यात आली. त्यामुळे खानदेशचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आले.८ सतराव्या शतकातील एक प्रवासी इटालीवा कैहेरी भारतात १६९५ पासून प्रवास करीत होता. मोगलांच्या कारभाराबद्दल तो म्हणतो की, राज्यांच्या सचिवांना आपल्या प्रांताची तपशीलवार माहिती आपल्या राजाला देण्यासाठी आठवड्याचे वेगवेगळे दिवस वाटून दिलेले होते. त्यात खानदेश अथवा बऱ्हाणपूरसाठी शनिवार आणि दख्खनसाठी रविवार अशी विभागणी केली होती.९ मोगल काळात दख्खनचे सहा सुभे अथवा प्रांत बनविण्यात आले होते. १)खानदेश २)वऱ्हाड ३)औरंगाबाद ४)बिदर ५)विजापूर ६)हैद्राबाद इत्यादी तर खानदेश सुभ्यात १)असिर २)बागलाण ३)विजागड ४)हंडिया ५)नंदुरबार ६)जालना या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला होता.१० असिरगडाच्या वेढ्या प्रसंगी भडगावच्या रामजीपंताने महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याने त्याला अकबराने नशिराबाद, एरंडोल, जामनेर, बहाळ आणि भडगाव ही गावे जहागिरी म्हणून दिलीत. रामजीने या भागाची भरभराट केली व भडगावलाच आपले ठाणे ठेवले. त्याच्या निधनानंतर त्याची पत्नी लाडकूबाई हिने कारभार चालविला. तिने ३०० दरोडेखोरांना ठार केल्याचा उल्लेख आढळतो. याचकाळात अबुल फझल काही काळ खानदेशचा सुभेदार होता.११ महाराष्ट्रात मराठ्यांनी स्थापन केलेले राज्य पेशवे काळात साम्राज्यात रुपांतर झाले. १७५२ मध्ये खानदेश सुभ्याचा बहुतांशी भाग त्यांनी आपल्या साम्राज्याला जोडला होता. त्यानंतर उर्वरित भाग १७६० मध्ये आपल्या ताब्यात आणला होता. असा

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

खानदेशचा भाग मराठा साम्राज्य अस्ताला जाईपर्यंत मराठ्यांचा ताब्यात होता.१२

**पेशवेकालीन खानदेश**

सन १६९७–९८ मध्ये नंदुरबार परगण्यावर मराठ्यांनी स्वारी केली. थाळनेरचा मोगल सुभेदार हुसेन अलीखान याचा पराभव करुन नंदुरबार शहर मराठ्यांनी लुटले. मराठ्यांचे चाळीस हजार सैन्य खानदेश परिसरात पसरले होते. खानदेशच्या प्रदेशातूनच मराठ्यांच्या फौजा माळव्यावर आक्रमण करीत. तसेच उत्तरेतून खानदेशमार्गे मोगल तळावर येणारा खजिना मराठ्यांनी अनेकदा लुटल्याची नोंद आढळते. बऱ्हाणपूर ते अजिंठा या मार्गावरही धुमश्चक्री होत असे. १६८० ते १७०७ या काळात खानेदशवर मोगलांचे बारा सुभेदार होऊन गेलेत. कोणालाही मराठ्यांचा पूर्णपणे बंदोबस्त करणे शक्य झाले नाही.१३ पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी सैय्यद बंधूंना मदत केल्यामुळे दख्खनमधील सहा सुभ्यांची चौथाई वसूल करण्याचा हक्क प्राप्त केला होता. परंतु निजाम उल–मुल्कने मराठ्यांना विरोध केल्यामुळे मराठा–निजाम यांच्यात संघर्ष  झाला. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत निजामाशी १७५२ मध्ये घ्भालकीचा तहङ झाला. या तहान्वये मराठ्यांना गाळणा, संगमनेर आणि खानेदशचा बराच भाग निजामाकडून मिळाला. व १७६० पर्यंत संपूर्ण खानदेश मराठ्यांनी मिळविला.१४ १७६३ मध्ये निजामाने माधवराव पेशव्याला दिलेल्या उर्वरित खानदेशातील सावदा हे गाव त्याने आपला मामा रास्ते यांना जहागिरी म्हणून दिले. १८१८ मध्ये इंग्रजांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत सावदा व तेथील गढी रास्ते घराण्याच्या मालकीचीच होती.१५ खानदेशातील मराठा सत्तेच्या काळात जहागीरदारांच्या गढ्या उभारल्या गेल्या. त्यात कदमबांडे, बारगळ, भोईटे, पवार हे मराठे सरदार खानदेशात गढ्या बांधून राहत होते.१६ खानदेशात मध्ययुगीन काळापासून अनेक वतनदार होते. तोरखेडे येथील कदमबांडे, शिंदखेडा येथील राऊळ, सावद्याचे देशपांडे, रावेरचे देशमुख, जळगावचे भोईटे तर नंदुरबार, बऱ्हाणपूर, पेठ, सुरगाणा इत्यादी ठिकाणीही वतनदार होते. या वतनदारांप्रमाणेच नगरदेवळा येथील पवार हेही वतनदार होते. ते खानदेशातील इतर वतनदारांपेक्षा शिवकाळापासूनचे वतनदार होते.१७ खानदेशात देशमुखांचे वतन मोगल काळापासून सुरु झाले. राजा अलीखान फारुकी यांच्या कारकीर्दीत सुभे खानदेशातील कोणत्याही परगण्यात देशमुखीचे वतन नव्हते. जेव्हा खानदेशात मोगलांचा अंमल सुरु झाला तेव्हापासून खानदेशातील परगण्यांवर देशमुखांची नेमणूक झाली असा उल्लेख हिजरीसन १०७९ (१६६८–६९) च्या पत्रात आढळतो. राजा अलीखान फारुकी हा १५७६ ते १५९७ या काळात खानदेशात सत्तेवर होता.१८ खानदेशात जे वतनदार होते त्यात कानगो हेही होते. कानगोचे वतन हे खानदेशातील वैशिष्ट्यपूर्ण वतन होते. कारण मराठा साम्राज्याचा इतर भागात कुठेच असे वतन अस्तित्वात नव्हते. ते केवळ खानदेशमध्ये अस्तित्वात होते. अर्थात हे वतन मराठा सरकारने खास बाब म्हणून निर्माण केले नव्हते. तर हे वतन मध्ययुगीन काळातील खानदेशला मिळालेल्या वतनांमध्ये मोगलांचा एक वारसाच होता.१९ पेशव्यांचा काळ हा प्राचीन वतनदारांना आश्रय देण्याचा होता. राजाने पूर्वी जे वतने दिली आहेत. ती पेशव्यांनी काढून टाकण्यापेक्षा ती जतन करण्याची व ती पुढे चालविण्याची राज्यसरकारची इच्छा होती हे स्पष्ट दिसते. या इच्छेमुळेच मराठा साम्राज्यात कानगोचे वैशिष्ट्यपूर्ण वतन टिकून राहिले. अन्यथा निजामाच्या पाडावा बरोबरच ते नष्ट झाले असते.२० पेशव्यांच्या ताब्यात खानदेश ५८ वर्षे होता. या काळात प्रशासन व्यवस्थेत त्यांनी फारसा बदल केला नाही. पूर्वीची जी पद्धत होती तीच पुढे चालू ठेवली. ग्रामजीवन आणि सुभा प्रशासनात त्यांनी हस्तक्षेप केला नाही.२१ १६६४ मध्ये मोगलांनी खानदेश सुभा निर्माण केला आणि तोडरमलची प्रशासन पद्धती खानदेशात सुरु केली. मोगलांशी सामना करण्याचे अव्यवहारी धोरण मराठी राज्याचा संस्थापक छत्रपती शिवाजी राजाने पत्करले नाही. याउलट सुरतेच्या मार्गात येणाज्या या समृद्ध व संपन्न सुभ्यांचे संपत्तीहरण केले.२२ ३ जून १८१८ रोजी दुसज्या बाजीरावाने धुळकोट येथे इंग्रजांपुढे शरणागती पत्करली. आणि मराठ्यांचे राज्य ब्रिटिशांच्या स्वाधीन केले. या घटने बरोबरच मराठेशाही संपली आणि ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली.२३

**संदर्भ सूची :**

१. देशपांडे प्र.न., च्प्राचीन खानदेशछ, पहा– खानदेश इतिहास, जळगाव १९९७ पूर्वोक्त पृ.क्र.३५
२. देशपांडे प्र.न., उपरोक्त पृ.क्र.३६
३. देशपांडे प्र.न., उपरोक्त पृ.क्र.३६
४. देशपांडे प्र.न., उपरोक्त पृ.क्र.३७
५. कुलकर्णी अ.रा., च्मध्ययुगीन महाराष्ट्रछ, पूर्वोक्त पृ.क्र.२३६
६. पाटील एम.व्ही., पूर्वोक्त पृ.क्र.२६–२७
७. पांडे मधुकर, पूर्वोक्त पृ.क्र.६
८. भवरे एन.जी., च्प्राचीन खानदेशछ, पहा– खानदेश इतिहास, जळगाव –१९९७ पूर्वोक्त पृ.क्र.६३.
९. भवरे एन.जी., उपरोक्त पृ.क्र.६४
१०. भवरे एन.जी., उपरोक्त पृ.क्र.६४
११. जी. डी. जळगाव, पूर्वोक्त पृ.क्र.९०

ISSN : 2348-7143
Dec. 2018

१२. शहा जी.बी., च्पेशवेकालीन खानदेशछ, पहा- खानदेश इतिहास, जळगाव १९९७, पूर्वोक्त पृ.क्र.६९
१३. पांडे मधुकर, पूर्वोक्त पृ.क्र.८
१४. महाजन टी.टी., च्खानदेशचा राजकीय इतिहासछ, खानेदश इतिहास, उपरोक्त पृ.क्र.१३८ आणि जी.डी. जळगाव पृ.क्र.१०१
१५. डी.जी. जळगाव, पूर्वोक्त पृ.क्र.१०२
१६. पाटील एस.ए., च्खानदेशच्या इतिहासाच्या साधनांचा शोधछ, निबंध संग्रह - ३, धुळे १९९८-९९, पूर्वोक्त पृ.क्र.१३
१७. पाटील अलका, च्नगरदेवळेकर पवारांच्या गढीचा एक अभ्यासछ, पहा- निबंध संग्रह-३, १९९८-९९ उपरोक्त पृ.क्र.४९
१८. नेहेते उज्वला जनार्दन, च्खानदेशातील सामाजिक जीवनछ (एरंडोल - परगण्याचा कागदपत्रांच्या आधारे), निबंध संग्रह-३,उपरोक्त पृ.क्र.११४
१९. शहा जी.बी., च्मराठा साम्राज्यातील कानगो वतनछ, पहा- डॉ.देशपांडे प्र.न.(संपा) खानदेश इतिहास परिषद - शोध-निबंध संग्रह धुळे १९९३/९४ पृ.क्र.१४
२०. शहा जी.बी., उपरोक्त पृ.क्र.१५
२१. शहा जी.बी., च्पेशवेकालीन खानदेशछ पूर्वोक्त पृ.क्र. ८०
२२. कुलकर्णी अ.रा., च्मध्ययुगीन महाराष्ट्रछ, पूर्वोक्त पृ.क्र. २३८
२३. सौ.देशपांडे विजया प्र., च्शेवटच्या पेशव्याचे शेवटचे दिवसछ, पहा निबंध संग्रह, १९९३/९४ पूर्वोक्त पृ.क्र.११८.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# अहिराणी बोलीचा इतिहास

**प्रा.डॉ. सुधाकर सीताराम चौधरी**
मराठी विभागप्रमुख,
आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर.

खान्देशात अहिराणी ही बोली बोलली जात असल्यामुळे या भागाला 'अहिराण पट्टी' असेही म्हटले जाते. 'अहिराणी' म्हणजे 'आभीर वाणी'. प्राचिन आभीर लोकसमूहाची भाषा म्हणजे अहिराणी. आभीर म्हणजे अहिर आणि अहिर म्हणजे गवळी होय. म्हणून खान्देशात पूर्वी गवळी राजाची वा कानडांची सत्ता होती असे म्हटले जाते.

अहिराणी बोली म्हणजे अभीर लोकांची बोली होय. अभीरांची बोली अभिराणी. अभीरचा अपभ्रंश अहिर आणि या अभिराणीचा अपभ्रंश अहिराणी असा आहे. भारतीय संस्कृती कोशामध्ये अहिर ही एक जात () आहे. हे अहिर लोक बिहार, ओडीसा, उत्तरप्रदेश, राजस्थान, पंजाब, सौराष्ट्र व खान्देशच्या परिसरात पसरलेले आहेत. अहिर हा अभीर या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे.

१९ व्या शतकामधील प्रसिद्ध संस्कृत पंडीत कवी श्री. तारानाथ तर्क वाचस्पती यांनी 'वाचस्पत्यम्' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी अभीर या शब्दाची 'अभि + ईर' अशी व्युत्पत्ती सांगितलेली आहे. 'आभीर म्हणजे निर्भय, नीडर, जो भीरु नाही तो'. असा अर्थ सांगितलेला आहे. आभीर या शब्दाचा अर्थ निडर, निर्भय, अभीरु म्हणजे न घाबरणारा असा होतो. यावरुन अभिर लोकांच्या गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश पडतो. आभिर लोक हे गुरे पाळतात, त्यासाठी त्यांना जंगल व वनांमध्ये भटकावे लागते. गाई – गुरांना घेऊन अभीर लोक हे दक्षिणेकडे तामिळनाडू, पूर्वेला बंगाल पर्यंत पोहोचलेले दिसतात. यावरुन अभीर लोक हे निर्भयतेने स्थलांतर करतात असे आपल्याला म्हणता येते.

श्री. एल. ब्राईट यांच्या मते 'आभीर' हे 'इभरी' या हिब्रू शब्दाचे रुप आहे, तर श्री. व्ही. कनकसभाई आपल्या 'दि तामिल्स एटीन हंड्रेड इयर्स ॲगो' या ग्रंथात 'आभीर' हा शब्द 'आयर' या तमिळ भाषेतील शब्दाचे संस्कृत रुप आहे असे म्हणतात. थोडक्यात 'आभिर' हे एका मोठ्या व शक्तीशाली अशा लोकांच्या समूहाच्या वंशाचे नाव आहे. महाभारत काळापासून ते गुप्तकाळापर्यंत त्यांना आभीर म्हणूनच ओळखले जात होते. इ. स. १५० मध्ये भारतामध्ये आलेला प्रख्यात भूगोल तज्ज्ञ टॉलेमीनेही त्याच्या देशाला 'अबिरिया' असे म्हटले आहे. 'आभीरांचा देश तो अबिरिया'.

'आभीर' लोकसमूहाची ओळख इ. स. ५ वे शतक म्हणजेच गुप्तकाळापर्यंत 'आभीर' या शब्दानेच होत होती. पण साधारण इ. स. ५५० मध्ये अमरसिंहाने 'अमरकोश' तयार केला. यात त्याने 'आभीर – अहिर – गवळी' असा अर्थ दिला. म्हणजेच 'आभीर' या मुळ शब्दाचे प्राकृतातील वा लोकभाषेतील 'अहिर' हे रुप अमरसिंहाच्या काळात रुढ झालेले दिसते. यापुढे 'आभिर' या शब्दाऐवजी 'अहिर' हा शब्द प्रचारात येऊन पुढे रुढही झाला व त्यापुढे आणखी 'अहिर' म्हणजेच 'गवळी' हा अर्थही 'अहिर' या शब्दाचा रुढ झालेला दिसतो.

आभीर लोकांचा मुख्य व्यवसाय गोपालन हा होता. गोपालन करण्यासाठी या लोकांना नेहमी भटकंती करावी लागायची. हे आभीर लोक आर्य लोकांप्रमाणेच अफगाणिस्थानमार्गे भारतात आले व भारतात आल्यानंतर या आभीर लोकांनी पंजाबमध्ये आपली पहिली वसाहत वसविली.

पतंजलीने आपल्या 'शुद्राभिरम्' या ग्रंथामध्ये आभिरांचा उल्लेख केलेला आहे. पतंजलीचा कालखंड हा इ. स. पूर्व दुसरे शतक असा मानला जातो. म्हणजेच आभीर हा लोकसमूह इ. स. दुस–या शतकापासून भारतात वास्तव्यास होता असे दिसते.

आभीर लोकसमूह हा आशियाकडून सिंधू नदीच्या खो–यामधून भारतात आला. आभीर लोकांना आर्य म्हटले जाते. इ. स. पूर्व पहिल्या अथवा दुस–या शतकात आभिर लोकांचे भारतात आगमन झाले असावे. अहिरांना बंगालमध्ये 'गोआला' व मध्यप्रदेशात 'गवळी' किंवा 'ग्वाला' असे म्हणतात. अहिर हे कृष्णभक्त आहेत.

आभीर लोक प्राचिन काळापासून खान्देशात वास्तव्य करीत असल्याचे पुरावे शिलालेख व प्राचिन ग्रंथामध्ये सापडतात. रामायण, महाभारतासारख्या ग्रंथामध्येही या आभीर लोकांचे उल्लेख आलेले दिसतात. या आभीर लोकांवर आर्य लोकांच्या जीवनपद्धतीचा प्रभाव पडलेला दिसतो. खान्देशात आजही अहिरे शिंपी, अहिरे ब्राह्मण, अहिर सोनार अशा जाती व अहिरराव, अहिरे अशी आडनावे दिसतात. प्राचिन काळी हे सर्व अभीर होते. अभीर हे मुळचे भारतीय की भारताबाहेरुन आले याबद्दल इतिहास संशोधकात व अभ्यासकात एकवाक्यता दिसत नाही. आभीर लोक हे भारताबाहेरुन आलेले आहेत असे मत प्रसिद्ध इतिहास संशोधक वेबर, टॉलेमी व डॉ. भांडारकर मांडतात तर अभीर हे भारतीयच आहेत असे मत डॉ. श्रीधर व्यं. केतकर, डॉ. सरकार, डॉ. सिद्धेश्वर शास्त्री मांडतांना दिसतात.

अभीर ही एक प्राचिन भारतीय जमात असून या अभीरांचा तपशीलवार, तर्कशुद्ध व सुसंगत असा इतिहास आजतरी उपलब्ध नाही. अभीर, अहिर लोकांचा प्रदेश खान्देश हा होय. या विषयी डॉ. श्रीधर व्यं. केतकर यांनी आपल्या 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' या ग्रंथाच्या खंड ७

व ८ मध्ये माहिती दिलेली आहे. डब्ल्यू क्रूक (१९७४) यांनी आपल्या ‘दि कास्ट अॅण्ड ट्राईबज् ऑफ नॉर्थ वेस्टर्न इंडिया‘ च्या खंड १ ला व आर. इ. इन्थोव्हेन यांनी आपल्या ‘दि ट्राईबज अॅण्ड कॉस्ट ऑफ बॉम्बे‘ या ग्रंथांच्या खंड १ मध्ये व डॉ. भांडारकरांच्या ‘दक्षिणेचा इतिहास‘ या ग्रंथात अहिर, अभीर लोकांविषयी माहिती आलेली आढळते.

अभीर, अहिर हे आर्य की अनार्य याविषयी विद्वान संशोधकात एकमत आढळत नाही. रामायण, महाभारत आणि पुराणांमध्ये अभिर लोकांचा उल्लेख येतो. महाभारत व पुराणात या अभिर लोकांना शुद्र म्हटलेले आहे. महाभारतात सभापर्व अध्याय ३२, श्लोक १० मध्ये अभिर लोकांचा उल्लेख येतो. याचबरोबर बृहतसंहितेमध्ये दक्षिणभागाकडील एक देश म्हणून या भागाचा उल्लेख आलेला दिसतो.

श्री. भा. रं. कुलकर्णी हे अहिर संस्कृती ही आर्यसंस्कृती असल्याचे सांगतात तर श्री. दा. गो. बोरसे हे अहिरांना चंद्रवंशीय यादव आर्य आहेत असे म्हणतात. श्री. चांदोरकर हे अहिरांना यदुवंशीय म्हणतात व अहिर लोकांचे शुद्ध अहिर व शुह अहिर असे दोन भेद करतात. थोडक्यात श्री. चांदोरकर, श्री. भा. रं. कुलकर्णी यांना अहिर, अभिर लोक हे आर्यवंशीय वाटतात. जॉर्ज ग्रिअर्सनने ‘अभिर हे भिल्ल आहेत‘ असे मत मांडलेले आहे. भिल्ल हे अभिरापासून आलेले आहेत असे ते म्हणतात. मनुस्मृतीकार मनुने अभीर हे ‘अंबुष्ट स्त्री व ब्राह्मण‘ यांची संतती होय असे मत व्यक्त करुन अभिरांची गणणा शुद्रांमध्ये केलेली दिसते.

खान्देशमध्ये अभिरांचे वास्तव्य होते व कालांतराने या अभिर लोकांचे नाव अहिर झालेले दिसते. या अभिर लोकांची बोली ही ‘आभिरी‘ वा ‘अहिराणी‘ होय. अहिराणी ही एक स्वतंत्र बोली आहे. या अहिराणी बोलीवर गुजरात राज्यातील गुजराथी या भाषेचा मोठा प्रभाव व परिणाम झालेला आहे. अहिराणी या बोलीवर गुजराथी या भाषेबरोबरच मराठी, नेमाडी, व हिंदुस्थानी या भाषांचा मोठा प्रभाव झालेला दिसतो. अहिराणी बोली बोलणारे अभिर लोक हे स्थलांतर करुन खान्देशमध्ये स्थिरावलेले आहेत. हे लोक पंजाबमार्गे स्थायिक झालेले आहेत. या स्थलांतरामुळे त्या – त्या ठिकाणच्या प्रादेशिक भाषेचा, बोलींचा परिणाम, प्रभाव व भाषेचे मिश्रण या लोकांच्या बोलीत झालेले आढळते. या अहिराणी बोलीवर या भाषांप्रमाणेच मागधी, अर्धमागधी, शौरसेनी, लाटी, महाराष्ट्री, पैशाची अशा प्राकृत भाषांचाही परिणाम झालेला दिसतो. खान्देशचा भौगोलिकलेच्या संदर्भात विचार केला तर या अहिराणी बोलीवर शेजारील विदर्भाकडील वैदर्भी, मध्यप्रदेशाकडील हिंदी, महाराष्ट्रातील मराठी, गुजरात राज्यातील गुजराती तसेच खान्देशमधील भिल्ल लोकसमुदायाच्या ‘भिल्ली‘ या बोलीभाषेचा संकर व मोठा प्रभाव झालेला आढळून येतो.

अहिराणी ही अभिर वा अहिर लोकांची बोली म्हणून ओळखली जाते. खान्देशवर अभिर लोकांचे राज्य होते. खान्देशातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. खान्देशात जळगांव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. पण अहिराणी बोलीसंदर्भात मात्र या तीन जिल्ह्यांबरोबर औरंगाबाद जिल्ह्यामधील सोयगांव, कन्नडचा भाग व नाशिक जिल्ह्यामधील मालेगांव, कळवण, सटाणा तालुक्यातील काही गावांचा समावेश होतो. खान्देशी बोली ही प्रामुख्याने सातपुड्याचा पर्वत, अजिंठ्याचा डोंगर, सह्याद्री पर्वताच्या रांगा, वाघूर नदी व चांदवड यांच्यामध्ये बोलली जाते. खान्देशात या खान्देशी बोलीबरोबरच इतर अनेक स्थानपरत्त्वे भिन्न–भिन्न बोली बोलल्या जातात.

**अहिराणी बोली** – अहिर हे लोक / जात – जातीची बोली
अहिर जातीची बोली

**खान्देशी बोली** – खान्देश हे प्रदेश वाचक नाव / नाम
खान्देश – भू भाग – व्यापक / परिसर मोठा त्यामुळे इतर अनेक बोली, प्रदेशपरत्त्वे
इतर बोली समाविष्ठ आहेत.

धुळ्याकडील तळोदे, शहादे या भागामध्ये गुजर या जातीच्या लोकांचे प्राबल्य मोठे असल्याने तिकडे ‘गुर्जरी बोली‘ बोलली जाते. नंदुरबार जिल्ह्यात नवापुर, धडगांव, अक्कलकूवा वगैरे भागात पावरा या वन्य जातीच्या लोकांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर आढळून येते. त्यामुळे या भागात ही लोक आपल्या ‘पावरी‘ या बोलीतून आपला संपर्कव्यवहार करीत असतात. शहादा, नवापुर हे तालुके गुजरात राज्याजवळ असल्याने व या ठिकाणच्या लोकांचा संपर्कव्यवहार हा गुजरात राज्याशी मोठ्या प्रमाणावर असल्याने या लोकांच्या बोलीवर ‘गुजराथी‘ या भाषेचा मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. नाशिक जिल्ह्यामधील चांदोर डोंगराच्या उत्तरेकडील भागाला ‘अहिराणपट्टी‘ असे म्हटले जाते. या भागामध्ये खान्देशी ही बोली बोलली जाते. या भागात सटाणा, कळवण, चांदवड, मनमाड, नांदगांव, मालेगांव या तालुक्यातील खान्देशला लागून असणा–या बहुसंख्य गावांचा समावेश होतो. औरंगाबाद जिल्ह्यामधील सोयगांव तसेच अजिंठ्याच्या डोंगरांना लागून असलेला कन्नड तालुक्यामधील बरेचसे लोक खान्देशी बोली बोलत असतात. सातपुड्याच्या पर्वत रांगेत येणारे पण मध्यप्रदेशात मोडणारे शहापुर, इच्छापुर, वलवाडी, ब–हाणपुर या भागातही मुख्यत्त्वे करुन खान्देशी बोली बोलली जाते. खान्देशातील बोली ही खान्देशी बोली म्हणून ओळखली जात असली तरी या खान्देशातील बोलीवर ती भाषा बोलणा–या विविध जाती – जमाती व शेजारील प्रदेशात बोलल्या जाणा–या इतर बोली वा भाषांचा प्रभाव व परिणाम झालेला आढळतो. या प्रभावातूनच मुळ भाषेपेक्षा भिन्न अशी दुसरी स्वतंत्र बोली आकाराला आलेली दिसते. नंदुरबारच्या परिसरात नंदुरबारी, गुर्जर समाजाची वा जातीची गुर्जरी बोली, धेडगुर्जरी बोली, बागलाणच्या

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

परिसरात बागलाणी, महार जातीची महाराऊ, लेवापाटीदार समाजाची लेवापाटीदारी, लाडसिक्की समाजाची लाडशिक्की अशा बोली आकाराला आलेल्या दिसतात. भौगोलिक वा प्रादेशिक रचनेनुसार खाल्यांगी (पूर्व), वरल्यांगी (पश्चिम), तप्तांगी (उत्तर दिशा), डोंगरांगी (दक्षिण) अशा नवीन बोली आकाराला आलेल्या दिसतात.

खान्देशी आणि अहिराणी हे शब्द साधारणत: एकाच अर्थाने वापरले जातात, पण त्यामध्ये सुक्ष्म भेद आहे. खान्देशी हा शब्द प्रदेशवाचक शब्द आहे. खान्देशी बोली ही संकल्पना अहिराणी बोलीपेक्षा व्यापक संकल्पना आहे. अहिराणी बोली ही संकल्पना जात वा बोलीवाचक संकल्पना आहे. अहिर लोकसमूदाय हा बाहेरुन आलेला लोकसमूदाय आहे व या लोकांनी खान्देशावर आपली सत्ता प्रस्थापित केल्यामुळे साहजिकच त्यांची बोली ही इतर बोलीपेक्षा लवकर प्रतिष्ठित पावली. अहिर लोकांकडे सत्ता असल्यामुळे त्यांनी खान्देशातील काळ्या कसदार जमिनीवर शेती करायला सुरवात केली. इतर जातीतील लोकांनी अहिरांच्या संपर्कामध्ये राहून त्यांची बोली, भाषा, संस्कृती, रुढी इ. अनेक गोष्टींचे अनुकरण केले. या अनुकरणामुळे या लोकांच्या मुळ बोलीवर अहिराणीचा मोठा प्रभाव पडला. वेगवेगळ्या जाती – जमातीतील लोकांनी या भौगोलिक परिसरातील आपल्या बोलीला अहिराणी असे नाव न म्हणता 'खान्देशी' हे प्रदेशवाचक वा प्रादेशिक नाव स्विकारले. खान्देशची बोली ती खान्देशी. अहिराणी बोली या संकल्पनेपेक्षा खान्देशी बोली ही संकल्पना व्यापक, मोठी व सर्वसमावेशक आहे.

**खान्देशी बोलीचे क्षेत्र व प्रकार**

डॉ. रमेश सुर्यवंशी यांची खान्देशातील खान्देशी या बोलीचा प्रदेश व सामाजिक अंगांनी अभ्यास करुन दोन प्रकारे वर्गीकरण केलेले आहे.

| **खान्देशी – प्रादेशिक प्रभेद** | **सामाजिक प्र–भेद** |
|---|---|
| बागलाणी (नैऋत्य) | अहिराणी |
| तप्तांगी (उत्तर) | लेवापाटीदार |
| डोंगरांगी (दक्षिण) | गुजरी |
| वरल्ह्यांगी (पश्चिम) | लाडसिक्की |
| खालल्यांगी (पूर्वदिशा) | पावरी |
| नंदुरबारी (नंदुरबार परिसर) | काटोनी |
| | तडवी |
| | परदेशी |
| | घाटोळी |
| | दखनी |
| | महाराऊ |

खान्देशातील सर्वच जाती – जमातीची लोक दैनंदिन व्यवहारासाठी अहिराणी बोलीचा वापर करीत असतात. खान्देशात अनेक जाती – जमातीची लोक गुण्या – गोविंदाने राहत असतात व आपला पारंपारिक व्यवसाय करीत असतात. प्रत्येक जातीची स्वत:ची अशी खास बोली आहे. या स्वत:च्या जातीच्या बोलीवर परिसरातील अहिराणी या बोलीचा मोठा प्रभाव पडलेला आढळतो. या खान्देशी बोलीच्या कक्षेत अनेक जाती – जमातीनुरुप लोक व त्यांची बोली येते. या बोलीच्या कक्षेत येणा–या बोली म्हणजे – लेवापाटीदार जातीची लेवापाटीदारी बोली, गुर्जर जातीची गुर्जरी बोली, लाडशाखीय वाणी लोकांची लाडशिक्की, पावरा जमातीची पावरी बोली, अहिर लोकांची अहिराणी, परदेशी लोकांची परदेशी, महार लोकांची महाराऊ बोली इ. होय.

तापीनदीच्या परिसरामध्ये बोलल्या जाणा–या खान्देशी बोलीची विशिष्ट अशी हेल वा ढब आढळून येते. या ठिकाणच्या बोलीत ज्, च्, झ्, श्, छ् या व्यंजनांचे उच्चारण पार्श्व आहे. अशा स्वतंत्र वैशिष्ट्यामुळे ही बोली खास खान्देशी बोली म्हणून ओळखली जाते. अजिंठ्याच्या डोंगररांगांच्या भू – प्रदेशावर खान्देशी बोली बोलणारे लोक च्, ज्, छ्, झ् या व्यंजनांचे उच्चारण दन्त्य करतात. अशा रीतीने खान्देशी या बोलीत भू – प्रदेश, जाती – जातीनुसार वेगवेगळे फरक वा बदल होतांना आढळतात.

खान्देशातील लोकांची अहिराणी ही बोलीभाषा आहे. या अहिराणीचे भाषिक क्षेत्र खान्देश हे होय. खान्देशमध्ये वेगवेगळ्या जाती – जमातीची लोक वास्तव्य करुन राहतात. ब–याच जातीच्या स्वतंत्र अशा खास बोली अस्तित्त्वात आहेत. या जातीतील लोक इतरांशी बोलतांना अहिराणी बोलीतून बोलतात. पण यांची अहिराणी बोली ही भिन्न स्वरूपाची दिसते. अहिराणी बोलीचे स्थान, जात, व्यक्तीपरत्त्वे काही भेद पडलेले आहेत. यांनाच अहिराणीच्या उपबोली म्हणता येईल. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**अहिराणी बोलीच्या उपबोली**

| **उपबोली** | **प्रभावक्षेत्र** |
|---|---|
| मध्यवर्ती अहिराणी | धुळे, अमळनेर, शिंदखेडा |
| बागलाणी बोली | कळवण, नांदगाव, सटाणा, बागलाण, निफाड, चांदवड |
| लाडशिक्की बोली | खान्देश परीसरातील लाडशाखीय वाणी समाज बांधव |
| नंदुरबारी बोली | नंदुरबार, तळोदा, शहादा, दोंडाईचा, नवापुर, अक्कलकुवा |
| डांगी बोली | डांगचा परीसर |
| नेमाडी बोली | चारण वंजारी समाज बांधव |
| पावरी बोली / भिल्ली बोली | आदिवासी व भिल्ल समाजबांधव |
| भावसारी रंगारी बोली | खान्देशातील भावसार समाजबांधव |
| लेवापाटीदारी बोली | यावल, भुसावळ, सावदा, फैजपुर, जळगांव, मुक्ताईनगर |
| गुर्जरी बोली | शहादा, नंदुरबार, शिरपुर, चोपडा परिसरातील गुजर समाजबांधव |
| तडवी बोली | तडवी समाजबांधव |

**निष्कर्ष**

१. अहिराणी म्हणजे अभीर लोकांची बोली होय. अभिरांची बोली 'अभिराणी' अभीरचा अपभ्रंश 'अहिर' आणि अभिराणीचा अपभ्रंश 'अहिराणी' असा झालेला दिसतो. हे अहिर लोक या प्रदेशात बिहार, ओडिसा, उत्तरप्रदेश, राजस्थान, पंजाब, सौराष्ट्र या भागातून प्राचिन काळी स्थलांतर करुन आलेले दिसतात.

२. अभिर लोक हे स्थलांतर करुन आल्यामुळे त्यांचा अनेक भू-प्रदेशांशी प्रत्यक्ष संबंध आलेला दिसतो. त्यामुळे या अहिराणी बोलीवर मागधी, अर्धमागधी, शौरसेनी, लाटी, महाराष्ट्री, पैशाची अशा प्राकृत भाषांचा परिणाम व प्रभाव झालेला दिसतो. याचबरोबर खान्देशला जवळचे असणारे गुजरात राज्य व तेथील लोकांची भाषा गुजराथीचाही मोठा प्रभाव अहिराणी बोलीवर दिसतो. मराठी, नेमाडी व हिंदुस्थानी भाषांचाही मोठा प्रभाव व परिणाम अहिराणीवर जाणवतो.

३. खान्देशी आणि आहिराणी हे शब्द ब-याचदा एकाच अर्थाने वापरले जातात पण त्यांच्यामध्ये सूक्ष्म भेद आहे. खान्देशी हा शब्द प्रदेशवाचक शब्द आहे व खान्देशी बोली ही संकल्पना अहिराणी बोलीपेक्षा व्यापक संकल्पना आहे. अहिराणी बोली ही संकल्पना जात वा बोलीवाचक संकल्पना आहे.

४. खान्देश हा अठरापगड जाती - धर्मांनी वसलेला समृद्ध व शांत प्रदेश आहे. या खान्देशातील बोलीवर ती भाषा बोलणा-या विविध जाती - जमाती व शेजारील प्रदेशात बोलल्या जाणा-या इतर बोली - भाषांचा प्रभाव व परिणाम झालेला आढळतो. या प्रभावातूनच मुळ भाषेपेक्षा भिन्न अशी दुसरी स्वतंत्र बोली आकाराला आलेली दिसते. नंदुरबारच्या परिसरात नंदुरबारी, गुर्जर समाजाची वा जातीची गुर्जरी बोली, बागलाणच्या परिसरात बागलाणी बोली, महार जातीची महाराऊ, लेवापाटीदार समाजाची लेवापाटीदारी, लाडसिक्की समाजाची लाडशिक्की अशा बोली आकाराला आलेल्या दिसतात.

५. खान्देशच्या भौगोलिक व प्रादेशिक रचनेनुसारही काही बोली आकाराला आलेल्या दिसतात. त्यात खाल्यांगी (पूर्व), वरल्यांगी (पश्चिम), तप्तांगी (उत्तरदिशा), डोंगरांगी (दक्षिण) अशा विस्तीर्ण प्रादेशिक भू - भागासंदर्भात बोली आकाराला आलेल्या दिसतात.

**संदर्भ सूची :**

१) राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथमाला - ऐतिहासिक लेखचर्चा भाग ४ था, ग्रंथ २६ वा, स. न. १९५४ - खान्देश या नावाचे मुळ लेखक - मो. रा. जोशी
२) 'अहिराणी भाषा परिचय'-बोरसे दा. गो., गिरजा साहित्य प्रकाशन, नागपुर
३) 'अहिराणी भाषा वैज्ञानिक अभ्यास'-सुर्यवंशी रमेश, अक्षय प्रकाशन, पुणे. १९९७
४) खान्देशातील ग्राम दैवते आणि लोकगीते - पगार सयाजी निंबाजी, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे. पहिली आवृत्ती - १९९२

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# पूर्व खान्देशातील स्वराज्य पक्षाचे योगदान

**प्रा.डॉ. बाळकृष्ण त्र्यंबक पाटील**
किसान कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
पारोळा, जि. जळगाव.

असहकार आंदोलन जोरात सुरू असल्यामुळे सरकारने दडपशाही धोरणांचा अवलंब केला. दि. १० मार्च १९२२ रोजी महात्मा गांधीजींना अटक करण्यात आली. गांधीजी आणि राष्ट्रीय काँग्रेसचे नेते तुरूंगात असल्यामुळे जनतेला मार्गदर्शन करणारा आणि असहकार आंदोलन पुढे घेऊन जाणारा एकही नेता शिल्लक राहिला नव्हता. काँग्रेस व जनता नेतृत्वहीन बनल्यामुळे असहकार आंदोलन पुन्हा सुरू करण्यासाठी काँग्रेसमधील नेते आणि जनता उत्सुक नव्हती. अशा काळात राष्ट्रीय चळवळीला पुढे घेऊन जाणारा आणि लोकजागृती करणा-या एखाद्या नवीन पक्षाची आवश्यकता काँग्रेसच्या काही नेत्यांना वाटू लागली.

सन १९२२ मध्ये गया येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले. कायदेमंडळात प्रवेश की कायदेमंडळात बहिष्कार या महत्वपूर्ण विषयावर काँग्रेसने निर्णय घ्यावयाचा होता. देशबंभू चित्तरंजन दास यांनी कायदेमंडळात प्रवेश या धोरणाचा पुरस्कार केला. डॉ. अन्सारी व चक्रवर्ती राजगोपालाचार्य आदी नेत्यांनी या धोरणाला विरोध दर्शविला. गया अधिवेशनात कायदेमंडळात बहिष्कारावर बहुमताने शिक्कामोर्तब केला. तेव्हा चित्तरंजन दास यांनी गया येथील काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.१

१ जानेवारी १९२३ रोजी चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांनी अलाहाबाद येथे स्वराज्य पक्षाची स्थापना केली. काँग्रेसमध्ये रितसर फुट पडली. पण महात्मा गांधीजींनी दास यांचा राजीनामा स्वीकारला नव्हता. सप्टेंबर १९२३ मध्ये काँग्रेसचे खास अधिवेशन दिल्लीत घेण्यात आले. काँग्रेसच्या नेत्यांत समझोता झाला. ज्यांना विधिमंडळाच्या निवडणूका लढवायच्या आहेत, त्यांनी स्वतंत्रपणे लढवाव्यात, काँग्रेसच्या नावाने लढवू नये असे या अधिवेशनात ठरविण्यात आले. शेवटी विधिमंडळात प्रवेश करून स्वराज्याची मागणी करणे किती आवश्यक आहे, हेच स्वराज्य पक्षाच्या नेत्यांनी जनतेला पटवून दिले. स्वराज्यवाद्यांनी निरनिराळ्या प्रांतातून व जिल्ह्यातून स्वराज्य पक्षाच्या कार्याला सुरूवात केली.२

१३ एप्रिल १९२३ रोजी खान्देशात स्वराज्य पक्षाची स्थापना झाली. पूर्व खान्देश स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष म्हणून श्री. द.वा. जोशी व सेक्रेटरी म्हणून श्री. श्रीपाद केशव पाठक यांची निवड झाली. ३० एप्रिल १९२३ पर्यंत पूर्व खानदेशात तालुका स्तरावर शाखा स्थापन करण्याचे ठरले. एरंडोल, अमळनेर, भूसावळ व चाळीसगांव तालुक्यात स्वराज्य पक्षाची शाखा स्थापन झाल्याची नोंद आढळते.३

१९२३ च्या नोव्हेंबर महिन्यात मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूकांना सुरूवात झाली. कायदेमंडळात प्रवेशाचा पुरस्कार करणारा स्वराज्य पक्ष निवडणूकिच्या रिंगणात हिरिरीने उतरला. पूर्व खान्देशातील स्वराज्य पक्षाचे मुंबई कायदेमंडळासाठी एरंडोलचे पी.जी. जोशी यांना उमेदवारी देण्यात आली. हे प्रचंड मतांनी निवडून आलेत.४

२७ जानेवारी १९२४ रोजी दे.भ.तात्यासाहेब केळकर हे दिल्ली कायदेमंदळाच्या अधिवेशनातून परत जातांना जळगांव येथे थांबले. त्याच दिवशी पूर्व खानदेश स्वराज्य पक्षाची सभा जाहीर करण्यात आली होती. सभेचे कामकाज त्यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी अमळनेर, एरंडोल, भडगांव, पाचोरा, पारोळा येथील स्वराज्य पक्षाचे सभासद उपस्थित होते. त्यांना विधीमंडळातील विधायक कार्य सांगण्यात आले. स्वराज्य पक्षाच्या प्रयत्नामुळे सरकारने मीठावरील कर रद्द केला, सुती कपड्यावरील कर कमी केला, सल्फरवरील लावलेला आयात कर रद्द केला, कामगारांची पिळवणूक थांबविण्यासाठी प्रयत्न केलेत, देशातील औद्योगिक विकास करण्यासाठी उद्योग धंद्यांना संरक्षण देणे, या मागण्या स्वराज्य पक्षाने सतत सरकारकडे केल्या. ही कायदेमंडळाच्या बैठकींची सविस्तर माहिती जनतेला कळावी यासाठी वर्तमानपत्राद्वारे प्रसिद्ध करावी. पूर्व खान्देशच्या विधायक कामासाठी १७ लोकांचे एक सल्लागार मंडळ स्थापन करण्यात यावे.५

पूर्व खानदेश स्वराज्य पक्षाची सभा भरविण्यात आली. या सभेत प्रत्येक तालुक्यातून सभासद मिळविणे व स्वराज्य पक्षाचा कार्यक्रम समजावून सांगण्यासाठी दौरे काढणे, परकीय मालावर बहिष्कार व स्पिनिंग क्लब स्थापन करणे इत्यादी कामे करन्याचे ठरले. परंतु या सभेतील वरील कार्यक्रम अंमलात आणला होता किंवा नाही या विषयी माहिती आढळून आली नाही. पूर्व खान्देशात स्वराज्य पक्षाचा प्रभाव होता. असे वरील घटनांवरून सांगता येते.६

पूर्व खानदेशातील स्वराज्यवाद्यांचे मुखपत्र म्हणून ओळखले जाणारे 'प्रागतिक' साप्ताहिकातील एका अग्रलेखात म्हणतात, महात्मा गांधी आपल्या अनुयायांना संदेश देताना सांगतात. काँग्रेस पक्षाने स्वराज्यवाद्यांबरोबरही संबंध ठेवावेत. स्वराज्यवाद्यांनी असहकारितेकरिता कार्य यशस्वी केले तर जगाच्या इतिहासात ती एक अद्भूत गोष्ट घडून येईल. असे विचार प्रागतिक साप्ताहिकाचे संपादक व प्रकाशक द.वा.जोशी हे पूर्व खान्देशातील स्वराज्य पक्षाचे मान्यवर नेते होते.७ महात्मा गांधी व चित्तरंजन दास यांनी जुहू येथे समेटाची बोलणी

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

झाल्यानंतर विधायक कार्यक्रमावर विश्वास असणारे कार्यकर्ते खादी-प्रचार कार्यात सहभागी झालेले दिसतात. पूर्व खान्देशात दास्ताने, देवकीनंदन नारायण यांचे प्रचार दौरे सुरू असल्याचे दिसते.८

दि. १८ जून १९२५ शुक्रवार रोजी स्वराज्य पक्षाचे संस्थापक देशबंधू चित्तरंजन दासबाबू यांच्या निधनानिमित्त अमळनेर येथील व्यापारी लोकांनी दुकाने व बाजारपेठ बंद ठेवली होती.९ दि. १९ जून १९२५ शनिवार रोजी अमळनेरला स्वराज्य पक्षाच्या स्थानिक शाखेतर्फे श्री संत सखाराम महाराज यांच्या समाधीपुढील वाळवंटात श्री. भिडे यांच्या अध्यक्षतेखाली जाहिर सभा भरविण्यात आली. अमळनेरचे नगराध्यक्ष श्री. भागवत यांचे प्रास्ताविक भाषण झाल्यानंतर श्री. चिंचोळकर यांनी दासबाबूचे चरित्र सांगून व त्यांच्या निधनाने देशाचे किती नुकसान झाले आहे. याचे वर्णन करून दुखवटा ठराव मांडला. श्री. बहादरमल चंदनमल यांनी अनुमोदन दिल्यानंतर तो सर्वांनी उभे राहून पास करण्यात आला. स्वराज्य पक्षाचा प्रभाव अमळनेर तालुक्यातील जनतेवर विशेष असल्याचे दिसते.१०

स्वराज्यवाद्यांनी कायदेमंडळात सरकारच्या धोरणांना पाठिंबा दिल्यामुळे दुर्दैवाने स्वराज्य पक्षांतर्गत भांडणामुळे त्या पक्षाच्या विघटनाला सुरूवात झाली. श्री. तात्यासाहेब केळकर व चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू यांच्यात देखील मतभेद होते. त्यात भर पडली ती मध्य प्रांतातील श्री. तांबे यांनी इंग्रजांची दिवाणगिरी स्वीकारल्यामुळे यावरून स्वराज्यवाद्यांत मोठे वादळ उठले. महाराष्ट्रातील केळकर व जयकर यांनी श्री. तांबे यांच्या कृतीचे समर्थन केले.११ त्यामुळे स्वराज्य पक्ष विघटनाला गेला. त्यांची परिणती पूर्व खान्देशात देखील झाली.

**निष्कर्ष –**

स्वराज्य पक्षाचा आकर्षक व वास्तववादी कार्यक्रमामुळे पूर्व खान्देशातील लोकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे जनतेने १९२४च्या निवडणूकीत स्वराज्य पक्षाचे उमेदवार निवडून दिले होते. त्यामुळे पूर्व खानदेशात स्वराज्य पक्षाचा प्रभाव दिसून येतो. स्वराज्य पक्षाने सुरूवातीला भरीव स्वरूपाची कामगिरी केली. तरी या पक्षाला फारसे यश लाभलेले दिसून येत नाही. स्वराज्यवाद्यांनी सरकारला धारेवर धरण्याऐवजी सरकारच्या ध्येय धोरणांना पाठिंबा दिला. त्यामुळे स्वराज्य पक्षाचे सभासद सरकारधार्जिणी असल्याचा आरोप करण्यात आला. पक्षात स्वार्थी व संधीसाधू लोकांचा गट, स्वराज्य पक्षाच्या ध्येय धोरणात झालेला बदल, सरकारचे दमन नीतीचे धोरण, स्वराज्य पक्षातील अंतर्गत फूट यामुळे १९२६ मध्ये झालेल्या विधीमंडळाच्या निवडणूकीत पूर्व खान्देशात या पक्षाचा दणदणीत पराभव झाला. त्यामुळे स्वराज्य पक्ष पूर्व खान्देशातून अस्त झालेला दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१) मुजुमदार आर.सि., स्ट्रगल फॉर फ्रीडम, प्रथम आवृत्ती, जुलै १९६९, प्रकाशन – भारतीय विद्या भवन, चौपाटी रोड, मुंबई – ७, पृ.क्र. ३८९.
२) डॉ. कठारे अनिल, आधुनिक भारताचा इतिहास, प्रकाशन – कल्पना प्रकाशन; नांदेड, द्वितीय आवृत्ती, १९९८, पृ.क्र. १४९.
३) सा. प्रागतिक, जळगांव, दि. १५ एप्रिल, १९२३, पृ.क्र. ३.
४) सा. प्रागतिक, जळगांव, दि. १७ नोव्हेंबर १९२३, पृ.क्र. १.
५) सा. प्रागतिक, जळगांव, दि. २८ जानेवारी, १९२४, पृ.क्र. ४.
६) सा. प्रागतिक, जळगांव, दि. १९ मे, १९२४, पृ.क्र. ४.
७) सा. प्रागतिक, जळगांव, दि. २ जून, १९२४, पृ.क्र. ३.
८) सा. प्रागतिक, जळगांव, दि. ९ जून, १९२४, पृ.क्र. २.
९) सा. प्रागतिक, जळगांव, दि. २३ जून, १९२५, पृ.क्र. ३.
१०) पूर्वोक्त.
११) कंटक प्रेमा, सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला शनिवारपेठ, पूणे, प्रथम आवृत्ती, १९४०, पृ.क्र. २११. २१२.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील बंजारा स्त्रियांची परिस्थिती

**डॉ. डी.डी. राठोड**
जिजामाता महाविद्यालय,
नंदुरबार.

**प्रस्तावना**

इतिहास उलगडण्याचे प्रयत्न गेल्या दोनशे वर्षात झालेले असलेतरी अजून अनेक कालखंड अज्ञातच आहेत.अनेक बाबतीत मिळालेली माहिती परिपूर्ण नाही.त्यामुळे इतिहाससंशोधनही एक सतत चालू राहणारी प्रक्रियाठरते. जोपर्यंत सर्व भूतकाळ स्पष्टपणे पुराव्याआधारे रेखाटत येणार नाही. तोपर्यंत'संशोधन'ही प्रक्रिया आवश्यकच असते.१कोणत्याही जातीची माहिती असणेहा त्या त्या जातीचा इतिहास असतो. इतिहासामुळेसमाजाचे पारंपरिक रीतीरिवाज लक्षात घेता येतात.कोणत्याही समाजाचा इतिहास माहीत झाला तरच त्या समाजास प्रगतीपथावर जाण्यासाठीच्या उपाययोजना करणे शक्य होते. समाजाच्या प्रगती आणि अधोगतीच्या कारणांचा चिकित्सक अभ्यास केला असता भविष्यकालीन सुधारणा घडवून आणण्यासाठीत्याची फार मोलाची मदतहोते.इतिहास शब्दाचा उल्लेख सर्वात प्रथम अथर्ववेदात येत असता तरी भारतात आधुनिक अर्थाने इतिहासाविषयी जिज्ञासा जागृत व्हायला जवळजवळ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्ध उजाडावा लागला होता.३खानदेशहा महाराष्ट्राच्या उत्तर विभाग असून त्या प्रदेशातील जनता शेकडो वर्षापर्यंत मुस्लिम राजवटीच्या वर्चस्वाखाली जीवन जगत होती. भारताप्रमाणेच खानदेशातील समाजजीवनात जातीव्यवस्थेचे प्राबल्य होते.अज्ञान, समाजविघातक रूढी धार्मिक अंधश्रध्दा आणि धर्मभोळया समजुतींना प्रभावित लोकसमुदाय, उच्च जातींच्या लोकांचे कनिष्ठ जातींच्या लोकांवर असलेले प्रभुत्व इ.समाजजीवनाची वैशिष्टये खानदेशातील समाजाला पुरेपूर लागू पडतात. अशा सामाजिक विषमतेने जखडलेल्या समाजाला खानदेशातील काही मुठभर समाज सुधारणावादी व्यक्तिंनी मुक्त करण्याचा प्रयत्न केला.४विसाव्या शतकातील खानदेशात झालेल्या सुधारणांचा विचार केल्यावर असे दिसून येते की, या प्रदेशातील, बुध्दीवादी अथवा पाश्चात्य शिक्षणाने प्रभावित झालेल्या विचारवंताच्या, सुधारणावाद्यांच्या प्रयत्नामुळे आणि येथील ख्रिश्चन मिशनरींच्या धोरणामुळे जागृतीहोऊनसुधारणा घडून आल्या.५भारत अनेक जाती, जमाती, धर्म, भाषा व संस्कृती असणारा देश आहे. भारतातील २३ राज्यात बंजारा जमातीचे लोक राहतात. मध्ययुगीन काळात बंजारा समाजाचे लोक व्यापार व व्यापारी वस्तुंच्या वाहतुकी निमित्त खानदेशात आल्याचे दिसून येते.बंजारा म्हणजे वनातून भटकणारा व गुराढोरांसाठी चारा शोधत फिरणाराहोय. तसेच प्राचीन-मध्ययुगीन काळातील राजे-सुलतान यांच्या मालाची -रसदाची वाहतुक गुराढोरांव्दारे करणेहा मुळ व्यवसाय असलेल्या लोकांना बंजारा असे म्हणतात. त्यांच्या उपजीविकेचे एकमेव साधन केवळ मालांची ने -आण करणेहाहोता.त्यासाठीते रानोमाळ भटकत होता.६काश्मिरते कन्याकुमारी पर्यंत दाट वनातून विखूरलेला, निसर्गाच्या सानिध्यात, सुधारीत व सुसंस्कृतसमाजापासून कोसो दूर असणारा, आपली गोर पंचायत, भिन्न राहणीमान, स्वतंत्र बोलीभाषा, भिन्न संस्कृती, तांडासंस्कृती असलेला बंजारा समाज संपूर्ण भारतामध्ये पसरलेला आहे. बंजारा समाजाचे लोकतांडा करून गावापासून व शहरी भागापासून लांब डोंगराळ व जंगली भागात वस्ती करून राहतो.

प्रस्तुत शोध निबंधात खानदेशातील बंजारा स्त्रियांची परिस्थिती या विषयावर संशोधन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या उत्तरेकडील खानदेशहा एक प्रादेशिक विभाग आहे.या खानदेशातील तिन्ही जिल्ह्यात अनेक भटक्या जाती-जमातीचे लोक वास्तव्य करून राहतात.खानदेशात, बंजारा जमातीचे अनेकतांडे स्थायिक झाले असून या भटक्या जमातीने आपले कार्यक्षेत्र निश्चित केले आहे.बंजारा लोकांत दोन वर्ग आढळतात.एक लदेणिया आणि दुसरा गमेलिया. लदेणिया म्हणजे रानात भटकणारा तर गमेलिया म्हणजे एके जागी स्थायिक झालेला.७इ.स.१८८० च्या खानदेश गॅझेटियर्समधीलनोंदीनुसार बंजारा लोकांची संख्या ३६५६२ होती आणि चारण किंवा गवार मथुरे लभाण, लाड, खुदाणे, लामचे आणि मेहरूणे या सात उपशाखातील बंजाराची वस्ती खानदेशात आहे.८खानदेशात मध्ययुगीन काळापासून बंजारा समाजाची वस्ती असल्याचे दिसून येते. आधुनिक काळात १९५० नंतर बंजारा समाज स्थिर झाल्याचे दिसून येते. आजच्या काळातील बंजारा समजाच्या स्त्रियांची परिस्थिती खालील प्रमाणे दिसून येते.

१. जन्म :- बंजारा समाजातील लोक मुलीचा जन्म झाल्यास आनंद व्यक्त करतात. मुला प्रमाणेच मुलीचे पालन पोषण केले जाते.
२. बालपण :- बंजारा समाजातील पालक आपल्या मुलींचे चांगल्या प्रकारेसंगोपण करतात. बालपणीचे सर्व लाड करतात.
३. शिक्षण :- खानदेशातील बंजारा समाजातीलस्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. मुली प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतात. मात्र उच्च शिक्षण मात्र घेत नाहीत. श्रीमंत बंजारा मुलीच उच्च शिक्षण घेतात. गरीब मुलीचे पालक शिक्षण खर्चिक असल्यामुळेते आपल्या मुलींना उच्च शिक्षण देवू शकत नाही.शहरी भागात नोकरी निमित्त आलेल्या बंजारा लोकांच्या मूली उच्च शिक्षण घेतांना दिसून येतात.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

४. नोकरी :- खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रिया बोटावर मोजण्या इतक्याच सरकारी नोकरी करतांना दिसतात, बऱ्याच कुटूंबात स्त्रिया उच्च शिक्षित असूनही त्यांना नोकऱ्या नाहीत.

५. विवाह :- खानदेशातील बंजारा समाजातीलस्त्रियांचे विवाह १८ वर्षापूर्वीच होत असल्याचे दिसून येते. बाल विवाहाचे प्रमाण ग्रामीण भागात अधिक असल्याचे दिसून येतात. बंजारा समाजातील पुरूषहुंडा घेवून विवाह करीत असल्यामुळे गरीब मुलींचे विवाह लवकर होत नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना विवाह जमवणे कठीण जाते.

६. वारसा हक्क :- खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रियांना पुरूषांसारखे वारसा हक्क मिळत नाही. बालपणी आई-वडील तरूणपणी पती व म्हातारपणी मुलगा स्त्रियांचा आधार असल्याचे दिसून येतात. पतिच्या संपत्तीवर स्त्रियांचा पूर्णहक्क असतो.

७. आर्थिक परिस्थिती :- खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रिया आपल्या कुटूंब प्रमुखाच्या आर्थिक मदतीवर अवलंबून असतात. त्यांना स्वत:चे आर्थिक स्वावलंबन नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना मात्र आर्थिक स्वावलंबन असल्याचे दिसून येते. शेतीची कामे करणे पशूपालन करणे व घरची धुनी भांडी करणेहे ग्रामीण भागातील स्त्रियांची दैनंदिन कामेहोत.

८. धार्मिक परिस्थिती :- खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने आपल्या पारंपारिक धार्मिक कार्यात सहभाग घेतात. प्रत्येक सण-उत्सव प्रसंगी स्त्रियांना सन्मान दिले जाते.

९. समाजातीलस्त्रियांचे स्थान :- एक व्यक्ति म्हणून भारतीय स्त्रीचा दर्जा पुरूषांपेक्षा कमी आहे. बंजारा कुटूंब व्यवस्था पितृसत्ताक पध्दतीची असल्यामुळे त्यांना दूय्यम स्थान आहे.

१०. स्त्रिया व आधुनिकीकरण :- देशातील बदलत्या स्थितीचा, ज्ञानाचा, आधुनिकीकरणाचा प्रभाव ग्रामीण भागातील स्त्रियांवर देखील पडत आहे. आज घरोघरी रेडियो, दूरदर्शन या सारखी प्रसारमाध्यमे पोहोचल्यामुळे विश्वामध्ये काय चालू आहे. याची माहिती प्राप्त होते.आधुनिकीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील स्त्रीचे राहणीमान, वेशभूषा, केशभूषा यातही परिवर्तन होत असल्याचे दिसून येत आहे.तांडयातील बंजारा समाजातीलस्त्रियांची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय असल्याचे दिसून येते.शासनाच्या विविध योजना आहे परंतू अज्ञानामुळेते त्याचा घेतांना दिसत नाहीत. विसाव्या शतकामध्ये अनेक शास्त्रीयसुधारणा झाल्या अनेक क्षेत्रात नेत्रदिपक यश मिळाले आणि विविध सुखसोयी उपलब्ध झाल्या परंतुसुधारणा बरोबरच गुंतागुंत वाढली आणि अनेक बंधने आली.

खान्देशातीलबंजारा समाजाच्या स्त्रियांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. बंजारा समाजाच्या स्त्रियां प्रगतीच्या मानाने कोसो दूर आहे.त्याचे कारण म्हणजेबंजारा समजाच्या स्त्रियांचीसमाजात सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात जागृती निर्माण करणाऱ्या कार्यकर्ते, नेतृत्वाचा अभाव आहे.खानदेशातील बंजारा समाजातीलस्त्रियांचीअवस्था सुधारण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेने निर्मिलेल्या रुढी, पंरपरा व चालीरितीच्या विळख्यात बंजारा समाजास पद्धतशीरपणे अडकवलेले असल्यामुळेहा समाज उन्नतीपासून वंचित राहिला.बंजारा समाजाची आजची परिस्थिती म्हणजे त्यांच्या रक्तावर व श्रमावर उभी आहे.ते फक्त पोट भरण्यापलिकडे.त्यांना काही मागण्यापूर्वी आणि मागितल्यानंतरही समाजव्यवस्थेने नकारात्मक भूमिका घेतली आहे.त्यांचे अस्तित्व संपूर्णत: नाकारले गेले व बंजारा जातीला गुन्हेगार ठरवून सामाजिक विकासापासून दूर ठेवले गेले.बंजारा समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे.हा समाज मासांहारी व मद्यपान करणारा आहे.

१. खानदेशातील बंजारा समाजाच्या स्त्रियांत बदल दिसतो. बंजारा समाजाचे वस्तीस्थान, राहणीमान, केशभूषा व वेशभूषा, आहार-विहार यात बदल घडून येत आहे.

२. प्राचीन व मध्ययुगीन काळात बंजारा समाजाचेतांडे भटक्या अवस्थेत होते आता तेस्थिर झाले आहे. त्यामुळे स्त्रिया सुध्दा पुरूषांच्या बरोबरीने शेती, पशुपालन, विविध व्यवसाय व नोकरी करतांना दिसून येते.

३. बंजारा समाजाची पूर्वीची परिस्थितीही फारहालाखीचीहोती. त्या काळात जीवन जगण्यासाठी लोकांना भटकावे लागत होते.आता मात्र स्थिरता आल्यामुळे आर्थिकसुधारणा दिसून येते.

४. खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रिया महाराष्ट्राच्या इतर भागातील स्त्रियापेक्षा कमी शिकलेल्या आहेत.तसेच नोकऱ्यामध्ये त्यांचा सहभाग नगन्य दिसून येतो.

५. खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रियामध्येसामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक जागृती करण्यीच आवश्यकता आहे.

६. खानदेशातील बंजारा समाजांच्या स्त्रियांचा राजकारणात सहभाग शून्य आहे.

७. बंजारा समाजातील स्त्रिया आर्थिक दृष्टया परावलंबी आहेत. त्यांना स्वावलंबी बनविण्याची आवश्यकता आहे.

८. खानदेशातील बंजारा समाजाच्या स्त्रिया शासनाच्या विविध योजनापासून वंचित आहेत. त्यांना या योजनाबद्दल माहिती

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

सांगण्याची आवश्यकता आहे.

९. खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रियांमध्ये सामाजिक व राजकीयसंघटनाचा अभाव दिसून येतो.

१०. खानदेशातील बंजारा समाजातील स्त्रियांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी बंजारा समाजातील उच्च शिक्षित पुरूष व शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

खानदेशातील तांडयावर राहणाज्या स्त्रियांची परिस्थिती अतिशय हालाखीची असून त्यांच्यातील मागासलेपणा दूर करण्यासाठी सामाजिक संस्था, स्वंयसेवी संस्था व शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. अजूनही बंजारा समाजातील स्त्रिया निरक्षर व अल्पशिक्षित असल्याने शासनाने या समाजाच्या स्त्रियांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी प्रयत्न करण्याची व योजना अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.बंजारा समाजातील अनिष्ट, सामाजिक रूढी, प्रथा, परंपरा बंद झाल्या पाहिजे.हुंडा प्रथा बंद झाल्या पाहिजे.अंधश्रध्दा नष्ट केली पाहीजे.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. देव प्रभाकर :इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड – १ जानेवारी २००२.पृ.१२
२. कदम नागनाथ धो :महाराष्ट्रातील भटका समाज ,संस्कृती व साहित्य प्रतिभा प्रकाशन, पुणे – १९९५.पृ.२२
३. डॉ. शहा मु.ब.– खानदेशचासांस्कृतिक इतिहास खंड–१, का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे जानेवारी –२००४ पृ.१
४. डॉ.पाटील भी.ना.– खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ, भूषण भीमराव पाटील, पाचोरा जि.जळगांव, जून–२००५ पृ.१
५. उपरोक्त –पृ.२
६. राठोडआत्माराम कनिराम –गोर बंजारा : इतिहास व लोकजीवन, गोरवट प्रकाशन, मोहा १९९४ पृ.३
७. तत्रैव –प.–११८
८. Torgol D.M. (Executive Editor)-Gazetteer of the Bombay Presidency, Vol-XII-Khandesh, Bombay-1880 P-106-113

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशात एकोणिसाव्या शतकातील औषधी तेल तयार करण्याचे उद्योगधंदे

**प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा**
विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
अक्कलकुवा, जि. नंदुरबार (महाराष्ट्र)

**प्रस्तावना**

खानदेशात औषधासाठी एरंडी तेल, चंदन तेल, इलायची तेल, काळ्या तिळीचे तेल, रोशा गवतापासून तयार करण्यात आलेले तेल इत्यादी वनस्पतीवर प्रक्रिया करून तेल काढले जात होते. खानदेशातील सातपुडा जंगलात चंदनाची झाडे भरपूर आहेत. एरंडचे झाडे आहेत. इलायचीचे देखील झाडे आहेत आणि काळ्या तिळीची लागवड केली जात होती. या वनस्पती गोळा करून तेल काढण्याची प्रक्रिया केली जात होती. यांचे तेल औषधीसाठी वापरले जात असे.१

**१) एरंडी तेल –** खानदेशात एरंडेलची लागवड पावसाळ्यात करण्यात येते. हे पीक तीनही हंगामात येते. पुर्वी या तेलाचा वापर वंगण म्हणून केला जात होता. रथ, बैलगाडी, चाकांमध्ये वंगण घालत असत. त्यामुळे रथाची आणि बैलगाडीची चाके सुलभ रीतीने फिरत असत.२ परंतु कालांतराने या तेलाचा वापर औषधी तेल म्हणून करण्यात येवू लागला. पचनक्रिया होत नसेल तर हे तेल प्यायला देत असत. पोटात गडबड झाली असेल किंवा अपचन झाले असेल त्याचबरोबर जास्त दिवस धान्याची साठवण करावयाची राहिल्यास तेल धान्यास लावत असत. त्यामुळे धान्याला किड लागत नाही. एखादी जखम झाली तर जखमेवर लावण्यासाठी, डोक्यावरील केसांना लावण्यासाठी३ खानदेशात आयुर्वेद तेल म्हणून या तेलाचा वापर केला जात होता.

**२) चंदन तेल –** खानदेशातील सातपुडा जंगलात चंदनाची झाडे मोठ्या प्रमाणात आहेत. या झाडाला जबरदस्त सुगंध असतो. हे झाड १८ ते २० वर्षांचे झाल्यावर परिपक्व होते. त्यानंतर त्याला तोडले जाते. तोडलेल्या झाडाच्या फांद्या अलग केल्या जातात. हे झाड शक्यतोवर मुळापासून काढले जाते. नंतर झाडाला कुऱ्हाडीने आजुबाजूचे लाकूड तासले जाते आणि शेवटी या लाकडाचा मधला जो गर असतो तो लालसर असतो. तो काढल्यानंतर त्याच्यावर भट्टीत प्रक्रिया करून तेल काढतात. हे तेल अतिशय सुगंधी असते. त्याचा आयुर्वेदिक औषधी म्हणूनही वापर केला जात असे.४ या चंदनाच्या लाकडाचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. त्याचबरोबर 'चंदन खोड' देखील बनवतात. नदीतून लाल रंगाचा गोल दगड आणत असत आणि चंदनाच्या लाकडाचा मधल्या गराचा तुकडा या दगडावरती पाणी टाकून गिरवत असत. त्यातून पांढऱ्या रंगाचे चंदन बाहेर निघत असे ते देवांच्या व पुजा करणाऱ्यांच्या कपाळावर लावत असत. हिंदु धर्मातील पुजा विधीसाठी चंदनाला अतिशय महत्त्व दिले जात होते. त्याचबरोबर हिंदु धर्मातील मनुष्य मेल्यावर दहन क्रियांसाठी या लाकडांचा उपयोग केला जात असे. चंदनाचा उपयोग आयुर्वेदिक तेल, सुगंधी तेल (अत्तर) म्हणून मोठ्या प्रमाणात उपयोग होत होता. चंदनाच्या झाडापासून अंगाला लावण्याचा सुगंधी साबण बनविला जात असे.

**३) निलगिरी तेल –** घरगुती औषधासाठी निलगिरी तेलाचा वापर केला जात होता. निलगिरीचे पान हातात चुरगळून वास घेतला तर त्यात निलगिरी तेलाचा सुगंध येतो. खानदेशात निलगिरीचे झाडे खूप आहेत. त्यांची वाढही फार झपाट्याने होते. शेतकरी पडीत जमिनीत, कुरणात, माळरानात अगर शेताच्या कडेने या झाडाची लागवड करत होते. सातपुडा जंगलातही निलगिरीची लागवड खूप केलेली दिसते. यांच्या पानपासून तेल काढले जात होते.

**तेल काढण्याची प्रक्रिया**

निलगिरीच्या झाडापासून तेल काढण्याचा उद्योग खानदेशात होता. निलगिरीच्या झाडाची पाने व कोवळ्या फांद्यापासून तेल काढत होते. कोवळ्या झाडापेक्षा १६ ते १७ वर्षांच्या वयाची झाडे निवडत असत. या झाडांची पाने गोळा करून ती सावलीत तीन दिवस सुकवत असत. एक एकरातील झाडापासून जवळपास ५०० ते ६०० किलो पाने मिळत असे. या पानातील तेल उर्ध्वपतन पद्धतीने काढत होते. १२५ सें.मी. उंच व ७५ सें.मी. व्यासाच्या तांब्याच्या भांड्यात बसविलेल्या जाळीदार पाने ठासून भरत असत. या जाळीच्या खालच्या भागात भांड्यात पाणी भरतात. या भांड्याच्या तोंडावर बगळ्याच्या मानेप्रमाणे लांब नळी बसवतात. भांड्याच्या तोंडावर ही नळी हवाबंद बसविलेली असते. भांड्याखाली विस्तव पेटवला की, भांड्यातील पाण्याची वाफ होते. या वाफेवर पानांतील तेल वाकड्या नळीतून बाहेर येते. नळीच्या टोकाची वेटोळी थंड पाण्यात बुडवलेली असल्यामुळे वाफ थंड होऊन तेल व पाणी नळीच्या टोकास लावलेल्या भांड्यात गोळा होते. तेल पाण्यावर तरंगते. या दुसऱ्या भांड्यास बुडाशी असलेल्या छिद्रातून पाणी बाहेर सोडतात आणि तेल वेगळे काढून बाटल्यांमध्ये भरतात. एकाच वेळी ४०० किलो पानांचे तेल काढण्यात येते. या प्रक्रियेस जवळपास आठ तास लागत असतात. भट्टीतून काढलेले तेल शुद्ध करावे लागते. त्यासाठी तेलाच्या वजनाच्या २/६ पाणी आणि थोडा कॉस्टिक सोडा, त्यामध्ये मिसळतात. लहान उर्ध्वपतन भांड्यात हे

ISSN : 2348-7143
Dec. 2018

मिश्रण तापवतात. उर्ध्वपतनाने मिळणारे तेल कापडामधून गाळून घेतात आणि कातडी पिशव्यांमध्ये भरले जात असे.५ पानांच्या वजनाच्या ०.७५ ते १.२५ टक्के तेल मिळते. पक्व झालेली पाने वापरल्यास अधिक तेल मिळते. मोठी भट्टी तयार केल्यास प्रक्रियेचा खर्च कमी येतो आणि तेलाची निर्मिती जास्त होते.

निलगिरीचे शुद्ध तेल रंगहीन किंवा पिवळ्या फिकट रंगाचे असते. त्याला कापसासारखा सुगंध येतो. चव तिखट असते. निलगिरी तेल हे जंतूनाशक आहे. म्हणून जंतूनाशक व दुर्गंधीहारक पदार्थात या तेलाचा उपयोग करतात. उलटी आणि खोकल्यांच्या औषधात आणि साबणात या तेलाचा वापर करतात. निलगिरी तेल व ऑलिव्ह ही दोघे सम प्रमाणात मिश्रण केल्यास त्याचा उपयोग सांधे दुखीकरिता चोळण्यासाठी केला जातो. जळलेल्या कातडीवर लावण्याच्या मलममध्ये हे तेल वापरलेले असते. दमा साठीही या तेलाचा वापर करतात. खोकल्यासाठी या तेलाची वाफ घेतात. सुस्ती व थकवा कमी करण्यासाठीही या तेलाचा वापर करतात. त्याचबरोबर आगगाडीच्या इंजिनात व बॉयलरमध्ये जो धुराचा पापुद्रा तयार होतो तो काढण्यासाठी निलगिरी तेलाचा वापर करतात. वाळलेली पाने जाळल्यावर किटकांचा उपद्रव कमी होतो. वस्त्र साफ करण्यास आणि कापडावरील डाग काढण्यास या तेलाचा उपयोग होतो. निलगिरीचे तेल आयुर्वेदिक आहे. सर्दी, पडसे, कफ वरती याचा उपयोग करतात. हे तेल जंतूनाशक तेल म्हणून ओळखले जाते.६ या तेलाचा उपयोग एखाद्या परिसरात रोगराई निर्माण झाल्यावर त्या रोगाची साथ नियंत्रणात आणण्यासाठी या तेलाचा उपयोग केला जात होता.

**४) इलायची तेल** – खानदेशात मसाल्याचे उत्पादन घेतले जात होते. त्यापैकी इलायचीच्या बियांपासून तेल काढले जात होते. याचा उपयोग औषधी तेल म्हणून वापर केला जात होता. त्याचबरोबर खाद्यान्न, कडी, शरबत यांच्यांमध्ये या तेलाचा वापर होत असे. यांच्यापासून पोट दुखण्याचा आजार कमी होत असे.७

**५) आवला तेल** – सातपुड्यातील अक्कलकुवा, अक्राणी, मोलगी येथील जंगलात आवलाची झाडे विपुल प्रमाणात आहेत. आदिवासी लोक या आवलाच्या बियांपासून प्रक्रिया करून तेल काढत होते. हे तेल केशतेल म्हणून प्रसिद्ध आहे किंवा केसांच्या वृद्धीसाठी या तेलाचा उपयोग केला जात होता. हे तेल त्वचेवर लावल्यावर त्वचा रोग नाहीसा होतो. त्याचबरोबर आवला खाल्ल्यावर तोंडातील आजार, दुर्गंधी नाहीशी होते. नाकातून वाहणारे रक्त थांबविण्यासाठी, रक्त शुद्धीस, फळाचे लोणचे इत्यासाठी आवळा उपयोगात येत असे.८

**६) रानतुळस तेल** – रान तुळसीची झाडे संपूर्ण खानदेशात आढळतात. जंगलात पडीत जमिनीत सर्वत्र रान तुळशीचे लहान-लहान झाडे दिसतात. या झाडांच्या पानांपासून तेल काढले जात होते. या तेलाचा उपयोग कफ काढण्यासाठी आणि जंतूनाशक म्हणून वापर केला जात होता. याचबरोबर रान तुळसाची पाने त्वचा रोगात वापर होत असे. ताप आल्यावर हाता-पायांच्या नखांना पाने बांधत असत. जखमेवर रानतुळसचे तेल लावत होते.९

**७) काळी तिळीचे तेल** – खानदेशात तिळीचे दोन प्रकार होते. एक पांढरी तिळी व दुसरी काळी तीळ होय. पांढऱ्या तिळीचे तेल खाण्यासाठी वापरत होते. परंतु काळी तिळीचे तेल हे आयुर्वेदिक होते. तिळीचे तेल प्यायल्याने अशक्त व्यक्तीचे वजन वाढते. भूक लागत नसल्यास गूळाबरोबर तिळीचे लाडू बनवून खावेत. दिवसातून दोन लाडू सकाळ व संध्याकाळ असे तीन दिवस खाल्ल्यास भूक व्यवस्थित लागते किंवा तिळाच्या तेलाचा मसाज नियमित सर्वांगाला करावा.१०

रक्त मूळव्याध झाल्यास बरे होईपर्यंत एक चमचा तेल दररोज प्यावे आणि मूळ व्याधीवर सकाळ, संध्याकाळ बरे होईपर्यंत त्या जागेवर तिळाचे तेल लावल्यास मूळव्याध बरा होतो. तसेच तिळाच्या तेलाचा मसाज केल्यास थकलेले स्नायू पुर्ववत काम देऊ लागतात. कितीही कष्ट, मेहनत केली तर जाणवत नाही. ज्या स्त्रियांना बाळंतपणानंतर पुरेसे दुध येत नाही अशा स्त्रियांना दररोज तिळाचे तेल रोज सकाळी प्यायला द्यावेत. याचबरोबर हृदय विकार ज्याला आहे त्यास ताजे तिळाचे तेल प्यायला दिल्यावर त्यांचे परिणाम चांगले दिसून येतात. डोक्यावरील केस वाढीसाठी देखील या तेलाचा उपयोग करण्यात येत होता.११ अशा या काळी तिळीच्या तेलाचे आयुर्वेदिक महत्त्व दिसून येते. सफेद तिळीच्या तेलापेक्षा काळी तिळीच्या तेलाचे भाव जास्त राहत असे.

**८) रोशा गवताचे तेल** – खानदेशात अक्राणी आणि पिंपळनेर परगण्यात मोठ्या प्रमाणात शेतात आणि जंगलात रोशा गवत उगत असते. या गवताचे दोन प्रकार होते. निळ्या फुलांच्या गवताचा तेलाचा रंग हिरवा राहत असे. त्यांना 'सोफीया' आदिवासी भाषेत म्हणत असत आणि पांढऱ्या फुलांच्या गवतापासून पांढऱ्या रंगाचे तेल तयार होत असून त्यांना 'मोतिया' असे म्हणत होते. मोतिया तेलाला सोफीया पेक्षा मोठ्या प्रमाणात मागणी होती आणि किंमत जास्त राहत असे.१२ या तेलाचे उत्पादन जास्तीत जास्त पिंपळनेर परगण्यात होत होते. तळोदा, अक्राणी, शहादा, नंदुरबार येथेही या तेलाचे उत्पादन होत होते.१३ या तेलाचे उत्पादक मुसलमान असून ते पावसाळा संपल्यानंतर सप्टेंबर महिन्यात हे गवत परिपक्व होत असे. तेव्हा आदिवासी भिल्लांकडून गवत विकत घेवून त्याचा मोठ्या प्रमाणावर साठा करून ठेवत होते.१४

रोशा गवताचा साठा केल्यानंतर तेल काढण्यासाठी पुढील प्रक्रिया केली जात होती. ४ फुट लांब, २ फुट रूंद आणि अडीच फुट खोल अशी भट्टी तयार करून त्याच्यावर तांब्याचे किंवा लोखंडी भांडे ठेवण्यात येत असे. त्यामध्ये काही प्रमाणात पाणी , रोशा गवताचा कुट किंवा

भुस्सा भांडे पूर्ण भरेपर्यंत टाकले जात होते. त्यात पुन्हा प्रमाणशीर पाणी टाकून छिद्र असलेली लोखंडी झाकण ठेवून त्यात झाकणातील छिद्राला बांबूची नळी जोडण्यात येत असे. ती नळी घट्ट राहावी म्हणून कापडी पट्टी आणि उडदाचे पीठ लावण्यात येत असे. त्यानंतर ती नळी दोरीच्या साह्याने दुसऱ्या भांड्यास जोडत असत. ते भांडे वाहत्या भांड्यात बुडवून ठेवत असत. त्या भांड्यात वाफ जमा होऊन थंड पाण्यामुळे त्या वाफेचे द्रवात रूपांतर होत असे. भांडे पूर्ण भरल्यावर ते हलू लागते. त्यातील द्रावण तिसऱ्या भांड्यात काढून ते ढवळल्यानंतर तवंग निर्माण होत असे. अशी तवंग अलगदपणे काढून एका बाटलीत साठविली जात असे. हे तवंग किंवा तरंगलेला जो भाग असतो तेच तेल होय. हे तेल औषधासाठी उपयोग केला जात असे. असे औषधी तेल कातडी पिशव्यांमध्ये भरून बैलाच्या पाठीवर ठेवून कोंडाईबारी खिंडीतून आणि धुळे–मनमाड मार्गे मुंबईला विक्रीसाठी पाठविले जात होते.[१५] या तेल व्यवसायातून मोठ्या प्रमाणात पैसा मिळत होता.

रोशा गवतापासून जे तेल काढले जात होते त्याला 'निरगुडी तेल' म्हणून नाव दिले गेले आहे. या तेलाचा गुणधर्म संधीवात, लकवा, अंगदुखी, मुक्का मार, कंबर दुखी, पाठ दुखी, गुडघे दुखीवर या तेलाने मालीश करावी लागत असे.[१६] आणि मसाज केल्यानंतर सर्व अवयवांना आराम मिळत असे. त्यामुळे स्नायू पुन्हा ताजेतवाने होत असत. त्याचबरोबर या तेलाचा सुगंधी तेल म्हणूनही वापर केला जात होता. तसेच रोशा गवत कोरा चहामध्ये टाकून उकळून प्याल्यावर सर्दी, डोळे दुखी, पडसे, कफ इत्यादी आजारावरही रोशा गवत गुणकारी आहे. नंदुरबार बाजारात ही रोशा गवताच्या तेलाची विक्री होत होती.[१७] तळोदा स्थानिक बाजारपेठेतून रोशा तेलाची परराज्यात निर्यात केली जात होती. सन १९०० मध्ये ४००० रुपये तेलाची निर्यात करण्यात आली होती.[१८]

**निष्कर्ष**

खानदेशात एकोणिसाव्या शतकात अनेक हस्त उद्योगधंदे होते. कापड तयार करणे, साखर उद्योग, गुळ उद्योग, बुरुड उद्योग आणि तेल उद्योग असे अनेक प्रकारचे उद्योगधंदे होते. तेल उद्योगामध्ये खाण्याचे तेल व औषधी तेल उद्योग व्यवसाय सुरु होता. औषधी तेलाचे व्यवसाय हे प्रामुख्याने सातपुडा वन विभागात चालत असत. आदिवासी लोक औषधी वनस्पती शोधण्यास पारंगत होते. त्या वनस्पतीवर ते विशिष्ट प्रक्रिया करुन तेल काढत असत. चंदन तेल हे सुगंधी तेल काढत असत. त्याचा वापर लग्न, विविध कार्यक्रमामध्ये व घरातही उपयोग करत होते. निलगिरी तेल हे जंतूनाशक तेल म्हणून त्याचा वापर करत असे. इलायची तेल हे पोट दुखण्याचा आजार कमी करत होते. आवला तेल हे दुर्गंधी कमी करण्यासाठी व त्वचेचा रोग कमी करण्यासाठी व केसतेल म्हणूनही त्याचा वापर केला जात होता. रानतुळसापासून तेल काढून ते माणसाच्या आजारीपणात कफ काढण्यासाठी करत असत. जंतूनाशक म्हणून त्याचा वापर होत असे. जखम झाल्यावर हे तेल लावत होते. काळी तिळीचे तेल हे आयुर्वेदिक होते तिळीचे तेल प्यायल्याने अशक्त व्यक्तीचे वजन वाढत असे. भूक लागत नसल्यास गूळाबरोबर तिळीचे लाडू बनवून दिवसातून दोन लाडू सकाळ व संध्याकाळ असे तीन दिवस खाल्ल्यास भूक व्यवस्थित लागत होती किंवा तिळाच्या तेलाचा मसाज नियमित सर्वांगाला केल्यानंतर अंगदुखी कमी होत असे. मूळ व्याधीवर सकाळ, संध्याकाळ बरे होईपर्यंत त्या जागेवर तिळाचे तेल लावल्यास मूळव्याध बरा होतो. काळी तिळीच्या तेलाचा उपयोग मोठया प्रमानात होत होता. त्याचबरोबर रोशा गवताच्या तेलापासून संधीवात, लकवा, अंगदुखी, मुक्का मार, कंबर दुखी, पाठ दुखी, गुडघे दुखीवर या तेलाने मालीश मसाज केल्यानंतर सर्व अवयवांना आराम मिळत असे. त्यामुळे स्नायू पुन्हा ताजेतवाने होत असत. त्याचबरोबर या तेलाचा सुगंधी तेल म्हणूनही वापर केला जात होता. हे तेल काढण्यासाठी अक्कलकुवा तालुक्यातील सातपुडा जंगलात मोठा कारखाना आहे. तसेच रोशा गवत कोरा चहामध्ये टाकून उकळून प्याल्यावर सर्दी, डोळे दुखी, पडसे, कफ इत्यादी आजारावरही रोशा गवत गुणकारी आहे. कालांतराने विज्ञान युगात केमिकल्सचा वापर केला जात आहे त्याचा मानवी जीवनावर विपरीत परिणाम होतो आहे. भविष्यात मानवाचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आयुर्वेदाकडे पुन्हा जावे लागेंल. कारण त्याच्याशिवाय पर्यायच राहणार नाही.

**संदर्भ सूची :**

१) खानदेश जिल्हा गॅझेटिअर, पृ.क्रं.२२७–२२८.
२) Selection from the Records of the Bombays, Government No.ccl, New Series. Papers Relating to the Revision Survey Settlement of 171 Govt. Villages Of the Nandurbar. (एस.आर.बी.जी.) पेपर्स, नंदुरबार तालुका, १८९६, पृ.क्र. ६
३) जळगांव जिल्हा गॅझेटिअर, पृ.क्र. ३८
४) उपरोक्त – पृ.क्र. ३८
५) राहूडकर वासुदेव बळवंत – शेतकऱ्यांसाठी लघु उद्योग, (सुगंधी वनस्पतीची तेले), उदाम प्रकाशन, नागपूर, १९७२, पृ.क्र. १००–१०७
६) जळगांव जिल्हा गॅझेटिअर – पूर्वोक्त, पृ.क्र. ३१
७) सिंह महेन्द्र प्रताप – भारतीय वन उपज, प्रकाशक राष्ट्रीय पुस्तक न्यास, नई दिल्ली, २०१४, पृ.क्र. २३९.
८) जळगांव जिल्हा गॅझेटिअर – पूर्वोक्त, पृ.क्र. ३९
९) उपरोक्त – पृ.क्र. ३७

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

१०) फजल अबूल (अनुवाद) शर्मा हरिवंश रॉय – आईने अकबरी, महामना प्रकाशन मंदिर, इलाहाबाद, १९६६, पृ.क्र. ६८
११) उपरोक्त – पृ.क्र. ६८
१२) खानदेश जिल्हा गॅझेटिअर – पुर्वोक्त, पृ.क्र. २२७
१३) उपरोक्त – पृ.क्र. २२८
१४) पाटील म.वि. – कंपनी सरकार कालीन खानदेश, पुर्वोक्त, पृ.क्र.९८
१५) खानदेश जिल्हा गॅझेटिअर – पुर्वोक्त, पृ.क्र. २२६
१६) एस.आर.बी.जी. पेपर्स, तालुका अक्राणी महल, १९००, पृ.क्र. ३
१७) एस.आर.बी.जी. पेपर्स, नंदुरबार तालुका, १८९६, पृ.क्र. ७५
१८) एस.आर.बी.जी. पेपर्स, तालुका अक्राणी महल, १९००, पृ.क्र. ३

‘RESEARCH JOURNEY’ *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील सण आणि उत्सव : विशेष संदर्भ बंजारा समाज

**प्रा.डॉ. सुनिल भालेराव पाटील**
इतिहास विभाग,
वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा.

**प्रस्तावना**

खानदेशही उत्तर मध्ययुगीन संज्ञा ज्या भौगोलिक प्रदेशासाठी वापरली जातेतो प्रदेश आजच्या काळातील जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हातसेच नाशिकच्या उत्तरेकडील काही भौगोलिक भागाचाही यात समावेश होतो. अशा या खानदेशात अनेक समाज अनेक पिढयान–पिढया गुण्या–गोविंदाने आणि एकोप्याने नांदतांना, वावरतांना दिसून येतात.कुठल्याहीसमाजाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी त्या भागातील कला, संस्कृती, यात्रा, सण–उत्सव, रूढी परंपरा, लोक व्यवहार यासर्वांची माहिती असणे आवश्यक आहे.

धार्मिक कार्य देव देवता, जयंती, सामाजिक किंवा सार्वजनिक व्यवहार करण्याचे ठराविक दिवस प्रत्येक धर्मात हे दिवस सारखेच असतात.ईस्टर, नाताळ इत्यादी ख्रिस्ती सण, मोहरम, बारवफत, रमजान, खोरदादसाल इत्यादी मुसलमानी, तर गहमबर, नवरोझ पतेतीहे पारशी सण आहेत. रामनमवी, गोकूळष्टमी, नवरात्र, दसरा, दिवाळी, होळी इत्यादीहिंदू लोक सण पाळतात त्यांना सण किंवा सणवार असेही म्हणतात.१

सण व उत्सव हे कुठल्याही समाजाचा एक अविभाज्य घटक असतात.सण हे आपल्याला त्या त्या प्रदेशातील असणा–या विशिष्ट धार्मिक कल्पनांचे ज्ञान करून देत असतात.सामाजिक व्यवहार व विशिष्ट परिस्थिती यांचा अन्योन्य संबंध असतो.धार्मिक कल्पनांचा समाज मनावर मोठा प्रभाव दिसून येतो.एखाद्या काळातील समाजाचा अभ्यास करण्याच्या हेतूने सण जसे महत्वाचे तसेच महत्व समाजातील उत्सव, समारंभाना असते.सण उत्सव यांच्या साजराहोण्याच्या निर्मित्ताने समाजाच्या अर्थकारणावर त्याची पकड दिसून येते.सण उत्सवामुळे समाज मनाचे दर्शन, अभिरूचीच्या पातळीचे ज्ञान होते.अभिरूचीच्या पातळी वरून समाज मन किती प्रमाणात विकास पावला याचाही अंदाज बांधता येतो.पूर्वी आजच्या सारखीसमाजाची सांपत्तिकस्थिती नव्हती.परंपरागत व्यवसाय करून कष्टमय जीवन जगणेहोते.सण उत्सवाच्या निर्मिताने घरात गोड धोडहोत असे.त्याच्यानिमित्ताने लोक कामातून सवड काढीत असत.

माणूसहा समाजप्रिय प्राणी आहे. मानवाच्या समाज जीवनाला सामुदायिकतेच्या अंगीकाराने नवा आकार प्राप्त झाला आहे. माणसा माणसांच्या एकत्र येण्यातूनच विशिष्ट गरजेतूनच सण उत्सवांची निर्मिती झालेली दिसते.सण उत्सवाच्या साहाय्याने चराचराशी नाते जोडले जाते.धर्म भावनेच्या मुळाशी जावून समाजमनाची बांधणी करतो.सण उत्सवामुळे व्यक्ती आणि समाजाने न तुटणारे नाते निर्माण होत असते.खानदेशातील आहिराणी भाषेच्या माध्यमातून येथीलसंस्कृती फार प्रभावीपणे विकसित झालेली दिसून येते.येथील लोक दैवत, यात्रा, सण, उत्सव हे समाजाच्या सर्व घटकांना आपल्यात सामावून घेतात.येथील विविध धर्म, पंथ, जाती, संप्रदाय आनंदाने एकत्र नांदतांना दिसतात.धार्मिक भेदाभेद कुठेही दिसत नाही.खानदेशातील सण उत्सवाची माहिती पाहत असतांना या भागातील सण उत्सव हेसाजरे करणेहे मराठी कॅलेंडर किंवा पंचांगात दिलेल्या तिथीनुसारसाजरेहोतांना दिसून येतात.सालाबादाप्रमाणे येणा–या तिथीलाहे सण उत्सव साजरे केले जात असतात.

खानदेशात अनेक समाज पिढयांन पिढया वास्तव्यास आहेत.यात कुणबी, माळी, साळी, कोळी, बंजारा, आदिवासी यासारखे अनेक समाज आहेत.या समाजामध्ये प्रत्येक सण उत्सव हा थोडया फार फरकानेसाजरा केला जात असतो.यात विशेष करून बंजारा समाजात साजरेहोणारे सण उत्सवा बाबतची माहिती मिळविण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

भारतात सर्वत्र आढळणारी बंजारा ही एक भटकी जमात.बंजारा समाज नेहमीच फिरस्तीवर राहणारा आहे.या लोकांना वंजारी, बंजारी, बनवारा, बिजारी, लमाण, लमाणी, लबाडी, लंबाडा, लंबाडोडू, सुकलीर इ अनेक नावे प्रचलित आहेत. बंजारा लोक आपसात बोलतांना हे स्वत:ला गोर म्हणून संबोधतात. महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास, राजस्थान व मध्यप्रदेशात या भागात बंजारा समाजाची वस्ती स्थाने बरीच मोठया प्रमाणात आहेत.

संस्कृतातील वाणिज्य म्हणजे व्यापार या शब्दावरून बनज किंवा वनज हा शब्द निघाला.व त्यावरून लोकांना बंजारा किंवा बनजारा हे नाव रूढ झाले.हे लोक लवण म्हणजे मीठ वाहून नेत असत म्हणून त्यांना लमाणी असे नाव प्रचलित झाले.

बैलाच्या पाठीवर धान्य, नारळ, खजूर, मीठ इत्यादी माल लादून देशात सर्वत्र पोचविणे हा त्यांचा परंपरागत व्यवसाय होता.या लोकांनी सन.१३९६ ते १८९६ या पाचशे वर्षांच्या कालखंडातहा व्यवसाय केला.सन १३९६ पासून पुढे १२ वर्ष उत्तर भारतात मोठा दुष्काळ पडलाहोता.अशा दुष्काळीस्थितीत या लोकांनी नेपाळ, चीन, तिबेट, ब्रह्मदेश, इराण या भागातून धान्य वाहून आणले व देशातील लोकांचे

प्राण वाचविले.याशिवाय युध्दाच्या काळात मोगल, मराठे व ब्रिटीश सैन्याला धान्य कपडा व इतर आवश्यक वस्तू पुरविल्यात परिणामी मोगल राज्यानी त्यांना वंश परंपरा किताब व जहागिरी दिली. ब्रिटींश आमदानीत रेल्वे आल्याने या नवीन वाहतूकीची साधनांमूळे त्यांचा परंपरागत व्यवसाय बंद पडला परिणामीहे लोक शेती व पशुपालन, मजूरी करून उपजिविका करू लागले.२

मूळातहे लोक राजस्थानातील असून मुसलमानांच्या फौजांना रसद पोचविण्याच्या निमित्तानेते दक्षिणेत आलेत व स्थायिक झाले.या जातीतहिंदू, शीख, जैन व मुसलमान या धर्माचे लोक असून ब्राह्मण, वैश्य क्षत्रिय या वर्णांच्या लोकांचा भरणा आहे.यात ब्राह्मणांना – मथुरिया, वैश्यांना– लमाण व राजपूतांना– गोरबंजारे आणि भाटांना चारण व घाडी या नावाने ओळखले जाते.पूर्वी या लोकांचा मुख्य व्यवसाय बैलावरून माल वाहून नेण्याचा होता. पण ते आता स्थायीक झालेत. शेती बरोबरच पशुपालन, लाकडे व गवत यांचा व्यापार, सावकारी इ.उद्योग करू लागले.हे लोक भवानी, बहिरौबा आणि खंडोबा यांचे उपासक आहेत. या लोकांच्या वस्तीला तांडा असे म्हणतात.३ खानदेशात वास्तव्याला असणा–या या बंजारा समाजामध्ये प्रामुख्याने गोकुळष्टमी, पोळा, दसरा, दीपावली, होळी, तीज उत्सव हे सण व उत्सव मोठया स्वरूपात साजरे केले जातात. शेतीचाहंगाम संपल्यावर गावात काम नसलेतरहे लोक ऊस तोडणीच्या कामाला आपल्या घरापासून लांब दुसरीकडे कामालाही जातात.अशा वेळी ते ज्या ठिकाणी मुक्काम असतोतेथेचहोळी सण साजरा करतात.

**बंजारा समाजातील सण व उत्सव**

भारतातील असलेल्या जनजाती या वेगवेगळया ठिकाणी वस्ती करून राहतात.प्रत्येकाची सण व उत्सव साजरे करण्याची पध्दतीत थोडा फार फरक दिसून येतो. जेव्हा मानव समाजाचे मन आनंदी आणि जीवनात वैभव अधिक असते तेव्हाच सण आणि उत्सव साजरेहोत असतात. सर्व मानव जातीत सण उत्सव साजरा करणे यामागे मुख्य उद्देश आनंदसाजरा करणे असतो.बंजारा समाजात होळी, दिपावली आणि तीज, दसरासाजरा करतांना मोठा उत्साहदिसून येते. अशा बंजारा समाजातील सण उत्सवाची माहिती खालील प्रमाणे

**१) होळी –** बंजारा समाजात होळी उत्सव सर्वात महत्वपूर्ण मानला जातो. वसंतऋ तुच्या आगमनापासून या सणास सुरूवात होत असते. फाल्गुन महिन्यातील पौर्णिमा म्हणजेचहोळी पौर्णिमाहोय. व्दिजराम यादव होळी बाबत म्हणतात की, वसंतऋतुच्या आगमना बरोबरच होळीचा रंग लोकांनावर उमटू लागतात. तसेच होळीवर गीत गाणारे गायकांच्या गळ्यातून कंठ फुटू लागतात.४तसेच डॉ. गणपत राठोड म्हणतात की, सण उत्सवाबाबत बंजारा समाजात एक विशेष गोष्ट दिसून येते की, गोर बंजारा देशात कोणत्याही कानाकोप–यात स्थिर झाला असला तरीत्यांचे सण उत्सव साजरा करण्याची पध्दती मात्र एक सारख्या आहेत.५ सर्व बंजारा समाजाचीहोळी एक सारखीच असते.या दिवसी तांडातील नवीन कपडे परिधान करतात.या समाजात होळीच्या वेळी पुरूषास ' गेरिया ' तरस्त्रीयांना ' गेरणी ' असा शब्दप्रयोग केला जातो.होळीच्या पंधरा दिवस अगोदरचस्त्रीया रातभर नृत्य करीत आनंदसाजरा करीत असतात.तर पुरूषांचे वेगवेगळे गट करूनतेही नृत्य करीत असतात.या समाजाचीहोळीसकाळीसकाळी पेटवली जाते. यात दोन प्रकारचीहोळीजळत असते. एक लहानहोळीतर दुसरी मोठीहोळी.या दोन्ही बहिणींपासून तांडयातील लोकांना त्रास होतो म्हणून या दोन्हींना मारून जाळून टाकावे अशी या लोकांची धारणा आहे.अशी आख्यायिका मानली जाते की, होळीही लहान मुलांना त्रास देणारी व खाऊन टाकणारी डायन आहे.तेव्हा लहान मुलांना डायनपासून वाचवून तिला पकडून अश्लील शिवीगाळ करून तांडयाच्या बाहेर घेवून जावून तिला जाळल्यानेसंकट मुक्त केले जाते.अशा खुशीच्या प्रसंगीस्त्री–पुरूष गाणे म्हणतात अशी परंपरा समाज रूढ आहे.

होळीच्या दिवसी तांडयातील सर्व लोक आपल्या नायकाच्या घरी जमा होतात तेथेच सर्व प्रथम होळी खेळतात.या उत्सवात नायकाची भूमिका महत्वाची असते.याप्रसंगी लहान मुले यात सामिल होत नसतात.या वेळी नायकाच्या घरातील स्त्रीया तांडयातील स्त्रियांना वाजणा देतात. स्त्रीया नायकाकडून पैश्याची मागणी करतात जर नायकाने सरळ भेट दिली नाहीतर त्याला शिव्याआणि भेटवस्तू सहज दिली तर नायकाच्या आयुष्याबाबत शुभकामना चिंतीतात.६

**२) दिपावली : –** बंजारा समाजात सामान्यपणे लक्ष्मीपूजन, दिप महोत्सवाची प्रथा प्रचलित आहे. दिवाळीचा उत्सवात बंजारा समाजात गोधन म्हणजे गायीची पूजा करण्याचा सण आहे.गायीची पूजा ही त्यांच्यासाठी लक्ष्मीपूजा असते.डॉ.विद्या चौहान यांच्यामते गोधन हा शब्द गोवर्धन या शब्दाचा अपभ्रंश झाला आहे.प्राचीन काळात गोवर्धनाची पूजा करण्याचा उल्लेख आढळतो.सर्व प्रथम श्रीकृष्णाने ब्रज–भूमीत सुरू असलेल्या इंद्र–पूजाला विरोध करून गोवर्धनाच्या पूजेला महत्व प्राप्त करून दिले.गोधन पूजा ही गोवर्धन पूजेचे प्रतिक मानले जाते.७ बंजारा समाजात दिपावलीच्या दिवसी गोपूजा करण्याची पध्दत रूढ असल्याचे आढळून येते.

बंजारा भाषेत कार्तिक अमावस्येला 'काली अमावस्या' असेही म्हणतात.यादिवसी रात्री मुली दिवा लावतात.तसेच बक–याचा बळीही देतात.बकराचा बळी दिल्याने आपल्यावरील वाईट ग्रहांची दशा टळत असते.अशी श्रध्दा या बंजारा समाजात दिसून येते.बंजारा लोक दिपावलीच्या दिवशी गोधनाची पूजा करतात कारण त्यांची रोजीरोटी गोधनावरच अवलंबून असते.अशा या रूढीच्या रितीरिवाजाचे उल्लंघन करणा–या व्यक्तीवर बहिष्कार ही टाकला जातो.पूर्वी बंजारा लोक वर्षभरातून एकदा कुलदेवतेच्या समोर दिवा लावत होते.कारण त्यांच्या

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

त्याकाळी कामानिर्मिताने भटकंती होत असल्याने दिवाळीला दिवा लावत असत.या सणाला ' दिवो बालणो ' असेही म्हणतात. जो पर्यंत तांडयाचा नायक दिवे लावण्याचा आदेश देत नाही तोपर्यंत घरात स्त्रीयाही दिवा लावत नसतात. डॉ.यशवंत जाधव म्हणतात की, अमावश्याच्या काळोखी रात्री ढिंढोरीचा आवाज ऐकू येताच घरात व अंगणात एकाच वेळी दिवे पेटवून उजाळा होतो. ८

अ) मेरा मांगणो (मेहर) : – दिपावलीच्या प्रसंगी ' मेरा ' या सर्वनामाचा प्रयोग केला जातो. याचा अर्थ आर्शिवाद असा होतो.यादिवशी रात्री तांडातील कुवारी मुली वडीलधारी लोक व देवीदेवतांची आरती करून त्यांच्याकडून मेरा मागतात.डॉ. यशवंत जाधव यांच्यामते, फारसी भाषेत मेहर या शब्दाचा अर्थ साम्य असा होतो तर फारसी भाषेत मेहरचा अर्थ दया, कृपा, अनुग्रह असा आहे.९ बंजारा समाजात फक्त अविवाहित मुलीच मेहर मागतात विवाहित स्त्रिया मात्र मेहर मागत नाही.ज्या कुटुंबांवर सामाजिक बहिष्कार टाकला असतो.त्यातील व्यक्तीकडून मेहर मांगाची मागणी केली जात नाही.

ब) गऊ पूजा : – अमावश्याच्या दिवशी सकाळी गायीला घराच्या मुख्य दरवाजा समोर उभी करून बंजारा लोक पूजन करतात. डॉ.केशव फालके यांच्यामते, भारतात कृषीप्रधान व्यवस्थेत गायी पासून शेतीसाठी बैल मिळतात बैलांच्या मेहनतीने शेती फुलवली जाते.तसेच या दोघांपासून अन्नधान्य पिकवण्यासाठी शेणखतही मिळते.गाय दूध देवून कुटुंबांची भूक भागविण्यास मदत होते.अशा स्वरूपात गाय हया प्राण्याचा उपयोग होतो. भारतीय कृषीप्रधान जीवनात दिपावलीच्या निर्मित्ताने गायीची पूजा करून तिचे ऋ ण फेडण्याची प्रथा आहे.१० बंजारा लोकांजवळ गायी व बैल मोठया प्रमाणात असत त्यांच्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असतो बैलांच्या पाठीवर वस्तू लादून ते वाहतूकही करीत असत.

क) गोदन करणो : – मुली दिवाळीच्या दिवशी जंगलातून फूले आणून सर्वप्रथम हनुमान आणि आपल्या कुलदेवताला फूले अर्पण करतात. देवीदेवतांना फूले अर्पण केल्यानंतर सर्व प्रथम नायकाच्या अंगणात पडलेल्या शेणात फूलांचे रोपन करतात.११

ड) मत्राल पूजा : – अविवाहित मुली जंगलातून फूले आणून तांडयातील प्रत्येक घरी जावून गोदन करतात. यावेळी बंजारा लोक आपल्या घरी मत्रालची पूजा करतात.मत्राल हे बंजारा लोकांच्या गाय– बैलांची राखण करणारी देवता मानली जाते.घराच्या समोर शेणाने लिंपूण त्यावर पीठात चौक काढतात.त्याला बंजारा भाषेत ' चोको पुरणे ' असे म्हणतात. चोको पुरणो नंतर सात दगड गेरूचा रंगाने रंगवून त्यावर दही शिपडून, बोर किंवा निंबाच्या झाडाची एक छोटी फांदी ठेवून कोंबडयाचे बळी दिला जातो. दिपावळीच्या दिवसात बंजारा लोक आपल्या पूर्वजांचीही करतात. नैवैदयास लापसी नावाचा पदार्थ तयार करतात.१२

इ) गोदन पूजनो : – दिवसभर गोदन केल्यानंतर, नृत्य करून, गाणे गाऊन मुली संध्याकाळी शेणाची पूजा करतात याला गोदन पूजनो असे म्हणतात. ही प्रथा बंजारा समाजात रूढ आहे.

३) तीज उत्सव : – बंजारा समाजातील मुलींचा हा महत्वपूर्ण उत्सव मानला जातो. श्रावण शुक्ल तृतीया या दिवशी हा तीज उत्सव साजरा करतात.तांब्याच्या टोपलीत माती टाकून त्यात गहू किंवा ज्वारी टाकून त्यास पाणी देवून त्याची उगवण करतात त्याला तीज म्हणतात.तरूण मुली आपल्या भावी आयुष्यात आपले जीवन सुखकर व्हावे आणि चांगला पती मिळावा अशी यामागे धारणा असते.पर्वतीने भगवान शिवशंकरला प्राप्त करण्यासाठी ध्यानधारणा केली.त्याप्रकारे तीज लावून आपले भविष्याची कामना या तरूणी करत असतात.लग्न झाल्यानंतर सासरी गेलेल्या मुलीची भेट माहेरच्या माणसाशी कधी होईल याचा नेम नसे. मालाची ने–आणच्या भ्रमतीत तांडे एकदा विखुरले की शेकडो वर्ष परत भेटत नसत त्यामुळे लग्न होणा–या या मुलीना अतिशय दु:ख होई. आपल्या मनातील दु:खाचे हे शल्य विसरण्यासाठी मुली तीज उत्सव नावाचा उत्सव साजरा करीत.१३ हा उत्सव साजरा करण्याची बंजारा लोकांमध्ये परंपरा दिसून येते. परंतू आताच्या धावपळीच्या काळात हा उत्सव फारच कमी स्वरूपात साजरा करतांना दिसून येतात.तीज उत्सवाच्या १० व्या दिवसी मुली गणगौरा व गणगौरी असे दोन मातीचे पुतळे बनवून त्यांना नवीन कपडे अर्पण करून त्यांची पूजा केली जाते.या उद्देश भविष्यात आपल्याला पार्वती सारखा चांगला पती मिळावा आणि संसार चांगला चालता राहावा.१० व्या दिवसी तीजला नदी अथवा नाल्यात विसर्जित करतात.

सारांश : – भारतातील सर्वच राज्यात बंजारा समाजात आपली स्वतंत्र भाषा व संस्कृती कायम राहिलेली दिसते. आपल्या राष्ट्रीय जीवनात त्याचे महत्व असून ते दिवसेंदिवस त्याचे महत्व वाढत जाताना दिसते.बंजारा समाजात प्रत्येक सण व उत्सवात होणा–या विविध विधींचे वर्णन करणारे अनेक लोकगीतेही गायली जावून नृत्य ही केले जाते.प्रत्येक समाजात रूढी परंपरंने सण व उत्सव साजरे करतांना दिसतात.पूर्वीच्या व्यापारा निमित्ताने नेहमीच भ्रमंती होत असल्याने सण उत्सवाच्या निमित्ताने हा समाज काही दिवस आपल्या तांडयात राहात आनंदाने सण साजरे करीत होते.सण उत्सव साजरा करतांना विशिष्ट अशी वेशभूषा ही करतात या उत्सवाच्या माध्यमाने आपल्या संस्कृतीचे रूढी परंपरांचे जतन करण्याचाही प्रयत्न झालेला दिसतो.सण उत्सवाच्या माध्यमातून पारिवारिक, सांस्कृतिक जीवनाला महत्व प्राप्त होत श्रध्दा भावना प्रकट होत असते.त्यांच्या संस्कृतीचे सण उत्सवाचे धार्मिक रूढींचे प्रतिबिंबातून दर्शन होते.

संदर्भ साधने :-

१) सुलभ विश्वकोष- भाग-६, संपादक- दाते यशवंत रामकृष्ण, प्रसाद प्रकाशन,६२३/१५ सदाशिव पेठ पुणे. पृ- २४७५.
२) भारतीय संस्कृतीकोष- खंड- ६ संपादक पं. महादेवशास्त्री जोशी- भारतीय संस्कृतीकोश मंडळ ४१०, शनिवार पेठ पुणे २०१०) पृ- २२.
३) भारतीय संस्कृतीकोष- खंड- ८ संपादक पं. महादेवशास्त्री जोशी- भारतीय संस्कृतीकोश मंडळ ४१०, शनिवार पेठ पुण(२०१०) पृ- ४५२.
४) व्दिजराम यादव, लोकसाहित्य, पृ- ३०.
५) डॉ. गणपत राठोड, बंजारा लोकगीताचा सांस्कृतिक अभ्यास, पृ- ८८.
६) डॉ. केशव फालके, बंजारा लोसाहित्य, पृ- ८३.
७) विद्या चव्हाण, लोकसाहित्य, पृ- १८२.
८) डॉ.यशवंत जाधव, बंजारा जाती, समाज आणि संस्कृती, पृ- १३३.
९) उपरोक्त, पृ- १३५.
१०) केशव फालके, बंजारा लोकसाहित्य, पृ- ९९-१००.
११) डॉ.यशवंत जाधव, बंजारा जाती, समाज आणि संस्कृती, पृ- १३८.
१२) आत्माराम कानीराम राठोड, गोर बंजारा इतिहास व लोकजीवन, पृ- १४६.
१३) व्यंकट चव्हाण, बंजारा लोकगीत समाज और संस्कृती, वान्या पब्लिकेशन्स,कानपूर (२००८) पृ. ११३.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील आदिवासी जमातीची सांस्कृतिक परिस्थिती

**प्रा.डॉ. योगेश जगन्नाथ कोरडे**
इतिहास विभाग,
उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल.

**प्रस्तावना**

महाराष्ट्रात आदिवासी समाज मोठया प्रमाणात वास्तव्यास आहे. त्यांच्या सुमारे ४० जमाती असून ८० बोलीभाषा आहेत. एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या जमाती भिल्ल, महादेवकोळी, गोंड, वारळी, कोकणी, ठाकूर, कातकरी व गावीत या आठ जमातींचा समावेश होतो. धुळे, नंदुरबार व जळगाव या खानदेशातील जिल्हयात प्रामुख्याने भिल्ल, कोकणी, गावीत, पावरा, मावची या आदिवासी जमाती मोठया प्रमाणात वास्तव्यास आहेत. बहुसंख्य आदिवासी डोंगर, दऱ्याखोरे, पठारे आणि जंगलात वास्तव्य करुन राहतात. महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व आदिवासींचे सामाजिक जीवन, आर्थिक स्तर, सांस्कृतिक चालीरिती, धार्मिक रुढी परंपरा समान नाहीत. त्या भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून आहेत; मात्र त्यांचे काही समान गुणधर्म आहेत. विशेषत: राहणीमान, जीवनपद्धती व देवदेवतांच्या पुजापद्धतीत सारखेपणा आढळतो. खानदेशातील डोंगराळ तथा पहाडी असा सातपुडयाचा परिसर असून येथे मोठया प्रमाणात आदिवासींची वस्ती आहे. यात भिल्ल, तडवी, पाडवी, वळवी, कोकणी, गावीत, पावरा व मावची इत्यादी विविध जमातींचे, लोक मोठया प्रमाणात आहेत. दुर्गम अशा पहाडी प्रदेशात राहणाऱ्या जमातींना 'आदिवासी' संबोधले जाते.

**आदिवासी जमातींची ठळक वैशिष्टये**

१) आदिवासींची वास्तव्याची एक विशिष्ट जागा, एक विशिष्ट असा भुभाग असतो. २) रक्त संबंधावर आधारीत एकात्मिक सामाजिक संघटन असते. ३) सांस्कृतिक एकजिनसीपणा असतो. ४) पूर्वज समान असतात. ५) देव-देवता, दैवते, पुजाविधी समान असतात. ६) समान बोलीभाषा असते. ७) रुढी, प्रथा, परंपरा, चालीरिती, रीतिरिवाज समान असतात. ८) जमातीत शाखा, पोटशाखा सांस्कृतिकदृष्टया निर्माण झालेल्या असतात. ९) लोककला, लोकसाहित्य समान असते. १०) सिमित तंत्रविद्या. ११) प्रमाण लघुता, थोडीशी लोकसंख्या समुदाय करुन रहाते. १२) स्वत:ची वेगळी जीवन पद्धती. १३) साधी अर्थव्यवस्था.

आदिवासी समाजाच्या या ठळक वैशिष्टयांवरुन हा समाज इतर कोणत्याही समाजापेक्षा निश्चितच वेगळा आहे. आदिवासींनी आपले अस्तित्व आपल्या सांस्कृतिक बळावर टिकवून ठेवले आहे. २० व्या शतकापर्यंत आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण नगण्य होते. त्यांची स्वतंत्र्य लिपी नसल्याकारणाने त्यांच्या सांस्कृतिक विकासाला, साहित्यिक प्रकृतीला कोणताही वाव मिळाला नाही; मात्र मागील काही वर्षांपासून खानदेशातील आदिवासींचे लोकजीवन त्यांचा ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक अभ्यास या विषयावर संशोधकांकडून मोठया प्रमाणात संशोधन केले जात आहे. त्या अनुषंगाने खानदेशातील आदिवासींचे सांस्कृतिक जीवन कशा प्रकारचे होते हे स्पष्ट होते.

**आदिवासी कुटुंब**

कुटुंब संस्थेला मानवी समाजजीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. खानदेशातील आदिवासींच्या कुटुंबातील व्यक्तिंची संख्या साधारणत: ६-७ असते. पती-पत्नी, त्यांची ३-४ मुले व घरात वृद्धआई-वडील असतात. दोन तीन भाऊ त्यांच्या बायका व मुलेदेखील काही ठिकाणी एकत्र राहतात.

- **वेशभूषा –** आदिवासी जमातीमधील पुरुष पूर्वी 'लंगोटी' वापरीत असत. जांघातून शरीर झाकण्यासाठी त्याचा वापर होई; मात्र आज आदिवासींच्या वेशभूषेत आमुलाग्र परिवर्तन घडून आले आहे. आज आदिवासी धोतर, कुडता, डोक्यावर टोपी, वाढलेले केस व मिशा ठेवतात. आदिवासी स्त्रिया लुगडे नेसतात. लुगडे नेसावयाच्या पद्धतीला 'दुमड पद्धत' म्हणतात. प्रौढ स्त्रिया लुगडी, चोळी वापरतात, डोक्याभोवती फडके बांधलेले असते. स्त्रियांना विशिष्ट प्रकारची दागिणे वापरण्याची हौस असते. यात चांदीची सरी, पाटल्या, बाजूबंध, जोडवे, कमरेला सरी, गळयात पुतळया, माळा, तोडे, तोरडे, नथ, बाळयांचा वापर दागिन्यांमध्ये मोठया प्रमाणात असतो.
- **खाद्यपदार्थ –** खानदेशातील आदिवासींच्या आहारात भाकरी, तुरीचे, मुगाचे वरण, मिरचीचा ठेचा, तिखट-भाकरी हे नेहमीचे पदार्थ असतात. भाकरी या बाजरी, ज्वारी, नागली व तांदळापासून बनविल्या जातात व इतर भाजीपाला नित्याचा असतो. सर्वच आदिवासी जमाती मांसाहार करतात; तर महुचे फुले देखील भाजी बनविण्यासाठी वापरतात.
- **गोंदणे –** खानदेशातील आदिवासींमध्ये विशिष्ट प्रकारचे गोंदण काढण्याची पद्धत मोठया प्रमाणात आढळते. कपाळावर, नाकावर, हातावर किंवा पाठीवर सुद्धा गोदण्यांची पद्धत रुढ आहे. स्त्री-पुरूष दोघेही अंगावर गोंदुन घेत होते. गोंदुन घेणाऱ्यास

ISSN : 2348-7143
Dec. 2018

देवीचा आजार होत नाही असा समज आहे. आदिवासी जमातीत अंगणात रांगोळी काढणे, घरातील भिंतीवर प्राण्यांची चित्रे काढणे, विशेषत: गेरुच्या भिंतींवर चुन्याची पांढरी चित्रे काढली जातात.

- **वाद्ये –** खानदेशातील आदिवासींची वनस्पती व प्राणी यांच्या वस्तुंपासून वाद्ये तयार केलेली असतात. त्यांच्या समूहनृत्यगानात ताल, नाद आणि गीते यांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. बासरी, ढोल, पावा, झांज, पावरी, डफ, नगारा, तारपा, तुणतुणे, ताशा, किंगरी, पिरी-पाई-पायरी, घुंगरु, टिपज्या यांचा वापर नृत्य गायनात मोठया प्रमाणात करण्यात येतो.

आदिवासी समाज खानदेशातील दज्याखोज्यात प्राचीन काळापासून वास्तव्यास असल्याकारणामुळे जल, जंगलसंपत्तीवर त्यांचा अधिकार आहे; मात्र इंग्रजी सत्ता खानदेशात प्रस्तापित झाल्यानंतर वनखाते निर्माण झाले व इंग्रजांनी जंगलांवर स्वत:ची सत्ता प्रस्थापित केली. यामुळे जंगलावर अवलंबून राहणारा आदिवासी समाज मोठया प्रमाणात विस्थापित झाला. इंग्रजांबरोबर सावकार, जंगलांचे ठेकेदार व वनाधिकारी यांचे जंगलांवर आक्रमण झाले. स्वातंत्र्यानंतर तापी नदीवरील उकाई धरण व नर्मदा नदीवरील सरदार सरोवर या मोठया धरणांमुळेदेखील आदिवासी जमात मोठया प्रमाणात विस्थापित झाली व त्यांच्या सांस्कृतिक एकोप्याला फार मोठा तडा गेला.

**खानदेशातील आदिवासींचा धर्म**

विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी माणसाच्या मानसिकतेसाठी धर्म हे टिकून असलेले वास्तव आहे. धर्म म्हटले की देवदेवता, धर्मग्रंथ, कर्मकांड या बाबी महत्त्वपूर्ण असतात; निसर्गात, समाजात, कुटूंबात आणि व्यक्तींच्या जीवनात अनेक समस्या असतात. त्या सोडविण्याचा मनुष्य प्रयत्न करतो. काही समस्या सुटतात काही नाही सुटत. ज्या समस्या सुटत नाही त्यामागे कोणती तरी अदृश्य शक्ती आहे. अशी मानसाची भावना निर्माण होते. ही अदृश्य शक्ती म्हणजे देवता व या देवतेस प्रसन्न करण्यासाठी प्रसंगी त्यातून निर्माण झालेले कर्मकांड, रीतिरीवाज आणि परंपरा यातून आकाराला येतो तो धर्म. आदिवासींचा संबंध निसर्गाशी होता त्यातूनच निसर्गाची उपसाना म्हणजेच नदी, डोंगर, वृक्ष, पाणी , पक्षी यांची उपासना सुरु झाली.

- **प्रार्थना किंवा उपासना –** आदिवासी समाजात दिव्य शक्ती, आत्मा, हिंस्र प्राणी, वनदेवता यासारख्या देवतांना शरण जाऊन त्यांची आराधना करणे यासाठी संगीत, नृत्य यामार्फत देवाला प्रसन्न करणे भगताद्वारे मंत्रोच्चार करुन विविध प्रार्थना अथवा उपासना करण्यात येत होत्या.
- **बळी देण्याची प्रथा –** आदिवासी समाजात एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी बळी देणे तथा धान्य, फळ, दारु, मोहाचे फुल तसेच कोंबडी, बकरी अर्पण करण्याची प्रथा मोठया प्रमाणात दिसून येते. वाघापासून गाई बकज्यांचे संरक्षण करणे म्हणून वाघदेवाला बळी देणे किंवा एखाद्या रोगाची साथ आल्यास बळी देणे या सारख्या संकल्पना आदिवासींच्या जीवनात महत्त्वपूर्ण आहेत.
- **धार्मिक विधी –** आदिवासींमध्ये विविध देवता आणि शक्तींना संतुष्ट करण्यासाठी निश्चित अशा पद्धती आहेत. यात सोयर किंवा सुतक पाळणे, बाळाची नाळ अंगणात पुरणे, विटाळशीने न करण्याची कामे अशा अनेक प्रकारच्या पद्धती विविध जातीनुसार वेगवेगळया रीतीने पाळल्या जातात. विविध धार्मिक विधीद्वारे पर्यावरण संरक्षण देखिल केले जाते.
- **जादूटोणा –** आदिवासींमध्ये शक्ती अथवा देवतेवर ताबा मिळविण्यासाठी जादूविद्येचा अवलंब केला जातो. जादू हा प्रकार जरी अंधश्रद्धेचा भाग असला तरी निसर्ग नियमानुसार जाणाज्या पद्धतीतून आभास निर्माण करणाज्या गोष्टी यात राबविल्या जातात व यापासून मानसिक समाधान मिळविले जाते. विविध आजार अथवा रोग चांगले करण्यासाठी भगत हा जादूटोणाचा वापर करीत असे.

**खानदेशातील आदिवासींच्या देवदेवता**

खानदेशातील आदिवासींची देवदेवतांवर मोठया प्रमाणात भक्ती आहे. 'देवाशिवाय देह नाही आणि दुनियाही नाही.' हे खानदेशातील आदिवासींच्या मनात पक्के बिंबले आहे. आदिवासींच्या प्रत्येक पाडयांमध्ये विधिवत ग्रामदेवतांची पूजा करतात. निसर्गातील वन्यजीवनाला दैवत्व बहाल करण्यात येते. गावदेवतांमध्ये गाव शिवाज्या, गावपांढुर, गावमेंढया, पुजपावा, वाघदेव, नागदेव, विजालाराणी, गाजषगोटा, निलिचारी, अन्नदेव, आगदेव, पाणदेव इत्यादी देवदवतांना सांस्कृतिक व धार्मिक दृष्टया अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

- **याहामोगी देवी –** 'याहामोगी' देवीला आदिवासी समाज आपले कुलदैवत मानतात. या देवी विषयी अनेक कथा, दंतकथा आहेत. सागबारा संस्थानचे मुळपुरूष चंपाजी वसावा यांना याहामोगी देवीची मूळ मुर्ती जंगलात सापडली. त्यांनी पारंपारिक पद्धतीने पूजा करून एका झोपडीत त्या मुर्तीची स्थापना केली. तो दिवस महाशिवरात्रीचा होता; परंतू आदिवासींच्या देव-देवता मुर्ती रूपात नव्हत्या. फक्त अपवाद याहामोगी देवीच आहे. याहामोगी देवीची मुर्ती लहान व सुंदर मानवी प्रतीकृती आहे. देवीचे स्वरूप हे कष्टकरणाज्या स्त्रीचे प्रतिक आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला याहामोगी देवीच्या देवमोगरा येथील यात्रेला मोठया प्रमाणात आदिवासी बांधव जमा होत असतात. यात्रेला पूर्वी लोक जथ्याने यायचे. या जथ्याला आदिवासी भाषेत 'होब' असे म्हणत. होब म्हणजे नवस फेडायला जाणारी मंडळी. आदिवासी यात्रेला जातांना रंगीत कपडे, दाग-दागिने, खाण्याचे पदार्थ, नवस फेडण्यासाठी

लागणारे साहित्य, दारूची बाटली, कोंबडे, बकरे, टोपली इत्यादी साहित्य सोबत घेऊन नाचत गाणे म्हणत जातात. मोठया भक्ती-भावाने देवीची पूजा-अर्चा करतात. यात्रेकरू यात्रेतून परततांना पूजाऱ्याने टोपलीत टाकलेले धान्य, नारळ, एक रूपया बांधून आणतात आणि घरातल्या धान्याच्या कोठीत ठेवतात. त्यामुळे सुख-समृद्धी येते. अशी त्यांची भावना आहे. याहामोगी देवीवर आदिवासींची अपार श्रद्धा असल्याचे दिसून येते.

- **आया –** खानदेशातील आदिवासी जमातीत 'आया' नावाच्या देवता होत्या. अनेक खेडया पाडयात वस्तीबाहेर आयादेवीचे ठाणे असते. देवी आणि आया यांच्यात भिन्नता आहे. मरीआई, जारवाई, कुबडायी, खोकल्याची देवी खोकलाई, ठसके लागल्यावर जिच्या कृपेने ठसका जातो ती ठसकाई. मरीआई ही गावाचे रक्षण करणारी आया होय. भुताखेतांना दूर ठेवणारी भुताई होय. अशा प्रकारच्या देवींची ठाणे किंवा ठिकाणे मोठया प्रमाणात आदिवासींच्या वस्तीबाहेर आढळतात.
- **वाघदेव –** खानदेशातील आदिवासी जमाती हया प्रामुख्याने जंगलातच राहत असत. अशा वेळी जंगलातील वाघ हा हिंस्त्र प्राणी असला तरी त्यापासून आपल्या वन्यप्राण्यांचे संरक्षण व्हावे म्हणून त्याची पूजा केली जात असते.
- **नागदेव –** खानदेशातील आदिवासी जंगलातच राहत असल्यामुळे नाग, विंचू व सापासारख्या प्राण्यांशी त्यांचा सामना होत असे. म्हणून त्यांची पूजा केली जात असे व घरांच्या भिंतीवर नागाच्या तथा सापांच्या आकृती चितारलेल्या आढळतात.
- **म्हसोबा –** गावाच्या बाहेरील दगडाचा देव म्हणजे म्हसोबा होय. सापाचे विष उतरविणे, अंगातील भुते काढणे अशा विविध विधी प्रकार म्हसोबापुढे केल्या जातात. आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनात म्हसोबाला ग्रामसंरक्षक देव असे स्थान दिले जाते. म्हणून म्हसोबाची पूजा आदिवासी समाज मनोभावे करीत असतो.

अशा प्रकारे आदिवासींच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनात विविध देवतांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. साधरणत: दगड, लाकूड, झाडे, फळे, फुले, डोंगर, दऱ्या हीच त्यांची देवता प्रतिके आहेत. डोंगराला निवास म्हणून त्यांचा देव डोंगरदेव किंवा डोंगऱ्यादेव, वाघाचे वास्तव्य गुहेत किंवा दऱ्या खोऱ्यात असते म्हणून दरी खोरीही देवता स्वरुप आहेत. अशाच प्रकारे पाणी, पाऊस, गायी, बैल, पक्षी इत्यादींमध्ये आदिवासी जमातींना देवता जाणवते. याबरोबरच घरातील खांबांची म्हणजे गिरहांनची पूजा, चुलीची पूजा, घरातील मालाची पूजा, दरवाजाची पूजा, गुरांच्या गोठयाची पूजा, अंगणाची पूजा, बळी दिल्या जाणाऱ्या प्राणीपक्षी यांची पूजा केली जाते.

**खानदेशातील आदिवासींचे सण-उत्सव**

खानदेशातील आदिवासी विविध प्रकारचे सण उत्सव साजरे करतात; मात्र सण-उत्सव साजरे करण्याची प्रथा, परंपरा व पद्धती ही इतरांपेक्षा-भिन्न स्वरुपाची आहे. खानदेशातील आदिवासी प्रामुख्याने होळी, दिवाळी, पोळा, दसरा, नागपंचमी, गुढीपाडवा, घटस्थापना, अक्षयतृतीया या सारखे सण मोठया प्रमाणात अतिशय उत्साहात साजरे करतात.

- **होळी –** आदिवासी जमातींमध्ये 'होळी' हा सण पूर्ण गावाचा सण असतो. या सणाच्या वेळी नाचणे, गाणे व ढोल बडवणे हे प्रामुख्याने केले जाते. तरुण मुले, म्हातारे, स्त्रिया विविध सोंग शृंगार करुन नृत्य करीत असतात. त्यांत भोंगऱ्या, मेलदा, गेर, बाबाबुध्या, दिंडन या प्रकारचे नृत्य केले जाते. होळीच्या वेळी वर्गणी गोळा केली जाते तीला फाग म्हणतात. होळी प्रसंगी स्त्रिया मुले, मुली ढोल-बासरीच्या तालावर होळीभावेती कमरेत हात घालून नृत्याचा आनंद घेत असतात.
- **पोळा –** आदिवासी लोकांचे जीवन शेतीशी निगडीत असल्या कारणाने बैलाचा सन्मान पोळयाच्या दिवशी केला जातो. बैलांना सजविणे, त्यांना रंगविणे, त्यांना गोड पदार्थ खाऊ घालणे व सायंकाळी नृत्याचा आस्वाद घेणे हा नित्यक्रम असतो.
- **दसरा –** घटस्थापनेनंतर पहिली माळ चढते घरातील प्रमुख मंडळी यावेळी उपवास धरतात. खानदेशातील आदिवासी जमातीत यावेळी घरातील शस्त्रांची पूजा केली जाते. वर्षातून फक्त एकादाच घरातील शस्त्रे दसऱ्याचे वेळी बाहेर काढली जातात. एकूणच इतर सणांप्रमाणे नृत्य, संगीत, ढोल यांच्याद्वारे मनमुरादपणे आनंद लुटला जातो.
- **दिवाळी –** खानदेशातील आदिवासींची दिवाळी ही हिंदूच्या दिवाळीनंतर एक महिन्यानी साजरी केली जाते. त्यांची दिवाळी ही 'गाव दिवाळी' असते. दिवाळीच्या दिवशी रात्री खाणे-पिणे संपल्यानंतर विविध वाद्यांच्या तालासुरात मनमुराद पणे नृत्य करुन आनंद लुटला जातो.

**समारोप**

आदिवासी जमातीचा इतिहास प्राचीन आहे. त्यांच्या धार्मिक कल्पनेत श्रद्धेतून-अंधश्रद्धेतून पुर्वजपूजा, मृतात्मा, प्रेतात्मा, भुतात्मा या गोष्टींवर त्यांचा विश्वास दिसतो. त्याबरोबर निसर्गातील रहस्यमय घटके , देवता यांची ही पूजा करतात. या अंधश्रद्धेबरोबरच जडीबुटी, मंत्रतंत्र, जादूटोणा, भूतबाधा यावरही त्यांचा विश्वास आहे. आदिवासी जमात अशिक्षित, अंधश्रद्धाळू असल्यामुळे त्यांच्या पारंपरिक पद्धतीतून सुरु असणाऱ्या परंपरांमुळे त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक इतिहासाला एक वेगळी दिशा प्राप्त झालेली आहे की, ज्यामुळे त्यांचे जीवन/संस्कृती ही नागर संस्कृती पेक्षा भिन्न असल्याचे दिसते.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची :**

१) कुलकर्णी शौनक श्रीनिवास, 'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड पब्लिकेशन पुणे २००९.
२) गारे गोविंद, 'बदलाच्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी', विद्या प्रकाशन, पुणे, जुन २०००.
३) जाधव सुधाकर एल, 'भारतातील आदिवासी समाज', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, मे-२०१२.
४) दुनबळे त्र्यंबक, 'धर्मांतराचे अंतरंग', सुगावा प्रकाशन, पुणे २००७.
५) पाटील भास्कर नारायणराव व पगारे संजीव सुकदेव , 'सातपुडयातील आदिवासी लोकसंस्कृती', प्रकाशक राहुल वाघ, धुळे, २०१०.
६) पाटील भी. ना., 'खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ', (१९००-१९५०), प्रकाशक- भुषण भीमराव पाटील. पाचोरा, प्रथमावृत्ती, ११ जुन २००५.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

**प्रा. गोकुळ निंबा पाटील**
इतिहास विभाग, गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव, ता.जि. धुळे.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्य सेनानींचा इतिहास हा देशाचे भवितव्य घडविणाऱ्यांचा इतिहास आहे. गुलामगिरीच्या शृंखला तोडणाऱ्यांचा इतिहास आहे. ब्रिटिशांना भारतातील सत्ता सोडावयास भाग पाडून ती भारतीयांच्या हातात देणाऱ्यांचा इतिहास आहे. सुमारे १५० वर्षे या देशावर परकीयांची सत्ता होती. त्या परकीय सत्तेला सनदशीर मार्गाने जर कोणी हादरा दिला असेल तर तो स्वातंत्र्य सेनानींनी दिला आहे. स्वातंत्र्य सेनानींचा इतिहास म्हणजे सामान्य जनतेचा इतिहास, त्यापूर्वी मध्ययुगात भारतात अनेक युद्धे झालीत. अनेक संघर्ष झालेत. परंतु या संघर्षात सामान्य जनतेचा कुठेही सहभाग नसल्याचे दिसून येते. क्रांतिकारकांनी (स्वातंत्र्य सेनानींनी) प्रथमच सामान्य जनतेला या संघर्षात सामील करुन घेतले आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून दिले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात खानदेशचे योगदान बहुमुल्य असे आहे. या स्वातंत्र्य चळवळीत धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील सवाई मुकटी या गावातील स्वातंत्र्य सेनानींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदानही महत्त्वाचे आहे. या गावातील स्वातंत्र्य सेनानींच्या कार्याचा इतिहास सामान्य जनतेला माहीत व्हावा म्हणून संशोधकाने सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान हा विषय संशोधन निबंधासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

- सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचा अभ्यास करणे.
- सवाई मुकटी गाव व परिसरातील स्वातंत्र्य सेनानींनी केलेल्या जनजागृतीचा अभ्यास करणे.
- स्वातंत्र्य सेनानींच्या कार्यातून मिळालेल्या प्रेरणेचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके**

- सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता.
- सवाई मुकटी व परिसरातील स्वातंत्र्य सेनानींच्या कायामुळे जनजागृती झालेली दिसून येते.
- स्वातंत्र्य सेनानींच्या कार्यामुळे गावात तरुणांमध्ये प्रेरणा व जागृती झालेली दिसून येते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहिती विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला आहे. तसेच प्रत्यक्ष मुलाखत पद्धतीचा वापर केलेला आहे. दुय्यम साधन म्हणून वर्तमानपत्रे, विविध संदर्भ ग्रंथांचा आधार घेतलेला आहे.

**माहितीचे विश्लेषण**

**सवाई मुकटी गावाचे स्थान –** महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यात सवाई मुकटी हे गाव विस्तारलेले आहे. धुळे शहरापासून वायव्य दिशेला २५ किलो मीटर अंतरावर व शिंदखेडा शहरापासून १० किलो मीटर दक्षिण व पश्चिम दिशेला हे गाव आहे. आज गावाची लोकसंख्या ८००० च्या जवळपास आहे. गावात इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. गावामध्ये प्रत्येक समाजाचे लोक गुण्यागोविंदाने राहतात.

**१९३० च्या सविनय कायदेभंग व जंगल सत्याग्रहात सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींचा सहभाग –** १२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधीजींची प्रसिद्ध कायदेभंगाची चळवळ सुरु झाली. महात्मा गांधीजींनी आपल्या निवडक ७९ अनुयायांसह साबरमतीहून दांडीकडे प्रयाण केले. जोपर्यंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार नाही तो पर्यंत मी या आश्रमात पुन्हा परतणार नाही, अशी प्रतिज्ञा करुन महात्मा गांधीजींचा दांडी यात्रेला प्रारंभ झाला. या दांडी यात्रेचा प्रभाव खानदेशच्या भूमीवर जाणवू लागला. धुळे जिल्हा कायदेभंग मंडळाची धुळे येथे स्थापना करण्यात आली. धुळे जिल्हा कायदेभंग मंडळाच्या वतीने धुळे जिल्ह्यात झालेल्या सत्याग्रहात सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींनी सहभाग घेतला. स्वातंत्र्य सेनानी श्री. शंकर विनायक ठकार यांच्या नेतृत्वाखाली गावात परदेशी कापडावर बहिष्कार घालून त्याची होळी करण्यात आली. तसेच स्वातंत्र्य सेनानी श्रीमती पार्वतीबाई ठकार यांनी १९३०–३२ च्या सविनय कायदेभंगात सहभाग घेतला आणि खादी ग्रामोद्योगाच्या कार्यात सक्रीय भाग घेतला. दारुच्या गुत्त्यावर पिकेटींग केले त्याबद्दल त्यांना तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. स्वातंत्र्य सेनानी रामचंद्र तुळशिराम पाटील व लोटन भिवसन पाटील या पंधरा सोळा वर्षाच्या कोवळ्या मुलांवर जंगल सत्याग्रहाचा

कायदेभंगाला प्रोत्साहन दिल्याबद्दल इंडियन पिनलकोड कलम ११७ व फॉरेस्ट अॅक्ट २६ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपाखाली दहा–दहा फटक्यांची शिक्षा झाली. धुळे कारागृहाच्या मांगाकडून त्यांना फटके मारण्यात आले. या बालवीर स्वातंत्र्य सेनानींपासून गावातील व परिसरातील लोकांना प्रेरणा मिळाली. या बालवीरांची गावातून व परिसरातून मिरवणूक काढण्यात आली.

**१९४२ ची चलेजाव चळवळ आणि सवाई मुकटी –** ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे झालेल्या काँग्रेसच्या महासमितीने चलेजाव चळवळीचा ठराव मंजूर केला. महात्मा गांधीजींनी हा संदेश ९ ऑगस्टला जाहीर संभेतून देणार होते. त्यामुळेच त्यांना व बहुतेक सर्व काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना ९ ऑगस्टला भल्या पहाटे अटक झाली. महात्मा गांधीजींनी तुरुंगात जाण्यापूर्वी आपल्या अनुयायांना करा किंवा मरा हा संदेश दिला. खानदेशातून श्री. बाळुभाई मेहता व सवाई मुकटी व कापडणे गावातील अनेक लोक हे मुंबईला अधिवेशनास गेले होते. स्वातंत्र्य सेनानी श्रीमती लक्ष्मीबाई विष्णू उपाध्ये यांनी चलेजाव आंदोलनात भाग घेतला. श्री. श्रावण अण्णा ठाकूर यांनी चिमठाणा खजिना लुटीतील आंदोलनकर्त्यांना सहाय्य केले व त्यांना आश्रय दिला.

**समर्थ खादी उद्योग केंद्राची स्थापना –** सवाई मुकटी येथे स्वातंत्र्य सेनानी नानासाहेब शंकर विनायक ठकार यांनी समर्थ खादी उद्योग केंद्राची स्थापना केली. गावकऱ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. हरिजन मंडळींना गावात रोजगार मिळावा. उद्योगप्रियता वाढावी, हस्त उद्योगाला उत्तेजन मिळावे. गावातील लोकांना एकत्र जमण्यास एक बैठकीचे स्थान असावे या हेतूने समर्थ उद्योग मंदिराची (केंद्राची) स्थापना करण्यात आली होती. या केंद्राची इमारत गावाच्या मध्यभागी होती. या इमारतीत रात्रीची शाळा, वाचनालय, खादी निर्माण करण्याचे व प्रशिक्षणाचे कार्य चालविले जात असे.

स्वातंत्र्य सेनानी श्री. शंकर विनायक ठकार आणि सवाई मुकटी येथील काही स्वातंत्र्य सेनानींनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी कार्य केलेले आहे. सवाई मुकटी येथील सार्वजनिक पाण्याची विहिर हरिजनांसाठी खुली केली. गावातील बैठकीच्या जागा, दुकाने हरिजनांसाठी खुली केली.

**सामुदायिक दंड –** हजारो लोकांना तुरुंगात टाकूनही खानदेशात चलेजावची तीव्रता कमी होत नव्हती. तेव्हा सरकारने आंदोलनकर्त्यांना जबरदस्त कर भरण्यास भाग पाडले. खानदेशमध्ये सवाई मुकटी या गावातून असा सामुदायिक दंड ब्रिटिश सरकारने वसूल केलेला आढळतो. हा दंड सरकारी अधिकाऱ्यांनी जबरदस्तीने व जुलूम करुन वसूल केला. एकूण सवाई मुकटी गावातून पाच हजार रुपये दंड वसुल केला गेला.

**पहिला स्वातंत्र्यदिन –** १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. देशभक्तांनी सोसलेल्या अनंत अपेष्टांचे चीज झाले. सवाई मुकटी या गावात चौकात स्वातंत्र्य सेनानी श्री. लोटन भिवसन पाटील यांच्या हस्ते पहिला ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला सवाई मुकटी गावातील व परिसरातील सर्व स्वातंत्र्य सेनानी व प्रमुख लोक उपस्थित होते. तसेच खानदेशात सर्वत्र हा पहिला स्वातंत्र्य दिवस फार मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

**निष्कर्ष**

सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींनी स्वातंत्र्य चळवळीत सुरुवातीपासून सहभाग घेतल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यसेनानी श्री. रामचंद्र तुळशीराम पाटील व श्री. लोटन भिवसन पाटील यांना झालेल्या फटक्यांच्या शिक्षेमुळे धुळे जिल्ह्यात व सवाई मुकटी परिसरात राष्ट्रीय चळवळ घराघरात व गावागावात पोहचलेली दिसते. स्वातंत्र्य सेनानी श्री. शंकर विनायक ठकार यांनी केलेल्या सामाजिक आणि खादी प्रसाराच्या कार्यामुळे ग्रामीण भागात खादी ग्रामोद्यागाचा प्रसार व प्रचार झालेला दिसून येतो. सवाई मुकटी येथील स्वातंत्र्य सेनानींनी अस्पृश्यता निवारणचे कार्य केलेले दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१. प्राचार्य डॉ. शहा जी. बी., खानदेशातील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव २०१४.
२. बापट गो. म. संपादक, धुळे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरवग्रंथ, भारत टाईपरायटींग इन्स्टिट्युट, कस्तुरबा गांधीरोड, धुळे, १९८८.
३. डॉ. कुंटे भ. घ., स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य, पश्चिम महाराष्ट्र खंड १, मुंबई, १९७९.
४. धुळे जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र शासन.
५. दै. लोकमत, दिनांक २१ ऑगस्ट २०१२, स्वातंत्र्य सैनिकांचे सवाई मुकटी – लेख
६. डॉ. शहा मु. ब., खानदेशचा सांस्कृतिक इतिहास, खंड १ ते ४, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे २००४.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खानदेशातील लोकसाहित्याचे विश्लेषणात्यक अवलोकन

**प्रा. राजकुमार ज्ञानोबा चाटे**
इतिहास विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड.

महाराष्ट्रातीलच नव्हे मर भारतातील साहित्याचे प्रमुख केंद्र म्हणुन खानदेशाच्या भुमीस ओळखले जाते. हा समृध्दशाली वारसा प्राप्त करुन देण्यासाठी विशेषत्वाने नेतृत्व केले ते म्हणजे बहीणाबाई चौधरी यांनी. परंतु लोकसाहित्याच्या विचार करताना विषेश कार्य कृष्णा पाटील यांच्या लोकसाहित्याद्वारे झाल्याचे दिसुन येते. आशा प्रकारे त्यांनी अहिराणी लोकसाहित्यास महत्वपुर्ण स्थान प्राप्त करुन दिल्याचे दिसुन येते. या संदर्भात म.सु.पगारे म्हणतात. अहिराणी बोलींचे स्वतंत्र स्थान अभ्यासाकांनी अद्यापर्यंत मान्य केलेले नव्हते. तीला मराठी, हिंदी, गुजरातीची पोटभाषा ठरविण्याचा प्रयत्न होता. परंतु या बोलीला स्वतंत्र मान्यता साहित्य अकादमी नवी दिल्लीसारख्या नामवंत संस्थेने दिली आहे. कृष्णा पाटील यांनी २००१ मध्ये मिळालेल्या पुरस्काराच्या निमीत्याने अहिराणीचे महत्व सिध्द केले आहे. याच अहिराणी बोली भाषेच्या माध्यमातुन खानदेशी साहित्यास त्यांनी जागतिक किर्तीचे लोकसाहित्य बनवले आहे. महाराष्ट्रातील खानदेश हा प्रदेश महाराष्ट्राच्या उत्तर भागात आहे. या प्रदेशाची अहिराणी बोली भाषा आहे. या अहिराणी बोली प्रदेशातील लोकसाहित्याचा या आगोदर अनेक अभ्यासकांनी अभ्यास केलेला आहे. त्या संस्कृतीचे रुप आपल्याला परंपरागत चालत आलेल्या आनेक सण- उत्सवाच्या विषयी आसलेल्या लोकसहित्यात व्यक्त झालेले दिसते. खानदेशातील साहित्यीक तेथील नाती-गोती, सण- उत्सव, परंपरा या विषयीचे दर्शन लोकसाहित्यातुन घडविताना दिसुन येतात. साहित्यीकांनी तेथील लोकमनात आसणारी भावना ते आपल्या लोक - कथा, लोकगिते आशा लोकसाहित्यातुन व्यक्त करताना दिसुन येतात. खानदेशातील बोलीभाषांचा लोकसाहित्यातुन स्पष्टपणे प्रभाव जाणवतो. आशा प्रकारच्या खानदेशी लोकसाहित्याचे अवलोकन करण्याच्या दृष्टिकोनातुन प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश ठरविण्यात आले आहेत.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. खानदेशातील लोकसाहित्याचे अवलोकन करणे.
२. खानदेशातील लोकसाहित्यतुन होणारे सांस्कृतिंक दर्शन अभ्यासणे.
३. खानदेशातील अहिराणी लाकसाहित्याचा मागोवा घेणे.

**१. खानदेशातील लोकसाहित्याचे अवलोकन :-** कोणत्याही प्रदेशातील लोकसाहित्य हे त्या प्रदेशातील समाज जिवनाशी निगडीत आसते. यात खानदेशातील समाजजीवन आहिराणी लोकसाहित्याच्या माध्यमातुन घडताना दिसुन येते.तसेच त्या समाज जीवनात घडणाऱ्या घटनांचे लाकसाहित्यातुन चित्रण होत असते. सांस्कृतीचा शोध घेण्याच्या दृष्टिने ग्रामीण भागाची ओळखही होत असते. ग्रामीण समाजाने आपली संस्कृती जतन करण्याच्या उद्देशाने सन उत्सवांची परंपरा जपली आहे. या संदर्भात डॉ. हजारी प्रसाद म्हणतात.जे सण-सोहळे आणि देव - देवतांचे पुजा विधी आढळतात ते सर्व ग्रामिण कृषी जीवनाशी नगिडीत आहेत या सर्व संस्कृतीचे दर्शन लोकसाहित्यातुन घडताना दिसुन येते.

**२. लोकसाहित्यातुन होणारे सांस्कृतीक दर्शन :-** लोकसाहित्य हे स्थानिक परिस्थीतीशी जवळीकता दर्शवणारे साहित्य म्हणुन ओळखले जाते. लोकसाहित्यातुन लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असते. महाराष्ट्रातील प्रत्येक प्रातांत त्या त्या परिसरातील परंपरेनुसार सण - उत्सव साजरे केले जातात. त्यातील काही सण - उत्सवाची स्वतंत्र प्रादेशीक ओळख निर्माण होत असते. महाराष्ट्रात असणारे निरनिराळे प्रदेश जसे विदर्भ, कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र,खानदेश आशा विविध प्रदेशांत सण साजरे करण्याची आपआपली पध्दती आहे. ही पध्दती लोकसाहित्यातुन साहित्यीकांनी प्रदर्शित केली आहे. अशाच प्रकारे खानदेशातील लोकसाहित्यातुन तेथील सण - उत्सवाचे चित्रणही साहित्यीकांनी केल्याचे आढळुन येते.

संपुर्ण महाराष्ट्रात चैत्र प्रतिपदेला साजरा केलीा जाणारा गुडीपाडवा हा सण खानदेशात गुडीपावडा म्हणुन ओळखला जातो. या दिवशी मराठी वर्षाची सुरुवात होत असते. या गुडीपावडयाची परंपरा साहित्यीकांनी लोकसाहित्यातुन मांडलेली दिसुन येते. या संदर्भात कृष्णा पाटील यांनी आपल्या लोकसाहित्यातुन चित्रीत केलेल्या गुडीपावडयाच्या सणाचे चित्रण पुढील ओव्यांना मधुन दिसुन येते.

*उभारा व गुढया, पताका तोरणे ।*
*घण सवर करा, सण गुडी पाडवा म्हणे ।।*
*आज पावडा - पावडा , लावा काठीवर गडू ।*
*आसी उभारा गुढीले, लागे आभायावर चढ़ ।।*

*सन गुडी पाडवा , आज यांन वरिसन येण ।*
*नवी पितांबर चोयी, गुढी मात्र सवासिन ।।*

आशाप्रकारचे वर्णन खानदेशातील गुडीपाडव्याच्या सणाचे चित्रण चित्रीत करताना दिसुन येते. त्यानंतर खानदेशात साजरा केला जाणारा आणखी एक सण म्हणजे आषाढी एकादशी होय. ज्याला खानदेशी बोली भाषेतुन आखाडी एकादस असे म्हटले जाते. या दिवशी वारकरी संप्रदायाकडुन पांडुरंगाची भक्तीभावे पुजा करुन उपवास केला जातो. साहित्यीकांनी या सणाच्या संदर्भात विविध साहित्यातुन वर्णन केलेले आहे. कृष्णा पाटील यांनी आपल्या साहित्यातुन एकादशीचे वर्णन करताना म्हटले आहे.

*गयी एकादशी बाई , द्वादशींन आज काम*
*केयीना पानवर सोडे ,पारन मन्हा राम।।*
*शेजी व मन्ही बाई, आज एकादशी माय*
*कुटु भगर उख्ययं, तिखी – फिकी रांधु माय।।*

खानदेशात अतिशय महत्वपुर्ण समजल्या जाणाऱ्या एकादशीचे महत्व उपरोक्त ओव्यांमधुन स्पष्ट होते. ग्रामीण जीवनाशी निगडीत असणारा व कृषीक्षेत्रात साजरा केला जाणारा एक महत्वपुर्ण सण म्हणजे पोळा होय. शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी वर्षभर साह्य करणाऱ्या प्राण्यामध्ये बैलाचे स्थान महत्वपुर्ण असे आहे. कृषीप्रधान संस्कृतीशी पिढयानपिढया नाते जोपासणारा सन म्हणजे पोळा असुन यादिवशी बैलांची पुजा केली जाते. खानदेशी साहित्यात 'पोया सन करे गोया' आणि 'ज्याचे घरी  गाय त्याचे घरी विठ्ठलाचे पाय' आशा म्हणी प्रचलित आहेत. आशाप्रकारे खानदेशातील सणामध्ये आसणारी प्राण्यांविषयीची भावना लोकसाहित्यातुन चित्रीत केली आहे. खानदेशात पोळा हा सण तिन दिवस साजरा केला जातो. या तीन दिवसात बैलाकडुन कोणतेही श्रमाचे काम करुन घेतले जात नाही. या काळात बैलांना साज श्रृंगार, आलंकर चढवुन त्यांची पुजा केली जाते. या संदर्भात लोकसाहित्यातुन करण्यात आलेले वर्णन खालील पंक्तीतुन दिसुन येते.

*आज पोयाना व सन, खासु पोटले काही माही  ।*
*धवया पिवया, आज तुम्हाले पुरन पोयी ।।*
*पोया – पोया करु बैल, कुणबीना आसरा ।*
*नंदीले ओवायाले , सन नाहीना दुसरा ।।*

आशाप्रकारे पोळयांचे वर्णन लोकसाहित्यतुन चित्रीत होताना दिसुन येते. खानदेशात या बरोबरच दसऱ्याच्या दिवशी जी परंपारा जोपासली जाते तिला खानदेशात शिलांगण आसे नाव आहे. खानदेशातील शिलांगण या सणाशी निगडीत आसणाऱ्या काही म्हणी प्रचलीत आहेत, यात 'दहा दिननना दसरा, इस दिननी दिवाई,' ' दसरा सन मोठा नाही आनंदाला तोटा' आशा म्हणी बोलल्या जातात. लोकसाहित्यातील ओव्या मधुन या सणाचे वर्णन आले ते असे

*दसरा रे भाऊ, तु नही बा एखोरा*
*पह्यल्या नवराती , तुले देतीस असरा ।।*

आशा प्रकारे दसऱ्याचे शिलांगण खानदेशात साजरे केले जाते. त्याचे लोकसाहित्यातुन यथार्थ चित्रण घडते.

**समारोप**

कोणत्याही प्रदेशातील लोकसाहित्य हे त्या त्या प्रदेशातील लोकांचे रहाणीमान, लोकांचे जिवनमान यांच्या एक प्रकारे आरसाच आसतो. खानदेशातील लोकसाहित्यातील म्हणी, वर्णने, साहित्य हे त्या समाज मनाशी समरस होतानां दिसुन येते. खानदेशातील लोकसाहित्यातुन साजरे होणारे सण, उत्सव यांचे यथार्थ चित्रण घडते. त्यात प्रामुख्याने खानदेशात साजरे होणारे सण जसे पोळा, आखाडीएकादस, शिलांगण आशा सणामधुन साहित्यकार प्रादेशीक वैशिष्ट्य दर्शविताना दिसुन येतात. महाराष्ट्रातही सण साजरे केले जातात. परंतु खानदेशातील लोकसाहित्यातुन या सणांचे जे चित्रण केले आहे. ते एक प्रदेशिक वैशिष्टये स्पष्ट करणारे आहे. आशा लोकसाहित्यातुन खानदेशाची वेगळी ओळख निर्माण होत आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्रभावती महाजन :– खानदेश भुमी साहित्य आणि साहित्यीक
२. शशिकांत पाटील :– खानदेशचे मराठी साहित्यरुप
३. दिलीप चव्हाण :– खानदेशातील भटकी पंचाळ जमात
४. शशिकांत पाटील :– अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

# खानदेशी कादंबरीतुन उलगडणारे समाजजीवनाचे प्रादेशिक रुप

**प्रा. देवकर मनोज बबनराव**
राजीव गांधी महाविद्यालय,
करमाड, जि. औरंगाबाद.

साहित्य हा समाजजीवनाचा एक आरसा असतो. साहित्यातुन समाजातील घटक व घटनांचे वास्तववादी चित्रण केले जाते. तात्कालीन परिस्थितीत घडलेल्या घटनांचे चित्रण साहित्यीक आपल्या साहित्यतुन व्याक्त करत आसतो. आशाच प्रकारे खानदेशी साहित्यीकांनी खानदेशी भुमित राहणाऱ्या समाज घटकांचा, त्यांच्या समस्याचा परामर्ष आपल्या साहित्यातुन घेतला आहे. विशेषत: गद्य लेखनात कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यामधुन जो समाजमनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे. या शोधनिबंधात खानदेशी कादंबरीकार श्रीधर दिक्षीत यांची कादंबरी पंख वेदनांचे, संजीव गिरासे यांची लगीन कादंबरी आणि गोकु ळ बागुल यांची काळीमाय कादंबरी यांचा विशेषत्वाने अभ्यास करण्यात आला आहे. ह्या कादंबऱ्यातमधुन समाजातील समस्या त्या समस्यांची दाहकता प्रस्तुत करण्याचा जो प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचा आढावा योत घेण्यात आला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. सचिव गिरासे यांच्या लगीन कादंबरीतुन होणारे व्यक्ती चित्रण प्रस्तुत करणे.
२. श्रीधर दिक्षीत यांच्या पंख वेदनांचे या कादंबरीचा परामर्ष घेणे.
३. गोकुळ बागुल यांच्या काळीमाय या कांदबरीवर प्रकाश टाकणे.

खानदेशी कादंबरीकार श्रीधर दिक्षीत, सजिव गिरासे, गोकुळ बागुल यांच्या अनुक्रमे पंख वेदनांचे, लगीन आणि काळी माय या कादंबरीतील व्यक्ती चित्रण, समाज चित्रण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**१. पंख वेदनांचे –** या कादंबरीचे लेखक श्रीधर दिक्षीत हे एक प्रसिध्द खानदेशी कादंबरीकार म्हणुन ओळखले जातात. प्रस्तुत कादंबरीत त्या आगोदर त्यांनी बोन फॅक्चर या नावाने मासिकातुन प्रसिध्द केली होती. त्यातुन त्यांनी पंख वेदनांच्या या शिर्षकाखाली ही कादंबरी म्हणुन प्रसिध्द केली. या कादंबरीचा नायक गोपळ बाबु नावाचे व्यक्तीमत्व आहे. जोकी इंदौर या शहरात बँकेत नौकरी करण्यासाठी जातो. गोपाळ बाबु हा साध्या व सरळ मनाचा असुन तो इंदौरला नौकरी करत आसतो. त्याच ठिकाणी राहत असलेल्या शोभा नावाच्या व्यक्तीरेखे सोबत त्याचे प्रेम जुळते. शोभा ही माधवीची बारकी बहीण माधवीच्या सांध्याचे हाड निखळल्यामुळे काम करण्यास आलेली शोभा गोपाळवर प्रेम करते. परंतु लग्न करुन त्याला फसवायची तिची इच्छा नसते. कोडाचे जग हे तिच्या जीवनातील वेदनांचे पंख होत. शर्माजी दोघे पती – पत्नी गोपालच्या वडीलांचे मित्र आहेत तेही गोपाळलला मदत करतात. अनादी माधुर हे हाडे बसविणारे डॉक्टर आहेत. दिसायला कुरुप पण बोलण्यात मधुरता आहे. पेशंन्टला त्रास होऊ नये म्हणुन त्याला गप्पामध्ये रंगवतात व हांडे बसवतात. आशा प्रकारची कादंबरीतील कथानक असुन यातील शोभाने मांडलेले विचार हे दु:खाचे भावविश्व उलघडनारे आहेत. ती कोडाच्या डागा विषयी म्हणते. कोड आसण्या सारखे दुर्भाग्य नाही तुमचे माझ्यावर माझे तुमच्यावर जे प्रेम आहे त्याला पृथ्वीवर मोल नाही. डागाळलेल्या माणसाची समस्या सोडविण्याच्या हेतुसारखा दुसरा उदात्त हेतु नाही. परंतु व्यवहारात असे उदत्तीकरण चालत नाही. आसली उदात्तीकरण क्षणाच सुख आणि आनंत काळाच दु:ख निर्माण करतात. या कादंबरीत मानवी मनाच्या प्रेम भावना व त्यात येणारे आडथळे याचे उत्कट चित्रण करण्यात आले आहे. या कादंबरीतुन मानवी जीवन विषयक भाव भावना तसेच त्यातील समस्या यांचे चित्रण करण्यात कादंबरीकार यशस्वी ठरले असल्याचे दिसुन येते.

**२. गोकुळ बागुल यांची काळीमाय –** ही कादंबरी ग्रामीण भागातील बारकु पाटील या व्यक्तीरेखे भोवती फिरणारी आहे. बारकु पाटील हा गावचा सरपंच असुन त्याचे राजकारणात बऱ्यापैकी स्थान आसते. त्याच्या संसाराची आणि राजकिय जीवनाची शोकांतिका या कादंबरीत मांडण्यात आली आहे. त्याचा पुताण्या जो कि देशी दारुचे दुकान चालवतो. गुलाव मराठा त्याचा मित्र आसतो. या दोघांच्या कावेबाजपणामुळे बारकु पाटलाचे जिवन उद्वस्त होण्याची वेळ येते. कारण बारकु पाटील हा सज्जन मनाचा आसतो. तर त्याच्या भोवती दुर्जन प्रवृत्तीचे लोक असतात. त्यातुन त्याला राजकारणाचा त्याग करावा लागतो आणि शेवटी त्याचे जिवन दु:खमय होते. या कादंबरीतुन गोकुळ बागुलनी ग्रमीण जीवनाच्या उदात्त जीवनाच्या चित्रणा बरोबरच दृष्ट प्रवृत्तीचे राजकारण, हाडवैर यातुन निर्माण झालेला संघर्ष, शेतकऱ्यांचे निसर्गाश्रीत जीवन, सात बाराचा फेरा इत्यादी बाबींचे चित्रण बागुलांनी केलेले आहे. गोकुळ बागुलांनी निवडलेला विषय सर्व समावेषक असुन त्यात सर्व घटक समाविष्ट असल्याने त्यांचा आवाका मोठा झालेला आहे. राजकारण, कुटुंब भाऊ बंदकी यांचे विदारक चित्रण त्यानीं केले आहे. खानदेशातील जळगाव अमळनेर परिसराची पार्श्वभुमी कादंबरीला लाभली आहे. या कादंबरीत खानदेशातील लोकगीते, लोककथा सण उत्सव तसेच नाती गोती या बरोबरच समाजात साजरे केले जाणारे सण ज्यात पोळा, दसरा, जत्रा या सारख्या सन

उत्सवांचे चित्रणही करण्यात आले आहे. या कादंबरीत ग्रामीण भागातील लोक समजुती जातीयवाद तसेच सामाजिक प्रथा परंपरा यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. ग्रामीण भागातील राजकारणाची परिस्थीती राजकारणाचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम आशा विविधागी दृष्टिकोनातुन ग्रामीण जीवनाचे चित्रण त्यांनी आपल्या कादंबरीद्वारे केले आहे.

**३. सजीव गिरासे यांची लगीन कादंबरी –** ग्रामीण भागातील भोळसर मतीमंद व्यक्तीरेखेच्या जीवनाची करुन कहानी प्रस्तुत करण्यात आली आहे. त्याच्या जीवनात आलेले दु:ख त्याची लोकाकडुन होणारी हेटाळणी, त्याचा होणारा छळवाद कादंबरीद्वारे प्रस्तुत करण्यात आला आहे. कादंबरीतील प्रमुख व्यक्तीरेखा म्हणजे वाघ्या जो कि मतीमंद आहे. त्याला तीन भावंडे तसेच आई – अडील असे भरघोस नाती संबध आसणाऱ्या कुटुंबातही एकटेपणाचे आयुष्य जगावे लागते. मतीमंद पाणामुळे त्याला अनाथांचे जीवन जगावे लागते. त्याला घरातील सर्वांकडुन तिरस्काराच्या नजरेतुन पाहीले जाते. आशा प्रकारे बाघ्याच्या वाटयाला आलेली दु:खाची फरफट मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कादंबरीकारांनी या कादंबरीत खेडयातला एक जीवनपट उलगडण्याचा एक प्रयत्न केला आहे. संघर्ष विरहीत हलके फुलके जीवन मांडल्याने या कांदबरीला तरलता आणि सरळरुप प्राप्त झालेले आहे. या कादंबरीत अहिराणी बोली परिपुर्ण कलात्मक परिसरत वापरलेली असल्याने तेथील लोकजीवन आलेले आहे. लगीन या कादंबरीत चालीरीती परंपरा पोषाखच्या तऱ्हा स्वभाव रेखाटन आलेले आहे. परिसरातील निसर्गाचे आणि तेथिल भुभागाचे वर्णन फारसे आलेले नाही. ग्रामीण प्रचलीत लोकप्रियता आणि बोलीभाषा वगळता या कादंबरीची प्रादेशिकता जाणवत नाही . ग्रामीण जीवनाचा पट असल्याने त्याचा ग्रामीणता स्पष्टपणे आलेली आहे. मायभुमी आणि मराठी बोलीच्या अभिमानामुन या कादंबरीचा जन्म झालेला आहे. त्यातुन ग्रामीण भागातील दु:खांचे वंचिताचे , विदारक चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**समारोप**

खानदेशातील कादंबरीकार सजीव गिरासे, गोकुळ बागुल, श्रीधर दिक्षीत यांनी खानदेशातील ग्रामीण जीवनाचे तसेच सामाजातील दु:ख विरहाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. यातील श्रीधर दिक्षीत यांनी दोन मानवी मनातील प्रेम संबधात आडसर ठरु पाहणाऱ्या सामाजिक समस्याचे चित्रण केले आहे. ज्यात कि प्रामाणिकपणाच्या माध्यमातुन प्रेम भावना जीवंत ठेवण्यासाठी करण्यात आलेला त्याग व्यक्त करण्यात आला आहे. सजिव गिरासे यांनी अपल्या कादंबरीद्वारे वाघ्याच्या वाटयाला आलेले दु:ख टिपण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याद्वारे मतीमंद व भोळसर व्यक्तींचे तीवन किती कष्टप्रद व दु:खमय आसते याचा प्रत्यय त्यांनी आनुन दिला आहे. तर गोकुळ बागुल यांची काळीमाय या कादंबरीत सज्जन आणि दुर्जन यांच्या संघर्षातुन सज्जनाच्या वाटयाला आलेली शोकांतिका स्पष्ट कराण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्रभावती महाजन :– खानदेश भुमी साहित्य आणि साहित्यीक
२. शशिकांत पाटील :– खानदेशचे मराठी साहित्यरुप
३. दिलीप चव्हाण :– खानदेशातील भटकी पंचाळ जमात
४. शशिकांत पाटील :– अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरांची ओळख : एक अभ्यास

**प्रा. जवळेकर धनंजय**
श्री संत गजानन महाविद्यालय,
खर्डा, ता. जामखेड, जि. अहमदनगर.

खानदेशाला साहित्यिकांची भुमी म्हणुन ओळखले जाते. अशी म्हण प्रचलीत आहे की खानदेशात केळी व कापुस या पिकासोबत काव्याचे पिक ही भरघोस येते. खानदेशाला साहित्याची परंपरा प्राचीन काळापासुन लाभलेली आहे. प्राचीन काळापासुन या भुमित साहित्य निर्मिती होताना दिसुन येते. आगदी प्राचीन काळात महर्षी वाल्मीकीनी रामायण लिहिले ते वाल्मीकी खानदेशी भुमितीलच होते. त्यानंतर खानदेशातील यावल या गावी व्यास मंदिर आहे म्हणजेच या भुमित व्यासांचेही वास्तव्य होते. चाळीसगाव जवळील बहाळगावचा राहणारा नारायण व्यास उ र्फ नारोबास बहाळीये यांनी श्री ऋषिपुर वर्णन या ग्रंथाची रचना केली आहे. सिंहासन बत्तिशी, बेताळपंचविशी या ग्रंथाची निर्मीती करणारे महालिंगदास व अनुभवोद्य या वेंदांतावरील ग्रंथ लिहीणारे महावेन्द्र धुळयाजवळील शिरुळ येथे राहत असत. निवृत्तीनाथांची शिष्या मुक्ताबाई, महायोगी चांगदेव यांचाही सहवास थल्या साहित्य परंपरेत गौरवास्पद आहे. आशा प्रकारची साहित्यीकांची परंपरा खानदेश भुमीस लाभली आहे. महानुभाव पंथाचे थोर चक्रधर स्वामी यांचेही वास्तव्य खानेशात होते. त्यांनाही लीळाचरित्र  या ग्रंथाची रचना करण्यासाठी प्रेरणा याच भागात मिळाली असावी आशा प्रकारच्या साहित्याची परंपरा लाभाविल्या खानदेश भुमिचे अध्ययन करण्याच्या उद्देशाने हा शोध निंबध प्रस्तुत करण्यात आला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. खानदेशातील सहित्यीक परंपरेचा आढावा घेणे.
२. खानदेशी साहित्यीचा आढावा घेणे.
३. खानदेशतील सांस्कृतिक आणि साहित्यीक परंपरेची यथार्थता स्पष्ट करणे.

खानदंशातील साहितीकांची तसेच साहित्यांची परंपरा प्राचीन काळापासुन लाभलेली असुन त्याच्या आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आलेली आहे.

**१. काव्यपरंपरा :–** खानदेशात काव्य साहित्याची निर्मीती भरपुर प्रमाणात झाली आहे. खानदेशात निर्माण झालेले गद्या साहित्यापेक्षा काव्य साहित्य आधिक आहे. अधुनिक मराठी कवितेचे आधारस्तंभ मानले जाते. त्यांनी कवीतेचे अंतरंग व बहीरंग ही बदलुन टाकले त्यांचा जन्म कोकणातला आसला तरि ते खानदेशात मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत होते. त्यांनी नेतृत्व कडील वारा कुनीकडुन, कुणीकडे, दवांचे थेंब, फुलपाखरु, नवा शिपाई, आम्हि कोण? म्हातारी, या त्यांच्या खानदेशात वास्तव्यास असतानाचे काव्य संग्रह प्रसिध्द   झाले. त्यानंतर विनायक जनार्दन करंदीकर हे देखील बरीच वर्ष खानदेशात वास्तव्यास होते. त्यांच्या राष्ट्रिय पुर्नउत्थानाच्या कविता अत्यंत लाकप्रिय होत्या. त्यानंतर ना.वा.टिळक, गोविदाग्रज हे युगपवर्तक साहित्यीक खानदेशास लाभले, त्यानंतर बालकवी म्हणुन प्रसिध्द असणारे बापुजी त्रिंबक ठोबरे हे मुळ खानदेशाचेच होते. ते खानदेशातील नव्हे तर महाराष्ट्रासाठी काव्याचे महामेरु ठरले. बालकवींच्या औदुंबर श्रावणमास, तडाग मेघांचा कापुस आणि पाऊस हे कवीतासंग्रह निसर्ग सौदर्यांचे हुबेहुब चित्रण करतात. त्याबरोबरच त्यांचे फुलराणी निरझरास वनवासी फुल चांदोबा प्रेम-लेख हेही कवीतासंग्रह प्रसिध्द आहेत. या बरोबरच आणखी एक महाराष्ट्राचे गुरुजी म्हणुन प्रसिद्ध असणारे पांडुरंग सदासिव साने उर्फ साने गुरुजी हेही आमळनेरच्या भुमितीलच होते. आशा प्रकारची समृध्दशाली काव्यपरंपरा खानदेशास लाभली आहे.

**२. कादंबरी परंपरा :–** खानदेशास कादंबरी लेखनाची परंपरा अत्यंत उज्वल स्वरुपाची लाभलेली आहे. साने गुरुजींनी कादंबरी साहित्यात महत्वाची भर टाकलेली आहे. रामाचाशेला, सती, दिनबंधु, नवाप्रयोग, आस्तिक, पुनजन्म आशा प्रसिध्द आसणाऱ्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या त्या बरोबरच दुसरे प्रख्यात कादंबरी कार म्हणजे बा. सि. मर्ढेकर होय त्यांनी पानी, तांबडीमाती, रात्रीचा दिवस या कादंबऱ्या लिहिल्या आनदवन आणि जलवंती सारख्या कादंबऱ्या लिहिणारे के. नारखेडे  हे देखील खानदेशी भुमितीलच होत.

**३. कथा साहित्य :–** खानदेशी भुमित कथा साहित्य भरपुर प्रमाणात निर्माण करण्यात आले. साने गुरुजींनी अनेक कथात्मक पुस्तके लिहिली. त्यांनी विशेषत: छोटया मुलांसाठी मुलींसाठी फुले, अमोल गोष्टी, सोन साखळी , विश्राम, जसंता, सारखे प्रसिध्द कथा संग्रह लिहिले. खानदेशातील गिरीजाबाई केळकर यांनाही अनेक कथा संग्रह लिहीले. जळगावमध्ये वास्तवास असलेल्या आनंदीबाई शिर्के यांनीही उत्कृष्ट कथा लेखन केले. नि.द. फाटक यांनीही कथा लेखनाचे महत्वपुर्ण कार्य केले. बालसाहीत्यात लहान मुलांसाठी गोष्टी लिहुन वृत्तपत्रातुन प्रसिध्द कारणारे धों. वे. जोगी हे ही खानदेशातील प्रमुख कथाकार म्हणुन मानले जातात. के. नरखेडे यांनी आपल्या कथांच्या माध्यमातुन ग्रामिण जीवनाचे वास्तव चित्रण मांडले. खादेशातील कथा साहित्यात म.ना.अदवंत यांनीही मोलाची भर घातली. या बारेबरच विविध

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

मासिकातुन आपल्या कथा प्रसिध्द करणारे म. बा. शिदोरे, बाबुराव तरटे, मो.द. ब्रम्हे आणि भागवत चौधरी यांचेही कथा साहित्य परंपेत महत्चपुर्ण स्थान मानले जाते. आशा प्रकारची कथा सहित्याची उज्वल परंपरा खानदेशी भुतिस लाभलेली आहे.

**४. नाटयसाहित्य :–** नाटयसाहित्य परंपरेत देखिल खानदेशाची मान उंचावलेलीच दिसते. प्रसिध्द नाटय साहितीक मा.द. ब्रम्हे यांनी आधात, आनेदाश्रव आणि आश्रीत सारखी प्रसिध्द नाटके लिहीली. या बरोबरच त्यांनी शेजारणी या आश्याच हो एकांकीका लिहीली. बा. सी. मर्ढेकरांनी नटश्रेष्ट हे नाटक लिहुन खानदेशाची नाट्या साहित्य परंपरा अजरामर केली. विनायक रामचंद्र चौघुले यांनी देखील सिंहासन आणि सैतानी संकृत ही दोन नाटके लिहीली. कथा आणि काव्य साहित्यात मोलाची भर टाकणारे साने गुरुजीं यांनी नाटया परंपरेतही आपला ठसा उमटविला आहे. त्यांनी आस्पृश्य उध्दार मंगल प्रभात ते आपले घर आणि नीळा पक्षी नावाचे प्रसिध्द नाटके लिहीली. आशा प्रकारची नाटय परंपरा जपण्यात नाटय साहित्यीक यशस्वी ठरले असल्याचे दिसुन येते.

**५. समिक्षा व संपादन साहित्य :–** समिक्षा व संपादन साहित्याची परंपरा देखील खानदेशातील साहित्यीकांनी उत्कृष्टतेने जपली असल्याचे दिसुन येते. बा. सि. मर्ढेकरांनी शौर्य आणि साहित्य व वाडमयीन महात्मता हे दोन समिक्षणात्मक ग्रंथ लिहीले. म.ना. अदवंत हे देखील एक नावाजलेले समिक्षक असनु लघु कथा आणि नाटक यावर समिक्षणात्मक लेखन केले आहे. दा.गो. बोरसे यांनी देखील समिक्षा व संपादन क्षेत्रात महत्वपुर्ण कार्य केल्याचे दिसुन येते.

**समारोप**

खानदेशाच्या सांस्कृतिक जडणघडणित साहित्याकांनी महत्वाची भुमिका निभावल्याचे दिसुन येते. कथा साहित्य असो अथवा नाटयसाहीत्य तसेच काव्यसाहित्य असो अथवा कादंबरी साहित्य आशा सर्वच शेत्रात साहित्यीकांनी खानदेशी भुमित उज्जवल परंपरा जपली आहे. या सर्व साहित्यीकांनी धार्मिक, समाजिक, राजकिय, सांस्कृतीक आशा सर्वच क्षेत्रावर प्रकाश टाकणारे साहित्य निर्माण केले. या साहित्यद्वारे त्यांनी सामाजिक प्रबोधनाचे कार्य केले. साहित्यतुन निव्वळ मनोरंजन तसेच समाज प्रबोधन आशा दुहेरी भुमिकेतुन साहित्य निर्मितीची परंपरा साहितीकांनी जोपासलेली दिसुन येते. एकंदरीत खानदेशास उज्जलि साहितीक परंपरा लाभलेली दिसुन येते.

**संदर्भ सूची :**

१. प्रभावती महाजन :– खानदेश भुमी साहित्य आणि साहित्यीक
२. शशिकांत पाटील :– खानदेशचे मराठी साहित्यरुप
३. दिलीप चव्हाण :– खानदेशातील भटकी पंचाळ जमात
४. शशिकांत पाटील :– अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशाची ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभुमी : एक आभ्यास

**प्रा. रामभाऊ देवराव काशीद**
इतिहास विभाग, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड.

खानदेशाला अत्यंत प्राचीन पार्श्वभुमी लाभलेली आहे. महाराष्ट्राच्या उत्तर भागात असलेल्या धुळे,नांदुरबार, जळगाव या तीन जिल्हयाचे मिळुन बनलेले भोगोलिक क्षेत्र म्हणजेच खान्देश होय. खान्देश हे महाराष्ट्रातील केवळ एक भौगोलिक क्षेत्रच नाहीतर ती एक संस्कृती आहे. प्राचीन काळात ऋषीकेदेश, स्कंददेश, खंडदेश, खांडवदेश, कान्हदेश, आभारदेश तसेच खान्देश आशा विविध नावाने उल्लेख आढळुन येतो. या नावामध्ये खान्देश हे नाव कधी रुढ झाले याचा स्पष्ट उल्लेख आढळत नसला तरीत्याच्या उत्पत्ती बाबतही एकमत आढळत नाही. काही लेखकांनी पांडवकालीन खांडववन म्हणजेच खान्देश आहे. असा उल्लेख केला आहे. तर काहींनी ऋषीकेदेश असे म्हटले आहे. प्राचीन काळी हिमालयात राहणारे ऋषीक स्थलांतरातुन या भागात आले. त्यामुळे याचा ऋषीकदेश असाही उल्लेख करण्यात येतो. या ऋषीकांचास्वामी कृष्ण म्हणजेच कान्हा हा आहे. या कान्हा नावारुन खान्देशचा उल्लेख कान्हा देश असे पडले असावे. पुढे कान्हा देशाचा अपभ्रंष होऊन खान्देश हे नाव रुढ झाले असावे. परंतु यात विचारवंतामध्ये एक वाक्यता दिसुन येत नाही. आशा खान्देश भुमीची ऐतिहासीक, भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभुमी प्रस्तुत करण्याच्या उद्देशाने या निबंधाची दिशा ठरवण्यात आली आहे.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. खान्देशाच्या ऐतिहासिक पार्श्वभुमीचा आढावा घेणे.
२. खान्देशांची भौगोलिक क्षेत्र कसे आहे याचा परामर्ष घेणे.
३. खान्देशातील सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करणे.

खान्देशची ऐतिहासीक, भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीचे अध्ययन पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

**१. ऐतिहासिक पाश्वभुमी :–** खान्देशाच्या नावाबाबत एकवाक्यता नसली तरी यादव राजा कान्हेरेदेव यांच्या नावावरुन खान्देश हे नाव रुढ झाले असावे. असे विचारवंतांनी मत व्यक्त केले आहे. परंतु मध्ययुगीन कालखंडातीलल उल्लेखानुसार खान्देश सुभा असल्याचे स्पष्टपणे आढळुन येते. महाभारत काळापासुन अस्तित्वात असलेल्या उल्लेखानुसार खांडवदेश, कान्हदेश, आणि खान्देश असा या भुमीचा नामकरण प्रवास झाला असल्याचे स्पष्ट होते. काही विचारवंताच्या मते यादव राजा सेऊन चंद्र यांच्या नावावरुन या प्रदेशास सेऊनदेश म्हणुन ओळखले जात असल्याचा उल्लेख केला आहे. दिल्लीचा सुलतान तुघलकाने हा प्रदेश १३७० मध्ये मलिकराजास जहांगिरीचा प्रदेश म्हणुन दिला. त्याचा वारस नसीरखान हा होता. अर्थात इतिहासकार फरिस्ता १२९६ मध्ये मुसलमानांनी जिकलेल्याचा खान्देशच्या अधिपतींचा उल्लेख करतो. त्याअर्थी खान्देश हे नाव फारकीपुर्व असावे. पुढे १६०९ मध्ये हा प्रदेश अकबराच्या कारकिर्दित मोगलांच्या ताब्यात आला. आपला राजपुत्र दनियाल याच्या सन्मानार्थ या प्रदेशाचे नाव दानदेश असे ठेवले. तथापी, अल्पावधितच हे नाव मागे पडुन अधिकृत ग्रंथामध्ये खान्देश हेच नाव पुर्ण प्रस्थापित झाले. आशा प्रकाराची पार्श्वभुमी लाभलेला खानदेश आज संयुक्त महाराष्ट्रातील एक महत्वाचे क्षेत्र म्हणुन ओळखले जाते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मीती नंतर जळगाव व धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्रास खान्देश म्हणुन ओळखले जाऊ लागले. ऐतिहासिक उल्लेखानुसार खानदेशाची व्याप्ती मोठी होती. परंतु आज मात्र खानदेशाचे कार्यक्षेत्र या तीन जिल्हयापुरतेच मर्यादित झाले असल्याचे दिसुन येते.

**२. भौगोलीक पार्श्वभुमी :–** नैसर्गीक समृध्दतेने नटलेला असा प्रदेश म्हणुन खान्देशाची ओळख आहे. खानदेशात पुर्वी धुळे आणि जळगाव या जिल्हयांचा समावेष होता त्यात नंदुरबारच्या जिल्हानिर्मीती नंतर एका जिल्हयाची भर पडुन तीन जिल्हयाचे कार्यक्षेत्र खानदेशात समाविष्ट आहे. या तिनही जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्रात म्हणजेच खानदेशात सातपुडयाच्या डोंगररांगा पसरलेल्या आहेत. खानदेशचे भौगोलीक वैशिष्टय म्हणजे इतर जिल्हयातील नद्या आपल्या क्षैत्रीतील निसार घेऊन पुर्वेकडे वाहत जाऊन शेवटी बंगालच्या उपसागरात समाविष्ट होतात. परंतु खानदेशातील एक प्रमुख नदी तापी – नदी ही पश्चिम वाहिनी नदी असुन आरबी समुद्राला जाऊन मिळते. या सोबतच खानदेशात तापी, गिरना, पुर्णा , आनेर, पांजरा, वोरी, वाघुट, आंजनी , भोगावती, सुकी, मीर, भोकर, गुळी, आशा मुख्य आणि प्रमुख उपनद्याही खानदेशातुन वाहतात.आशा प्रकारच्या जल उपलब्धतेने समृध्द असणारा प्रदेश म्हणुन खानदेशाची ओळख आहे. या सर्व नद्यामुळे खानदेशाचा भोगोलिक भाग सुपीक बनला आहे.

भौगोलिक दृष्टिने खानदेश हा महाराष्ट्राच्या उत्तर भागात वसलेला एक प्रमुख महसुली प्रदेश आहे. खानदेशाच्या उत्तर सिमा गुजरात आणि मध्यप्रदेश यांच्याशी जुळलेल्या आहेत. त्यामुळे खान्देशात गुजरात आणि मध्यप्रदेश राज्यांतुन व्यापारासाठी प्रतिसाद मिळत आसतो.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

खानदेशाचे एक महत्वपुर्ण भौगोलिक वैशिष्टये म्हणजे या भागातील डोंगररांगा होत.

या डोंगर रांगामध्ये काही ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत. रामायणातील शबरी, महाभारतातील पांडवामधील भीम – बाकासुराची लढाई झाली ते ठिकाण यांचा संबंध खान्देशशी आहे. सातपुडयात पाल हे थंड हवेचे ठिकाण आहे. गणपतीचे मंदीर (पाद्यलय) उष्णमुनीचा आश्रम कानळक्ष, सखाराम महाराजांची समाधी(अमळनेर), झुलते मनोरे (फरकोडे), भुईकोट किल्ला (पारोळा),थंड हवेचे ठिकाण (मोरळमाळा), गोविंद महाराजांचाी समाधी (सोनगीर), भुइकोट किल्ला (थाळनेर), प्रती काशी (शहदा – प्रकाशे ), तसेच लळींग भामेर, येथेही फार प्राचीन किल्ले आहेत. आशा प्रकारची भौगोलिक पार्श्वभुमी खान्देशाची असल्याचे दिसुन येते.

**३. सामाजिक पार्श्वभुमी :–** उत्तर भारतीय लोकांसाठी दक्षिणेचे प्रवेशद्वार म्हणुन ओळखली जाणारी भुमी म्हणजे खानदेश होय. उत्तर भारतातुन आलेले विविध सामाजिक परिस्थितीचे लोक दक्षिणेकडे स्थलांतरीत होताना खानदेशातुनच प्रवेशित झाले. त्यामुळे उत्तर भारतीय लोकांचा तेथील सामाजिक आणि सांस्कृतीक परिस्थितीवर विशेषत्वाने प्रभाव पडल्याचे दिसुन येते. खानदेशात गुजरात मधुन आलेल्या लेवा – पटीदार समाज, राजस्थानातुन आलेला भिल्ल समाज मोठया प्रमाणावर स्थाईक झाला आहे. या बरोबरच अभीर किंवा आहीर लोकांचा खानदेशातील समाज घडणीवर फार मोठा प्रभाव आहे.  ही जात परंपरेने दुग्ध व्यवसाय, गोपालन इत्यादी व्यावसायाशी निगडीत आहे. या बरोबरच खानेदशात कोळी, ठाकुर, तेली, धनगर, दिवर,नाव्ही, बारी, भावसार, भिल्ल, कुणबी, वाणी इत्यादी भटक्या विमुक्त प्रवर्गातील लोक वास्तव्य करतात. या शिवाय, खानदेशात गुरव, चांभार, कासार, धोबी, बंजारा, ब्राम्हण, माळी, मांग, शिंपी, साळी, सुतार, सोनार, कोष्टी, पारधी, बडार, गोसावी, बैरागी, वासुदेव या जाती – जमाती तसेच अनेक अदिवासी लोक वास्तव्य करतात तसेच भटक्या विमुक्त जाती – जमाती बिगर हिंदु धर्मीय जैन, बौध्द, ज्यू, ख्रिश्चन लोक यांचे ही आस्तित्व खानदेशात आढळुन येते. आशाप्रकारची सामाजीक परिस्थीती खानदेशात आहे.

नंदुरबार धुळे आणि जळगाव या तीन जिल्हयाच्या बनलेल्या खानदेशात अनेक बोलीभाषा बोलल्या जातात. जळगाव जिल्हयात आहिराणी भाषा बोलली जाते. खानदेशात प्रामुख्याने आदिवाशींचे वास्तव्य आहे. त्यामुळे आदिवाशी व अहिराणी भाषाही प्रामुख्याने बोलली जाते. खानदेशात पुर्वीपासुन आशाच प्रकारची सामाजिक व सास्कृंतीक परिस्थिती असुन या प्रदेशात विविध जाती जमाती तसेच विविध धर्मिय संस्कृती या ठिकाणी वाढीस लागल्याचे दिसुन येते. खानदेशाच्या सांस्कृतीक क्षेत्रातील एक आग्रगण्य नाव म्हणजे बहीणाबाई चौधरी होय. ज्यांनी आपल्या साहीत्यातुन खानदेशचा परिसर आणि खानदेशचे कृषीजीवन, सामाजिक जीवन लोकंसमोर मांडले. आशी सांस्कृतीक पार्श्वभुमी खानदेशास लाभली आहे.

**समारोप**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर महाराष्ट्राचा प्रमुख आणि महत्वाचा भाग म्हणुन ओळखला जात आसलेला प्रदेश म्हणजे खानदेश होय. या भागाला अत्यंत प्राचीन वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळापासुन हा भाग भौगोलिक सामाजीक आणि सांस्कृतीक दृष्टिने समृध्द आशा स्वरुपाचा आहे. उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा दुवा म्हणजे खानदेश होय, त्यामुळे उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय संस्कृतीचे दर्शन या भागात होते. गुजरात आणि मध्यप्रदेशाच्या सिमा संलग्नते मुळे या परराज्यांचा प्रभावही खानदेशावर पडलेला दिसुन येतो. सातपुडयाच्या डोंगररांगानी नटलेला हा प्रदेश भौगोलीक दृष्टिने समृध्द आहे. तर या प्रदेशात सर्व जाती धर्म सामाजिक विविधतेतुन एकात्मतेची भावना प्रकट करताना दिसुन येतात. आशा प्रकारची ऐतिहासीक सामाजिक आणि भौगोलिक परिस्थिती खानदेशाला लाभल्यांचे दिसुन येते.

**संदर्भ सूची :**

१. प्रभावती महाजन :– खानदेश भुमी साहित्य आणि साहित्यीक
२. शशिकांत पाटील :– खानदेशचे मराठी साहित्यरुप
३. दिलीप चव्हाण :– खानदेशातील भटकी पंचाळ जमात
४. शशिकांत पाटील :– अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील कादंबरी आणि कादंबरीकारांची ओळख एक आभ्यास

**प्रा. एस.आर. साळवे**
इतिहास विभाग, दगडोजीराव देशमुख महाविद्यालय,
वाळुंज, जि. औरंगाबाद.

खानदेशास साहित्याची उज्वल परंपरा लाभलेली आहे. खानदेशात अनेक साहित्यीक जन्माला आले आहे. या साहित्यीकांनी साहित्यात मोलाची भर टाकली आहे. साहित्यातील एक महत्वपुर्ण प्रकार म्हणजे कादंबरी होय. कादंबरी हा प्रकार आपल्या देशात साहित्यीकांसाठी नवीन होता. परंतु तो जसा जसा भारतात रुढ झाला तशी तशी त्याची लोकप्रियता वाढली. खानदेशास साहित्याची भुमी म्हणुन ओळखले जाते. त्यामुळे कांदबरी हा प्रकार त्या प्रदेशातही लोकप्रिय ठरला. खानदेशातील प्रसिध्द कादंबरीकार म्हणुन ज्यांची ओळख आहे. त्यात बा.सि. मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' ही कादंबरी लिहिली. त्यानंतर वसंत कानेटकरांनी घर ही कांदबरी लिहिली. आशा प्रकारे कादंबरी विश्वात लोकप्रिय ठरतील आसे कादंबरीकार खानदेशात होऊन गेले. त्यातील काही कादंबरीकार व त्यांच्या साहित्याची ओळख व्हावी या दृष्टीकोनातुन प्रस्तुत शोधनिंबधाचा उद्देश ठरण्यात आले आहेत.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. खानदेशी सहित्याची ओळख करुन घेणे.
२. खानदेशी साहित्यातील कादंबरीकांराची माहिती प्रस्तुत करणे.
३. खानदेशातील कादंबऱ्यांचा आढावा घेणे.

खानदेशात जे साहित्य विषेशत: कादंबरीकार आहेत. त्यांची ओळख व त्यांचे साहित्य यांचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे.

**१. श्रीराम आत्तरदे :–** खानदेशात जन्मलेल प्रसिध्द कादंबरीकार श्रीराम आत्तरदे यांचा जन्म ३० जानेवारी १९१९ रोजी आमळनेर तालुक्यात झाला. त्यांनी शिक्षक तसेच प्राध्यापक पदावर कार्य केले. याच कालावधीत त्यांनी साहित्य निर्मीतीचे ही कार्य केले. साहित्याच्या निर्मीतीत केलेल्या उत्कृष्ट कार्याबदल १९५५ मध्ये मराठी छंद शास्त्रावरील 'छंदोभई मराठी' या ग्रंथास नागपुर विद्यापिठाने .. ही पदवी प्रदान केली. त्यानंतर त्यांनी संपादक पदावर कार्य करताना पत्रिका या पाक्षिकाचे संपादन केले. त्यांनी सर्वप्रथम सावलीच्या उन्हात ही कादंबरी प्रकाशीत केली. ही कांदबरी भिल्ल पावऱ्याच्या प्रश्नावरील भाष्य करणारी होती. या कादंबरीत त्यांनी सावकार आणि त्यांच्या माध्यमातुन गरीब लोकांवर होणारे अत्याचार याचे चित्रण केले आहे. सावकार देशभक्तीच्या नावाखाली गरीब लोकांचे कसे शोषण करतात तसेच राजकारणी लोकांकडुन आशा सावकारांना अभय दिले जाते. याचे चित्रण त्यानी या कादंबरीत केलेल आहे.

**२. श्रीधर दिक्षीत :–** खानदेशात जन्मलेले आणखी एक लोकप्रिय कांदबरीकार म्हणजे श्रीधर दिक्षीत हे आहेत. त्यांचा जन्म ३० जुन १९४० मध्ये चोपडा येथे झाला. त्यांनी आपले पदवी शिक्षण वाणिज्य शाखेतुन घेतले. त्यानंतर त्यांनी इंदौर, भुसावळ आणि जळगाव शहरात विमा विभागात नौकरी केली. त्यांनी कथा कादंबरी बाल कादंबरी असे अनेक प्रकारचे साहित्य निर्मीतीत योगदान दिले. त्यातील पंख वेदनांचे ही कादंबरी अत्यंत लोकप्रिय ठरली. या कादंबरीत त्यांनी गोपाल बाबु या नायक पात्रासोबत शोभा या नायीकेचे प्रम आणि त्यानंतर त्यांचा आरोग्याच्या कारणास्तव झालेली ताटातुट याचे हुबेहुब चित्रण या कादंबरीत केले आहे.

**३. डॉ. मधुकर पाठक :–** हा एक खानदेशातील प्रसिध्द कादंबरीकार आहेत. त्यांनी भुसावळ येथिल नहाटा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत. त्यांना पुणे विद्यापिठाने एम.फिल व पिएच.डी. चे मार्गदर्शक म्हणुन मान्यता प्रदान केली आहे. मुग्धा व साधना काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांनी हट्टवाद नावाचा कथासंग्रह लिहिला. तसेच विषवृक्षाची फळ हे अप्रकाशीत नाटक ही लिहीलेले आहे. त्यांची भाविकांचे बंड ही महत्वपुर्ण कादंबरी प्रकाशित झाली आहे. या कादंबरीत देशाचे स्वातंत्र्य व त्यानंतर महात्मा गांधीजींचा खुन याचे चित्रण केले आहे. या सर्व घटनांचे परिणाम भरतातील समाज घटकावर कशा प्रकारे पडले त्याचे वर्णन या कादंबरीत करण्यात आले आहे.

**४. के. नारखेडे :–** कौतीक गरबड नारखेडे असे पुर्ण नाव आसणारे एक प्रसिध्द कादंबरीकार यांचा जन्म यावल तालुक्यात झाला. ते व्यवसायाने शिक्षक होते. त्यांच्या नावाने आजही के. नारखेडे हायस्कुल ही शाळा आजही प्रसिध्द आहे. त्यांचे बालसाहित्य प्रसिध्द आहे. त्यात जीवन मोत्याचा मळा, वेडा राजपुत्र, आजच्या गोष्टी हे कथा संग्रह अत्यंत लोकप्रिय ठरले. या बरोबरच ज्यांचा आनंदवन, मधुरानी, जलवंती, तारकापुष्प या बाल कादंबऱ्या ही लोकप्रिय झाल्या त्यांनी साकार केलेल्या राधेय हा बालनाटय प्रयोग यशस्वी ठरला तसेच त्यांचे कादंबरी साहित्यातील योगदानही विषेश उल्लेखनिय स्वरुपाचे आहे. त्यांनी पाटलाची लेक व आलंनी या दोन महत्वपुर्ण कादंबऱ्या लिहिल्या,

यातील आजंनी ही प्रादेशिक कादंबरी आहे. या कादंबरीत त्यांनी खानदेशातील पाटीदार समाजामध्ये सत्पंथाची जी वावटळ उढली होती तीचे ओझरते दर्शन या कादंबरीत दाखवले आहे. सत्तपंथी आसणाऱ्या लोकांनी इतर पंथ स्विकारावा आणि तो स्विकारल्या नंतर त्याचे परिणाम काय होतात त्याचे हुबेहुब चित्रण या कादंबरीत करण्यात आले आहे.

**५. वासुदेवराव वाघुळदे :–** खानदेशातील प्रसिध्द कादंबरीकार म्हणुन यांची ओळख आहे. ते एम. ए. बी.एड आसुन त्यांनी नसिराबाद येथे शिक्षकाची नौकरी केली. त्यांनी आधुनमधुन वृत्तपत्रामधुनही लेखन केले त्यांचा एकमेव कथा संग्रह प्रकाशित असुन त्याचे नाव रक्ताची आक्षरे असे आहे. रक्ताची अक्षरे या काथा संग्रहात त्यांनी एकुण १४ कथांचा समावेष केला आहे. त्यातील चिंता आणि खरा मित्र या दोन कथा महत्वपुर्ण आशा आहेत. या काथांनमधुन त्यांनी मानवी जीवनात येणाऱ्या समस्या तसेच निर्माण होणाऱ्या प्रमेभावना यांचे हुबेहुब चित्रण केले आहे.

**समारोप**

कादंबरी या साहित्य प्रकारात अनेक खानदेशी साहित्यीकांनी मोलीचे योगदान दिले आहे. खानदेशी कादंबरी म्हटले की वाचनाची ओढ लागावी आशा कादंबऱ्या आहेत. साहित्यकारांनी या कादंबऱ्याच्या माध्यमातुन एक वेगळा ठसा उमटवला आहे. आशा प्रमुख कादंबरीकारात श्रीराम अत्तरदे, श्रीधर दिक्षीत, डॉ. मधुकर पाठक, के नारखेडे, वासुदेवराव वाघुळदे, वा.रा. सोनार या प्रमुख कादंबरीकाराचा समावेश होतो. त्यांनी आपल्या कादंबऱ्यातुन लोकांचे निव्वळ मनोरंजन करुन त्यासोबतच सामाजिक संदेश देण्याचाही प्रयत्न केला. त्यांनी आपल्या कादंबऱ्यामधुन समाजातील समस्या दु:ख यावर मार्मीक भाष्य केले. मानवी जिवनात दु:खाला सामोरे जाताना एक नवी प्रेरणा मिळेल. आशा प्रकाराचे लेखन त्यांनी आपल्या कादंबऱ्या मधुन केले आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्रभावती महाजन :– खानदेश भुमी साहित्य आणि साहित्यीक
२. शशिकांत पाटील :– खानदेशचे मराठी साहित्यरुप
३. दिलीप चव्हाण :– खानदेशातील भटकी पंचाळ जमात
४. शशिकांत पाटील :– अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

# कृष्णा पाटिल यांच्या साहित्यातुन प्रदर्षित झालेले सामाजिक चित्रण : एक आभ्यास

**प्रा.डॉ. शेख हुसेन इमाम**
इतिहास विभाग, मिलिया महाविद्यालय,
जि. बीड.

खानदेशातील कवीता म्हटले की ओघानेच कृष्णा पाटील यांचा उल्लेख येतो. खानदेशात साहित्याची मुबलक निर्मीती झालेली आहे. यातुनच साहित्य चळवळी उभ्याराहिल्या. संख्यात्मक दृष्टिने विचार केला तर खानदेश हे साहित्य निर्मीतीचे भांडार आहे. परंतु महाराष्ट्रातील साहित्य वर्तुळात स्वतंत्र ओळख निर्माण करु शकणारे काही मोजकेच कवी खानदेशात आहेत. त्यातीलच एक नाव म्हणजे कृष्णा पाटील यांचे होय. त्यांनी आपल्या कवीतेद्वारे समाजमनाचा आढावा घेतला. त्यांनी आपल्या कवितातुन समाजातील प्रेमभावना, समाजातील सहसंबध, सर्वनाते सबंध, याबरोबरच या नाते संबधाविषयी चिंतनात्मक विवेचन प्रस्तुत केले आहे. तसेच खानदेशाच्या भुमिचाही उल्लेख त्यांच्या कवितातुन प्रदर्षित होतो. या समाज चित्रणाचे व खानदेशाच्य भुमिचे जे वर्णन त्यांच्या कवितातुन प्रदर्षित झाले आहे. त्याचा आढावा प्रस्तुत शोध निंबधातुन घेण्यात आलेला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. कृष्णा पाटील यांच्या काव्यसाहित्याचा आढावा घेणे.
२. कृष्णा पाटील यांच्या खानदेशीभुमी विषयक काव्यांचा परामर्ष घेणे.
३. कृष्णा पाटील यांच्या कवितेतुन प्रदर्षित होणारे सामाजिक चित्रण प्रस्तुत करणे.

कृष्णा पाटील यांनी खनदेशी सामाजाचे, खानदेशी भुमिचे चित्रण आपल्या कवितेतुन केले आहे.कृष्णा पाटील यांनी खानदेशाच्या भुमीचे यर्थाथ व वास्तववादी चित्रण आपल्या कवितेतुन केले आहे.जळगाव जिल्हातुन वाहणाऱ्या तापी नदीचे रुप जिल्हयातल्या लोकांवर किती मोठया प्रमाणात आहे. हे त्यांनी आपल्या खालील कवितेद्वारे स्पष्ट केले आहे.

*जळगाव जिल्हयात या*
*माता तापी वोहे शांत*
*थोर तिच्या पुण्याईने*
*पीक डोले शिवारात*

या कवितेद्वारे जळगाव जिल्हयातील तापी नदीच्या पुण्याईने कशी समृध्दी आली आहे. याचे वर्णन त्यांनी केले आहे. तशाच प्रकारे जिल्हयातील भाषाशैली भौगोलीक परिस्थिती जीवनमान, तिर्थस्थळे, नद्या, डोगंर यांचा परिचय त्यांनी आपल्या अनेक कवितांमधुन करुन दिला आहे. त्यांनी या कवितांच्या माध्यमातुन निसर्गाचे यथार्थ चित्रण केलेले आहे. निसर्गाचे निव्वळ सौदर्य त्यांनी आपल्या कवितेद्वारे शब्दबध्द केले आहे. या बरोबरच खानदेशी भुमित असलेल्या सातपुडा पर्वतरांगा किती महत्वपुर्ण आहेत. याचाही उल्लेख त्यांनी आपल्या कवितान्द्वारे चित्रीत केले आहे.

*माझ्या गावाच्या शेजारी*
*गिरी थोर सातपुडा*
*पाठिराखा तो आमुचा*
*काय आम्हा तुटवडा?*

या कवितेद्वारे नैसर्गिक देणगी म्हणुन लाभलेला सातपुडा, तेथील समाज जिवनाचा पाठीराखा असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. सातपुडा पर्वतामुळे येथिल लोकांना कशाचाही तुटवडा भासत नसल्याचे त्यांनी आपल्या कवितेत स्पष्ट केले आहे. कृष्णा पाटील यांच्या कविता व्यक्ती जीवनाचाही परामर्ष घेताना दिसुन येतात. त्यांनी समाजातील अर्धपोटी राहुन कार्य करणाऱ्या कामगारवर्गाचे वास्तवादी चित्रण प्रस्तुत करण्याचा प्रयत्न आपल्या कवितेद्वारे केला आहे.

*माझ्या लहान संसारी*
*राझण तो एका कोनी*
*नाही स्टीलची भांडी*
*मडक्याच्या उतरणी*
*माझ्या लहान संसारी*

या कवितेतुन समाजातील गरीबी, दरिद्रय आणि त्याची दाहकता त्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. समाजातील श्रमीकवर्ग दारद्रियात खितपत पडलेला असताना देखील आशा संकटाना देखील कसा सामोरा जातो याचे वास्तववादी चित्रण त्यांनी आपल्या कवितेद्वारे केले आहे.

समाजात असणारी अध्यात्मीकता यांच्यावरही कृष्णा पाटील यांची कविता प्रकाश टाकते. कवि कृष्णा पाटील यांच्या कवितेतुन व्यक्त होणारा भक्तीभाव त्यांची अध्यत्मिकता, तत्वचिंतन, मध्ययुगाम संतवाङमय यातील भक्तीभावासरखे नसुन अधूनिक काळातील मानसाला ईश्वरीशक्तीचा लागलेला ध्यास, ईश्वराच्या मांगल्याचा, पावित्र्याचा झालेला बोध व्यक्त करते.

*गाढ झोपल्या सागरी तुझी जाग जाणवते*
*समाधिस्थ गीरीतुन तुझी वाणी ऐकु येते*
*शांत अशा या सृष्टित तुझी चाहुल लागते*
*आर्त निःशब्द वाणीत तुझे गुढ उकलते*

आशा प्रकारे त्यंनी ईश्वराच्या अस्तित्वाचे गुढ आपल्या कवितेतुन शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ईश्वरास आमृत, निर्वीकार, निर्गणरुप आशा विविध विशेषणातुन संबोधले जाते. त्याचे गुढ त्यांनी आपल्या कवीतेतुन उकलण्याचा प्रयत्न केला आहे.

**समारोप**

कवि कृष्णा पाटील यांनी आपल्या कवितेतुन खानदेशी समाज मनाचा, भुमिचा आढावा प्रस्तुत केला आहे. त्यांनी त्यातुन खानदेशी निसर्गचित्रण समाजातील अध्यात्म, गरीबी, सामाजातील दारिद्रय आशा विविधांगी घटना व घटकांचे यर्थाथ व वास्तववादी चित्रण आपल्या कवितेद्वारे मांडले आहे. त्यांनी आपल्या कवितेतुन समाजातील दारिद्र्यावर प्रकाश टाकुन समाजमनाचा शोध घेतला आहे. आशा आवस्थेत असणारा समाजमनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. या बरोबरच खानदेशातील समाजावर तेथील नैसर्गिक घटकांचा जसे पर्वतरांगा , नद्या यांचा पडलेला प्रभाव स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. एकदंरित खानदेशी समाज घटकांचे मन आणि त्याचे वास्तवादी चित्रण त्यांनी आपल्या कवितेद्वारे चित्रीत केला आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्रभावती महाजन :- खानदेश भुमी साहित्य आणि साहित्यीक
२. शशिकांत पाटील :- खानदेशचे मराठी साहित्यरुप
३. दिलीप चव्हाण :- खानदेशातील भटकी पंचाळ जमात
४. शशिकांत पाटील :- अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खान्देशातील दलित चळवळ : ऐतिहासिक विश्लेषण

**प्रा.डॉ. निशांत भिमरावजी शेंडे**
पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग,
जी.टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार.

**अ) प्रस्तावना**

हजारो वर्षापासूनच्या गुलामगिरी व सर्वकष शोषणाच्या बंदिस्त बेड्यांनी शरीराचेसंपूर्ण इद्रिंय बबधीर झालेलाहादलित समाज वर्तमान परिस्थितीत एक नवीन चेतना व अस्मितेकडेझेप घेत आहे. आपली स्वतंत्र्य ओळख निर्माण करतो आहे. याचे निश्चितच श्रेय भारतभूमीतील पुरोगामी विचारसरणीचे समाज सुधारक, संत, दर्शनिक, चिंतक, विशेषकरुन मानवतेचे मुक्तीदाते, दलितांच्या स्व-प्रतिभेचे जनक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.भिमराव रामजी आंबेडकर यांना दिले जाते. तथागत गौतम बुध्द,सम्राट अशोक, चार्वाक, महात्माज्योतीबा फुले, छत्रपतीशाहु महाराज, संत कबीर, कार्ल मार्क्स या सर्व महापरुषांनी समाजातील स्वार्थी व्यक्तिप्रणीत सामाजिक विषमता व अन्याय याच्या विरोधात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मानवतावादी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी वैधानिक संघर्ष केला आणि त्या धगधगत्या दलितसंघर्षाची ज्योत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हाती घेऊन विषमताधिष्ठीत व्यवस्थेविरुध्द दलित चळवळीला निशस्त्र लढाऊ रुप देऊन आंदोलनाच्या माध्यमातून खुला विद्रोह केला. जेव्हा जेव्हा दलित चळवळीविषयी चर्चा केली जाते.तेव्हा महाराष्ट्र राज्याला सोडून अखिल भारतीय स्तरावर मोठ्या प्रमाणात आंदोलन झाले नाही.महाराष्ट्रामध्ये महारसमाजाची बौध्दांची जी चळवळ उभारली गेली त्या चळवळीलाच दलित चळवळ म्हणजेसंयुक्तिकठरते. परंतु वर्तमान परिस्थितीत केवळ नवबौध्द व महारसमुदाय म्हणजेच दलित अशीसंकुचित व्याख्या करुन चालणार नाहीतर जे आर्थिक, सामाजिक, शारीरिक, राजकीय दृष्टिकोनातून शोषित, वंचित आहेते दलित आहेत. दलितांचा लढा म्हणजे केवळ बौध्दांचा लढा नव्हे किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे केवळ बौध्दांचे नेते नव्हेततर प्रस्थापितांविरुध्द प्रभावीपणे लढा द्यावयाचा असेलतर बौध्देतर दलितसमाजालाहीसंघटीत करुन त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे.१

**ब) दलित चळवळीचा उदय व विकास**

डॉ.म.ना.वानखेडे दलित शब्दाची व्याख्या करतांना म्हणतात की, दलित शब्दाची व्याख्या केवळ बौध्द अथवा मागासवर्गीय नव्हे, तर जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेतते सर्व दलित आहेत.२दळण-दळीत -- दलित अशी शब्दाची उत्पत्ती सांगता येते.३ १९७१ च्या जनगणनेनुसार दलितांची एकूण लोकसंख्या ७,९९,९५,८९६ अर्थात भारताच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात १४.६० टक्के संख्या अनुसूचित जातींचीहोती. चार वर्णाच्या व्यतीरिक्त एक पाचवा वर्ण होता.त्या वर्णातील सदस्यांना अस्पृश्य किंवा अछूत म्हटले जात होते. आज त्यांना हरिजन किंवा अनुसूचित जाती म्हटले जाते. सर्वप्रथम अनुसूचित जाती या पदाचा वापर १९३५ मध्ये सायमन कमिशनव्दारे केला गेला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते प्रागैतिहासिक भारतामध्ये दलितांना भग्न पुरुष ( ) किंवा बाह्य जाति ( ) म्हटले जात होते.ब्रिटीश त्यांना दलित वर्ग ( ) म्हणतहोतेतर महात्मा गांधी त्यांना हरीजन म्हणत होते.४

वर्तमान दलित चळवळीचे वास्तविक स्वरुप आपल्याला प्राचीन भारतातील चार्तुवर्ण्य व्यवस्थेमध्ये शोधता येते.हिंदूमध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा मुख्य चार वर्णाचा एकत्रित उल्लेख प्रथम ऋग्वेदातील दहाव्या मंडलातर्गत पुरुष सुक्तात सापडतो.५ पुरुष सुक्तात चार्तुवर्ण्य व्यवस्थेबद्दल असे म्हटले आहे की,

*ब्राम्हणोस्य मुख्मासीत, बुहु:राजण्य:कृत*
*उरु तदस्य यद वैश्य: पदम्यांशुद्रो अजायत६*

अर्थात ब्रम्हाच्या मुखापासुन ब्राम्हणाची उत्पत्तीझाली.बाहुंपासुनक्षत्रियाची उत्पत्तीझाली, मांड्यांपासून वैश्याची उत्पत्तीझालीतरपायापासून शूद्राची उत्पत्तीझाली.वर्ण व्यवस्थेचा उद्देश असा होता की, व्यक्ती आपल्या शक्तीचा उपयोग सामाजिक हित व कल्याणासाठी करेल. चार्तुवर्ण्य व्यवस्था ही सुरुवातीला कर्म व श्रमावर आधारीतहोती.या काळामध्ये दलितांचीस्थिती समाजात मध्यम स्वरुपाची दिसून येते.परंतु उत्तर वैदिक काळामध्ये वर्णव्यवस्थेचे श्रम व कर्मावरील आधारीत स्वरुपामध्येपरिवर्तन होऊनते जन्मावर आधारीतझालेवर्णव्यवस्थेत एकमेकालाश्रेष्ठ, कनिष्ठ समजण्यात येऊ लागले.त्यामुळेश्रेष्ठ कनिष्ठतेच्या भावनेतून जातीसंस्थेचा उदयझाला.परिणामत भारतीय समाज अनेक जाती व उपजातींमध्ये विभागला गेला. आज भारतामध्येतीनहजार पेक्षा जास्त जाती व उपजातीचे अस्तित्व दिसून येते. आणि त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा उत्पन्न होते.उत्तर वैदिक काळामध्ये शूद्राचे एका सामाजिक वर्गाच्या स्वरुपामध्येसुनिश्चित अस्तित्व दिसून येते. यावेळी शुद्रांना धर्म व जातीच्या नावाने वेदाध्ययन करणे, यज्ञ करणे, उपनयन संस्कार विधी, संपत्तीपरिमार्जन, सवर्णाच्या वस्तीत निवास करणे, सार्वजनिक विहीर, तलावांमधुन पाणी भरणे, ईश्वराची आराधना करणे इत्यादी मानवी अधिकारापासून वंचित करण्यात आले. परिणामत: सामाजिक, राजकीय,

आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक बाबतीत हा वर्ग प्रवाहाच्याबाहेर फेकला गेला. या वर्गाच्या हाती उत्पादनाची कोणतीचसाधने न राहिल्यामुळे आर्थिक नाकेबंदी होऊन आर्थिक परावलंबन व दारिद्र्य त्यांच्या वाट्याला आले.

**क) खानदेशातील दलित चळवळ**

संपूर्ण भारताप्रमाणेच चार्तुवर्ण्य व्यवस्था खानदेशातील समाजजीवनामध्ये विषारीसापाच्या वेटोळ्याप्रमाणे घट्ट पकड करुन बसली होती.या व्यवस्थेने खानदेशातील समाज जीवनामध्ये कमालीची विषमता निर्माण झालीहोती.माणसा-माणसांमध्ये भेदभावाची भावना निर्माण झालीहोती.समाजातील अस्पृश्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कनिष्ठ जातींनास्पर्श करणे विटाळ समजले जात होते.त्यांचा स्पर्शअपवित्र समाजला जात होता.परंपरागतहिंदू धर्मशास्त्रीय इतिहासात या गोष्टीला आधार आहेही भावना खानदेशातील समाज मनामध्ये रुजवण्यात आली.

महार, मातंग, चांभार, मेहतर या अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या कनिष्ठ जातीशी खानदेशातील सवर्णाची वागणूक हिनतेचीहोती.सवर्णानी त्यांना कायमस्वरुपी आपल्यापासून दूर ठेवले होते.सवर्णानी त्यांच्याकडून आवश्यक त्या सेवासुविधा घेऊनसुध्दारोटीबंदी व्यवहार नाकारणे.सार्वजनिक विहीरीवरुन पाणी भरण्यास मज्जाव करणे, मंदिरे, खाजगी वस्तीस्थाने या ठिकाणी या अस्पृश्यांच्या प्रवेशास मनाई करणे, सवर्णाच्या प्रमुखरस्त्यावरुन त्यांची रहदारी बंद करणे, याउलट त्यांच्याकडूनमेलेली गुरेढोरे ओढणे, गावकीची कामे करुन घेणे, आपल्या भोजनानंतर उरलेसूरले उष्टे अन्न त्यांना देणे. वेढबिगारीची कामे करुन घेणे.७अशी सवर्णाची अस्पृश्य गणल्या गेलेल्या जातीशी वागणूक होती.त्यामुळे समाजामध्ये पराकोटीची विषमता, सामाजिक अन्यायाचा भावना निर्माण झालीहोती.सवर्णाकडून होत असलेल्या या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात दलितांमध्ये जाणीवजागृती सुध्दाहोतहोती. म्हणूनच अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार, मातंग, चांभार यासारख्या जातींनी विविध परीषदांमधून सवर्णा कडूनहोत असलेल्या अन्यायकारक बाबी नाकारणे सुरु केलेहोते. चिचंखेडे (प.खा.) येथीलमहार परिषदेत गोविंददास महाराज यांच्या अध्यक्षतेखाली जवळजवळ ५०० महार बांधवांनी मृत जनावरांचे मास खाण्याचे नाकारुन ब्रिटीश सरकारवर निष्ठा व्यक्त करुन दोन ख्रिस्ती झालेल्या महार बांधवांना हिंदू धर्मात घेतल्याचे दिसून येते.८ या घटनेवरुन खानदेशामध्ये सवर्णाच्या भेदभावपूर्ण व विषमताधिष्ठीत वागणूकी विरोधात दलितांमध्ये जाणीव जागृतीहोत असल्याचे निदर्शनास येते.या जाणीव जागृतीतूनच अस्पृश्य गणल्या गेलेल्या जमातींनीआपल्यावर सवर्णाकडून होत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात ठिकठिकाणी बहिष्कृत परीषदा आयोजित करण्याचे धोरण स्वीकारले या धोरणानूसारचाळीसगांव येथे २८, २९ मे १९२२ रोजीबहिष्कृत खानदेश जिल्हा परीषद भरविण्यात आली. अध्यक्षस्थानीशिलीडी कलेक्टर साहेबहोते.या परीषदेत विविध ठरावासोबत महार लोकांकडून गावात जी कामे करुन घेतली जातात त्याची बारनिशी ठेवणे सार्वजनिक विहीरी, तलाव, येथे मनाई नसणे इ. ठराव मंजूर करण्यात आले.९

अस्पृश्यता ही जन्मावर अवलंबुन असूनती एक व्यवस्था आहे.अशी भूमिका जळगाव येथेझालेल्या हिंदू धर्म परीषदेत डॉ.कुर्तकाटी यांनी जाहीर केली.यामुळे पूर्व व पश्चीम खानदेशातील अस्पृश्य बांधवांनी ठिकठिकाणीजातीय परिषद बैठका घेऊनडॉ.कुर्तकोटीचानिषेधकेला.१० याचाच अर्थ खानदेशामध्येविदर्भ प्रातांप्रमाणेच संवर्णवर्चस्ववादी व्यवस्थेच्या विरोधात दलितांमध्ये तिव्र विरोधाची भावना निर्माण होऊन त्या भावनेचे रुपांतर दलित चळवळ अधिक प्रमाणात गतीमानहोण्यात झालीहोती.खानदेशातील दलित चळवळ गतीमान करण्यात खानदेशातील समाज सुधारकांनी भरीव योगदान दिल्याचे प्रकर्षाने निदर्शनासयेते. त्या समाज सुधारकांमध्येश्री विनायक नरहर बर्वे यांचे नावप्रकर्षाने घ्यावे लागेल. बर्वेनी अस्पृश्यतेचेसमाजातून कायमचे उच्चाटन करण्यासाठी प्रसंगी विरोधी पत्करण्याचीतयारीसूध्दा ठेवली होती. अस्पृश्योव्दारासाठी त्यांनी आपले आयूष्य वेचले.गावोगावी अस्पृश्यावरील बहिष्कार प्रसंगी सर्वणांना आपली भूमिका पटवून देऊन या कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. पूर्व व पश्चिम खान्देशात दौरे काढूनतेथील कार्यकर्त्यांच्या मदतीनेहे उपक्रम चालविले हरीजन मंदिर प्रवेश मोहीम चालवीली.११ दलित सेवा आणि उध्दारासाठीदलित सेवा पाक्षिक चालवून दलितांच्या व्यथाबद्दल पोटतिडकीनेलिहीले.१२ एकंदरीतचदलितसेवक काकासाहेब बर्वेनी आपल्या विधायक कार्याव्दारे खानदेशामधील दलित चळवळ गतीमान करण्यात भरीव योगदान दिले.

बर्वेप्रमाणेच खानदेशातील दलित चळवळीमध्येसेनू नारायण मेढे या खानदेशातीलसमाजसुधारकाने महत्त्वपूर्ण योगदान दिले.नागपूर येथे ३०-३१ मे व १ जून १९२० रोजीक्षत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या अखिल भारतीय बहिष्कृत वर्ग परिषदेला मेढे उपास्थित होते.या परिषदेत सक्रिय सहभाग घेऊनत्यांनी दोन ठराव या परिषदेत मांडलेहोते.त्यातील एक म्हणजे मेल ट्रेनिंग कॉलेजमध्येअस्पृश्य विद्यार्थ्यांच्या जास्त भरणा करण्यात यावा आणि जिल्हावार अस्पृश्य वर्गाचा स्पेशल एज्युकेशनल इन्स्पेक्टर असावा.१३ या अखील भारतीय बहिष्कृतपरिषदेमध्ये एकूण १४ ठराव मांडण्यात आलेहोते. त्यातील दोन ठराव सेनू नारायण मेढे यांनी मांडलेहोते.त्यावरुन त्यांची दलितांच्या सर्वागिंण उन्नतीचीतळमळ प्रकर्षाने निदर्शनास येते जळगाव नगरपालिकेत डिसें.१९३२ रोजी अखिल भारतीय वर्णाश्रम स्वराज्य संघाचीपरिषद भरली होती. या परिषदेत अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणूनसेनू नारायण मेढे यांनी प्रयत्न केले.१४ एकंदरीतच डॉ.आंबेडकरांनी सुरु केलेलाअस्पृश्योव्दाराच्या चळवळीचा कारवा सेनू नारायण मेढे यांनी खानदेशात संथ न होऊ देता गतीमान करण्याचे फार मोठ्याप्रमाणात प्रयत्न केले. आपल्या कार्याव्दारे खानदेशातील दलितांमध्येत्यांनी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक जागृती मोठ्या प्रमाणात घडवून आणली अस्पृश्य वर्गामध्येशैक्षणिक प्रचार व प्रसारमोठ्या प्रमाणात व्हावा याकरीता मेढे गुरुजींनी जळगांव येथे संत चोखामेळा वसतीगृह सुरु केलेहोते.

सेनू नारायण मेढे प्रमाणेच धनाजी रामचंद्र बिऱ्हाडे या खानदेशातीलसमाजसूधारकाने दलित चळवळ गतीमान करण्यात फार मोठ्या प्रमाणात योगदान दिले. अस्पृश्य वर्गाचे प्रबोधन व्हावे आणि त्यांना सामाजिक न्यायाचे अधिकार मिळावेत याकरीताते गावोगावी भ्रमंती करीत. औरंगाबाद येथे १० आणि ११ नाव्हे. १९४६ रोजीरोजी भरलेल्या अखिल भारतीय दलित परिषदेत बिऱ्हाडे गुरुजी उपस्थित होते. या परिषदेत डॉ.आंबेडकरांच्या भूमिकेस पांठीबा दर्शविणारा ठराव मंजूर करण्यात आला. २५ जाने. १९४८ रोजी बिऱ्हाडे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली पूर्व खानदेश जिल्हाअश्पृश्य परिषद जळगांव येथे यशस्वीरित्या पार पडली.१५ या परिषदेतअश्पृश्य वर्गास फॉरेस्ट किंवा रेव्हेन्यू खात्याची पडीत जमीनसवलतीच्या दराने देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

एकंदरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या चळवळीला साद देवून विदर्भ प्रातांप्रमाणेच खानदेशातील अनेकसमाजसुधारक पूढे आले व त्यांनीखानदेशातील दलित चळवळ गतीमान करुन त्या चळवळीच्या माध्यमातून खानदेशातील दलितांमध्ये समाजिकन्यायाच्या हक्कासंर्दभात सर्वांगीन जागृती घडवून आणली.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अश्पृश्योव्दाराच्या चळवळीच्या प्रभावातून विदर्भ प्रांताप्रमाणेच खानदेशातसुध्दादलितसमाजसूधारक पूढे आलेत आणि त्यांनी आपल्या कणखर व बाणेदार, अभ्यासू, नेतृत्त्वाने खानदेशामध्ये दलित चळवळ गतीमान करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सवर्णवर्चस्ववादी समाजव्यवस्थेला धाब्यावर बसवून स्वातंत्र्य, समता, बंधूत्व, व न्याय या मानवतावादी तत्त्वाच्या पायावर नवसमाजाची उभारणी करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण वाटा उचलला.दलित चळवळीच्या माध्यमातून खानदेशातील दलितांमध्ये मानवी हक्क व अधिकार यासंदर्भात जाणीवजागृती करुन दलितांना आपले न्याय्य हक्क परत मिळविण्याकरिता संघर्ष करण्यास तयार केले.

**संदर्भ सूची :**

१. लिंबाळे शरणकुमार – दलित पँथर, सुगावा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, सप्टें.१९८९, पृ.क्र.१०
२. डॉ.मुलाटे वासुदेव – दलितांची आत्मकथने, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९९ पृ.क्र.११.
३. कित्ता – पृ.क्र.१०
४. डॉ.कुमार युवराज – दलित आंदोलन, ओरीएंट ब्लैकस्वॉन, प्रथम संस्करण, २०११, पृ.क्र.४०५.
५. डॉ.मो.वी.पटवर्धन – वर्ण व जाती, विदर्भ–मराठवाडा बुक कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६६, पृ.क्र.१८
६. डॉ.मेश्राम योगेंद्र – सामाजिक मुल्यसंघर्षाचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपुर, पहिली आवृत्ती, १० ऑक्टों.१९८९ पेज क्र.६.
७. पाटील भी.ना. खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ प्रकाशक, भुषण भिमराव पाटील, पाचोरा, जळगांव प्रथम आवृत्ती जून २००५ पृ.क्र.१९८
८. कित्ता पृ.क्र.१९९
९. कित्ता पृ.क्र.१९९
१०. कित्ता पृ.क्र.१९९
११. शहा मु.ब.(संपा.) : खानदेशचासांस्कृतिक इतिहास (खंड ४) का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे जाने. २००४ पृ.क्र.१३४.
१२. कित्ता पृ.क्र.१३४
१३. निकुंभे सि.एच.समाज प्रबोधनकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर सूगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे प्र.आ.एप्रिल २००५ पृ.क्र.३२
१४. कित्ता पृ.क्र.३४
१५. कित्ता पृ.क्र.४१

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# जळगांव येथील ऐतिहासिक साधने

**प्रा.डॉ. जे.डी. गोपाळ**
प्रमुख, इतिहास विभाग, श्री. शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा, जि. जळगांव.

वस्तूसंग्रहालये हे इतिहास संशोधनासाठी अभ्यासासाठी आणि लेखनासाठी अत्यंत अपयोगी आणि ठोस विश्वासू साधने उपलब्ध असलेली स्थळे आहेत. वस्तूसंग्रहालय पहाण्यासाठी शैक्षणिक सहली आयोजीत होतांना दिसून येतात. म्हणजेच वस्तू संग्रहालये हे शैक्षणिक आणि मनोरंजन अशा दोन्ही बाबी साध्य करणारे दिसून येतात. वस्तू संग्रहालयातील वस्तू विविध विषयांशी निगडित असल्या तरी त्यांच्या अधिकाधिक संबंध इतिहासाशी दिसून येतो. मानवी पूर्वजाविषयी व त्यांच्या कलात्मकतेविषयी जिज्ञासा निर्माण संवाद साधतांनाचा अभ्यास होतो. वस्तू संग्रहालयातील वस्तूशी संबंधितांचा इतिहास व ऐतिहासीक कार्य माहित करून घेण्याची इच्छा निर्माण होते. त्यातून ऐतिहासीक घटनांचा व इतिहासाशी संबंधित विविध घटकांचा अभ्यास समजून येतो. इतिहास काळातील विविध पैलू समजून घेण्यासाठी वस्तू संग्रहालये व ऐतिहासिक साधने मोलाची उपयोगी ठरतांना दिसून येतात.

वस्तू संग्रहालयांना म्युझियम असं शब्दा प्रयोग वापरतांना दिसून येते. माऊझयॉन () या मूळ ग्रीक शब्दा पासून म्युझियम हा इंग्रजी शब्द तयार झालेला दिसून येतो. विविध वस्तूचे जतन, संवर्धन, प्रदर्शन, माहिती सांगणे, अर्थ सांगणे, चित्रे व वाङ:मयीन साहित्य हे संशोधकांना संदर्भ साधने म्हणून उपलब्ध करून देणे आणि असे काही कार्य वस्तूसंग्रहालयाचे दिसून येते. वस्तूसंग्रहालयातील साधने अस्सल व प्रथम दर्जाची असल्याने त्यातून सत्यता प्रकट होते. मात्र संबंधित इतिहासाचे लेखन करणाऱ्या संशोधकाने वस्तूनिष्ठता जोपासली पाहीजे. वस्तू संग्रहालयामध्ये ऐतिहासीक विविध वस्तू बरोबरच वाङ:मयीन साधनांचेही जतन होतांना दिसून येते. कलकत्ता येथील व्हीक्टोरीया मेमोरीयल या वस्तू संग्रहालयात ऐतिहासीक वस्तूंबरोबरच वाङ:मयीन मौल्यवान साधनांचे संवर्धन व अभ्यास होतांना दिसून येतो. ऐतिहासीक संग्रहालये भारतात अनेक ठिकाणी दिसून येतात. स.१९१० मध्ये स्थापन झालेले पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळ येथे ऐतिहासीक वस्तू व हस्तलीखीते यांचे संग्रहालय आहे. ऐतिहासीक संग्रहालयात इतिहास जिवंत उभा करण्याचा प्रयत्न संबंधितांपुढे केला जातो.

पुरातत्वीय अवशेष, भूविज्ञान, वनस्पती संग्रहालये, प्राणी संग्रहालये, पक्षी संग्रहालये, ऐतिहासीक संग्रहालये असे प्रकार सध्या दिसून येतात. ऐतिहासीक संग्रहालयांमध्ये इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या वर्तमानपत्राचाही समावेश दिसून येतो. यापैकीच जळगांव येथील ऐतिहासीक संग्रहालयांचा व ऐतिहासिक साधनांचा परीचय करून देण्याचा माझा प्रयत्न आहे.

जळगांव १८६२ सालापर्यंत नशिराबाद तालुक्यातील जळगांव म्हणुन ओळखले जात होते. जळगांवला आधुनिक इतिहास मोठा असून जळगांवची जुनी वस्ती गोपाळपुरा नावाने ओळखली जात असे. कापुस आणि केळी यासाठी जळगांव प्रख्यात आहे. नगरपालिकेची स्थापना व मनमाड-भुसावळ रेल्वे मार्ग निर्मीतीनंतर जळगांवचा विकास होण्यास सुरूवात झालेली दिसून येते. उत्तर महाराष्ट्रातील जळगांव हे जिल्ह्याचे स्थान असून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ माध्यमाने येथे उच्च शिक्षणाचा विकास होत आहे. या विद्यापीठात एक ऐतिहासीक वस्तू संग्रहालय आहे. या वस्तू संग्रहालयातील परिसरात वस्तू पाचोरे तालुक्यातील नगरदेवळे येथील 'पवार' या जहागीरदार घराण्याशी संबंधित आहेत. स. १६८९ पासून पवार घराण्यातील साबुसिंग उर्फ शिवाजी केरोजी यांचे काळापासून नगरदेवळे गावाला इतिहास लाभलेला आहे. घ्स.१७९५ च्या खर्डाच्या लढाईत या पवार घराण्यातील शिवराव यांनी मुर्दुमकी गाजविली असा उल्लख येतो. दि.४/०५/१८१९ रोजी कंपनी सरकारने पुर्वीपासून अस्तीत्वात असलेल्या पवारांच्या नगरदेवळे आणि परिसरातील जहागिरीस मान्यता दिली.ङ१ असाही उल्लेख येतो. खानदेशातील भिल्लाचा उठाव मोडून काढण्याकामी नगरदेवळ्याच्या पवार जहागीरदारांनी कंपनी सरकारला मदत केल्यामुळे कॅप्टन ब्रिग्ज व्दारा पवारांना जहागीरीची सनद मिळली होती असाही उल्लेख आहे. अशा नगरदेवळे, ता. पाचोरा, जि. जळगांव येथील पवार जहागीरदार घराणे संबंधी तलवारी, भांडी, नाण्याचा संग्रह, विविध धातूंचे दिवे, राजेशाही अडकित्ते, राजेशाही कट्यारी, विविध जुनी पुस्तके, कागदपत्रांचा संग्रह या ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात पहावयास मिळतात. त्यावरील कलाकुसर व इतिहासाशी संबंधित इतर घटकांची माहिती मौलिकरुपात उपलब्ध आहे.

जळगांव येथे १ जुलै १८७७ रोजी स्थापना झालेले वल्लभदास वालजी जिल्हा वाचनालय आहे. आज ते व.वा वाचनालय या नावाने परिचीत आहे. या वाचनालयात ऐतिहासीक जुनी पुस्तके संदर्भग्रंथे तर आहेतच याशिवाय येथे आधुनिक इतिहासाशी संबंधित वर्तमानपत्रे आहेत. घ्साप्ताहीक प्रागतिकङ२ हे वर्तमानपत्र महत्वाचे असून येथे स.१९२२ ते १९४२ या काळातील या वर्तमानपत्राचे अंक उपलब्ध आहेत. द.वा. जोशी हे नामांकीत वकील हे 'साप्ताहीक प्रागतीक' चे संस्थापक होते. हे साप्ताहीक नंतर स्वा. सावरकर यांच्या विचारांशी निगडीत झालेले दिसून येते. याच वाचनालयात घ्साप्ताहीक लोकमतङ३ चे स.१९६०-६१ चे व घ्साप्ताहीक जनसेवकङ४ चे स.१९६१ ते १९६७

ISSN : 2348-7143
Dec. 2018

पर्यतचे अंक येथे आहेत. हे साप्ताहीक काँग्रेसनिष्ट असून त्याचे संपादक निळकंठ एस. पाटील हे होते. घ्मासिक भावसारङ५ हे स.१९३७ ते १९४१ पर्यतचे उपलब्ध असून श्री बंडु गणपत चव्हाण भावसार हे त्याचे संपादक होते. घ्साप्ताहीक जनशक्तीङ६ चे स १९३१ ते १९६८ चे अंक येथे असून संपादक ब्रिजलाल पाटील हे होते. घ्साप्ताहीक वार्ताविहारङ७ हे दर गुरुवारी सायंकाळी प्रकाशीत होणारे असे साप्ताहीक असून त्याचे स १९६१ ते १९६३ पर्यतचे अंक उपलब्ध आहेत. सुरवातीचे संपादक श्री. वि.रा.चौगुले हे असून, त्यांच्यानंतर संपादिका म्हणून सौ. कमलाबाई चौगुले यांनी काम पाहीलेले दिसून येते. घ्साप्ताहिक जळगांव समाचारङ८ चे सन १९६६ ते सन १९६८ या वर्षातील अंक उपलब्ध असून त्याचे संपादक श्री. भागवत चौधरी हे होते. घ्साप्ताहीक खानदेशङ९ चे संपादक श्री. भालचंद्र ना. नेमाडे हे असून त्याचे स.१९६५ ते १९६८ पर्यतचे अंक उपलब्ध आहेत. घ्साप्ताहिक नवजागृती ङ१० चे सन १९६२ ते १९६५ पर्यंतचे अंक येथे असून संपादक श्री. भागवत चौधरी हे होते. घ्साप्ताहिक बातमीदारङ११ चे सन १९६२ ते १९६७ पर्यंतचे अंक येथे आहेत. संपादक श्री. वि. चा. नेहते हे होते. घ्सप्ताहीक राष्ट्रसेवकङ१२ हे जळगांव मधील एक महत्वाचे वर्तमानपत्र असून ते दर मंगळवारी प्रकाशित होत असे. स १९६१ ते १९६८ दरम्यानचे अंक उपलब्ध आहेत. हे स्वातंत्र्य सैनिकांसंबंधी वर्तमानपत्र असून स्वा. सै. देवकिनंदन नारायण हे त्याचे संस्थापक होते. या वाचनालयात घ्साप्ताहीक प्रबोधचंद्रीकाङ१३ चे स.१९६८ चे अंक आहेत. नानासाहेब फडणवीस हे त्याचे संपादक होते. याशिवाय, पोथीमध्ये घ्श्री गुरुचरीत्र समाप्तङ१४ हे स १८६१ मधील असून श्री. केशव भिकाजी ढवळे हे त्याचे लेखक आहेत. घ्अथ अधिकामास माहात्म्य प्रारंभङ१५ ही एक पोथी असून ते. श्री बा. ल.पाठक प्रकाशन, मुंबई संबंधी आहे.

जळगांव येथील जिल्हा परिषद कार्यालया जवळील बळीराम पेठेत स १८८१ पासून सुरू असलेली साप्ताहीक प्रबोधचंद्रीका प्रेस आजही सूरू आहे. घ्साप्ताहीक प्रबोधचंद्रीकाङ१६ हे वर्तमानपत्र स १८८१ पासूनचे असून सुरुवातीस ते गांधीवादी व नंतर स्वा. सावरकरांचा वैचारीक प्रभाव स्विकारलेले असे आहे. संबंधीत फडणवीस कुटुंब संशोधकांना संशोधनकामी तळमळीने सहकार्य करतात. संशोधकांना संशोधनकार्यात हे वर्तमानपत्रे उपलब्ध करून देण्यात ते टाळाटाळ मुळीच करत नाहीत. ते संपूर्ण सहकार्य करतात. हे वर्तमानपत्र मोलाचे ऐतिहासिक साधन आहे.

जळगांव शहरात मानाचे स्थान प्राप्त केलेले घड्याळी टॉवर जवळ घ्सा. राष्ट्रसेवकङ१७ चा छापखाना आहे. येथील स्वतंत्र स्वा.सै. के. गो. लेले यांनी आयुष्याच्या शेवट पर्यंत हे साप्ताहीक चालविले होते. या वर्तमानपत्रात स्वातंत्र्य चळवळ, स्वातंत्र्य सैनिक, स. १८५७ चा उठाव संबंधी मोठी माहिती आलेली आहे.

जळगांव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परीसरात घ्गांधी संशोधन केंद्रङ१८ असून म.गांधीजीह संबधी दुर्मिळ छायाचीत्रे, लिखीते, पत्रे, ग्रंथ संपदा येथे आहे. यासंबंधीत कार्य करणाऱ्यानी हे साहीत्य गुजरात व अन्य ठिकाणांहून आणले आहे.

जळगांव येथे घ्गांधी रिसर्च फाउंडेशनङ१९ या नावाखाली जैन हिल येथे नामांकित संस्था कार्यरत आहे. म. गांधीजी संबंधी मौल्यवान कागदपत्रे, ग्रंथ, वस्तू, हस्तलिखीते, पोथ्या येथे उपलब्ध आहेत. दोन्हीही गांधी केंद्रातील चित्र प्रदर्शन मौल्यवान आहेत. गांधीजींच्या अभ्यासासंबंधीची मोलाची ऐतिहासिक साधने येथे आहेत.

जळगांव जिल्हा परिषदेजवळील घ्शामप्रसाद मुखर्जी उद्यानात वायव्य कोपऱ्यात षटकोनी चौथऱ्यावर चौकोनी स्तंभ उभारला असून त्यावर चारही दिशांनी शिलालेखङ२० आहेत. जळगांवचा स. १९२० मधील कलेक्टर जी. मॉन्टीकेश याने त्याची निर्मीती केलेली दिसून येते. पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुध्दांमध्ये जळगांव जिल्हयातील तालुक्यांमधुन सरकारला जी मदत मिळाली तीची तालुकानिहाय माहिती या स्तंभावरील चारही बाजुंच्या शिलालेखात कोरून ठेवलेली आहे. जागतिक महायुध्दे व जळगांव जिल्हा यासंबंधीच्या अभ्यासकांना व संशोधकांना हे साधन महत्त्वाचे ठरते.

**निष्कर्ष**

इतिहास लेखकान वस्तूसंग्रहालयाचे व ऐतिहासीक साधनांचा मौल्यवान उपयोग होतो. सहल, मनोरंजन, ज्ञान, या बरोबरच मानवा संबंधी विविध प्रकाराच्या घडामोडींची माहिती मिळते. ऐतिहासीक संग्रहालयातील साधने अस्सल व प्रथम दर्जाची असतात. वर्तमानपत्रांतून विविध प्रकारची माहिती तर मिळतेच. परंतु ऐतिहासीक घडामोडी, घटना मनच:क्षू पुढे जिवंत उभ्या राहण्यास मदत होते.

**संदर्भ सूची :**

१. गुजर म. वि., पवार विश्वासराव घराण्याचा इतिहास व ऐतिहासीक कागदसंग्रह, पुणे, १९४६
२. सा. प्रागतिक, व. वा. वाचनालय, जळगांव.
३. सा. लोकमत, व. वा. वाचनालय, जळगांव.
४. सा. जनसेवक, व. वा. वाचनालय, जळगांव.
५. मासिक भावसार, व. वा. वाचनालय, जळगांव.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

६. सा. जनशक्ती, व. वा. वाचनालय, जळगांव.
७. सा. वार्ताविहार, व. वा. वाचनालय, जळगांव.
८. सा. जळगांव समाचार, व. वा. वाचनालय, जळगांव.
९. सा. खानदेश, व. वा. वाचनालय, जळगांव.
१०. सा. नवजागृती, व. वा. वाचनालय, जळगांव.
११. सा. बातमीदार, व. वा. वाचनालय, जळगांव.
१२. सा. राष्ट्रसेवक, व. वा. वाचनालय, जळगांव.
१३. सा. प्रबोधचंद्रिका, व. वा. वाचनालय, जळगांव.
१४. श्री गुरूचरित्र समाप्त पोथी, व. वा. वाचनालय, जळगांव.
१५. अथ अधिकमास महात्म प्रारंभ, व. वा. वाचनालय, जळगांव.
१६. सा. प्रबोधचंद्रिका, प्रबोधचंद्रिका प्रेस, बळीराम पेठ, जळगांव.
१७. सा. राष्ट्रसेवक, गांधी भवन, टॉवर चौक, जळगांव.
१८. गांधी संशोधन केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
१९. गांधी रिसर्च फाऊंडेशन, जैन हिल, जळगांव.
२०. शिलालेख, शामप्रसाद मुखर्जी उद्यान, जिल्हा परिषद चौक, जळगांव.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खान्देशीय काव्यधारेचा परीसस्पर्श : कवयित्री बहिणाबाई चौधरी

**प्रा. विजय डी. झुंजारराव**
कै. अण्णासाहेब पी.एस. वाडीले कला महाविद्यालय,
थाळनेर, ता. शिरपूर, जि. धुळे.

मराठी साहित्यातील काव्य निर्मितीचा उल्लेख खान्देशाबाबत झाल्यावर सर्व प्रथम डोळ्यासमोर प्रतिमा उभी राहते ती खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची. कारण त्यांच्या काव्यनिर्मितीस जेथेही स्पर्श होईल तेथून केवळ खान्देशातील भावजीवनाचा प्रत्येक अनुभव प्रत्ययास येतो एवढा जिव्हाळा, आपलेपणा, वास्तव स्वरूप त्यांच्या हरएक कवितेतून जाणवतो. बहिणाबाई स्वत: शालेय जीवनाची पायरी जरी चढल्या नसल्या तरी माय सरस्वती त्यांच्या मुखात विराजमान असल्याने त्यांनी मानवी जीवनातील प्रत्येक पैलू आपल्या काव्यातून मांडत हरएक क्षणाला मानवाला कोणत्याही काळात उपयोगी ठरेल असाच सांगितला आहे एवढा शब्दभंडार त्यांच्याकडे होता हे वाचकांच्या सहजपणे लक्षात येते.

बहिणाबाईचा जीवनकाळ पाहता तोही दोन दशकांना स्पर्श करणारा असाच आहे. बहिणाबाईंचा जन्म इ.स.१८८० मध्ये जळगाव जिल्ह्यातील आसोदे या गावी प्रगत आणि प्रतिष्ठित अशा उखाजी महाजन व भिमाई या शेतकरी कुटुंबात झाला होता.व जळगावच्याच वतनदार चौधरी घराण्यातील नथ्थूजी चौधरींशी त्यांचा १३ व्या वर्षी विवाह झाला होता.व मृत्यू इ.स. १९५१ मध्ये झाला होता. कविवर्य सोपानदेव चौधरी हे पुत्ररत्न त्यांच्या पोटी जन्मास आले होते. सोपानदेव आपल्या आईच्या आठवणी सांगतांना म्हणतात की,माझ्या आईचा रंग गव्हाळ होता,ती मध्यम बांध्याची व दहा जणींसारखीच दिसायची, पण तिच्या मुखातून ओघळणाऱ्या रसाळ व मधुर वाणीने हजारातूनही उठून दिसणारी होती. जात्यावरील धान्याच्या घरघरीबरोबर तिच्या गळ्यातील सूर संपूर्ण घर निनादून टाकत असे इतका तिचा आवाज गोड होता.

बहिणाबाईंचे शिक्षण म्हणजे घरसंसाराची वहिवाट तसेच निसर्ग व त्यातून जाणारी पायवाट त्यावरून चालतांना सभोवतालचा निसर्ग सौंदर्याचा विविधरंगी अविष्कार,दगड-धोंडे, शेती, तेथे वावणारी माणसे,तवा-चुला या साऱ्यांची अनुभती घेत घेत जीवन जगतांना त्या सुसंस्कृत व परिपक्व स्त्री बनल्या. यातूनच त्यांचे काव्य हे चिंतनात्मक तत्त्वज्ञान बनले. जीवनरूपी संसारात तव्यावर भाकरी टाकतांना चुल्याचे चटके सहन करत एकाएकी जीवनात आलेल्या वैधव्यांच्या कुऱ्हाडीला अंगावर झेलत आपल्या लहानग्या सोपानाला बरोबर घेत गरीबीच्या काळात दुष्काळी कामावरची खडी फोडत वैधव्यांच्या खुणा अंगा खाद्यावर झेलत झेलत त्यांनी जीवनगाणे म्हटले.अक्षरज्ञानाची ओळख नसणाऱ्या बहिणाबाई म्हणतात,

*अरे संसार संसार*
*जसा तवा चुल्ह्यावर*
*आधी हाताले चटके*
*तेव्हा मियते भाकर*

मानवी जीवनात येणाऱ्या सुख-दु:ख रूपी संसाराचे सत्यपूर्ण वास्तव चित्रण करणाऱ्या कवयित्री बहिणाबाई वरील ओव्यतून जीवनविषयक सखोलात्मक चिंतन सांगून जातात.

बहिणाबाई आपल्या काव्यातून दैनंदिन जीवनातील अनेक प्रतिमा प्रतीके योजून तत्त्वज्ञानपर भाष्य करतांना सांगतात-

*देव कुठे देव कुठे*
*भरीसनी जो उरला*
*अरे उरीसनी माझ्या*
*माहेरात सामावला.*

देव हा सर्वत्र व्यापून उरला आहे. म्हणून त्या म्हणतात

*सदा जगाच्या कारनी*
*चंदनापरी घसला*
*अरे सोतामधी त्याले*
*देव दिसला दिसला*

लेक अर्थातच मुलगी आणि तिचे माहेर याबाबत बहिणाबाईंचा शब्दसंग्रह अमाप असाच आहे.सुखाला माहेराची उपमा व अनिवार

ISSN : 2348-7143
Dec. 2018

दु:खाला सासरची उपमा असले शब्दचिंतन त्याच जाणतात. दु:खमय रणरणत्या उन्हात शितल छायेसारखे वाटणारे माहेर साहजिकच सासरच्या खाचखडग्यामध्ये वावरणारी लेक की जिला जीवनव्यवहारांचे पैलू अजाणत्या वयात अवगत होत नाहीत अशा स्थितीत त्याकाळात बालविवाह पध्दतीने आपल्या सासरी नांदावे लागत असे. बालपणी माहेरात लाडात वाढलेली लेक अशा प्रंसगी संभ्रमात पडते. हे जाणून बहिणाबाई योगी आणि सासुरवाशीन – या कवितेत म्हणतात की,

*लेकीच्या माहेरासाठी, माय सासरी नांदते.*

माहेरपणाच्या अनेक आठवणींचा साठा त्यांनी – माहेर – या कवितेतून मांडला आहे –

*माझ्या माहेराच्या वाटे*
*जरी आले पायी फोड*
*पाय चालले चालले*
*अशी माहेराची ओढ*

बहिणाबाईंच्या जीवनाकडे पाहता हे लक्षात येते की, त्या दैववादी नव्हत्या. त्यांचा स्वकर्तृत्वावर विश्वास होता. म्हणूनच आपल्या जगण्याबद्दल त्या म्हणतात,

*जग जग माझ्या जीवा*
*असं जगणं तोलाचं*
*उच्च गगनासारखं*
*धरत्रीच्या रे मोलाचं*

ऐन तारुण्यात साधारणत: वयाच्या ३० च्या आसपास म्हणजे १९१० च्या सुमारास पती नथ्थूजी चौधरींच्या निधनानंतर आलेल्या वैधव्याला त्यांना सामोरे जावे लागले, त्यांच्याकडील पूर्वीची संपन्नता गेली. लहान पोरं पदराखाली घेऊन जीवन जगणं आल.अशा खडतर परिस्थितीत त्या डगमगल्या नाहीत. अशा स्थितीत बहुतावंशी स्त्रीया आपल्या नशिबाला दोष देत हतबल होऊन जातात.पण बहिणाबाईंनी वास्तवाचे भान ओळखून काळाच्या कसोटीला स्विकारले.त्यातच घरादाची वाटणी झाल्यानं आलेल्या दारूण प्रसंगात आपोआपच नैतिक बळ त्यांच्यात आले.

*देव गेले देवाघरी*
*आठे ठेयीसनी ठेवा*
*डोयापुढे दोन लाल*
*लडू नको माझ्या जीवा*

अंतरंग अपार दु:खाने भरलेले असतांनाही धीरोदात्त बहिणाबाई आपल्या लेकरांनां सोबत घेऊन आलेल्या कठीण प्रसंगालाही हसत–खेडत सामोरे जाते.माणसाच जगणं कसं असाव याचा एक आर्दश त्यातून आम्हा अभ्यासकांना मिळतो.

लपे करमाची रेखा – या कवितेत त्या म्हणतात,

*नको नको जोतिषा*
*नको माझा हात पाहू*
*माझे दैव माले कये*
*माझ्या दारी नको येऊ*

स्वत:च्या कर्तृत्वावर ज्याचा भरोसा असतो त्याला कुणाच्याही आधाराची गरज नसते.

*नका नका आया बाया*
*नका करू माझी किव*
*झालं माझं समाधान*
*आता माझा मले जीव*

दु:ख हे सर्वांच्याच नशिबात असतं.त्यासाठी मग काय रडतकुडत बसायचं.रडण काय कामाचं. त्याबद्दल बहिणाई म्हणतात,

*रडू नको माझ्या जीवा*
*तुले रड्याची रे सव*
*रडू हांसव रे जरा*
*त्यानं संसाराची चव*

पृथ्वीतळावर वावरणाऱ्या जीव सृष्टीपैकी मानवाला व त्यात असणाऱ्या मानव्याला शोधणे ही पण एक कसोटीच आहे.त्या बाबत बहिणाबाई म्हणतात,

*अरे मानसा मानसा*
*तुझी नियत बेकार*
*तुझ्याहून बरं*
*गोठ्यातलं जनावर*

माणूस हा स्वत:च्या स्वार्थापायी दिवसेदिवस स्वार्थी,मतलबी आणि लोभी बनत चालला आहे.

*भरला डाडोर*
*भूलीसनी जातो सूद*
*खाईसनी चारा*
*गायम्हैस देते दूध*

पण माणसाची नियत या गुराढोरांपेक्षा निफत्तर दिसून येते.

लोभापायी झाला
मानसाचा रे कानूस

कवयित्री बहिणाबाईंचे काव्य कधीच चार भिंतीआड राहिले नाही. त्यांना कारूण्यारूपी देवतांबद्दल, बहुजन समाजाबद्दल, तसेच पददलितांच्या दयनीय स्थितीबद्दल आत्मीयता असल्याने गोरगरिबांचे दु:खमय जीवनपध्दती बघून त्यांच्या भावनाशील मनाला पाझर फुटे. तत्कालिन परिस्थितीतील दुष्काळी अवस्था, रोगराईने त्रस्त माणसाला पाहून बहिणाबाई म्हणतात,

*देखा महारवाड्यात*
*कशी मानसाची दैना*
*पोटामंधी उठे आग*
*चुल्हा पेटता पेटेना*

लाचारी, गरिबी, उपासमारी, पाठीशी लागलेले दारिद्रय अशा दुष्ट चक्रातून त्या वेळच्या समाज स्थितीचे भान ठेवून पददलितांना जीवन कंठावे लागत असे.त्यांचे जगणे हे सावकार-वतनदार-पाटीलांसारख्या महाजनशाहीत अडकलेले होते.पक्षुपक्षी,गुर-ढोरांपेक्षाही त्यांचे जीवन लाचारीचे होते. समाजातील ही विषमता पाहून त्या म्हणतात,

महारकी महारकी
गावकरी ठेकेदार
गावातल्या पाटलांचे
हुकुमाचे ताबेदार

खान्देशकन्या बहिणाबाई चौधरी कोणत्याही शाळेची पायरी चढल्या नसल्या तरी त्यांच्याकडे सर्जनशिलता व्यापक स्वरुपात असल्याने त्यांनी मानवी जीवनाचे बारकावे टिपता टिपता निसर्गातील हरएक हालचाल मांडतांना निसर्गाच्या सहवासात राहणाऱ्या माणसाच मतलबी मन साकारलेले आहे.

*पाहिसनी रे लोकांचे*
*यवहार खोटे नाटे*
*तव्हा बोरी-बाभयीच्या*
*अंगावर आले काटे*

मराठी साहित्यातील काव्यधारेच्या प्रवाहात आपल्या आंगिक कल्पकतेच्या, सर्जकतेच्या जोरावर खान्देशाचा झेंडा फडकविणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या काव्याकडे पाहता असेच जाणवते की, त्यांनी मानवी जीवनाचा कोणताच पैलू आपल्या काव्यनिर्मितीतून सोडलेला आढळत नाही.म्हणून शेवटी त्याच्या काव्यकर्तृत्वाचा गौरव कसा करावा. हे पण एक मनाला पडलेले कोडे असल्याने येथेच थांबतो.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची :**

१) बहिणाअीची गीणी: एक अभ्यास- प्रा.डा.सौ.प्रमिला भिरूड,व्यंकटेश प्रकाशन,रिंगरोड-जळगाव
२) आधुनिक मराठी वाङ्मयाचा विश्लेषणात्मक इतिहास (१९२०ते१९६०)-डा.फुला बागुल,प्रशांत पब्लिकेशन-जळगाव
३) लोकमत- अक्षररंग ३ आक्टों १९९९
४) खान्देशची काव्यधारा-संपादक मंडळ, प्रशांत पब्लिकेशन-जळगाव

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# भारतीय स्वतंत्रता आंदोलनात खानदेशचा सहभाग

**सुनिता बी. पाटील**
महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित
कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा.

**प्रस्तावना**

सदयास्थितीत जळगाव, धुळे, नंदुरबार, मिळुन संबोधला जात असलेला खानदेश हा भुप्रदेश कधी–कधी विस्तृत प्रदेश होता. असा हा खानदेश उत्तर व दक्षिण भारत या प्रदेशांना जोडणारा दुवा आहे.या प्रदेशास ऋषीकदेश, स्कंददेश, खंडदेश, कान्हदेश, अशा वेगवेगळया नावांनी ओळखले जात होते. मात्र खानदेश हे नाव कसे ? व केंव्हा ? पडले याबाबत अनेक मतभेद आहेत.इस. १४१७ मध्ये फारूखी घराण्यातील दूसरा बादशहा मलिक नासिर याने गुजरातच्या सुलतानकडुन खान ही पदवी घेतल्यामुळे या प्रदेशाला खानदेश हे नाव पडले असल्याची नोंद इ.स. १८८० च्या प्रकाशित खानदेश गॅझेटीअर मध्ये दिसुन येते.

खानदेश या नावाची उत्पत्ती बाबत खानदेशातील जेष्ठ इतिहासकोर डॉ.प्र.न. देशपांडे हे खानदेशातील 'कान' नावाच्या नदीवरून खानदेश तसेच चांदवड, अजिंठा, डोंगर माळयांच्या पायथ्याशी असलेला मैदानी प्रदेश डोंगरापासुन खंडीत झाल्यामुळे खानदेश शब्द रूढ झाल्याची शक्यता वर्तवतात. तर रा.श्री. मोरवंचीकर खंड वा खान शब्दावरून या भुप्रदेशाला 'खानदेश' नाव प्राप्त झाल्याचे मानतात. खानदेशात कृ ष्णाची कान्हा, कन्हैया अशी अनेक नावे आहेत. तसेच खानदेशात पुजली जाणारी दुसरी लोकप्रिय देवता म्हणजे 'कानबाई ' तिला काही भागात कान्हाबाई, कानाबाई म्हटले जात असुन कान्हापासुन कानबाई रुढ झाली. व कानबाईचा देश म्हणजे 'कानदेश' म्हणुन या प्रद्रशाची ओळख सांगितली जाते. असा हा खानदेश वैविध्यपुर्ण अशा इतिहासाने नटलेला असुन खानदेशची संघर्षकहानी विशेष उल्लेखनीय आहे.

**संशोधनाचा उददे्श**

१. खानदेशची प्राचीनता व विविध नावे व खानदेश हे नाव कसे पडले हे स्पष्ठ करणे.
२. खानदेशातील ब्रिटीश सत्तेच्या प्रवेशाचे वर्णन करणे.
३. भारतीय स्वतंत्रता चळवळीतील खानदेशातील विविध घटनांचा आढावा घेणे.
४. भारत स्वातंत्र्यता चळवळीतील खानदेशातील लोकांचा राष्ट्रीय चळवळीतील व लढयातील सहभागाची नोंद घेणे.

**माहिती संकलन :–** प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णात्मक व विश्लेशनात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे. माहिती संकलणासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केलेला असुन त्यात विविध संदर्भ ग्रंथाचा समावेश आहे.

**विषय विवेचन:–**

इ.स. १८१८ मध्ये झालेल्या इंग्रज – मराठा तिस–या युध्दात मराठयांचा पराभव होऊ ण संपुर्ण महाराष्ट्रासह खानदेशावर इंग्रजांचा अमल सुरू झाला. सुरवातीला खानदेशाच्या जनतेला इंग्रजांच्या सुनियोजित राजवटीचे कौतुक वाटत होते. काहिंना तर स्वहिताच्या दृष्टीने इंग्रजांनी भारतात रहावे असे वाटत होते. परंतु लवकरच इंग्रज राजवटीचा पाया स्वार्थी, स्वकेंद्री असल्याने भारतीय विचारवंताच्या लक्षात येवुन या थंड गोळयाला उब देणारे कार्य पाश्चात्य धर्तीवर शिक्षण घेतलेल्या व पारतंत्र्याची खंत वाटणा–या मुठभर सुशिक्षीत पिढीने केले व त्यातुनच इ.स. १८८५ मध्ये मुंबई येथे राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. या सभेच्या माध्यमातुनच एक संघटीत चळवळ निर्माण होवुन जनतेचे प्रबोधन झाले. त्यासाठी अनेक संस्थानी व लहान थोर नेत्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यातच खोनदेश आघाडीवर होता.

**१) खानदेशातील वृत्तपत्रांचे कार्य**

खानदेशच्या प्रबोधनात वृत्तपत्रांनी महत्वाची कामगीरी बजावली. त्यात इ.स. १८६७ मध्ये 'खानदेश वैभव' हे पहिले वृत्तपत्र धुळे येथे साप्ताहिकाच्या स्वरूपात सुरु झाले. तसेच इ.स. १८७८ मध्ये 'जळगाव समाचार' या नावाने वृत्तपत्र जळगाव येथे 'श्रीमत् जगत्गुरू शिळाप्रेम' या नावाचा छापखाना सुरू करून १८८१ पासुन प्रबाेध चंद्रिका हे साप्ताहिक वृत्तपत्र जळगाव येथुन सुरू केले. खानदेशातील वैचारीक जाणीव जागृती निर्माण करणे, सामाजिक अन्याय व दु:ख यांना वाचा फोडण्याचे कार्य या विविध वृत्तपत्रांनी केले.

**२) लोकमान्य टिळक व खानदेशातील राष्ट्रीय चळवळ**

सामान्य लोकांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी उत्सवाचा उपयोग करुन घेतला. त्यासाठी त्यांनी गणेशोत्सव व शिवजयंती या उत्सवाची सुरूवात केली. गणपती उत्सवातील गणेश मेळे भुसावळ, जळगाव व अमळनेर येथे कार्यरत असुन गणेश उत्सवाने खानदेशात वैचारीक व राष्ट्रीय जागृती निर्माण केली. मुंबई इलाखाच्या गोपनिय वृत्तांतत इ.स. १८९५ साली धुळे येथील

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

गणपती उत्सवाची नोंद आढळते. रणछोड पुरूषोत्तम यांनी धुळयात प्रथम मेळा सुरू करूण गणपतीची पदे गायली. टिळकांनी सुरू केलेल्या शिवजयंतीचे लोन खानदेशात पसरून २१ एप्रिल १९९८ रोजी धुळे येथे शिवजयंती साजरा होवुन संगप्पाच्या वखारीत मंडप उभारून छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीची स्थापना करण्यात आली. गोपाळ रावजी गोगाटे यांनी विदयार्थ्यासमोर शिवकथन केले. १९०१ मध्ये पारोळा, यावल, रावेर येथे शिवजयंती साजरी झाली. उत्सव म्हटला म्हणजे लोक जमणारच त्यांच्या उपस्थितीचा फायदा घेवुन त्यांच्या मनावर राष्ट्रीयत्वाचे संस्कार बिंबविण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन झाले.

खानदेशात लोकामान्य टिळकांच्या चतु:सुत्रीचाही मोठया प्रमाणात पुरस्कार केला गेला. २२ ऑगस्ट १८९६ रोजी चोपडयाला पुरुषोत्तम वासुदेव वकील यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊ न देशी कापड वापरण्याचे आवाहन करण्यात आले. जळगाव जिल्हयात भय्याराव कळकरांनी राष्ट्रीय शाळा सुरू करून क्रांतीकारकांना प्रशिक्षण देणारी 'दामोदर गुरू' व्यायामशाळा सुरू करण्यात आली. १९०८ मध्ये सरकारी अधिकारांच्या निशेध संप व हरताळ घडून आले. टिळकांच्या होमरूल चळवळीला प्रतिसाद म्हणुन टिळकांचे निष्ठावंत धुळयाचे शंकर श्रीकृष्ण देव यांनी धुळे व जळगाव येथे होमरूल संघटना उभारली. भुसावळचे आप्पासाहेब दस्ताने यांनी होमरूल चळवळीत पुढाकार घेऊ न शेकडो सभासद नोंदवले.

**३) महात्मा गांधी व खानदेशातील स्वातंत्र्य चळवळ**

जालीयनवाला बाग हत्याकांड, खिलाफत बाबतचा हत्याकांड यांचे निमित्त करून महात्मा गांधीनी असहकार आंदोलन सुरू केले. या आंनदोलनाला खानदेशचा चांगला प्रतिसाद मिळून शंकरराव देवे, न.वि.गाडगिळ, काकासाहेब कालेकर, शिवराम महादेव परांजपे, डॉ.डी.डी. साठे, वीर वामनराव जोशी, आण्णासाहेब दास्ताने यांनी गांधीच्या असहयोग आंदोलनाला पाठींबा दिला. महाराष्ट्रात गांधीचे नेतृत्व प्रस्थापित व्हावे म्हणुन शंकराव देवांनी मोठा दौरा काढला. राष्ट्रीय शाळा स्थापन करण्याच्या कॉंग्रेसच्या धोरणानुसार जळगावजवळ पिंप्राळे, भुसावळ व अमळनेर येथे राष्ट्रीय शाळा सुरू करण्यात आल्या.

गांधीच्या सविनय कायदेभंग चळवळीत खानदेशातील युवक व शाळकेरी मुलांनी सहभाग घेतला भादलीचे सुभामनराव पाटील, चहार्डीचे माधव झिपरू सोनार, चोपडयाचे परमानंद मयुर व बाबु कोठारी यांची वानर सेना सर्व प्रकारची कामे करत होती. जनसामान्यात आंदोलनासाठी प्रवृत्त करण्याचा उदेद्शाने अनेक प्रभात फे-या वा मिरवणुकींचे आयोजन केले गेले. जळगाव, भुसावळ, जामनेर, पाचोरा, चाळीसगाव येथे मोठया सभा वारंवार होत. साने गुरूजींनी विविध ठिकाणी सभा घेतल्या. खानदेशातील अनेक स्वातंत्र्य सैनिकावर खटले भरून त्यांना शिक्षा करण्यात आल्या. खानदेशातील 'छोडो भारत' आंदोलनात उत्स्फुर्त हरताळ, निशेध, शाळावरील बहिष्कार, चावढया व सरकारी कार्यालयावर तिरंगा ध्वज फडकावणे अशा लढयास प्रारंभ झाला. सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना अटक झाल्यामुळे आंदोलनात तिव्रता आली. सानेगुरुजींच्या आदेशानुसार डांगरीचे क्रांतीकारक उत्तमराव पाटील व त्यांची पत्नी लिलाताई पाटील यांनी साने गुरूजींचा संदेश वाचुन दाखवल्यामुळे त्यांना ब्रिटिशांच्या रोष पत्कारावा लागला.पोलिसांच्या गोळीबारात अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मे झाले, तर काहि गंभीर जखमी झाले.

गांधीचे मानसपुत्र महादेवभाई देसाई यांचे आगाखान महल कारागृहात संशायस्पद निधन झाले. या घटनेचे पडसाद खानदेशात उमटुन एरंडोल तालुक्यातील आडगाव येथील महादेवभाईंना श्रदधांजली अर्पन करण्यासाठी आडगावाच्या २००० नागरीकांनी भगवान भुसारी यांच्या नेतृत्वाखाली जंगल सत्यागृह केला. शांततापुर्वक सत्याग्रह करून परत येत असलेल्या लोकांवर चावडीत लपुन बसलेल्या पोलीसांनी गोळीबार केला. त्यात भगवान भुसारी, शामराव पाटील व त्र्यंबक वाणी मरण पावले.

खानदेशात क्रांतीकारी चळवळींनी स्वातंत्र्य आंदोलनात मोठा सहभाग घेतला. यात प्रामुख्याने धुळयाचे आप्पासाहेब व भाईसाहेब रणदिवे यांनी मोठी कागगीरी केली. धुळयात व्यायामशाळा सुरू करून त्यांना राष्ट्रीय कार्यात ओढण्याचे, त्यांच्यात देशभक्तीचे व क्रांतीकार्याचे विचार रूजविण्याचा प्रयत्न रणदिवे बंधुनी केला. साता-याच्या क्रांतीकारकांकडुन खानदेशातील क्रांतीकारकांनी शस्त्रास्त्रे मिळवली व साक्रिच्या खजिन्यावरील हल्याची तयारी केली. धुळयाहुन नंदुबारला पाठवायचा खजिना चिमठाणे गावाजवळ लुटण्याची योजना बनवली. लुटीतील काहि रक्कम सेंट्रल डायरेक्टरकडे तर बाकीची सातारा व पश्चिम खानदेशातील क्रांतीकार्यासाठी वापरण्यात आली.

**सारांश**

ब्रिटीशांचे भारतात राज्य स्थिरावल्यांवर भारतीय जनतेने हळुहळु बंड पुकारले. भारतीयांच्या मनात स्वातत्र्यांची ज्योत प्रज्वलीत झाली. भारतीयांनी स्वातंत्र्य कसे मिळविले? यात कोणत्या राज्याचा कीती व कसा सहभाग होतो. ते मिळवण्यासाठी भारतीयांना कसे-कसे मार्गक्रमण करावे लागेल व राष्ट्राच्या स्वातंत्र्य आंदोलनात खानदेश कसा-कसा समरस होत गेला हे पाहणे सयुक्तीक ठरेल.

खानदेशातील सहयाद्री व सातपुडयातील राहणारे आदिवासी जात स्वातंत्र्यप्रिय असुन त्यांनी ब्रिटीशांविरूदध बंड पुकारले, त्याच बरोबर शेतक-यांनी उठाव केले. इ.स. १८२४ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला यावेळीही सरकारने सक्तीने सारावसुली केली. खानदेशातील लोकांच्या मनात राष्ट्रीय भावना प्रबळ करण्यास अनेक वृत्तपत्रांनी मोलाची कामगीरी केली. गणेशोत्सव व शिवजयंती माध्यमातुनही या स्वातंत्र्य चळवळीस खानदेशात व्यापक स्वरूप प्राप्त झाले. खानदेशावर लोकमान्य टिळकांच्या व महात्मा गांधीचा प्रभावही कारणीभुत ठरला.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

स्वदेशाचा पुरस्कार, परकीय मालांची होळी, राष्ट्रीय शाळा, होमरुल चळवळ, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, छोडो भारत अशा विविध चळवळींच्या माध्यमातुन खानदेशातील क्रांतीकारी चळवळी उभ्या राहिल्या. चिमठाणा लुटीतुन खानदेशाने स्वातंत्र्य चळवळीला मोलाचे योगदान दिले. खानदेशातील विविध चळवळीच्या माध्यमातुन राष्ट्रवाद व राष्ट्रप्रेमाचा संदेश भारतीयांच्या मनामनात पोहचण्यात खानदेशचे योगदान अतुलनिय ठरेल.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.चौधरी कि.का (१९५४) महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझॅटीअर जळगाव जिल्हा.
२) डॉ.पाटील मधुकर वि (२००७) कंपनी सरकार कॉलिन खानदेश, नंदुरबार, शिवम प्रकाशन
३) डॉ.खोबरेकर वि.गो (१९९४) महाराष्ट्रतील स्वातंत्र्य लढे, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
४) भोगे दादासाहेब रामभाऊ (१९८८) जळगाव जिल्हयातील स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासाचे सिहांलोकन
५) सौ.भालेराव इंदू, (१९७३) स्वातंत्र्य लढयाच्या जळगाव जिल्हयातील समर कथा.

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# पेशवाईचा अस्त व खानदेशातील उध्वस्त आर्थिक जीवन

**प्रा.डॉ. आर.एम. साळुंके**
इतिहास विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय, नंदुरबार.

मराठयांची सत्ता खानदेशात प्रस्थापित झाली तेव्हा खानदेश हा सुपीक व अन्नधान्याच्या दृष्टीने समृध्द असा प्रदेश होता. परंतु पेशवेकाळाच्या अस्ताच्या वेळी युध्दजन्य परिस्थिती व दंग्या धोक्यांमुळे जनजीवन विस्कळीत झालेले होते. याच काळात ब्रिटीश सत्तेच्या खानदेशातील हस्तक्षेपामुळे याभागातील मानवी जीवन युध्दजन्य परिस्थिती व दंग्यामुळे अस्थिर झालेले होते. खानदेशातील नंदुरबार उपविभाग तर पेशवाईच्या अस्तापर्यंत बऱ्याचदा उध्वस्त झाला होता.१ अशा युध्दजन्य स्थितीमुळे सावकारांनी शेतकऱ्यांना कर्ज देणे बंद केले. व्यापारी वर्गाने व्यापार बंद केला. त्यामुळे भरमसाठ महागाई वाढली.२ महागाई वाढल्यामुळे मानवी जीवन विस्कळीत झाले व निराधार बनले. त्यामुळे पेशवाईच्या शेवटच्या कालखंडात खानदेशातील आर्थिक जीवन उध्वस्त झाले होते.

सन १७९५ मध्ये पेशव्यांनी खानदेशची व्यवस्था लावतांना माळव्यालगतच्या खानदेशचा भाग होळकरांकडे सोपविला होता. पश्चिमेकडील अक्राणीमहल, तळोदे, नवापूर वगैरे प्रदेश स्वत:च्या देखरेखीखाली सोपविला होता.३ तुकोजी होळकरांच्या काळात खानदेशवर होळकरांचे वर्चस्व होते. मात्र नंतरच्या काळात मराठा सरदारांच्या आपआपसातील दुहीमुळे खानदेशात राजकीय अनागोंदी माजली होती. तुकोजी होळकरांच्या मृत्यूनंतर खानदेशच्या सत्तेची सुत्रे काशीराव होळकरांकडे आली आणि त्यामुळे मल्हारराव होळकरांनी बंडखोरी केली. त्याला नाना फडणीसांनी मदत केली होती. मल्हारराव होळकरांनी स्वत:चे सात–आठ हजार सैन्य तयार केले होते. हे सैन्य खानदेशात विविध ठिकाणी दंगे माजवून लुटमार करू लागले. तसेच जबरदस्तीने खंडणी वसूल करू लागले होते. यावेळी नंदुरबार, सुलतानपूर भागाचे अक्षरश: धुळदाण झाल्याचे दिसून येते.४ याकाळात शिंदे होळकरांच्या वैरभावाला एक वेगळीच धार चढली होती. यशवंतराव होळकरांनी सुलतानपूर, नंदुरबार परगण्यातील कुकुरमुंडा येथील झुंझार नाईकांच्या मदतीने लुट केली. या लुटीत प्रकाशा वगैरे गावे लुटली गेली होती.५ मल्हाररावांच्या मृत्यूनंतर शामखान पठाण याने दोन वर्षापर्यंत रनाळा गावात सतत लुट करून ते पुर्णत: उध्वस्त केले.६

यशवंतराव होळकर आपल्या वडील विठोजी होळकर यांचा मृत्यूचा बदला घेण्यासाठी पेशवा दुसरा बाजीरावाच्या विरूध्द दक्षिणेत आला.७ सन १८०२ पुण्यावर स्वारी करण्यासाठी जात असतांना तो खनदेशातून आपल्या फौजेसह गेला. खानदेशात जून ते ऑगष्ट १८०२ या तीन महिन्यापर्यंत होळकरांच्या फौजेचा मुक्काम खानदेशात होता. या फौजेने खानदेशात मोठ्या प्रमाणात लुटमार करून हानी पोहचवली होती. खानदेशातील एरंडोल परगण्यात केवळ लुटपाट नव्हेतर एरंडोल जाळून भस्मसात केला. त्यामुळे खानदेशच्या होळकरांच्या किंवा पेशव्यांच्या काळातील आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास याकाळात खानदेशचे झालेले आर्थिक नुकसान पुढील पन्नास वर्षात देखील भरून न निघणारे होते असे आपणास दिसून येते.८

यशवंतराव होळकर पुण्याहून उत्तर भारतात परत जात असतांना सन १८०३–०४ च्या सुमारास खानदेशात पुन्हा धुमाकूळ घातला होता. १८०३ मध्ये हरणाथसिंग याने मालपूर दोंडाईचा याभागात मागेल तशी खंडणी वसूल केली होती. जीवलाल सिंगाने शिंदखेडा, निमगुळ व चिलाणे या भागात उभे पिक उध्वस्त केले. त्यामुळे या भागातील जनतेच्या उपजिविकेचा मोठा प्रश्न उभा राहिला. त्यामुळे लोकांनी स्थलांतर केले होते. त्यामुळे या भागातील गावेच्या गावे ओस पडली होती.९ सन १८०३ जनरल वेलस्ली खानदेशातून जात असतांना त्यास अन्नधान्य व अन्य सामुग्रीची टंचाई जाणवली होती. या संदर्भात वेलस्ली लिहितो की, 'होळकरांनी अत्यंत पध्दतशीरपणे केलेल्या लुटीमुळे संपूर्ण मुलूख पुर्णत: उजाड झाला आहे. गावकरी आपली गुरेढोरे घेऊन पळून गेले आहेत. शेती ओस पडली आहे. मिरज सोडल्यापासून आतापर्यंत एक छोटे गाव वगळता मला माणूस म्हणून दिसला नाही.'१० यावरून होळकर शिंदे यांच्या आपआपसातील दुहीमुळे खानदेशचे किती नुकसान झाले होते हे आपणास लक्षात येते.

सन १८१७ च्या सुमारास पेंढाऱ्यांनीही खानदेशात लुटालूट करून गावेच्या गावे उध्वस्त केल्याचे पुरावे मिळतात. सन १८१७ मध्ये वालखेडे नावाचे शिंदखेडा तालुक्यातील गाव पेंढाऱ्यांनी लुटून उध्वस्त केले होते. या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी आजूबाजूच्या गावांनी मदत केली होती.११ सन १८१८ पासून इंग्रजांची खानदेशात सत्ता सुरू झाल्यावर सातपुडा, अजिंठापाडा, दऱ्याखोऱ्या, सातमाळा या भागातील भिल्ल व आदिवासींनी लुटालूट, गुरे पळवून नेणे, शेतातील उभे पिक कापून नेणे, सक्तीने पैसे वसूल करणे, घाट रस्त्यांवर व्यापारी व प्रवाशांना लुटणे व गावे जाळून भस्म करणे यासारखे उपद्रव केले.१२ त्यामुळे खानदेशातील समाजजीवन पुर्णत: मोडकळीस आल्याचे दिसते. नोव्हेंबर १८१८ मध्ये खानदेशातील वाघदा गावावर हल्ला करून ते लुटले.१३ धरणगाव जवळील अनोरे गावावर भिल्लांनी हल्ला करून लुटमार व जाळपोळ करून गुरेढोरे पळवून नेली. या संदर्भात कॅप्टन ह्युनेस याने खानदेशच्या जिल्हाधिकाऱ्याला पाठविलेल्या पत्रातून माहिती मिळते.१४

याच काळात थाळनेर परिसरही भिल्लांनी लुटून अक्षरश: बेचिराख केला होता. सुलतानपूर व नंदुरबार भागातही अविचित नाईक व सुभान्या नाईक यांनी लुटमार करून हाहाकार माजविला होता. या भागातील जनतेत दहशतीचे वातावरण पसरल्याने सर्व व्यवहार ठप्प झाले होते.१५ पेशवाईच्या शेवटच्या कालखंडात खानदेशातील आर्थिक परिस्थितीवर खुपच मोठा परिणाम झाला. याकाळात खानदेशात निर्माण झालेल्या अस्थिर वातावरणामुळे, दंगा धोक्यामुळे खानदेशातील जनजीवन विस्कळीत होऊन पुर्णपणे उध्वस्त झाले होते. अशा भितीच्या वातावरणामुळे, सावकारांनी शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना कर्ज देणे बंद केले होते. व्यापारी वर्गाने व्यापार करणे बंद केले होते. त्यामुळे या प्रदेशातील मानवी जीवन मोडकळीस आले. त्यांना उपजिविका भागविण्यासाठी रोजगाराची गरज होती. त्यामुळे अनेक गावातून खानदेशातील लोकांनी स्थलांतर केलेले दिसून येते.

पेशवाईत खानदेशात सतत चालत असणाऱ्या लुटालूट, जाळपोळ, दंग्याधोप्यांमुळे होळकरांच्या काळातील मराठी साम्राज्य आर्थिक व सामाजिकदृट्या उध्वस्तच झालेले होते. याचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास होळकरांच्या मोहिमेबद्दल इंग्रजी कागदपत्रातूनही माहिति मिळते. पिस्स क्लरेन्स या समकालीन युरापीयन प्रवाशाने म्हटले आहे की, 'होळकरांच्या निर्घृण मोहिम म्हणजे माळवा, खानदेश व महाराष्ट्राचे देश, जिल्हे या संपूर्ण क्षेत्रात झालेली लुटालूट व विनाश यांची कहाणी आहे. त्यांना माणसेच काय तर परमेश्वरबद्दलही तिळमात्र आदर किंवा भिती नव्हती.'१६ यावरून खानदेशातील होळकरांच्या अत्याचाराची कल्पना लक्षात येते.

सन १८१८ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटीश सत्ता प्रस्थापित झाली. खानदेशात याकाळात हजारो लोक बेकार झाले, प्रचंड महागाई वाढली. या लोकांचे जीवन त्याकाळी मुख्यत: सैन्यातील बारगीर व शेतीवर आवलंबून होते. कुटुंबातील निम्मे लोक शेतीच्या उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह भागवत असून इंग्रजांचा अंमल खानदेशवर प्रस्थापित झाल्यानंतर बारगिर बंद पडून सर्व रयतेला आपला उदरनिर्वाह भागविण्यासाठी शेतीवरच अवलंबून रहावे लागे. परंतु पेशवेकाळात खानदेशातील शेतीचे, गावातील साधनसामुग्रीचे मानव, गुरेढोरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने पेशवेकालीन खानदेशची आर्थिक स्थिती याकाळात प्रचंड खालावलेली होती व त्यातच खानदेशची सत्ता ब्रिटीशांच्या ताब्यात गेली होती. खानदेशात झालेल्या सत्तांतरामुळे ब्रिटीश काळात कामगारांच्या व मजूरांच्या वेतनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. तशी वाढ शेतमजूरांच्या मजूरीतही झालेली दिसून येते. सन १८१८ नंतरच्या काळात ब्रिटीशांनी धन्यावर कर बसविला होता. हा कर अन्यायकारक होता असे खुद्द खानदेशचा पॉलिटिकल एंजट कॅप्टन ब्रिग्ज यानेही हेच मत व्यक्त केलेले आढळून येते.१७ एकंदरीत याकाळात खानदेशातील आर्थिक जीवन पुर्णत: उध्वस्त झाल्याचे आपणास दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१) संशोधक, त्रैमासिक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे वर्षे ४८ वे, अंक २, जून १९८०, पृ.१९
२) सरदेसाई गो.स. – पेशवेदप्तर भाग ४१, लेखांक १५७
३) ठाकूर वा.वा. – होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, पृ.४७
४) तत्रैव.
५) संशोधक, त्रैमासिक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे वर्षे ४८ वे,अंक ४, डिसेंबर १९८०, पृ.१६
६) तत्रैव.
७) सरदेसाई गो.स. – मराठी रियासत, खंड – ८, पृ. १९५
८) खरे य.वा. – ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग १४, पृ.७४०९
९) संशोधक, त्रैमासिक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे वर्षे ४८ वे,अंक ४, डिसेंबर १९८०, पृ.१६
१०) वैद्य सुमन – अखेरचा पेशवा, पृ.७६
११) निबंध संग्रह भाग – २, खानदेश इतिहास परिषद, १९९५–९६, पृ.१४०
१२) पेशवा खानदेश, रूमाल १९७
१३) डेक्कन कमिशनर्स फाईल, खानदेश रजिस्टर, भाग १७४, पत्र ३१३
१४) तत्रैव. पत्र ३४७
१५) पेशवा खानदेश, रूमाल ११६९
१६) डेक्कन कमिशनर्स फाईल, खानदेश रजिस्टर, भाग १७४, पत्र ३४७
१७) तत्रैव. पत्र ३२१

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

# खानदेशातील बेलदार समाज

**डॉ. विवेकानंद लक्ष्मण चव्हाण**
इतिहास विभाग, एस.पी.डी.एम. महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे.

भारत हा एक खंडप्राय देश आहे. या देशात अनेक जाती-जमाती , पंथ व धर्माचे लोक अनेक वर्षापासून वास्तव्य करून राहतात. भारतीय समाज साधारणत: सहा हजार जाती व उपजातींचा मिळून बनलेला आहे. प्रत्ये जाती-धर्माची खास वैशिष्टयपूर्ण व स्वंतत्र ओळख आणि आस्तित्व आहे. प्रत्येकाची विलग अशी प्रथा, परंपरा, रूढी, रीतिरिवाज, खानपान, देवदेवता, विवाह संस्कार आणि बोलीभाषाही आहे. या देशातील प्रत्येक जात इतर जातीपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असा वृथा अभिमान बाळगतांना दिसते. भारतातल्या या हजारो जातीपातींमध्ये रोटी व्यवहार रूढ आहे. मात्र बेटी व्यवहार वर्ज्य मानला जातो.

भारतात कित्येक वर्षांपासून विशिष्ट समुदायाने स्वत:चे आस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी बंदिस्त वर्णव्यवस्था निर्माण केली. तिला चार्तुवर्ण्य व्यवस्था असे म्हटले जाते. प्रत्येक वर्णाला त्यांची कामे ठरवून दिली होती. ठरलेल्या चौकटीतच समाजातील लोकांना राहावे लागत होते.१ भारतीय जातीव्यवस्थे संदर्भात डॉ.जी.एस. धुर्ये म्हणतात की, भारतीय समाजातील जाती व वर्णव्यवस्था ही एक वैशिष्टयपूर्ण सामाजिक व्यवस्था होय जगातील अन्य कोणत्याच राष्ट्रात अशी समाजव्यवस्था आस्तित्वात नाही.२

कोणत्याही समाजाचा सर्वांगीण अभ्यास करतांना त्या समाजातील घटक असलेल्या लहान मोठया समुदायांचा, समुह-उपसमुहांचा आणि त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

भारतातील अनेक भटक्या विमुक्त जमाती आजही भटकंती अवस्थेत जीवन जगत आहेत. भारतात भटक्या-विमुक्त जमातींची संख्या १९८ असून महाराष्ट्रात ती ४२ आहे. आज हा समाज स्थिर होत असला तरी शहरांबाहेर, गांवाबाहेर कुठेतरी गलिच्छ ठिकाणी पाल ठोकून तो भटकंती करत जिवन जगतांना दिसून येतात.६ आज इथे तर उद्या तिथे असे भाकरीच्या शोधात या जाती-जमातींना फिरावे लागते. त्यांच्या अलिकडे काही प्रमाणात स्थिर वस्त्या होऊ लागल्या आहेत. पण त्यांच्या जीवनातील दु:ख, द्रारिद्र व अवमान संपलेला नाही.

अशा भटक्यांचे जीवन जगणाऱ्या बेलदार जमातींचे संशोधनात्मक अभ्यास कण्यासाठी प्रस्तुतच विषय संशोधकाने निवडलेला आहे.

खानदेशातील धुळे, जळगांव व नंदूरबार जिल्ह्यात बेलदार या भटक्या विमुक्त जमातीचे लोक राहतात. मानवाला घर बांधून देणारी, स्थिर जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणाऱ्या गुणवान जमाती पैकी बेलदार ही एक जमात आहे. घर बांधण्याचे कौशल्य असलेली ही जमात वेगवेगळया प्रांतात वेगवेगळया नावाने आपल्या पांरपरिक व्यवसायावरून ओळखली जाते. या जमातीचा प्राचीन काळातील व्यवसाय म्हशीच्या किंवा हेल्याच्या पाठीवर पखाल ठेवून पाणी आणणे आणि गावातील पांढऱ्या मातीचा चिखल करून त्या चिखलात मजबूती येण्यासाठी वेल झाडाच्या पाल्याचे मिश्रण किंवा वाळलेले गवत मिसळून भिंती बांधणे हा होता. भिंत बांधणारे किंवा घरे बांधणारे ते बेलदार असे नामकरण झाले असावे. खानदेशात नुनिया बेलदार आकेड बेलदार , तेलगु बेलदार, सिलवार बेलदार, परदेशी बेलदार, कुमावत बेलदार, इत्यादी बेलदार जमातीचे प्रकार दिसून येतात.

बेलदार या शब्दाचा अर्थ बेल म्हणजे, फावडे, कुदळ किंवा टिकास असा असून ती खांदयावर घेऊन जाणारे ते बेलदार असा होतो. बेलदार हे मुळचे राजस्थानातील राजपूत समाजपैकी असून अनेक लढायांमध्ये मुलसमानांकडून पराभूत झाल्यानंतर वेगवेगळे नाव धारण करून भटकंती करीत राहीले.३ उदरनिर्वाह करण्यासाठी माती खणणे, विहीर खोदणे, दगड काम करणे, विटा वाहून नेणे, बांधकामाकरीता लागणारी कामे करणे, तसेच हातमागाच्या फण्या व शिंगाच्या चौकटी तयार करणे. इत्यादी कामे करू लागला पूर्वी जात, उखळ, पाटे-वरवंटे व चौरंग इत्यादी वस्तु विकत असत. स्त्री-पुरूष दोघेही जात्या तयार करित असे. कामधंदा नसतो तेव्हा गाढवावर सामान लादून ते काम शोधण्यासाठी गावोगाव भटकंती करीत असतात.४

१. **कुटूंबपध्दती :-** बेलदार जातीत पितृसत्ताक कुटूंब पध्दती आढळून येते. वयाने ज्येष्ठ व्यक्ति कुंटूंबप्रमुख असतो. एकत्र कुटूंब पध्दती असल्यामुळे या जातीचे लोक समुहाने वस्ती करून राहतात.

२. **कुळ :-** बेलदार जातीत ३२ कुळ आहेत इंजोरे, कुणबीथोप, घटे, घाटे, बघे, बगंळे, बिलेवार, जमेवार, धगेवार, वघेवार, पांडेववार, तलेववार, मुछवार, इंदुरे, हनवते, मेहंगे, गवरे, बजर, कटवने, सिकुटे, सुलताने, मांजरे, मुंडाले, मुंढे, सरीसे, रामचवरे, चौक, इटिवाले, गोरकर, जांभुळकर व जंबधरे ही कुळ बेलदार जमातीत आढळतात.

३. **संस्कृती :-** बेलदार जमातीची संस्कृती हिंदू संस्कृतीपैकीचे असून इतर जमातीपेक्षा वेगळी व स्वतंत्र असल्याचे दिसून येते. या समाजात ज्ञान, कला, श्रध्दा , नितितत्वे, कायदे , परंपरा आणि चालिरीतीतून हा समाज सुसंस्कृत असल्याचे दिसून येते.५

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

४. **देवी देवता :–** बेलदार जमातीचे लोक हिंदू धर्मातील देवी देवतांची पुजा अर्चा करतात. श्रीकृष्ण, सीतामाता, किसनजी या देवांची विशेष्ज्ञ पुजा करतात. कुळदेवतेचा सण चैत्र महिन्यात किंवा नवरात्रात साजरा करतात. आपल्या कुलाच्या देवतेची पुजा करण्यासाठी ते पंडित किंवा पुरोहिताला बोलावित नाही तर स्वत:च पुजेचा विधी पार पाडतात.

५. **वेशभुषा :–** बेलदार जातीची प्राचीन वेशभूषा नेमाडी होती. पुरूष धोतर, पगडी, बंडी आणि हातात चांदिचे कडे, कमरेला कमरपट्टा आणि डोळयावर केस वाढविण्याची आवड असलेला उंचपुरा असे तर स्त्रिया लेहंगा, फटकी, गळयात काळया पोत आणि वेगवेगळे दागिने असलेल्या होत्या. स्त्रिया अंगावर, हातावर, गालावर, कपाळावर गोंदवून घेत असत. बेलदार जातीचे लोक स्थिर झाल्यामुळे त्यांच्या वेशभूषेत फरक दिसून येतो.

महिला राजपूत समाजातील महिलांसारखे पेहराव करताना दिसून येतात. मारवाड आणि राजपूत समाजाच्या महिलांचे पदर उलटे असतात तसेच बेलदार समाजातील महिलांचा पदर उलटा आहे.

६. **भाषा :–** बेलदार जमातीची बोलीभाषा स्वतंत्र आहे. तिला मुनीफ किंवा बेलदारी भाषा म्हणतात. त्या भाषेत मारवाडी, गुजराती शब्द असतात. महाराष्ट्रीयन समाजात मराठी व ऐरणी मिश्रीत भाषा बोलतात. या बोलीचा ढंग हिंदी मिश्रीत वाटत असून ती अशुध्द हिंदी असते. धुळे, जळगाव व नंदुरबार भागात मारवाड भाषा बोलतात. बहुतेक बेलदार समाजातील लोक नोकरी व व्यवसायानिमित्त इतर जातीच्या संपर्कात आल्याने त्या ज्ञत्या प्रदेशातील बोली भाषेचा स्विकार केला आहे. परिणामी नवीन पिढीला त्यांची स्वत:ची भाषा बोलता येत नाही.६

७. **विवाह प्रथा :–** बेलदार जमातीत पोटजाती नाहीत, लग्न जुळवताना कुळ पाहिले जाते. नाना–नानी गोत्र, काका–काकी कुळ, आजा–आजी गोत्रात लग्न होत नाहीत. पूर्वी मुलीच्या वडिलांना म्हणजे वधुस दहेज देण्याची पध्दत होती. त्यास कुलदार (हुंडा) म्हटले जात आहे. पूर्वी लग्न चांदणे पाहून होत असत. पुरोहित किंवा ब्राम्हणास लग्न लावण्यासाठी न बोलविता समाजातील माणूसच लग्न लावतो. लग्नानंतर बोकडे मेजवानी दिली जात असे. या समाजात पुनर्विवाह प्रथा व घटस्फोटाची प्रथात होती.७

८. **आहार :–** बेलदार जमात ही सुरूवातीच्या काळात मांसाहारी होती. पण आज मात्र ही जमात मिश्रहारी बनली आहे. या जमातीत आज मांसाहारा सोबतच दारूचे व्यसनही फार मोठया प्रमाणात जडलेले आहे. घरी आलेल्या पाहुण्यांना दारू आणि मटनाचा पाहुणचार दिला नाही तर तो पाहुण्याचा अपमान झाला असे मानतात.

९. **जात पंचायत :–** बेलदार जमातीत पूर्वीपासून जात पंचायत होती. या समाजातील जातीपंचायतीच्या प्रमुखाला दास म्हणण्याची पध्दत होती. आपल्या जातीतील वाद,भांडणे, कलह, तक्रार किंवा कौटूंबिक वाद झाला असेल तर त्यांचा न्यायनिवाडा जाती व गोत्रातील प्रमुख माणसे एकत्र बसून करतात. जातीपंचायतीचा निर्णय सर्वांना मान्य करावा लागतो. आज जातीपंचायतीचे महत्व कमी झालेले दिसून येते.८

१०. **व्यवसाय :–** हा समाज कष्टकरी असून मुळचा राजस्थानी आहे. कामधंद्यासाठी भटकंती करीत महाराष्ट्रात आलेला आहे. या जमातीचा प्राचीन व्यवसाय म्हशीच्या किंवा हेल्याच्या पाठीवर पखाल ठेवून पाणी आणणे. गाढवाच्या पाठीवर माती वाहणे. माती खणणे, विहीर खोदणे, दगड काम करणे, विटा वाहून नेणे, बांधकामाकरीता लागणारी कामे करणे तसेच जात, उखळ, पाटे–वरवंटे व चौरंग इत्यादी वस्तु विकत असत. बायका व पुरूष दोघेही जात्यांना टाक्यांना टाके लावण्याचे काम करित असे. महिला फण्या व शिंगाच्या चौकटी तयार करून विकत असे. अलिकडे हा समाज स्थीर झाला असून शिकलेले तरूण नौकरी करताना दिसून येते. तसेच काही लोक भटकंती सोडून स्थिर शेती व्यवसाय करतांना दिसतात.

***प्रसुतीप्रथा –** बाळंतिण झालेली महिला पाचव्या दिवशी षष्टी देवीची पुजा करतात. त्यावेळी घरातला वयोवृध्द पुरूष बाळंतिणीसमोर बोकड कापतो. बाळंतिणीला जननशौच (विटाळ) सव्वा महिना पाळला जातो.मुलीचे नवव्या व मुलाचे बाराव्या दिवशी नाव ठेवतात.

११. **महिलांची स्थिती :–** बेलदार समाजातील महिलांचे जीवन अतिशय कष्टमय आहे. या समाजात बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे. पूर्वी भटकंती करणारा हा समाज आता स्थिर झाल्याने विवाहित स्त्रीया आपल्या पतीबरोबर मिळेल ते कष्टाचे काम करतांना दिसून येते. स्त्री शिक्षणाचे प्रमाण कमी असून नोकरदार स्त्रियांची संख्या अगदी नगन्य आहे. बेलदार समाजातील स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा व पूनर्विवाह करण्याचा अधिकार आहे.९

१२. **अंधश्रद्धा :–** बेलदार समाज हा अंधश्रद्धाळू असून रानावनातून फिरत असल्यामुळे भूतपिशाच्च , जादुटोणा, गंडादोरा, शुभ–अशुभ यावर या समाजाची मोठी श्रध्दा असल्याचे दिसून येते. बेलदार समाजात कोणी आजारी पडले तर दवाखान्यात जाण्यापेक्षा गंडादोरा, नवस व उतारा करीत असतात. शकून व अपशकुन पाहतात.१०

१३. **मृतक संस्कार :–** या समाजातील लोक मृताला दफन करतात. आधुनिक काळात दहन करण्याची प्रथा सुरू झाली आहे. अत्यंसंस्कार झाल्यानंतर मृताच्या घरी जातात व तिथे दिव्याला नमस्कार करतात. तिथेच एक लिंबाचे पान खाऊन मग आपल्या

ISSN : 2348-7143
Dec. 2018

घरी परततात. दहा दिवस सुतक पाळतात. बाराव्या दिवशी इष्टीभोजन घालतात.११

१४. **बेलदार समाजातील शैक्षणिक परिस्थिती :–** आज बेलदार समाजातील लोक भटकी अवस्था सोडून स्थिर जीवन जगताना दिसून येते. जे लोक स्थिर वस्ती करून राहू लागले. त्यांच्यात शैक्षणिक बदल झालेला दिसून येतात. या समाजातील लोक शिक्षक, प्राध्यापक, अभियंता, वकील, डॉक्टर व विविध खात्यात नोकरी करतांना दिसून येते. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण खुपच कमी आहे. खानदेशातील महिला व पुरूष शेती व्यवसाय करीत असल्यामुळे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

१५. **सामाजिक संघटन :–** खानदेशातील बेलदार समाज असंघटीत व भटक आणि विखुरलेला आहे. तरीही काही सुशिक्षित नोकरदार बेलदार समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न करीत आहे. आज नोकरी निमित्त शहरात आलेल्या तरूणांमध्ये समाजाबद्दल आस्थ असल्यामुळे वधुवर परिचय मेळावा , गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा, बेलदार समाज जागृती मंच या माध्यमातून हा समाज संघटीत होतांना दिसून येतो.

१६. **बेलदार समाजाची आजची परिस्थिती :–** महाराष्ट्र शासनाने बेलदार समाजाची नोंद १९६१ प्रमाणे भटक्या जमातीमध्ये केलेली आहे. या सवलतीचे फायदे या जातीपर्यंत पोहचले नाहीत. अलीकडे हा समाज बऱ्याच ठिकाणी स्थिर झालेला असून काही लोक पारंपारिक व्यवसाय करतांना दिसून येतात. हे व्यवसाय आधुनिक युगामध्ये बंद पडलेले आहेत. दारिद्र्य व गरिबीमुळे हे लोक नवीन माहिती व तंत्रज्ञानाशी स्वत:ला जुळवून घेऊ शकला नाही. काही लोक गुत्तेदारी व ठेकेदार म्हणून काम करतांना दिसून येतात.

**सारांश**

बेलदार ही भटकी जमात खानदेशातील तिन्ही जिल्ह्यात वास्तव्य करताना दिसून येते. हिंदू धर्मातील जात असून इतर भटक्या जमातीच्या तुलनेत अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कलमवार हे या जातीतूनच उदयाला आले होते. रामनाथ चव्हाण म्हणतात बेलदार गाढवगोती जमात म्हणून महाराष्ट्रात सुपरिचित आहे. ते नर जातीचे गाढवच पाळतात. गाढव व हा प्राणी ते पवित्र व इमानी मानतात. गाढवांच्या संख्येवरून या जमातीत माणसांची प्रतिष्ठा व श्रीमंती ठरविली जाते. मुलांप्रमाणे या जमातीत गाढवांची निगा ठेवतात. माती कामासोबतच गाढव खरेदी-विक्रीचा व्यवसायही ही जमात करताना दिसते. काही बेलदार स्वत:ला रजपूत वंशीय ,क्षत्रिय बेलदार मानतात. खानदेशात ओढ, रजपूत, मारवाडी, नाईक , गवंडी व कुंभार बेलदार विशेषत्वाने आढतात.

खानदेशातील बेलदार समाजाची स्थिती पाहता हा समाज शासनाच्या विविध योजनांपासून वंचित असून या समाजातील लोकांना शासनाने विशेष सवलत देवून आर्थिक विकास मंडळा मार्फत रोजगार विषयक प्रशिक्षण देवून त्यांचा आर्थिक विकास केला पाहिजे.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.जाधव रमेश- भटक्या -विमुक्तांचे परिप्रेक्ष्य, हरणाई प्रकाशन, नांदेड ,जून-२०१३ पृ.०७
२) डॉ.धुर्ये जी.एस.- दि कास्ट अँड रेस इन इंडिया, पॉप्युलर बुक डेपो, १९३२ बॉम्बे, पृ.०१
३) चव्हाण भिमराव व्यंकप्पा- उपलाणी, स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद, २००९ पृ.६३
४) उपरोक्त पृ.६५
५) उपरोक्त पृ.६७
६) उपरोक्त पृ.६७
७) उपरोक्त पृ.६८
८) चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्तांचे अंतरंग, सुगावा प्रकाशन, पुणे-१९८९ पृ.१४०
९) कदम ना.धो.-महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे -१९९५ पृ.६५
१०) किर्दक बंडू हरिभाऊ -अकोला जिल्ह्यातील बेलदार जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास, अप्रकाशित शोध प्रबंध, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,२००५ पृ.१४
११) उपरोक्त पृ.१६

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खान्देशातील साहित्यिक

**प्रा.डॉ. विजया पाटील**
जी.टी.पी. महाविद्यालय,
नंदुरबार.

पूर्वी मुंबई इलाख्याचा एक जिल्हा असणारा दख्खनच्या पठाराचा अगदी उत्तरेकडील भाग म्हणजे खानदेश होय. खानदेशाचे अतिप्राचीन नाव ऋषिकेश असे होते. यादवांच्या काळात हा भूभाग सऊणदेश म्हणून ओळखला जाई. खानदेश हे नाव मोगलांच्या कारकिर्दीत पडले असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. खानदेश या नावाच्या कूळ आणि मुळाबद्दल अनेक मते प्रचलित आहेत. आज उत्तर महाराष्ट्र म्हणून ओळखला जाणारा भूप्रदेश म्हणजे खानदेश. असे साधारणपणे मानले जात असले तरी मध्ययुगातील खानदेशाची व्याप्ती मात्र मोठी होती. भारतातील महत्त्वपूर्ण घटकराज्य असणाऱ्या महाराष्ट्राच्या उत्तरेचा भाग खानदेश म्हणून गणला जातो. खानदेश हे नाव ऐतिहासिक असून पूर्वी खानदेश सुभा अस्तित्वात होता. पुढे खानदेश सुभ्याला खानदेश जिल्हा असे नाव पडले. खानदेशाला प्रदीर्घ अशी अतिप्राचीन, प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन, ऐतिहासिक, भौगोलिक भाषिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. खानदेशी संस्कृती वैशिष्टपूर्ण आहे. प्राचीन काळापासून खानदेशची भूमी निरनिराळया नावांनी ओळखली जाते. ऋषिक, आश्मिक, स्कंददेश, आभीरदेश, गोपराष्ट्र, सेऊणदेश, अहिराष्ट्र, खांडवदेश, खंडदेश, कानदेश, कन्नदेश, दानदेश, इ. विविध नावे या प्रदेशाबद्दल योजलेली दिसतात. 'खानदेश' नावाच्या उत्पत्तीबाबत संशोधकात एकमत आढळत नाही. खानदेश शब्दाविषयीच्या विविध उपपत्ती मांडल्या गेल्या आहेत त्यात मतभेद आहेत. या संदर्भात प्रत्येकाची भूमिका स्वतंत्र आहे. काही संशोधक ऐतिहासिक संदर्भ घेऊन उपपत्ती देतात, तर काही पुराणातील संदर्भ लक्षात घेऊन विश्लेषण करतात. काही भौगोलिक रचनेवरुन स्पष्ट करतात. 'कान्हदेश' म्हणजे खानदेश ही उपपत्ती अधिक योग्य वाटते. आजही खानदेशात मोठया प्रमाणात कान्हाची म्हणजे कृष्णाची पूजा केली जाते. कृष्ण उपासक असा देश तो कान्हदेश पुढे तोच शब्द अपभ्रंश होऊन खानदेश असा रुढ झाला असावा. खानदेश ही प्राचीन काळापासून आभीरांची म्हणजेच अहिरांची भूमी म्हणून ओळखली जाते. खानदेश या शब्दाच्या उपपत्तीबाबत संशोधकात एकवाक्यता नाही त्याप्रमाणे आभीर या शब्दाबाबतही मतभेद दिसतात. आभीर कोण, कुठले खानदेशात कसे आले याविषयी मतभेद असले तरी खानदेशात आभीरांची वस्ती होती हे सत्य सर्वांना मान्य आहे. आभीर या शब्दाचा पुढे अपभ्रंश होऊन अहिर हा शब्द रुढ झाला असावा. या अहिर लोकसमूहाची जी बोली ती अहिराणी होय. खानदेशातील मध्यवर्ती भाषा अहिराणी आहे. साधारणपणे दैनंदिन व्यवहारात सर्वच जातीजमातीचे लोक अहिराणी भाषा वापरतात. अहिराणी बोलीला स्वतंत्र लिपी निर्माण होऊ शकली नाही. मौखिक रुपात ही भाषा टिकून असलेली दिसते. लोकवाङ्मयाचा समृध्द, संपन्न असा जिवंत वारसा या बोलीत उपलब्ध आहे. वर्तमानात देवनागरी, लिपीतून अहिराणीचे लेखन होऊ लागले आहे.

दर दहा कोसावर भाषा बदलते असे म्हटले जाते. महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या अनेक बोली आहेत. खानदेशात बोलली जाणारी अहिराणी बोली पण एक महत्त्वाची बोली आहे. नादमधुर असणाऱ्या या बोलीतून मोठया प्रमाणात लोकसाहित्य उपलब्ध आहे. लिखित रुपातील साहित्यही अलीकडच्या काळात उपलब्ध व्हायला लागले आहे. खानदेखाला मोठी सांस्कृतिक पंरपरा आहे. प्रतिभेची देणगी लाभलेल्या सृजनशील साहित्यिकांचीही परंपरा पहायला मिळते. बहिणाबाई चौधरी, भालचंद्र नेमाडे, ना.धो. महानोर, यांच्या सारखे दिग्गज साहित्यिक मराठी साहित्यात स्थान मिळवून आहेत. अनिल सोनार, पुरुषोत्तम पाटील, अशोक कोळी, अशोक कोतवाल, रविंद्र पांढरे, उज्वल कुलकर्णी, निंबाजीराव बागुल, कै. रमेश चव्हाण, प्रा. दत्ता वाघ, डॉ. मु.ब. शहा, डॉ. विश्वास पाटील, नंदकुमार कुलथे, विरसिंग पाडवी, डॉ. पितांबर सरोदे, विजया जहागीरदार, वा.न. सरदेसाई, वाहरु सोनवणे, विश्राम वळवी, नजूबाई गावीत, डॉ. संजीव सोनवणे, डॉ. किसन पाटील, गोकुळ बागुल, संजीव गिरासे, दिपक कुलकर्णी, अलका कुलकर्णी, रमाकांत पाटील, जगदिश देवपूरकर, रमेश सूर्यवंशी, प्रभाकर जोशी, वा.रा. सोनार, स्व. आनंद पाटील, रामदास वाघ, डॉ. टाटीया, रावसाहेब कुवर, गझलकार विरेंद्र बेडसे, नरेंद्र खैरनार यांच्या सारखे प्रतिभावंत सृजनशील साहित्यिक, कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, काव्य, गझल यासारख्या साहित्य प्रकारांमध्ये लेखन करीत आहेत. पुण्या-मुंबईकडच्या साहित्यिकांची साहित्य क्षेत्रातील मिरासदीर संपुष्टात आणत आहेत. खानदेशच्या मातीतही प्रतिभावंतांची परंपरा असल्याचे सिध्द करीत आहेत. दर्जेदार लेखन करुन श्रेष्ठ साहित्यिकांचे कौतूक संपादन करीत आहेत. मराठी साहित्याच्या क्षेत्रात खानदेशचा झेंडा अभिमानाने फडकावित आहेत. मराठी साहित्य अधिक समृध्द करण्यास हातभार लावीत आहेत. उदा. काही साहित्यिकांच्या साहित्याची झलक अशी सांगता येईल वाहरु सोनवणे (श्रीखेड ता.शहादा) गोधड कविता संग्रह, प्रा. अनिल सोनार- एकूण ७० पुस्तके प्रकाशित, २० नाटके, ३ कादंबऱ्या, ३ एकांकिका संग्रह, ३ काव्यसंग्रह, ३ बालकथा, ३७ एकांकिका, १ आस्वादक समीक्षा ग्रंथ, सारे प्रवासी तिमिराचे, मालकीण मालकीण दार उघड, सत्यांतर ही व्यावसायिक रंगभूमीवर सादर झालेली नाटके, डॉ. पितांबर सरोदे- नंदुरबारचे

ISSN : 2348-7143
Dec. 2018

अमर शहीद, डॉ. राम मोहन लोहिया : एक झंझावात, पुरुषार्थ: (व्यक्तित्व व कार्य), सानेगुरुजींची साहित्य साधना, महात्मा गांधी आणि राष्ट्रभाषा, मातृत्वाची साधना, ग्रंथांची किमया, डॉ. विश्वास किसन पाटील- सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, पुण्यक्षेत्र प्रकाशा, कालनदीच्या किनाऱ्यावरती (एकांकिका), माधवी आख्यान (एकांकिका) जादूचा गालिचा (बाल एकांकिका) गांधी,गीता आणि गीताई, आपले साने गुरुजी, पूर्णवाद आणि गांधी चिंतन, निंबाजीराव बागुल- वस्तीवरल्या कविता (काव्यसंग्रह), खान्देशी माणसं (व्यक्तिचित्रे), ऊन-सावली (कथासंग्रह), शब्दसुगंध (ललित) अंबादास वाघ- वढाळ, ढगाळलेले आकाश(कादंबऱ्या) खारेपाणी (काव्यसंग्रह), वसुली (कथासंग्रह) मराठी साहित्य लेखनात योगदान देणारे साहित्यिक आहेत तसेच खानदेशची मध्यवर्ती बोली असणाऱ्या देवनागरी, लिपीतून लिहिण्यास कठीण असणाऱ्या अहिराणी बोलीतूनही मोठया प्रमाणात साहित्य निर्मिती करण्यास खानदेशी साहित्यिकांनी सुरुवात केली आहे. खानदेशची अस्मिता जपण्यासाठी लेखन करुन अहिराणीच्या लालित्याचा गोडवा शब्दबध्द केला आहे. अहिराणीचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी मौलिक कार्य केले आहे. दा.गो. बोरसे, कृष्णा पाटील, राजा महाजन, रमेश सूर्यवंशी, वा.गो. वाजपेयी, सुभाष अहिरे, गोकुळ बागुल, बापूराव देसाई, संजीव गिरासे, भगवान पाटील, शकुंतला चव्हाण, रामदास वाघ, रमेश बोरसे, सदाशिव सूर्यवंशी, जगदिश देवपूरकर, निंबाजीराव बागुल, सदाशिव माळी, अशोक शिंदे, शिवराम पाटील, ही दर्जेदार लेखन करणारी मंडळी अहिराणी विषयी वाटणाऱ्या आत्मीय जिव्हाळयातून कथा, कादंबरी, नाटक, कविता, ललित, गद्य अशा सर्व वाड्मय प्रकारातून चौफेर लेखन करताना दिसतात. संजीव गिरासे यांचे आगारी (ललित गद्य) डफडं (कथासंग्रह) क्षितिज, पळतं बी चावतं बी (कथा संग्रह) लगीन (कादंबरी) लेखन प्रकार आहेत. मराठी साहित्यातील ललित गद्याची समृध्द परंपरा बोलीभाषेतील आगारी या ललित गद्य संग्रहात साकार झाली आहे. बापूराव देसाई- हवश्या नवश्या गवश्या (अहिराणी पयलं नाटक) आख्खी हयाती (अहिराणी पयली कादंबरी) धोंडया धोंडया पानी दे, लबाडनी दुनिया, उनी रे भो तोफांडी, कुढापा, चुल्हामा ग्यात त्या नोटा, आडजी पडजी, खान्देशनामा (कादंबऱ्या) सटीना टाक (पयलं अहिराणी महाकाव्य), दुनियादारी (अहिराणीतलं पहिलं चिंतन) अशा प्रकारे चौफेर सर्वच वाड्मय प्रकारात लेखन केले आहे. निंबाजीराव बागुल यांनी अहिराणीतील पहिला चारोळी संग्रह खान्देशी खुडा लिहून आपण कुठल्याही प्रांतात मागे नाहीत हे सिध्द केले आहे. या सर्व साहित्यिकांनी आपली बोलीभाषा दर्जेदार साहित्य लेखन करण्याइतकी समृध्द असल्याचे सिध्द केले आहे.

एकूणच खानदेशात सांस्कृतिक समृध्दता आहे. प्रतिभाशक्तीची दैवी देणगी लाभलेली साहित्यिकांची मोठी फळी आहे. दिवसेंदिवस ती वाढते आहे. खानदेशचा नावलौकिक चौफेर पसरवीते आहे. आपल्या मायभूमीची सेवा या सर्व साहित्यिकांकडून होते आहे. त्या साहित्यावर समीक्षण आणि संशोधन करण्यासाठी अभ्यासकांना वाटा मोकळया होत आहेत हे मोठे योगदान आहे.

**संदर्भ सूची :**

१) अहिराणी ओवीगीते आशय आणि अभिव्यक्ती- डॉ. सुधा खराटे, विद्या प्रकाशन
२) अहिराणी बोली साहित्य आणि संस्कृती- डॉ. सुधीर कोठावदे
३) नंदुरबार जिल्हा साहित्यिक सूची
४) आगारी - संजीव गिरासे
५) अहिराणी लोकसाहित्यदर्शन- कृष्णा पाटील

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# शामकुंवर जगजीवन शेठयांचा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान

**मंजुश्री अप्पासाहेब जाधव**
पीएच.डी. विदयार्थीनी,
भडगाव, जिल्हा – जळगाव.

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही वैभवशाली असलेली दिसुन येते.सन १८१८ मध्ये मराठा राज्य जिंकुन इग्रजांनी राबविलेल्या सत्तेविरोधात महाराष्ट्रात लहान लहान उठाव झालेले दिसतात.भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत इंग्रजीसत्तेला कोणत्या ना कोणत्या मार्गाने विरोध करून स्वातत्र्य प्राप्तीसाठी महाराष्ट्रीयनस्त्री, पुरुष, बालके अशा सर्वांनीच आपले योगदान दिलेले दिसुन येते.परंतु इतिहास लेखनातस्त्रीयांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठी योगदान दिलेले आहे यावर पुरुषांच्या योगदानात्मक महत्वा इतके महत्व दिलेले दिसुन येत नाही.इतिहासात या माध्यमातुनस्त्री घटकहा उपेक्षित दिसुन येतो.जळगाव जिल्हागॅझेटीअर मध्ये याचा उल्लेखअल्प आहे.सबाल्टर्न या दृष्टीकोनातुन भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास माडतांना यातीलस्त्रीयांचा सहभाग मांडणे अत्यंत गरजेचे वाटते.म्हणून मी स्त्रीवादी लेखन या दृष्टीकोनातुन या शोधनिबंधातस्वा.सै.शामकुंवर जगजीवनशेठयांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान यावर विचार मांडत आहे.

ॲन्टीनिओ ग्राम्शी यांनी या अर्थाने सर्वसामान्याचा इतिहास लिहण्याची निकड कृतीमय रितीने व्यक्त केली. असेच विचार रणजीत गुहा यांनी सबाल्टर्न या संकल्पनेतुन सर्वसामान्य, बहुजन, उपेक्षित, वंचित यांचा इतिहास लिहला जाण्यातुन कृतीत आणला. महात्मा फुले – आंबेडकरवादी विचारसरणी याच अर्थाची दिसुन येते. १९७३ मधील , १९७७ मधील या अभ्यासांमध्येस्त्री कतृत्वाला उजाळा देण्यात आला. स्त्रिया आणि राष्ट्रवाद यांच्या परस्पर सबंधाविषयी भारतात जे स्त्रीवादी लेखन झालेतेतीन वर्गांमध्ये दिसुन येते.१ राष्ट्रीय चळवळीत स्त्रीयांचे योगदान, स्त्रीयांनीच इतिहास घडविला असे म्हणतस्त्रीयांच्या कर्तेपणाचा इतिहास, लिंगभाव या विश्लेषणात्मक कोटीक्रमातुन इतिहासाकडे स्त्रीवादी दृष्टीकोनातुन पाहणे असेहेतीन वर्ग दिसुन येतात. राष्ट्रीय चळवळीत विशेषत: भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीयांचे योगदानहे पहिल्या वर्गात मोडणारे लेखन मानले जाते.

मानवाची सर्वांगीन कहाणी म्हणजे इतिहास असे आपण मानतो.त्यातही घडणाऱ्या इतिहासातील जो लिहीला जातो त्यालाच आपण इतिहास म्हणतो.इतिहास लेखनहे परिपूर्ण आढळून येत नसुन, स्त्रीवादी इतिहास लेखन – यात इतिहासातस्त्री कतृत्वाविषयी जे वास्तव दडलेले आहेते शोधणे, तळाकडून इतिहास अशी मांडणी करणे अपेक्षित असते.स्त्री विषयक कोणताही इतिहासहातळाकडून इतिहास म्हणून संबोधता येईल.२ सबाल्टर्नचा अर्थ सैन्यातीलकॅप्टनच्या हाताखाली लढलेले दुय्यम सैनिक असा दिसुन येतो.तसेचसमाजातील वंचित समुहाचा इतिहास अभ्यासणाऱ्या नव्या इतिहास प्रवाहाचे सबाल्टर्न असे नामकरण केले गेले.३ असे दिसते.प्रमुख राष्ट्रीय नेत्यांच्या आज्ञेखालीजळगाव जिल्हयातस्वा.सै.शामकुंवर जगजीवनशेठयांचेभारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान याअर्थाने महत्वपूर्ण दिसुन येते.

**विषयाची निवड:–** महाराष्ट्रातीलस्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान दिसून येते. स्त्रीयांचे समाजात दुय्यम स्थान पहावयास मिळते. स्वातंत्र्य चळवळीत फक्त पुरुषांचाच सहभाग आहे अशा आभास निर्माण केला जातो. असंख्य महानसुधारकांनीस्त्रीयांचा उध्दार करण्यासाठी कृतीमय जीवन झीजवले असतांनाही, स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्याचा व समता प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न केलेला असतांनाहीस्त्रीयांचासमाजातील दुय्यम दर्जा नष्ट झालेला दिसून येत नाही.स्त्री कर्तृत्वाला उजाळा दिला पाहिजे.त्या निमित्ताने या विषयाची शोधनिबंधासाठी निवड केलेली आहे.

**शोधनिबंध विषयाचे महत्व:–**स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान दिसून येते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला विशेष महत्व असल्यानेतीचा सर्वांगीण दृष्टीने वस्तुनीष्ठपणे अभ्यास होण्यासाठी या विषयाचे मोठे महत्व आहे. समाजाला स्त्रीयांना विविध क्षेत्रात स्वातंत्र्य व समान हक्क देण्याची गरज पटेल. स्त्रीयांना समान स्वातंत्र्य, त्यातून समाजाचा विकास व आपोआपच राष्ट्राचा विकास साध्य होईल.

**उद्दीष्टे:–**

१. महाराष्ट्रातीलस्त्रीयांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदानाचा अभ्यास करण्याचा दृष्टीकोण निर्माण करणे
२. स्त्रीयांचे सबलीकरण हेसमाजहीत व देशहीतासाठी गरजेचे आहेहे पटवून देणे.
३. स्वा. सै. शामकुंवर जगजीवनशेठयांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदानअभ्यासणे.

**गृहीतके:–**

१. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातस्वा. सै. शामकुंवर जगजीवनशेठयांचा सहभाग होता.
२. स्त्रीयांचे सबलीकरण झालेतर समाजात स्थीरता येऊन राष्ट्रहीत साध्य होईल.

**विषय विवेचन:–** स्वा. सै.शामकुंवर जगजीवनशेठया पाचोराचे रहीवाशी आहेत. आधुनिक जगाच्या इतिहासात भारतीय स्वातंत्र्य

चळवळ ही अनन्य साधारण राष्ट्रीय चळवळ मानली गेलेली दिसून येते.जगात औद्योगिक क्रांतीच्या उदय आणि व्द्रिकासाच्या परिणामातून उदयास आलेल्या साम्राज्यवादास बळी पडलेल्या देशांपैकी भारत हा एक देश होय. सन १८१८ ते सन १९४७ या काळात खानदेशावर इंग्रजी अंमल होता. भारतीय जनतेने ब्रिटीशांच्या पारतंत्र्यातून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वातंत्र्य चळवळ पुकारल्याने, सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य देण्यात आले. या सर्व प्रक्रियेत पाचोरा तालुका महत्वपूर्ण पद्धतीने सहभागी होता. स्वा. सै.शामकुंवर जगजीवन शेठ यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान होते. भारतीय राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेस) स्थापनेपासून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला सनदशीर व व्यापक वळण मिळत गेलेले दिसून येते. पाचोरा येथेही काँग्रेसची स्थापना झालेली होती. म. गांधीजींचा वैचारीक प्रभाव पाचोरा तालुक्यात मोठया प्रमाणात दिसून येतो. पाचोरा तालुका काँग्रेस कमिटी प्रभावी होती. १९२१ मधील काँग्रेस अधिवेशनास उपस्थित राहण्यासाठी श्री जगजीवन शेठ गेले होते. त्यांच्या कार्यात श्रीमती शामकुंवर जगजीवनशेठ यांचा पाठींबा होता. पूर्वखानदेश काँग्रेस सभेत खादी कार्य संबंधी कार्यकारी मंडळ निवडले गेलेत्यात श्री जगजीवनशेठ होते.४

सविनय कायदेभंग चळवळीचा प्रभाव तर या तालुक्यावर प्रचंड मोठया प्रमाणात निर्माण झालेला दिसून येतो. आण्णासाहेब दास्ताने, भगवानदास, बाबासाहेब देशपांडे आणि इतर पुढाऱ्यांचे कायदेभंग चळवळीचे मर्म लोकांना समजावून देण्यासाठी पाचोरा येथे व्याख्याने झाली होती. ५ म.गांधीनींही स्त्रियांमध्ये राष्ट्रीय जागृतीकरण्याचे विचार मांडलेले दिसून येतात. सविनय कायदेभंग चळवळीचा प्रचार व प्रसार करीत सानेगुरुजीं पूर्व खानदेशात जनजागृती करीत होते. पाचोरा येथ झेंडा सत्याग्रहात अनेक स्वयंसेवकांना अटक करण्यात आली होती. सरकारसाठी अत्यंत धोकादायक आंदोलनापैकी वेलजी कानजी भाटे व जगजीवन कशालचंद शेठ हे होते.६ यांचा उल्लेख सरकारी अहवालात आहे. सन १९३६ मधील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशनात जगजीवन कशालचंद शेठ व परीवाराचा सहभाग होता.

भारतात वैयक्तिक सत्याग्रह चळवळीचे लोन पसरलेले दिसून येते. सन१९४० मधील वैयक्तिक सत्याग्रह चळवळीत श्रीमती शामकुंवर जगजीवनशेठ अग्रेसर दिसून येतात. त्यांनी ठिकठिकाणी सत्याग्रह केल्याने त्यांना सक्तमजूरीच्या व दंडाची शिक्षा झालेल्या आहेत. श्रीमती शामकुंवर जगजीवन शेठ या प्रभावी स्वयंसेविका असून त्यांना वेगवेगळया सत्याग्रहात वेगवेगळया शिक्षा झालेल्या होत्या. त्यांना अटक केल्याच्या निषेधार्थ पाचोरा येथे हरताळ पाळण्यात आला होता.७ ता. ६ जानेवारी १९४१ रोजी पाचोरा येथे श्रीमती शामकुवरबाई, रा. पाचोरा यांनी सकाळी ९ वा. ३०० ते ४०० लोकांची सभा घेऊन सत्याग्रह केला. त्यांना अटक झाली. पाचोरा तालुक्यात चलेजाव चळवळी संबंधी घटना घडलेल्या आहेत. शेठ शामकुंवर जगजीवन, पाचोरे, यांनी स.१९४१ च्या युद्ध विरोधी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला. त्याबद्दल त्यांना जळगांव जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात पंचवीस रूपये दंड अथवा दीड महिना साध्या कैदेची शिक्षा झाली. त्यांनी दंड भरला नाही.८ ही शिक्षा त्यांनी धुळे जेलमध्ये भोगली.

**निष्कर्ष**

स्वा. सै. शामकुंवर जगजीवनशेठयांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान होते. मवाळ, जहाल, क्रांतीकारी, गांधीयुग अशा सर्वच कालखंडात पाचोरा तालुक्याचा स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग होता. जिवंत प्रभावी राष्ट्रवाद त्या काळी पाचोरा परीसरात होता. पुर्व खानदेशातून सरकारला धोकादायक वाटावे असे कार्य येथे काँग्रेस संघटनेचे होते. स्वातंत्र्यानंतर सरकारने येथील स्वातंत्र्यसैनिकांचा ताम्रपत्र व पेन्शन देऊन सन्मान केलेला आहे. शामकुंवर जगजीवन शेठयांचा ताम्रपत्र व पेन्शन देऊन सन्मान केलेला आहे. त्यांच्या व त्यांच्या वारसांच्या राष्ट्रीय भावना अंमलात आणण्याची आज गरज आहे.

**संदर्भ सूची :**

१. दिवाकर वैशाली, भारतातील राष्ट्रवाद: सिध्दांत आणि व्यवहार, पुणे, २००६,पा. २२
२. दिक्षित (डॉ.) राजा, १९ व्या शतकातील महाराष्ट्रातीलस्त्री जीवन तळाकडून इतिहास, पुणे विद्यापीठ वार्ता, पुणे, २००२, पा. २९.
३. कोठेकर (डॉ.) शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७, पा. २४२
४. सा.प्रबोधचंद्रिका,जळगांव, ३ नोव्हेंबर १९२४, पा. ८
५. सा.प्रबोध,धुळे,६एप्रिल१९३०,पा.३
६. Home Department (Special) File No. 800-A-I-1932 Letter of 3rd September 1932, Maharashtra State Archives, Bombay.
७. Home Department (Special) File No. 800(74)(10)III, 1941-43 Letter of 16 January 1941, Maharashtra State Archives, Bombay.
८. कुंटे (डॉ.) भ. ग. (संपादक), स्वातंत्र्य-सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, पश्चिम महाराष्ट्र खंड-१, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर, १९७९, पा. ३१०

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील कादंबरी आणि कादंबरीकाराचा : एक अभ्यास

**डॉ. एन.डी. नाईक**
इतिहास विभाग, श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय,
सिरसाळा, ता. परळी वै., जि. बीड.

**प्रस्तावना**

खानदेशास साहित्याची उज्वल अशी परंपरा लाभली आहे. खानदेशात अनेक साहित्यीक आणि कवी यांनी साहित्यामध्ये मोलाची भर टाकलेली आहे. कादंबरीला आज एक प्रधान वाङमय प्रकार म्हणुन जागतीक मान्यता आणि लोकप्रियता लाभलेली असली तरी तिचा विकास खऱ्या अर्थाने प्रथम पाश्चात्य देशात झाला. मराठी वाचक लेखकांना मराठी कादंबरीची ओळख खऱ्या आर्थाने सन १८१८ नंतरच झालेली आहे. खानदेशातील प्रसिध्द कादंबरीकार म्हणुन ज्यांचा उल्लेख केला जातो. ते म्हणजे श्रीराम आत्तरदे यांनी सावलीच्या ऊन्हात ही कादंबरी प्रकाशीत झाली. त्यानंतर मधुकर पाठक यांनी भावीकाचे बंड ही कादंबरी आपल्या स्वतंत्र्यादिनाच्या दिवशी प्रकाशीत केली आहे. त्यातील काही कादंबरीकार आणि त्यांच्या साहित्याची ओळख व्हावी म्हणुन प्रस्तुत शोध निंबधाचा उद्देश ठरविण्यात आली आहेत.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. खानदेशी साहित्यातील कादंबरीकाराची माहीती स्पष्ट करणे.
२. खानदेशातील कादंबरीकाराच्या कार्याचा आढावा घेणे.
३. खानदेशी साहीत्याची ओळख करुन घेणे.

**श्रीराम आत्तरदे :–** यांची पहिलीच कांदबरी म्हणजेच सावलीच्या ऊन्हात प्रकाशीत झाली. ही कादंबरी उपेक्षीतांच्या जवळ जाऊन टिपलेल्या सुख दु:खांचे वास्तव चित्रण म्हणुन उल्लेखनीय आहे. या कादंबरी मध्ये साम्यावादी विचार सरणी दिसते. त्या बरोबरच समाज सेवेची मुळ बैठक दिसते. या मध्ये भिल्ल, वारली लोंकाचे सथार्थ दर्शन आपणास पहायला मिळते. आदिवाशी समाजातील लोंकाना संघटीत होण्यासाठी आव्हान देणारी अशी ही कादंबरी अत्यंत प्रखर आहे. सावकार लोक देश भक्तीचा बुरखा घालुन लोंकाचे आतोनात शोषण करीत असत. त्यांचे झालेले दंब स्फोट या कादंबरीत वर्णीलेला आहे. पारतंत्र्य संपुष्टात योण्याच्या सीमेवरील ही काहणी. त्यावेळी देशभक्त देशाला स्वतंत्र्य मिळविण्यासाठी एकीकडे जीवाची पर्वा न करता झटत होते. आणि दुसरीकडे सावकारी गरीब दारिद्र्य लोकावर अत्याचार करुन त्यांचे हक्क त्यांना मिळु देत नव्हते. खादीधारी बगळयाच्या सावकारी छायेच्या दाहक मायेची लाखो श्रमजीवी जीव भाजुन निघाले होते. सावली म्हणजे आधार दुसऱ्याला मदत करणे. त्याचा विविध प्रश्नावर मायेची पारवर घालुन ते सोडवणे.

**डॉ. मधुकर पाठक :–** यांची भाविकांचे बंड ही कादंबरी आपल्या स्वातंत्र्य दिनादिवशी प्रकाशीत झालेली आहे. स्वातंत्र्य मिळुन बरीच वर्ष झाली असली तरी. स्वातंत्र्य मिळवुन देणाऱ्या मं. गांधीजीचा खुन एका ब्राम्हणाने केला म्हणुन संपुर्ण देशात ब्राम्हण वर्गाला सहन करवा लागणारा त्रास या कादंबरीत विस्तृतपणे वर्णन केला आहे. याशिवाय ग्रामिण भागातील राजकारणावर प्रकाश झोत टाकण्याचा यशस्वीवणे प्रयत्न कादंबरीकाराने केलेला आहे. कादंबरी वाङमय प्रकार हा कथा वाङमयाशी निगडीत आहे. एक मुख्य कथानक व त्याच्या जोडीला अनेक उपकथानकाची शृंखला असते. सत्य सृष्टीच्या आधारे काल्पनीक प्रतीसृष्टी निर्माण करुन काल्पनीक पत्राची स्वभाव चित्रे व काही अंशी तद्दोलबीत जिवीत घटना यांचे गोष्टी रुपाने वर्णन करुन आणि कलानंदाची प्राप्ती करुन जिवीतातील गुंता गुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणाऱ्या वाङमय विभागास कांदबरी म्हणतात.

**के. नारखेडे :–** यांनी बालसाहीत्या मध्ये अंत्यंत मोलाची भर घातली आहे. एक प्रसिध्द कादंबरीकार यांचा जन्म यावल तालुक्यात झाला. ते व्यवसायाने शिक्षक होते. त्यांच्या नावाने आज ही के. नारखेडे हायस्कुल ही शाळा प्रसिध्द आहे. ज्यांचा आनंदवन, मथुरानी, जलवंती, तारकापुष्प या बाल कादंबऱ्या ही लोकप्रिय झाल्या त्यांनी साकार केलेल्या राधेय हा बालनाटय प्रयोग यशस्वी ठरला तसेच त्यांचे कादंबरी साहित्यातील योगदान ही विषेश उल्लेखणीय स्वरुपाचे आहे त्यांचे बालसाहित्य प्रसिध्द आहे. या कादंबरीत त्यांनी खानदेशातील लोक पाटीदार समाजामध्ये सतपंथाची जी वावटळ उडाली होती तीचे ओझरते दर्शन या कादंबरीत दाखवले आहे. संतपंथी असणाऱ्या लोकांनी इतर पंथ स्विकारावा आणि तो स्विकारल्या नंतर त्याचे परिणाम काय होतात त्याचे हुबेहुब चित्रण या कादंबरीत करण्यात आले आहे.

**भालचंद्र नेमाडे :–** डॉ. भालचंद्र नेमाडे हे खानदेश पुत्रच होते. परंतु शिक्षण संपवुन नौकरी निमत्त खानदेशा बाहेर जावे लागले. त्या मुळे बाहेर राहुनही त्यांनी प्रचंड साहित्य निर्माण केलेले आहे. त्या वरुण खानदेशासी असलेला दुवा कायम राहीलेला दिसतो. इंग्रजी व मराठी या दोन्ही विषयाचे गाडे अभ्यासक चिंतक असुन संत साहित्यावर ही त्यांचा प्रंचड अभ्यास आहे. मुंबई विद्यापिठामध्ये इंग्रजीचे प्रपाठक म्हणुन कार्यरत असताना नेमाडे नि कोसला, जरीला, बिडार, झुल अशा कादंबऱ्या आणि मिलडी व देखनी हे काव्य संग्रह लिहिले आहेत. त्यांच्या

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

कोसला या कादंबरीला खानदेशातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाणे त्यांना डि.लीट ही पदवी देऊन त्यांचा सन्मान व गौरव केला. मुंबई पुण्या सारख्या चंदेरी दुनीयेत राहुण ही नेमाडे मधला भाग भागवत हा खानदेशी मातीतच रमला नेमाडेच्या साहित्याची लोकप्रियता फार मोठी आहे. त्यांच्या साहित्या विषयी चंद्रकांत बोधवडेकर म्हणतात बीडार हे आत्मचरित्र आणि कादंबरी यांच्या समन्वयाने बनवलेला साहित्य प्रकार होय. एका सिमीत जगाचा घेतलेला आनुभव भालचंद्र नेमाडेनी अत्यंत प्रभावित पणे मांडला आहे. खरेतर साहित्यातील संकेत एकिकडे त्यांनी तोडले असले तरीही तोडतांना त्यांनी कोठेही अतीरेकी पणा येऊ दिला नाही.

**समारोप :–**

कादंबरीच्या माध्यमातुन अनेक कादंबरीकाराने समाजाच्या वास्तवतेचे दर्शन परखड पनाणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सम्यावादी विचार सरणीचा पुरस्कार करणारी तसेच भिल्ल आणि वारली या लोकांचे यथार्त लोंकाचे जीवन प्रकट करणारी प्रादेशीक कादंबरी म्हणुन सावलीच्या ऊन्हात ही कादंबरी आहे.

**संदर्भ सूची :**

१. मनोहर जाधव :- के नारखेडे यांच्या ग्रामिण साहित्याचा अभ्यास, प्रबंध पृष्ठ क्र. ६२
२. आनंद यादव :- ग्रामिण साहित्य स्वरुप आणि समस्या, मेहता पब्लिकेशन्स हाऊस पुणे
३. श्रीराम अत्तरदे :- सावलीच्या ऊन्हात, नागपुर प्रकाशन-प्रथमावृत्ती १९४६

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# १९ व्या शतकातील खानदेशातील समाजजीवन एक दृष्टीक्षेप

**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर**
इतिहास विभाग, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय,
पारोळा, जि. जळगांव.

**प्रस्तावना**

खानदेशातील समाजजीवनावर वैदिक संस्कृतीचा प्रामुख्याने प्रभाव दिसतो. आपल्या संस्कृतीच्या रूढी परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करणे हे खानदेशी लोक आपल्या जिवनाचे ध्येय मानतात. त्याचप्रमाणे खानदेशातील समाजजीवनावर चातुर्वण्य व्यवस्थेचाही जबरदस्त पगडा असल्याने निदर्शनास येते. खानदेशातील वैविध्यपुर्ण समाजजीवन हे प्रमुख वैशिष्ठ आहे.

**जाती व्यवस्था**

जातीयता हा भारतीय समाजव्यवस्थेला मिळालेला एक शाप आहे. भारतीय समाजव्यवस्था ही विविध जातीजमातीनी मिळून बनलेली असून प्राचीन काळात चातुर्वण्य व्यवस्थेतून जातीव्यवस्था निर्माण झाल्याचे दिसते विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात खानदेशातील प्रमुख जातीत कुणबी, भिल्ल, महार, मराठा, माळी, कोळी, ब्राम्हण, वाणी, धनगर, वंजारी, तेली, सोनार, न्हावी, चांभार, सुतार, शिंपी, मांग इत्यादींचा समावेश दिसून येतो. जातीमध्ये जशी विविधता होती तसेच रितीरिवाजातही विविधता असल्याचे दिसते. समाजावर पारंपारीक अंधश्रध्दा, परंपरांच्या प्रभाव असल्याचे दिसते.

विसाव्या शतकाच्या पुर्वार्धात खानदेशात पुज्य साने गुरूजी, बाळूभाई मेहता, नानासाहेब ठकार, गुला महाराज, धनाजी नाना चौधरी, पं श्रीधरशास्त्री पाठकांसारख्या व्यक्ती समाजात पुढे आल्या.

**कुटूंबसंस्था**

कुटूंबसंस्था हे समाजाचे मुलभूत अंग आहे. समाजव्यवस्था सुसंघटीत आणि सुव्यवस्थीत राहण्यासाठी कुटूंबसंस्था महत्वपुर्ण कार्य करते. १९ व्या शतकात मातृसत्ताक कुटूंसंस्थेकडून पितृसत्ताक अवस्थेत समाज आला. उत्पादन साधने, मालमत्ता, सत्ता यावर पुरूषवर्गाची मक्तेदारी निर्माण झाली. यातुन स्त्रीवर्गाचा शोषणाला सुरूवात झाली. कुटूंबव्यवस्थेतील कणा असलेल्या स्त्रीला दुय्यम लेखले गेले. स्त्रीचे जिवन अनेक रूढी परंपरांनी जखडले गेले. त्याचप्रमाचे १९ व्या शतकापासुनच विवाहसंस्थेचे उदात्त तत्व बाजूलाच राहीले. स्त्रीकडे एक उपभोग्य वस्तु म्हणून बघितले जात होते. अतिशय वाईट अशा प्रथा परंपरामध्ये तिला गुरफटून तिचे जीवन बंदिस्त केले होते.

**बालविवाह पध्दती**

खानदेशातील स्त्रीयांविषयक चळवळ खऱ्या अर्थाने धुळ्यात महिला सभेच्या स्थापनेनंतर सुरू झाली. श्रीमती विजया चौक यांनी सभेची स्थापना करून स्त्रीयांच्या संदर्भातले अनेक प्रश्न मार्गी लावले. इ.स. १८९० मध्ये मुलीचे विवाहाचे वय १२ ते १३ वर्षे आणि मुलाचे वय २० वर्षे होते. खानदेशातील बालविवाहाची प्रथा ही सर्व जाती जमातीमध्ये अस्तित्वात होती. हळदीच्या डागावर विधवा झालेल्या त्या मुलीला सारं आयुष्य परित्यक्त्या म्हणून व्यतीत करावे लागे. स्त्रीचं जीवन म्हणजे समाज व्यवस्थेने निर्माण केलेल्या चौकटीतलं जिणं होते. रूढी परंपरांचे प्राबल्प असलेल्या समाज व्यवस्थेत मुलीने शिक्षणासाठी कधी जावे हा प्रश्नच होता कारण वयाचा पाचव्या सहाव्या वर्षी विवाह होत लगेच बाळंतपण आणि कौटूंबीक जबाबदाऱ्या तिच्यावर पडत.

**विधवांची स्थिती**

खानदेशातील प्रचलित असलेल्या बालविवाह पध्दतीचा एक दुष्परीणाम म्हणजे विधवांची प्रचंड संख्या होय. विधवा स्त्रीचे जीवन म्हणजे अगदी मरणप्राय यातना सहन करण्यासारखं होतं. समाजाचा विधवा स्त्रीयांकडे बघण्याच्या दृष्टीकोन अतिशय वाईट असल्याचे प्रत्ययात येते. विधवांचा असहाय्य स्थितीचा गैरफायदा खानदेशातील समाज द्रोही लोक घेत असत. विधवावर जबरदस्ती करून अत्याचार करत. समाजाच्या या किळसवाण्या प्रकाराला कंटाळून काही विधवा घराच्या त्याग करीत वाममार्गाला लागीत किवा एखाद्या आश्रमाचा आश्रय घेत असत. स्त्री समानतेचा कोणी पुरस्कार केला तर रूढीवाद्यांची करडी नजर त्यांच्यावर पडत असते. खानदेशातील एरंडोल येथे श्री. सिताराम बिरला यांनी विधवा विवाहास उत्तेजन आणि आंतरजातीय विवाहस प्रोत्साहन दिल्यामुळे त्यांना १९४१ पासून बरीच वर्षे मारवाडी समाजाने समाज बहिष्कृत केले होते. समाजातील परिवर्तनवादी विचार मोडून काढण्यासाठी सनातनी मंडळी अशा प्रकारचे अघोरी उपाय योजित असत.

**खानदेशातील स्त्रीशिक्षण**

१९ च्या शतकात स्त्रीचं जीवन उंबरठ्याच्या आत बंदीस्त करून टाकलेले होते. अज्ञान आणि अंध:कारातून स्त्रीची सुटका करायची असेल तर त्यावर एकमेव व उपाय म्हणजे शिक्षण अशी विचारधारा २० व्या शतकाच्या पुर्वार्धात पुढे आली. महात्मा ज्योतिबा फुले आणि

ISSN : 2348-7143
Dec. 2018

सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाची मुद्दर्तवेळ महाराष्ट्रात रोखली. त्याच धरतीवर खानदेशातही स्त्री शिक्षणाच्या संदर्भात जनजागृतीस सुरूवात झाली. खानदेशातील जळगाव येथील सोा, सरस्वतीबाई साठे यांनी साक्षरता प्रसाराचे वर्ग चालविले होते. ९ मार्च ते ११ मार्च १९३५ याकाळात संयुक्त खान्देश महिला परिषद धुळे या ठिकाणी झाली. ज्याच्या अध्यक्षा सोा, इंदिराबाई भिडे स्त्री होत्या. या अधिक्षेनाला ३०० महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. स्त्री प्रश्नावर सकारात्मक विचार विनीमयास सुरूवात झाली. खान्देशातील स्त्री शिक्षणासाठी मुलींची पहिली शाळा १८६४ मध्ये धुळे येथे स्थापन झाली. स्त्रीयांनी शिक्षण घेणे ही धर्मबाह्य बाब नाही. तर ती काळाची गरज आहे हे विचार समाजात रूजविणे गरजेचे होते. त्यादिशेने २० शतकाच्या पुर्वाचीत जोरदार प्रयत्न झाले.

**खानदेशातील जातीय सलोखा**

खानदेशात विविध जाती जमातीचे लोक कधी सलोख्याने प्रेमाने तर कधी त्यांच्यात पराकोटीचे धार्मीक मतभेद होतांना दिसतात. सामाजिक विषमता निर्माण होण्यास विविध गटामध्ये असलेली असमानता जबाबदार असल्याचे दिसते. खानदेशातील बहादरपुर येथील बद्रीनारायणाच्या यात्रेला १९२८ मध्ये सवाद्य मिरवणुकीवर बंदीचा फतवा ब्रिटीशांनी काढला हा आदेश रामलाल मिश्रा यांना मान्य नव्हता. त्यांनी सवाद्य मिरवणुक काढली आणि हिंदु-मुस्लीम तणाव वाढला. शासनाचा हुकूम मोडल्याने रामलाल मिश्रा यांच्यावर खटला भरण्यात आला. जातीय तेढीची बिजे अगदी ग्रामीण भागापर्यंत गेल्याचे या काळात निदर्शनास येते. पारोळा येथील नवरात्र उत्सवात हिंदुची मिरवणुक मशिदीवरून जात असतांना संघर्ष होऊन ३७ हिंदुना अटक करण्यात येऊन खटला भरण्यात आला. यानंतर खानदेशात धरणगांव, नशिराबाद, शेंदुर्णी, पाळधी इ. ठिकाणी जातीय दंगली पेटल्या. ब्रिटीशांनी हिंदु-मुस्लिम धर्मियांच्या धार्मिक भावना भडकविण्याचा नेहमी प्रयत्न केलेला आहे. त्यांनी या धार्मिकांमध्ये एकसंघता कधीच निर्माण होऊ दिली नाही.

**खानदेशातील धर्म संकल्पना**

खानदेशातील जनतेची धर्मभावनेवर कमालीची श्रध्दा दिसून येते. खानदेशाच्या सर्वांगिण जीवनावर धर्माचे प्राबल्य असल्याचे दिसते. समाज जीवनाच्या उत्कर्षासाठी त्या समाजावर असलेली धार्मिकतेची पकड महत्वपुर्ण असते. १९ व्या शतकात समाजमनावर धार्मिकतेची जबरदस्त पकड होती. परंतु सनातनी मंडळींनी याचा वेगळाच फायदा उचलेला दिसतो. धर्मवेड्या खानदेशी माणसाच्या मनावर धर्म संकल्पनेचे विकृत स्वरूप बिंबवले होते. यातून समाजाची सुटका करण्याचा आणि समाजाला विधापक दिशा देण्याचा वारकरी संप्रदायाने प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते. खानदेशात वारकरी संप्रदायाच्या बऱ्याच संस्था कार्यरत असून त्यात उत्राण खर्ची व आडगांव या एरंडोल तालुक्यातील गावामधील वारकरी मंडळे, पाचोरा तालुक्यातील माहिजी, चाळीसगांव तालुक्यातील वालझिरी तसेच जळगांव व पाचोरा येथील संस्थाचा महत्वपुर्ण सहभाग धार्मिक प्रबोधनामध्ये असलेला दिसतो.

एकुणच खानदेशी धर्मभोळा माणूस रूढीवाद्यांच्या जाळ्यात सहज अडकला, ब्रिटिशांच्या कुटील डावास बळी पडला तर धर्मवेड्या मुस्लीमांच्या आक्रमतेचा शिकार ठरला.

**संदर्भ सूची :**

१) भनसाळी डी. एम (संपा.) – संयुक्त खानदेश डिरेक्टरी अर्थात संयुक्त खानदेशचा माहितगार (१९५२)
२) चौधरी कि. का. (संपा) – महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर, महाराष्ट्र भुमी व लोक (१९९४)
३) शहा (डॉ.) मु. ब. (संपा) – खानदेशचा सांस्कृतिक इतिहास, खंड ४, प्रकाशक का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययत संस्था (२००४)
४) पाटील (डॉ.) भी. ना. – खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०), (२००५)
५) मिश्रा चंद्रशेखर, स्व. रामलाल काळुराम मिश्रा जीवनी व स्मृतिसंच
६) साप्ताहिक प्रबोधचंद्रिका, १९ मार्च १९३५

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खानदेशातील शिरपूरचे प्राचीन व मध्ययुगीन, ऐतिहासिक महत्त्व

**प्रा. परदेशी भगवान ईश्वरलाल**
इतिहास विभाग, श्रीमती एच.आर. पटेल कला महिला महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे.

**प्रास्ताविक**

उत्तरेला सातपुडापर्यंत,दक्षिणेस सातमाळा, चांदोरा अजिंठा पर्वत रांगे पर्यंत, पूर्वेला हाती टेकड्या असून, पश्चिमेस सह्याद्री डोंगराच्या रांगापर्यंत पसरलेला हा भूप्रदेश होता. चिंचोळी पट्टीचा प्रदेश तो खानदेश म्हणून ओळखला जात असे.

महाराष्ट्र, महाराष्ट्रातील खानदेश मधील धुळे जिल्हा श्रीकृष्णाच्या पदस्पर्शाने पावन झालेला धुळे जिल्हा आकाराने लहान असला तरी अनेक वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. प्राचीन काळी हा प्रदेश ऋषीक-कृषिक म्हणून ओळखला जात असे. रामायण-महाभारत सुदेशकुमार चरित्रामध्ये तसे उल्लेख आढळतात त्यानंतर यादव घराण्याचा राजा सेऊनचंद्र ज्याने खानदेशावर राज्य केले. त्यानंतर सेऊण देश नावाने ही प्रचलित होता. महाभारताच्या भिष्म पर्वात विविध प्रदेशांच्या गोमता, मंदका, खर्डा, विदर्भ व रुपवाहिका असा उल्लेख आढळतो. त्यातील खर्डा म्हणजेच खान्देश असा अर्थ या इतिहासकारांनी लावलेला आहे. तर काही इतिहासकारांच्या मते खान्देश असा अर्थ म्हणजेच पूर्वीचे कान्हदेश म्हणजेच कृष्णाचा देश असे होते.

ऐन-इ-अकबरी या ग्रंथाचा लेखक अबुल फजल याने खानदेश असे संबोधिले दिसते कारण अकबराने खानदेश जिंकल्यानंतर या प्रदेशाची कारभाराची सुत्रे राजपुत्र दानयाल यांच्या हाती सोपविल्यावर त्याला दानदेश असे म्हटले होते.

काहींच्या मते गुजरातचा सुलतान पहिला अहमद याने या तालुक्यातील थाळनेरचा दुसरा फारुखी राजा मलिक यांना खान ही पदवी बहाल केली होती, त्यावरुन खान्देश हे नाव पडले.

ब्रिटीशकाळात जळगांव व धुळे मिळून 'खानदेश' हा एकच जिल्हा होता. जिल्ह्यांचे मुख्यालय धुळे येथे होते. पुढे खानदेशाचे 'पुर्वखानदेश' व 'पश्चिम खानदेश' असे दोन भाग करण्यात आले. पश्चिम खानदेश म्हणजेच थोड्याफार फरकाने विभाजन पूर्व धुळे जिल्हा होय. १९६१ मध्ये पश्चिम खानदेशाचे धुळे जिल्हा असे नामकरण केले गेले.

प्राचीन काळी अभीर-अपभ्रंश अहीर राजे सध्याचे धुळे-नंदुरबार-जळगाव किंवा पूर्वीच्या खानदेश परिसरात राज्य करीत होते. या अहिरांची बोली ती 'अहिराणी' ही अहिराणी बोली या भागात बोलली जाते.

१ जुलै १९९८ रोजी प्रशासकीयदृष्ट्या उपरोक्त धुळे जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन नंदुरबार या स्वतंत्र जिल्ह्याची निर्मिती केली गेल्याने धुळे जिल्ह्यात आता धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर हे तालुके आहेत.

याच खानदेश मध्ये धुळे जिल्ह्यातील शिरपूर, शिरपूर तालुक्याला पुरातन इतिहास आहे. यात या शहरास शिरपूर हे नांव कसे पडले याचा संदर्भ दिलेला आहे. फार काळी काळूबाबा नावाचे सदगृहस्थ होते. श्री. खंडेराव महाराजांवर त्याची श्रद्धा होती व ते नेहमी भगवंताची पुजा अर्चना नामस्मरण भक्ती यात मग्न राहत असत. काळूबाबा सांसरीक गृहस्थ होते. त्यांची व्यथा म्हणजे त्यांना मुलबाळ नव्हते. त्यामुळे त्यांनी स्वत:चे शिरकमळ देण्याचा खंडेराव देवाला नवस केला व साकडे घातले. यानंतर नवसाप्रमाणे त्यांना मुलगा झाला, नवसानुसार श्री खंडेराव महाराजांच्य चरणी शिरकमळ अर्पण केले असता शिरकमळातून रक्त न निघता भंडारा (हळद) चा पूर निघाला या शहराचे नाव शिरपूर असे पडले असे जुने वयोवृद्ध सांगतात.

'श्रीपूर' चा अपभ्रंश होऊन 'शिरपूर' हे नाव आले असावे असा तर्क केला जातो. श्री चा अर्थ लक्ष्मी आहे. लक्ष्मीचा सदैव वास असलेल्या या शहराचे 'श्रीपुर' हे नाव शहराची समृद्धी पाहता सार्थ ठरते.

*मना खानदेशनी भूमी*
*जणू सोनान्या खाणी*
*वाहे सुख-समृद्धीना पूर*
*त्यानं नाव शिरपूर*

खानदेशातील धुळे जिल्हा या जिल्ह्यातील तापी नदीच्या पासून अवघ्या १० कि. मी. च्या अंतरावर सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी व मध्यप्रदेशच्या सीमेलगत तसेच गुजरात राज्याच्या सिमेलगत असलेल्या शिरपूर या तालुक्याची ओळख आहे ती बालाजी नावाने व दरवर्षी खंडेराव देवाच्या नावाने यात्रा भरते असे शिरपूर. शिरपूर तालुका हा महाराष्ट्राची राजधानी मुंबई पासून ४०० कि.मी. अंतरावर आहे. समुद्र सपाटीपासून सुमारे १८० ते २१५ मिटर अंतरावर आहे. या तालुक्याचे क्षेत्रफळ २३६४.५३ चौ. कि. मी. असून या खेड्यांची संख्या १४७

इतकी असून ग्रामपंचायतींची संख्या ११६ इतकी आहे. येथील हवामान कोरडे असून उन्हाळ्यात तापमान ४३.४० सेल्सीअस व हिवाळ्यात १०.२० अंश सेल्सीअस असते.

मोतीराम पाटील (३६६-६७) यांना पश्चिम खानदेशातील शिरपूर येथे सापडलेल्या महाराज रुद्रदास यांच्या ताम्रपटावरुन आणि इंदूर येथे सापडलेल्या महाराला भुलुण्ड यांच्या ताम्रपटावरुन असे दिसून येते की, इंद्रदासाचे राजघराणे खानदेशवर राज्य करीत होते. हा राजा वैदीक कार्याचा पुरस्कर्ता व चाहता होता. भारद्वाज गोत्रातील ब्राम्हण द्रोणित्म यास जमीन दान केल्याची नोंद आहे. ब्राम्हणांच्या समुहाला जमिनीवरुन दान केलेल्या जमिनीच्या केलेल्या दानावरुन त्या ताम्रपटाला 'चतुरवैद्य समुह' असे म्हटले जाते. राजाने ११७ व्या वषी विकट्टानूक (विटनेर) गावी ब्राम्हणाला एक शेत दान केल्याची नोंद त्या ताम्रपटावर आहे.

अजिठांच्या लेखात नमनिर्देशित केलेले कुभकर्ण घराण्यांचे पूर्वजांचे संलग्न राजे वाल्खा येथून (वाघ) राज्य करीत होते. त्यांच्या अंगल पूर्व व पश्चिम खानदेशातील शिरपूर, विटनेर इत्यादी विभागावर होता.

इ. स. ४७० पूर्वी पश्चिम खानदेशातील थाळनेर येथे वाकाटक राजा हरिषेण याचा ताम्रपट मिळाला त्या ताम्रपटात हरिषेण राजाने थाळनेर मुक्कामी असतांना त्यांच्या मांडलीक व पराभूत गोमिक राजा याच्या परवानगीने तेथील काही गावे दान दिल्याचा उल्लेख आढळतो.

वाकाटक सम्राटाच्या खानदेशातील थाळनेर येथील कुंभकर्ण घराण्याचा मांडलीक राजा भानुषेण याने स्थलनगर विषय भागातील गौतम गोत्राचा ब्राम्हण नागवस यास पिंपरी मंडळाकातील, कोरडवाहू व बागायत जमीन शिरपूर येथील पिळोदे गावाची जमीन आणि टाकरखेडे गावाच्या दक्षिणेला 'पर्णसा' आणि 'पंसचा' प्रकारची जमीन दान दिल्याचा उल्लेख ताम्रपटात केलेला आहे. हा राजा याच चालुक्यांचा मांडलीक होता हे त्याने धारण केलेल्या 'महाराजा' या उपाधीवरुन स्पष्ट होते.

कुंभकर्ण घराण्यात पाच राजे होऊन गेल्याचे म्हटले आहे. त्यापैकी पुरुष जयराज याने 'आदिल महाराज' अशी उपाधी धारण केलेली दिसून येते.

खानदेशातील धुळ्याच्या ईशान्यकडे शिरपूर पासून जवळपास १४/१५ कि.मी. अतंरावर थाळनेरचा किल्ला व गाव बसले आहे.

थळ म्हणजे जमीन आणि नीर म्हणजे पाणी, जेथील जमीन समृद्ध आणि जेथे भरपूर पाणी आहे ते थाळनेर हे गाव आणि किल्ला अतिशय वैभवशाली समृद्ध, मोठी बाजारपेठ असलेले, भरभराटलेले, अभेद्य मध्ययुगात समृद्ध असलेले खानदेशची गावे असलेले गाव होते.

इ. स. १३७० मध्ये दिल्लीचा सुलतान फिरोजशहा तुघलक याने थाळनेर आणि करवंद हे दोन्ही परगाणे जहांगीर म्हणून मलिक उर्फ राजा अलिखालाला दिले. इ. स. १३७० मध्ये राजा अलिखा उर्फ राजा मलिक थाळनेर येथे आल्यानंतर त्याने खानेदशमध्ये फारुखी घराण्याचे राज्य स्थापन केले आणि थाळनेर ही आपल्या राज्याची राजधानी म्हणून असल्याचे जाहिर केले. कारण थाळनेरचा किल्ला हा राज्य करण्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने अभेद्य असा होता. पर्सी ब्राऊन या किल्ल्याचा उल्लेख 'बादशाही किल्ला' म्हणून करतो.

मलिक खान याच्यानंतर त्याचा लहान पुत्र इफ्तिकार थाळनेर येथे राज्य करीत होता. त्याचा मोठा बंधू मलिक नसीर खान ने १४१७ मध्ये थाळनेरवर आक्रमण करुन आपल्या लहान भावाचा पराभव करुन त्याला कैद करुन असीरगढच्या किल्ल्यात बंदिवासात ठेवले.

इ. स. १६०० मध्ये मोगल सम्राट अकबराने खानदेशच्या फारुखी घराण्याचा शेवटचा राजा बहादूरशहा फारुखी याचा पराभव केला आणि थाळनेर किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला.

मोगल नंतर हा किल्ला मराठा काळात पेशव्यांचा ताब्यात आला. तेव्हा त्यांनी इंदोरच्या होळकरांना सरंजाम म्हणून दिला होता. इ स. १८०० च्या दरम्यान तो निंबाळकरांच्या देखरेखीखाली होता. काही वर्षांनी तो पुन्हा होळकरांच्या ताब्यात आला मन्दसोरचा तह होईपर्यंत तो त्यांच्या ताब्यात होता.

माळव्यातील महिदपूरची लढाई संपल्यानंतर नर्मदा उतरुन सर थॉमस हिस्लाप हे सेंधव्याच्या घाटाने आपले सैन्य घेऊन दक्षिणेत येण्याकरीता खाली उतरत असता २७ फेब्रुवारी १८१८ मध्ये सैन्य सकाळी थाळनेरच्या टापूत पोहोचले. शत्रूचे लोक आपल्या किल्ल्या खालून जात आहे असे दिसून आल्याबरोबर किल्ल्यावरील लोकांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यानंतर या युद्धात थाळनेरचा मुख्य किल्लेदार ब्रिटीशांच्या हाती लागला व थाळनेरचा किल्ला आपल्या वर्चस्वाखाली आणला.

पहिला बाजीराव हा निजामाविरुद्ध मोहीम काढीत असतांना गुजरात मधील सुरत अलिमोहन मुलखाकडे गेला तिकडून येतांना त्याने खानदेशातून आगेकूच केली. १४ फेब्रुवारी १७२८ रोजी पेशव्याने शिरपूर वाघाडी येथे मुक्काम केला व तेथे मुक्कामी असतांनाच पेशव्याने एक पत्र चिमाजी आप्पास पाठविले होते.

खानदेशातील काही भागात राऊळकीची वतने होती. थाळनेर परगण्यातील मौजे वनावल, कुरखळी, टेकखेडे, मौजे होळ, मौजे नांथे, करवंद इत्यादी गावी मोकादमे, देशमुखी सारख्या वतनाप्रमाणे राऊळकीची ही वतने होती. अशा प्रकारे मध्ययुगीन काळामध्ये शिरपूरचे महत्त्व ऐतिहासिक दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१) प्रा. डॉ. महाजन टी. टी. : खानदेशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. १९९८
२) नगर परिषद विकास कामांचा अहवाल २००७
३) के. सागर : महाराष्ट्रातील जिल्हे , अनिरुद्ध पब्लिकेश्न हाऊस
४) लोकमत (वृत्तपत्र) : धुळे जिल्हा विकासाची भरारी वर्धापन दिन विशेष दिनांक १५ऑगस्ट २००७
५) प्रा. डॉ. शहा जी.बी. : महाराष्ट्रातील उपेक्षीत दुर्गांचा इतिहास, सुमेरु प्रकाशन पूर्व डोंबीवली, प्र.आ. फेब्रुवारी २००३

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# पश्चिम खानदेशातील ख्रिश्चन मिशनऱ्यांचे आरोग्य विषयक कार्याचा ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. विजय पुंडलिक साळुंखे**
सहाय्यक प्राध्यापक,
प्रताप कॉलेज, अमळनेर.

मिशनरी पश्चिम खानदेशात आले त्यावेळी पश्चिम खानदेशात वास्तव्य करणारा घभिल्ल आदिवासीङ समाज सामाजिक चाकोरीबध्द जीवन जगत होता. या समाजात अंधश्रध्दा, पशुबळी अशा चालिरिती प्रचलीत होत्या. समाजात बालविवाह, बहुविवाह प्रथा होत्या. या प्रथा-परंपरांशी आदिवासींची इतकी जवळीक निर्माण झाली होती की, खिस्ती मिशनऱ्यांनी या प्रथांविषयी जागृती करुनही मिशनऱ्यांना पूर्णपणे त्या बंद करता आल्या नाहीत.

मिशनऱ्यांच्या आगमनापूर्वी आदिवासी समाज सातपुडा भागात भटकंती करीत होता. समाज स्थिर नव्हता. रानात मिळणाऱ्या फळांवर, कंदमुळांवर आदिवासी आपली उपजिविका करीत असे. पहाडी प्रदेशातून लाकूड तोडून आणून ते शहरात विकत. त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह सुरु होता. मात्र ब्रिटिशांच्या जंगल विषयक कायदयामुळे मोळया विकणे, लाकूड तोडणेही बंद झाले. परिणामी सातपुडा भागातील आदिवासींची स्थिती आणखीनच दयनीय झाली होती.

भारतात १९ व्या शतकात सुरु झालेल्या प्रबोधन चळवळीचा कोणताही प्रभाव पश्चिम खानदेशावर पडला नाही. कारण पश्चिम खानदेशात शिक्षणाचा अभाव होता. मुंबई ईलाख्यात १९ व्या शतकात एल्फिंस्टनने शिक्षण विस्तारासंबंधी केलेले प्रयत्न मुंबई आणि पुण्यापूरतेच मर्यादित राहीले. शिवाय सरकारने आदिवासी प्रदेश संरक्षित घोषित केल्यामुळे या भागात फक्त मिशनरी सारख्या स्वयंसेवी संस्थाच कार्य करु शकत होत्या. परिणामी या भागात सुधारणांचे वारे पोहचू शकले नाहीत. तरीही या मिशनरी संस्थांनी पश्चिम खानदेशातील आदिवासी भागात जावून आदिवासींकरीता दवाखाने काढले आणि त्यांच्यावर सुश्रृषा केली. त्यामुळेच या भागात मिशनरींना मोठ्या प्रमाणावर धर्मप्रचार करता आला. पश्चिम खानदेश हा डोंगर, दऱ्या, पठारे, मैदाने असा भौगोलिकदृष्टया उंचसखल तसेच जंगलयम प्रदेश, त्यामुळे साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव या प्रदेशात जास्त आढळतो. मात्र या प्रदेशात वास्तव्य करुन रहाणारे आदिवासी शिक्षण प्रसार कमी असल्यामुळे भगत, भोपे हेच आजारपण दूर करतात असा त्यांचा समज होता. रोग भूताखेतांमुळे होतात असा त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे भूते पळवून लावण्यासाठी, दोरा मंतरणे, तावीत बांधणे, हे प्रकार सर्रास आजार बरे करण्यासाठी चालत.

१९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात, ए.पी. फ्रँकलीन हा स्विडीश मिशनरी मुंदलवड भागात प्रसारकार्यासाठी आला. आदिवासींमध्ये रुढ असणाऱ्या प्रथा, परंपरा आणि अंधश्रध्दा पाहून त्याने या भागातील पावरा आदिवासींमध्ये सेवाकार्याला प्रारंभ केला. त्याने या इ.स. घ१९०५ मध्ये मुंदलवड भागात एक डिस्पेंसरी स्थापन केली.ङ१ डिस्पेंसरी म्हणजे छोटा दवाखाना. या डिस्पेंसरीत तात्पूरता औषधोपचार केला जात असे. तथापि सुरवातीच्या काळात लोकांचा मिशनरी दवाखान्यावर विश्वास नसल्याने, किंबहुना मिशनरी दवाखान्यात पूर्णपणे आरोग्याच्या सोई नसल्याने, भगत भोप्यांचे महत्त्व आणि प्रसार जास्त असल्यामुळे, फ्रँकलीन यांना यश आले नाही. तरीही निराश न होता फ्रँकलीन यांनी आपले कार्य सुरु ठेवले.

मुंदलवड भागात १९ व्या शतकाच्या पूर्वाधात गावात रोगराई निवारण्यासाठी भगताकडे आदिवासी धाव घेत. भगताच्या अंगात पावरा लोकांची एखादी देवदेवता किंवा एखादया प्रसिद्ध मृत व्यक्तीचा आत्मा संचारत असतो अशी त्यांची मान्यता असे. भगत घुमत असतांना संबंधित व्यक्तीच्या दु:ख निवारणाचे उपायही सांगत असे. त्याशिवाय आजारी पडलेल्या माणसाला भगत गंडा, दोरा मंतरुन देत असे. भगताने मंतरुन दिलेल्या दोऱ्याने रोग बरे होतात, अशी आदिवासींची श्रध्दा होती. म्हणून मिशन दवाखान्यांना प्रारंभीच्या काळात फारसा लोकप्रतिसाद मिळाला नाही. असे असले तरी, मिशनऱ्यांनी कष्ट सहन करुन, आदिवासींमध्ये आरोग्या विषयी जनजागृती करण्याचे प्रयत्न केलेत.

इ.स. १९२२ च्या सुमारास तोरणमाळ येथे घ्डंकर ब्रदरनङ मिशनचे केंद्र स्थापन झाले. त्यांत च्डॉ.जॉन बुकानन आणि त्यांच्या पत्नी मागरिट यांनी सेवा कार्य केले. डॉ. जॉन बुकानन व्यवसायाने स्वत: डॉक्टर होते त्यांनी तोरणमाळ भागात पायी प्रवास करुन घरोघरी जाऊन आजारी रुग्णांची सुश्रृषा केली.छ२ असे असले तरी, त्यांना लोकप्रतिसाद मिळाला नाही. म्हणून बुकानन दाम्पत्याने खचून न जाता आपले कार्य सुरुच ठेवलेले दिसते.

तळोदा, काझीपूर आणि सेलीनपूर या भागात रेव्ह. ए.जे. सेलीन यांनी एक डिस्पेंसरी चालवली. श्रीमती व्हीक्टोरीया सेलीन यांनी तळोदा डिस्पेंसरीत दीन-दुबळया, दलित लोकांकरिता त्यांनी परिचारिका म्हणून सेवा कार्य केले. या डिस्पेंसरीत तात्पूरत्या औषधोपचाराच्या सोई पूरवून देण्यात आल्या होत्या. सेलीन नंतर च्वॉल्टर इंगब्लुम आणि श्रीमती वॉल्टर या दाम्पत्याने तळोदा भागात लोकांना औषधोपचार देण्यासाठी पायपीठ केली.छ३ त्यांनी आजुबाजूला खेडेगावी जाऊन आजारी रुग्णांवर औषधोपचार केले. असे असले तरी, मिशनऱ्यांचे

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

आरोग्याच्या क्षेत्रातील कार्य पुरेसे नसल्यामुळे शिवाय रुढी आणि अंधश्रद्धांचा प्रभाव आदिवासी समाज जीवनावर असल्यामुळे मिशनरी दवाखान्यातून मिळणाऱ्या मोफत औषधोपचाराने आदिवासींच्या आरोग्य विषयक समस्या सुटल्या नाहीत. घ्इ.स १८१८ मध्ये खानदेशात फल्यु ची साथ आली.ङ४ फल्यु निवारण्यासाठी मिशनऱ्यांनी गावांगावात जाऊन उपचार केलेत. इ.स. सन १९१० मध्ये मिशनरी म्हणून भारतात आलेल्या श्रीमती एस्तेर रित्झमन यांनी नवापूर भागात मोठया जीद्दीने सेवाकार्य केले. त्यांनी रस्त्यावर, घरांघरात जाऊन येशूचा संदेश नवापूर, पिंपळनेर व अमळनेर भागातील लोकांना दिला. त्यांना वैद्यकीय ज्ञान होते. त्या प्रशिक्षित परिचारिका असल्यामुळे खेडयापाडयातून लोक त्यांच्याकडे उपचार करुन घेण्यासाठी येत. घ्सफेद केसांची बाईङ हे टोपण नाव लोकांनी त्यांना दिले.

मिशन कार्यात वैद्यकीय सेवा नेहमीच महत्त्वाची आहे असे मिशनऱ्यांना वाटत होते. शारीरिक आजाराकडे माणसाला दूर्लक्ष करता येत नाही. दवाखाना मिशनचा असला आणि मिशनऱ्यांना विरोध असला तरी, त्या दवाखान्याकडे लोकांची गर्दी होते, हे मिशनरींनी ओळखले. म्हणून वैद्यकीय सेवा सुरु करुन तेथे उपचारार्थ आलेल्या रुग्णांमध्ये धर्मप्रसार करण्याची संधी मिळेल म्हणून मिशनऱ्यांनी खानदेशात दवाखाने सुरु केलेले दिसतात.

श्री.जोहान्सन हे इव्हँन्जेलिकल अलायन्स मिशनचे मिशनरी नवापूर भागांत २० व्या शतकाच्या सुरुवातीला आले. त्यांनी नवापूर पासुन १० मैल अंतरावर चिंचपाडा येथे सेवाकार्याला प्रारंभ केला. मात्र च्इ.स. १९१४ मध्ये श्रीमती जोहान्सन आजारी पडल्या म्हणून त्या उभयतांस अमेरीकेत निघून जावे लागले.छ५ मिशनरी निघून गेल्यामुळे मिशन कार्य या भागात काही काळ थंडावले मात्र डॉ.क्लोके आणि श्रीमती क्लोके यांनी पुढे मिशन कार्याची धुरा सांभाळली.

ज्या आदिवासींमध्ये आपण धर्मप्रसाराचे कार्य करीत आहोत. त्यांना वैद्यकीय सेवेची किती गरज आहे हे मिशनरींना जाणवत होते. आणि त्या जाणीवेतूनच त्यांनी दवाखाने सुरु केल्याचे दिसते. कोणताही आजार झाला अथवा रोगाची साथ सुरु झाली तर ती भूताखेतांमुळेच झाली असे मावची भिल्ल मानीत होते. त्यामुळे रोगाचे निर्मूलन न होता टायफाईड, मलेरीया, निमोनिया व पटकी या सारख्या साथीच्या आजारांचे प्राबल्य वाढतच होते. सुरुवातीला मिशनरींनी तुटपुंजी औषधे देवून गरजवंतांची गरज भागविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या तुटपुंज्या औषधोपचारांचा काहीच उपयोग होत नव्हता.

पश्चिम खानदेशात प्रामुख्याने हिवताप, देवी, नारु, कॉलरा, पोटाचे विकार हे आजार आढळत. सातपुडयाच्या आसपास घनदाट जंगल, विषम हवामान,ऋतुमानात स्थानपरत्वे होणारे बदल, या कारणांमुळे हिवताप आणि मलेरीया सारख्या आजारांचे प्रमाण अधिक दिसून येते. च्इ.स. १८१८ मध्ये कॅ.ब्रिग्जच्या तुकडीतील ८४ सैनिक कॉलरामुळे मृत्यू पावले.छ६ कॅ.ब्रिग्जच्या अहवालातील विधानावरुन कॉलराच्या भयंकर प्रकोपची कल्पना येते. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी साथीच्या रोगाच्या काळात पश्चिम खानदेशात आदिवासींमध्ये जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. साथीच्या रोगाची सुरुवात झाली की, भिल्ल आदिवासींचा असा समज होता की, त्यांच्यावर मरीआईचा कोप झाला. हे अशिक्षीत आदिवासी मरीआईला कोंबडया, बकरी, नारळ, खण, हिरवा चुडा, हे अर्पण करीत असत. साथीच्या रोगांच्या नियंत्रणासाठी सरकारी उपाययोजना कमी पडत, कारण २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात खानदेशात दळणवळणच्या साधनांचा अभाव होता. मात्र ख्रिस्ती मिशनरी खेडोपाडी पायी फिरुन साथीच्या रोगांविषयी लोकजागृती करीत असत. हा आजार देवी कोपली म्हणून झाला नाही, तर स्वच्छता ठेवा, इंजक्शने घ्या, घाबरु नका, रोगाची साथ बंद होईल असे सांगत. पण लोकांचा त्यावर विश्वास बसत नसे, लोकांचा त्यावर विश्वास बसावा व लोकांची आरोग्य विषयक समस्या सुटावी म्हणून च६ सप्टेंबर १९१८ रोजी चिंचपाडा येथे श्रीमती क्लोके आणि डॉ.क्लोके यांनी दवाखाना सुरु केला.छ७ या दवाखान्याच्या स्थापनेमुळे आदिवासींच्या समस्या सुटण्यास मदत झाली. चिंचपाडयाच्या या दवाखान्यात औषधे, एक प्रयोगशाळा आणि शस्त्रक्रिया करण्यासाठी एक टेबल अश्या त्रोटक साहित्यांचा समावेश असलेला अगदी साधा दवाखाना होता.

च्डॉ.क्लोके यांनी या दवाखान्याच्या उद्घाटनास जमलेल्या मंडळीस बोलावून त्यांना सुक्ष्मदर्शक दाखविला. आजार जंतुमुळे होतात असे सांगुन हे जंतु त्यांना सुक्ष्मदर्शकातून बघण्याची दूर्मिळ संधी दिली.छ८ त्याचा परिणाम असा झाला की, चिंचपाडयाच्या या छोटया दवाखान्याची जाहिरात लोकांनीच सुरु केली. रोग भूताखेतांमुळे होत नाही तर ते जंतुमुळे होतात आणि ते जंतु आपण प्रत्यक्ष डोळयांनी पाहिले असा प्रचार लोकांनी केल्यामुळे चिंचपाडा येथे मिशन दवाखान्यात लोकांची वर्दळ सुरु झाली. त्याचा अनुकूल परिणाम म्हणून मिशन कार्याला गती मिळालेली दिसुन येते.

नवापूर या मावची आदिवासींचे वास्तव्य असणाऱ्या तालुक्यात एकच तेवढा दवाखाना होता. सरकारी दवाखाने मोठ–मोठया शहरात होते. मलेरीया, टाईफाईड, गुप्तरोग, कुष्ठरोग, देवी, कॉलरा, प्लेग हे सर्व आजार भगताच्या छु–छा ने बरे होणारे नव्हते. खूद: मिशनरीही आजारी पडत, त्यांनाही उपचार करुन घेण्यास आरोग्य केंद्र नव्हते. चिंचपाडयाला हा दवाखाना निघाल्यामुळे ही गरज थोडया अंशी का हाईना दूर झाली. च्इ.स. १९१८ मध्ये प्लेग आणि पिवळा ताप (मानमोडी) इ. रोगांमुळे खानदेशच्या ग्रामिण भागात अनेक लोक मरण पावले.छ९ त्यामुळे ग्रामीण भागात सेवाभावी दवाखाना असला पहिजे याची जाणीव ख्रिश्चन धर्मप्रचारकांना झाली आणि त्याचाच परिणाम

म्हणून चिंचपाडयात मिशनच्या वैद्यकीय सेवेची सुरुवात झाली.

चइ.स. १९३२ मध्ये श्री.रिचर्ड थॉमस हे सेवक म्हणून आले आणि वैद्यकीय सेवेस व्यवस्थित स्वरुप प्राप्त होऊ लागले. श्री.थॉमस यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले होते. त्यांना रोग उपचार करता यावा, बाह्य रुग्णांसाठी खोल्या बांधता याव्यात म्हणून काही अमेरीकन मित्र मंडळीने पैशाची मदत पाठविली.छ१० थॉमस यांच्या प्रयत्नामुळे आणि त्यांना अमेरीकेतून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे बाहेर गावाहुन येणाऱ्यांना तेथे राहून उपचार घेता येऊ लागले. चइ.स. १९३९ ला कार्ल क्लोक हे चांगले प्रशिक्षित डॉक्टर वैद्यकीय सेवेसाठी चिंचपाडयास लाभले.छ११ त्यामुळे मिशनच्या सेवेला वेग येऊ लागला, रुग्णांची संख्या वाढू लागली. इ.स. १९४१-४२ या चएका वर्षाच्या कालावधीत २१,५०० रुग्ण उपचार घेऊन गेले. त्यापैकी ४५० रुग्णांना दवाखान्यात दाखल करुन, त्यांच्यावर उपचार केले. त्यापैकी निम्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करुन उपचार केले.छ१२ याचाच अर्थ असा की, मिशनरी दवाखान्यांना चांगला लोकप्रतिसाद मिळाला परिणामी मिशनऱ्यांनी वैद्यकीय सेवा वाढवून लोकांना आरोग्याच्या सोई उपलब्ध करुन दिल्या. मिशनरी डॉक्टरांवर लोकांची किती श्रद्धा होती तो अनुभव मिशनऱ्यांना चिंचपाडयाच्या आजुबाजूच्या खेडयापाडयात फिरतांना आला. चचिंचपाडा भागातील एका खेडे गावांत एक मिशनरी सुवार्ता सांगण्या गेले तेथे त्यांना एक खेडूत भेटला, तो त्यांना म्हणाला, तुमचा येशू मला महिती आहे ! तुम्हाला त्याचे प्रत्यंतर दाखवितो.छ त्याने अंगातले शर्ट काढले आणि पाठीवरचा शस्त्रक्रियेचा बरा झालेला मोठा व्रण दाखविला, चतुमच्या येशूनेच ही शस्त्रक्रिया करुन, मला मरता-मरता वाचविले  ज्याने ते ऑपरेशन केले त्या ख्रिस्ती डॉक्टरलाच तो खेडूत येशू मानित होता.छ१३ या वरुन असा निष्कर्ष निघतो की, ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसार करतांना कोणावरही बंधने घातलेली नव्हती. ब्रिटिशकालीन भारतात मिशनरी सक्तीने धर्मांतर करतात असे आरोप मिशनऱ्यांवर केले जात. असे असले तरी, मिशनऱ्यांनी बाप्तीष्मा घेण्यासाठी कोणावरही सक्ती केली नाही. मिशनऱ्यांच्या सेवाभावी वृत्तीने प्रभावीत होऊन धर्मांतरे घडून आलीत. त्यात दवाखाने हे एक प्रमुख माध्यम होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांना हे कार्य साध्य करण्यासाठी अनंत यातना, कष्ट सहन करावे लागले. या विषयी गोविंद नारायण माळगांवकरां सारख्या लेखकाने म्हटले की, चज्या अडचणी मिशनरी लोकांस भारत खंडात राहण्यासाठी प्राप्त जाहल्या, त्याचा एक शतांश जरी आमच्या एखादया धर्माभिमानी पुरुषास प्राप्त जाहला असता, तर त्याने केव्हाच गाशा गुंडाळून काशी यात्रेची वाट धरली असती.छ१४ हे म्हणणे काहीसे सार्थकच वाटते. मात्र मिशनरींनी अनंत अडचणी सोसुन, पायपीट करुन, सेवाकार्याव्दारे धर्मप्रसार घडवून आणला.

चिंचपाडा येथे इव्हँन्जेलिकल अलायन्सच्या अमेरीकन मिशनऱ्यांनी दवाखाना काढून सेवाकार्य केले, तर धुळयात मेथॉडीस्ट प्रोटेस्टंट अमेरीकन मिशनरी श्रीमती मॅथ्यू लाँगर्ड आणि श्रीमती फलोरेन्स विल्यम या महिलांनी मेथॉडीस्ट मिशनच्या प्रसार कार्यासाठी सेवाभावी दवाखाना काढला. श्रीमती मॅथ्यू लाँगर्ड आणि श्रीमती फलोरेन्स विल्यम यांना लोक अनुक्रमे मोठी अंटी व लहान अंटी म्हणून संबोधीत. हा दवाखाना धुळे, हरणमाळ, मोरणे या भागात अंटीचा दवाखाना म्हणून प्रसिध्द होता.

घइ.स. १९२९ मध्ये या दवाखान्याची इमारत बांधण्यात आली.ङ१५ मेथॉडीस्ट मिशनरींनी धर्मप्रसार करीत असतांना धुळे येथे एक बोर्डींग चालवली. या बोर्डींग मधील सुवार्ता नावाची एक मुलगी मरण पावली. तिचे स्मरण म्हणून या दवाखान्याचे नाव घसुवार्ता मेमोरीयल हॉस्पीटलङ असे ठेवण्यात आले. या दवाखान्यात ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम, शिख या सर्व धर्मियांवर मोफत उपचार केली जात. चडॉ.ग्लेसी यांनी इ.स. १८२९ पासून दवाखान्यातील रुग्णांसाठी मुक्तपणे सेवाकार्य केले.छ१६ डॉ.ग्लेसी यांच्या सेवाभावी कार्यामुळे आणि त्यांच्याकडून मिळणाऱ्या आपुलकीच्या वागणुकीमुळे मिशन दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली. त्यामुळे मिशन कार्याची भरभराट झालेली दिसते. चइ.स.१९३२ मध्ये डॉ. रोझी कालीदास यांनी दीन- दुबळया, दलित लोकांसाठी सेवाकार्य आरंभीले.छ१७ या कार्यात अर्थात त्यांचा स्वार्थी हेतू होता हे नक्कीच. मात्र आपल्या सेवाभावी कार्याने त्यांनी आदिवासींना प्रभावीत केलेले दिसते.

चडॉ. रोझी कालीदास या स्त्री रोग तज्ज्ञ आणि गुप्त रोग तज्ज्ञ होत्या. रोझी कालीदास आणि डॉ. डॅनियल यांचे लग्न झाले त्यामुळे मिशन दवाखान्यात डॉ. डॅनिअल यांचीही मदत झाली.छ१८ डॉ. रोझी आणि डॉ. डॅनियल यांनी केलेल्या वैद्यकीय सेवेमुळे मिशन दवाखान्याची प्रगती झाली.

इ.स. १९४० च्या सुमारास परदेशातून दवाखान्यासाठी लागणारी अद्ययावत सामग्री मागविण्यात आली आणि श्री.प्रतापराव देवराम कसोटे यांना लॅब टेक्नीशियन च्या ट्रेनिंगसाठी मद्रासला पाठविण्यात आले. असे स्वत: प्रतापराव कसोटे सांगतात. प्रतापराव कसोटे यांनी ट्रेनिंगहून परतल्यानंतर लॅब टेक्नीशियन म्हणून १९८६ पर्यंत या दवाखान्यात सेवा कार्य केलेले दिसते.

श्री. प्रतापराव देवराम कसोटे दवाखान्यातील एक प्रसंग सांगतात, चसुशील संदाशिव नवाचा मुलगा चिंचेच्या झाडावरुन पडला असता, त्यांचा पाय मोडला तो तोडून कृत्रिम श्वासोच्छ्वास (आर्टीफिशीयल रेस्पीरेशन) देवून, नवीन लाकडी पाय बसविण्याचे कौशल्य मिशनरी डॉक्टरांनी करुन दाखविले.छ१९ या प्रसंगामुळे आदिवासी वस्त्यांमधील अंधश्रध्दा कमी होण्यास मदत झाली.  तरीही भगत, भोपे, चेटकीन यांचे महत्त्व कमी झालेले दिसून येत नाही.

चइ.स. १९४२ पासून डॉ.पवार यांनी मिशनरी दवाखान्यात डॉक्टर म्हणून सेवा कार्याला सुरुवात केली. यावेळी जमालोद्दीन अन्सारी

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

आणि दामोधर नगरे हे परिचारक, तर मंजुळा कर्मारकर परिचारिका होत्या.छ२० स्थानिक डॉक्टर परिचारक आणि परिचारिका असल्यामुळे रुग्णांना त्यांचेशी स्थानिक भाषेतून संपर्क साधणे सोपे झाले. च्डॉ.फ्रेडरीके जेम्स डॅनियलछ२१ आणि च्प्रसाद नाथन् कालीदास छ२२ यांनी मेथॉडीस्ट मिशनकरीता वैद्यकीय सेवा दिली. मिशनऱ्यांच्या सेवाकार्याने प्रभावीत होऊन, धुळयाच्या मिशन दवाखान्यात आलेल्या रुग्णांनी येशूला देव मानण्यास सुरुवात केली. अश्या प्रकारे धर्मप्रसाराचे माध्यम म्हणून सेवाभावी दवाखाने सरस ठरल्यामुळे मिशनऱ्यांनाही त्यामुळे दवाखाने उघडून सेवाकार्य करण्यास प्रेरणा मिळाली.

इ.स. १९१५ मध्ये डेन्मार्क स्त्रियांच्या मिशनरी गटाने केलेले कार्यही लोकोत्तर होते. या मिशनरी स्त्रियांनी शहादा भागात पायपीठ करुन, गरजू आदिवासी रुग्णांवर उपचार केले. च्इ.स. १९१८ मध्ये खानदेशात मानमोडीची साथ आली.छ२३ या साथीच्या रोगात अनेक लोक मृत्युमुखी पडले. काही कुटूंबे उद्ध्वस्त झाली. त्याचा परिणाम म्हणून अनेक लहान मुले अनाथ झाली. म्हणून या मिशनरी स्त्रियांनी शहादयास एक अनाथालय उघडले. शहादा मिशन हे डेनमार्कचे मिशन होते. या मिशनमध्ये फक्त स्त्रियांचा सहभाग होता. त्यामुळे या स्त्रिया चिंचपाडा किंवा धुळयासारखा दवाखाना काढू शकल्या नाही. असे असले तरी, च्मारीया जेकबसन, रुथ जॉनसन, ॲन्ना लॉरीडसन, एना लीसा ओस्कारसन, हुल्डा बिजोर्क या मिशनरी स्त्रिया तळोदा, सेलीनपूर या आदिवासी पाडयांमध्ये जाऊन आदिवासी रुग्णांवर उपचार करीत.छ२४ असे असले तरी, मिशनरी परिचारिकांना आजूबाजूला खेडोपाडी दररोज पायी प्रवास करणे शक्य झाले नाही. परिणामी त्यांच्या कार्याचा प्रभाव आदिवासींवर पडला नाही. तरीही शहादा भागातील आदिवासींना तात्पूरत्या स्वरुपाच्या का होईना, औषधोपचाराच्या सोई उपलब्ध झाल्या. शहादा येथील चर्चमध्ये बसविलेल्या कोनशिलेवरुन आणि काही स्थानिक महितीवरुन असे दिसते की, शहादा भागात श्रीमती इंगर वालु आणि त्यांची मुलगी सुवार्ता जयवंत वालु यांचे कार्यही महत्त्वाचे आहे. सुवार्ता वालु यांना लोक घ्सुर्वाता आक्काङ म्हणून संबोधीत. या मिशनरीने शहादा, बोरद, लोणखेडा, मलोणी या भागात घ्इ.स. १९५४ ते इ.स. १९९४ अशी चाळीस वर्ष मातोश्री, परिचारिका, मिशनरी म्हणून सेवाकार्य केले.ङ२५ सुवार्ता आक्कांच्या सेवाभावी कार्यामुळे धर्मप्रसाराला गती मिळाली.

शहादा भागात डेनमार्क मिशनरी महिलांच्या प्रयत्नामुळे काही प्रमाणात आरोग्य सेवांचा प्रचार होऊन, आदिवासींमधील अंधश्रध्दांना आळा बसला. मात्र पूर्णपणे आदिवासींमधील भोळया समजूती नष्ट झाल्या असे आपणास म्हणता येणार नाही.

पश्चिम खानदेशात शिक्षण प्रसाराच्या कार्यात अग्रेसर असणाऱ्या ढालग्रीन या मिशनऱ्याने नंदूरबार जवळ धानोरा येथे एक स्वतंत्र वसाहत स्थापन केली. मात्र वैद्यकीय सेवेची धानोऱ्यास पायाभरणी करण्याचे कार्य हेनेक हेडबर्ग यांनी केले. च्हेडबर्ग यांनी धानोऱ्यास एक डिस्पेंसरी क्लिनीक स्थापन केले.छ२६ कारण धानोरा भागात दवाखान्याची सोय नव्हती. म्हणून तात्पूरत्या स्वरुपाच्या औषधोपचाराच्या सोई आदिवासींना मिळाव्या हा हेतू हेडबर्ग यांनी लक्षात ठेवून, डिस्पेंसरी काढली. या डिस्पेंसरीत परिचारिका म्हणून च्श्रीमती मेलीन, श्रीमती लींडक्वीस्ट यांनी परिचारिका म्हणून १९४७ पर्यंत सेवाकार्य केले.छ२७ त्यानंतर लतीकाबाई पवार या परिचारिका म्हणून या डिस्पेंसरीत सेवाकार्य करीत होत्या.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीस दोंडाईचा भागात मिशनऱ्यांनी सेवाकार्य केलेले दिसुन येते. त्यांनी इ.स. १९३३ च्या सुमारास एक डिस्पेंसरी चालविण्याचे उल्लेख मिळतात. च्या डिस्पेंसरीत परिचारिका म्हणून ॲलन व्ही. ॲन्डरसनछ२८ कार्य करीत होत्या. असे असले तरी, दोंडाईचा भागात मिशनरी कार्याला फारसे यश आलेले दिसून येत नाही, कारण डॉक्टरी उपचार उपलब्ध असतांनाही लोक भूताखेतांना पळवून लावणारे भगत यांच्याकडेच धाव घेत. भूतेखेते, चेटूक करणारी चेटकीन, यांच्या नजरा आपल्या मुलाबाळांवर पडू नयेत आणि त्यांना बेडक्या, कावडया, सरडया अशी नावेही दिली जात किंवा आपल्या मुलांच्या गळयात काळा दोरा किंवा एखादा कापडाचा तुकडा तावीत म्हणून बांधीत. हे सर्व प्रकार भगताच्या सांगण्यावरुन होत. एवढी लोकांची भगतांवर श्रद्धा होती. शिवाय माणूस मृत्यु समयी शेवटच्या घटका मोजीत असतांना, कुऱ्हाड किंवा विडा त्याच्या शेजारी ठेवले तर मृत्यू पळून जातो, असे मानले जात होते अर्थात या भिल्ल आदिवासींच्या परंपरागत कल्पना होत्या आणि त्याचा त्याग करण्याची मानसिकता भिल्ल आदिवासींची नव्हती. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हे प्रकार वाढू नयेत म्हणून सातत्याने लोकजागृती केली. भगत जास्त पैसे घेतो तरी, आजार बरा होत नाही मिशन दवाखान्यांमध्ये नाममात्र पैसे घेऊन, रोगी खळखळीत बरे होतात हे लोकांना समजून येऊ लागले तरही आदिवासींच्या मनातील भ्रम पूर्णपणे बरे झाले नाहीत.

पिंपळनेर येथे च्इ.स. १९२२ च्या सुमारस ओ.ए.ढालग्रीन या मिशनरीने एक डिस्पेंसरी सुरु केली.छ२९ या डिस्पेंसरी स्थापनेमुळे पिंपळनेर, सामोडा, सुकापूर, चेकी या भागातील आदिवासींना प्रथामोपचाराच्या वैद्यकीय सेवा मिळाल्या. पिंपळनेर येथे प्रथमोपचारा नंतर रुग्णांना चिंचपाडा येथे मिशन दवाखान्यात पाठविण्यात येत असे. घ्इ.स. १९४३ मध्ये खानदेशात प्लेग ची साथ आली. त्याबरोबर दुष्काळानेही जनतेच्या दैन्यावस्थेत भर घातली.ङ३० त्यावेळी घ्कॅरल हेस्टींग्ज नावाच्या मिशनरी बाई पिंपळनेरला सेवाकार्यासाठी आल्या. त्यांनी प्लेग हा माश्या आणि उंदरांमुळे होतो असा प्रचार सुरु केला आणि जनतेत प्लेग या रोगाविषयी जागृती घडवून आणली.ङ३१ या भागात उंदरांचा इतका सुळसुळाट होता की, रात्रीच्या वेळी कॅरल झोपत असतांना तिच्या अंगावरुन उंदीर उडया मारत. प्लेग पासून रक्षण करण्यासाठी मिशनरींनी सुरुवातीला प्लेग प्रतिबंधक लसी स्वत:स टोचून घेतल्या व नंतर इतरांनाही टोचण्यास सुरुवात केली. मिशनऱ्यांच्या या

ISSN : 2348-7143
Dec. 2018

सेवाभावी कार्यामुळे प्लेग काहीसा आटोक्यात आला. कॅरल हेस्टीग्जने खानदेशात सेवाकार्यासाठी मराठी भोषेचा मन लावून अभ्यास केला आणि मराठी भाषा आत्मसात करुन त्यांनी पिंपळनेर, अमळनेर, चिंचपाडा, कळवण या भागात ३८ वर्ष सेवाकार्य केले.

**निष्कर्ष**

ख्रिस्ती मिशनरींनी धर्मप्रसार करीत असता सेवाभावी कार्य म्हणून दवाखाने काढले. त्यामुळे आदिवासींना आरोग्याच्या सोई उपलब्ध झाल्या. मिशनरी खानदेशात येण्यापुर्वी या भागात दवाखान्यांची सोय नव्हती. अंधश्रध्दांचा पगडा समाज मनावर होता. हा आदिवासी समाज आजार बरे करण्यासाठी कोंबडया, बकऱ्या मरी आईला बळी देत होता. शिवाय देवीला नवस बोलले जात. आजार बरा होण्यासाठी आदिवासी भगाताकडून दोरा, गंडा मंतरुन घेत, मरी आईचा कोप झाला म्हणून आजार आला अशा समजुती पश्चिम खानदेशातील समाजात प्रचलीत होत्या. या अधश्रध्दाळु समजतींविरुध्द मिशनरींनी आवाज उठवला, प्रचलीत रुढी परंपरांवर टिका केली आणि नवीन शिक्षणाने आपल्या परंपरागत अंधश्रध्दा आणि भोळया समजुती नव्या जीवनासंदर्भात तपासुन पाहण्याची प्रेरणा दिली. मिशनरींनी भारतीय समाजातील मूर्तीपुजेवर कडाडून टिका केली. ठिकठिकाणी भाषणेही दिलीत. तरीही अंधश्रध्दांचे प्राबल्य कमी झाल्याचे दिसून येत नाही.

मिशनरींनी आदिवासींना आरोग्याच्या सोई प्राप्त करुन दिल्यात. परिणामी भगताविषयी असणाऱ्या अंध:श्रध्देला काहीशी तिलांजली मिळाली. पश्चिम खानदेशात असणाऱ्या सातपुडा पर्वत रागांमुळे या भागात रस्त्याची सोय नव्हती. जर एखादा माणूस आजारी पडला तर त्याला पालखी अथवा बैलगाडीने शहरापर्यंत यावे लागत असे. शिवाय शहरात सोय मिळूनही आर्थिकदृष्टया मागासलेल्या आदिवासींकडे उपचार करुन घेण्यास पैसेही नसत. त्यामुळे वर्षानुवर्ष आदिवासी समाज आरोग्याच्या सोईपासून वंचित होता. आदिवासी भागातील स्त्रीयांची बाळंतपणाची समस्या तर कठीणच होती. परंपरागत पध्दतीने बाळंतपण करणारी सूईनबाई अप्रशिक्षीत असूनही बांळतपण करी. त्यामुळे गर्भवती स्त्रीच्या मृत्यूचा धोका संभवत असे. शिवाय नवजात अर्भकाचाही अकारण मृत्यू होत असे. यावर उपाय म्हणून मिशनरींनी दवाखाने काढले. या दवाखान्यातील प्रशिक्षित परिचारिका. आरोग्यविषयक जागृती करु लागल्या. शिवाय आजारांवर मोफत उपचार करुन रुग्णांची चिंचपाडा दवाखान्यात पाठविण्याची व्यवस्था केली जात असे. त्यामुळे आजारी असलेला माणुस मिशनऱ्यांच्या सेवाकार्याने प्रभावित होऊन मिशरींनकडे आकर्षित झाला. मिशनरी आणि परिचारिकांच्या कार्यामुळे शहादा, पिंपळनेर, दोंडाईचा, सेलीनपूर, तळोदा, नंदूरबार, नवापूर, साक्री, शिरपूर भागात आरोग्य विषयक सुविधांचा प्रचार आणि प्रसार झाला. मिशनरी दवाखान्यात मोफत औषधोपचार उपलब्ध झाल्यामुळे आर्थिक अडचणींमुळे वैद्यकीय सेवेला मुकणारे आदिवासीही औषधोपचार घेऊ लागले. त्यामुळे भगत, भोपे, चेटकीण यांचे महत्त्व कमी होण्यास मदत झाली. मिशनरींच्या या कार्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली. मिशनरी दवाखान्यांना सुरुवातीच्या काळात चांगला लोकप्रतिसाद मिळाला. कारण इतरत्र सरकारी दवाखान्यांची सोय नव्हती. त्यामुळे मिशनरी दवाखान्यात लोकांची वर्दळ रहात असे. १९४०-४१ या एका वर्षात चिंचपाडा मिशन दवाखान्यात २१५०० रुग्ण उपचार घेतल्याची माहिती मिळते.

मिशनरींनी दवाखाने काढून आरोग्य सुविधांचा प्रसार तर केलाच पण भगत भोप्यांविरुद्धही आवाज उठविला. मिशनरींशी संपर्क येण्यापूर्वी भगताचे काम करणाऱ्या मोन्या उकडया बारीश या व्यक्तींने भगत ढोंगीपणाने लुबाडणुक करतो. असाच काहीसा सुर काढला. त्यामुळे भगत भोप्यांच्या ढोंगीपणाला काही अंशी आळा बसला. मेथॉडीस्ट मिशनरींच्या प्रयत्नामुळे धुळे येथील, अंन्टीचा दवाखाना तसेच पूर्व खानदेशातील पारोळा येथे श्रीमती टीना जोहानसन यांच्या प्रयत्नामुळे दवाखाना निघाला. इ.स.१९६२ च्या दरम्यान शिरपूरला घविश्व सेवा मंडळङ ही संस्था 'आनंद सदन' दवाखाना चालवित होती. दवाखाने काढून सेवाभावी कार्य करणारे मिशनरी आदिवासींकरीता सेवक होते.

पश्चिम खानदेशातील जनतेस अधश्रध्दांपासुन वाचवण्यात आणि सार्वजनिक आरोग्य निर्माण करण्यात मिशनरींनी मोलाची भूमिका बजावली. मात्र तरीही आदिवासी भागाचा आरोग्यविषयक प्रश्न पुर्णपणे सुटलेला दिसत नाही. भारत सरकारने सार्वजनिक आरोग्यावर मुबलक प्रमाणात खर्चाची तरतुद केली. त्यामुळे ठिकठिकाणी आरोग्य केंद्रे निघाली. परिणामी मिशन दवाखान्यांकडे लोकांची जाणारी गर्दी कमी झालेली दिसते. तरीही आदिवासी भागात, कुपोषण, बालमृत्यु या समस्या समूळ नष्ट झालेल्या नाहीत.

मिशनरींनी साथीच्या रोगांच्या काळात गावोगावी पायी प्रवास करुन रुग्णांवर उपचार केले. त्यांनी कोणतीही खंत न बाळगता जिद्दीने हे कार्य केले. त्यांचे हे कार्य लोकोत्तर म्हटले पाहिजे.

सावकार, पुढारलेले हिंदु आणि मुस्लिम यांच्यांपासून शोषण थांबवण्यासाठी तसेच आर्थिक आणि सामाजिक उत्कर्षासाठी मिशनरींनी आदिवासींकरिता प्रयत्न केलेले दिसतात. शिवाय सरकारलाही या कार्यात लक्ष देण्याचे अवाहन केले.

**संदर्भ सूची :**

१. जांबिलसा बी.एन., मुंदलवाड ख्रिस्ती मंडळीचा शताब्दी अहवाल. मुंदलवाड, अप्रकाशित ता.अक्राणी, दि.५/५/२०००, पृ.३
२. चव्हाण नेमीबाई प्रेमदास, मुलाखत, धर्मांतरित ख्रिश्चन, दि.१०/८/०७ वेळ.१४.२०, तोरणमाळ.
३. वळवी मुक्तामाला ल्युथर, मुलाखत, धर्मांतरित ख्रिश्चन, दि. ७/९/२००७ वेळ.१७.२३, तळोदा, जि.नंदूरबार.
. सूर्यवंशी स.ना., सुवार्तिकांच्या पाऊलखुणा, दि इव्हॅन्जेलीकल अलायन्स मिनिस्ट्रीज, नाशिक, पहिली आवृत्ती, १९९९, पृ. ४३४

ISSN : 2348-7143
Dec. 2018

५. उपरोक्त, पृ. ४५५
६. THE GAZETTEER OF BOMBAY PRESIDENCY, Vol. XII, KANDESH DISTRICT GAZETTEER, The Government Photozinco Press, Pune, 1985, P. 337.
७. Cornerstone, This Cornerstone, is put on the Hospital of Chinchpada Mission.
८. सूर्यवंशी स.ना., पूर्वोक्त.. पृ.४५५
९. शहा मु.ब. (संपा.), खानदेशचा सांस्कृतिक इतिहास, (खंड-१), का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००४, पृ. १८०.
१०. सूर्यवंशी स.ना., पूर्वोक्त.. पृ.४५६
११. उपरोक्त, पृ. ४५६
१२. उपरोक्त, पृ. ४५७
१३. उपरोक्त, पृ. ४५७
१४. मांडगांवकर गोविंद नारायण, मुंबईचे वर्णन, वरदा बुक्स्, पुणे, चौथी आवृत्ती, २००२, पृ. ३४०.
१५. कोनशिला, सदर कोनशिला डॉ.राजेश पाटील, धुळे यांच्या दवाखान्याजवळ काढून ठेवण्यात आलेली आहे.
१६. कसोटे प्रतापराव देवराम, मुलाखत, धर्मांतरित ख्रिश्चन आणि लॅब असिस्टंट, मिशन दवाखाना, धुळे, दि.१०/७/०७ वेळ.११.१०
१७. उपरोक्त,
१८. उपरोक्त,
१९. उपरोक्त,
२०. उपरोक्त,
२१. Dainial Fedric Jem's, His Epitaph Matter, Metodist Kabarastan, Moglai, Dhule.
२२. Nathan Kalidas Prasad, His Epitaph Matter, Metodist Kabarastan, Moglai, Dhule.
२३. शहा मु.ब. (संपा.), उनि., पृ. १८०.
२४. Deshpande P.M., Shahada Mission Maloni. (Unpublish Research Paper) P.3
२५. कोनशिला, सदर कोनशिला शहादा चर्चमध्ये आतील बाजूस बसविण्यात आलेली आहे.
२६. वळवी भिका सुजा,मुलाखत, निवृत्त मिशन शिक्षक, दि.२४/३/०८, वेळ.१५.१०, धानोरा, ता.जि.नंदूरबार..
२७. उपरोक्त,
२८. पारधे मधुसूदन मनोहर, मुलाखत, (संपादक वनवासी बंधु मासिक आणि धर्मांतरित ख्रिश्चन), दि.१०/११/०७, वेळ.३.४०, दोंडाईचा, ता.शिंदखेडा.
२९. Cornerstone, This Cornerstone, is put on the Dispencessory building, Mission Bangalo, Pimpalner
३०. शहा मु.ब. (संपा.), उनि., पृ. १८०.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील मंदिर स्थापत्य कला

**गावीत कृष्णा अर्जुन**

**प्रस्तावना**

कोणताही समाज, देश अथवा राष्ट्रामध्ये निवास करणाऱ्या मानव समुदायाचा धर्म, ज्ञान, तत्वज्ञान, विज्ञान यांच्याशी क्रिया, रुढी-परंपरा, वेशभुषा, आदर्श संस्कार यांचा समन्वय म्हणजे संस्कृती होय. संस्कृतीमध्ये विविध कलांना विशेष महत्वपुर्ण स्थान आहे. त्यातीलच एक कला म्हणजे स्थापत्य कला होय. माणुस विविध कला, अविष्कारांनी नटलेला, घडलेला सुसंस्कृत मानला जातो. एकाच व्यक्तीत विविध व्यक्ती लपलेल्या असतात कारण एकच व्यक्ती विविध प्रसंगी अनेक भुमिकेत कार्य करत असते. मानवाच्या उत्क्रांती बरोबरच त्यांच्या व्यक्तीमत्वात विविध कला अंगीकारल्या गेल्यात. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थितीमुळे त्यांची अभिव्यक्ती घडली. काळानुरुप कलेचा आविष्कार उदयास आला. कला-मनोरंजन प्रकाराचे चिरकाळ स्मरण असावे त्यातून ती माहिती त्या काळातील उपलब्ध साधनातून जतन केली जाऊ लागली. वर्षानुवर्षे ती टिकुन राहील तसेच भावी पिढीला आदर्श वाटेल या विचारातून विशिष्ट दगडातून त्या काळातील कला कोरल्या गेल्यात प्रसंग व परिस्थितीनूसार त्यामध्ये असलेले भाष्य, संवाद, प्रसंग, संदेश, उपदेश स्विकारले व साकारले गेलेत.

**उद्देश :-**

भारतातील सर्वात प्राचीन संस्कृती ही सिंधू संस्कृती आहे. त्यानंतर वैदिक संस्कृती उदयास आली. त्याकाळातील ऋग्वेदात घ्सहस्र-स्थुण-प्रासादङ असा उल्लेख आहे. त्याचा अर्थ असा की, मोठ्या वृक्षाची तोड करुन महल बनविण्यात आले. याव्यतीरीक्त भारतातील सर्व कालावधीत स्थापत्य निर्मिती झाली. स्थापत्यातून तत्कालीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थिती समजते. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून खानदेशातील मंदिर स्थापत्याचा अभ्यास करणे हा उद्देश आहे.

**खानदेशाची भौगोलिक परिस्थिती व ऐतिहासीक मागोवा :-**

भौगोलिक दृष्ट्या खानदेश हा महाराष्ट्राच्या उत्तरेकडील एक प्रादेशिक विभाग आहे. खानदेशाच्या पूर्वेस बुलढाण्याचे पठार व अजिंठा पर्वत, पश्चिमेस सह्याद्री पर्वत रांगा, नैऋत्येस चांदवड टेकड्या, दक्षिणेस सातमाळ टेकड्या, उत्तरेस सातपुडा पर्वत रांगा आहे१. या प्रदेशाला उत्तर महाराष्ट्र या नावाने ही ओळखले जाते. शहादा, फैजपुर ही समृद्ध पठारे आहेत२. तापी, नर्मदा या नद्या व्यतिरीक्त त्यांच्या उपनद्या गिरणा, वाघुर, पुर्णा, भोकर, सुकी, मोर, भोगवती, बोरी, पांझरा, बुराई, गोमती, उदाई, पाताळगंगा व रंगावली इत्यादी तसेच असिरगढ, तोरणमाळ, लळिंग डोंगरी किल्ले आहेत३.

सिंधू संस्कृतीच्या काळापासून खानदेशात सावदळा संस्कृती अस्तित्वात होती. मौर्य, सातवाहन, अभिर, वाकाटक, राष्ट्रकुट इ. प्राचीन काळात तर सुलतानशाही, मुघलशाही, मराठी सत्ता व ब्रिटीशांनी राज्य केले४. खानदेश नावाच्या उत्पत्ती संदर्भात विद्वानांमध्ये एकवाक्यता आढळत नाही. प्राचीन उपलब्ध पुराव्यानुसार पांडवकालीन खांडववन, अश्मक, स्कंधदेश, खांडदेश, कानदेश तर मध्ययुगीन साधनावरुन दानदेश, खानदेश, कानबाईचा देश, कान्हदेश यासारखी नांवे आढळतात. हाथीगुफालेखात असिकनगर असा उल्लेख येतो. आज खानदेश म्हणुन जळगांव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांनी व्याप्त प्रदेशाला ओळखले जाते. या प्रदेशातील मंदिर स्थापत्य अभ्यासण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**खानदेशातील मंदिर स्थापत्य कला :-**

आधुनिक महाराष्ट्रातील प्राचीन खानदेशाच्या इतिहासाचा ठेवा त्यातील स्थापत्य होय. किल्ले, मंदिर, मस्जिद, मुर्ती, लेणी इत्यादी स्थापत्य त्या काळातील सांस्कृतिक ठेवा जोपासत आहेत. दख्खनच्या प्रदेशाप्रमाणे खानदेशातही खडक कोरुन लेणी व मंदिरे उभारली गेलीत. यामध्ये भरीव कामगिरी राष्ट्रकुट घराण्याने केली५.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात बुराई नदीच्या काठावर वसलेल्या बळसाणे गावालगत प्राचीन ०९ वास्तु (आठ मंदिर व एक मठ) आहेत. त्यामध्ये मारुती मंदिर, त्रीमुखी मंदिर, वराह मंदिर, कानबाई मंदिर, जैन मंदिर, पार्वती मंदिर, सदाशिव मंदिर व पार इत्यादींचा समावेश होतो. साधे एकमंडपी वराह मंदिर महाराष्ट्रातील दुर्मिळ मंदिर होय. वराह मुर्तीच्या पाठीवर नक्षिदार झूल आहे. सपाट दगडी हात, उभे आडवे स्तंभ त्यावरील मागील बाजूस लक्ष्मी, महिषासुरमर्दनी स्वरुपातल्या स्त्रीमुर्त्या कोरलेल्या आहेत६. त्रीमुखी मंदिर प्रवेश द्वारासमोरील गाभाऱ्याचे प्रवेशद्वार देखणे आहे. पाच घड्या असलेले तसेच इतर काटकोनात असलेले दोन गाभारे त्यामधील शिवाच्या गाभाऱ्यावरील शिखर रचनेत

शिल्पांकृत दगड बसविलेली कला विशेष आहे. त्या प्रमाणेच भिंतीला दिलेला मोड तसेच बाह्यांगावरील शिल्पे, शिल्पपट्ट्या कोनाडे, नद्या, मुर्त्या अत्यंत विलोभनिय आहेत.

बळसाणे येथे दोन मुर्ती नसलेले मंदिर आहेत. गाभाऱ्यातील आतील भिंतींवर उथळ आकाराची शिल्पे तेथील उच्च दर्जाची कला जोपासत आहेत. गाभाऱ्यात स्तंभ, स्तंभशीर्ष, तुळ्या त्यांची जोडणी तसेच प्रवेशद्वाराजवळील नक्षी कला सुंदर आहे७. मंडपातील आतील सुरेख नक्षिदार स्तंभ यादवकाळातील शिल्पकलेचे वैशिष्ट्ये कमळ व वेलबुटीची नक्षी दर्शवितात. मुर्ती नसलेल्या दुसऱ्या मंदिराची रचना हेमाडपंथी मंदिराची तसेच मठासारखी आहे.

बळसाणे येथील सदाशिव मंदिर नागरशैलीचे अत्यंत अप्रतिम शिल्पकला व शिखर धारण केलेले हेमाडपंथी बांधकाम असलेले आहे८. मंदिराची रचना चांदणीच्या आकाराची आहे. हे मंदिर तीन मंदिराचे असुन ते शिव, विष्णु, पार्वती देवतांचे आहे९. म्हणुन त्यास त्रिदल किंवा त्रीमुखी म्हणतात. पश्चिममुखी असलेले मंदिर शिवलिंग आहे. तीनही मंदिराचे दरवाजे नक्षीकामाने सजविलेले असुन पुष्पसारखा, स्तंभसारखा, व्यालसारखा इत्यादी नक्षीकाम केलेले होते. मंदिरातील देवताच्या मुर्ती बरोबर हत्ती आणि सिंहाची मुर्ती आहे. तसेच नृत्य करणाऱ्या स्त्रीयांच्या मुर्त्या आहेत. प्रवेशद्वारासमोरील गाभाऱ्यात शिवाची मोठी पिंड आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावर मध्यभागी गणपती आहे. मंदिराचे दुसरे वैशिष्ट म्हणजे सभामंडप होय. तो चौकोनी आकाराचा मंडप आहे. तीन गाभाऱ्यावर तीन शिखरे असुन सभा मंडपावर चौथे शिखर आहे. मंदिराच्या बाह्य रचनेतील शिल्प आकर्षक आहेत. मंदिराचे वैभव म्हणुन ओळखले जाणारे कोरीव स्तंभ स्तंभशिर्ष व तुळ्या यांना महत्व असुन मंदिराचा बाह्य भाग अत्यंत सुंदर व आकर्षक असुन त्यावर कोरीव मुर्ती कोरलेली आहेत. मंदिराच्या आधार स्तंभाचे तीन भाग पडतात. पहिला प्रकार चौकोनी आकाराच्या आधार स्तंभ, दुसरा अष्टकोनी आधारस्तंभ, तीसरा अष्टीश्रा स्तंभ होय.

धुळे जिल्ह्यात शिंदखेडा तालुक्यात मुथी येथे स्थापत्यकलेचे उत्कृष्ट नमुने असलेले भवानी मंदिर, विष्णु मंदिर, हरीबा मंदिर आणि लक्ष्मी नारायण मंदिर उभारलेले आहेत. गरुड मंडप असलेले बालाजी मंदिराचे छत नागर शैलीतील कुंभोज पद्धतीचे आहे१०. भवानी मंदिराच्या गर्भगृहाचे प्रवेशद्वार साद घड्या सुंदर व रेखिव शिल्पे आहेत. त्यामुळे प्रवेशद्वाराचे सौदर्य व देखणेपण आकर्षक ठरते. हरीबा मंदिराच्या चौथऱ्यापर्यंत कांगोरे असलेल्या नक्षीपट्ट्या, भौमितीक आकृत्या, स्तंभावर रेखाकृत आकृत्या आहे. हे मंदिर त्रिमुर्ती पद्धतीचे असुन तीन गाभारे असलेले त्यावर रेखिव शिल्प आहेत. मंदिराचे शिखर नागर शैलीतील भूमीज पद्धतीचे आहे११.

भोनगाव ठिकाणी एक समाधी मंदिर बारा स्तंभांवर उभारलेले आहे. मध्यभागी मोठा घुमट असुन चार कोपऱ्यांवर छोटे घुमटवजा चार अर्ध गोलाकार दगडी कळस आहेत. चारही बाजुने कठडेवजा दगडी भिंत बांधलेली असुन मध्यभागी प्रवेशद्वार आहे. अनामिक स्थानिक संताची समाधी असावी. तसेच भोनगाव येथे गढीच्या तटबंदीच्या आत असलेले गढीतील शिवमंदिर म्हणुन प्रसिद्ध आहे. त्याचे शिखर वासर शैलीचे असुन वर कळसाऐवजी गोल कोरीव चक्र आहे. मंदिराच्या चारही भिंती व चौथरा घडी व दगडांनी बांधलेला असुन बांधकामात चुना वापरलेला आहे. भिंतीच्या के ोपऱ्यात जोडणीमध्ये सळयांचा केलेला वापर हे खास वैशिष्ट होय. गाभाऱ्याचे प्रवेशद्वार पाय घड्याने असुन मध्यभागी गणेशाची कोरीव मुर्ती कोरलेली आहे.

शिरपुर येथे बांधलेले बालाजी मंदिर दक्षिण भारतातील द्रविड शैलीत बांधलेले आहे. त्यात मुर्ती देखण्या व वास्तु सुंदर आहेत. प्रकाशा येथील विक्रमाकचे मंदिर कदंब घराण्याच्या सत्तेवेळी बांधलेले आहे. चांगदेव येथील मंदिर, शेदुर्णी येथील मंदिर, झोडगे येथील मंदिर त्याकाळातील सुंदर स्थापत्य कलेची उदाहरणे आहेत.

**समारोप :–**

खानदेशातील स्थापत्य कला विशेषत: मंदिर स्थापत्य उत्कृष्ट दर्जाचे आहे. अतिशय सुंदर नक्षीकाम व शिल्प आहेत. मंदिराच्या शिखरावर आतील बाजूस सुंदर कमळाचे शिल्प त्या रचना शैलीवरुन कालखंड ओळखता येतो. स्तंभशिर्षाचे वेगवेगळे नमुने आहेत. नागर, वेसर व द्रविड शैलीची स्थापत्य कला मंदिर रचनेत आहेत. शिल्पकलेत यक्षीमुर्ती, अप्सरा यांची कला अनेक पिढ्यांना आकर्षित करणारी आहे. काही ठिकाणी लाकडी मंदिर आहे. मुखमंडप बांधण्याची पद्धत आहे. आवकाश परिसरात दगडी कास व जमिनीवर कोरलेले आहेत. मंदिरातील पाणी बाहेर वाहुन नेण्यासाठी गोमुख आहे. दिवे लावण्यासाठी स्वतंत्र उभारलेले स्तंभ म्हणजे दिपमाळ होय. पाणी साठविण्यासाठी दगडी सरोवर, तलाव आहेत. मंदिर शिखर रचनेत चौकोन, अष्टकोन चे रुपांतर सोळा कोनात वर्तुळात केलेले आहे. नागर शैलीचे वर्तुळावर वरवर निमुळते, द्रविड शैलीचे शिखर चौरस दंडगोलाकार तर वासर शैलीचे शिखर मिश्र रचना शैलीचे असुन खानदेशात त्यास ओरीसा शैली असेही म्हणतात. संगीत स्तंभाची रचना विशेष आहे. मंदिरास तटबंदी प्रदक्षिणा मार्ग इत्यादी विशेषता मंदिर स्थापत्य कलेत आहे. स्थानिकदृष्टीने विचार केला तर डोंगरावरील मंदिर, नदीकाठावरील मंदिर, नदी प्रवाहातील मंदिर, संगमावरील मंदिर, दिपमाळ असलेले मंदिर, पुष्करणीतील मंदिर, गढीतील मंदिर, तटबंदी असलेले मंदिर, दोन मुर्ती व दोन गाभारे असलेले मंदिर, तीन गाभारे असलेले मंदिर, घाटावरील मंदिर, चार बाजुंनी कालवा असलेले मंदिर अशा पद्धतीचे स्थापत्यानुसार किंवा वैशिष्ट्यानुसार मंदिर प्रकार खानदेशात आढळुन येतात. अकराव्या, बाराव्या व तेराव्या शतकात मंदिर निर्मिती अधिक संपन्न व समृद्ध होती.

खानदेशात मंदिर स्थापत्य शिवाय गढी, किल्ले, वाडे यांची रचनाही करण्यात आली. इतिहासाचे मूक साक्षीदार किल्ले आहेत. महाराष्ट्र राज्यात सुमारे ३९० किल्ले आहेत. त्यापैकी खानदेशात १९ किल्ले आहे१२. खानदेशात अशी विविध स्थापत्य आहे त्यांच्यावर सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्राचीन खानदेशचा इतिहास, टी.टी. महाजन, दिलीपराज प्रकाशन २००५ पृ. १७
२. खानदेश लोकसभा प्रतिनिधी, डॉ.अशोक पाटील, प्रशांत पब्लीकेशन २०१५ पृ.२८
३. बी.जी. खानदेश, १९८० पृ. ०६
४. ब्रिटीशकालीन खानदेश आणि दुष्काळ, प्रा.डॉ.संजय जिभाऊ पाटील, सम्यकता प्रकाशन, २०१२ पृ. ३७
५. महाजन टी.टी. उपरोक्त पृ. २९०
६. मंदिर शिल्पे, मुंकुंद धाराशिवकर, भांडारकर पब्लीकेशन, धुळे. पहिली आवृत्ती २०१३ पृ.३७
७. धाराशिवकर उपरोक्त पृ.४४
८. धाराशिवकर उपरोक्त पृ.४८
९. महाजन टी.टी. उपरोक्त पृ.२९७
१०. धाराशिवकर उपरोक्त पृ.१९
११. धाराशिवकर उपरोक्त पृ.५९
१२. खानदेशातील गड किल्ल्यांची दुरावस्था, सकाळ वृत्तपत्र प्राचार्य सी.झेड इंदासराव पृ.३

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# पूर्व खानदेशातील अस्पृश्योध्दाराच्या चळवळीत श्री. सेनू नारायण मेंढे यांचे योगदान

**प्रा. यशवंत किसन शिरसाठ**
पू.सा.गु.वि.प्र.मं.चे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,
शहादा, जि. नंदुरबार.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्पृश्यउध्दाराच्या चळवळीमुळे विविध भागात अनेक सुधारक कार्यकर्ते पुढे येवून त्यांनी आपापल्या भागात अस्पृश्य समाजात सुधारणेचे कार्य सुरु केले. यापैकी पूर्व खानदेशात कर्मवीर सेनू नारायण मेंढे याची अस्पृश्य समाजात सामाजिक, शैक्षणिक सुधारणेची कामगीरी महत्वाची मानली जाते. अस्पृश्य समाजाच्या विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे सेनू नारायण मेंढे यांचा जन्म इ.स. १८८७ मध्ये सांगवी ता.यावल येथे महार या अस्पृश्य कुटूंबात झाला. त्यांचे बालपण सांगवी येथे गेले. आवश्यक ते शिक्षण घेतल्यावर त्यांनी शिक्षकी पेशा स्विकारला होता.१ पूढे ते मेंढे गुरुजी म्हणून ओळखले जावू लागले.

दि. ३०, ३१ मे व १ जून १९२० रोजी नागपूर येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली 'आखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद' आयोजित केली होती. या परिषदेत डॉ. आंबेडकर उपस्थित होते. तर मुंबई इलाख्यातील 'डिप्रेस्ड क्लास मिशन' च्या कार्यकर्त्यांबरोबर मेंढे गुरुजीही उपस्थित होते. या परिषदेत मेंढे गुरुजीनीदोन ठराव मांडले. त्यात मेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये बहिष्कृत वर्गाच्या विद्यार्थ्यांचा जास्त भरणा करण्यात यावा, जिल्हा निहाय बहिष्कृत वर्गाचा स्पेशल एज्यूकेशन इन्स्पेक्टर नेमला जावा व त्या जागेस थर्ड इयर ट्रेन्ड शिक्षक किंवा मॅट्रिक पर्यंत शिकलेला इसम लायक धरला जावा.२ असा ठराव क्रमांक ०८ मांडला. तसेच बहिष्कृत वर्गातील मेट्रीक परिक्षा नापास झालेले उमेदवार नोकरीस लायक धरले जावेत असा ठराव क्रमांक १० मांडला. हे दोन्ही ठराव मंजूर करण्यात आले होते.

मेंढे गुरुजी हे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्याने प्रभावीत झाले होते. पुढे त्यांनी खानदेशातील अस्पृश्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात डॉ. आंबेडकरांच्या 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रातून वाचा फोडण्याचे कार्य केले.३ अस्पृश्य मूलांना शिक्षण घेणे सोईचे व्हावे यासाठी जळगाव येथे 'संत चोखामेळा' वसतिगृह जानेवारी १९२५ मध्ये सुरु केले. आपल्याआहे त्या परिस्थितीत बदल होण्यासाठी अस्पृश्य मूलांनी धडपड केली पाहिजे. साक्षर झाले पाहिजे असा विचार मेंढे गुरुजींनी व्यक्त करुन अस्पृश्य शिक्षकांनी बोर्डींगला आर्थिक मदत करावी असे आवाहन केले होते.४

जळगाव नगरपालिकेच्या स्कूल बोर्डाचे सदस्य म्हणून नेमणूक झाल्यावर मेंढे गुरुजींनी अस्पृश्य मूलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. त्यात जळगाव नगरपालिकेकडून वसतिगृह इमारतीसाठी एक प्लॉट मिळविला त्या जागेवर वसतिगृह इमारतीची कोनशिला कलेक्टर मे. गिलिगन साहेब यांच्या हस्ते बसविली. फैजपूर येथे दि. २१ एप्रिल १९२७ रोजी मे.गिलिगन यांना अस्पृश्य वर्गातर्फे पानसुपारिचा समारंभ साजरी झाला त्यावेळी काही जनांकडून ५१/- रु. देणगी बोर्डींग इमारत फंडासाठी देण्याचे वचन घेतले होते.५

मेंढे गुरुजींना अस्पृश्योध्दाराच्या कार्यासाठी वृत्तपत्राच्या महत्वाची जाणीव झाली होती. डॉ. आंबेडकरांचे 'मूकनायक' हे वृत्तपत्र बंद पडल्यावर ते पून्हा सुरु करावे यासाठी पूर्व खानदेशातील वृत्तपत्रातून मेंढे गुरुजींनी पाठींबा दिला होता. तसेच खानदेशातील शिक्षकांना हे वृत्तपत्र सुरु करण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन केले होते. पूढे मेंढे गुरुजीनी अस्पृश्य समाज प्रबोधनासाठी 'तरुण बहिष्कृत' नावाचे पाक्षीक सुरु केले होते. परतु हे वृत्तपत्र पूढे लवकरच बंद पडले. यानंतर मेंढे गुरुजीनी २ मे १९३९ रोजी 'सेवक' नावाचे साप्ताहिक सुरु केल्याचे दिसते.६

मेंढे गुरुजीवर डॉ. आंबेडकरांच्या विचार व कार्याचा मोठा प्रभाव होता. यामूळे त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा खानदेशात प्रसार व प्रचाराचे कार्य सुरु केले होते. त्यासाठी खानदेशात ठिकठिकाणी बैठकी घेवून सामाजिक सुधारणा कार्याच्या प्रसाराचे कार्य सुरु केले. दि. २४ मार्च १९३४ रोजी भूसावळ येथील जाम मोहल्यात सभा घेवून डॉ.आंबेडकरांची कामगिरी व दलितांची स्थिती यावर विचारविनियम केला. या सभेत सुटीच्या मे महिन्यात शिक्षकांनी सामाजिक सुधारणा, शिक्षण, अनिष्ठ रुढी, 'जनता' साप्ताहिकाचा प्रचार करणे या संदर्भात खेडोपाडी प्रचार करावा असे ठराव पास केले. धरणगाव येथे काशिनाथ सहादू वाघमारे यांच्य निधनानंतर झालेल्या शोकसभेत मेंढे गुरुजीनी डॉ.आंबेडकरांच्या धर्मांतर निर्णयास पाठींबा देणारे भाषण केले. सर्व अस्पृश्य जातीनी एकाच विहिरीवर पाणी भरण्याचा निर्णय घेतला. याबरोबरच मेंढे गुरुजी कार्यकर्त्यांच्या इतर बैठकिंनाही हजर राहून मार्गदर्शन करित असत.७ दि. ५ मे १९३६ रोजी अमळनेर येथे पूर्व खानदेश जिल्ह्याची परिषद भावूराव कृष्णराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली या परिषदेत मेंढे गुरुजी यांनी अस्पृश्य समाजाच्या परिस्थितीचे वर्णन करुन धर्मांतर करणे किती गरजेचे आहे ते सांगून धर्मांतराबरोबरच विविध इतर ठराव परिषदेत मंजूर केले.८

दि. ८ ऑक्टोबर १९३६ रोजी डॉ. आंबेडकर जळगावला आले असता मेंढे गुरुजीनी डॉ. आंबेडकरांचे स्वागत केले. या प्रसंगी झालेल्या जाहिर सभेत डॉ. आंबेडकरांनी 'मुंबई कायदेमंडळाच्या १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी पूर्व खानदेश जिल्ह्यातील स्वतंत्र

मजूर पक्षाचे उमेदवार म्हणून आपले सहकारी दौलत गुलाजी जाधव यांचे नाव उमेदवार म्हणून जाहिर केले. परंतु या जागेसाठी मेंढे गुरुजीही उत्सुक होते. मात्र दौलत गुलाजी जाधव यांचे नाव उमेदवार म्हणून जाहिर झाल्याने मेंढे यांनी आपली स्वतंत्र उमेदवारी जाहिर करुन जाधव याच्या विरोधात प्रचार सुरु केला. मेंढे गुरुजींनी आपला उमेदवारी अर्ज भरु नये असा डॉ. आंबेडकरांचा प्रयत्न होता. त्यांनी केलेल्या अस्पृश्य उध्दाराच्या कार्यचीही डॉ. आंबेडकरांना जाणीव होती. मेंढे गुरुजी विषयी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात, 'त्यांचा आणि माझा संबंध १५-२० वर्षापासून आहे. श्री. मेंढेनी येथे काम केले आहे.' असे उदगार काढले होते. डॉ. आंबेडकरांच्या मते मेंढे गुरुजी नगरपालिका, स्कूल बोर्ड, लोकल बोर्ड या सारख्या स्थानिक पातळीच्या कामास योग्य उमेवार होते. परंतु कायदेमंडळाचे कामकाज इंग्रजीत चालते व जाधव हे इंग्रजी जाणणारे उमेदवार असल्याने त्यांचा समाज हितासाठी उपयोग होवू शकेल. परिणामी मेंढेनी समाजहिताचा आड येवू नये अशी डॉ. आंबेडकरांना विनंती केली होती परंतु मेंढेनी स्वतंत्र उमेदवारी केल्याने डॉ.आंबेडकरांनी निवडणूक प्रचार दौऱ्यात श्री. मेंढेवर कडक शब्दात टीका केलेली दिसते.

डॉ. आंबेडकरांनी स्वत: पूर्व खानदेशात 'स्वातंत्र्य मजूर पक्षा' चे उमेदवार श्री. जाधव यांच्या निवडणूक प्रचारासाठी दौरा काढला. जळगाव, नेरी, जामनेर, बोदवड, नाडगाव, एदलाबाद, वरणगाव, फूलगाव, फेकरी, भूसावळ, यावल, सावदा या दौऱ्यात जाधवाचा प्रचार केला. येथील एका भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात 'तूम्हास बळी पाडण्याकरिता काही लोक तूच्याकरिता बोर्डींगे काढतात, चहापाणी करतात पण ते सर्व अगदी थोडावेळ टीकणारे आहे. तेवढ्याने अपला उध्दार होणार नाही.९ असे सांगून पूढील भाषणात कडक शब्दात टिका केली. पूढे या निवडणूकीत श्री. जाधव विजयी झाले तर श्री. मेंढे गुरुजी पराभूत झाले या राजकीय संघर्षामूळे बराच काळ मतभेद राहीले.

पूढील काळात इ.स. १९३८ मध्ये पूर्व खानदेशात जिल्हा निवडणूका जाहिर झाल्या असता डॉ. आंबेडकरांनी आपल्या पक्षातर्फे श्री. मेंढे गुरुजीना उमेदवारी दिली.१० परंतु इ.स. १९४६ च्या मुंबई प्रांत विधीमंडळाच्या निवडणूकीप्रसंगी पून्हा दूरावा निर्माण झालेला दिसतो. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या शाखा खानदेशातही स्थापन झाल्या होत्या. श्री. मेंढे गुरुजीचा त्यात मोठा सहभाग होता. इ.स. १९४६ च्या निवडणूकीत मेंढे गुरुजीनी खानदेशातून राखीव जागेसाठी अर्ज भरला परंतु डॉ. आंबेडकरांनी त्यांना उमेदवारी नाकारली तर श्री. मेंढे गुरुजीनीही माघार घेण्यास नकार दिला. परिणामी पून्हा मतभेद झाले. या निवडणूकीत शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे सर्व उमेदवार पराभत झाले होते.११ डॉ. आंबेडकरांसोबतच्या संबंधात दूरावा निर्माण झाला असला तरी श्री. मेंढे गुरुजीनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे कार्य सुरु ठेवले होते. पूढील निवडणूकीत पूर्व खानदेशात शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे चार उमेदवार उभे कररुन त्यापैकी जळगाव म्हसावद मतदारसंघात डॉ.आंबेडकरांनी श्री. मेंढे गुरुजींना उमेदवारी दिली. तर काँग्रेस पक्षाने श्री. कल्याणी वकील यांना उभे केले. या निवडणूकीत श्री. मेंढे गुरुजींचा पराभव झाला. इ.स.१९५१ च्या निवडणूकीत जळगाव-म्हसावद मतदार संघात राखीव जागेवर शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनतर्फे श्री. बिऱ्हाडे गुरुजी यांना उमेदवारी मिळाली त्यामूळे श्री. मेंढे गुरुजी यांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणूक लढविली. परंतु याही निवडणूकीत मेंढे सह तिनही उमेदवार पराभूत झाले होते.१२

निवडणूकीत उमेवारीच्या प्रश्नावरुन डॉ. आंबेडकर व श्री. मेंढे गुरुजी यांच्यात मतभेद असले तरी विविध सभा, बैठकी यातून श्री. मेंढे गुरुजी यांनी डॉ. आंबेडकरांच्या चळवळीची भूमिका लोकांना समजावून सांगितली, सामाजिक कार्य करित असतांना त्यांनी असंख्य कार्यकर्ते जोडले होते. पूढे मूलांच्या निधानांत श्री. मेंढे गुरुजींची तब्येत बिघडत गेली. त्यातच श्री. मेंढे गुरुजी यांचे इ.स. १९५७ मध्ये निधन झाले.१३

**संदर्भ सूची :**

१) डॉ. भी. ना. पाटील, खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ, जळगाव, २००५, पृ. ५३६.
२) वसंत मून, (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत व मूकनायक, पृ. ३९०(१०)
३) डॉ. सी. एच. निकुंभे, समाजप्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. ३३
४) डॉ. भी. ना. पाटील, उपरोक्त, पृ. ५३७.
५) तत्रैव, पृ. ५४० / वसंत मून, (संपादक), उपरोक्त, पृ. ५९(१३)
६) डॉ. सी. एच. निकुंभे, उपरोक्त, पृ. ३५
७) तत्रैव, पृ. ३७, ३८
८) डॉ. बी. एन. पाटील, उपरोक्त, पृ. ५४७
९) जनता साप्ताहिक दि. २१ नोव्हेबर १९३६, पृ. २
१०) डॉ. सी. एच. निकुंभे, उपरोक्त, पृ. ३९
११) तत्रैव, पृ. ५३९
१२) डॉ. भी. ना. पाटील, उपरोक्त, पृ. ५५०
१३) तत्रैव, पृ. ५५१

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

# खानदेशातील महिलांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान

**प्रा. सुभाष श्रावण धनगर**
इतिहास विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनगीर, ता.जि. धुळे.

**प्रस्ताविक**

कोणत्याही समाजात किंवा देशात सामाजिक वाटचालीची किंवा जाणिवांची पार्श्वभूमी ही सामाजिक व धार्मिक सुधारण चळवळीत तयार होत असते. स्त्रियांच्या सामाजिक चळवळीतील सहभाग हा त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या जाणिवांचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. अशा जाणिवा निर्माण होणे किंवा त्या ज्ञात होणे याकरीता सामाजिक सुधारणा महत्त्वाच्या ठरतात. अर्थात याकरीता शिक्षणाचे महत्त्व समाज परिवर्तन घडून आणण्यासाठी महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे भारतीय जिवण प्रणालीत लक्षणीय बदला झाला. स्त्री जागृती होत गेली. स्त्री शिक्षणाचा अभाव, बालविवाह, विधवा विवाहाला विरोध, केशवपण, सतीची चाल या सारख्या अनिष्ठ रुढी १९व्या शतकापर्यंत प्रभावी होत्या. त्या दुर करण्यासाठी समाज सुधारकांनी प्रयत्न सुरु केलेत. स्त्रीयांच्या परिस्थितीत सुधारण घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश मिळत गेले. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द व अत्याचाराविरुध्द स्त्रिया जागृत होत गेल्या. स्त्रीच्या शिक्षणाची, कर्तृत्वाची, तिच्या सामाजिक कार्याची व्दारे उघडली गेली. समाजातील तिचे स्थान तिच्या महत्तेने विस्तृत होत गेले. स्त्री-पुरुष विषमता संबंधाने विचार वाढीस लागला. जातिय व्यवस्था मोडण्यासाठी स्त्रियांमध्ये व्यक्तीमत्वाचा विकास झाला व तिच्या कर्तृत्वाला योग्य दिशा मिळण्यास मदत झाली. त्यातून खानदेशातील सामाजिक चळवळी अधिक जोमदार झाल्याचे दिसते. या सुधारण चळवळीत महिलांच्या समाज सुधारणेच्या कार्यात खानदेशातील मोठे योगदान दिले आहेत. त्यात विजयाताई चौक, पार्वतीबाई ठकार, मंदाकीनी टोणगांवकर, नजुबाई गावित इ. महिलांचे सामाजिक योगदानावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टये :** १९ व २०व्या शतकात खानदेशात स्त्री मुक्ती, जातीभेद, अस्पृष्यता निवारण, स्त्री अत्याचार निवारण अशा अनेक मानवतावादी चळवळी सुरु झाल्या असून, त्या आजतागायत या संबंधी खानदेशात, सामाजिक स्थळावर चळवळी निर्माण होतांना दिसतात. त्या अनुषंगाने सदर विषयाची माहिती जाणून घेण्यासाठी प्रस्तुत शोध निबंधाचे सादरीकरण करीत आहे.

**पार्वतीबाई ठकार :**

**अस्पृश्यता निवारण कार्य :-** खानदेशातील अग्रेसर असलेल्या कार्यकर्त्यामध्ये श्रीमती पार्वताबाई ठकार व श्री. शंकर ठकार या दाम्पत्यांचा उल्लेख येतो. त्याचे ग्राम स्वच्छता आणि आरोग्य विषयी त्यांनी गावातील शेतकरी लोकांनी जनावरांचे मलमुत्र आणि कचरा गावाबाहेर इतरत्र कुठेही टाकू न देत, त्यामुळे आरोग्यास बाधा निर्माण होत असे. अशीच परिस्थिती सवाई मुकटी या गावातही होती. म्हणून तेथे ठकार दाम्पत्यांनी स्वत: सहभाग घेऊन गावाबाहेर खे खोदून जनावरांचे मलमुत्र टाकण्याच्या सोयी करुन घेतल्या याबरोबर आरोग्याचा प्रश्न सुटण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या शेतीकरीता खताचा ही प्रश्न सोडण्यास मदत झाली.

तसेच ग्रामीण भागातील महत्त्वाची समस्या म्हणजे स्त्री-पुरुषांना शौचालय नसतात. उघडयावर शौचास बसण्यातून आरोग्यविषयीचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. विशेषत: महिलांकरीत तर बंदिस्त किंवा किमान आडोशाची शौचास बसण्याची जागा उपलब्ध करुन देणे. तेवढेच महत्वाचे ठरते. त्यादृष्टिने श्रीमती पार्वताबाई ठकार यांनी आपल्या पतीच्या आणि गावकऱ्यांच्या मदतीने खे करुन मल विसर्जनानंतर त्यांच्यावर माती टाकण्याची व्यवस्था केली. महिलांकरीता अशा जागांभोवती आडोशाचीही व्यवस्था करण्यात आली. या नाविन्यपूर्ण प्रयोगामुळे गावाचा आरोग्याचा प्रश्न तर सुटलाच महत्त्वाचे म्हणजे महिलांच्या करीता ही व्यवस्था अधिक सोयीची ठरली.

ठकार यांनी सवाई मुकटीसह इतर ३५ गावांना भेटी देऊन अस्पृष्यतेबाबत प्रबोधन करुन ती अमानवी असून अस्पृश्यता पाळू नये. असा निर्देश दिला. सार्वजनिक विहीरी, स्थळे, दुकाने अस्पृष्यांकरीता खुली केली. सवाई मुकटी हे गांव आदर्श बनविण्यासाठी प्रयत्न केलेत. तसेच गावात न्यायमंडळ स्थापन करुन तंटामुक्त गावं केले. शेतकऱ्यांच्या गुराढोरांची आरोग्याची काळजी घेण्यासाठी पशुवैद्य डॉ. मानेकरांचे सहकार्य मिळवून दिले. लग्नसमारंभ दशक्रीयाविधी प्रसंगी सामुहिक भोजनाचा खर्च, कार्यक्रमावरील खर्चावर आळा बसविला. गावातील मद्यविक्री नियंत्रणाकरीता प्रयत्न केलेत असे पार्वताबाई ठकार यांचे लोकोपयोगी समाजयोगी कामे करता आली.

**विजयाताई चौक**

विजयाताईंचे जन्मगांव बुलढाणा असले तरी धुळयातील चौक सरांशी विवाहबध्द झाल्याने धुळे ही ताईंची कर्मभूमी बनली. ते राष्ट्रसेवादलाचे कार्यकर्ते होते. तसेच त्यांचा समाजवादी पक्षाची राजकीय संबंध आल्याने विजयाताईंचा संपर्क त्यांच्या कार्याशी येत गेला. राष्ट्रसेवा दलाच्या कार्यकर्त्यांचा मुक्काम आणि जेवणाची सोय स्थानिक कार्यकर्त्यांच्या घरी करावी लागत असल्यामुळे दलाच्या आणि

समाजवादी पक्षाच्या अनेक कार्यक्रमांना हजर राहत. यातूनच विजयाताईच्या अवाबेन, सिंधु काटे यांच्यशी संपर्क आला बॉ. नाथ पै यांचे 'समाजवाद आणि सद्या परिस्थिती' या विषयावर भाषण ऐकल्यानंतर ताईंवर समाजवादी विचारांचा मोठा प्रभाव पडला.

विधान सभेच्या उमेदवार म्हणून शकुंतलाबाई परांजपे यांच्या प्रचारास ताई जात असत. त्या निमित्तने ताईंना घराबाहेर जाता येऊन भाषणे ऐकण्याची संधी मिळत गेली. शंकुतला बाईमुळेच विजया ताईंना कार्यकर्तीचा वसा मिळाला.

धुळयाच्या समाजवादी महिला सभेच्या अध्यक्षपदी सुमन चौव्हाण यांची नियुक्ती करण्यात येऊन सेक्रेटरी पद ताईंकडे सोपविण्यात आले. शंकुतलाबाई आणि सुमन चव्हाण यांच्या मार्गदर्शनासाठी सन १९६७ मध्ये ५० महिला सभासदांची नोंद करण्यात आली. ताईंच्या कार्याचे महत्व पटल्यामुळे श्री. चौक सरांनी शिकवण्यांच्या कार्यातून ताईंना मुक्त केले. त्यामुळे ताई चळवळींच्या कामात पुर्ण वेळ देऊ लागल्या. खानदेशातील अशी सामाजिक चळवळ ही समाजवादी ही खऱ्या अर्थाने धुळयात समाजवादी महिला सभेच्या स्थापनेपासून सुरु झाली आणि त्याच्या अग्रणी विजयाताई चौक एक झुंझार, निर्भय, अशा ताईंनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराबाबत जागरुक राहून अविरत प्रयत्नांनी खानदेशातील स्त्रियांच्या प्रश्नांची सोडवणूक केली.

महिलांमध्ये जाणिव जागृतीकरिता समाजवादी महिला सभेमार्फत शिबिराचे आयोजन करण्यात आले अशा शिबिरामधून लोकसंख्या, शिक्षण, साक्षरता प्रसार, व्यसनाधिनता, योगाभ्यास, हुंडानिर्मुलन, आरोग्य अशा उद्‌बोधनपर विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यात निमडाळे, मेहेरगांव, कापडणे या गावांमध्ये शिबीरे घेण्यात आली. तसेच पुणे येथील इंडियन इस्टिट्यूट ऑफ एज्युकेशनच्या सहकार्यानी युवती विकास शिबिराचे महत्त्व पटवून देण्यात आली.

१९७१ मध्ये विजयाताईंनी महागाई विरोधी तिव्र लढा सुरु केला. या विषयी शुभांगी जोशी लिहितात की, मुंबईत होणाऱ्या महागाई प्रातिकर समितीच्या प्रत्येक कार्यक्रमाचे पडसाद जिल्हयाच्या ठिकाणी उमटत होते. धुळे जिल्हयात विजयाताईंच्या नेतृत्वाखाली 'समाजवादी महिला सभा' त्यात उतरली होती. लाटणे मोर्चा, घंटानाद जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन असे सर्वच कार्यक्रम धुळयात आलेत. घर चौकट सोडून प्रथम बाहेर पडलेल्या या महिला महागाईच्या प्रश्नांवर तुरुंगात गेल्या आठ दिवसाच्या तुरुंगवासांनंतर बाहेर पडल्या . त्या स्वत: नवीन ओळख घेऊनच. यावरुन विजयाताईंनी महिलांमध्ये निर्माण केलेल्या आत्मविश्वासाचा प्रत्यय येतो. या करीता माईंनी महिला सभा शिबिरे, मेळावे व्याख्यानमाला यांच्यातून महागाईच्या आंदोलनाचे सुत्र समजावून दिले होते. हे सुत्र म्हणजे आपण आंदोलन का करीत आहोत, लढयात आपला सहभाग का आहे हे होय. अशी सुत्रबध्द वाटचाल विजयाताईंची सामाजिक कार्यात राहत असत.

विजयाताईनी महिलांचे शोषण, अत्याचार, हुंडाबळी, बलात्कार, जाळून मारणे अशा गंभीर प्रश्नांच्या सोडवणूकीकरिता समाजवादी महिला संस्थेमार्फत कार्य चालूच होते. अशातच 'स्टेट्स ऑफ वूमेन कमिटी', ने आपला अहवाल जाहीर केल्यामुळे स्त्रियांची विदारक परिस्थिती समाजासमोर आली. हुंडाबळी बाळंतपणातील मृत्यु, जळीत प्रकरणातील मृत्यु, बलात्कार यातून स्त्रियांचा बळी जाण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले. त्यामुळे महिला संघटनांना जाणिवेने कार्य करणे अपरिहार्य ठरले.

महिलांवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात समाजवादी महिला सभा या संघटनांमार्फत माईंनी आरोपींना शिक्षा व्हावी. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. याकरीता मोर्चे निवेदने देऊन आपले कार्य चालु ठेवले. त्याकरीता उषा वाणी, साधना पाटील, ममता राजपूत, पुजा चौधरी, वैशाली पाठक, संगिता माळी, कल्पना सोनवणे, रंजना राजपूत, अलका पाटील, शोभा गुलेच्छा प्रकरणी मोर्चे व सामाजिक बहिष्काराच्या सभा घेण्यात आल्या. महिलांची कशी मुस्कटदाबी होते. हे विदारक सत्य समाजासमोर ठेवण्यात आले होते.

**मंदाकिनीताईंचे कार्य**

**अस्पृश्योद्धाराचे कार्य :–** देशसेवेसाठी झटणारे अण्णा हे अस्पृश्यांचे कैवारी होते. अण्णांनी स्वत:च्या आईला पवर्तनीय करुन अस्पृश्यतेच्या निर्मूलन कार्यात सहभागी करुन घेतले होते. अण्णांची ही हरिजन भक्ती पाहून त्यांची पत्नी मंदाकिनीताईंनीही या मानवतावादी कार्यास वाहून घेतले. सुख–दुख्याच्या वेळी रात्री–बेरात्री मुलांजवळ आल्या. मायेच्या ममतेने मुलांना गोंजारले, हितगोष्टी केल्या. बोर्डिंगच्या मुलांना मातृत्वाची जाणीव भासू दिली नाही. गरीब मुलांना काम देऊन पैसे दिले. यावरुन मंदाकिनीताईच्या गरीब, शोषित–वंचित, अस्पृश्य मुलांविषयीच्या जाणीव लक्षात येतात. अस्पृश्यता निवारण्याच्या कामी त्यांनी अण्णांना दिलेला सहयोग हा महत्त्वपूर्ण होता, याचा प्रत्यय या वाक्यातून येतो.

अण्णाचे सत्याग्रही जीवन आणि सेवाभाव वाटचाल ही पूर्णत: मंदाकिनीताईच्या सहकार्यावरच अवलंबून होती. याविषयी श्री.पी.यू पवार 'अण्णांच्या सहचर्या – माझ्या गुरुवर्या' या लेखात लिहितात की, अण्णा सत्याग्रही, कौटुंबिक माया तोडतो. त्याप्रमाणे अण्णांचे सेवेसाठी सतत भ्रमण चालू असे. जेल, सत्याग्रह, हरिजन सेवा, दारुबंदी, साक्षरता प्रसार इ. निमित्ताने ते बाहेर राहावयाचे म्हणून बाईंचे जीवन वैवाहिक ब्रम्हचर्याने भरलेले होते. अल्पवयातच प्रौढत्व धारण केले होते. संसाराचा भार शिरावर होता. अण्णांना कौटूंबिक कार्यातून मोकळ ठेवण्याचे कार्य बाईंनी केले. म्हणूनच अण्णा निश्चितच देशकार्य करीत राहिले. अण्णांबरोबर त्यांनी कधी स्वत:ला मिरविले नाही. सभा–संमेलनाला गेल्या नाहीत. प्रत्येकाचा कार्यप्रवाह वाहत राहिला. कोणी कोणाच्या कार्यात लुडबुड केली नाही. या विवेचनावरुन एक बाब

ISSN : 2348-7143
Dec. 2018

स्पष्ट होते की, अण्णांनी मोठे योगदान देश आणि समाजसेवेसाठी दिले असले तरी त्यांच्या स्थानी हया मंदाकिनीताई असल्यामुळे या कार्याच्या श्रेयामध्ये त्यांची भूमिका अण्णांएवढीच महत्त्वाची ठरते.

**नजूबाई गावीत**

कॉ. नजूबाई गावीत यांच्या साक्री तालुक्यातील बेंद्रेपाडा येथे दि. १० जानेवारी १९५० रोजी गायी पाळणाऱ्या सामान्य मावची या आदिवासी जमातीत जन्म झाला. त्यावेळी समाजात शैक्षणिक जाणिवा नसल्याने मराठी चवथीपर्यंतचे शिक्षण कसे तरी झाले. आपल्या आठवणींत नजूबाई गावीत यांनी लिहिले आहे की, आदिवासींच्या समस्यांवर लहानू मिस्तरी, भावराव गवळी, आत्माराम अहिरे, केशव मास्तर या मंडळींनी ठाण्याकडे चळवळ सुरु केली होती. त्यांच्या मार्फत आम्हाला कळविले की, पक्षाचा कार्यकर्ता तुमच्या परिसरात कार्यरत आहे. त्यांच्याशी तुम्ही संपर्क साधा, तेव्हा सर्व मंडळी कॉ. शरद पाटील यांना साक्री येथे भेटायला गेले. लाटीपाडा धरण परिसरात अधिवेशन भरविण्यात आले. यावरुन असे दिसते की, नजूबाई गावितांसह साक्री परिसर आणि तालुक्यातील जनताही तेव्हांपासून कॉ. शरद पाटील यांच्या संपर्कात आले. कॉ. शरद पाटील यांचा विचारांचा आणि कार्याचा नजूबाई यांच्यावरही प्रभाव पडल्याने त्या चळवळीशी जोडल्या गेल्या.

सन १९७१ मध्ये दुष्काळ पडला असताना त्यावरील उपाय योजनांकरिता साक्री तालुक्यात कॉ. शरद पाटील यांच्या नेतृत्वात मोर्चाचे आयोजन करण्यात आले. तेव्हा लाटीपाडा धरणातून पाणी सोडण्याचा निर्णय झाला. त्याचबरोबर रोजगार हमीची काम करण्यात आली. कासारे गावाबाहेरील जागेत (लेनिन नगर ) उभे करण्यात आले.

**हिंदूकोड बिलाविषयी कॉ. नजूबाई गावित यांची भूमिका :–** हिंदूकोड बिलानुसार स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा आणि वारसा व पोटगीचा अधिकार असतो. हे अधिकार आदिवासी स्त्रियांना मात्र नव्हते. आदिवासी स्त्रियांच्या बाबतीत आदिवासी समाज मंडळामार्फत निर्णय घेतले जातात. आदिवासी स्त्रियांबरोबर समाजात काही भ्रम असल्याचे नजूबाई अधोरेखित करतांना म्हणतात की, लोकांना वाटते आदिवासी स्त्री पती निवडते, पण हे खरे नाही. तिचे लग्न तिच्या इच्छेविरुध्द होत असते. जर ती तिच्या पतीला सोडत असेल तर तिला मारहाण केली जाते. एवढेच नव्हे तर पतीकडे जबरदस्तीने पाठविले जाते. जर तिला घटस्फोटच घ्यावयाचा असला तरी तिला लग्नाचा सर्व खर्च भरुन द्यावा लागतो. तिला पोटगी दिली जात नाही. या वास्तव परिस्थितीचा विचार केला तर आदिवासी स्त्रीची परिस्थिती प्रत्यक्षात दाखविली जाते. तशी नसून हालाखीची असल्याचेच वास्तव डोळयासमोर येते. मग असे वास्तववादी हलाखीचे जीवन जगत असेल तर तिला हिंदूकोड बिलानुसार अधिकार का प्रदान करण्यात येवू नयेत. म्हणूनच कॉ.शरद पाटील आणि कॉ. नजूबाई गावीत यांनी आदिवासी स्त्रियांकरिता हिंदूकोड बिलाचा आग्रह धरणे ही भूमिका रास्त होती.

**संशोधन पध्दती :** सर्वसाधारण विषयांकरीता असलेल्या वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, तुलनात्मक आणि ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा लेखनाकरीता उपयोग केला आहे.

**निष्कर्ष**

१) खानदेशातील महिलांनी सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान दिले.
२) खानदेशातून महिलांनी परंपरागत प्रथा मोडून आत्मविश्वासाने सामाजिक आंदोलनात भाग घेतला.
३) सामाजिक कार्य करतांना समाजातील सर्वच जाती धर्मातील स्त्रियांचे योगदान दिसून येते.
४) समाज सुधारकांच्या कार्यामुळे अनेक महिलांना सामाजिक कार्य करण्यास प्रेरणा मिळाली.
५) महिलांदेखील दारुबंदीसाठी महत्त्वाचे कार्य करु शकतात व समाजात परिवर्तन घडवून आणू शकतात.

**समारोप**

भारतीय समाज व्यवस्थेत सामाजिक स्तरावर अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. आजतागायत त्या समस्या सोडविण्यासाठी अनेक क्षेत्रातील सामाजिक संस्था पुढे आलेल्या दिसतात. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील अनेक विभागात समश्यांचे निर्मूलन करण्यासाठी विविध संस्था कार्य करतांना दिसतात. प्रामुख्याने खानदेश विभागतही सामाजिक समस्या सोडविण्यासाठी अनेक महिला पुढे आलेल्या दिसतात. प्रामुख्याने चळवळींमध्ये पुरुषांचा मोठया प्रमाणावर सहभाग दिसतो. परतु चळवळीमध्ये काही महिलांचेही योगदान लक्षणीय ठरते. त्यात विजयाताई चौक, मंदाकिनी टोणगांवकर, पार्वताबाई ठकार, नजूबाई गावीत या कर्तबगार महिलांचेही योगदान खानदेशाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण आहे. या महिलांनी विविध समाजातील स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार निवारणार्थ कार्य केलेले आहे त्यानुसार महिलांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी कर्तबगार महिलांनी अहोरात्र परिश्रम करुन महिलांमध्ये आत्मीक बळ निर्माण करुन आज विविध क्षेत्रात महिला निडरपणाने जगतांना दिसतात. म्हणून सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचे योगदान आपल्याला विसरता येणार नाही.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची :**

१. प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस, विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे, संपादक, 'महाराष्ट्राच्या इतिहासातील स्त्रियांचे योगदान'
२. चौक विजया विष्णू, कार्यपरिचय, (विजया माळी) यांचे स्वलेखन संपादन केलेली पुस्तिका
३. प्राचार्य, डॉ. जी.बी. शहा, 'खानदेशातील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास'
४. प्राचार्य डॉ. भी.ना. पाटील, 'खानदेशातील समाज प्रबोधनची चळवळ'
५. संपादक, मुं.ब.शहा, 'सप्तसिंधू', श्रीमती मंदाकीनी टोणगांवकर गौरव ग्रंथ
६. टोणगांवकर मंदाकीनी, संपा, समर्पित श्री. अण्णासाहेब टोणगांवकर स्मृती, साधना प्रकाशन, पुणे १९७८
७. नजुबाई गावित, 'तृष्णा'

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील जमीन महसूल गोळा करण्याची पध्दती

**प्रा.डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी**
इतिहास विभाग प्रमुख, एस.जे.एम.एस.एम.चे कला व वाणिज्य महाविद्यालय,
खापर, जि. नंदुरबार.

शेती हा खानदेशातील लोकांचा प्रमुख व्यवसाय मानला जात असे. राज्याला सर्वाधिक महसूल लोकांच्या प्रमुख व्यवसायापासूनच मिळत असतो. म्हणूनच राज्यकर्तेचे लक्ष जमीन महसूलाकडे अधिक असल्याचे आढळून येते. या काळात जमीन महसूल हेच सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन बनले होते. संपूर्ण राज्याची अर्थव्यवस्था कृषी व्यवसायावर अवलंबून होती. जमीन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचे महत्वाचे साधन असल्यामुळे पेशवे, कंपनी व ब्रिटिश सरकारने जमीन महसूल गोळा करण्यासाठी वेगवेगळया पध्दतींचा अवलंब केला होता. शेतसारा गोळा करतांना तत्कालीन परिस्थितीचा विचार होत असे. सरकार पाटील याची स्थानीक अधिकारी म्हणून नेमणूक करत असे. सरकार पाटील, कुलकर्णी यांच्यामार्फत शेतसारा निश्चित करणे, गोळा करण्याचे काम करीत असत.

**१) पेशवे सरकारकालीन जमीन महसूल गोळा करण्याच्या पध्दती :-**

पेशवे सरकार जमीन महसूल, जकात, खनिज संपत्ती, जंगल, खंडणी, नजराणा, दंड व न्यायालयीन शुल्क्, युध्दात मिळालेली लूट, दुसऱ्या राज्यांकडून मिळणारी चौथाई, सरदेशमुखी इ. विभागातून कर गोळा करत असत.१ या काळात सरकारी वसुलीच्या अनेक बाबी असल्या तरी यात जमीन महसूल ही सर्वात महत्वाची बाब मानली जात असे.२ यामुळे सरकार जमीन महसूल गोळा करण्यासंदर्भात विशेष दक्ष असत. पेशवे सरकारच्या काळात जमीन महसूल गोळा करण्याच्या अनेक पध्दती होत्या. यात कमाविसी पध्दत, बटाई पध्दत, व मक्ता पध्दत इ. प्रमुख पध्दती होत्या.

- **अ) कमाविसी पध्दत :-** पेशवे काळात काही जमिनी उपरी लोकांकडे असत. त्या जमिनी खंडाने कसण्यासाठी दिल्या जात असत. मामलेदार कमाविसा मार्फत अशा जमिनीवरील महसूल गोळा करत असे. म्हणून या पध्दतीला कमाविसी पध्दत असे म्हणत.
- **ब) बटाई पध्दत :-** पेशवे काळात बटाई पध्दत जास्त प्रचलित होती. सरकार जमिनीची मोजणी व पीक पाहणी करुन पाच वर्षाकरिता शेतसाऱ्याचा दर निश्चित करत असे. याच दराने महसूल गोळा केला जात असे. यानुसार महसूल गोळा करण्याच्या पध्दतीला बटाई पध्दत म्हणत असत.
- **क) मक्ता पध्दत :-** पेशव्यांना नवीन जिंकलेल्या प्रदेशात लागलीच जमीन महसूल वसुलीसाठी नवीन पध्दत लागू करणे शक्य होत नसे. याकरिता सरकार जमीन महसूल गोळा करण्यासाठी मक्ता पध्दतीचा अवलंब करत असे. यात मामलेदार किंवा कमाविसदार एक विशिष्ट रक्कम सरकारकडे जमा करत असत. नंतर मामलेदार त्या भागातील शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करत असे. या पध्दतीला मक्ता पध्दत असे म्हणत.३

पेशवे सरकार तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन शेतसारा वसुलीसाठी वेगवेगळया पध्दतींचा अवलंब करत असत. त्यामुळे पेशवेकाळात सारा वसुलीची विशिष्ट अशी पध्दत नव्हती.४

**२) कंपनी सरकारकालीन जमीन महसूल गोळा करण्याची पध्दती :-**

१८१८ मध्ये महाराष्ट्रात कंपनी सरकारची सत्ता प्रस्थापीत झाली. डेक्कन कमिशनर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी पूर्वापार सारा पध्दतीत बदल करण्याचे ठरविले.५ एलफिन्स्टने सारा वसुलीची मक्तेदारी पध्दत बंद करुन मुंबई इलाख्यासाठी मौजेवारी पध्दत सुरु केली. पाटील व मिरासदारांचे हक्क कायम ठेवले. मात्र जिल्हाधिकारी आणि दुय्यम कंपनी सरकारच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना वसूली बाबत व्यापक अधिकार दिलेत.६ एलफिन्स्टन यांनी मराठाकालीन सारा वसुली पध्दतीत किरकोळ बदल करुन पारंपारिक पध्दत सुरु ठेवली. तहसीलदारांना कागदपत्रे तपासण्याचे व सारावसुलीचे अधिकार दिले.७ कंपनी सरकारच्या काळात शेतसारा निश्चित झाल्यावर मामलेदाराकडून कराराचा मसुदा तयार करण्यात येत असे. त्यावर पाटील व कुलकर्णींची सही झाल्यानंतर मामलेदार जमाबंदीचे पत्रक पाटीलला देत असत. त्यानुसार शेतसारा वसुलीला सुरुवात होत असे.८ शेतसारा निश्चित करतांना जमीन, पाणीपुरवठयाची सोय व जमिनीची प्रत याचाही विचार केला जात असे.९ शेतसारा वसुलीचा पहिला हप्ता सप्टेंबर महिन्यात खरीप पिकांचे उत्पादन आल्यावर वसूल करत असत.१० कंपनी सरकारने महसूल पध्दतीत बदल करतांना पारंपारिक पध्दतीची जोड घेतली. गाव पातळीवरील मिरासदार, वतनदारांचे अधिकार कायम ठेवून त्यांच्यावर ब्रिटिश अधिकाऱ्यांचे वर्चस्व निर्माण केले. कंपनी सरकारला महसूल पध्दतीत जास्तीचे बदल करुन जनतेचा असंतोष ओढवून घ्यावयाचा नव्हता.

**३) ब्रिटिश सरकारकालीन जमीन महसूल गोळा करण्याची पध्दत :-**

१८५८ मध्ये भारतात ब्रिटिश सरकारची सत्ता प्रस्थापीत झाली. नव्या सरकारने सुरुवातीच्या काळात कंपनी सरकार प्रमाणेच महसूल

ISSN : 2348-7143
Dec. 2018

गोळा करण्याचे धोरण अवलंबिले होते. ब्रिटिश सरकारने सरकार व जनता यांचे जमीन धारण करण्यासंबंधीचे हक्क व कर्तव्य मुंबई जमीन महसुलाच्या कायदयाने ठरवून टाकली. यापध्दतीने प्रत्येक शेतकरी थेट सरकारकडून जमीन धारण करतो व तो सरकारचा खातेदार होतो. आणि शेतकरी आपल्या उत्पन्नाचा सहावा हिस्सा जमीन महसूल म्हणून रोख स्वरुपात भरत असे.११ ब्रिटिश सरकारच्या या धोरणामुळे जनतेचा थेट शासनाशी संबंध प्रस्थापित झाला.

ब्रिटिश सरकारने महसुली उत्पन् वाढविण्यासाठी खानदेशातील पडीक जमीन जास्तीत जास्त लागवडीखाली आण्ण्यासाठी प्रयत् केले. नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतसाऱ्यात सवलती दिल्याच्या नोंदी आढळतात. सरकारच्या या धोरणांमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली. १९०० च्या शेतीविषयक सांख्यिकी अहवाला नुसार ब्रिटिश सरकारच्या काळात खानदेशात रयतवारी पध्दतीने जमीन महसूल गोळा करत असत.१२ खानदेशातील लोकांचे उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती आहे हे ओळखून पेशवे, कंपनी आणि ब्रिटिश सरकारने जमिनीचे प्रकार, सिंचनाच्या सोयी आणि पिके इ. बाबींचा विचारात घेऊन महसूल आकारणी केली होती. परिणामस्वरुप मशागतीच्या क्षेत्रात वाढ झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नत वाढ झाली होती. पर्यायाने सरकारच्याही महसुली उत्पन्नात वाढ झाली होती.

**४) खानदेश सर्वात जास्त् महसूल देणारा जिल्हा :–**

ब्रिटिश सरकारच्या ताब्यात असलेल्या हिंदुस्थानातील उत्तर विभाग, मध्य् विभाग व दक्षिण विभागात सरकारला मिळत असलेल्या जमीन महसूलाची आकडेवारी पाहता सरकारी अहवाला नुसार सरकारला खानदेश विभागातून सर्वात जास्त् जमीन महसूल मिळत असे.

**सन १८९७–९८ मधील उत्तर, मध्य् आणि दक्षिण विभागातील महसूलाची आकडेवारी१३**

| जिल्हा | जमा झालेला एकूण महसूल |
|---|---|
| उत्तर विभाग | |
| अहमदाबाद | १६,१२,०१५ |
| कैरा | २१,५७,९३० |
| पंच महाल | ३,२८,९७९ |
| भ्रुच | २२,१०,२०० |
| सुरत | २३,९१,७०२ |
| ठाणा | ११,९१,९११ |
| एकूण | ९८,९२,७३७ |
| मध्य् विभाग | |
| नासिक | १५,३५,११४ |
| खानदेश | ४०,१७,५७१ |
| अहमदनगर | १५,४५,१७९ |
| पुणा | १२,७२,१०१ |
| सोलापूर | १०,६८,४८९ |
| सातारा | १८,२४,९९२ |
| एकूण | १,१२,६३,४४६ |
| दक्षिण विभाग | |
| बेळगाव | १५,५८,५३१ |
| धारवाड | २५,२९,०७९ |
| बिजापूर | १३,२४,६५८ |
| कनारा | १०,०८,४१५ |
| रत्नागिरी | ८,४५,१२४ |
| कुलाबा | १२,४३,९७२ |
| एकूण | ८५,०९,७७९ |
| तीन विभागांची एकूण | २,९६,६५,९६२ |

सन १८९७–९८ मध्ये सरकारला या तिन्ही विभागातून एकूण जमीन महसूल २,९६,६५,९६२ रुपये एवढा मिळाला होता. या सर्व

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

विभागांमध्ये सर्वात जास्त् मध्य् विभागापासून १,१२,६३,४४६ रुपये महसूल मिळाला होता. या विभागातील खानदेश जिल्हयातून ४०,१७,५७१ रुपये महसूल मिळाला होता. मध्य् विभागातील इतर जिल्हयातून मिळणाऱ्या महसुलीच्या तूलनेत खानदेशातून मिळणारा महसूल जास्त् होता. एवढेच नव्हे तर इतर कोणत्याही जिल्हयातून मिळणाऱ्या महसुलीच्या रक्कमेपेक्षा जास्त् होता.

**निष्कर्ष**

खानदेशातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे आणि या व्यवसायापासून मिळाणारा महसूल हा मोठया प्रमाणावर आहे. म्हणून राज्यकर्त्यांनी खानदेशातील शेती व्यवसायाकडे लक्ष दिले. सिंचनाच्या सोयी, दुष्काळाच्या काळात मदत करणे, चोर दरोडेखोर यांचा बंदोबस्त् करणे, बी-बीयाणे घेण्यासाठी आर्थिक मदत करणे यासारख्या बाबी केल्या होत्या. त्यामुळे लागवडीचे क्षेत्र वाढले परिणामी सरकारचे महसूली उत्पन् वाढले.

**संदर्भ सूची :**

१) सावंत बी.एस., जाधव- मराठयांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर,२००७,पा.७७
२) भावे वा.कृ.- पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसन्धान परिषद, नवी दिल्ली, १९७६, पा.३४९
३) सावंत- पूर्वोक्त्, पा.२०२
४) व्होरा राजेंद्र (संपा.)- प्रा.य.दि.फडके गौरव ग्रंथ्, आधुनिकता आणि परंपरा एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रतिमा प्रकाशान, पुणे २०००, पा.३०४.
५) घोडके ह.म.- महाराष्ट्रगाथा, राजहंस प्रकाशन, पुणे २०००, पा,१७०
६) ओक प्रमोद- एलफिन्स्टन, पुणे,१९९९, पा.१७९
७) घोडके ह.म.- महाराष्ट्रगाथा, पूर्वोक्त्, पा.३७
८) डे.क.फा.१७२, दि.३/१०/१८१८, पत्र क्रं.२३३
९) डे.क.फा. १७६, दि.२३/६/१८१९, पत्र क्रं.५३९
१०) उपरोक्त्.
११) अत्रे त्रि.ना.- गावगाडा, वरदा बुक्स्, पुणे१६,१९९५, पा.८
१२) शेतीविषयक अहवाल-१९००.पा.२७६
१३) प्रशाकीय अहवाल मुंबई-१८९८, पा.३९०

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील आदिवासींची आर्थिक परिस्थिती

**प्रा. एस.एस. वसावे**
अर्थशास्त्र विभाग, एस.पी.डी.एम. महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे.

भारतात अनेक राज्यांमध्ये आदिवासी जमाती विखुरलेल्या दिसतात. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात आदिवासींच्या ४७ जमाती आहे. महाराष्ट्रात नदुंरबार जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात आदिवासी लोकांची वस्ती दिसते. प्रामुख्याने महाराष्ट्रातील खानदेश परिसरातील सातपुडा पर्वतरांमध्ये आदिवासींची लोकसंख्या मोठया प्रमाणावर आहे. या लोकांना आदिवासी म्हणून संबोधले जाते. काही अभ्यासक या आदिवासींना अगदी मुळचे रहिवासी () असे संबोधतात. डॉ.जी.एस.धुर्ये त्यांना तथाकथित मुळचे रहिवासी ( ) व मागासलेले हिंदू असे म्हणतात. या व्यतिरिक्त धरतीची लेकरे, गिरीजन, जनजाती, आदिम समाज, मूळनिवासी, वनवासी असेही म्हटले जाते. भारतीय राज्यघटनेत आदिवासींना 'अनुसूचित जमाती' असे म्हटले आहे. मात्र 'आदिवासी' हाच शब्द प्रचलित आढळतो.

सातपुडयाच्या पहाडपट्टीत स्थलांतरित झालेल्या वस्त्या आणि मूळच्या वस्त्या अशा वस्त्यांतून राहणारे आदिवासी लोक पाडे, खेडे, गाव यात राहत असून शेतावरही त्यांचे वास्तव्य आढळते. आदिवासी लोक मेहनती, प्रामाणिक, दयाळू, आदरातिथ्य करणारे, सहसा अनोळखी माणसांशी न बोलणारे, परंतु परिचयानंतर मोकळेपणाने वागतांना दिसतात. हे लोक अनादीकाळापासून टोळयाटोळयाने आपापल्या जीवनपध्दतीनुसार दऱ्या खोऱ्यातून राहत आलेले आहेत. ते जमातीनुसार समूह करून राहतात. सातपुडयात भिल्ल, पावरा, कोटले, धानका, नाईकडा, राठवा, तडवी भिल्ल, पारधी, वसावा या जमातीचे समूह आढळतात. सामाजिक जीवनात त्यांच्या चालीरीती, कार्यपध्दती, संपत्ती, श्रध्दा आहार, पोशाख, विवाहपध्दती, स्त्रीयाचे स्थान त्या-त्या जमातींमध्ये वैशिष्टयपूर्ण आहे.

मानव आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी त्या संदर्भात विशिष्ट आर्थिक क्रिया करतो. समाज ज्या भौगोलिक क्षेत्रात वास्तव्य करतो त्या क्षेत्रातील लोकांच्या जीवनाश्यक गरजांची पूर्तता करणाच्या उद्देशाने मर्यादित म्हणजेच उपलब्ध साधनसामुग्रीचा माध्यमातून आपल्या जास्तीत जास्त गरजा भागविण्याचा प्रयत्न केला जातो. दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी जमातींचे आर्थिक जीवन हे प्रामुख्याने जंगलात आढणाऱ्या पशू-पक्षी, वृक्ष, फळ-फुले, नद्या-नाले इत्यादीशी निगडीत असते. उदरनिर्वाहाची साधने गोळा करण्यासाठी आदिवासी लोकांना कठोर परिश्रम करावे लागतात. त्यामुळे त्यांचे आर्थिक जीवन हे अधिक संघर्षमय असते. फळे, फूले , कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे, मासे पकडणे, पशूपालन आणि शेती यासारख्या आर्थिक क्रियांतून ते निसर्गाशी संघर्ष करीत आपल्या गरजांची पूर्तता करतात. अर्थव्यवस्थेची व्याख्या करतांना राल्फ पिडिंग्टन म्हणतात. मानवाच्या भौतिक गरजांची पूर्ती करण्यासाठी उत्पादनाचे संघटन, वितरणावर नियंत्रण तसेच समूहातील मालकी व अधिकाराचे निर्धारण करणाऱ्या पध्दतीला अर्थव्यवस्था असे म्हणतात. सातपुडा पर्वतरांगामध्ये भिल्ल, पावरा, तडवी भिल्ल (मुस्लीम) कोटले, राठवा, पारधी, धानका, नायकडा हे लोक डोंगराळ व पर्वतीय जंगलव्याप्त भागात राहतात. साहजिकच त्यांची अर्थव्यवस्था प्राथमिक व्यवसायांवर अवलंबून आहे. त्यांचे आर्थिक जीवन निसर्गावर निर्भर आहे. आदिवासी लोक खाद्यसंकलन, शिकार, मासेमारी, पशूपालन, जंगली पदार्थ, गोळा करणे उदा. महूफुले, डिंक, मध,औषधी, कंदमुळे इत्यादी व्यवसाय करतात. खानदेशातील हे लोक पर्वत, रानावनात, जंगलात भटकून विविध वस्तु गोळा करून आपला उदरनिर्वाह करतात. जंगलात भटकतांना डिंक, महुफुले, औषधी, कंदमुळे, लाख, मेण गोळा करणे ही कामे करतात. हे त्यांचे पारंपरीक व्यवसाय होते.

**शिकार –**

खाद्यसंकलनाबरोबर बहुतांश आदिवासी जमाती शिकार करीत होत्या आदिवासींच्या आर्थिक जीवनात शिकारीस विशेष स्थान असल्याचे दिसते. सातपुड्याच्या कुशीत राहणाऱ्या आदिवासी जमाती हे पशू-पक्षी यांची शिकार करीत होत्या. हे लोक ससा, पारवा, तितर, मैना, मोर, लांडोर, रानकोंबडा, बुलबुल, रानडुक्कर, सांबर, हरिण इत्यादींची शिकार करुन आपला चरितार्थ चालवित होत्या.शिकार करण्यासाठी आदिवासी धनुष्यबाण, भाला, गोफण, कुऱ्हाड, धाऱ्या, विडा, काठ्या इत्यादी हत्याऱ्यांचा वापर करीत होते. फासे तयार करुन कबूतरे, हरीण पकडण्यात फासे पारधी जमात तरबेज होती. आदिवासी लोक शिकार करण्यासाठी कुत्रा सोबत बाळगत होते.

**मासेमारी –**

सातपुड्यातील आदिवासी जमातींचा 'मासेमारी' हा प्रमुख व्यवसाय नाही. मात्र फुरसतीच्यावेळी, शिकार न मिळाल्यास, घरात कोंबडी नसल्यास, पाहूणचार करण्यासाठी नदी किंवा नाल्यांमध्ये मासेमारी केली जाते. मासेमारी करणे सोपे असल्याने लहान मुले आणि स्त्रियादेखील लहान-लहान तलावात, ओढ्यात, नाल्यात, नदीत मासे पकडण्याचे कार्य करीत असतात. पकडलेले मासे कधी जागेवरच तर कधी घरी

आणून भाजून किंवा शिजवून खातात. मासे पकडण्यासाठी गळ, जाळे, झापडी, मोडे, कंडा इत्यादी साधने वापरली जातात. आदिवासी लोक अधिकतर मोडे व जाळे वापरुन सांघिक व वैयक्तिकरित्या मासेमारी करतात.

**शेती व्यवसाय –**

आदिवासी जमातींमध्ये शेती ही स्थलांतरीत व स्थिर या दोन्ही प्रकारे केली जात होती. स्थलांतरीत शेतीस वेगवेगळ्या जमातींमध्ये वेगवेगळी नावे आहेत. नागा जमातीत 'झूम' गोंड जमातीत पेंडा, बैगा जमातीत बेवरा तर भिल्ल जमातीत 'दध' किंवा 'जीमटा' अशी नावे आढळतात. सातपुड्याच्या जंगलातून खाद्यसंकलन करणाऱ्या, शिकारीमागे धावणाऱ्या, ओढा-नाल्यातून मासेमारी करणाऱ्या आदिवासींच्या जीवनातील भटकंती थांबली ती शेतीमुळे. आदिवासी करीत असलेल्या आर्थिक क्रियांपैकी स्थिर शेती ही सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासाला पोषक होती. सातपुड्याच्या कुशीत भिल्लांची संख्या मोठी आहे. पूर्वी सातपुडा वैभवाने, घनदाट अरण्याने व्यापलेला होता. जंगल-दऱ्याखोऱ्यात वाहणाऱ्या बारमाही नद्या, नाले, उंचावरुन कोसणारे धबधबे, वनऔषधींची खाण होती. सातपुडा परिसर आदिवासींना मुबलकता निर्माण करणारा होता. नर्मदा व तापी या दोन मुख्य नद्यांमुळे परिसरात पाण्याची मुबलकता होती व आजही आहे. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे लोकांवर उपासमारीची वेळ येत होती.

शेतीबरोबर पशूपालन व कुकूटपालन हे आदिवासींचे दुय्यम व्यवसाय आहेत. प्रत्येक भिल्ल कुटुंबाकडे गुरे व शेळ्या असतात. कुटुंबाची गरज भागावी व शेती कामात मदत व्हावी एवढ्याच हेतूने पशूपालन केले जाते. असे असले तरी या पशू-पक्ष्यांचा नवस फेडण्यासाठी व धार्मिक कार्याच्यावेळी बळी देण्यासाठी पशूपालन केले जात होते. आदिवासींच्या पशूपालनात गाय, बैल, म्हैस, आणि शेळ्या या मुख्य स्वरुपात आढळतात. तर कोंबड्या, कुत्रा, मांजर, बदक, कबूतर, मोर, पोपट इत्यादी पाळतात.गुरे, बकऱ्या बांधण्यासाठी स्वतंत्र किंवा झोपडीतच जागा असते व कोंबड्यांची खूराडी असतात. आदिवासी लोक आर्थिक स्थैर्यासाठी पशूपालन व कुकूटपालन करतात.

**शेतमजूरी**

शेती मशागत करतांना पूर्व मशागत, अंतर्गत मशागत आणि उत्तर मशागत या तीनही मशागतीच्या कामासाठी शेतमजूरांची आवश्यकता असते. पेरणी, कोळपणी, निंदणी आणि कापणी ही कामे करण्यासाठी मजूर हा महत्वाचा घटक मानला जातो.

**रोजंदारी –**

साधारणत: शेतमजूरांचे तीन प्रकार पडतात त्यात रोजंदार-रोजची मजूरी घेणारा, महिनादार-मासिक मजूरीवरील मजूर आणि सालदार-वार्षिक मजूरी घेणारा. शेतकरी या मजूरांना रोख मजूरी देत असत. रोख रक्कमेव्यतिरिक्त धान्य, जेवण आणि कपडे यासारख्या बाबी पुरवत असे.१३९ शेतीकामात रोजंदारीमध्ये पुरुषांबरोबर स्त्रिया व पंधरा वर्षाखालील मुले यांचाही मजूर म्हणून उपयोग होत होता. पुरुष नांगरणी, कापणी व जड ओझ्याचे वाहतूक यासारखी कष्टाची कामे करतात, तर लावणी, निंदणी, वेचणी यासारखी हलकी कामे स्त्रिया व मुले करतात. कामाच्या स्वरुपावरुन स्त्रिया व मुलांना मजूरी देताना पुरुष मजूरापेक्षा कमी मजूरी दिल्याची नोंद आढळते.

**सालदारी**

सालदार हा अनिश्चित वर्षासाठी मजूर असतो. वर्षाच्या कराराने पैशाच्या किंवा धान्याच्या स्वरुपात मजूरी ठरवून दुसऱ्याच्या शेतात काम करणाऱ्या मजूरास सालदार किंवा घरगडी म्हणतात. साल म्हणजे वर्ष दार-दरवाजा सालभर मालकाच्या घरी काम करणारा सालदार.१४७ या सालदार मजूरांना मालकाकडे घराची व शेतीविषयक कामे करावी लागत होती.

एकंदरीत खानदेशातील आदिवासी भिल्ल सालदारांची मोठया प्रमाणावर सधन शेतकरी, जमिनदार आर्थिक शोषण करीत होते. ही स्थिती १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत अशीच होती. सातपुडयातील आदिवासी लोक रोजंदारी व सालदारी करीत होते. शहादा, शिरपूर, चोपडा, आणि यावल या तालुक्यांमध्ये अजूनही पावरा (बारेला) भिल्ल जमातीतील लोक सालदार, रोजंदारी आणि जागल्याचे काम करतांना आढळतात. सातपूडा परिसरात शेतीचे उत्पादन कमी, रोजंदारीचा अभाव, वाढती लोकसंख्या, त्यामुळे या परिसरात बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस उग्र होत आहे. वनखात्यांतर्गत सामाजिक वनीकरण योजनेत हे लोक रोजंदारी कामाला जातात तसेच जंगल भागातील पाझर तलाव, रस्तेबांधणी, गवत कापणी इत्यादी कामे रोजंदारीने केली जातात. सातपुडा परिसरातील आदिवासी कुटूंबे मैदानी भागात कामासाठी जातात. शेतात शेतमजूर, शेतराखणदाराची कामे तर शहरी भागात इमारत बांधकामावर मजूर व जागल्या म्हणून काम करतात.

**वनसंकलन**

सातपुड्याच्या परिसरात अनेक प्रकारची फळझाडे आढळतात. त्यात आंबे, चारोळी, महू तसेच सीताफळाची झाडे प्रमुख आहेत. त्याशिवाय कुहबे, बोरं, कंद, पिंपळे, उंबरे, टेंबरे, चिंच, भिलावा, जांभुळ, आवळा, करवंद इत्यादी झाडे जंगलात विखूरलेली आढळतात. त्याच्यापासून किरकोळ पैसे मिळतात. परंतु आंबे, चारोळी, महू, सीताफळ या प्रदेशात मुबलक प्रमाणात असून आदिवासी लोकांच्या आर्थिक स्त्रोताची ती महत्वाची साधने आहेत. 'निसर्गातील खाद्यवस्तूंचा संचय अगर संग्रह करुन त्यावर उपजीविका करणे यास वनसंकलन असे म्हणतात.' ब्रिटिश आमदनीत लहान-मोठ्या २५५ आदिवासी जमाती कंदमुळे, फळे, मध, औषधी वनस्पती म्हणून जंगलातील उत्पादने

गोळा करण्याचे काम करीत होत्या तोच त्यांच्या उपजीविकेचा मार्ग होता.

सातपुड्यातील भिल्ल झाडांची तोड करुन कोळसा करणे, कात तयार करणे, लाकडे तोडणे, गवत कापून ते विकणे, अंजनाचा पाला विकणे, डिंक व मध गोळा करणे, मोहाची फुले व फळे गोळा करुन विकणे, मोहाची दारु पाडणे, विड्यासाठी तेंदू पाने तोडणे यावर गुजराण करतात.या वनसंपदेवर गावच्या लोकांचा सामुदायिक मालकी हक्क होता. पाड्याच्या सीमेअंतर्गत असणाऱ्या टेकड्यांवरील फळझाडे देखील त्यांची सामूहिक संपत्ती होती. त्या–त्या पाड्यातील लोक ही वनसंपदा गोळा करण्यासाठी जंगलभर भटकतात. वाट्यास आलेल्या या वनसंकलनेची आपल्या सोयीप्रमाणे विक्री करीत होते.मात्र ब्रिटिशांच्या वनखात्याने सातपुडा परिसरातील जंगलभाग ताब्यात घेतल्यानंतर या सामूहिक मालकीच्या वनसंकलनाचे प्रमाण कमी होतांना आढळते.

**गृहउद्योग**

उद्योगामुळे आर्थिक संपन्नता प्राप्त होते. परंतु असे उद्योगधंदे उभारण्यासाठी कच्चा माल, भांडवल, दळणवळणाची सुविधा, पाणीपुरवठा व कुशल कामगार वगैरेंची आवश्यकता असते. सातपुडापर्वत रांगांमध्ये उद्योगधंदा उभारण्यासाठी या घटकांचा अभाव होता. तरीही आदिवासी जमातींनी आपल्या हस्तकौशल्याच्या जोरावर गृहउद्योग व्यवसाय चालविलेले आढळतात. आपल्या उपजिवीकेसाठी आवश्यक असलेल्या शेतीला जोडधंदा म्हणून टोळंबीचे तेल, रोशा तेल, विडी वळविणे, दारु गाळणे, विणकाम, बांबूकाम, मातीकाम यासारखे गृहउद्योग व्यवसाय स्थानिक आदिवासींनी चालविलेले आढळतात. परिसरात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधसामग्री, प्राण्यांचे केस, कातडे, बांबू, वनस्पती, माती, दगड इत्यादींचा वापर करुन कलाकसूरींची काम करतात.

**५.८ विणकाम**

विणकाम हे मानवाच्या तांत्रिक प्रगतीचे एक लक्षण आहे. ही कला प्रागेतिहासिक काळापासून भारतात प्रचलित आहे. सिंधू संस्कृतीतील लोक कापड वापरीत होते. त्यावरुन त्या काळातील काही लोक सूत कातीत होते, असे आढळते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात विणकामासंबंधी उल्लेख आढळतो. विणकामावरील अधिकाऱ्याला सूत्राध्यक्ष अशी संज्ञा होती.झाडांच्या साली, गवत, ताग इत्यादींपासून तंतू काढणे, कापसाचे सूत कातणे, त्याची वस्त्रे विणणे इत्यादी कामे केली जात होती.

**बांबूकाम**

बांबूच्या वस्तुंची निर्मिती करण्याची कला परंपरागत आहे. बुरुडकाम हा विशेषत: आदिवासींचा पुरातन व सार्वत्रिक स्वरुपाचा हस्तव्यवसाय असून बहुतेक सर्व आदिवासी जमातीत तो टिकून आहे. बुरुड, कैकाडी समाजाव्यतिरिक्त डोंगराळ भागातील आदिवासी लोक बांबूपासून विविध वस्तू तयार करतात. बुरुडकामासाठी बांबू, वेत विविध प्रकारचे गवत इत्यादी वृक्ष–वनस्पतींचा वापर होत असल्याचे आढळते. झाडांच्या साली, पाने, धागे वा तंतू यांचाही बुरुडकामासाठी उपयोग करताना आढळतात. टोपल्या, परड्या, पिंजरे, अन्नपाण्याची भांडी, कणग्या, यासारख्या गृहोपयोगी वस्तूंप्रमाणेच घरासाठी तट्ट्या, छपरे, शिकारीसाठी ढाली, शिरस्त्राणे, लहान बालकांसाठी पाळणे, पंखे, पादत्राणे तसेच ढोल वाजविण्याच्या काठ्या, मासेमारीची साधने यासारख्या गरजेच्या वस्तू आदिवासी लोक स्वत: तयार करीत होते.त्यांची विक्री करावी एवढ्या बांबूच्या वस्तू बनवीत नसले तरी काही गरजू लोक खराटे, टोपल्या, सूप, विणून बाजाराच्या ठिकाणी विक्री करतात. यातून बांबूपासून गृहोपयोगी वस्तू बनविण्याचा व्यवसाय काही प्रमाणात चालत होता. असे आढळते.

**मातीकाम –**

खानदेश परिसरातील मोठ्या गावांमध्ये मातीची भांडी, कौल, विटा आणि मातीची खेळणी बनविण्याचा व्यवसाय चालत असे. हा व्यवसाय परंपरागत सुरु होता. आदिवासी लोकांच्या घरगुती वापरातील वस्तू ह्या सर्व मातीच्या बनविलेल्या असतात. मातीकामात प्रामुख्याने कुंभार, बेलदार आणि कुणबी लोक कार्यरत होते. खानदेशातील कुंभार हे नित्यनियमाने पाटील व इतर कूळांना वर्षातून एकदा मातीची भांडी देत असत. त्या मोबदल्यात त्यांना धान्य मिळत असे. मात्र काठेवाडी कुंभारांना रोख पैसा मिळत होता. त्यांची आर्थिक परिस्थितीही संपन्न होती. गावाजवळच्या शेतातील, तलावातील, नदीकाठची माती खोदून आणून माठ, चूल, मडकी, विटा, कौल व झारी इत्यादी वस्तू तयार केल्या जात.

**कौल व विटकाम उद्योग –**

दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींच्या घरांची रचना सर्वत्र सारखी आढळते. त्यांची घरे कौलारु झोपड्यांची असतात. सातपुड्याच्या जंगलात साग, बांबू वृक्षांची वने सर्वत्र आढळतात. झोपडी तयार करण्यासाठी माती, विटा गवत व पळसाची आणि सागाची पाने इत्यादी साहित्य वापरलेले आढळते. त्यांची घरे बांबू, साग व गवताची आणि शेणामातीने लिपलेली असतात.

**पशूपालन –**

कुत्रा हा मानवाचा सर्वात पहिला पाळीव पशू आहे. कुत्र्याच्या मदतीने शिकार करणे आदिवासींना सोपे झाल्यामुळे प्रत्येक शिकारीसाठी कुत्रा सोबत बाळगत असे. कुत्रा मालकाचे जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करु लागला. कुत्र्याच्या भुंकण्यामुळे नवीन माणसाची अगर शत्रूची

चाहूल समजू लागली तसेच शेळ्या, गाय, बैल, म्हैस, इत्यादींचे कळप राखण्याचेही काम कुत्रे करु लागल्यामुळे सातपुड्यातील आदिवासी कुत्रा पाळू लागले. कुत्र्यावरती आदिवासींचा इतका जीव बसला की ते कुत्र्याला घरातील माणसाप्रमाणे समजू लागले व तशी प्रेमाची वागणूक देऊ लागले.

पाळीव पशू म्हणून 'गाय' जवळ बाळगण्याची प्रथा भारतात प्राचीन काळापासून प्रचलित आहे. गायी-म्हैशींचा उपयोग दूध काढण्यासाठी व शेतीसाठी बैलाची पैदास या दोन मुख्य कारणासाठी केला जात होता. दूधापासून दही, ताक, तूप तयार करतात. आदिवासी समाजामध्ये गाय, म्हैस यांचा उपयोग आहारामध्ये 'दूध' मिळविणे इतकाच असला तरी काही जमातींमध्ये त्याचा मांस भक्षण म्हणून आहारात उपयोग केला जातो.आदिवासी भिल्ल जमातीत 'गोमांस' खातात तर पावरा जमातीत 'गोमांस' निषिध्द् मानले जाते. गावदिवाळीच्या वेळेस भिल्ल लोक रेड्याचा बळी देतात. बळी दिल्यानंतर प्रत्येक कुटुंबात समान वाटणीवर मांस दिले जाते. गायी, बैल, रेडा यांचा देव-देवतांना प्रसन्न करण्याकरिता बळी देण्याची प्रथा सातपुड्यातील आदिवासी जमातींमध्ये आढळते. शेतीच्या कामासाठी बैलांचा उपयोग करतात तसेच सातपुड्यामध्ये दळणवळणाच्या साधानांअभावी हे लोक माल वाहतूक, लाकूड वाहतूक, बैलगाडी ओढण्यासाठी बैलांचा उपयोग करतात. तसेच विवाहप्रसंगी 'वधूमूल्य' म्हणून गायी-बैल देणे सातपुड्यातील आदिवासींमध्ये अगदी मानाचे समजले जाते.

**संदर्भ सूची :**

१) फडके , सुधीर (१९६३) महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे
२) बैसाणे, अनिल व पाटील, सुभाष (२००५) मराठाकालीन समाज आणि अंधश्रध्दा कल्पना प्रकाशन, आय.टी.आय.जवळ, नांदेड
३) भनसाळी , डी.एन.(१८४१) संयुक्त खानदेश डायरी, संयुक्त खानदेशचा माहितीगार
४) राजवाडे, वि.का.(१९२८) राजवाडे लेखसंग्रह भाग २ व ३ प्रकाशक भावे ह.अ. वरदा बुक्स प्रकाशन, सेनापती बापट मार्ग , पुणे
५) संगवे विलास (१९७८) आदिवासींचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन ताडदेव रोड, मुंबई
६) गारे, गोविंद (१९९७) सातपुडयातील भिल्ल (ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे
७) घोडके, ह.म. (२०००) महाराष्ट्रगाथा, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
८) तोरो, वा.शि.(१९२३) पश्चिम खानदेश व त्याचे सचित्रवर्णन, ऑक्सफोर्ड, युनिव्हर्सिटी प्रेसे, बॉम्बे.

‘RESEARCH JOURNEY’ *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# घोडदे येथील गढीचा ऐतिहासीक अभ्यास

**प्रा. एस.सी. सोनवणे**
इतिहास विभाग प्रमुख, सि.गो. पाटील महाविद्यालय,
साक्री, ता. साक्री, जि. धुळे.

**प्रस्तावना**

मध्ययुगीन काळात युरोपात सामंतशाही पद्धत अस्तित्वात होती. सामंत शाही म्हणजे सरंजामशाही होय. सामंतशाहीचा उदय आणि विकास होत गेला. भारतीय सामंतशाहीचे स्वरूप मध्ययुगातील युरोपीय सामंतशाही पेक्षा वेगळे होते. भारतीय सामंतशाही प्रामुख्याने जमीन, जुमल्यांच्या आर्थिक व्यवहारांशी संबधित होती. भारतीय वतन व्यवस्थेतून सामंतशाही निर्माण झाली. सामंत शाहीत मालक व कुळे असे दोन घटक होते. शेतकऱ्यांना व कुळांना सर्व व्यवहार सामंताच्या मार्फत करावे लागत. सामंत व कुळे यांचे संबंध वंशपरंपरागत चालत असत, सामंत हे शेतकऱ्यांचे व कुळांचे सरंक्षण करत. शेतकऱ्यांना आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग सामंतांना द्यावा लागे.

**लेखाची उदिष्ट्ये**

१. गढीची संकल्पना स्पष्ट करणे.
२. घोडदे गावाचा इतिहास ज्ञात करणे.
३. घोडदे गावातील गढीची माहिती मिळविणे.

**लेखाची गृहितके**

१. घोडदे गाव ऐतिहासिक आहे.
२. घोडदे गावात ऐतिहासिक गढी आहे.
३. घोडदे गावाला गढीमुळे ऐतिहासीक, सामाजिक व धार्मिक दृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**गढीची संकल्पना**

१. गढी (स्त्री) गाव प्रमुख राहतात त्या भागातील गावाची उंच जागा म्हणजे गढीचा भाग.१
२. गढी म्हणजे लहान किल्ला, लहान तट, सोनाराचे एक हत्यार.२
३. गढी हा प्रकार जवळ जवळ किल्ल्यासारखाच असतो. ‘गढी‘ म्हणजे सरदाराने राहायचे संरक्षित ठिकाण होय. गढी व किल्ला यात फरक आहे. गढी ही प्रामुख्याने सरदाराचे निवासस्थान असल्यामुळे एखाद्या उच्च सरदार व्यक्तीला राहावयास योग्य अशा नागरी सुविधा त्यामध्ये निर्माण केलेल्या दिसून येतात. गढीच्या संरक्षणासाठी बाहेरच्या बाजूला उंच दगडी भिंत केव्हा काही वेळा विटांची तटबंदी, काही वेळा नुसती मातीची तटबंदी, खंदक व भक्कम दरवाजे बांधलेले दिसतात. अशा रीतीने गढीचा उद्देश जरी निवासस्थान असला, तरी गढीचा बाह्य देखावा म्हणजे एखाद्या किल्ल्याप्रमाणे वाटतो. हा सर्व परिणाम मध्ययुगीन रणधुमाळीचाच होय असे म्हटले जाते.३

प्रत्येक सामंताची तटबंदीयुक्त गढी आणि त्या भोवतालच्या प्रदेश म्हणजे ‘मॅनॉर‘ होय ‘मॅनॉर‘ म्हणजे मध्ये सामंताचा प्रसादतुल्य वाडा त्यांच्या आजुबाजुला शेतकऱ्यांच्या झोपड्या, चर्च, धान्याची कोठारे आणि त्यांना लागून शेतजमीन असे. संपूर्ण ‘मॅनॉर‘ भोवती तटबंदी असे. प्रत्येक ‘मॅनॉर‘ हे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होते. किल्ले वजा ‘मॅनॉर‘ मधील सामंत एखाद्या राजाप्रमाणे राहत. ते आपल्या प्रासादात दरबार भरवीत. या दरबारात त्यांचे दुय्यम सामंत व कुळ हजर राहत असत ते नजराणे देत व मनुष्यबळ पुरवत. मॅनॉरमध्ये म्हणजे गढीमध्ये नेहमी उत्सव समारंभ चालत तसेच खेळांचे सामने व मेजवान्या चालत. प्रत्येक भागातील ‘मॅनॉर‘ आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व प्रशासकीयदृष्ट्या स्वतंत्र होते. मॅनॉरमुळे सामंतशाही अधिक बळकट झाली.४

नागपूर-सुरत मार्गावर धुळे जिल्ह्यायात धुळ्यापासून ६५ किलोमीटर आणि साक्री तालूका पासून पश्चिमेकडे १३ कि. मी. वर घोडदेहे गाव आहे. या गावाला लागूनच पूर्वेकडे एक मोठी गढी आहे. या गढीचा इतिहास अभ्यासला असता मध्ययुगीन कालखंडात अनेक राजे होऊन गेलेत. त्याकाळी आपला समाज गटागटाने टोळ्यांच्या स्वरूपात स्थलांतरीत जीवन जगत होता आजू-बाजूला सुपीक जमीन लाभल्याने व बारमाही पाणी लाभल्याने नदीला बंधारेबांधून शेत-जमीन ओलीताखाली आणून अनेक प्रकारचे अन्नधान्य फळ-फळावणे यांचे उत्पन्न काढूलागले. काही लोक परिसरात असलेल्या जंगल संपत्तीवर आपली उपजिविका भागवू लागले. एकाच ठिकाणी समाज स्थिर झाला. आपल्या निपुणते नूसार अनेक उद्योग-व्यवसाय सुरू झालेत वर्ण-जाती व्यवस्था निर्माण झाली. अशा या मध्ययुगीन काळी घोडदे गाव कान नदीच्या किनारी वस्ती करून राहू लागले. त्याकाळी गवळी राजा यांचा या परिसरावर अंमल होता. गावाच्या पूर्वेस आज गावठाणचा जो

सपाट भाग आहे. त्याठिकाणी गवळी राजाची गढी होती. गढी म्हणजे मोठ्या राजवाड्यासारखा भाग म्हणजेच मॅनॉर. त्याकाळी राजाच्या संरक्षणासाठी पायदळ व घोडदळ असे सैन्य तैनातीस होते तळ म्हणजे सैन्यातील घोडे ठेवण्याची जागा कालांतराने राजेरजवाड्यांचा काळ व सामंतांचा काळ स्मृतीस जागा झाला. पुढे अपभ्रंश होऊन घोडदळ जाऊन 'घोडदे' असे नाव पडले. या ठिकाणी घोडदौडसाठी, शेतीवर फेरुटका मारण्यासाठी घोड्यांचा डांगा किंवा घोडी यांचा वापर तसेच व्यापार-उदिम करण्यासाठी घोड्यांचा वापर करीत असत. कालपरत्वे यांत्रिक युग आले तसे प्रवासाची साधने वाढत गेली. त्यानुसार घोड्यांची संख्या काळानुरुप कमी कमी होत गेली.

मध्ययुगीन कालखंडात या भागात गवळी राजांचे प्राबल्य असून व्यापार-उद्दीम वाढत गेला. कालपरत्वे धर्मयुध्दे झालीत. सामाजात धर्माची प्रभावी पकड लोकांवर होती. एकाच ध्वजाखाली गरीब प्राणपणाणे लढले होते. धर्मयुद्धामुळे धर्मसंस्थांचे सामाजात महत्त्व वाढले. राष्ट्रीय भावना, देशाभिमान मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला. सामंतशाहीच्या इतिहासास सुरुवात झाली. धर्मयुद्धामुळे पूर्वेकडील व पश्चिमेकडील लोकांना एकमेकांच्या सांस्कृतिक जीवनाची ओळख झाली. कालांतराने पेशवाईच्या काळात मराठे शाहीत भोसले घराण्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी देशमुख, देशपांडे, चौधरी यांना दिलेली वतने जप्त केली व भोसले घराण्याची वतनदारी सुरु झाली. भोसले घराण्याचे वर्चस्व वाढले. म्हणून आज देखील घोडदे गावानजीक असलेली गढी 'भोसलेंची गढी' म्हणून ओळखली जाते.

खान्देशातील काही गावांच्या गढ्या ह्या हमरस्त्यावर असून घोडदे व भोनगाव येथील गढी ऐतिहासिक दृष्ट्या नामांकित म्हणून ओळखल्या जातात. कोंडाईबारी जवळचे धनेर आमळी येथिल सुप्रसिद्ध, देवस्थान श्री. कन्हैयालाल महाराज हे श्री. भगवान विष्णूचा अवतार असून त्यांच्या बेंबीतून पाण्याचा स्रोत पूर्वेकडील भूप्रदेशावर वाहत-वाहत येऊन कान नदीत रुपांतर होऊन बारमाही लोकांना पाणी मिळू लागले. कन्हैयालाल महाराजांच्या नावावरून ही 'काननदी' असे नाव पडले ती पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत जाते या काननदीच्या किनाऱ्यावरच गढी असलेले गाव घोडदे व भोनगाव ही गावे वसलेली आहेत. भोनगाव या गावाच्या गढी लगतच प्राचीन शिवमंदीरे आहेत. घोडदे या गावी ज्या महिलेने नवस केला असेल अशा महिलेला श्री. बहिरमदेवाच्या मंदिरात आणून अशा महिलेला पहिले दोन गळ टोचले जातात आणि दुसरीकडे मुलाचे जावळ काढले जाते. तसेच दैत्याजवळ बोकड कापून रात्री गोंधळाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. दुसऱ्या दिवशी कुस्तीचा कार्यक्रम होतो. ही यात्रा पूर्वपरंपरेनुसार दरवर्षी चैत्र शुद्ध चतुर्दशीला भरत असते २-३ दिवस चालते. ही यात्रा बऱ्याचशा काळापासून सुरु असून घोडदे गावाच्या गढीजवळच भरते या गढीजवळूनच कान नदी वाहते.

पूर्वीच्या काळात गढीमध्ये राहणाऱ्या लोकांचे जीवन हे सुखी संपन्न होते. गढी जवळून कान नदी वाहत असल्याने पाण्याची बारमाही व्यवस्था शेतीसाठी व पिण्यासाठी होत असे. मध्यंतरीच्या कालखंडात नैसर्गिक स्थित्यंतरे घडून आणि नदीला महापूर आल्याने तसेच प्लेगची साथ आल्याने गढीवर राहणाऱ्या लोकांनी गढीच्या पश्चिमेकडे सपाट भूभागावर नवीन गावाची वस्ती केली व त्याचे घोडदळ नाव नामशेष होऊन 'घोडदे' हे नाव रुढ झाले. कालांतराने गढीची पडझड होऊन बऱ्याच वास्तू, गोष्टी नामशेष झाल्यात. घोडदे गावातील घरे ही मातीच्या भिंती व लाकडी छत बनवून त्यावर खारीमाती कच्च्या विटांनी भिंत बांधीत असत गढीतूनच माती खोदून आणतांना बऱ्याच लोकांना तेथे जुने अवशेष सापडत असत. गाडगी, मडकी, रस्त्यांचे अवशेष, भुयारी, दगडाच्या कोरीव चिरा, मेलेल्या माणसांची हाडे, सापळे, जनावरांचे अवशेष इ. बऱ्याच गोष्टी सापडत असत गढी लगतची तटबंदीची भींत ही नदीच्या महापूराने वाहून गेली. आज देखील या गावठाण जागेचा 'भोसल्यांची गढी' म्हणून नामोल्लेख केला जातो.

गढीलगतचा परिसर हा नैसर्गिक असून गढीचा भाग हा स्मशानभूमी म्हणून ओळखला जातो. मुस्लिम समाजाने अर्धाभाग गढीचा कब्रस्थान म्हणून कुंपण करून घेतले. उरलेल्या अर्ध्या भागात भिल्ल समाज आणि शाहू समाजाने स्मशानभूमी आणि मेलेले प्रेत पुरण्यासाठी त्या जागेचा वापर केला जातो. ही जागा आज ओसाड असून लोकांची वस्ती नाही. या गढीच्या पूर्वदिशेला लगतच महादेवाच्या ज्योर्तीलिंगाचे प्राचीन मंदिर असून त्याच्या शेजारी ऋषीमुनीचे साधूंच्या समाधीचे ओटेही दिसतात. या गढीच्या व घोडदे गावाच्या आजूबाजूला ३ ते ४ कि.मी अंतरावर लहान लहान गावेही वसली आहेत. पूर्वेकडेसुरपान गावी मंदिर (महादेवाचे जागृत ज्योर्तीलिंग) प्रसिद्ध आहे. पश्चिमेकडे ढोलीपाडा या गावी राम लक्ष्मणचे मंदिर आहे. राम वनवासात हिंडत असताना पूर्वी प्रकाशामार्गे घोडदे, ढोलीपाडा या गावावरून शबरी मातेला भेट देऊन नाशिक पंचवटीकडे गेले. म्हणून ही भूमी पवित्र आहे. अशी अख्यायिका सांगितली जाते. घोडदे गावाच्या चौफेर भिल्ल समाजाची वस्ती असून गावात मात्र शाहूसमाजासह सर्व जातीधर्माचे लोक राहतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती असून पशुपालनाचा पूरक व्यवसाय केला जातो. पूर्वी नदीला बंधारे,पाटाच्या पाण्याच्या साहाय्याने शेती केली जात असे. भात आणि ऊस ही प्रमुख पिके घेत असत. घोडदेया गावाच्या परिसरात गूळ, ऊस पिळण्याची गुऱ्हाळे भरपूर होती. म्हणून व्यापारासाठी धुळे, नंदुरबार, सटाणा (बागलाण) व सुरत (गुजरात) येथे घोड्यांच्या बग्गीतून ते प्रवास करत असत परंतु आज शेतजमीनीवर लहान मोठ्या शेतकऱ्यांनी स्वत:च्या विहिरी खोदून स्वावलंबी झालेत म्हणून पूर्वीचे पाटबंधारेपद्धत लयास गेली. ब्रिटीशांच्या राजवटीत घोडदे या गावी आजूबाजूची खेडी गावे जोडून मुलकीकर वसूल करण्यासाठी पोलीस पाटील व मुलकी पाटील अशी पदे निर्माण केली होती. गावाच्या मध्यभागी चावडीवर बसून योग्य ते व्यवहार केले जायचे महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाच्या निमित्ताने दिवाळ्यामाळ या डोंगरावर येऊन लोकांमध्ये जनजागृती केली. तसेच संत गाडगेमहाराज या गावाला भेट देऊन

कीर्तनाच्या माध्यमातून स्वच्छतेचे प्रबोधन करून गेलेत. सन १९४४ ला धुव्वाधार पाऊस पडल्याने कान नदीला मोठा महापूर गेला आणि घोडदे गावाचा गढीचा बराचसा भाग वाहून गेला अशा प्रकारेघोडदे गावाला ऐतिहासिक व धार्मिकदृष्ट्या मध्यवर्ती स्थान म्हणून ओळखले जाते.

**सारांश**

खानदेशात विपूल प्रमाणात गढ्या आहेत. मध्ययुगीन रणधुमाळीच्या काळात याच गढ्यांनी खानदेशचे सरंक्षण केले आहे. त्यात राऊळांच्या साडेबारा गढ्यांनी अतिशय महत्त्वाची भुमिका बजावलेली आहे. तद्वतच साक्री तालुक्यात जवळपास १६ गढ्या आहेत. त्यात साक्री, छाईल, घोडदे, चिंचखेडे, दहिवेल, पानखेडा, भोनगाव, घोंगडेदगीर, ब्राह्मनवेल, रायतेल, जांभोरे, डोमकाणी दुसाणे, भाडणे, डांगशिरवाडे, धाडणे अशा गढ्या आहेत. या गढ्यापैकी साक्रीला भोसलेची गढी आहे तशिच घोडद्याच्या गढीलाही 'भोसल्यांची गढी' म्हटले जाते. या गढीमुळे व तेथील बहिरम देवाच्या देवस्थानामुळे घोडदे गावाला ऐतिहासीक, सामाजिक व धार्मिक दृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. सद्य स्थितीला आज गावात गढी नामशेष होऊन तिचे कोणतेही अवशेष शिल्लक दिसून येत नाहीत.

**संदर्भ सूची :**

१. सुर्यवंशी रमेश, अहिराणी शब्दकोश, अभ्यासिका प्रकाशन, औरंगाबाद, २६ जानेवारी २०१३, पृ १२२.
२. आपटे वा. गो., भावे अ. ह., विस्तारीत शब्द, वरदा बुक्स, पुणे, पृ. १६०
३. सरदेसाई, गायकवाड, थोरात, हनमंते, मराठे कालीन संस्था व इतिहास, पृ. ४२३.
४. परदेशी (बधेल) नरसिंह, खानदेशातील राजपुतांचा इतिहास, सुधा प्रकाशन, जळगाव, २०१२
५. प्रत्यक्ष भेट व स्थानिकाची मुलाखत व चर्चा करून मिळविलेली माहिती.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# प्राचीन खानदेशातील सेंद्रक किंवा निकुंभ घराणे

**डॉ. एच.आर. चौधरी**
सहयोगी प्राध्यापक, एच.आर. पटेल महिला महाविद्यालय, शिरपुर, जि. धुळे.
**प्रा. एच.बी. सरतापे**
सहाय्यक प्राध्यापक, क.वा.वि. महाविद्यालय, नवापूर, जि. नंदुरबार.

प्राचीन काळापासून खानदेशावर अनेक राजवटी व घराण्यांनी राज्य केलेले आहे. खानदेशाला प्राचीन काळापासून ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. प्राचीन खानदेशचे ताम्रपट , शिलालेख, पुरातत्वीय उत्खन्नन, यांच्या आधारे नोंदविलेल्या तपशीलामधून माहिती होणाऱ्या खानदेशाला ऋषिक देश, आभिरांचा देश, त्रिकुटाचा देश, कहानदेश, कान्हेरी देश, सेऊण देश, इत्यादी नावाने ओळखले जाते.

प्राचीन खानदेशावर मौर्य, सातवाहन, कुशाण, शक, आभिर, वाकाटक, चालुक्य निकुंभ, राष्ट्रकुट घराण्यातील विविध राजांनी राज्य केल्याचे दिसते. प्रस्तूत शोध निबंधामध्ये प्राचीन खानदेशातील सेंद्रक किंवा निकुंभ घराण्याचा आढावा घेतला आहे. प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करुन प्रस्तूत शोध निबंध लिहिला आहे.

**खानदेशची व्युत्पत्ती :-** मिराशी म.म. यांच्या मते खानदेशचे प्राचीन नांव ऋषिक होते. रामायण व महाभारत आणि दशकुमार चरित्र ग्रंथामध्ये ऋषिक नावाच्या प्रदेशाचे उल्लेख आढळतात, खानदेश या नावाचा उल्लेख प्रथमत: फेरिस्ताच्या बखरीत सापडतो. फेरिस्ता हा मध्ययुगीन काळात होऊन गेला १ अबुल फजल च्या मते गुजरातचा सुलतान पहिला महमंद याने थाळनेरचा दुसरा फारुकी राजा मलिक नासेर याला खान हि पदवी दिल्यानंतर त्यांच्या अखत्यारित असलेल्या प्रदेशास खानदेश असे नाव पडले. युरोपियन अधिकाऱ्यांच्या मते खानदेश हे नाव बऱ्हाणपूर किंवा अचलपरच्या नवाबांनी दिले आहे. या प्राताचे मूळ नाव कण्हदेश, कण्हदेश म्हणजे कृष्णाचा देश, देवगिरीच्या यादव कुळात कृष्ण उर्फ कण्ह नावाचा राजा होऊन गेला. त्याने आपले नांव या प्रदेशाला दिले असावे. कर्नल साईक्स मते खंड किंवा खिंड या शब्दावरुन खानदेश हा शब्द प्रचारात आलेला असावा. २

सिनक्लेअरच्या मते बुऱ्हाणपूरच्या सुलतानांनी जी खान उपाधी लावली त्यावरुन खानाचा देश म्हणजे खानदेश होय. याशिवाय खानदेश हे नांव कान्हा (देश) या शब्दावरुन पडले असावे. खानदेश हा शब्द तानदेश, (पाण्याची टंचाई असणारा प्रदेश) अथवा कांटादेश (काटेरी रोपटयांचा प्रदेश) याचा अपभ्रंश होऊन पुढे खानदेश नाव पडले असावे. अकबराने खानदेश जिंकल्यानंतर या प्रदेशाची सुत्रे राजपुत्र दानियल याच्या हाती दिली होती त्याला दानदेश म्हटले होते.३

देवगिरीकर यादवच्या वंशातील सेऊणचंद्र पहिला या राजाच्या नावावरुन या प्रदेशास सेऊणदेश असे नाव पडले असावे.४

**खानदेशच्या सीमा :-** खानदेशच्या सीमा या पूर्वेस असीरगड दक्षिणेस पाटणे, पश्चिमेस नासिक आणि मध्यभागी लळींग आशा होत्या सम्राट अकबरच्या काळात खानदेश सुभ्याच्या पुर्वेस वऱ्हाड, उत्तरेस माळवा, दक्षिणेस जालना, व पश्चिमेस माळवा सुभ्याच्या दक्षिणेकडे पर्वत रांगा अशा सीमा होत्या. ५

रामायण व महाभारत काळात ऋषिक अथवा खानदेश राज्याच्या उत्तरेस अनुप पुर्वेस विदर्भ राज्य आणि अहमदनगर जिल्हयाचा प्रदेश ही राज्ये लागून होती. ६

सध्याच्या खानदेशच्या सीमा या उत्तरेकडे सातपुडा पर्वत, दक्षिणेकडे सातमाळा डोंगर, अजिंठा डोंगर, मनमाडजवळील गाळ टेकडयांपर्यंत आहे. त्यामुळे नाशिक खानदेश सरहद्द आहे. पश्चिमेकडे सहयाद्रीच्या लहान टेकडया पर्वतच्या रांगा सोनगड पर्यंत आहेत. तापी नदीच्या बाजूने अक्राणी पर्यंत जाते.७

**खानदेशातील सेंद्रक किंवा निकुंभ घराणे :-** बदनामीच्या चालुक्यानंतर खानदेशावर सेंद्रकांचे राज्य स्थापन झाले. पुलकेशी राजाने दक्षिण गुजरात व त्या प्रदेशाचा पूर्वेकडील प्रदेश म्हणजेच खानदेश हे दोन्ही प्रदेश सेंद्रक राजाकडे सोपविले होते. या घराण्याचा संस्थापक हा भानुशक्ती उर्फ निकुंभ होता त्याचा मुलगा अल्लाशक्ती असून त्याने धुळे जिल्हयातील पिंपळनेर हे गाव व येथील जमीन दान दिल्याचा उल्लेख सापडतो. त्या दानपत्रावदन अल्लाशक्ती हा खानदेशावर राज्य करीत होता. हे दिसून येते. सातव्या शतकात दुसरे एक दानपत्र अल्लाशक्ती चा पुत्र जयाशक्ती याने मुंदखेड येथे केल्याचा आढळतो, त्यात त्याने सेनानी हे गाव दान दिल्याचा पुरावा मिळतो. या घराण्याच्या उपलब्ध पाच ताम्रपटापैकी चार खानदेशात यातील तीन जळगाव जिल्हयात व पाचवा गुजरात येथे मिळाला आहे. निकुंभ हे बिरुद धारण करणारा अल्लाशक्ती नावाचा राजा होता. ८

अल्लाशक्ती राजा नंदुरबार प्रादेशिक विभागातील एका गावाचे दान करतो. असा उल्लेख नागद किंवा नेगद येथील इ.स. ६५३ च्या ताम्रपटात येतो. नागद किंवा नेगद गाव हे चाळीसगाव व कन्नड तालुक्यांच्या सीमेवर आहे. अल्लाशक्तीचा मुलगा जयशक्ती याच्या इ.स.६८०-८१ च्या मुंदखेडे ता. जामनेर या गावात सापडलेल्या ताम्रपटात जळगावच्या पश्चिम सीमेवरील गावाच्या दानाचा उल्लेख आलेला

ISSN : 2348-7143
Dec. 2018

आहे. इ.स. ७०२ च्या मेहुणबारेला सापडलेला ताम्रपटात देवीग्रामचा उल्लेख असून नागशर्मन नावाच्या ब्राम्हणास दान दिल्याचे नमूद केलेले आहे. या दानाचा उपयोग अग्निहोत्र कार्यासाठी व्हावा हे नमूद केले आहे. तसेच त्यामध्ये जयशक्तीचे वंशज देवशक्ती, दंडिराज, वैरदेव यांचाही उल्लेख आढळतो. या राजाच्या मदतीला महासंधिविग्रहाधिकृत असे अधिकारी असत. हे राजे संगोपनिषद वेदविदय ब्राम्हणाच्या विदवतेची बूज राखणारे राजे होते. ही माहिती वरील ताम्रपटावरुन मिळते. ९

एदलाबाद येथील शिलालेखातून मिळालेल्या माहितीनुसार सेंद्रक वंशीय राजे हे चालुक्यांचे नातेवाईक होते. तर या घराण्याचे लोकही चालुक्य वंशाचे होते. श्रीअत्रियप्प, श्रीमदप्प, आणि श्रीनरसिंघदेव हे या घराण्याचे राजे होते. या तिघांनाही समधिगत पंचमहाशब्द ही बिरुदे होती. या वरुन हे राजे महासामंता धिपती होते राष्ट्रकुंटांचा तृतीय गोविंद व त्याचा मुलगा अमोघवर्ष यांचे घराणे मांडलिक म्हणून नागद किंवा नेगद गावाहून राज्य करत होते. त्या राज्यात भुक्ती, विषय असे राजकीय विभागही होते. हे राजे सुर्योपाषक होते. १०

इ.स.६५३ मध्ये कासारे ताम्रपट आणि इ.स. ६५५ मध्ये नागद व बागुम्रा येथे सेंद्रक घराण्याच्या निकुंभ राजांची वंशावळ पुढील प्रमाणे दिली आहे.

| कासारे ताम्रपट | नागद ताम्रपट | बागुम्रा ताम्रपट |
|---|---|---|
| १) निकुंभ | १) भानुशक्ती | १) भानुशक्ती |
| २) अदित्य राजा | २) अदित्य शक्ती | २) अदित्य शक्ती |
| ३) निकुंभ अल्लाशक्ती | ३) निकुंभ अल्लाशक्ती | ३) निकुंभ अल्लाशक्ती |

निकुंभ राजा भानुशक्ती निकुंभ घराण्याचा संस्थापक मानला जातो. ११

डॉ. वा.वि.मिराशी यांच्या मते निकुंभ हे अल्लाशक्तीने धारण केलेले उपनाम बिरुद मानता येईल अल्लाशक्तीने श्री निकुंभ हे बिरुद लावलेले दिसते. जयशक्तीने सत्यश्राय विक्रमादित्य निकुंभ ही उपाधी लावलेली दिसते. खानदेशातील नागद, कासारे, मुंदखेड ही सेंद्रक राजांची प्रमुख ठिकाणे होती. गुजरात राज्यातील सुरत भरोच जिल्हे, बडोदा संस्थानचा काही भाग, पश्चिम खानदेश जिल्हा पुर्व खानदेशातील दक्षिण पश्चिम भाग, तसेच नासिक जिल्हयाचा उत्तर पुर्व भाग, निकुंभ सेंद्रक राजांच्या आमलाखाली होते.१२

अल्लाशक्ती राजाच्या बागुम्रा ताम्रपटात उल्लेख केल्याप्रमाणे निकुंभ राज्यांच्या आमलाखालील खानदेश प्रदेशाचे राष्ट्र, विषय,मंडळ,भुक्ती आणि ग्राम इ. विभाग पडल्याचे दिसते. निकुंभ राजे वेद पंडीतांना अथवा अभ्यासकांना त्यांच्या वेद पारंगत विदवत्तेनुसार वेगवेगळया पदव्या देवून सन्मानित करीत. सेंद्रक घराण्याचे निकुंभ राजे हे वैदीक धर्म व संस्कृती यांचे चाहते होते. त्यांनी अनेक खेडी दान दिली होती. निकुंभ राजे हे वेद अभ्यासाला चालना देणारे वेद संस्कृतीचे उपासक व रक्षण कर्ते होते. हे दिसून येते. १३

**सारांश :-**

प्राचीन खानदेशमध्ये होऊन गेलेल्या अनेक प्रमुख घराण्यापैकी निकुभ/सेंद्रक हे एक महत्वाचे घराणे होऊन गेले. जवळजवळ ५० ते ६० वर्षे या घराण्याने खानदेशवर राज्य केल्याचे ताम्रपटावरुन समजते. ताम्रपटातील नोंदीवरुन या राजांचे गुजरात मधील लहान-लहान राजे, चालुक्याचे मांडलिक राजे अथवा त्याचे प्रमुख अधिकारी असल्याचे समजते. निकुंभ राजे स्वतंत्र व सार्वभौम असल्याचे दिसते. ताम्रपट आणि दानपत्रावरुन स्पष्ट होते. खानदेशच्या आर्थिक सामाजिक. सांस्कृतिक प्रगती मध्ये निकुंभ घराण्याचे योगदान मोलाचे ठरले आहे.

**संदर्भ सूची :**

१) डॉ. देशपांडे प्र.न. व इतर (संपा) खानदेश इतिहास परिषद शोध निबंध संग्रह -३ (डॉ. एन.एस. पाटील यांचा लेख ) दोंडाईचा वैभव मुद्रण. १९९८. पृष्ठ २७.
२) कित्ता प्र.२७
३) डॉ. महाजन टी.टी. खानदेशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर पुणे, १९९८ पृष्ठ. ११, १२.
४) चौधरी कि. का. जळगाव जिल्हा गॅजेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई . १९९४ पृष्ठ. १
५) फजल अबुल ऐने अकबरी (इंग्रजी भाषांतर, कर्तल एच.एस. जॅरेट) खंड दुसरा १९८९ पुष्ठ.२३२
६) मिराशी वा.वि. संशोधन मुक्तावली खंड ८ वा पृष्ठ १२०
७) डॉ. देशपांडे प्र.न.(सं.पा.) अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद अधिवेशन चौथे, नागपूर शोध निबंध संग्रह १९९५ पृष्ठ ५९
८) एपिग्राफिया इंडिका. २८, पृष्ठ १९७.
९) चौधरी कि.का. उपरोक्त पृ.६५
१०) कित्ता पृष्ठ. ६५.
११) डॉ. महाजन टी.टी., प्राचीन खानदेशचा इतिहास, दिलीपराज प्रकाशन पुणे,२००५ पृष्ठ, १८९
१२) कित्ता पृष्ठ, १९४
१३) कित्ता पृष्ठ, १९७

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेश : नंदुरबार जिल्हयातील गुजरानु' परिसर परिचय व सण-उत्सव

**प्रा.डॉ. सविता पटेल**
जी.टी.पी. महाविद्यालय,
नंदुरबार.

**उद्देश :**

१) गुजराना परिसराचा स्थलांतरीत इतिहास परिचय करुन देणे.

२) गुजराना परिसरातील वैशिष्ट्यपूर्ण सण-उत्सवांचे वेगळेपणाचा परिचय करुन देणे.

**संशोधन पद्धती :**

१) क्षेत्रिय पद्धती, २) स्तरीय पद्धती, ३) संदर्भान्वयी पद्धती, ४) कार्यान्वयी पद्धती. .

**गुजराना' परिसर स्थलांतरीत इतिहास**

खानदेशातील लेवा पाटीदार समाजाचे वास्तव्य हे नंदुरबार जिल्ह्यात असून नंदुरबार, तळोदा, शहादा, नवापूर, अक्कलकुवा या तालुक्याच्या संपूर्ण परिसरात राहणाऱ्या गुजर वस्तीस गुजरानु' म्हणून ओळखले जाते.

गुज्जर' ही भारतातील एक महत्त्वाची जात असून ती पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या भागात आढळते. इ.स.सनाच्या सहाव्या शतकात मध्य आशियातील हूण' गुज्जर व इतर लोक यांनी भारतावर आक्रमण केले. पहिल्याच आक्रमणात ते ग्वाल्हेरपर्यंत पोहोचले. पण त्यांना कनौज नरेशाने अडविले. त्यामुळे यापैकी बरेचसे लोक सातव्या शतकात उत्तरेकडे तेथील रहिवाशांत मिसळून गेले. जणगणना सर्वेक्षणानुसार गुर्जर बोलीभाषा बोलणाऱ्यांची संख्या साठ हजारच्या आसपास आहे. गुजर-गुज्जर-गोज्जर, गुजर-गुर्जर-गुर्जरी लेवापाटीदार या वेगवेगळ्या जाती नसून उच्चार जरी वेगवेगळे असले तरी जात मात्र एकच आहे.

**गुर्जरांची उत्पत्ती व विकास**

गुर्जर लोकांच्या अस्तित्त्वाची माहिती गुर्जर गाथा, लेवापुराण, गुर्जर वीरगाथा, गुर्जर प्रतिहारावंश या ग्रंथामध्ये मिळते. गुर्जरांच्या उत्पत्तीचे दोन प्रवाह आहेत. लेवा पुराणाच्या आधारे हरिश्चंद्र राजाचा पुत्र दद्दाच्या दोन राण्या होत्या. त्यातील एका राणीच्या पुत्राच्या शाखेला गुर्जर' म्हटले जाते. दुसरा प्रवाह दशरथ राजाचा पुत्र राम, त्याचा पुत्र लव या लवापासून लेवा गुर्जर' वंशाची उत्पत्ती झाली, असे मानले जाते.

**गुर्जरांचे मूळ निवासस्थान**

गुर्जर लोक स्थलांतरीत असल्यामुळे त्यांचे मूळ निवासस्थान विवादास्पद आहे. अभीर आणि गुर्जर दोन्ही एकाच वेळेला पूर्व भारतात आले. गुर्जर-गुजर-बडगुजर या नावांनी हे उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागात मोठ्या संख्येने वसले. तसेच त्यांनी दक्षिणेकडे जाऊन गुजरातमध्ये वस्ती केली व त्या भागाला आपल्या नावाने प्रसिद्ध केले. गुर्जर लेवापुराणात गुर्जरांचे निवासस्थान आणि विकास गाथेची माहिती मिळते. ती अशी की श्रीरामाची प्रतिमा रथामध्ये ठेवून गुर्जरांच्या गाड्या गंगा-यमुनेच्या खोऱ्यात आल्या. तेथे त्यांनी अडालज' नावाचे गोत्र बनविले. लेवाभट' हस्तलिखित प्रतीच्या आधारे राजकुमार लव' याला उत्तर कोशलचे राज्य प्रदान केले गेले.

लवकुमार यात्रा करीत करीत पाटण क्षेत्रात आले. तेथे लव' याने लवपुराण' (लाहोर) शहर रावी नदीच्या किनारी वसविले. तेव्हापासून गंगा-यमुनेचा तो प्रदेश लव' वंशजाचे राज्य म्हणून ओळखला जाऊ लागला. अशा प्रकारे लव वंशजांनी पंजाबमध्ये प्रजेच्या पालनासाठी कृषि उद्योग केला.

गुजरातच्या विरमगाममधील विका यांचा पुत्र गांगो गोपाळ आणि भूता पटेल हे तीर्थयात्रा करीत करीत विंध्याचल पर्वतावर गोरक्षनाथाचे दर्शन घेण्याच्या हेतूने आले. तोरणमाळमध्ये पाचा गवळी नावाचा राजा राज्य करीत होता. वर उल्लेखिलेले तोरणमाळ नाथ संप्रदायाचे प्रमुख स्थान आहे. तेथल्या राजाने या दोघांजवळ सव्वा रुपया कर मागितला म्हणून हे लोक तेथून गोमाई आणि तापी नदीच्या संगमावर आले. तेथे त्यांनी अंघोळी केल्या व त्यांना सव्वा रुपया कर द्यावा लागला. नंतर हे तीर्थयात्री पाटण येथे आले. तेथे सिद्धनाथ सोलंकी नामक गुर्जर राजा राज्य करीत होता. कर घेण्याविषयीची हकीगत यात्रेकरुंनी राजाला सांगितली व तुम्ही जर त्या प्रदेशाला सुरक्षित करत असाल तर आम्ही तेथे राहू असे आश्वासन यात्रेकरुंनी दिले. सिद्धनाथ राजाने युद्ध करुन तोरणमाळचे राज्य जिंकून घेतले. नंतर गांगो पटेल आणि भूता पटेल यांनी गवरी राजाचे राज्य पुनश्च प्रकाशित केले. म्हणून त्याला प्रकाशा' हे नाव देण्यात आले. गांगो पटेल गढी'मध्ये वसले आणि भूता पटेल यांनी एक अळी (गल्ली) वसविली. ती आजही भूताअळी' (भूताताळी) या नावाने ओळखले जाते. गुजरानु' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात अनेक प्रकारच्या बोलींचा प्रभाव व परिणाम झाल्यामुळे समाजाच्या चालीरिती, श्रद्धा, विश्वास, विधी-विधान यांच्यावर देखील चांगला

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

परिणाम झाला. आपापल्या सुखा-समाधानासाठी देव-देवता, सण-उत्सव साजरे होऊ लागले. अशाप्रकारे गुर्जरांच्या विकास यात्रेमुळे तुटलेल्या शृंखला पुन्हा जोडल्या गेल्या.

अशा या वैभवशाली स्थलांतरीत गुजरानु' परिसरात विविध सण-उत्सव आपल्या संस्कृतीप्रमाणे साजरे केले जातात.

**गुर्जरांचे धार्मिक सण**

हिंदू धर्मिय गुर्जर हे परंपरेने चालत आलेले सर्व सण, कुलाचार, नवस-सायास साजरे करतात. हा समाज ज्या-ज्या क्षेत्रात वसलेला आहे, त्या-त्या क्षेत्रातील सामाजिक व धार्मिक जीवनाचा प्रभाव त्यांच्यावर झाल्यामुळे त्या-त्या क्षेत्रातले सर्व सण त्यांनी स्वीकारले. गुर्जर लोक आपले सर्व सण, कुलाचार नवस-सायास साजरे करत असताना आर्थिक बाबींचा विचार करीत नाही. यावरुन या समाजाची धार्मिक निष्ठा प्रबळ असल्याचे दिसते. सर्वसाधारणपणे वर्षातील पुढे येणारे सर्व सण मोठ्या प्रमाणात आनंदाने साजरे केले जातात असे आढळते. परंतु हेच सण इतर समाजातही सारख्याच प्रमाणात साजरे होत असतात. उदा. गुढीपाडवा, दिवाळी, दसरा, नागपंचमी अक्षयतृतीया इत्यादी.

**गुजरानु परिसरातील उत्सव**

**गोंधळ :** गुर्जर समाजात लग्नानंतर मूल होते तेव्हा गोंधळ देण्याची प्रथा आहे. गुर्जर वैष्णवपंथी असल्यामुळे शुद्ध गोंधळ देतात. हा गोंधळ खंडेरावाला देतात. खंडेरावाला गोंधळ देताना खोबऱ्याची वाटी व हळद चढवितात. खीर पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो. गोंधळाचा विधी इतर समाजात होतो. त्याच पद्धतीने गुर्जर समाजात देखील होतो. परंतु गुर्जर समाजातील गोंधळाचे वैशिष्ट्ये म्हणजे गोड गोंधळ (खीर-पुरी) करण्याची प्रथा आहे.

**कालीमाता :** कालीमाता लग्नानंतर मानलेली असेल तर त्या व्यक्तीला कालीमातेच्या नवसाची परिपूर्ती करावी लागते. ही परिपूर्ती करताना प्रथम घर सारवून स्वच्छ करावे लागते. शरिराने व मनाने शुद्ध होऊन नवे कोरे कपडे परिधान करुन गव्हाच्या पीठाच्या आरत्या जितके आकोत' (स्त्री-पुरुष) असतील तितक्या घडवायच्या. नंतर शमीच्या झाडाची पळी (चमचा), पाटी (टोपले) अशा वस्तू बनवून त्या घ्यायच्या. पाच लहान मडकी घेऊन त्यात पाणी भरुन ठेवायचे. याला गुर्जरी बोलीत केळीचोळी' म्हणतात. घरातील स्त्रिया खीर, वडे (फुलके) इत्यादी पदार्थ करुन पाच ताम्हणी या पदार्थांनी भरतात व देवीपुढे ठेवून नैवेद्य दाखवितात. नंतर पाच सवाष्ण स्त्रिया केळीचोळी' च्या ताम्हणी प्रत्येकी एक-एक घेऊन आपल्या सासरी जातात. सासरी नदीच्या किनारी उभ्या राहतात. घरी निरोप पाठवितात. घरातील लोक येऊन त्यांची पुजा करतात व तिला घरी आणतात. घरातील सर्व मंडळी कालीमातेचा प्रसाद पाच-पाच घास खातात.

**आकोत :** गुर्जर समाजात हा कुलाचार देण्याची प्रथा जरी असली तरी तो दिलाच पाहीजे असे बंधन नसते. आकोत दिल्याने घरात सुखसमृद्धी नांदते. देवीचा वास सदैव घरात असतो. अन्नधान्याची कमतरता पडत नाही. असा हा गुर्जरी स्त्रियांचा कुलाचार आहे. कुटूंबातील वृद्ध स्त्रिया तोंडून देवासमोर आकोत देण्याचा नवस बोलला गेला असेल तर तो नवस म्हणजे आकोत मुलाच्या लग्नात किंवा लग्नाअगोदर देण्याची प्रथा गुर्जर समाजात आहे.

हा कुलाचार कानबाई सारखाच असतो. आकोत ज्या घरी देण्यात येतो, त्या घरी कानबाईची मूर्ती नसली तर ज्यांच्या घरी ती मूर्ती असते त्यांच्या घरुन ती मूर्ती आणावी लागते. आणल्यानंतर प्रातःकाली उठून घरचा मालक व त्याची पत्नी डोक्यावरुन न्हाऊन नवेकोरे वस्त्र परिधान करुन कानबाईची स्थापना बाजवटवर करतात. बाजवटवर प्रथम गव्हाची रास करुन तांब्याचा कलश ठेवून त्यावर पाच नागवेलीची पानं ठेवतात व त्यावर श्रीफळ ठेवून हळद, कुंकू, अबीर, गुलाल, धुप, दीप, नैवेद्य ठेवून दाखवितात. कानबाईचा सौभाग्यवतीचा शृंगार (टिकली, बांगडी, फणी, काजलडबी, हळद, कुंकू, कोरे कापड) ठेवून पूजा करतात. नंतर कापूर पेटवून आरती करतात. पूजा विधीचा कार्यक्रम होत असताना दुसरीकडे पाच सवाष्ण स्त्रिया सव्वापाव गहू घेऊन घरी दळून सोवळ्यात बसून जितके आकोत असतील तितक्या म्हणजे (५, ७, १०) आरत्या घडवतात. त्यावर कणकेच्या चार लांबट दोऱ्या उभ्या आडव्या ठेवून त्या सर्व आरत्या एका ताटात सजवून त्या पेटवून कानबाई पुढे पानावर ठेवतात. नंतर कुंभाराकडून पाच, सात, दहा जितके आकोत असतील तितकी छोटी कोरी मडकी झाकणासहीत मागवतात. त्याची कानबाईसमोर पूजा करतात. मातीच्या मडक्यामध्ये एक पितळी मडके जास्तीचे ठेवलेले असते.

आकोतचा सर्व स्वयंपाक घरातल्या चुलीवर न करता बाहेर ओट्यावर वेगळी चूल मांडून सर्व स्वयंपाक पितळी भांड्यामध्ये केला जातो. खीर, पुरणाच्या पोळ्या, मेथीची भाजी, कांद्याची कोशींबीर असा सर्व स्वयंपाक करुन पाच, सात किंवा दहा सौभाग्यवती स्त्रियांना आकोत जेवण्याची सुपारी आदल्या दिवशी दिली जाते. आकोत जेवण्यासाठी स्त्री-पुरुष जोडपी मिळाली तर अती उत्तम, न मिळाल्यास फक्त सौभाग्यवती स्त्रियाही आकोत बसू शकतात. आकोत बसणाऱ्या स्त्री-पुरुषांना टिळा लावून पितळी ताटांमध्ये सर्व स्वयंपाक वाढून प्रत्येकापुढे ताट, त्यात एक दिवा व जवळ मातीचे छोटे मडके दिले जाते. जेवण झाल्यावर मातीचे मडके घरी घेऊन जायचे असते. त्या कोऱ्या मडक्याचा स्वयंपाक घरात उपयोग केला जातो.

जेवण आटोपल्यावर उष्टे हात बाहेर न धुता जमीनीतील खड्ड्यात धुवावे लागतात. तसेच ताटातले उष्टे खरकटे सर्व जमीनीमधल्या खड्ड्यात टाकावे लागते. घरातील केर, स्वयंपाक, केलेली चूल, तिच्यातील राखुंडी, सर्व वस्तू नदीत टाकाव्या लागतात. आकोत देताना सर्व

विधी पद्धतशीर करावा लागतो. सर्व वस्तुची आठवण ठेवून कानबाई समोर सजवाव्या लागतात. एखादी वस्तू घरात आणल्यानंतर पूजेला ठेवण्याची आठवण पडल्यास घरात आजारी पडणे, शांततेचा भंग होणे, धान्य न पिकणे असे विपरीत परिणाम भोगावे लागत असल्यामुळे आकोत विधी निट लक्षपूर्वक करावा लागतो. एका पिढीने आकोत दिल्यानंतर तो दुसऱ्या पिढीने दिलाच पाहीजे, असे बंधन नाही. त्यामुळे आपल्या इच्छेनुसार देता येणारा असा हा कुलाचार आहे.

**रानबाई (रणादेव) :** कानबाई जवळ जी नारळ लागतात ती रणादेवीच्या लग्नात परणलेली असतात. रानबाई म्हणजेच रणादेवी ही सौराष्ट्र, गुजरातमधून खानदेशात आलेली आहे. या देवतेचे पूजन गुर्जर समाजातही करतात. यावरुन गुर्जरांचे सौराष्ट्र, गुजरात यांच्याशी असलेले नाते रानबाईच्या उत्सवातून स्पष्ट होताना आढळते. गुर्जर समाजात मुलाच्या लग्नाच्यावेळी रणादेव देण्याची प्रथा आहे. रानुबाईला लग्नाच्या घरी बोलविताना स्त्रिया रानुबाईची स्तुती करताना म्हणतात –

*कोरी घागर वो माता*
*के रानुबाई रसे भरी ।*
*सूरज उग्यो ने माता डुंगरी*
*के अंबे रसे भरी ।*
*पंडितभाई घेरी आई वो*
*के माता रसे भरी ।*
*मायावऊ लागे तमारी पाय वो*
*के माता अंबे रसे भरी ।*
*कोरी घागर ....*

रानुबाईच्या तेजस्वी रुपाचे वर्णन करताना गुर्जर स्त्रिया म्हणतात, कोरी घागर, रसरशीत फळ, जसे सुंदर दिसते तशी रानुबाई सुंदर आणि तेजस्वी दिसते. सुर्योदय झाला आणि रानुबाई डोंगर सोडून पंडितभाईच्या घरी आली. मातेची विधीवत पूजाअर्चा करुन स्थापना झाली व घरच्या मालकीणीने मातेची मनोभावे पूजा केली. खानदेशात पूजली जाणारी रणादेवी ही भूदेवीच असून तिचे सूर्यदेवाशी लग्न लावण्याची प्रथा म्हणजे आकाशाचे धरणीमातेशी नाते जोडण्याची प्रथा आहे.

**लळीतोत्सव :** गुजराना परिसरात लळीतोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. सप्टेंबर महिन्न्यात गणेश चतुर्थीच्या काळात वेगवेगळ्या गावात वेगवेगळ्या तिथीनुसार लळीत साजरा होतो. लळीतला अपभ्रंशरित्या नळीत' असे म्हटले जाते. संपूर्ण रात्रभर लोक रामायण' यातील पात्र विहित सोंगं घेवून हा उत्सव साजरा करतात. गुजराना परिसरातील सर्वेक्षणानुसार हा लोकोत्सव सारंगखेडा, पुसनद, पाडळदा, म्हसावद, कोळदा, शिंदा इत्यादी गावांमध्ये साजरा होत असतो. लळीत उत्सवाच्या पंधरा दिवस अगोदर राम मंदिरात पोथीचे गायन सुरु होते. श्री' विसर्जनापूर्वीची जी रात्र असते, त्या रात्री चौकात उंच चौथऱ्यावर रात्रीच्या पहिल्या प्रहरापासून ते पहाटेपर्यंत लळीत'चे प्रदर्शन होत असते. तसेच गुजरान्यात सिंहस्थ पर्वणी'चा मोठा उत्सव दर बारा वर्षांनी प्रकाशा अर्थात दक्षिण काशी येथे मोठ्या उत्साहात साजरा होतो.

अशाप्रकारे गुजराना परिसरात विविध सण-उत्सव साजरा करण्याची प्रथा वैशिष्ट्यपूर्ण आढळून येते.

**गृहितक :**

१) गुजर समाज स्थलांतरीत असल्यामुळे पंजाब, काश्मिर, मारवाड, राजस्थान, हिमाचल प्रदेश, गुजरात इत्यादी भागात स्थलांतर करत-करत गुजर क्षेत्रात वसला.

२) गुजरांचे धार्मिक सण-उत्सव, कुलाचार, रुढी-परंपरांचे वर्णन करताना असे दिसून येते, की श्रीमंत, गरीब सर्व गुजर लोक त्यांचा प्रत्येक सण-उत्सव, कुलाचार, रुढी-परंपरा, रितीरिवाजानुसार करतात.

३) गुजरानु' परिसरात इतर समाजाचे इतर बोलीभाषिक असल्यामुळे साहजिकच त्यांच्या सण-उत्सवांचा परिणामही गुजर समाजावर झालेला दिसतो.

४) गुजर समाजातील सण-उत्सवात गोड नैवेद्याचाच प्रसाद म्हणून वापर होतो. हे वैविध्यपूर्ण वैशिष्ट्य आढळते.

**संदर्भ सूची :**

१) गुर्जरी बोलिके लोकसाहित्यका विवेचनात्मक अध्ययन, पृष्ठ क्र.२४, शोधप्रबंध-डॉ.दिलीप पटेल
२) लेवापुराण-भिमकवी काण्हवेकृत मराठी अनुवादीत प्रत १९१८
३) गुजरी लोकसाहित्याचा परिचय-प्रा.सुनंदा पटेल, ब्राम्हणपुरी
४) सण-उत्सव माहिती संकलन-पळाशी, ता.जि.नंदुरबार
५) गुर्जरवीर गाथा - पृष्ठ क्र.२३, प्रकाशन-भारतीय गुर्जर परिषद, रतनलाल वर्मा

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खान्देश पोलिटिकल एजन्सीमधील सुरगाणा संस्थान

**डॉ. शितल म. पंचीकर**
सहाय्यक प्राध्यापक,
इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई.

नाशिक जिल्ह्यातील एक तालुका असलेले सुरगाणा हे भारताला स्वातंन्त्र मिळण्यापूर्वी ब्रिटिश राजवटीच्या काळात मुंबई प्रांतातील एक संस्थान होते. सुरगाणा संस्थानाच्या उत्तरेला डांगचे संस्थान व डांगचा जंगलमय प्रदेश होता. दक्षिण पूर्वेला नाशिक जिल्हा होता. तर धरमपूर व बनसडा ही संस्थाने सुरगाणा संस्थानाच्या पश्चिमेला होती. १

ऋ संस्थानाचे क्षेत्रफळ ३६० चौ.मैल असून ऋ संस्थानाचे प्रमुख देशमुख पवार हे जातीने मराठा असून नातेसंबंधाने मध्य प्रदेशातील धार संस्थानाच्या पवार घराण्याशी संबंधित होते. इ.स. १८१८ मध्ये सुरगाणा संस्थान ब्रिटिश अधिपत्याखाली आले. सुरुवातीला डांग व सुरगाण्याचा प्रदेश हा खान्देश पोलिटिकल एजन्सीशी जोडला गेला होता. इ.स. १८७२-७३ च्या प्रशासकीय अहवालात खान्देश पोलिटिकल एजंटच्या अधिपत्याखाली १) डांगचा प्रदेश २) सुरगाणा तालुका ३) मेवासी प्रदेश असे प्रदेश येतात असा उल्लेख आहे. २

**सुरगाणा संस्थानाची इ.स.१८१८ पूर्वीची स्थिती**

सुरगाणा संस्थानाचे प्रमुखांचे पूर्वज सुरुवातीपासून या प्रदेशातील हातगडच्या किल्ल्याच्या आसपास वास्तव्य करुन होते. खान्देशच्या प्रदेशात मुस्लिम सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर सुरगाणा संस्थानाच्या पूर्वजांनी मुस्लिम शासकांचे नामधारी वर्चस्व मान्य केले होते. हातगडच्या आजूबाजूच्या प्रदेशाच्या बंदोबस्ताची जबाबदारी सुरगाणा संस्थानाच्या प्रमुखांवर होती. या मुस्लिम शासकांकडून सुरगाणा संस्थानाच्या प्रमुखांना देशमुख हा किताब मिळाला होता. सुरगाणा संस्थानाचे प्रमुख ब्रिटिश अधिपत्यापूर्वी मुस्लिम व मराठे शासकांना कोणत्याच प्रकारची खंडणी किंवा रक्कम देत नव्हते. यामुळे या प्रदेशाच उल्लेख बंदी मुल्ख म्हणून केलेला आढळतो.३ परंतु दख्खनकडून सुरतला जाणारा रस्ता सुरगाण्यातून जात असल्यामुळे त्याचे व्यापारी महत्त्व असल्यामुळे मराठयांच्या व पुढे पेशवेकाळातही सुरगाणा संस्थानाच्या प्रमुखांशी जुळवून घेण्यात आले होते असा उल्लेख आढळतो. पेशव्यांच्या दप्तरामध्ये सुरगाण्याचा उल्लेख हातगडचा एक विभाग, तरफ सुईगाना असे केलेला आढळतो.

**सुरगाणा संस्थानाची निर्मिती**

महाराष्ट्रातील खान्देशातील पश्चिम घाटाच्या डांगच्ऋ प्रदेशातील भिल्लांनी इ.स.१८१७-१९ मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीविरुध्द बंड केले होते. नवीन राजवट आपल्याला संकटात टाकणार अशी भिती भिल्लांना वाटत होती. इ.स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी खान्देशचा प्रदेश जिंकून घेतला त्यामुळे डांग, पेठ, सुरगाणा हे प्रदेश ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आले. खान्देशमधील व डांग प्रदेशातील भिल्लांच्या उठावाचे पडसाद सुरगाणा संस्थानातील प्रजेवर व प्रमुख देशमुख यांचेवरही झाले असावेत,कत्रण यत्त्वकव्ळत्त संस्थानाचे प्रमुख देशमुख मल्हाररत्त्व यंत्री सुरगाण्यात थांबलेल्या इंग्रजांच्या तुकडीवर हल्ला केल्याची नोंद आहे.४ ही गोष्ट न आवडल्यामुळे इंग्रजांनी सुरगाणा प्रदेशावर आक्रमण करुन देशमुख मल्हारजींच पराभव केला व त्यांन फाशीची शिक्षा दिली. यानंतर इ.स. १८१९ मध्ये ब्रिटिश सरकारने मल्हारजीचे चुलत भाऊ भिकाजीरत्त्व यांना संस्थानाचे प्रमुख नियुक्त केले. अशाप्रकारे संस्थानाची निर्मिती होवून हे संस्थान खान्देश पोलिटिकल एजन्सीला जोडले गेले.

**सुरगाणा संस्थान खान्देश पोलिटिकल एजन्सीमध्ये**

इ.स. १८१९ ते इ.स. १८९० पर्यंत सुरगाणा संस्थान खान्देश पोलिटिकल एजन्सीमध्ये होते. हा कालखंड ७१ वर्षाचा होता. याकाळात खान्देश पोलिटिकल एजन्सीच्या पोलिटिकल एजंटतर्फे व पोलिटिकल एजंटने नेमलेल्या कारभाऱ्यामार्फत सुरगाणा संस्थानाच्या कारभारावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यात येत असे. याकाळातील इ.स. १८४३ मधील उपलब्ध झालेल्या पत्रात सुरगाणा संस्थान हे प्रांत बागलाण जिल्हा धुळे मध्ये दाखविण्यात आलेले आहे. इ.स. १८७८-७९ च्या मुंबई प्रांताच्या प्रशासकीय अहवालात सुरगाणा संस्थान डांग प्रदेशा शेजारील संस्थान, सारखाच डोंगराळ प्रदेश आदिवासी जनता या भौगोलिक सारखेपणामुळे डांग संस्थानांच्या भागात दाखविण्यात आलेले दिसून येते.५ इ.स.१८९० मध्ये खान्देश एजन्सीमधून सुरगाणा संस्थान नाशिक जिल्हयाशी प्रशासकीयदृष्टया जोडण्यात आले. इ.स. १९३७ मध्ये सुरगाणा संस्थान गुजरात स्टेट एजन्सीमध्ये समाविष्ट करण्यात आले. तर स्वातंन्यत्रंतर मार्च १९४८ मध्ये सुरगाणा संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले.

सुरगाणा संस्थान खान्देश पोलिटिकल एजन्सीमध्ये असतत्रं खालील ५ व्यक्तींनी सुरगाणा संस्थानाचे प्रमुख म्हणून संस्थानाचा कारभार पाहिला.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

१. **देशमुख मल्हारराव (इ.स. १८१८ ते इ.स. १८१९) :–** ब्रिटिशांनी फाशी दिल्यामुळे यंत्र्ची कारकीर्द फक्त एकच वर्षाची होती.

२. **देशमुख भिकाजीराव ( इ.स. १८१९– इ.स. १८२०) :–** गादीसाठी झऱ्लेल्या भांडणामध्ये यंत्र्ची हत्या घडवून आणली त्यामुळे त्यांची कारकीर्दही अल्प ठरली.

३. **देशमुख यशवंतराव भिकाजीराव पहिले (इ.स. १८२० ते इ.स. १८५४) :–** देशमुख भिकाजीराव यांच्या हत्येनंतर त्यांचे सुपुत्र यशवंतराव यांना ब्रिटिश सरकारने संस्थानचे प्रमुखपद दिले. परंतु संस्थानातील लहान शाखेल्त्र हे मत्र्य नव्हते व त्या शाखेचे नेतृत्व करण्र्च्यत्र मुरारराव्त्री यत्र्बत्र्बत तीव्र विरोधी कत्रवत्र्यत्र केल्यत्र्चत्र व ब्रिटिशांशत्र्ी पत्रव्यवहत्र केल्यत्र्क्त उल्लेख मिळतो. यत्र्बत्र्बत १८४४ मध्ये मुरारराव बीन मल्हारराव यांनत्र ब्रिटिश सरकारतर्फे त्यांच्या अर्जात कोणतेच तथ्य नसल्यत्र्चे कळविण्यात आले होते. उलट मुराररावत्र्च्या विरोधी कारवाया वाढल्यामुळे त्यांना संस्थानाबाहेर जाण्याचे आदेश देण्यात आले होते.

अशत्र्प्रकत्रे खान्देश पोलिटिकल एजंट व ब्रिटिश सरकारने या गृहकलहादरम्यत्र चत्रंगल्यत्र्प्रकत्रे चौकशी व योग्य निर्णत्र्य घेत्तल्यत्र्चे आढळून येते.

४. **देशमुख रविराव (इ.स. १८५४ ते इ.स. १८६७) :–** देशमुख यशवंतराव यांचे निधनत्र्नंतर त्यांचे चुलतबंधू रविराव हे सुरगाणा संस्थानचे प्रमुख झाले व त्यानंतर २ वर्षातच भारतात इंग्रजांविरुध्द इ.स.१८५७ चा उठाव झाला.

**सुरगाणा संस्थान व इ.स.१८५७ चा उठाव :–** महाराष्ट्रात सातारा, सावंतवाडी, कोल्हापूर, जामखिंडी या संस्थानाच्या राजांनी व तेथील प्रजेने या उठावात इंग्रजांविरुध्द भाग घेतलेला आढळतो. तसेच सुरगाणा संस्थानत्र्च्यत्र शेजारील पेठचे संस्थानातील प्रजेने व तेथील संस्थानिक प्रमुख भगवंतराव नीलकंठराव दळवी (पवार) यांनी इंग्रजांविरुध्द उठाव केला होता. त्याचप्रमाणे खान्देशातील भिल्ल लोकांनीही काजी सिंग व भीमा नाईक यांच्या नेतृत्वाखाली या उठावात भाग घेतला. नाशिक, अहमदनगर,त्र्यंबकेश्वर, पेठ संस्थान, खान्देश येथे भिल्ल, कोळी लोकांनी खजिना लुटणे, ब्रिटिश फौजेवर हल्ला करणे, उठाव करणे यासारख्या ब्रिटिश विरोधी कारवाया करण्यास सुरवत्र केली होती. अकोले-नेर तालुक्यातील भिल्ल आणि महादेव कोळी जमातीतील क्रांतिकारकांनी सुरगाण्याच्या पवारांकडे सहाय्य मागितले होते. ही बातमी समजल्यामुळे इंग्रजांचा कॅप्टन नट्टल याने १६० पायदळ व ५० घोडेस्वारासह या प्रदेशावर चाल केली.६ परंतु सुरगाण्याकडे जात असतांना कॅप्टन नट्टल यांना भिल्ल व ठाकूर यांनी त्र्यंबकचा खजिना लुटल्याची बातमी समजली. त्यामुळे ते सुरगाण्याला न जाता त्र्यंबकला गेले. यत्र्चकत्र्ळत्र भागोजी नाईकही पेठ, सुरगाणा परिसरातील आदिवासी कोळी लोकांच्या संपर्कात असल्याचे आढळते.यावरुन सुरगाणा संस्थानातही खान्देशातील भिल्ल लोकांनी येऊन संस्थानातील आदिवासींना ब्रिटिशाविरुद्ध उठाव करण्यास प्रवृत्त करुन संस्थानातही विरोधी हालचाली सुरु केल्या असाव्यात असे दिसून येते.

पुढे ब्रिटिशत्र्तर्फे या प्रदेशातील उठावाचा बंदोबस्त करण्यात आला. पेठच्या संस्थानाचे प्रमुख भगवंतराव यांना पकडून फाशी देण्यात आली. यत्र्कत्र्ळत्र सुरगाणा संस्थानचे प्रमुख देशमुख रविराव यांनी या उठावात प्रत्यक्ष सहभागघेतल्यासंबंधी माहिती आढळलेली नाही. इ.स.१८५७ च्या उठावानंतर जी चौकशी करण्यात आली. त्यात सुरगाणा संस्थानाच्या प्रमुख देशमुख रविराव यांचा कोणताच प्रत्यक्ष सहभाग आढळलेला नाही.७

५. **देशमुख शंकरराव रविराव (इ.स. १८६७ ते इ.स. १८९८) :–** देशमुख मे.रविराव यांच्या मृत्युनंतर त्यांचा मुलगा देशमुख मे.शंकरराव रविराव हे सुरगाणा संस्थानाचे प्रमुख झाले.३१ वर्षांची कारकीर्द त्यांना लाभली होती. ब्रिटिश सरकारने चांगली बुध्दीमत्ता असलेला शासक म्हणून त्यांचे कौतुक केलेले व सुरगाणा संस्थान हे खान्देश पोलिटिकल एजन्सीमधील एक महत्त्वाचे संस्थान आहे अशी नोंद आढळते. देशमुख शंकरराव यांच्या कारकीर्दीच्या काळात इ.स. १८९० मध्ये सुरगाणा संस्थान हे खान्देश पोलिटिकल एजन्सीमधून काढून नाशिक जिल्हयाला जोडले गेले.

**ब्रिटिश सरकारच्या सुरगाणा संस्थानाविषयी बदलेला दृष्टीकोन :–** सुरुवातीच्या ब्रिटिश कागदपत्रातून सुरगाणा संस्थानाचा उल्लेख एक लहान संस्थान असा केलेला आढळतो. इ.स. १८७५-७६ च्या प्रशासकीय अहवालात सुरगाणा संस्थानाचा समावेश खान्देश डांग प्रदेशात केला असून तेथे २२ संस्थाने असल्याचा उल्लेख मिळतो. या प्रदेशातील जनता मागासलेली, अंधविश्वासाने ग्रासलेली आहे अशी नोंद आढळते. आदिवासी बहुल प्रदेश व शेजारील डांग संस्थानातील भिल्ल प्रमुखांची, लुटालुट करण्याची वृत्ती यामुळे ब्रिटिश सरकार सुरगाणा संस्थानिक प्रमुखांकडेही साशंकतेने पाहात होते.८ सुरगाणा संस्थानत्रील बहुसंख्य प्रजा कोळी असल्यामुळे सुरूवातीच्या ब्रिटिश। कागदपत्रातून विशोषत: गॅझेटियर मध्ये सुरगाणा संस्थानाचे प्रमुख। जातीने कोळी असल्याचा उल्लेख। मिळतो. डांग प्रदेशातील भिल्लांची आक्रमकता, इ.स. १८५७ पूर्वी ब्रिटिशांविरूद्ध लढाई, इ.स. १८५७ च्या उठावातील सहभाग यामुळे या जमातीविषयी ब्रिटिश सरकारचे मत फारसे चांगले नव्हते. सुरगाणा

संस्थान डांग संस्थानाच्या शेजारी असल्यामुळेच सुरूवातीला ब्रिटिशांनी सुरगाणा संस्थान डांग संस्थानाचा भाग मानले व त्यामुळेच ब्रिटिश सरकाराचे मत सुरगाणा संस्थानाविषयीही फारसे चांगले नसावे असा निष्कर्ष काढता येतो. परंतु नंतरच्या काळात ब्रिटिश सरकारच्या कागदपत्रातून व प्रशासकीय अहवालातून सुरगाण्याचा उल्लेख स्वतंत्रपणे खान्देश डांग प्रदेशातील एक महत्त्वाचे संस्थान म्हणून केल्याचा आढळतो. यावरुन सुरगाणा संस्थानाचे प्रमुख हे डांग संस्थानांप्रमाणे भिल्ल जमातीचे नाहीत व संस्थानातही भिल्ल आदिवासींची वस्ती नसून कुणबी, कोकणी व कोळी आदिवासी लोक राहतात हे लक्षात आल्यानंतर इंग्रजांचा सुरगाणा संस्थाना विषयीचा दृष्टीकोन बदलला असावा असा निष्कर्ष काढता येतो.

**सुरगाणा संस्थानिकंच्े डांग प्रदेशातील भिल्ल प्रमुखांशीसंबध**

यत्र्बत २७ मे १८४२ रोजी खान्देश कलेक्टरने दिलेल्या अहवालात कारभारी दत्तो चिमणाजी यांनी प्रमुख्र यशवंतराव पहिले ) लहान असल्यामुळे बऱ्याच वर्षापासून त्यांनी अत्यंत कौशल्याने प्रशासन सांभाळले असल्यत्र्च व डांग प्रदेशातील भिल्लर्स्त्रेसंबध्र ठेवतत्र्र ब्रिटिश सरकारतर्फे चांगली भूमिका बजत्र्वल्यत्र्च उल्लेख आढळतो.९ यावरुन शेजारील डांग प्रदेशातील भिल्ल प्रमुखांशीही संस्थानाचे चांगले संबंध असल्याचे स्पष्ट होते.

मानाची वस्त्रे व बिरुदे संस्थानाचे एकूण्र ८ प्रमुख होऊन गेले. सुरगाणा संस्थानाच्या प्रमुखांना तोफांची सलामी दिली जात नव्हती व त्यांनत्र देशमुख किंवा 'चीफ' म्हटले जात होते. त्यांना मिळालेले बिरुद किंवा पदवी ही साहेब मुसफत कदरदान मेहेरबान करम फर्माये दोस्तान याप्रमाणे होती.

सुरगाणा संस्थानातील वार्षिक दरबार इ.स. १८१८ मध्ये सुरगाणा संस्थानाच्या निर्मितीपासून संस्थानात वार्षिक दरबार भरविला जात होता. या दरबाराच्या वेळी मुंबई गव्हर्नर जनरलच्या वतीने पोलिटिकल एजंटच्या हस्ते संस्थानाच्या प्रमुखांना मानाची वस्त्रे देण्यत्र्ची प्रथा होती. इ.स. १८८३–८४ मध्ये १६ मे या दिवशी डांग प्रमुखांचा दरबार भरविला गेला होता. या दरबाराच्या वेळी या प्रदेशात आढळणाऱ्या चेटकिण प्रथेविरुध्द ब्रिटिश सरकारने काढलेले परिपत्रक पोलिटिकल एजंटने वाचून दाखविले होते, दरबाराच्या वेळी अशाप्रकारे शासनाची परिपत्रके वाचून दाखविण्याची पध्दत असावी असे दिसून येते. आदिवासी समत्र्जत्र चेटकिण प्रथत्र अस्तित्वत्र होती व ती प्रथा बंद करण्यासाठी सरकारतर्फे प्रयत्न झाल्याचे दिसते.

**सुरगाणा संस्थान खान्देश पोलिटिकल एजन्सी मध्ये असतानाची न्यायप्रक्रिया :–** सुरगाणा संस्थानाच्या न्यायप्रक्रिये संदर्भात उपलब्ध माहितीनुसार संस्थान जेव्हा खान्देश पोलिटिकल एजन्सीत होते तेव्हा खान्देशचा कलेक्टर सर्वप्रकारच्या गंभीर फौजदारी गुन्ह्यांसदर्भात न्यायनिवाडा करीत असे. तर संस्थानाचे प्रमुख देशमुख (पवार) हे इतर गुन्ह्यांसंदर्भात स्वत:च्या जबाबदारीवर दंड आकारुन न्यायनिवाडा करीत असत. या संदर्भात पोलिटिकल एजंटला वाटल्यास तो हस्तक्षेप करु शकत असे. संस्थानाकडे स्वत:चे सैन्य नव्हते.खान्देश एजन्सीचा पोलिस सुपरिटेंडट या प्रदेशाचा दौरा करित असे व आपला अहवाल देत असे. १९०२ पासून पोलिस व्यवस्थेचा उल्लेख मिळतो.

संस्थानात बहुसंख्य प्रजा ही कोकणा, कोळी, वारली, अशी आदिवासी होती.याचबरोबर कुणबी हिंदू , मुसलमान व (पारशी) झोरेस्ट्रियन धर्माच्या लोकांचाही समावेश होता. बौध्द व ख्रिश्चन धर्मातील लोकांच्या सुरगाण्यातील वास्तव्याबाबत तसेच संस्थानात ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून धर्मांतर होत होते याबाबतही उल्लेख आढळलेला नाही. संस्थानात भिल्ल आदिवासी जमातीचे वास्तव्य अजिबात नव्हते.१० पारशी समाज हा विशेषकरुन दारु निर्माण करणे व विकणे या उद्योगात होता. जंगल महसूल व अबकारी कर हे उत्पन्नत्र्चे महत्त्वाचे साध्त्र होते. सुरतकडे जाणारा रस्ता हा सुरगाणा संस्थांनातून जात असल्यामुळे व्यापारी मार्गावरील वत्र्हतुकीच्यत्र दृष्टीकोनातूनही हे संस्थान महत्त्वाचे होते .

**निष्कर्ष**

१. सुरगाणा संस्थांन डांग प्रदेशाला लागून असल्यामुळे ब्रिटिश सरकारने सुरवातीला संस्थानाचा समावेश खान्देश डांग संस्थान म्हणूनच केलेला आढळतो. डांग संस्थानातील भिल्ल प्रमुखांप्रमाणेच सुरगाणा संस्थानाचे प्रमुख असावेत अशी ब्रिटिशांची धारणा झालेली होती असे दिसून येते.

२. ब्रिटिश सरकारने सुरगाणा संस्थानिकांनत्र भिल्लांप्रमत्र्णेच आदिवासी मत्र्नले म्हणूनच सुरूवातीच्या गॅझेटियर मध्ये सुरगाणा संस्थानाचे प्रमुख जातीने कोळी असल्याचा उल्लेख मिळतो .

३. सुरगाणा प्रदेशत्र्लत्र'बंदीमुल्ख्र'म्हटले जत्र्यचे. भिल्ल प्रमुखांप्रमाणेच १८१८ पर्यंत सुरगाणा संस्थानिकांनी त्यांचे स्वातंन्त्र्य जपलेले दिसते.

४. खान्देशवरील ब्रिटिशांचे आक्रमण सहन न झाल्यामुळेच भिल्ल प्रमुखांप्रमाणेच देशमुख मल्हाररत्र्वत्र्नी सुरगाण्यातील ब्रिटिश तुकडीवर हल्ला केल्याचा निष्कर्ष काढता येतो.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

५ भारतीय संस्थानांच्या बाबतीत ब्रिटिश हस्तक्षेप होत असला तरी खान्देश पोलिटिकल एजंटमार्फत संस्थानातील गृहकलहासंदर्भात चौकशी करुन ब्रिटिश सरकारने योग्य निर्ण्य घ्ेतलेले दिसतात.यावरुन संस्थान लहान असले तरी ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते हे स्पष्ट होते.

६ खान्देश पोलिटिकल एजन्सीत असताना सुरगाणा संस्थानिक व त्यांच्या कारभाऱ्यामार्फत ब्रिटिश सरकारने शेजारील डांग व खान्देश प्रदेशातील भिल्ल आदिवासींशी चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेल दिसतो.

७ संस्थानाचे प्रमुख देशमुख रविराव यांनी १८५७ च्या उठावात भाग न घेतल्यामुळे ब्रिटिशांना अप्रत्यक्षरित्य मदत केल्याचे स्पष्ट होते.

८ संस्थांनातून जाणारा व्यापारी मार्ग, अबकारी महसूल, समृद्ध जंगल व त्यापासून मिळणारे उत्पन्न यामुळे ब्रिटिशांसाठी सुरगाणा संस्थान महत्त्वाचे होते हे लक्षत्र येते.

**संदर्भ सूची :**

1. Gazetteer of the Bombay Presidency, Khandesh District, Vol.XII Govt. Central Press, December 1880, Page No. 611.
2. Administration Report of Bombay Presidency, year 1872-73, Govt. Central Press-1874, Mum. Archv., Admn. Report file No.2, Sr. No.177, Publi. No. 9153, Page No. 200.
3. Imperial Gazetteer of India Bombay Presidency, Vol. IX and X, Part VIII, Native States, Aden and Portuguese Possession, Govt. Central Press, Bombay, 1907, Page No. 158
4. Gazetteer of the Bombay Presidency, Khandesh District, 1880, Vol. XII, Printed at Govt. Central Press, December 1880, Page No. 612.
5. Report of the Admn. of the Bombay Presidency year, 1878-79, Govt. Central Press- 1879, Mum. Archv., Admn. Report file No.2 Sr.No.177, Publi.No.12076, Page No.1.
6. डॉ.सौ. धारणकर सरल, (२८ नोव्हेंबर, २००९), १८५७ चे स्वातंत्र्यसमर आणि वीर भागोजी नाईक, प्रकाशक – अखिल भारतीय इतिहास संकलन समिती, जिल्हा नाशिक, रामजानकी, शिंगणे गल्ली, पृ.क्र. ५५.
7. Surgana.www.facebook.com Text and photographs courtesy - Shrimant Rohitraje Tejsinh Pawar, Surgana.
8. General Report on the Admn. of the Bombay Presidency, year 1875-76, Printed at the Govt. Central Press 1876, Mumbai Archives., Admn. Report file No.2, Sr No.177, Publi. No. 10294, Page No. 43
9. Letter of Murarrao Bin Malharrao, Political Department Mixed Vol. 9/1333, Mum. Archv., file No. 623, Year 1842, Page No. M- 349 , M- 350.
10. Administration Report of the Surgana State for the year 1946-47, Mumbai Archives, Admn. Report file No. 2, Sr. No. 677, Publi. No. R- 17355, Page No.5

५. भारतीय संस्थानांच्या बाबतीत ब्रिटिश हस्तक्षेप होत असला तरी खान्देश पोलिटिकल एजंटमार्फत संस्थानातील गृहकलहासंदर्भात चौकशी करुन ब्रिटिश सरकारने योग्य निर्ण्य घ्ेतलेले दिसतात.यावरुन संस्थान लहान असलेतरी ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते हे स्पष्ट होते.

६. भारतीय संस्थानांच्या बाबतीत ब्रिटिश हस्तक्षेप होत असला तरी खान्देश पोलिटिकल एजंटमार्फत संस्थानातील गृहकलहासंदर्भात चौकशी करुन ब्रिटिश सरकारने योग्य निर्ण्य घ्ेतलेले दिसतात.यावरुन संस्थान लहान असलेतरी ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते हे स्पष्ट होते.

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील यात्रा, सण-उत्सवाच्या सामाजिक, धार्मिक महत्त्वाचे ऐतिहासिक अध्ययन

**व्ही.जी. सोमकुवर**
सहाय्यक प्राध्यापक, स्नातक एवं स्नातकोत्तर इतिहास विभाग,
जी.टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार.

**सारांश**

महाराष्ट्रातील सर्वच भागात विविध देवदेवतांच्या पूजेच्या निमित्ताने यात्रा भरत असते. तसेच सण-उत्सव सुद्धा साजरे केले जातात. महाराष्ट्रातील जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिकचा काही भाग मिळून, खानदेश बनलेला आहे. महाराष्ट्रातील इतर ठिकाणाप्रमाणेच खानदेशाच्या मातीलाही एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती लाभली आहे. खानदेशातसुद्धा विविध देवतांची पूजा करून त्यानिमित्ताने यात्रा भरविण्याची परंपरा आहे. यातून खानदेशची सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संस्कृती स्पष्ट होते. महाराष्ट्रात बरेच सण साजरे होतात. त्यातील खानदेशात मात्र निराळेच सण आहेत त्याचे दर्शन व खानदेशात होणाऱ्या विविध यात्रांची माहिती सर्वांना व्हावी व त्याचे महत्त्व कळावे हेच या शोधनिबंधातून माडण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**उद्देश :-**

१) खानदेशातील विविध देवतांच्या पूजेचे स्वरूप स्पष्ट करणे.
२) खानदेशाच्या मातीच्या सामाजिक, धार्मिक पार्श्वभूमी स्पष्ट करणे.
३) खानदेशातील विविध देवदेवतांच्या यात्रांचे स्वरूप स्पष्ट करणे.
४) यात्रांमधील सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बांधीलकी स्पष्ट करणे.
५) यात्रांमधील आर्थिक व्यवहार स्पष्ट करणे.
६) खानदेशातील सण-उत्सवाचे वेगळेपण समोर आणणे.

**प्रस्तावना :-**

जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्ह्याचा काही भाग मिळून खानदेश बनलेला आहे. महाराष्ट्रातील ह्या भागात सातपुड्याच्या रांगा लाभलेल्या असून बहुसंख्य आदिवासी लोक राहतात. त्यामुळे लहानसा भाग असला तरीसुद्धा विविधतेने नटलेला आहे. त्यात विविध यात्रा, सण उत्सव यांचे वेगळेच वैशिष्ट्य आहे.१ त्यामुळे महाराष्ट्रात सर्वांच्या परिचयाचा झालेला आहे. त्यामुळे खानदेशच्या मातीतील लाभलेल्या संस्कृतीचे व विविध यात्रा, स्थळे व सण-उत्सव व त्याचे महत्त्व समाजासमोर आणण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधाद्वारे केला जात आहे.

**खानदेशातील यात्रा :-**

१) **शिरपूर येथील खंडेराव महाराजांची यात्रा –** शिरपूर येथे माघ शुध्द पौर्णिमेपासून खंडेराव महाराजांची यात्रा सुरू होते. ही यात्रा आदिवासी बांधवांसाठी एक आनंदोत्सव ठरतो. येथे २०० ते २५० वर्षापूर्वीचे खंडोबाचे प्राचीन मंदिर अरूणावती नदीच्या किनारी आहे. खंडोबा हे महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश इ. राज्यातील लोकांचे कुलदैवत असून ही यात्रा १५ ते २० दिवस चालते. या यात्रेच्या निमित्ताने घोड्यांचे व्यापारी मोठ्या संख्येने येथे येतात.२

२) **याहामोगी देवीची यात्रा –** याहामोगी देवी सर्व आदिवासी बांधवाचे कुलदैवत आणि श्रध्दास्थान आहे. त्या देवतेला देवमोगरा माता असेही म्हणतात. गुजरात आणि महाराष्ट्र राज्याच्या सिमेवर भडोच जिल्ह्यातील सागबारा तालुक्यात देवमोगरा या सातपुड्याच्या पहाडपट्टीतील गावात वसली आहे. या देवीचे भाविक महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातील आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात आहेत. दरवर्षी महाशिवरात्रीला या देवीची मोठी यात्रा भरते.३

३) **मंदाणे येथील अष्टभुजा देवीची यात्रा –** शहादा तालुक्यातील मंदाणे येथे श्री अष्टभुजादेवीची भव्य यात्रा दरवर्षी पौष शुध्द शांकभरी पौर्णिमेपासून भरते. आदिवासी भागातील ही यात्रा १० ते १२ दिवस चालते. 'कृषी देवतेची यात्रा म्हणून ही यात्रा प्रसिध्द आहे. ही यात्रा खानदेशातील ऐतिहासिक संस्कृतीचे प्रतिक मानले जाते. या यात्रेला विविध ठिकाणांहून व खेड्यापाड्यातून लोक जमतात.

४) **नवसाला पावणाऱ्या काळंबा देवाची यात्रा –** नंदुरबार जिल्ह्यातील शनिमांडळ, ऐचाळे, जामदे या तीन गावांच्या सीमेवर काळंबा देवस्थान आहे. या देवाची यात्रा दरवर्षी नागदिवाळीला भरत असते. सदर यात्रेनिमित्त येणारे भाविक संतती, आरोग्य, ऐश्वर्य, नोकरी, व्यवसायासाठी नवस मानत असतात व ते फेडण्यासाठी भाविकांची दरवर्षी गर्दी होत असते. काळंबा देव धनगर कुळाचे कुलदैवत असल्याने शेकडो बोकडांचा बळी दिला जातो.

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

५) **भोणे येथील नवरा-नवरीची यात्रा –** सुरत-भुसावळ रेल्वे मार्गालगत 'भोणे' हे लहानसे गाव आहे. अमळनेर, पारोळा व एरंडोल या तिन्ही तालुक्यांच्या सीमेवर ते वसलेले आहे. येथे लक्ष्मीनारायणाची यात्रा दरवर्षी पौष वद्य अमावस्येला भरते. खानदेशात ही यात्रा प्रसिध्द आहे. ही यात्रा महिनाभर भरत असते.

६) **म्हसदी येथील धनदाई देवीची यात्रा –** म्हसदी हे गाव धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात आहे. हे गाव धनदाई देवीच्या यात्रेसाठी प्रसिध्द आहे. दरवर्षी चैत्रशुध्द अष्टमीला यात्रा भरते. धनदाई नवसाला पावते अशी भाविकांची श्रध्दा आहे. महाराष्ट्रातील विविध शहरातून असंख्य भाविक येथे हजेरी लावतात.४

७) **सारंगखेडा येथील यात्रा –५** शहादा तालुक्यातील सारंगखेडा येथे दरवर्षी श्री दत्तजयंतीनिमित्त यात्रा भरते. ही यात्रा घोड्यांसाठी अतिशय प्रसिध्द आहे. त्यामुळे महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश राज्यात ही प्रसिध्द आहे. ही यात्रा सलग १५ दिवस भरते. ही यात्रा खानदेशातील वैभवशाली यात्रा आहे. या यात्रेत गायी व बैलांचाही विक्री व्यवसाय होतो. येथे भाविक आपला नवस पूर्ण करण्यासाठी लाखोंनी येत असतात.

८) **तळोद्यातील कालिका देवीची यात्रा –** तळोदा येथील खर्डी नदीच्या तीरावर, दरवर्षी अक्षयतृतीयेच्या दिवशी कालिकादेवीची भव्य यात्रा भरते. ही यात्रा मसाल्याचे पदार्थ, बैलगाड्यांची विक्री व भरपूर करमणूक याकरिता प्रसिध्द आहे. येथे कालिका मातेचे आकर्षक मंदिर आहे. नवसाला पावणारी, भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी म्हणून ह्या मातेची ख्याती आहे.

९) **धुळयाच्या एकवीरा देवीची यात्रा –६** श्री एकवीरादेवी धुळे येथील संपूर्ण खानदेशाची कुलस्वामिनी आहे. या यात्रेची सुरूवात दरवर्षी चैत्र शुध्द पौर्णिमेला होत असते. या यात्रेला अनेक वर्षाची परंपरा असल्यामुळे संपूर्ण खानदेश परिसरात ही यात्रा एक अग्रगण्य व उत्साहाची पर्वणी समजली जाते. या यात्रेनिमित्त मंदिरात लोकांचे नवस, होमहवन व विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत असतात. देवीच्या प्रतिमेची व पादुकांची पालखीतून मिरवणूक निघत असते.

१०) **जळगांव येथील श्रीराम रथोत्सव –७** जळगांव शहराच्या व जिल्ह्याच्या सांस्कृतिक व धार्मिक उत्सव परंपरेत गेल्या १३० वर्षापासून श्रीराम रथोत्सवाने एक आगळीवेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी परंपरा निर्माण केली आहे. हा रथोत्सव केवळ जळगावचेच नव्हे तर खानदेशचे भूषण ठरला आहे. हा कार्तिक शुध्द एकादशीला साजरा केला जातो. यामध्ये रासक्रिडा, वहन कीर्तन, प्रवचन इ. रात्रीचे कार्यक्रम पार पडतात.

११) **मेहुण येथील मुक्ताबाईचा यात्रोत्सव –८** मेहुण ता. एदलाबाद या श्री संत ज्ञानेश्वराच्या भगिनी मुक्ताबाईची समाधी आहे. वारकरी संप्रदायाचे भाविक लोक दरवर्षी येथे वारीला येतात. येथे दरवर्षी विजया एकादशीला यात्रा महोत्सव सुरू होतो. संत मुक्ताबाई हे तीर्थक्षेत्र खानदेशातीलच नव्हे तर इतर जिल्ह्यातून येणाऱ्या भाविकांचे श्रध्दास्थान म्हटले जाते. सतत दोन दिवस भजन कीर्तन अशा वातावरणात ही यात्रा वर्षानुवर्षे साजरी होते.

**खानदेशातील सण –**

१) **बैलपोळा –** खानदेशात मराठे, पावरा आदिवासी, गुर्जर इ. समाजात सण साजरे करण्याची प्रथा होती. त्या खानदेशवासी म्हणून काही महत्त्वाचे सण ते साजरे करतात. त्यात बैलपोळा हा विशेष सण आहे. कृषिवल संस्कृतीत बैलांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे श्रावणात अमावस्येला बैलपोळा साजरा केला जातो. पोळ्याच्या आदल्या दिवशी खानबैली असते. यादिवशी बैलांना स्वच्छ धुवून त्यांच्या खांद्यांना तेलाने मालिश करतात. त्या दिवसापासून तीन दिवस बैलांच्या मानेवर दुसर (जू) ठेवत नाही. पोळयाच्या दिवशी बैलांना सजवतात व त्यांची पूजा करून गोड जेवण घालतात.९

२) **भालदेव –** खानदेशात भाद्रपदात 'भालदेव' हा सण साजरा करतात. हा सण काही ठिकाणी ७ दिवस तर काही ठिकाणी ९ दिवस असतो. ह्यात स्वत:च्या घरच्या गाई-म्हशींचे शेण अंगणात पायरीजवळ जमा करतात. हळदीकुंकू लावून त्या शेणाची पूजा करतात. ह्या काळात घरच्या गाई, म्हशींच्या दुधाचा साठा करतात. ते दुसऱ्यास देत नाहीत. पूजा झाल्यानंतर घरचेच लोक हे दही, दूध, लोणी, तूप खातात. ह्या पदार्थांपासून तयार केलेले गोड जेवण देण्यात येते.

३) **कानबाई –** खानदेशात श्रावण महिन्यात कानबाईचा विशेष सण साजरा होतो. कानबाई हे गौराईचेच प्रतीक रूप समजले जाते. ह्या दिवशी स्त्रिया कानबाईची गाणी गातात, तिच्यासमोर फुगड्या खेळतात. ह्यावेळी मोठ्या पाटावर कलश व त्यावर नारळ ठेवतात. या कार्यक्रमात भाऊबंदाच्या बाया भाग घेतात. चार दिवसानंतर कानबाईचे विसर्जन होते. कानबाईचा चौरंग डोळ्यावर घेऊन घरधनी मिरवणुकीने विसर्जनासाठी जाते. सोबत गाणी म्हणणाऱ्या व मधूनच फुगड्या खेळणाऱ्या बाया असतात.१०

४) **रोट –** खानदेशात 'रोट' हा सण नवनाथ संप्रदायातून आला. श्रावणावतल्या रविवारी सूर्योदयाच्या वेळीच अंबाडीची भाजी व भाकरीचा नैवेद्य दाखवून हा सण साजरा केला जातो. सूर्योपासनेच्या दृष्टीने या सणाला खास महत्त्व आहे. खानदेशातल्या मराठ्यांमध्ये हा सण साजरा करतात. त्या दिवशी घरातल्या खंडेरावाच्या टाकाची पूजा करतात. आदिनाथ महादेव हा

नवनाथाचा आद्यगुरू म्हणून त्याची पूजा, उपासना रविवारीच करतात.११

५) **होळी –** होळी हा सण तसा सर्व महाराष्ट्रात, भारतात साजरा करतात. पण खानदेशात व विशेषत: आदिवासी पावरा समाजात हा सण सगळ्यात मोठा सण असतो. खानदेशातील सातपुड्याच्या पहाडपट्टीत तसेच पायथ्यालगतच्या भागात जवळ, जवळ १५ दिवस हा सण अतिशय धामधुमित साजरा केला जातो. यात गुलण्या बाजार, भोंगऱ्या बाजार, होळी, रंगपंचमी, मेळदा असे महत्त्वाचे भाग असतात.

इ. सणांव्यतिरिक्त दिवाळी, दसरा, गुढीपाडवा, गणेशोत्सव इ. सणही आनंदाने साजरे करतात.१२

**यात्रा, सण–उत्सवाचे महत्त्व –**

१) खानदेशात ज्या विविध यात्रा, सण–उत्सव साजरे होतात. त्यात विविध जातिधर्माचे लोक एकत्र येतात. यातून धर्माचे समाजीकरण होते. त्यातून एकमेकांत सुख दु:खाची देवाणघेवाण होते आणि सुसंवादाचे वातावरण तयार होते. येथे विवाह जुळून येतात. सामुहिक विवाह तयार होतात. त्यमुळे अशा सामाजिक वातावरणाकरिता ह्या यात्रा अतिशय महत्त्वपूर्ण ठरतात.

२) सामान्यत: देवतेच्या किंवा संताच्या गुणगौरवासाठी यात्रा सुरू करण्यात आल्यात. यातूनच लोकांच्या धार्मिक प्रवृत्तीचा विकास होतो. एखादी आदी दिव्यशक्ती आहे. अशी धार्मिक समजूत निर्माण होते. त्यामुळे देवतांच्या दर्शनाला जाण्याचा उद्देश सफल होतो.

३) यात्रा, सणउत्सवाच्या निमित्ताने सामान्य जनतेचे ८–१० दिवस तरी विविध कार्यक्रमातून मनोरंजन होते. लोक यावेळी स्वत:ची दु:खे विसरतात. त्यातून काही दिवस विरंगुळा मिळतो, कीर्तन, जलसे, तमाशे, कार्यक्रम नाचगाणे इ. आनंदपर वातावरण निर्माण होऊन मनोरंजन होण्यास मदत होते.

४) यात्रा, सणउत्सवातून विविध दुकानदार आपली दुकाने थाटतात. त्यातून आर्थिक उलाढालही होते. सारंखेड्याच्या यात्रेत तर मोठा घोड्याचा बाजार भरतो. त्यातून दलाल लोकांचे आर्थिक जीवन सुधारते. शिवाय पारंपरिक उद्योग व त्यापासून निर्मित वस्तूच्या विक्रीचे मुख्य ठिकाण असते. म्हणजेच बरेच लोक यातून आपले पोट भरतात.१३

**निष्कर्ष –**

महाराष्ट्रात तसे विविध सण–उत्सव साजरे होतात. पण खानदेशाची गोष्टच वेगळी आहे. येथे काही विशिष्ट आणि पारंपारिक पध्दतीनेच यात्रा, सण साजरे करण्याची प्रथा आहे. या यात्रांमुळे आदिवासी, मराठे समाजातील विविध स्वरूपाच्या सण–उत्सवामुळे खानदेशला एक वेगळीच संस्कृती मिळाली आहे असे दिसून येते.

कानबाई, रोट, भालदेव हे असे सण आहेत की, जे केवळ खानदेशातच साजरे करतात. शिवाय खानदेशच्या मातीलाही विविध संत, देवदेवता लाभले. त्यामुळे विविध यात्रांचे आयोजन होते. त्यामुळे खानदेशचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द झाल्याचे दिसून येते. यात सारंगखेड्याची यात्रा व याहामोगीची यात्रा तर सर्वत्र प्रसिध्द आहे. खानदेशची ही विविधता सर्वांना परिचयाची व्हावी हाच यातून निष्कर्ष निघतो.

**संदर्भ सूची :**

१) प्रा.डॉ.मधुकर वि. पाटील– कंपनी सरकार खालील खानदेश, शिवम प्रकाशन, नंदुरबार पृष्ठ क्र.२२७.
२) डॉ.मु.ब. शहा– खानदेशचा सांस्कृतिक इतिहास, खंड २ का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे पृ.क्र.३४–३५.
३) प्राचार्य डॉ.भि.ना. पाटील– खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ, पान क्र.२७५.
४) कित्ता– पान.क्र.२७७.
५) कित्ता– पान.क्र.२८३.
६) कित्ता– पान.क्र.२८०.
७) प्रा.डॉ.पाटील– उपरोक्त पा.क्र.२२७.
८) प्रा.डॉ.पाटील– उपरोक्त पान क्र.२२८–२९
९) डॉ.मु.ब. शहा– खानदेशचा सांस्कृतिकम इतिहास, खंड ३, का.स. वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे पान क्र.२५९.
१०) कित्ता– पान.क्र.२६०.
११) कित्ता– पान.क्र.२६१.
१२) कित्ता– पान.क्र.२६२.
१३) उपरोक्त– पान.क्र.२८०.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# 'खान्देश' नावाविषयी उत्पत्ती

**प्रा.डॉ. मिलिंद भगवानराव बचुटे**
मानसशास्त्र विभागप्रमुख,
आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर.

महाराष्ट्राच्या उत्तर दिशेला दख्खनच्या पठारावर वसलेला भू – प्रदेशहा 'खान्देश' या नावाने ओळखला जातो. 'खान्देश' प्रांत हा 'उत्तर महाराष्ट्र' या नावानेही परिचित आहे. खान्देशमध्येसदयकालीन जळगांव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यांचा समावेश केला जातो. खान्देशच्या उत्तर भागाला सातपुडा पर्वताच्या पर्वत रांगा असून त्या पर्वतरांगांच्या पायथ्याशी मध्यप्रदेशचा भू – भाग येतो. खान्देशच्या दक्षिण भागात सातमाळा डोंगर व औरंगाबाद हा जिल्हा येतो. पश्चिम दिशेलासह्याद्री पर्वत रांगा व त्याचबरोबर गुजरात राज्याचा डांग, सुरत व भडोच हे जिल्हे येतात. तर खान्देशच्या दक्षिण दिशेला गोदाकाठ, नाशिकचा भू – प्रदेश येतो. पूर्वीच्या काळी खान्देशचीसीमा तापीनदीवर वसलेल्या ब-हाणपुर पासूनते थेटसोनगड (गुजरात), नवापुर पर्यंत होती. उत्तर भागाकडे अशिरगडते थेट दक्षिणेकडीलसह्याद्री पर्वतावरील प्रसिद्ध किल्ले मुल्हेर पर्यंत होती. बागलाणचा परिसरही इतिहास काळात खान्देशचा भाग म्हणून ओळखला जात होता.

सध्या 'खान्देश' हे नाव राजकीय व प्रशासकियदृष्ट्या अस्तित्त्वात नाही. खान्देशचे नामकरण 'उत्तर महाराष्ट्र' असे झालेले आहे. असे असलेतरी या भू – प्रदेशाला 'उत्तर महाराष्ट्र' या नावा ऐवजी 'खान्देश' या नावानेच ओळखले जाते. खान्देशचे इ. स. १९०६ मध्ये इंग्रजांनी पूर्व व पश्चिम दिशांना अनुसरुन दोन विभाग केलेलेहोते. पूर्वेकडील भाग – पूर्व खान्देशतर पश्चिमेकडील भाग हा पश्चिम खान्देश. पूर्व खान्देश म्हणजे जळगांव जिल्ह्याचा भाग व पश्चिम खान्देशात धुळे व नंदुरबार जिल्ह्याचा भाग येतो. पूर्व खान्देशात जळगांव, अमळनेर, मुक्ताईनगर, एरंडोल, धरणगांव, बोदवड, चोपडा, रावेर, यावल, भडगांव, जामनेर, पाचोरा, भुसावळ, पारोळा, चाळीसगांव हेतालुके येतात. तर पश्चिम खान्देशमध्ये धुळे, साक्री, शिरपुर, शहादा, शिंदखेडा, दोंडाईचा, नंदुरबार जिल्हा, अक्कलकुवा, धडगांव, नवापुर, तळोदा या तालुक्यांचा समावेश होतो. खान्देशात नाशिक जिल्ह्यातील मालेगांव, सटाणा (बागलाण), कळवण आणि नांदगांव हेतालुकेहीयेतात. याचबरोबर औरंगाबाद जिल्ह्यामधील सोयगांव तालुका व नागद बनोटीचा परिसरही खान्देशचा भाग म्हणून ओळखला जातो.

'खान्देश' या परिसराचा भौगोलिकतेच्या संदर्भात विचार केलातर पृथ्वीच्या नकाशामध्ये 'खान्देश' हा २०.८ ते २२.७३ उत्तर अक्षांश आणि ७३.४२ ते ७६.२८ पूर्व रेखांशाचा भाग व्यापणारा सुमारे १६० मैल लांब आणि ९० मैल रुंदीच्या परिसरामध्ये व्यापलेला आहे. खान्देशचेक्षेत्रफळहेसुमारे १०,४३१ चौ. मैल एवढे आहे. खान्देशच्या भू – भागाला सातपूड्याचा डोंगर, अजिंठ्याचा डोंगर, चांदवडच्या व सह्याद्री पर्वताच्या पर्वत रांगांनी वेढलेले आहे. उत्तर दिशेला पूर्व – पश्चिम पसरलेल्या सातपुड्याच्या पर्वतरांगा या मध्यप्रदेश व खान्देश यांना विभागतात. दक्षिण दिशेकडील अजिंठ्याचा डोंगरहा खान्देशला औरंगाबाद, जालना, बुलढाणा या जिल्ह्यांपासून विभागतो तर आखा, लळींग व गाळण या सह्याद्री पर्वत टेकड्या खान्देशला नाशिकपासून वेगळ्या (अलग) करतात.

'खान्देश' हा शांत व संपन्न लोकवस्तीचा प्रदेश म्हणून सर्वदूर परिचीत आहे. खान्देशची मातीहीसुपीक माती आहे. त्यामुळे येथील लोकसुखी व संपन्न आहेत. खान्देशाात वेगवेगळ्या अनेक नद्या वाहतात. नद्यांमुळे काही ठिकाणी गाळाची जमीनतयार झालेली आहे. ही काळी कसदार जमीन असल्याने भरघोस उत्पन्न येथील लोक काढतात. खान्देशची मुख्य नदीतापी नदीहीहोय. हीतापी नदी 'पश्चिमवाहिनी' म्हणून ओळखली जाते. ही नदीसखोल व विस्तीर्ण पात्र असलेली मोठी नदी आहे. या तापी नदीला खान्देशातील अनेक उपनद्या येऊन मिळतात. त्यात पूर्णा, गिरणा, वाघुर, भोगवती, अरुणावती, गोमाई, वाकी, अमरावती, बोरी, अनेर, पांझरा या उपनद्या होत. खान्देशच्या परिसरामध्ये काळी कसदारसुपीक जमीन असल्यामुळे येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती करणेहा आहे. या व्यवसायाबरोबर शेती व्यवसायाला पुरक जोडधंदा म्हणून पशुपालन करणेहाही व्यवसाय येथे चालतो. खान्देशचे हवामान कोरडे असून पावसाळा, उन्हाळा व हिवाळा हे मुख्य तीनऋतु आहेत. या भागाचे सरासरी पर्जन्यमान चांगले आहे. यामुळे नद्यांना नेहमी पाणी असते व जंगले दाट आढळून येतात.

इ. स. १ मे १९६० ला संयुक्त स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनुसार खान्देशचे पूर्व खान्देश व पश्चिम खान्देशहे दोन विभाग रद्दबातल ठरवून पूर्व खान्देशच्या ऐवजी जळगांव जिल्हा व पश्चिम खान्देश ऐवजी धुळे जिल्हा असे नवीन नामकरण करण्यात आले. कालांतराने धुळे जिल्ह्यामधूननंदुरबार या स्वतंत्र नवीन जिल्ह्याची निर्मिती महाराष्ट्र शासनाने केली. थोडक्यात आज खान्देश म्हणजे जळगाव, धुळे व नंदुरबार हेतीन जिल्हेहोत. खान्देशला 'खान्देश' हे नाव कशावरुन, कशामुळे पडले वा मिळाले याच्या उत्पत्तीविषयी शोध घेतला असता अनेक मतप्रवाह समोर आलेतत्यातील मुख्य मतप्रवाह.

'खान्देश' नावाविषयी श्री. दा. गो. बोरसे यांनी पुढील उत्पत्ती सांगितलेल्या आहेत–

**अ) आभीरदेश –** ''खान्देशचे पूर्वीचे नाव अश्मक देश असावे. महाभारतात अश्मक देशाचा उल्लेख आहे. बौद्धग्रंथातही अश्मक देशहेनाव आढळते.''

**ब) गोपराष्ट्र –** ''खान्देशात गवळी राजाचा अंमल होता नाशिकच्या आसपास गोपराष्ट्रहोते असे इतिहासकारांचे म्हणणे आहे.''

**क) सेऊणदेश –** ''यादवराजा सेऊणचंद्र यांच्या नावावरुन सेऊणदेश नाव पडले. चांदवड ते सर्व खान्देश या देशात अंतर्भूत होता.''

**ड) अहिराष्ट्र –** ''श्री. दा. गो. बोरसेंनी इ. स. १९३७ मध्ये 'केसरी'त लिहिलेल्या लेखात अहिराच्या या भागातील वस्तीवरुन हे नाव सुचविले.''

**इ) खांडवदेश –** ''पांडवाचा या भागात लाक्षागृह दहनानंतरसंचारहोता. अर्जुनाने खांडववन जाळले व खांडववनाची स्मृती म्हणून खान्देश नाव पडले.''

**ई) खंडदेश –** ''भरतखंड, रेवाखंड अगर नुसते खंड याचप्रमाणेतापीखंडहे नाव असावे व खंड – खान असे नाव प्रचलित झाले असावे.''

**उ) कानदेश –** ''जामनेरतालुक्यातील कान नदीच्या नावावरुन या नदीच्या आसपासच्या मुलखास कानदेश असे नाव पडले असावे.''

**ऊ) खानदेश –** ''१४ व्या शतकात खान्देशावर फरुकी राजाचा अंमल होता व त्याची राजधानी थाळनेरहोती. त्याचे उपनाव खान यावरुन खानदेश नांव या देशास पडले असावे. अकबराने दानियल मुलावरुन दानदेश सुचविले पण ते रुढ झाले नाही.''

**ए) कान्हदेश –** ''स्वातंत्रवीर सावरकरांनी भाषाशुद्धीच्या अभिनिवेशाने या देशाला कान्हदेश म्हणावे असे सुचविले. तथापी गोप (गवळी राजे), आभीर, महानुभाव गुजर, लेवेपाटीदार, राजपूत चारणहे कृष्णाचे भक्त शिवाय या भागात कानबाई, कन्हेर, कानोडचे महत्त्व जास्त म्हणून कृष्ण – कान्ह – खान हीच खान्देशची व्युत्पत्ती संयुक्तिक दिसते.''

प्रसिद्ध इतिहासाचार्य वि. का. राजवाडेंच्या व्युपत्तीकोशामध्ये खान्देशाचे नाव कन्हदेशहोतेहे प्रा. मिराशींना मान्य नाही. 'सेऊणदेश' या शब्दापासून 'खान्देश' हा शब्द आला असावा,हेही मत न पटण्यासारखे आहे. कारण'सेऊण' देशाचीसीमा व व्याप्ती ही सिन्नर, नाशिकपासून पूर्वेकडील देवगिरी पर्यंत होती. पण खान्देशचा भाषा – संस्कृती संदर्भात विचार केलातर नाशिक, सिन्नर, देवगिरी इथल्या भाषा – संस्कृती मध्ये बरेच अंतर दिसते, म्हणूनही उत्पत्ती बरोबर वाटत नाही. 'खालचा देश' म्हणजे 'खान्देश' व स्कंदपासून बनलेल्या खांद्याचा अहिराणी अपभ्रंश जो'खांद' यापासून खान्देशहा शब्द तयार झाला हेही मत न पटण्यासारखे आहे.

खान्देशच्या नाव उत्पत्तीसंदर्भात श्री. दा. गो. बोरसे म्हणतात, ''खान्देशला अभिर देश, स्कंददेश, गोपराष्ट्र, सेऊणदेश, अहिराष्ट्र, खांडवदेश, खंडदेश, खानदेश, कान्हदेश अशा विविध नावांनी आतापर्यंत ओळखले जात असलेतरी खान्देशहेच नाव आजपर्यंत रुढ झालेले दिसते.''

खान्देशहे नाव 'कन्न' पासून आलेले असावे कारण 'कन्न' म्हणजे कृष्ण. 'कृष्णाचा देशतो खान्देश' हेही न पटण्यासारखे आहे. कन्न म्हणजे कानड – गवळी अशीही एक नामव्युत्पत्ती देता येते. या भू – प्रदेशावर पूर्वी कानडांची वा गवळी लोकांची वस्ती होती. कानड – गवळी लोकांचा मुख्य व्यवसाय गुरे पाळणेहाहोता. गुरे पाळणेहा मुख्य व्यवसाय असल्याने त्यांना नेहमी भटकंती करावी लागायची. याविषयी श्री. शं. बा. जोशी म्हणतात, ''कन्नड, कन्नडगाव या गावांच्या नावांवरुन तसेच खान्देशामधील विरंगळांच्या स्मारक शिल्पाच्या खूणांवरुन या भागात एके काळी कानडी लोक राहत असावी'' असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष नोंदवलेला आहे. थोडक्यात खान्देशातील कानड गवळी लोकांच्या जाती, त्यांची नावे, विरंगळांची स्मरणशिल्पेतयार करण्याच्या प्रथेवरुन खान्देशहा कन्नदेश – म्हणजे कानड देशही उत्पत्ती स्विकारार्य वाटते.

**निष्कर्ष**

१. कन्नड, कन्नडगांव या गावांच्या नावावरुन तसेच खान्देशमधील विरंगळांच्या स्मारक शिल्पाच्या खुणांवरुन पूर्वीच्या काळी येथे कानडी, गवळी राजाची सत्ता व या लोकांचे वास्तव्य असावे. त्या कानडी गवळी लोकांची नाव, जाती व व्यवसायावरुन खान्देशहा 'कानड – गवळी' लोकांचा प्रदेशहोता असे वाटते.

२. खान्देशी आणि आहिराणीहे शब्द ब–याचदा एकाच अर्थाने वापरले जातात पण त्यांच्यामध्येसूक्ष्म भेद आहे. खान्देशीहा शब्द प्रदेशवाचक शब्द आहे

३. खान्देशहा अठरापगड जाती – धर्मांनी वसलेला समृद्ध व शांत प्रदेश आहे.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची :**

१) बोरसे दा. गो., 'अहिराणी भाषा परिचय', गिरजासाहित्य प्रकाशन, नागपुर

२) खान्देशातील ग्राम दैवते आणि लोकगीते- पगारसयाजी निंबाजी, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे. पहिली आवृत्ती – १९९२.

३) 'अहिराणी भाषा वैज्ञानिक अभ्यास'- सुर्यवंशी रमेश, अक्षय प्रकाशन, पुणे. १९९७.

४) अहिराणी लोकगीते आणि लोकभाषा – पगारे म. सु.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खान्देशातील मंदिर स्थापत्य कला

**प्रा. ए.एम. काळबांडे**
इतिहास विभाग प्रमुख, सार्वजनिक कला व वाणिज्य महाविद्यालय,
विसरवाडी, ता. नवापुर, जि. नंदुरबार.

**प्रस्तावणा**

माणूस विविध कला – अविष्कारांनी नटलेला, घडलेला, सुसंस्कृत व बहुआयामी माणला जातो.

एकाच व्यक्तीत विविध व्यक्ती लपलेल्या असतात. कारण एकाच व्यक्ती विविध प्रसंगी अनेक भुमिकेत कार्य करत असतो. माणवाच्या उत्क्रांती बरोबरच त्यांच्या व्यक्तीमत्वात विविध कला अंगिकारल्या गेल्यात. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थितीमुळे त्यांची अभिव्यक्ती घडली. काळानुरुप कलेचा अविष्कार उदयास आला. कला, मनोरंजन प्रकाराचे चिरकाल स्मरण असावे त्यातुन ती माहिती त्या काळातील उपलब्ध साधनातुन जतन केल्या जाऊ लागली. वर्षानुवर्ष ती टिकुन राहील. तसेच भावी पिढीला आदर्श वाटेल या विचारातुन विशिष्ट दगडातुन त्या त्या काळातील कला कोरल्या गेल्यात प्रसंग व परिस्थितीनुसार त्यामध्ये असलेले भाषा, संवाद, प्रसंग, संदेश, उपदेश व विविध घटा स्विकारल्या व साकारल्या गेल्यात. प्राचिन काळापासून जतन केलेल्या कलेत स्थापत्य कला, ऐतिहासिक घटना, जतन करणारी ठरली. खान्देशातील स्थापत्य कला अभ्यासन्याचे हेतुने हा प्रयत्न आहे.

**खान्देशातील भौगोलिकता**

भौगोलिक दृष्टीने विचार केला तर उत्तरेला सातपुडा पर्वत रांग व पुर्वेला बलढयाचे पठार, अजिंठा पर्वताची रांग, नैऋत्यला चांदवड टेकडया, पश्चिमेला सहयाद्री पर्वतरांगाच्या टेकडया असा महाराष्ट्रातील भौगोलिक पट्टीचा प्रदेश म्हणजे खान्देश होय (महाजन २००५, १७) महाराष्ट्राच्या उत्तर दिशेला असलेला तो प्रदेश असुन त्यास उत्तर महाराष्ट्र नावाने सुध्दा ओळखला जातो. शहादा, चोपडा, फैजपुर ही समृध्द पठारे आहेत. (पाटील २०१५, २८) असिरगड, तोरणमाळ, ललिंग असे डोंगरी किल्ले, तापी, नर्मदा या मोठया नदया सह (खान्देश १९८०, ०६) गिरणा, वाघुर, पुर्णा, भोकर, सुकी, मोर, भोगावती, बेशि, पांझरा, अनेर, बुराई, गोमती, उदाई, पाताळगंगा, व रत्नावली नदया आहेत. त्यातील बहुतेक नदया तापीला समर्पित होतात.

सिंधु संस्कृतिच्या काळापासुन खान्देश जोरवे संस्कृति होती. मौर्य, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट ई. घराणेचा समावेश खानदेशात होता. सुलतानशाही, मुघलशाही, पेशवाई व ब्रिटीश काळाचा इतिहास खानदेशास लाभलेला आहे. (पाटील २०१२–३७) महाभारत काळात खानदेशला कान्हदेश, दानदेश, सेऊणदेश, (जोशी मोरा १९५४–१६०) कहानदेश, कान्हेरी, इत्यादी नावाने ओळखले गेले आहे. सध्याच्या खानदेशात जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्हयाचा समावेश होतो.

**मंदिर स्थापत्यकला**

आधुनिक महाराष्ट्रातील प्राचिन खानदेशाच्या इतिहासाचा ठेवा त्यातील स्थापत्य होय, किल्ले, मंदिर, मज्जित, मुर्ती, लेणी इत्यादी स्थापत्य कला त्याकाळातील सांस्कृतिक ठेवा जोपासत आहेत. दखनच्या प्रदेशाप्रमाणे खानदेशातही खडक कोरुण लेणी अथवा मंदिरे उभारली गेलीत. यामध्ये भरीव कामगिरी राष्ट्रकुट घरण्यांनी केली. (महाजन टीटी २००५, २९०)

धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यात बुराई नदीच्या काठावर बसलेल्या बळसाणे गावालगत प्राचिन ०९ वास्तु (आठ मंदिरे व एक मठ) आहेत. त्यामध्ये मारुती मंदिर, जिमुखी मंदिर, वराह मंदिर, कानबाई मंदिर, जैन मंदिर, पार्वती मंदिर, गणेश मंदिर, सदाशिव मंदिर व पार इत्यादीच्या समावेश होतो. साधे एक मंडपी मंदिर, वराह मंदिर महाराष्ट्रातील दुर्मिळ मंदिर होय. वराह मुतीच्या पाठीवर नक्षीदार झुल आहे. सपाट दगडी छत, उभे आडवे स्तंभ, त्यावरील मागील बाजुस लक्ष्मी, महिषासुरमर्दनी स्वरुपातल्या स्त्रीमुर्त्या कोरलेल्या आहेत. (धाराशिवकर २०१३, ३७) जिमुखी मंदिराच्या प्रवेशव्दारा समोरील गाभाऱ्याचे प्रवेशव्दार देखणे पाचघडया असलेले तसेच इतर काटकोणात असलेले दोन गाभारे त्यामधील शिवाच्या गाभाऱ्यावरील शिखररचनेत शिल्यांकृत दगड बसविलेली कला विशेष आहे. त्या प्रमाणेच भिंतीला दिलेला मोड तसेच बाहयांगावरील शिल्पे, शिल्पपट्टया, कोनाडे, नदया, मुर्त्या अत्यंत विलोभनिय आहेत.

बळसाणे येथे मुर्ती नसलेले मंदिर दोन आहेत. गाभाऱ्यातील आतील भिंतीवर उलट  आकाराची शिल्पे तेथील उच्च दर्जाची कला जोपासत आहेत. गाभाऱ्यात स्तंभ, स्तंभशीर्ष, तुळसा, त्याची जोडणी तसेच प्रवेशव्दाराजवळील नक्षी कला सुंदर आहे. (धाराशिवकर २०१३–४४) मंडपातील आतील सुरेख नक्षीदार स्तंभ यादव काळातील शिल्पकलेचे वैशिष्टये कमळ व वेलबुट्टीची नक्षी दर्शवितात. मुर्ती नसलेल्या दुसऱ्या मंदिराची रचना हेमाडपंथी ---- तसेच मठासारखी आहे.

बळसाणे येथील सदाशिव मंदिर नागर शैलीचे अत्यंत अप्रतिम शिल्पकला व शिखर धारण केलेले हेमांडपंथी बांधकाम असलेले आहे.

(धाराशिवकर २०१३,४८) मंदिराची रचना चांदणीच्या आकाराची आहे. हे मंदिर तीन मंदिराचे मंदिर असुन ते शिव, विष्णु, पार्वती देवतांचे मंदिर आहे. (महाजन टी. टी. २००५, २९७) म्हणुन त्यास त्रिदल किंवा त्रिमुखी मंदिर म्हणतात. पश्चिममुख असलेले मुख्य मंदिरात शिवलिंग आहे. तीनही मंदिराचे दरवाजे नक्षीकामाने सजविलेले असुन पुष्पसारखा, स्तंभसारखा, ब्यालसारखा इत्यादी नक्षीकाम केलेले सारवा होते. मंदिरातील देवतांच्या मुर्तीबरोबर हत्ती आणि सिंहाची मुर्ती आहे. तसेच नृत्य करणाऱ्या स्त्रियांच्या मुर्त्या आहेत. प्रवेशव्दार समोरील गाभाऱ्यात शिवाची मोठी पिंड आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशव्दारावर मध्यभागी गणपती आहे. मंदिराचे दुसरे वैशिष्टये म्हणजे सभामंडप होय. तो चौकोनी आकाराचा मंडप आहे. (महाराष्ट्र इति.) तीन गाभाऱ्यावर तीन शिखरे असुन सभा मंडपावर चौथे शिखर आहे. मंदिराच्या बाहय रचनेतील शिल्पे आकर्षक आहेत. मंदिराचे वैभव म्हणुन ओळखले जाणारे कोरीव स्तंभ, स्तंभशिर्ष व तुळया यांना महत्व असुन मंदिराचा बाहय भाग अत्यंत सुंदर व आकर्षक असुन त्यांवर कोरीव मुर्ती कोरलेल्या आहे. मंदिराच्या आधार स्तंभाचे तीन भाग पडतात. पहिला प्रकार चौकोनी आकाराचा आधार स्तंभ, दुसरा आष्टकोनी आकाराचा आधारस्तंभ, तिसरा अष्टीश्रा स्तंभ होय. खजुराहोच्या मैथुनशिल्पाचा प्रभाव दाखविणारी भौमितिक सर्व शिल्पे आणि मनुष्यकृती शिल्पे ही मंदिराची विशेषत: होय.

धुळे जिल्हयातील शिंदखेडा तालुक्यात मेथी येथे स्थापत्यकेलेची उत्कृष्ट नमुने असलेले भवानी मंदिर, विष्णु मंदिर, हरीबा मंदिर, आणि लक्ष्मी नारायण मंदिर उभारलेले आहे. गरुड मंडप असलेले बालाजी मंदिराचे छत नागर शैलीतील कुंभोज पध्दतीचे आहे. (मुकूंद धाराशिवकर २०१५-१९) भवानी मंदिराचा गर्भगृहाचे प्रवेशव्दार सात घडया व सुंदर व रेखिव शिल्पे आहेत. त्यामुळे प्रवेशव्दाराचे सौंदर्य व देखणेपणा आकर्षण ठरते. हरीबा मंदिराच्या चौथाऱ्यापर्यंत विविध कांगोरे असलेल्या नक्षीपट्टया, भौमितिक आकृत्या, स्तंभावर रेखांकृत आकृत्या आहेत. हे मंदिर जिंदल (जिमुखी) पध्दतीचे असुन तीन भागारे असलेले आहे. मुख्य गांभाऱ्याचे प्रवेशव्दार पाच घडयांचे असुन त्यावर रेखीव शिल्पे आहेत. मंदिराचे शिखर नागर शैलीतील भूमीज पध्दतीचे आहे. (मुकूंद धाराशिवकर २०१५-५९)

भोनगाव ठिकाणी एक समाधी मंदिर बारा स्तंभावर उभारलेले आहे. मध्यभागी मोठा घुमथ असुन चार कोपत्यावर छोटे घुमटवजा चार अर्धगोलाकार दगडी कळस आहेत. चारही बाजुनी कठडेवजा दगडी भिंत बांधलेली असुन मध्यभागी प्रवेशव्दार आहे. अनामिक स्थानिक संताची समाधी असावी. तसेच भोनगाव येथे गठीच्या तटबंदीच्या आत असलेले गठीतील शिवमंदिर म्हणुन प्रसिध्द आहे. त्याचे शिखर वासर शैलीचे असुन वर कळसाऐवजी गोल कोरीव चक्र आहे. मंदिराच्या चारही भिंती व चौथारा घडी व दगडानी बांधलेला असुन बांधकामात चुना वापरलेला आहे. भिंतीच्या कोपऱ्याच्या जोडणीमध्ये सळयांचा केलेला वापर हे खास वैशिष्टये होय. गाभाऱ्याचे प्रवेशव्दार पाच घडयाचे असुन मध्यभागी गणेशाची कोरीव मुर्ती कोरलेली आहे.

शिरपुर येथे बांधलेले बालाजी मंदिर दक्षिण भारतातील द्रविड शैलीत बांधलेले आहे. त्यात मुर्ती देखण्या व वास्तु सुंदर आहेत. प्रकाशा येथील विक्रमंमार्कचे मंदिर कदंब घराण्याच्या सत्तेवेळी बांधलेला आहे. चांगदेव येथील मंदिर शेदुर्णी येथील मंदिर, झोडगे येथील मंदिर त्याकाळातील सुंदर स्थापत्य कलेची उदाहरण आहेत.

**समारोप**

खानदेशातील स्थापत्य कला विशेषतत मंदिर स्थापत्य उत्कृष्ट दर्जाचे आहे. अतिशय सुंदर नक्षीकाम व शिल्प आहेत. मंदिराच्या शिखरावर आतील बाजुस सुंदर कमळाचे शिल्प त्या रचना शैलीवरुन कालखंड ओळखता येतो. स्तंभशिर्षाचे वेगवेगळे नमुने आहेत. नागर, बेसर व द्रविड शैलीची स्थापत्य कला मंदिर रचनेत आहेत. शिल्पकलेत यष्टीमुर्ती, अप्सरा यांची कला अनेक पिढयांना आकर्षित करणाऱ्या आहेत. काही ठिकाणी लाकडी मंदिर आहेत. मुख्यमंडप बांधण्याची पध्दत आहे. आवकाश परिसरात दगडी कासव जमिनीवर कोरलेले आहेत. मंदिरातील पाणी बाहेर नेण्यासाठी गोमुख आहे. दिवे लावण्यासाठी स्वतंत्र उभारलेले स्तंभ म्हणजे दिपमाळ होय. पाणी साठवण्यासाठी दगडी सरोवर, तलाव आहेत. मंदिर शिखर रचनेत चौकोन, अष्टकोन चे रुपांतर सोळा कोनात वर्तुळात निमुळते, द्रविड शैलीचे शिखर चौरस दंडगोलाकार तर वासर शैलीचे शिखर मिश्र रचना शैलीचे असुन खानदेशात त्यास ओरीसा शैली असेही म्हणतात. संगीत स्तंभाची रचना विशेष आहे. मंदिरास तटबंदी प्रदक्षिणामार्ग इत्यादी विशेषता: मंदिर स्थापत्य कलेत आहे. स्थानिकदृष्टीने विचार केला तर डोंगरावरील मंदिर, नदी काठावरील मंदिर, नदीच्या प्रवाहातील मंदिर, संगमावरील मंदिर, पुष्कराणी असलेले मंदिर, दिपमाळ असलेले मंदिर, गठीतील मंदिर, तटबंदी असलेले मंदिर, दोन मुर्ती व दोन भागारे असलेले मंदिर, तीन भागारे असलेले मंदिर, घाटावरील मंदिर, चार बाजुनी कालावा असलेले मंदिर अश्या पध्दतीचे स्थापत्यानुसार किंवा वैशिष्टयानुसार मंदिर प्रकार खानदेशात आढळुन येतात.

**संदर्भ सूची :**

१) प्राचिन खानदेशाचा इतिहास, टी. टी. महाजन, दिलीपराज प्रकाशन, २००५, पा.नं. १७
२) खानदेश लोकसभा प्रतिनिधी, डॉ. अशोक पाटील, प्रशांत पब्लीकेस २०१५, पा.नं. २८
३) बी. जी. खानदेश १९८०, पृ. ०६
४) ब्रिटीशकालीन खानदेश आणि दुष्काळ, मा. डॉ. संजय जिभाऊ पाटील, सम्यकता प्रकाशन, २०१२, पृ ३७
५) मो. रा. जोशी, खानदेश नावाचे मुळ, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे संशोधन त्रैमासिक, वर्ष २२ वे अंक १-४, १९५४ पृ. १६०
६) सकाळ वृत्तपत्र खानदेशातील गड-किल्यांची दुरावस्था, लेख प्राचार्य सी. झेड. इंदासराव पृ. ३
७) महाजन टी. टी. उपरोक्त पृ. २९०
८) मंदिर शिल्पे, मुकूंद धाराशिवकर, भांडारकर पब्लीकेशन, धुळे प्रथम आवृत्ती २०१३, पृ. ३७
९) उपरोक्त पृ. ४४
१०) उपरोक्त पृ. ४८
११) महाजन टि. टि. पृ. २९८
१२) मुकूंद धाराशिवकर पृ. १९
१३) मुकूंद धाराशिवकर पृ. ५९

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शिक्षणाच्या आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातुन खान्देशात केलेला धर्मप्रसार : एक चिकित्सक अभ्यास

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**प्रस्तावना :-**

ख्रिश्चन मिशनरी लोकांनी धर्मप्रचाराच्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यात ज्या सामाजिक सुधारणा घडवुन आणल्या त्यात शैक्षणिक विषयक, आरोग्य विषयक आणि सामाजिक अनिष्ट रुढी-परंपरा यांना तडा देणे याविषयक सुधारणांचा समावेश होता. प्रभु येशुच्या जन्माबरोबर या सुधारणांची सुरुवात इजरायल या राष्ट्रात झाली. त्यांच्या जिवंत कार्याने आणि शिक्षणाने जसा यहुदी समाजच नाही तर रोमन ग्रीक सत्ता देखील जागरुक झाली. त्याच शिक्षणाने भारतात, महाराष्ट्रात आणि खान्देशात देखील अनेक सामाजिक सुधारणा घडवुन आणल्या. महाराष्ट्रात गॉर्डन हॉन, पंडीता रमाबाई, लेले शास्त्री, ना.वा.टीळक, लक्ष्मीबाई टीळक यांनी ख्रिस्ती मिशनरी चळवळीच्या प्रगतीला हातभार लावला. तसेच अमेरिकन मराठी मिशन या संस्थेने ज्ञानोदयाच्या माध्यमातून ख्रिस्ती साहित्य आणि शैक्षणिक विकास महाराष्ट्रात घडवून आणला. पुढे खान्देशात टिम मिशनचे संस्थापक फेड्रीक फ्रँकसन याने मिशनरी कार्याची सुरुवात केली. तसेच डाल्डग्रीन, मिरा मावशी, बार्टनेस अशा अनेक मिशनऱ्यांनी आदिवासींमध्ये शैक्षणिक आणि आरोग्यविषयक सुधारणा घडवुन आणल्या. पुढे स्कॅनेडीयन मिशन, टिम मिशन, स्विडीश अलायन्स मिशन, मेथोडिक्स चर्च इन इंडीया या मिशनरी संस्थांनी अनेक शाळा, वसतीगृह, बेबी होम, चॅपेल, दवाखाने अशा सामाजिक संस्था काढून खान्देशात शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा घडवुन आणल्या.

**ख्रिस्ती मिशनऱ्यांचा धर्मप्रचाराचा उदय आणि विकास :-**

प्रभु येशु क्रुशीत होण्याअगोदर बारा शिष्यांची नेमणूक करतो. जे पुढे मंडळींचे पाया रचणारे प्रेषित म्हणुन ओळखले गेले. ज्यात प्रभु येशुने देवाच्या राज्याचा संदेश देत असतांनाच त्याने बारा शिष्यांची नेमणूक केली. मग त्याने या बारा शिष्यांची नियुक्ती केली. शमोल ज्याचे नांव त्याने पतरस ठेवले आणि जब्दीचा पुत्र याकुब आणि याकुबचा भाऊ युहन्ना ज्याचे नाव त्याने बुअर नरगीस अर्थात गर्जनाचा पुत्र असे ठेवले आणि अन्ट्रीआस तसेच फिलीप, बरतुल्मे, मत्ती आणि थोमा तसेच यहुदा इस्कारीयोती ज्याने येशुला पकडवून दिले.१ पुढे याच बारा शिष्यांनी आशियात आणि संपूर्ण युरोपभर फिरुन येशुचा संदेश पोहचवण्याचे कार्य केले.

येशुचा जन्म ही इतिहासातील महत्त्वाची घटना होती. तिला निश्चित स्वरुप देण्यासाठी व कालगणनेत बसविण्यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्या. चर्च इतिहास लेखनाची सुरुवात पश्चिम आशियात पॅलेस्टाईनमध्ये झाली. सुरुवातीच्या संघर्षानंतर इ.स. ३१३ मध्ये रोमन बादशहाने ख्रिश्चन धर्म स्विकारला. ख्रिश्चनांचा संपूर्ण वर्चस्वाचा कालखंड ऑगस्टीन ते मार्टीन ल्यूथर किंग असा मानला जातो. ख्रिश्चनांचा बायबल हा प्रमुख ग्रंथ. ज्यामध्ये इतिहाससंबंधी विचार व्यक्त केले आहे.२ अशा प्रकारे संपुर्ण युरोपची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक या सर्व संस्था चर्चच्या आणि ख्रिस्ती धर्माच्या मान्यतेखाली आल्या. परिणामी चर्च ही संस्था सर्वोच्च बनली आणि तिने राज्यसत्तेवर देखील आपला जम बसविला आणि युरोपात अंधःकार युगाची सुरुवात झाली. म्हणुन शेक्सपिअर म्हणतो की, चर्च हे पापाचे केंद्र आहे आणि याच पापाची वाचा सर्वप्रथम सेंट ऑगस्टीन याने फोडली.

सेंट ऑगस्टीन या धर्मगुरुंनी इतिहासाविषयी आपली मते मांडली. त्याने ज्यू धर्माची चौकटीतून बाहेर पडून आपले स्वतंत्र तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला. ऑगस्टीन हा धर्मवेत्ता, तत्वज्ञ, शिक्षक, कवी व राजकीय विचारवंत होता. त्याने हा ग्रंथ २२ खंडामध्ये लिहीला.३ ऑगस्टीनने या ग्रंथात म्हटले आहे की, चर्च संस्था ही दैवी निर्मिती आहे. चर्च संस्था ही सिटी ऑफ गॉड आहे. म्हणून ते पवित्र राज्य आहे. स्वर्गाचे जमिनीवरील रुप म्हणजे चर्च होय. तसेच पुढे हेगलने हे येशु ख्रिस्तांच्या जीवनावरील चरित्र ग्रंथ लिहून त्याने येशुचे दैवत्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पुढे ओटो, युसेबियस, बिडे, सेंट ग्रेगोरी यांनी ख्रिश्चन इतिहास मोठ्या प्रमाणात लिहीला आणि ख्रिस्ती इतिहास लेखनशास्त्रात एक नवा दृष्टीकोन निर्माण केला आणि आधुनिक मिशनरी कार्याची वाचा फुटली.

**मिशन म्हणजे काय ? आणि मिशनरी शब्दाची उत्पत्ती :-**

येशु ख्रिस्ताचा प्रचार करीत त्यांना ख्रिस्ताचे अनुयायी अथवा मिशनरी म्हणुन ओळखले जाऊ लागले. संपुर्ण आशिया आणि युरोपभर फिरुन हे मिशनरी देवाच्या राज्याची सुवार्ता सांगु लागले. मिशन व मिशनरी या मुळ लॅटीन शब्दाचा अर्थ संदेश वाहक, संदेश वहनाचे कार्य, दुतांचा समुह असा होय. देवाच्या राज्याच्या पहिला या भुतलावरचा मिशनरी हा स्वतः येशु ख्रिस्त होता. तो देवाचे संदेश आजुबाजूच्या राज्यात प्रचार करीत असे आणि जनसामान्यांत दलित-पिडीत लोक हे येशुचे संदेश ऐकण्यासाठी आवर्जुन उपस्थित राहत असत. त्या वेळेपासुन येशुने सांगायला आरंभ केला, पश्चाताप करा, कारण देवाचे राज्य जवळ आले आहे.४ येशु ख्रिस्ताने लोकांना पापापासुन परावृत्त

ISSN : 2348-7143
Dec. 2018

करण्याचा संदेश दिला. कारण त्याने पुढे संपुर्ण जगाच्या पापासाठी क्रुसावर बलिदान दिले. हेच बलिदानाचे प्रेम देवाच्या अस्तित्त्वाचा मार्ग मोकळा करते. येशु ख्रिस्ताला वधस्तंभावर खिळल्यानंतर येशु ख्रिस्त तिसऱ्या दिवशी पुन्हा पुनरुत्थित म्हणजे जिवित झाले आणि त्याने आपल्या शिष्यांना दर्शन देवून शेवटची आज्ञा दिली ती अशी, म्हणून तुम्ही जा आणि सर्व जातीच्या लोकांना चेले बनवा आाि पिता, पुत्र तसेच पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तीस्मा द्या आणि जी जी आज्ञा मी तुम्हाला सांगितली आहे, त्याचे पालन करण्यास त्यांना शिकवा आणि बघा जगाचा शेवट होईल तोपर्यंत मी सदैव तुमच्या बरोबर राहील.५ आणि अशा प्रकारे येशु ख्रिस्ताने शिष्यांना महान आज्ञा दिली आणि त्यांच्या डोळ्यादेखत तो स्वर्गात चढून गेला.

**मंडळीचा विकास आणि प्रभु येशुचा जन्म दिवसाला राज्यमान्यता :-**

येशु ख्रिस्ताचा जन्मदिवस आज संपुर्ण जगात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. तो कसा निर्माण झाला. वर्ष अखेरीस उत्सव करणे ही फार प्राचीन प्रथा आहे. रोमन लोक सॅटेनेलीआ साजरा करत. रोमन लोकांना रानीचा सुगीचा देवतेचा उत्सव, हा उत्सव १७ ते २३ डिसेंबर यादरम्यान असे. अखिल वर्षातील सर्वात आनंददायी व भव्य असा हा उत्सव होता. सर्व वाणिज्य, व्यापार व कामकाज थांबविले जाई... जर्मेनिके लोकांची उत्सव करण्याविषयी अशी ठाम समजुत होती की, ते देखील ऐन वसंतात सण साजरा करीत होते... तसेच सुर्यदेवाचा पुर्नजन्माचा तितकाच भव्य सोहळा ते दक्षिणायानामध्ये देखील साजरा करीत होते.... खास करुन रोमन फौजा विजयश्री फलोत्पादन आणि शांती प्रदान करणारी देवता म्हणून मित्रसला मानत, त्यामुळे शतक ३५४ मध्ये पोप लिबेरीयस (३५२ ते ३६६) च्या अधिपत्याखाली ख्रिश्चन चर्चने एक अतिशय चतुराईचा निर्णय घेतला. ख्रिश्चन चर्चने उपलब्ध मित्रसचा जन्म दिवस डिसेंबर २५ हाच येशूचा जन्मदिवस म्हणून जाहीर केला.६ (अॅने सुझान रिश्के डिसेंबर २५, १९८८)

**भारतात ख्रिस्ती मिशनरी चळवळीचा उदय आणि प्रसार :-**

येशूच्या आज्ञनेवरुन शिष्य हे आशिया तसेच युरोपभर विखुरले आणि येशु हाच जगाचा उध्दारकर्ता आहे, असे सांगू लागले. तसेच येशुचा बारा शिष्यांपैकी सेंट थोमा हा भारतात सागरी मार्गाने केरळमध्ये पोहचला. याने केरळमध्ये सात चर्चेस स्थापन करुन ख्रिश्चन धर्म प्रचाराची पताका रोवली आणि तसेच पुढे अनेक नेस्टोरीयन्स, ख्रिश्चन भारतात येवू लागले. त्याचबरोबर कॅथलिक मिशनरी, प्रोटेस्टंट मिशनरी यांच्या प्रवाहाची लाटच भारतात सुरु झाली. पुढे मिशनरी कार्याचे संस्थापक विल्यम केरी यांनी बायबलचे अनेक भाषांत जसे मराठी, इंग्रजी, बंगाली, तेलगु अशा अनेक भाषांत बायबलचे भाषांतर केले. जवळजवळ अशा २१ भाषांचा त्यात समावेश होतो. त्यामुळे मिशनरी कार्याला भारतात खऱ्या अर्थाने गती प्राप्त झाली.

इंग्लंडच्या पार्लमेंटने १८१३ चार्टर अॅक्टनुसार कंपनी सरकारच्या हद्दीत येणाऱ्या प्रदेशात ख्रिश्चन धर्मप्रसार करण्यासाठी मिशनरी लोकांना मान्यता दिली. अशा प्रकारे हा प्रवाह जगाच्या काना-कोपऱ्यातून भारतात आणि महाराष्ट्रातून खान्देशात वाहू लागला. विशेष करुन पश्चिम खान्देशात या प्रवाहाने जोर धरलेला दिसतो. पुढे महाराष्ट्रात पंडीता रमाबाई, लेले शास्त्री, विष्णु भास्कर करमरकर, बाबा पदमजी, बाळ गोपाळ जोशी, गोविंदराव काणे इत्यादींनी ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला. भारतात ख्रिश्चन हे धर्मांतर घडवून आणतांना त्यांच्यावर आरोप केला जात होता, पण या आरोपाला न जुमानता त्यांनी बाप्तीस्मा घेतला. बाप्तीस्मा म्हणजे प्रतिकात्मक रुपाने आपण पण क्रुसावरुन खाली उतरविले जातो. त्याच्यासोबत पाण्याचा कब्रमध्ये गाडले जातो आणि पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावांनी आपले पुनरुत्थान (नवीन जीवन) होते. नवा करारामध्ये बाप्तीस्मासाठी इब्रानी शब्द हा ज्याचा अर्थ डुबकी म्हणजे त्याची गहराईमध्ये जाणे. जेव्हा कुणी डुबकी घेतो आणि पाण्याच्या गहराईमध्ये जातो, तेव्हा हे त्याच्या गाडले जाण्याचे आणि बाहेर येण्याचे प्रतिक म्हणजे बाप्तीस्मा होय.७

**खान्देशात ख्रिस्ती मिशनऱ्यांचे शिक्षण आणि समाज प्रबोधनाचे कार्य :-**

पश्चिम खान्देशातील मिशनऱ्यांनी शैक्षणिक आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून धर्म प्रसाराचे कार्य सुरु केले. मिशनऱ्यांचा आदिवासींमध्ये कार्य करण्याचा मुख्य हेतु म्हणजे धर्मांतर नव्हे तर देवाने दिलेला महान संदेश होता. गरीब, गरजु, गुलाम, खालच्या वर्गातील दलित व पिडीत यांना वर आणणे आणि सेवा-सुश्रूषा करणे हा मिशनऱ्यांचा मुख्य उद्देश होता. उदाहरणार्थ म्हणता येईल, देव म्हणतो इस्त्रायली ज्यांना मिस्त्री लोकांनी गुलाम करुन ठेवले आहे, त्यांचा आवाज मी ऐकला आहे, मी त्यांना त्यांच्या गुलामगिरीतून सोडविल आणि महान कार्य करुन मी तुम्हाला सोडविन.८ देवाने प्रेषित मोसेला पाचारण केले आणि त्याच्या माध्यमातून यहुदी जे मिश्र देशात गुलाम होते त्यांची सुटका केली. त्यांची गुलामगिरीतून सुटका करण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे दु:खी आणि पिडीत जिवन. म्हणुन मिशनरी लोक आदिवासी आणि दलित-पिडीत लोकांकडे वळून त्यांची शुध्द अंत:करणाने सेवा करतात.

**मिशनऱ्यांची खान्देशातील शैक्षणिक कार्याची सुरुवात :-**

१८५२ मध्ये मालेगावाबरोबर धुळे येथे मिशनऱ्यांनी इंग्रजी शाळा सुरु केली. ख्रिस्ती धर्माची तत्वे, इंग्रजी व्याकरण, इतिहास, भुगोल, गणित, रसायन या विषयाचा अभ्यास विद्यार्थ्यांना शिकविला जात होता.९ आणि धुळे जिल्ह्यात मिशनऱ्यांनी इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली. धुळे जिल्ह्यात चर्च मिशनरी सोसायटी व स्विडीश अलायन्स मिशनच्या शाखा स्थापन होवून त्यांच्यावतीने शाळा व वस्तीगृहे सुरु

ISSN : 2348-7143
Dec. 2018

करण्यात आली. उत्तर अमेरिका, स्कल्डेनव्हियन अलायन्स मिशनने खान्देशात जवळजवळ ४० मिशनरी शाळा चालविलेल्या दिसतात. रविवारच्या दिवशी देखील शाळा चालविल्या जात.१० या ४० शाळांमुळे गरीब आदिवासी मुला-मुलींमध्ये शिक्षणाचा प्रसार होऊ लागला आणि आदिवसींना अज्ञानतेच्या बाहेर पडून मिशनऱ्यांनी त्यांच्यावर शिक्षणाचा आणि ज्ञानाचा प्रकाश टाकला आणि पश्चिम खान्देशात मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्म रुजविण्याचा प्रयत्न केला नाही पण धर्म प्रसाराच्या माध्यमातुन सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला.

धुळ्यातील ख्रिश्चन मुख्यत: पोर्तुगीज सेवक असून त्यातील चार-पाच धर्मांतरीत प्रोस्टेस्टंट होते. शिवाय धुळे येथे एक लहानसे रोमन कॅथालिक चॅपेल बांधण्यात आले होते.११ आज ख्रिस्ती मंडळ्यांची स्थिती उलटी आहे. आज प्रोटेस्टंट संस्था जास्त आहे आणि कॅथालिक संस्था कमी आहेत.

ख्रिश्चन मिशनरी हे सुरुवातीच्या काळात खान्देशात बैलगाडीने प्रवास करीत होते. विसाव्या शतकात मिशनऱ्यांनी धर्म प्रचाराच्या कार्याला जोरदार सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात फारसा प्रतिसाद मिळत नसला तरी अतोनात कष्टांना सहन करुन अनेक मिशनऱ्यांनी आपले कार्य चॅपेल, बेबीहोम, चर्चेस, शाळा, वस्तीगृह, दवाखाने, गरजू व असहाय्य लोकांना मदत करणे या माध्यमातून सेवाकार्य सुरुच ठेवले. धुळे शहराच्या स्कुल बोर्डाचा (१९२८ ते १९२९) च्या शैक्षणिक वर्षाच्या अहवालात जातवारीप्रमाणे नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक प्रगतीत येथील मेथोडीक्स प्रोटेस्टंट मिशनने केलेल्या सात शैक्षणिक कामगिरींचा विशेष दृष्टीने उल्लेख करण्यात येवून शिक्षण प्रसारास धुळ्याला ख्रिश्चन जातीचा नंबर पहीला असल्याचे नमूद केले आहे. अशा प्रकारे शैक्षणिक गुणवत्ता या मिशनरी संस्थांमार्फत पश्चिम खान्देशात हळूहळू जोर धरु लागल्या होत्या.१२

**ख्रिस्ती मिशनरींचे खान्देशातील समाज प्रबोधनाचे कार्य :-**

धुळे येथे स्टॅन्डेनव्हियन अमेरिका मिशन, मेथॉडीस्ट चर्च इन इंडीया, स्वीडीश मिशन या संस्थांमधील मिशनऱ्यांनी धुळे येथे दवाखाना, शाळा, मुलामुलींची वस्तीगृहे इत्यादी चालविली. मुलींसाठी सुरु करण्यात आलेली शाळा पुढे नगरपार्लमेंटने ताब्यात घेतली. (हल्लीची शाळा नं. १४) तसेच हरणमाळ ही ख्रिश्चन मिशनऱ्यांनी वसविलेली धुळ्यापेक्षाही आधीची वसाहत होय. तसेच मोराणे, कुंडाणे, रावेर, हरणमाळ येथून मिशनऱ्यांनी आपले सेवाकार्य चालविले आणि खान्देशातील समाज प्रबोधनाला हातभार लावला. या चर्चेसच्या शाखा नवापूर, नंदूरबार, चिंचपाडा इ. भागात सुरु होऊन आदिवासींना आरोग्य शिक्षण, वस्तीगृह, शाळा या सोयी उपलब्ध करुन देण्यात मिशनऱ्यांचा मौल्यवान वाटा आपल्याला नाकारता येत नाही.

१९०५ मध्ये डाल्टग्रीन नावाचा मिशनरी नंदूरबारजवळील धानोरा, नंदुरबार, साक्री, नवापूर या भागात सेवा कार्यासाठी येऊन भिल्ल, मावची या सारख्या लोकांसाठी खेडोपाडी फिरुन ख्रिस्तांचा संदेश देत होता. त्यांनी आदिवासी मुला-मुलींसाठी वसतीगृहे व शाळा सुरु केल्या.१३ अशा सेवाभावी वृत्तीने डाल्डग्रीन याने पश्चिम खान्देशात सेवाकार्य सुरु केले. डाल्डग्रीन याने नंदुरबार येथील दुर्गम भागात धर्मप्रसाराच्या माध्यमातून शिक्षणाची आणि समाज प्रबोधनाची पताका रोवली. जी आधुनिक नंदुरबार जिल्ह्याच्या जडणघडणीला कारणीभूत ठरली.

तसेच खान्देशात ह.भ.प. विश्राम पाटील यांनी किर्तनातून मिशनऱ्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी हिंदूंनो मिशनऱ्यांचे अनुकरन तुम्ही करणार काय ? हिंदु समाजाकरीता अनाथालये, रुग्णालये, अर्थकालये, शाळा, वस्तीगृहे इ. काढावयास नकोत काय ? असे ते जाहीरपणे आवाहन करीत होते.१४ मिशनरी कार्याच्या सेवाभावी कष्टांना विश्राम पाटील यांनी किर्तनाच्या माध्यमातून वाचा फोडली आणि लोक मिशनरी लोकांना सहाय्य करु लागली.

पश्चिम खान्देशात दुष्काळाच्या वेळी हलाखीची परिस्थिती होती. त्यात ख्रिश्चन मिशनरी यांनी स्थालिक लोकांना मदत करायला सुरुवात केली. अन्नधान्य, औषधे, वैद्यकीय सुविधा या रुपाने मिशनरींनी गरजू लोकांना सहकार्य केले. या दुष्काळी परिस्थितीत ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रचाराचे कार्य वाढविले. १८८१ मध्ये दुष्काळातील लोकांचा फायदा उचलुन ख्रिस्ती मिशनरींनी ३५१ हिंदुंचे तर १८९१ मध्ये ६४२ हिंदुंचे धर्मांतर घडवून आणण्याची माहिती मिळते.१५ या दुष्काळाच्या परिस्थितीत मिशनऱ्यांनी मोठ्या प्रमाणात धर्मप्रसार करुन पश्चिम खान्देशात ख्रिश्चन धर्म रुजविण्याचा पुरेपुर प्रयत्न केलेला दिसून येतो. पण हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, या मिशनरी लोकांनी धर्मांतरासाठी सेवा केली नाही तर सेवेच्या माध्यमातून त्यांनी जात-पात न पाहता स्वत:ला लोकांच्या सेवेसाठी वाहुन घेतले आणि पुढे अनेक समाजातील लोकांनी स्वनिर्णयाने धर्मांतरासाठी स्वत:ला तयार केले.

सध्याच्या परिस्थितीत नंदूरबार जवळील धानोरा येथे ईसाई नगर हे ख्रिश्चन समाजाची मोठी वसाहत आहे. तसेच नंदुरबार येथे बेथेल कॉलनी ख्रिश्चन मिशनऱ्यांची वसाहत आहे. तसेच चिंचपाडा येथे १९४२ ला ख्रिश्चन मिशनऱ्यांनी गरीब, दलित आणि आदिवासींसाठी हॉस्पिटलची स्थापना केली. जे कार्य आजतागायत निरंतर सुरु आहे. तसेच आज खान्देशात पवित्र शास्त्राचे शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र बायबल कॉलेज, बोदवड तसेच बायबल कॉलेज, वाकीपाडा, ता.नवापूर या अस्तित्त्वात आहेत. अशा प्रकारे मिशनऱ्यांनी खान्देशात शैक्षणिक आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून ख्रिश्चन धर्मप्रचार घडवून आणला.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**निष्कर्ष :–**

अशा प्रकारे खान्देशात भिल्ल, मावची समाजाबरोबरच अनेक जाती–धर्माच्या लोकांत ख्रिश्चन धर्मात प्रवेश व्हावा, यासाठी प्रलोभने दाखविली जातात. अशा तऱ्हेच्या काही मोजक्या लोकांच्या तक्रारी असल्या तरी भिल्ल, आदिवासी किंवा इतर समाज आपल्या पोटासाठी ख्रिश्चन धर्म स्विकारण्यास तयार होता. असा अनुभव आदिवासी भागात कार्य करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांचा होता, हा निष्कर्ष चुकीचा ठरतो. कारण धर्मांतरीत लोकांच्या परिस्थितीत आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक परिवर्तन झालेले दिसून येते. तसेच मिशनऱ्यांची सेवावृत्ती गरजू व असहाय्य लोकांना मदत करणे या कामातून त्यांनी आजतागायत आपले कार्य सुरु ठेवल्याचे दिसून येते आणि दलित–पिडीत लोकांना शैक्षणिक, सामाजिक सुधारणांची गुरुकिल्ली या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी दिली, असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ सूची :**

१) पवित्र बायबल, मार्क ३:१६.
२) इतिहास लेखन पध्दती, डॉ.बी.एन.सरदेसाई, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २००५, पृ. क्र. १४६.
३) उपरोक्त, पृ. क्र. १०७.
४) पवित्र बायबल, मत्यय ४:१७.
५) पवित्र बायबल, मत्यय २८ : १९ ते २०.
६) अधिकार प्राप्तीचे ४८ सुत्रे, सत्ता, रॉबर्ट ग्रीन, ज्युस्ट एल्फर्स प्रकाशित, नववी आवृत्ती, पृ.क्र. १८१, १८२, १८३.
७) बायबल की चौबीस मुलभूत शिक्षाए, समुएल सिंह, श्याम प्रकाशन, नागपूर, २००४, पृ.क्र. ११५.
८) पवित्र बायबल, निर्गमन ६:६.
९) शिरसगावकर शरावती, महाराष्ट्रातील चर्च मिशनरी सोसायटी कार्य, १८१९ ते १८८५, भारतीय इतिहास आणि संस्कृती, वर्ष ५, अंक १८, जुलै १९६८, पृ.क्र. ५९.
१०) खान्देशातील समाज प्रबोधनाची चळवळ, डॉ.भी.ना.पाटील, प्रकाशक : भु.बी.पाटील, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. ३१९.
११) Gazetter of Bombay Presidency, Vol. XII, P. 129.
१२) साप्ताहिक विजयी मराठा, ३१ मार्च १९३०, पृ.क्र. ५.
१३) खान्देशातील समाज प्रबोधनाची चळवळ, डॉ.भी.ना.पाटील, प्रकाशक : भु.बी.पाटील, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. ३२०.
१४) उपरोक्त, पृ. क्र. ३२१.
१५) Nineteenth Century History of Maharashtra, Sunthankar B.R., Vol.I, P. No. 124.

‘RESEARCH JOURNEY’ *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात धुळे जिह्यातील स्त्रीयांचे योगदान

**प्रा. अमृत निंबा वळवी**
इतिहास विभाग, गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नगांव, ता.जि. धुळे.

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास म्हणजे एक रोमांचकारी इतिहास आहे. ब्रिटिश शासनाच्या प्रदीर्घ गुलामगिरी सत्तेला झुगारुन १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देशाने मुक्त श्वास अनुभवला. मात्र त्यासाठी कित्येक स्वातंत्र्य सैनिकांना आपले रक्त सांडावे लागले. अनेकांना तुरुंगात व फासावर जावे लागले. लाखो स्त्री–पुरुषांनी जीवाची पर्वा न करता या स्वातंत्र्य संग्रामात झोकून दिल्यामुळे स्वातंत्र्य मिळणे शक्य झाले. मात्र स्वातंत्र्य आंदोलनातील स्त्रियांच्या सहभागाबद्दल इतिहास फारच अल्प आणि ओझरता संदर्भ आलेला दिसतो. स्वातंत्र्य आंदोलनातील स्त्रीयांच्या सहभागाविषयीचा ऐतिहासिक वृत्तांत अनेक कारणांमुळे अपुरा व असमाधानकारक वाटतो. सशस्त्र व नि:शस्त्र स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणाऱ्या स्त्रियांविषयी संपूर्ण व पध्दतशीर अभ्यास करण्याची गरज आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत धुळे जिल्ह्यातील स्त्रीयांचे योगदान फार मोठे आहे. स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी झटलेल्या स्त्रीयांचा इतिहास समाजाला ज्ञात व्हावा या हेतूने प्रस्तुत शोध निबंध लिहीण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्देश**

१) भारतीय स्वातंत्र्य लढ्यात खानेदशातील स्त्रीयांचा योगदानाचा अभ्यास करणे.
२) स्वातंत्र्य लढ्यातील खानदेशातील स्त्रीयांचे कार्य समाजासमोर आणणे.

**गृहितके**

१) भारतीय स्वातंत्र्य लढ्यात खानदेशातील स्त्रीयांचे योगदान दिसून येते.
२) स्वातंत्र्य चळवळीत खानदेशातील स्त्रीयांचे कार्य मोठे आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असून या विषयाशी निगडीत शोधनिबंधातील विवेचन दुय्यम स्त्रोतांवर अवलंबून आहे. यासाठी संदर्भग्रंथ, स्वतांत्र्य सैनिक चरित्रकोश, वर्तमानपत्रातील लेख, मासिके यांचा आधार घेतला आहे.

**१८५७ च्या उठावात धुळे जिल्ह्यातील स्त्रीयांचे योगदान**

इ. स. १७५७ मध्ये ब्रिटीशांनी भारतात आपल्या राजकीय सत्तेचा पाया रोवला. व्यापारी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी हळूहळू भारतात सर्वत्र राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न सुरु केला. या दरम्यान त्यांनी मोठ्या प्रमाणावर भारतीय जनतेवर अन्याय अत्याचार केला. परिणामी ब्रिटिशांविरुध्द भारतीयंमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. त्यातूनच पुढे इ. स. १८५७ मध्ये ब्रिटिशांविरुध्द ठिकठिकाणी भारतीयांनी उठाव केला या १८५७ च्या उठावात खानदेशातील भिल्ल स्त्रीयांचे योगदान ही आपणास दिसून येते. खानदेशामध्ये या काळात भिल्लांचा नायक काजीसिंग नाईक व भीमा नाईक यांनी ब्रिटिशानविरुध्द उठाव केलेला आपणांस दिसून येतो. भिल्लांचा उठाव दडवून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी मेजर ईव्हान्स आणि कॅ. लॉगस्टन यांना खानदेशामध्ये पाठविण्यात आले. तेंव्हा काजीसिंग नाईक यांनी आपले भिल्ल सहकारी अंबापाणी येथे एकत्र आणले. त्यांना कालुबाबा आणि दौलतसिंग हे भिल्ल क्रांतिकारकांना येऊन मिळाले. ११ एप्रील १८५८ रोजी अंबापाणी येथे भिल्ल क्रांतिकारक आणि ब्रिटिश यांच्यात युध्द झाले. या लढाईत भिल्लांचा पराभव झाला. अंबापाणीच्या युध्दात सापडलेल्या भिल्लांवर ड्रम ट्रायल होऊन ५७ भिल्लांना ठार करण्यात आल्याचे आढळते.

**भिल्ल स्त्रियांना अटक**

अंबापाणीच्या युध्दात भिल्ल क्रांतीकारकांना भिल्ल स्त्रियाही मोठ्या प्रमाणात मदत करतांना दिसतात. त्यामुळे ब्रिटिशांना भिल्ल पुरुषाइतक्याच भिल्ल स्त्रियाही धोकादायक वाटत होत्या. अंबापाणीच्या युध्दात अशा ४०० भिल्ल स्त्रियांना पकडण्यात आले व जोपर्यंत भिल्ल नायक शरण येत नाही तोपर्यंत ह्या स्त्रियांना सोडू नये, असा आदेश ब्रिटिश सरकारने आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना दिल्याचे आढळते. असा आदेश देण्याचे कारण आपणास मुंबई इलाखाच्या गुप्त पोलिस पत्रकात आढळते. हे पत्र १ जून १८५८ चे आहे. या पत्रात भिल्ल स्त्रियांबाबत म्हटले आहे की, भिल्ल पुरुष जितके उपद्रवी व सतावून सोडत आहेत. आमच्या बातम्या काढून त्या आपल्या पुरुषांना कळविणे, पुरुषांसाठी भोजन तयार करणे, प्रसंगी लढाई करणे, ही सर्व कामे त्या स्त्रिया करतात. म्हणून त्यांनाही पकडून तुरूंगात डांबुन ठेवले पाहिजे. या स्त्रियांना केवळ तुरुंगातच डांबले नाही तर त्या वेळच्या फौजदाराने काही भिल्ल स्त्रियांवर अत्यंत क्रूर व पाशवी अत्याचार केल्याची हकीकत खानदेशचा मॅजिस्ट्रेट

मेन्सफिल्ड याने पोलिस कमिशनरला कळविल्याची नोंद सापडते.

**सविनय कायदे भंग चळवळीत धुळे जिल्ह्यातील स्त्रीयांचे योगदान**

इ. स. १९३० मध्ये महात्मा गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. महात्मा गांधीजींनी आपल्या निवडक ७९ अनुषायांसह साबरमतीहून दांडीकडे प्रयाण केले. जोपर्यंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार नाही तोपर्यंत मी या आश्रमात पुन्हा परतणार नाही, अशी धीर गंभीर प्रतिज्ञा करुन महात्मा गांधीजींच्या दांडी यात्रेस प्रारंभ झाला. या दांडी यात्रेच्या लाटा खानेदशच्या भूमीवर येवून आदळू लागल्या. सविनय कायदेभंगा च्या चळवळीत खानदेशातील स्त्रीयांचाही मोठा सहभाग असल्याचे आपणास आढळते देशभक्त अष्टपुत्रे, कमलाबाई, जोशी, कमलाबाई शंकर, ठकार पार्वतीबाई, पाटील नादरबाई कौतिक, पाटील शारदाबाई पुंडलिक, पोतदार गंगादेवी रामेश्वर, बुवा सिताबाई रामचंद्र, मदाने रमाबाई गोपाळ, मुधोळकर सरलाबाई वासुदेव, व इतर स्त्रियांनीही सविनय कायदेभंग चळवळीत सभा – मिरवणुकीत, मीठ, जंगल सत्याग्रह यात मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन ब्रिटिश सरकारला प्रखर विरोध केल्याचे दिसून येते. स्त्रियांचा उत्स्फूर्त सहभाग हे या चळवळीचे विशेष होय.

**घ्चले जावङ आंदोलनात धुळे जिल्ह्यातील स्त्रीयांचे योगदान**

७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे झालेल्या कॉग्रेसच्या महासमितीने चलेजाव चळवळीचा ठराव मंजूर करण्यात आला. महात्मा गांधीजींनी आपल्या अनुयांयांना घ्करेंगे या मरेंगेङ हा संदेश दिला. या चलेजाव चळवळीत धुळे जिल्ह्यातील स्त्रीयांचा सहभाग ही फार मोठा असल्याचे आढळते.

अष्टपुत्रे, कमलाबाई (तालुका व जिल्हा धुळे) : १९४२ साली महात्मा गांधीजींनी पुकारलेल्या चलेजावच्या आंदोलनात भूमिगत चळवळीच्या कार्यात भाग घेतला त्याबद्दल अकरा महिने स्थानबध्द होत्या.

गोसावी, मनुबाई राजगीर, गोसावी, शेवंताबाई गोरखगीर, गोसावी, सीताबाई कैलासगीर मूळगांव डांगुर्णे : (तालुका शिंदखेडा जिल्हा धुळे) या देशभक्त स्त्रीयांनी १९४२ सालच्या चलेजावच्या चळवळीत भूमिगत आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना सहाय्य व आश्रय दिला त्याबद्दल चार दिवस पोलिसांनी तपासात घेतले होते.

गोसावी, राधाबाई मगनगीर मूळगाव कापडणे (तालुका व जिल्हा धुळे) १९४२ सालच्या चलेजावच्या चळवळीत भूमिगत राहून ब्रिटिश सत्तेला त्रास देण्याचा प्रयत्न केला.

जोग विमलाबाई नारायण : जन्मगाव धुळे (तालुका व जिल्हा धुळे) १९४२ साली अंडर-ग्राऊंड कार्यकर्त्यांना जेवण दिले व त्यांची इतर कामे केली, आंदोलनात डिक्टेटर म्हणून निवड झाली होती.

पवार, जनाबाई जागो, मूळगांव विटाई (तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे), पाटील सुंदराबाई विनायक : मूळगांव कापडणे (तालुका व जिल्हा धुळे), १९४२ सालच्या चलेजावच्या चळवळीत भूमिगत आंदोलनाचे कार्यकर्त्यांना सहाय्य व आश्रय दिला, त्यांनी खादी ग्रामोद्योगाचे विधायक कार्यात भाग घेतला होता.

बुवा, सिताबाई रामचंद्र : मूळगांव शिंदखेडा (तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे), रोकडे, हंसाबाई रुपला : मूळगांव धुळे (तालुका व जिल्हा धुळे) १९४२ सालच्या चलेजाव च्या चळवळीत भूमिगत आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना सहाय्य व आश्रय दिला, गुप्त वाङ्‌मयाचा प्रसार केला.

शिंपी, सुंदराबाई नानाजी : मूळगांव दोंडाईचा (तालुका शिंदखेडा जिल्हा धुळे) १९४२ सालच्या चलेजाव च्या चळवळीत सभा, मिरवणूकीत भाग घेतला, त्याबद्दल चार महिने साधी कैद झाली.

**निष्कर्ष :–**

ब्रिटिश राजवट उलथवून टाकण्यासाठी आपले सर्वस्वपणाला लावणारे भारतीय क्रांतीकारक हा भारताचा एक गौखसाली व प्रेरणादायी इतिहास आहे. सशस्त्र प्रतिकाराने ब्रिटिश राजवट नामशेष करण्याचे प्रयत्न शंभर वर्षापेक्षाही आधीपासून सुरु होते. या क्रांतीकारी सशस्त्र आंदोलनात स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत धुळे जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग असल्याचे दिसून येते. कांतिकारी आंदोलनात अनेक स्त्रियांनी प्रत्यक्ष व त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक स्त्रियांनी अप्रत्यक्ष सहभाग घेतला. स्वातंत्र्य आंदोलनातील महिलांच्या सहभागाविषयीचा ऐतिहासिक वृत्तांत अनेक कारणांमुळे अपुरा व असमाधानकारक वाटतो. सशस्त्र व नि:शस्त्र स्वातंत्र्यलढ्यात भाग घेणाऱ्या स्त्रियांविषयी संपूर्ण व पध्दतशीर अभ्यास करण्याची गरज आहे.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची**

१) डॉ. कुंटे भ. ग. – स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य पश्चिम महाराष्ट्र खंड–१ (अहमदनगर, धुळे, जळगांव, नाशिक) प्रकाशक : कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई–१९७९.
२) शहासने, चंद्रकांत – देशभक्त कोश प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे दुसरी आवृत्ती : २ ऑक्टोबर २०१२
३) डॉ. पाटील वा. भा. – संशोधन पध्दती प्रकाशक : प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव प्रथमावृत्ती–२००६
४) मोदी, नवाझ ब. (संपादक), फडके वासंती (अनुवाद) भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया, प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी, २००३.
५) डॉ. गारे, गोविंद – स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी क्रांतिकारक, प्रकाशक : श्रीविद्या प्रकाशन पुणे. ९ ऑगस्ट २००४.
६) डॉ. जगताप पी. डी. (संपादक) – खानेदश इतिहास, प्रकाशक : प्राचार्य डॉ. के. आर. सोनवणे, ज. जि. मराठा विद्याप्रसारक सहकारी समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगांव, प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट १९९७.
७) आचार्य, जावडेकर शं. द. – आधुनिक भारत प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे आवृत्ती पाचवी १९९४.
८) प्रा. निकम गौतम – क्रांतिकारी आदिवासी जननायक, प्रकाशक : विमलर्कीर्ती, प्रकाशन, चाळीसगांव प्रथम आवृत्ती–२०१०
९) डॉ. शहा, जी. बी. – धुळे व नंदुरबार जिल्ह्याचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान प्रकाशक प्रथमेश प्रकाशन, धुळे – २००४.
१०) खोबरेकर वि. गो. – इंग्रजी सत्तेविरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव – १८१८–१८६०. प्रकाशक : पॉप्युलर बुक डेपो, मुंबई – १९५९.
११) वाळिंबे वि. स. – सत्तावन्न ते सत्तेचाळीस (स्वातंत्र्य लढ्याची संस्मरणीय कहाणी) प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे – १९९८.
१२) Jaiswal Pradip - Research Methodology in History, Omega Publications New Delhi-First Published-2008
१३) डॉ. शहा, मुं. ब. – खानदेशचा सांस्कृतिक इतिहास, खंड १ ते ४, प्रकाशक : का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे – २००४.
१४) डॉ. शहा, जी. बी. खानदेश : सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय इतिहास प्रकाशक : सुमेरु प्रकाशन डोंबिवली, प्रथमावृत्ती–२०१०.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# अंबापाणीची लढाई

**डॉ. अरूण धोंडू वळवी**
संरक्षणशास्त्र विभाग,
ए.सी.एस. कॉलेज, धरणगाव.

खान्देशातील भिल्ल आदिवासी आंदोलकांचा वाढता उपद्रव पाहूनब्रिटिशांनी नरमाईचे धोरण स्वीकारले. खान्देशात भीमसिंग नाईक, काजीसिंग नाईक,मोवासिया नाईकहे आदिवासी भिल्ल आंदोलकांनी सेंधवा घाट आणि परिसरात धुमाकूळ घातला होता. भिल्ल आदिवासी आंदोलकांच्या या वारंवार होणाऱ्या अचानक छापामार हल्ल्यास तोंड देण्यापेक्षासामोपचाराने बोलणी करुन भिल्ल आदिवासी आंदोलकांच्या कारवाया थांबविण्यासाठी मेजर इव्हान्स यांनी भिल्ल आदिवासी आंदोलकांचे नेते भीमा नाईक आणि मोवासिया नाईक यांच्याशी वाटाघाटीची बोलणी सुरु केली. परंतु ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या या बोलणीला भीमसिंग नाईक आणि मोवासिया यांनी अजिबात प्रतिसाद दिला नाही.यामुळेही बोलणी फिसकटली.

**ब्रिटिशसेनेचे आक्रमण :**

नरमाईचे धोरण स्वीकारुन सामोपचाराच्या वाटाघाटी फिसकटल्यावर मेजर इव्हान्सने भिल्ल आदिवासी आंदोलकांचा पुरता बिमोड करण्यासाठी सशस्त्र सैन्य घेऊनहल्ला करण्याचे ठरविले. त्यानुसार मेजर इव्हान्ससह कॅप्टन बर्च, सर फ्रँक, लेप्टनंट कागलान इ.ब्रिटिश अधिकाऱ्यांनी एक हजार पेक्षा जास्त सैन्यांच्या बंदोबस्तासह खान्देशातील भिल्ल आदिवासी आंदोलकांवर हल्ला करण्याचे ठरविले. खान्देशातील भिल्ल आदिवासी आंदोलकांचे नेतृत्व भीमसिंग नाईक, काजीसिंग नाईक, मोवासिकया नाईक, भागोजी नाईक पूर्व खान्देशातील अंबापाणी येथे भिल्ल आदिवासींचे संघटन करुन हल्ला करण्याच्या बेत आखत असल्याचा सुगावा लागल्यावर थेट अंबापाणीवरच चढाई करण्याचा कट आखला.

**ब्रिटिशसेनेचीसैन्यसंख्या**

सामोपचारी बोलणी फिसकटल्यावर भिल्ल आदिवासी आंदोलकांचा पुरता बिमोड करण्यासाठी मेजर इव्हान्स यांनी आपलेसाथीदार कॅप्टन बर्च, लेफ्टनंट कागलान, सर फ्रँक या अनुभवी सेना अधिकाऱ्यांची दोनतुकडयांमध्ये विभागणी केली. पहिल्या तुकडीत ४५ घोडेस्वार, २१० पायदळ, ६० बंदुकधारी, १०० भिल्ल सेनेचे पायदळ, दोन मोटारगाडी एवढा ताफाहोता.दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व कॅप्टन लॉग्स्ट्रॉन यांचेकडे सोपविण्यात आले. त्यांच्याकडे ५८ घोडदळ,२३६ पायदळ, ५८ बंदुकधारी, ७० भिल्ल सैनिक,२ मोटारगाड्या अशी दोन्ही विभाग मिळून ८४१ सैनिकांची फौजतयार करुन मेजर इव्हान्स यांनी खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांवर हल्ला करण्याचा व्यूह रचना आखली.

**खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांची संख्या :**

काजीसिंग नाईक, भागोजी नाईक, भीमसिंग नाईक, मोवासिया नाईक यांच्या नेतृत्वाखाली सुमारे दिडहजारते दोनहजार खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकहोते.त्यापैकी ४०० पेक्षा जास्त स्त्री आंदोलकांचाही सहभाग होता.

**शस्त्रास्त्रे :**

ब्रिटिश फौजेचेकडे आधुनिक शस्त्रास्त्रेहोती.बंदुका, तोफा, मोटारगाडया, घोडदळ, पायदळ इ.प्रशिक्षित शस्त्रधारीसैन्यहोते.

खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांकडे दगडगोटे, गलोल, गोफण, तीरकामठे, कुऱ्हाड, बनाटया (छोटी तलवार) इ. पारंपरिक शस्त्रास्त्रेहोती.

**युध्द योजना :**

खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांशीसामोपचाराची बोलणी सुरु ठेवून त्यांच्या गाफिलपणाचा फायदा घेऊन अचानकहल्ला करण्याची योजना आखलीहोती. परंतुहा बेत खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांच्या नेत्यांनी वेळीच ओळखल्याने ब्रिटिशसैन्य अधिकारी मेजर इव्हान्स यांचीही योजना फसली.ब्रिटिशसैन्य अधिकारी मेजर इव्हान्स यांनी खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांचा बिमोड करण्यासाठी त्यांच्या प्रमुखठाण्यांवर हल्ला करण्याची योजना आखली.त्यासाठीत्यांनी आपल्या सैन्यदळाचे दोन विभाग केले.याकामीत्यांनी कॅप्टन लँग्स्ट्रॉन, लेप्टनंट कागलान या सेनाधिकाऱ्याची नियुक्ती केली.

**लढाईची कार्यवाही:**

अंबापाणी येथे काजीसिंग नाईक, भीमसिंग नाईक, काळूबाबा, दौलतसिंग नाईक इ.खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांचे नेतेसुलतानपूर जंगलातून लपतछपत शिरपूर मार्गे एकत्र जमले.खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलक अंबापाणी येथे असल्याचा सुगावा लागल्याने मेजर इव्हान्सने ब्रिटिशसैन्याला अंबापाणी येथे गाठायचे ठरवून दि. ११ एप्रिल १८५८ रोजीहल्ला केला.

११ एप्रिल रोजीसकाळी आठ वाजता ब्रिटिश सत्तेविरुध्द उठाव करण्याचा बेत आखत असलेल्या खान्देशी भिल्ल आंदोलकांवर अचानकपणेहल्ला करुन त्यांना कोंडीत पकडले. ब्रिटिशांकडेसुसज्ज फौज असल्याने भिल्ल आदिवासी आंदोलकांकडे दगडगोटे, गलोल, गोफण, तीरकामठा यासारखी पारंपरिक शस्त्रास्त्रे असल्याने त्यांचा सहजपणेसमोरासमोर युध्द शकेय नसल्याने अंबापाणीच्या पर्वतीय जंगलात लपून बसले. तेथूनचत्यांनी युध्दाला सुरुवात केली.समोरुन ब्रिटिशसैन्य बंदुकीच्या फैरी झाडतहोते.तीरकामठा व दगडगोटयांनी भिल्ल आदिवासी आंदोलक छूप्यापध्दतीने प्रतिकार करीतहोते. डोंगरी युध्दपध्दतीने भिल्ल आदिवासी आंदोलकांनी ब्रिटिशांच्या सुसज्ज सेनेला चांगलेच जेरीस आणले.घनघोर लढाईला सुरुवात झाली.सुमारे चारसाडेचार तास धुमश्चक्री सुरु होती. या धुमश्चक्रीतसुसज्ज शस्त्रास्त्रेधारी ब्रिटिशसेनेचे भिल्ल आदिवासी आंदोलकांनी डोंगरीयुध्दपध्दतीने खूपच नुकसान केले.मेजर इव्हान्सने भिल्ल आदिवासी आंदोलकांवर कडाडूनहल्ला चढविला.यात भिल्ल आदिवासी आंदोलकांचे नेते काजीसिंग नाईक, दौलतसिंग, काळूबाबा हे निकराने लढले.ब्रिटिशसेनेलात्यांनी जरीस आणले.कॅप्टन बर्च, लेप्टनंट वेसवी हे अधिकारी या लढ्यात जखमी झाले.भिल्ल आदिवासी आंदोलकांपैकी ६५वीरांना हौतात्म्य प्राप्त झाले.१७० जखमी झाले.या लढ्यात भिल्ल आदिवासी आंदोलनातस्त्रियांचाही सहभाग होता.या लढाऊ पुरुषांच्या स्त्रियांही त्यांच्या इतक्याच लढाऊहोत्या.काजीसिंग नाईकाची पत्नी, बहिण, भीमा नाईकाची पत्नी, भाऊ त्यांची मुले अशा अनेक भिल्ल आदिवासी आंदोलकांनी स्वातंत्र्याच्या धगधगत्या यज्ञकुंडात आहुती दिली.

या धुमश्चक्रीत आपला टिकाव लागत नाही असे पाहून शिताफीने ब्रिटिशसैन्यालातुरी देत भागोजी नाईक, भीमानाईक, काजीसिंग नाईकहे निसटले.ब्रिटिश फौजेला या हल्ल्यात यश आलेतरी भिल्ल आदिवासी आंदोलकांचे नेतेहाती लागले नाहीत म्हणून त्यांच्या बायका मुलांना ओलिस ठेवले.आधुनकि शस्त्रास्त्रे आणि प्रशिक्षित ब्रिटिश फौजेच्या आक्रमणापुढे भिल्ल आदिवासी आंदोलकांचा निभाव लागला नाही. भारतीय स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांना या लढ्यातहार पत्करावी लागली.

**अंबापाणी लढाईचे सामरिक महत्व :**

अंबापाणी लढाईचे स्वरुप लूट, दरोडा वा साध्या चकमकीचे नव्हते.अंबापाणी येथे खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलक नेते एकत्र येऊन भारतीय स्वातंत्र्यासाठी एकत्रित स्वरुपात संघटीतपणे ब्रिटिश सत्तेविरुध्द एक मोठा उठाव करण्याचा कट आखण्यासाठी एकत्र आलेहोते.परंतु खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांच्या वारंवार होणाऱ्या हल्याने ब्रिटिशसेनाधिकारी त्रस्त झालेहोते. या काळात पेशवे,मोगल,निजाम यासारखे मोठमोठी भारतीय संस्थानांचा बिमोड झाल्याने भारतीय जनता निर्नायकी अवस्थेत होती. हा काळ अतिशय धामधूमीचा आणि संक्रमण अवस्थेतला होता.अशा काळात भिल्ल आदिवासींनी संघटीतपणे पारंपरिक शस्त्रास्त्रांचा वापर करीत डोंगरी युध्द पध्दतीचा प्रभावी आणि परिणामकारक अवलंब करुन ब्रिटिशसत्तेलाहादरा दिला.अंबापाणी येथे भिल्ल आदिवासी आंदोलक एकत्र येऊन मोठा उठाव करण्याच्या आधीच ब्रिटिशसेना अधिकाऱ्यांनी भिल्ल आदिवासी आंदोलकांवर आक्रमण केले. आणि ब्रिटिशांच्या बलाढय सेनेपुढे भिल्ल आदिवासी आंदोलकांनाहार पत्करावी लागली .या युध्दाचे महत्व भारतीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे.

**लढाईचे परिणाम :**

अंबापाणीच्या लढाईचे अनेक दूरगामी परिणाम झाले. सातपुडयाच्या पर्वत रांगातील जंगलात खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलकांनी स्वतंत्रपणे स्वातंत्र्य आंदोलन सुरु केलेहोते. काजीसिंग नाईक, भीमसिंग नाईक यासारखे बलाढय भिल्ल आदिवासी नेत्यांच्या नेतृत्वामुळे हे स्वातंत्र्य आंदोलन भारतभर पसरुन भारतातील इतर सर्व प्रांतात पसरुन सर्व राज्यातील लढाऊ आदिवासी एकत्र येऊन आंदोलन करतील अशी शक्यता ब्रिटिशसेना अधिकाऱ्यांना वाटल्याने त्यांनी अतिशय गंभीरपणे खान्देशी भिल्ल आदिवासी आंदोलनाचासमूळ नायनाट करण्यासाठी योजना आखून अंबापाणी येथे भिल्ल आदिवासींना कोंडीत पकडले. ब्रिटिशसत्तेची जरब व दहशत बसावी ,पुन्हा असे आंदोलन उभे राहू नये म्हणूनत्यांनी अंबापाणीच्या लढाईत पकडलेल्या ६० भिल्ल वीरांपैकी ५७ भिल्ल आदिवासी आंदोलकांना गोळया घालून निर्दयपणे, अगदी क्रूरपणे गोळया घालूनठार केले.४६० भिल्ल आदिवासी आंदोलकांना ड्रम ट्रायलने लष्करीढोल वाजवून ठार केले. २० भिल्ल आदिवासी आंदोलकांना अंदमान येथे काळया पाण्याच्या शिक्षेसाठी पाठविण्यात आले.

अंबापाणीचा लढा अनेक अर्थाने महत्वाचा आहे. या लढ्यात भिल्ल आदिवासी आंदोकांच्या खांद्याला खांदा लावून भिल्ल आदिवासी महिलांचे योगदानही महत्वाचे होते. ४०० भिल्ल आदिवासी स्त्रिया या लढ्यात जिवाची पर्वा न करता लढतहोत्या.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**तक्ता – अंबापाणीची लढाई**

| क्र. | घटक /तपशील | ब्रिटिश | भिल्ल आदिवासी |
|---|---|---|---|
| १ | सैन्य क्षमता/शक्ती | १. प्रबळ,प्रचंड,प्रशिक्षित सैनिक.<br>२. आधुनिक युध्द पध्दतीचा परिचय व सराव.<br>३. ८४१ सशस्त्रधारी प्रशिक्षित सैन्य | १. ३००० भिल्ल आदिवासी आंदोलक<br>२. पारंपरिक युध्द पध्दतीचा परिचय व सराव. |
| २ | लढाईचे स्वरुप/पध्दती | सुसज्य व आधुनिक शस्त्रास्त्रांनी प्रतिकार. | छापामार पध्दतीने हल्ला. |
| ३ | युध्दतंत्र | आधुनिक युध्दतंत्र | डोंगरी युध्दतंत्र |
| ४ | लढाईतील शस्त्रास्त्रे | बंदुका,तलवारी,भाले,बरचे इ. | दगडगोटे,गलोल,गोफण,तीरकामठा इ. पारंपरिक शस्त्रास्त्रे. |
| ५ | लढाईचे परिणाम | १. भिल्ल आदिवासी आंदोलकांची जरब बसली.<br>२. सेंधवा घाटासारखे दुर्गम घाट धोक्याचे ठरले.<br>३. ब्रिटिशसत्तेच्या सैन्य शक्तीची क्षमता उघडकीस आली. | १. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाची कक्षा वृंदावली.<br>२. भारतीय स्वातंत्र्य आंदोलकांचे मनोबल वाढले.<br>३. स्वातंत्र्य आंदोलकांना प्रचंड लूट मिळाली.<br>४. स्वातंत्र्य आंदोलकांची ब्रिटिश सत्तेवर जरब बसली.<br>५. भिल्ल आदिवासी आंदोलनात सर्वसामान्य जनताही सहभागी झाली.<br>६. भिल्ल आदिवासी आंदोलकसंघटीतहोऊ लागले.<br>७. भिल्ल आदिवासी आंदोलकांची पारंपरिक छापेमार युध्दपध्दत यशस्वी ठरली. |

*संदर्भ : सोर्स मटेरियर फॉर हिस्ट्री ऑफ द फ्रिडम मोव्हमेंट इन इंडीया, पृ.३०७,३०८.*

**संदर्भ सूची :**

1. KayandeShyam, Popular Resistance to British Rule in North Maharashtra, Jalgaon, 1998. P.85.
2. Secret and Political Department Diary 1818, 447, P. 327.
3. Graham D.C. A Brief Historical Sketech of the Bheel tribes inhabiting the province of Khanesh, Selection from the Record of Bombay Govt. New Series No.SSVI-1858, P.204.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# जळगांव जिल्ह्यातील भिल्ल जमातीचे सामाजिक सांस्कृतिक आर्थिक परिवर्तनाचे अभ्यास

**सहा.प्रा. विनोद शालीक नाईक**
अर्थशास्त्र विभाग,
कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा.

**प्रस्तावना :-**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात विविध जाती, धर्म पंथ, विविध उपजाती मिळून-मिसळून आपले जीवन जगतांना दिसुन येतात सामाजीक, सांस्कृतिक व आर्थिक परिवर्तनाच्या काळात मात्र या विविध जातीचे समानतेनुसार विकास झालेले दिसुन येत नाही. काही जमाती मुख्य समाज प्रावाहपासुन बाहेर झालेल्या दिसून येतात. यापैकी आदिवासी भिल्ल जमात ही मुख्य व मोठ्या प्रमाणात असलेली जमात होय. भिल्ल जमात पूर्वीपासूनच एक वंचित व आत्मकेंद्रि जमात म्हणून ओळखली जाते.

भारतात ही जमात राजस्थान मध्यप्रदेश, गुजरात तसेच महाराष्ट्रात देखील धुळे, नंदूरबार, जळगांव, सातपुड्याच्या पायथ्याशी ही जमात वास्तव्याला आहे. भिल्ल जमात भारतभर विखुरलेली असली तरी संस्कृती बोलीभाषा, चालीरिती, परंपरा, नृत्य, संगीत, याबाबतीत बरेच साम्य आहे.

जळगांव जिल्ह्यातील भिल्ल जमातीचा विचार केल्यास प्रत्येक गावाबाहेर किंवा गावालगत ह्या समाजाची वस्ती आहे. त्या वस्तीला भिलाटी असे म्हणतात. प्राचीन काळापासुन तर आजपर्यंत या भिल्ल जमातीच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा विचार केल्यास इतर प्रगत समाज व्यवस्थेपेक्षा खूपच मागासलेले आहेत. अतिशय गरिबीत, हालाकीचे जीवन जगत आहेत. राहण्यासाठी चांगली झोपडी नाही, रोजगार नाही, शिक्षण नाही, आरोग्य निकृष्ट आहे, बहुतेक कुटूंबे आपला गाव सोडून बाहेर राज्यात ऊसतोड कामासाठी, विट कामासाठी, डांबर कामासाठी गेल्याचे दिसुन येतात.

संशोधक या शोध निबंधात जळगांव जिल्ह्यातील भिल्ल समाज इतर समाज व्यवस्थेपेक्षा का मागासलेली आहे. याचे थोडक्यात अध्ययन करण्याचे प्रयत्न केलेले आहे.

**उद्देश :-**

१) भिल्ल जमातीचे सामाजिक अध्ययन करणे.
२) भिल्ल समाजाच्या आर्थिक मागासलेपणाचा अध्ययन करणे.
३) भिल्ल जामातीचे सांस्कृतिक परिवर्तन अभ्यासणे
४) भिल्ल जमातीचे राहणीमान अभ्यासणे

**गृहितकृत्ये :-**

१) भिल्ल जमातीत सामाजीक बदल घडूण येत आहे.
२) भिल्ल जमात आर्थिकदृष्ट्या मागासलेली आहे.
३) भिल्ल समाजाचे राहणीमान निकृष्ट आहे.
४) भिल्ल जमातीत सांस्कृतिक परिवर्तन होत आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधात संशोधक प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचे वापर केलेला आहे.

**विषय विश्लेषण :-**

**अ) भिल्ल जमातीतील सामाजिक परिवर्तन :-**

जळगांव जिल्ह्यातील भिल्ल जमात पूर्वी गावाबाहेर नदी-नाल्यात डोंगर दऱ्यांत, टेकटीवर आपले वास्तव्य करिते होते त्यामुळे इतर समाजापासुन लांब राहिले. या प्रगत समाज व्यवस्थेपेक्षा भिल्ल समाजाची संस्कृती, चालीरिती, बोलीभाषा जीवन जगण्याची पद्धत यात भिन्नता आहे भिल्ल समाज एक उपेक्षीत असल्यामुळे त्यांना लांब ठेवले जात असे. त्यांच्याकडून नंतरच्या काळात शेतात राखणदारी, गडी, पहारेकरी, सालदार या स्वरुपाचे काम देऊ लागले.

कालांतराने भिल्ल जमात गावाबाहेर किंवा गावालगत वस्तीकरुन राहु लागले. तरी देखील या समाजाचे सामाजिक परिवर्तन झालेले नाही. या जमातीत आजही अंधश्रेद्धा, भूतबाधा, भानामती, करणे, चेटूक याबाबत चुकीचे समज आहे इतर समाज व्यवस्येमध्ये भिल्ल लोक सहज सामील होत नाहीत. किवा त्यांचा लाजाडू स्वभाव असल्यामुळे ते अलिप्त राहणे पसंत करतात. भिल्ल समाज आजही विकसीत समाज

व्यवस्थेपेक्षा मागासलेले आहेत.

**ब) भिल्लांची आर्थिक परिस्थिती :-**

जळगांव जिल्ह्यातील भिल्ल समाजाचा विचार केल्यास आर्थिक मागासलेपण हे त्यांचे एक वेगळे वैशिष्ट्ये मानले जाते कारण भिल्ल जमातीला बारा बलुतेदारी मध्ये कोणत्याही. प्रकारचे काम मिळाले नाही ही जमात मासेमारी, शिकार, डिंक काढणे, मद्य गोळा करणे, उदरनिर्वाह करतांना दिसुन येतात. कालातरांने भिल्ल समाजमध्ये कामाचे स्वरुप बदलेले दिसुन येते, धरणे आटल्यामुळे मासेमारी व्यवसाय बंद पडला, जंगल कायद्याने लाकुड तोडण्याचे व शिकार करण्याचे देखील अधिकार काढूण घेतले यामुळे कुठेतरी स्वत:ला नवीन व्यवसायात गुंतवविण्याचा प्रयत्न भिल्ल समाज करित आहे. कोणतेही हक्काचे काम नाही, शासकिय योजनांची माहिती मिळत नाही, नवीन व्यवसाय सुरु करण्यास शिक्षण व भांडवल नाही. यामुळे भिल्ल समाज आज ही आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे.

**क) भिल्ल जमातीतील सांस्कतिक परिवर्तन :-**

भिल्ल समाज सण, उत्सव साजरा करत असतो त्यास नैसर्गिक घटनांचा आधार आहे. बदलत्या काळात या समाजातील बऱ्याच प्रथा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे पूर्वी विवाह ५ दिवस चालत असे त्याने बॉलगाडी किंवा पायदड नवरीच्या घरी जात असे सध्या विवाह दोन दिवसात उकतला जातो भिल्ल समाजात आजही मुलीला हुंडा म्हणून १५,०००/- रु. दिले जातात लग्न मुलाकडे असतो मात्र या प्रगत समाज व्यवस्थेचा परिणाम भिल्लाच्या संस्कृतीवर काही प्रमाणात होत आहे जसे बँड किंवा डिजे लावणे, नवर देवासाठी घोडा, जेवणात मसाले भात, बर्फी इत्यादी. जन्म प्रथेचा विचार केल्यास आज मात्र कुठेतरी दवाखान्यात प्रसुती करणे, लसीकरण करणे. यासारख्या बदलांचा स्विकार केलेला आहे. पोशाखाचा विचार केल्यास मात्र खूपच बदल झाले आहे. सध्या पांढरी टोपी, आहे. म्हणजे पँट-शेर्ट, जिन्स,टि-शर्ट, पायजमा इत्यादीचा वापर वाढलेला आहे.

सण उत्सवांमध्ये देखील हिंदू संस्कृतीचा प्रभाव वाढत चाललेला आहे.

**ड) भिल्ल समाजाची सध्यास्थिती :-**

जळगांव जिल्ह्यातील भिल्ल जमातीच्या सध्यास्थितीला विचार केल्यास आजही ही जगात खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रवाहात झालेली नाही. घरात अठरा विश्व दारिद्र्य, शिक्षण नाही, उद्योगाकडे बघण्याची दुरदृष्टी नाही, हाताला पुरेशे काम नाही, निकष्ठ राहणीमान शासकीय योजनांची पुरेशी माहिती नाही इत्यादी विविध कारणांमुळे भिल्ल समाजाची सर्वात वाईट परिस्थिती आहे. कामासाठी भटकंती यामुळे मुलांच्या शिक्षणात गळती निर्माण झालेली दिसून येते.

**निष्कर्ष :-**

१) भिल्ल समाजाने काही प्रमाणात सामाजीक बदल स्विकारले आहे.
२) आज ही भिल्ल समाज उत्पन्नाच्या साधनांच्या शोधात आहे.
३) भिल्ल समाजातील सण - उत्सवांवर इतर समाजाचे देखील प्रभाव पडत आहे.
४) भिल्ल समाज आजही शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे.

**शिफारसी :-**

१) भिल्ल समाजाला हक्काचे उत्पन्न मिळवूण देणारे साधन निर्माण व्हावे.
२) भिल्ल जमातीला शैक्षणिक वातावरणात येण्यासाठी विशेष प्रयत्न करावे.
३) भिल्ल जमातीला व्यवसाय व उद्योगात संधी द्यावी.
४) सामाजिक व संस्कृतिक परिवर्तनाबाबत जागृती

**संदर्भ सूची :**

१) डॉ.गोंविद गारे - सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासीक मागोवा - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पृष्ट. ४
२) प्रकाश जनार्धन खेत्री - विकास आणि परीवर्तनाच्या प्रक्रियेतील अंजिठा डोंगर परिसरातील भिल्ल जमात : एक समाजशास्त्राचे अभ्यास.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# यावल तालुक्यातील आदिवासींचे ब्रिटिश सत्तेविरुध्द लढे (१८५७-१८५८)

**प्रा.डॉ. दिनेश रामदास महाजन**
इतिहास विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद, जि. जळगाव.

उत्तरेत १८५७ चे स्वातंत्र्य युध्द सुरु झाले. या स्वातंत्र्य युध्दाच्या बातम्या खानदेशच्या भूमीवर येऊन धडकु लागल्या. तेव्हा खानदेशातील जनतेतही ब्रिटिशांविरुध्द रोष उफाळून आला. त्यावेळी सर्वांत प्रथम खानदेशातील भिल्लांनी ब्रिटिश सत्तेविरुध्द उठाव केलेले दिसून येतात.

काजीसिंग हा हया काळात भिलांचा नायक होता. सेंधवा ते शिरपूर हा ४० मैलाचा रस्ता त्याच्या देखरेखीखाली होता. या रस्त्यावर १८३१ ते १८५१ या काळात त्याने चोख काम करुन फारसे गुन्हे घडू दिले नाहीत. १८५१ मध्ये एका गुन्हेगाराचा कबूली जबाब घेतांना गुन्हेगाराचा मृत्यु झाला. त्याचा ठपका काजीसिंगवर ठेवून त्याला १० वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा झाली. परंतु त्याने ब्रिटीशांची इमाने इतबारे केलेली सेवा लक्षात घेऊन ५ वर्षानी त्याला कैदेतून मुक्त केले. जून १८५७ मध्ये तो पुन्हा ब्रिटीशांच्या नोकरीत सामावला गेला व त्याच्याकडे सेंधवा ते शिरपूर या मार्गावर पहारा देण्याचे काम सोपविण्यात आले.

एकदा त्याच्या हातून लहानशी चुक घडली म्हणून बॅ.बर्थ याने काजीसिंगला खूप शिव्या दिल्या. त्यामुळे काजीसिंगचा अभिमान जागृत झाला. त्याने नोकरीचा राजीनामा दिलाव आपली माणसे गोळा करुन ब्रिटीश सरकार विरोधी बंडाचा झेंडा फडकवला. त्याला यावेळी होळकरांच्या सेनेतून काढून टाकलेले अनेक सैनिक येवून मिळाले. झाशी, कोटा येथील सैनिकांनीही त्याच्या तुकडीत प्रवेश केला. त्यामुळे खानदेशामध्ये सप्टेंबर १८५७ पासून स्वातंत्र्य युध्दाचा वणवा पेटला. भीमा नाईकच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी ले.केनेडीच्या तुकडयावर हल्ला चढवला आणि त्याला ताकीद दिली की, तुम्ही ब्रिटीश सरकारशी एकनिष्ठ आहात हे योग्य नाही. तुम्ही आम्हाला येऊन मिळा अन्यथा त्याचे वाईट परिणाम होतील. मी तुम्हाला ही आज्ञा दिल्लीच्या बादशहाच्या वतीने देत आहे. भीमा नाईक हा स्वत:ला हयावेळी खानदेशमध्ये दिल्लीच्या बादशहाचा प्रतिनिधी समजत असे.

२९ ऑक्टोंबर १८५७ च्या रात्री शिरपूर शहरावर भीमा नाईक व काजीसिंग यांनी संयुक्त हल्ला केला. या हल्यात १५०० भिल्लांनी भाग घेतला. कॅ.बर्थने त्यांचा पाठलाग केला. परंतु हे भिल्ल डोंगराळ प्रदेशात निघून गेल्याने त्याला हात हलवीत परत यावे लागले.

१ नोव्हेंबर १८५७ रोजी तर काजीसिंग, भीमा नाईक आदिंनी कमालच केली. खानदेशच्या कलेक्टरचा मुक्काम जेथे होता तेथून केवळ सहा मैलाच्या आतील दोन खेडी त्यांनी लुटली. या प्रसंगी धनाजी जाधव व संताजी घोरपडे या दोन मराठी वीरांची आठवण येते. त्यांनी ज्याप्रमाणे औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणले होते तसे खानदेशमधील या भिल्ल वीरांनी खानदेशच्या कलेक्टरला दणका दिला.१

**सात लाखाची लूट :-** १८५७ मध्ये काजीसिंग व भीमा नाईक हे दोन्ही भिल्ल नेते एक झाले व त्यांनी सुमारे दीड हजार भिंल्लांची पलटण उभारली. ठिकठिकाणी ठापे घालणे सुरु केले. १७ नोव्हेंबर १८५७ रोजी इंदूरकडून ब्रिटीश खजिना मुंबईकडे जाता होता. तो अनेक थैल्यात भरलेला होता. त्याच्या संरक्षणासाठी इंग्रज व चतुर्भूत हे दोन अधिकारी होते. त्यांच्या मदतीसाठी २०० ब्रिटीश सैनिक होते. त्यांच्या देखरेखीखाली हा खजिना बैलगाडीतून मुंबईकडे जात होता. तो सेंधवा घाटात येताच भीमा नाईक व काजीसिंग यांनी त्यांच्यावर छापा घातला. सुमारे ३०० भिल्लांनी जांभळी चौकीपाशी हल्ला केला. खजिन्याचे संरक्षक पळून गेले. हा खजिना एकूण सात लाख रुपयांचा होता.भिल्लांनी हा खजिना लुटून ब्रिटिशांच्या सत्तेला जबरदस्त आव्हान दिले. याघटनांचे पडसाद यावल तालुक्यात सुध्दा उमटलेले दिसून येतात.

**मेजर ईव्हान्सच वाटाघाटी :-** भिल्लंचा उपद्रव वाढत होता. त्यांनी ठिकठिकाणी ब्रिटीशांवर हल्ले करणे सुरु केले. ब्रिटीशांनीही भिल्लांना नष्ट करण्यासाठी जंग जंग पछाडले. पण तेही ब्रिटीशांना पुरुन उरले. तेव्हा मेजर ईव्हान्सने भीमा नाईक आणि मोवासिया नाईक यांना वाटाघाटीसाठी बोलाविले. ब्रिटीशांचे सामर्थ्य किती प्रचंड आहे हे त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण सारे व्यर्थ. या वाटाघाटीतून काहीच निष्पन्न झाले नाही व संघर्ष चालू राहिला.२

**अंबापाणीची लढाई :** आंबापाणी हे गाव यावल तालुक्यात असून जळगाव पासून ४५ कि.मी. अंतरावर आहे. या गावाचे छोटे छोटे चारपाडे आहेत. भिल्लांचा उपद्रव वाढत चालला होता. इंग्रज पलटणी त्यांच्या संहाराकरिता जंग जंग पछाडत होत्या. भिल्लही त्यांना पुरुन उरले होते. मेजर इव्हान्सने भीमा आणि मोवासिया नाईक यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगून वाटाघाटी करण्यास बोलविले. पण वाटाघाटी फिसकटल्या. तेव्हा मे.इव्हान्सने या भिल्लांच्या जमावावर कडाडून हल्ला चढविला. या जमावांत भिल्ल नेते काजीसिंग, दौलतसिंग व काळू बाबा हे होते. ते निकराने लढले. इंग्रज सेनेला त्यांनी पुरा मार दिला. कॅ.बर्च, ले.वेसवी हे अधिकारी जखमी झाले व एक हिंदी अधिकारीही मारला.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

भिल्ल सेनेपैकी ६५ भिल्ल मारले गेले व १७० जखमी झाले. ही लढाई अंबापाणी येथे सकाळी ११ एप्रिल १८५८ रोजी झाली.३

या लढाईत काजीसिंगचा एकुलता एक मुलगा पोलादसिंग यासह ७२ जणांना पकडले त्यापैकी ५५ जणांना ११ एप्रिल १८५८ ला संध्याकाळी सामुदायिक मृत्युदंड देऊन गोळया घालून ठार केले होते. १२ एप्रिल रोजी उरलेल्या १७ जणांना अशाच प्रकारे गोळया घालून ठार करण्यात आले. भागोजी नाईक यांचा तपास लागेपर्यंत त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्यात आले. तरी देखील सुलतानपूर, पाचोरा, यावल या भागात ठिकठिकाणी सशक्त उठावाचे सत्र वर्षभर चालुच राहिले होते. या उठावाचे नेतृत्व करणारे विशेष व्यक्ती खालीलप्रमाणे

१ दौलत नाईक – उठावातील नेता, आंबापाणीच्या लढाईतील नेता.

२ काळू बाबा – आंबापाणीच्या लढाईतील नेता.

३ बारवानीचे राजे – पेशव्यांच्या आदेशानुसार उठावात सर्व प्रकारचे सहाय्य, २५०० ची फौज वापरास दिली.

४ पोलादसिंग – उठावाचा सूत्रधार काजीसिंग याचा एकुलता पुत्र आंबापाणीच्या लढाईत धारातीर्थी पडला.

५ सिंदी – आंबापाणीच्या लढाईनंतर यास गोळया घालून ठार मारले. आंबापाण्याच्या लढाईत याने इंग्रज अधिकारी बेसेवी यास तुकडे तुकडे करुन ठार केले.

६ १९ ऑक्टोंबर रोजी यावल येथे फाशी देण्यात आले त्यांची नावे. १ अवचित २ बेदु

७ २४२ जण आंबापाणीच्या लढाईत धारातीर्थी.

८ ५५ जणांना आंबापाणी येथे ११ एप्रिल १८५८ रोजी गोळया घालून ठार केले.

९ १७ जणांना आंबापाणी येथे १२ एप्रिल १८५८ रोजी गोळया घालून ठार केले.४

**भिल्ल स्त्रियांना अटक :–** या झटापटीत भिल्लांच्या इतक्याच त्यांच्या स्त्रियाही धोक्याच्या, उपद्रवकारक असल्याचे कंपनी सरकारला आढळून आले. तेव्हा ४०० वर भिल्ल स्त्रिया पकडल्या. त्यांत काजीसिंग, मोवासिया नाईक आणि करीचा माऊ रावळ यांच्या बायका प्रमुख होत्या. भागोजी नाईक, भीमा नाईक आणि काजीसिंग हे सापडेपर्यत त्यांच्या स्त्रियांना ओलीस ठेवण्याचा आदेश मुंबई सरकारने दिला होता.५ जोपर्यंत भिल्ल नायक शरण येत नाही तोपर्यंत हया स्त्रियांना सोडू नये असा आदेश ब्रिटीश सरकारने आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना दिल्याचे आढळते. असा आदेश देण्याचे कारण आपणास मुंबई इलाख्याच्या गुप्त पोलिस पत्रकात आढळते. हे पत्र १ जून १८५८ चे आहे. या पत्रकात भिल्ल स्त्रियांबद्दल म्हटले आहे की, भिल्ल पुरुष जितके उपद्रवी व सतावून सोडणारे आहेत, तितक्याच त्यांच्या स्त्रिया देखील आम्हाला उपद्रव देत आहेत व सतावून सोडीत आहेत. आमच्या बातम्या काढून त्या आपल्या पुरुषांना कळविणे, पुरुषांसाठी भोजन तयार करणे, प्रसंगी लढाई करणे, ही सर्व कामे त्या स्त्रिया करतात. म्हणून त्यांनाही पकडून तुरुंगात डांबून ठेवले पाहिजे, या स्त्रियांना केवळ तुरुंगात डांबले नाही तर त्यावेळच्या फौजदाराने काही भिल्ल स्त्रियांवर अत्यंत क्रूर व पाशवी अत्याचार केल्याची हकीकत खानदेशचा मॅजिस्ट्रेट मेन्सफिल्ड याने पोलिस कमिशनरला कळविल्याची नोंद सापडते.६ अंबापाणी लढाईनंतर ड्रुम ट्रायल खटले होऊन ६२ आरोपींपैकी ५७ लोकांना गोळी घालुन ठार करण्याची सजा दिली. एवढी क्रूरता ब्रिटिशांनी यावेळी दाखविली.

पण याचा बदला नगरच्या भिल्लांनी घेतला. नांदगावच्या आसपास ते गोळा झाले. ही बातमी ले.स्टुअर्टला कळल्याबरोबर तो आपल्या ३०० सैनीकांसह गेला. भिल्लांची संख्या ४०० च्या आसपास होती. त्यांनी नदी किनाऱ्याने लगतच्या दाट झाडीचा आश्रय केला होता. लढाई जुंपली. भिल्लांनी इंग्रजांवर अक्षरश: आग ओकायला सुरुवात केली. त्यांच्या आगीच्या माऱ्याने कॅ.मॉन्टगेमेरी जखमी झाला. ले.चेंबरलेन, स्टुअर्ट व डाक्सिन यांनाही तसाच तडाखा बसला. ले.स्टुअर्ट दुसऱ्या दिवशी २१ रोजी ख्रिस्तवासी झाला. इंग्रजांकडील ५० जखमी झाले व १९ मृत्यु पावले तर भिल्लांकडील २५ लोक कामास आले. खानदेशात शिरपूर, सुलतानपूर, पाचोरा, यावल आदि तालुक्यात वर्षभर चकमकी झडतच होत्या व भिल्लांचा धुमाकुळ चालू होता.७

पारंपारिक शस्त्रांस्त्रांनी गनिमी पध्दतीने लढणाऱ्या या भिल्ल नायकांविषयी समाजाला सहानुभूती होती. प्रथमच भिल्ल नायक यावेळी एकत्रित लढले व राजे राजवाडयांचेही सहाकार्य मिळाले म्हणून इंग्रजांवर विजय मिळवता आला. इंग्रजांनी या भिल्ल नायकांना दरोडेखोर, बंडखोर व लुटारु ठरविले. परंतु ते खऱ्या अर्थाने या मायभूमीच रक्षणकर्ते होते. साम्राज्यवादी सत्तेला विरोध करणे, परकीयांचे वर्चस्व झुगारुन देणे, अस्तित्वासाठी व अस्मितेसाठी लढा देणे, जुलूम व अत्याचारा विरुध्द संघर्ष करणे हा या लढयातील प्रेरणा होत्या. आंबापाणीची लढाई खानदेशवासीयांच्या दृष्टीने अविस्मरणी अशी घटना आहे.८

**यावल भागात दंगे :** १८५८ मध्ये यावल भागातील पारशी फौजदाराच्या अत्याचाराला कंटाळून तेथील भिल्लांनी दंगे केले. धुळे जिल्हयातील चिखली गावचा नेता रामसिंग वसावा याने कोकखुंडा हे गाव लुटले. रामसिंगला पकडण्यासाठी ब्रिटिशांनी ५०० रुपयांचे बक्षीस जाहीर केले. पण त्याचा उपयोग झाला नाही.९

**खानदेशमध्ये तात्या टोपे येणार असल्याची आवई :** शिरपूर, यावल, पाचोरा, सुलतानपुर आदि तालुक्यात भिल्लांचा वर्षभर धुमाकूळ चालू होता. त्यात पुन्हा ३ नोव्हेंबर १८५८ रोजी महत्वाची बातमी येऊन धडकली. की प्रसिध्द सेनापती तात्या टोपे यांनी नर्मदा पार केली

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

असून ते खानदेशकडे येत आहेत. ही बातमी येताच खानदेशमधील पायदळ बोदवड येथे उभे करण्यात आले. तात्या टोपेंना बहुधा तापी ओलांडून खानदेशमध्ये यावयाचे असेल म्हणून ब्रिटिशांनी तात्या टोपे यांना खानदेशमध्ये उतरता येणार नाही अशी काळजी घेणे आवश्यक होते. ब्रिटिशांना तात्या टोपे हा खानदेशमध्ये बहुधा धोलबारी खिंडीतून प्रवेश करील असे वाटत होते.१०

**अंदमान गुन्हेगार वसाहतींची निर्मिती :** सतराव्या शतकाच्या प्रारंभी गुन्हेगारांना देण्यात येणाऱ्या शिक्षेच्या स्वरुपात काही बदल करण्यात आले. पूर्वी हातपाय तोडणे, लडेलोट करणे, डोळे काढणे अशा क्रुर शिक्षा दिल्या जात. परंतु सतराव्या शतकात जग काहीसे सुसंस्कारित झाल्याने या पूर्वीच्या शिक्षा त्यांना असंस्कृत वाटू लागल्या. गुन्हेगाराला या शिक्षा देणे म्हणजे त्या गुन्हेगाराचा जगण्याचा अधिकार हिरावून घेणे असे मानण्यात येवू लागले. तेव्हा अशा गुन्हेगारांना आपल्या देशापासून लांब अंतरावर निर्जनस्थळी नेवून ठेवण्याची प्रक्रिया या काळात अवलंबिण्यात येवू लागली. अशा वसाहतींना पीनल सेटलमेंट असे म्हणत. मराठीत याला आपण गुन्हेगारांची वसाहत असे म्हणू शकतो. प्रारंभी इंग्लड आपल्या गुन्हेगारांना अमेरिकेत पाठवित असे. नंतर अमेरिका स्वतंत्र झाली. त्यावेळी काही वर्षे इंग्लंडने वीस गुन्हेगारांना समुद्रातील तरंगत्या जहाजावर ठेवले. नंतरच्या काळात गुन्हेगारांचे प्रमाण एवढे वाढले की पुन्हा हे गुन्हेगार कोठे ठेवावेत ही समस्या इंग्लडपुढे उभी राहिली. एव्हाना समुद्रातील सर्व जहाजे भरुन गेली होती. तेव्हा इंग्लडने ऑस्ट्रेलियाचा शोध लावून तेथे गुन्हेगारांना पाठविणे सुरु केले. हिंदुस्थानात १८५७ मध्ये उठाव झाल्यानंतर हाच प्रश्न निर्माण झाला. कारण यावर्षी डिसेंबरमध्ये सुमारे एक लाख कैदी हिंदूस्थानात असल्याची नोंद आढळते. तेव्हा इंस्ट इंडिया कंपनीने गुन्हेगारांची नवीन वसाहत निर्माण करण्यासाठी अंदमान बेटात वसाहत स्थापण्याचे ठरविले. गुन्हेगारांबरेबरच संकटग्रस्त जहाजांना येथे आश्रय मिळावा, व्यापार वाढावा, ही कारणे देखील अंदमन बेटावर वसाहत स्थपण्याच्यावेळी देण्यात आली.

तसे पाहिले तर यापूर्वी ईस्ट इंडिया कंपलीने १७ सप्टेंबर १७८९ रोजी अर्चि बाल्ड ब्लेअरला अंदमान येथे वसाहत स्थापन करण्यासाठी पाठविले होते. २५ ऑक्टोंबर १७८९ रोजी त्याने या बेटावर जाऊन इंग्लंडचा ध्वज युनियन जॅकही फडकविला होता. परंतु येथील रोगट हवामान आणि स्थानिक लोकांचे सहकार्य न मिळाल्याने अर्चिबाल्ड बरोबर गेलेले अनेक रहिवासी मरण पावले. शेवटी १७९६ मध्ये इंग्रजांनी ही वसाहत बंद केली.

१८५७ च्या उठावाच्या वेळी पुन्हा इंग्रजांना नवीन गुन्हेगार वसाहतींची गरज भासू लागली म्हणून त्यांनी पुन्हा ६० वर्षानंतर अंदमान येथे गुन्हेगारांची नवीन वसाहत स्थापण्याचे ठरवून पूर्वी अर्चिबाल्ड ब्लेअरने जेथे वसाहत केली होती तेथेच पुन्हा नवीन वसाहत स्थापन करण्याचे ठरवून हिंदुस्थानातील गुन्हेगारांना अंदमान बेटात पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.११ हा १८५७ च्या उठावाचा आणखी एक महत्वाचा परिणाम होय.

१९ जानेवारी १९५८ रोजी कॅप्टन मॅन याची या वसाहतीचा प्रमुख आयुक्त म्हणून नेमणूक करुन त्याला अंदमान बेटावर पाठविले. ४ दिवसांनी तो अंदमान बेटावर पोहोचला. २२ जारनेवारी १८५८ रोजी त्याने ओल्ड हार्बरनचे नवीन नामकरण करुन त्याला पोर्ट ब्लेअर असे नाव दिले. ही अंदमानाची नवीन राजधानी म्हणून जाहीर करण्यात आले. तेथे कॅप्टन मूनने इंग्लंडची राणी इलिझाबेथच्या नावाने युनियन जॅक हा ध्वज फडकविला. त्यानंतर १० मार्च १८५८ राजी नवीन गुन्हेगार वसाहतीत कैद्यांचे पहिले जहाज पाठविण्यात आले. हे जहाज कलकत्याहून पाठविण्यात आले होते. या जहाजातून पाठविलेल्या कैद्यांची नावे आज उपलब्ध नाहीत. पुढे तीन महिन्यात आणखी चार तुकडया अंदमानला पाठविण्यात आल्याची सरकारी दप्तरात नोंद आहे. १८६० पर्यंत या बेटावर पाठविलेल्या महाराष्ट्रातील १४८ कैद्यांची नावे डॉ.निवास साठे यांनी १८५७ चे अंदमान काळे पाणी या ग्रंथात दिली आहोत. ती नावे खालील प्रमाणे होते. यात खानदेशमधील २१ कैद्यांची नावे आढळतात. तर नाशिक १५, अहमदनगर ७ , कोल्हापूर १७, कोकण ३४ व पंरपूर येथील ४ असे कैदी तेथे पाठविलले दिसतात.

**यावल तालुक्यातील कैदी :** विशेष म्हणजे खानदेशातून जे २१ कैद्यांना अंदमानला पाठविण्यात आले. ते सर्व यावल तालुक्यातील असलेले दिसून येतात.

| क्र. | नाव | गाव/प्रदेश | अंदमानला गेल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ | अधुरीआ | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| २ | अर्जून | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| ३ | भाई खान | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| ४ | भिकारी | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| ५ | भिमाजी | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| ६ | भुत्या | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| ७ | दामा | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |

ISSN : 2348-7143
Dec. 2018

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | धर्मा | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| ९ | जयसिंग, | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १० | खैरान | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| ११ | म्हारु | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १२ | मोहन | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १३ | नरसिंग | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १४ | नासीर | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १५ | रामा | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १६ | रायसिंग | खानदेश, यावल | ----- |
| १७ | गोपाळ साळवी | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १८ | संदू | खानदेश, यावल | २९ ऑक्टोंबर १८५८ |
| १९ | सुका | खानदेश, यावल | १८५८ |
| २० | सुप्र्या | खानदेश, यावल | १८५८ |
| २१ | वझी | खानदेश, यावल.१२ | |

**यावल भागात दंगे :** १८५८ मध्ये यावल भागातील पारशी फौजदाराच्या अत्याचाराला कंटाळून तेथील भिल्लांनी दंगे केले. शिरपूर, यावल, पाचोरा, सुलतानपूर आदी तालुक्यात भिल्लांचा वर्षभर धुमाकूळ चालू होता.१३

**निष्कर्ष**

ब्रिटिशांनी संपुर्ण भारत जिंकून घेत असतांना शेवटी १८१८ मध्ये महाराष्ट्र व खानदेश जिंकून घेतला. तेव्हा या भागातील स्वातंत्र्यप्रिय भिल्लांनी ब्रिटिश सत्तेला सर्वप्रथम विरोध केला. एवढेच नव्हे तर त्यांच्यात मोठी दहशतही निर्माण केली. भिल्लांशी संघर्ष करुन त्यांना नियंत्रणात आणता येत नाही म्हणून शेवटी त्यांच्याशी सामोपचाराने जुळवून घेत त्यांना पोलीस व इतर सेवांमध्ये घेऊन त्यांना आपलेसे करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केलेला दिसून येतो.

मात्र २० व्या शतकाच्या पूर्वाधार्पर्यंत भिल्लांचा ब्रिटिशांशी संघर्ष सुरुच असलेला दिसून येतो. अशीच एक महत्वाची लढाई यावल तालुक्यात आंबापाणी येथे भिल्लांची इंग्रजांविरुध्द झालेली दिसून येते. या लढाईत जवळपास ७२ भिल्ल क्रांतीकारकांना गोळया घालुन ठार करण्यात आले. तर अनेक ब्रिटिश अधिकारी जखमी झालेले दिसून येतात. एवढेच नव्हे तर या लढाईत पुरुषांबरोबर भिल्ल स्त्रियांनीही सक्रिय सहभाग घेतलेला दिसून येतो. जवळपास ४०० भिल्ल स्त्रियांना ब्रिटिश सरकारने ओलीस ठेवलेले दिसून येते.

तसेच ब्रिटिश सत्तेच्या दृष्टीकोनातून जे त्रासदायक क्रांतीकारक असत त्यांना ते अंदमान येथील सेल्युलर जेल मध्ये त्यांची रवानगी करत असत. यात यावल तालुक्याच्या इतिहासात महत्वाची नोंद घेण्याची गोष्ट म्हणजे खानदेशातील ज्या २१ क्रांतीकारकांना अंदमानच्या तुरुंगात पाठविण्यात आले. ते सर्वच्या सर्व यावल तालुक्यातील होते. यावरुन यावल तालुक्यातील भिल्ल जनता स्वातंत्र्यप्रिय व आपल्या हक्कांसाठी सजग असलेली दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१ शहा जी.बी., धुळे व नंदुरबार जिल्हयाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, धुळे२००४, पृ.०४
२ खोबरेकर वि.गो., महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे, मुंबई, १९९६, पृ.९७
३ पुर्वोक्त, ९८
४ ढेकणे के.डी., महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी, जळगाव, २०१५, पृ.१६०-१६१
५ खोबरेकर वि.गो., महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे, मुंबई, १९९६, पृ.९७-९८
६ शहा जी.बी., धुळे व नंदुरबार जिल्हयाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, धुळे२००४, पृ.०५
७ खोबरेकर वि.गो., महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे, मुंबई, १९९६, पृ.९७-९८
८ दै.लोकमत, जळगाव, ११ एप्रिल २००८, पृ.९
९ शहा जी.बी., खानदेश: सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय इतिहास, डोंबीवली, २०१०, पृ.१२७
१० पुर्वोक्त, पृ.१२९
११ शहा जी.बी., पाटील बी.एन., आधुनिक भारताचा इतिहास, जळगाव, प्रथम आवृत्ती, २००८, पृ.६०
१२ पुर्वोक्त,, पृ.६१-६६
१३ पुर्वोक्त, पृ.१२७

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातील बोलीभाषेचे अस्सल रूप

**प्रा. भैय्या डी. पाटील**
एस.एस.व्ही.पी.एस्. साहित्य व वाणिज्य महाविद्यालय,
देवपूर, धुळे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील सर्व प्रदेश त्यांच्या भौगोलिक सांस्कृतिक व सामाजिक वैशिष्ट्यांसह दिमाखदार पणे उभे आहेत. प्रत्येक प्रदेश हा मराठी माणसाच्या मनात त्याच्या विशिष्ट वेगळेपणामुळे आस्थेचा विषय बनलेला आहे.यातच खानदेश हा सातपुडा पर्वत व अजिंठ्याचा पर्वत रांगांमध्ये वसलेलाआणि तापी, गिरणा, पांझरा या जीवनदायी नदींच्या सुपीक खोऱ्यात आपली समृद्ध संस्कृती टिकवून ठेवणाऱ्या खान्देशाची जशी सांस्कृतिक व सामाजिक एक दीर्घ परंपरा आहे तशीच काव्याची ही खूप प्राचीन परंपरा आहे.

महर्षी वाल्मिकी, व्यास ऋषी, गणिताचार्य भास्कराचार्य, चक्रधर स्वामी, मुक्ताबाई,चांगदेव, नारायण बास, महालिंगदास अशा प्राचीन महान व्यक्तींचे वास्तव्य खानदेशात होते. आधुनिक काळात नाना फडणवीस यांनी काव्यरत्नावली हे फक्त कवितेला वाहिलेले नियतकालिक सुरू केले. आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत यांनी अनेक महत्त्वाच्या कविता खानदेशात असतांना लिहिल्या.बालकवी, कवी विनायक, माधव जूलियन, साने गुरुजी, दू. आ. तिवारी, बहिणाबाई चौधरी, के. नारखेडे, सोपानदेव चौधरी, पुरुषोत्तम पाटील, भालचंद्र नेमाडे, ना. धो. महानोर, त्र्यंबक सपकाळे, वि. भा. नेमाडे, निळकंठ महाजन, उत्तम कोळगावकर, वा.रा.सोनार, भगवान ठाकुर, जगदीश देवपूरकर, दत्ता वाघ,कृष्णा पाटील,गणेश कुडे, सुशील पगारिया, अरुण नारखेडे,संजीवकुमार सोनवणे, प्रकश किनगावकर, वाहरू सोनवणे,अशोक कोतवाल इत्यादी खानदेशी काव्य परंपरेत सांगता येतात.यातील काही कवींची खानदेशी जन्मभूमी आहे तर काहींची कर्मभूमी आहे. या कवींच्या कवितेत खानदेशातील संस्कृती, येथील बोलीभाषा याचे प्रतिबिंब पहाता येते.

**बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातील बोलीभाषेचे अस्सल रूप**

आधुनिक खान्देशातील भाषेचे साहित्यात अस्सल रूप पहावयाचे असल्यास ते बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यात इतके दुसऱ्या कोणत्याच कवीच्या कवितेत पाहता येणार नाही. बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यात अस्सल लेवा पाटीदार,वऱ्हाडी भाषेचे अहिराणी रूप पहावयास मिळते. याचबरोबर लोकपरंपरेतील श्रद्धा परंपरा व आधुनिक विचार हेही याच भाषेच्या माध्यमातून पहावयास मिळतात.

शब्दांनीच भाषा तयार होते व भाषेतूनच कविता तयार होते. कवितेत येणारी भाषा ही व्यवहारातील भाषेहून वेगळी असली तरी व्यवहारातील भाषेचे विविध प्रयोग कवी कवितेत करत असतो.कवितेत चपखल बसतील अशा शब्दांचा प्रयोग कवी करत असतो याचबरोबर नाद, लय यांच्यासोबतच स्वतःला आलेले अनुभव व वास्तव चित्रण याच्यातून वाचकांसमोर एक हुबेहूब चित्र साकारत असतो.बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातील भाषेचा विचार करताना लोकश्रद्धा, रूढी- परंपरा,प्रतिमा, प्रतीके, निसर्ग ,म्हणी,वाक्प्रचार इत्यादींचा आधार घ्यावा लागेल. कारण वरील सर्व घटक हे भाषेची अंगे आहेत.

बहिणाबाई चौधरी यांचे काव्य जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे आहे. आचार्य अत्रे म्हणतात, एखाद्या शेतात सोन्याचा हंडा सापडावा तसा बहिणाबाईच्या काव्याचा शोध महाराष्ट्राला लागला( बहिणाईची गाणी,बहिणाबाई चौधरी) बहिणाबाई एक अशिक्षित स्त्री होत्या. अक्षराची ओळख बहिणाबाईंना नव्हती मात्र खाणीत हिरा सापडावा तशी बहिणाबाईची कविता अचानक उजेडात आली व प्रचलित कवी व टीकाकार यांना धक्का दिला. प्रतिभा हे कवीला निसर्गाचे देणे आहे ते त्याच्या बरोबर यावे लागते मात्रांचा किंवा विद्येचा त्याच्याशी संबंध नाही हे पटवून जाते कोकिळेने तोंड उघडले की आपोआपच संगीत वाहू लागते प्राजक्ताची कळी उमलली किती सुगंधाने निश्वास टाकू लागते तसेच जातीच्या कवीचे आहे त्याचे रुदय ताल धरून बसलेले असते त्यामुळे त्याच्या जिभेवर जो शब्द येतो तो नाचतच येतो सृष्टीतील सौंदर्य तेवढे त्याच्या नजरेला दिसते आणि जीवनातले संगीत त्याला ऐकू येते डोंगराच्या कपारीतून एखादा झरा वाहू लागतो तसे काव्य एक सारखे त्याच्या रुदयातुनी उसळ्या घेत असते असे मानल्या केलीस जगातले अमर काव्य कसे जन्मास आले हे कोडे सुटणार नाही. डॉ.यादव स. ग., निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती- १९८२ जानेवारी, पृष्ठ क्र. ८) असे डॉ. स. ग. यादव कवीला मिळालेल्या प्रतिमेविषयी सांगतात. बहिणाबाई चौधरी यानां ही गोष्ट लागू पडते.

बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यात येणारी भाषा ही अहिराणी आहे. या काव्यात लेवा पाटीदार व वऱ्हाडी बोली भाषेचे संमिश्र रूप या काव्यात पहावयास मिळते.बहिणाबाई चौधरी यांनी लोकांगीतांसारखी रचना केलेली आहे. बहिणाबाई चौधरी या अशिक्षित असल्यामुळे त्यांच्या मनावर लोक परंपरेचा प्रभाव व परिणाम होता. त्यामुळेच त्यांच्या काव्यातील भाषेने बोलीचे स्वरूप व रूप धारण केले आहे बहिणाबाई यांनी लोक रचनाबंधाचा जरी वापर केलेला असला तरी कवितेत येणारे विचार हे बहिणाबाईचे आहेत.बहिणाबाई चौधरी यांच्या

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

कवितेतील भाषेविषयी डॉ.कैलास सार्वेकर म्हणतात,प्रमाण मराठीतील एखादा शब्द चुकूनही या कवितेत आलेला नाही अर्थात खास बोली भाषेत कविता करायची अशी पोज घेऊन या कवितेची निर्मिती झालेली नाही. जात्यातून पीठ पडावं तशी या कवितेची बोलीभाषाही या कवितेबरोबर सहजपणे अवतरते (डॉ. सार्वेकर कैलास,मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुनर्मुद्रण जुलै २०१७, पृष्ठ १०६)

बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यात ग्रामीण शेतकरी कुटुंबातील शेतीशी निगडीत विविध साधने व शेतीनिष्ठ असे शब्द,श्रद्धा या अस्सल बोलीभाषेत पहावयास मिळतात. मोघड, पांभर,कोयप, निदांईले, आऊत, तीफन, वखर, नांगर इत्यादी विविध शेतीशी निगडित साधनांचा उल्लेख येतो. विशेष म्हणजे या सर्व साधनांचा उल्लेख बहिणाबाई अहिराणीतच करतात.

*पांभर पांभर*
*मांघे धारये झांबर*
*कोयप कोयप*
*निंदाईले सोप सोप*

बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यात च्या प्रतिभा निर्मितीचे स्त्रोत निसर्गच आहे. बहिणाबाई यांच्या काव्यात येणारी भाषा ही अलंकार व प्रतिमा यांनी नटलेली आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यात यमक, अनुप्रास, रुपक, उत्प्रेक्षा, अपन्हुती, अलंकार येतात.

**अपन्हुती–** *पयसाचे लाल फुलं*
*हिर्वे पानं गेले झडी*
*इसरले लाल चोची*
*मिळू गेले कुठे उडी*

**उत्प्रेक्षा–** *हिरवे हिरवे पानं*
*लाल फय जशी चोच*
*लाल वडाच्या झाडाले*
*जसं पीक पोपटाचं*

बहिणाबाई चौधरी यांची काव्य भाषा त्यांच्या काव्यात येणाऱ्या कल्पनेला वजन प्राप्त करून देते,त्यांना तोलून धरते.बहिणाबाईच्या मनातील भावगर्भ कल्पकता त्यांच्या काव्यातील भाषेच्या माध्यमातून कवितेत आविष्कृत होतात. त्या आविष्कृत होताना प्रतिमांचा वापर अगदी श्वासो श्वासासारखा सहज करतात.

*धरत्रीच्या कुशीमधीं*
*बीयबियानं निजलीं*
*वऱ्हे पसरली माटी*
*जशी शाल पांघरली*
किंवा
*ऊन वाऱ्याशी खेयता*
*एका एका कोंबातून*
*पर्गटले दोन पानं*
*जसे हात जोडीसन*

बहिणाबाई चौधरी या ओळीतून शेतात बियाणे पेरणे, ते उडवणे याचे अतिशय सुंदर वर्णन प्रतिमांच्या माध्यमातून करतात.

बहिणाबाई चौधरी यांनी कौटुंबिक नातेसंबंध आपल्या काव्यात अतिशय समर्पकपणे मांडले आहेत. नाते संबंधांवरील कविता ह्या एखाद्या भाषाशास्त्रज्ञांनी लिहिल्या असाव्यात असे प्र के अत्रे बहिणाबाईच्या कवितेविषयी म्हणतात.(बहिणाबाईची गाणी प्रस्तावना पृष्ठ २८)दंत, तालव्य,ओष्ठ्य, वर्ण यांच्याद्वारा कुटुंबातील नातेसंबंध व त्यां नात्याचे महत्त्व त्यावरून स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे बहिणाबाई यांना ध्वनी आणि वर्ण स्थान माहीत आहेत.

*माय म्हणता म्हणता*
*होट होटालागी भीडे*
*आत्या म्हणता म्हणता*
*केवढं तर पडे*

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

माय आणि आत्या या दोन नात्यातील अंतर बहिणाबाई या ओळीतून स्पष्ट करतात.

*ताता म्हणता म्हणता*
*दातामंधी जीभ अडे*
*काका म्हणता म्हणता*
*कशी मांघे मांघे दडे*
*जी जी म्हणता म्हणता*
*झाला जीभले निवारा*
*सासू म्हणता म्हणता*
*गेला तोंडातून वारा...*

बहिणाबाई या ओळीतून ताता,काका,जी जी, सासू यांचे असणारे नाते जसे स्पष्ट करतात तसेच दुसरीकडे भाषाशास्त्रीय दंतव्य व तालव्य या वर्णोच्चारातील अंतरही स्पष्ट करतात.

बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यात विविध प्रतिमांचा संचार सहजपणे आढळतो. 'मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर','दारी खेटराची रास', 'जशी आंब्याची सावली', 'माहेरची वाट माले वाटे मखमल', यासारख्या असंख्य प्रतिमा बहिणाबाईच्या काव्यात येतात.

*माझ्या माहेराच्या वाटे*
*डाबा पान्याच्या लागल्या*
*म्हशी बसल्या पान्यात*
*जशा वरमाई न्हाल्या*

बहिणाबाईंनी शब्दांचा अतिशय सुंदर वापर केलेला आहे.याच बरोबर अनेक नवीन शब्दही तयार केले आहेत. ज्यातून पीठ पडते त्याला 'जातं' न म्हणता 'घरोटा' हा शब्द वापरावा आणि 'गुढीपाडवा' या शब्दासाठी 'गुढी उभारणे' हा शब्द वापरावा कारण पडी तो पाडवा आणि आपण गुढी उभारतो म्हणून त्याला 'गुढी उभारनी' म्हणावे असे बहिणाबाई सांगतात. 'हिरिताचं देणं घेणं'या कवितेत माणसाने माणसाशी कसे वागावे पिकाच्या प्रतिमेतून व्यक्त करतात.निसर्ग हा नेहमी माणसाला भरभरून देत असतो आणि निसर्गाच्या मनातील ही उच्च कोटीची भावना बहिणाबाई पिकांच्या प्रतिमातुन व्यक्त करतात.

*उभे शेतामधी पिकं*
*ऊन वारा खात खात*
*तरसती केव्हा जाऊ*
*देवा भुकेल्या पोटात*

याचबरोबर मानवाच्या स्वार्थीपणा खोटेपणाही बहिणाबाई निसर्गप्रतिमा तून व्यक्त करतात. पाहिसनी रे लोकांचे

*यवहार खोटे नाटे*
*तेव्हा बोरी बाभयीच्या*
*आले अंगावर काटे*

किंवा

*खोपा इनला इनला*
*जसा गिलक्याचा कोसा*
*पाखराची कारागिरी*
*जरा देख रे मानसा!*
*तिची उलूशीच चोच*
*तेच दात तेच ओठ*
*तुले देले रे देवानं*
*दोन हात दहा बोटं?*

बहिणाबाई चौधरी यांनी काही स्फुट काव्य व म्हणी यांचे लेखन केले आहे. या काव्यातही भाषिक सौंदर्य पहावयास मिळते.

*दया नही मया नही, डोयाले पानी*
*गोगलगायच्या दुधाचं काढा वो लोनी*
*हौस केली लिहीले गोंधलं*
*मोठ्या बैलाले बाशिंग बांधलं*
*चुल्हयाची माटी आगीन खाये*
*माथनीची माटी पानी पेये*

यासारख्या ३० म्हनी बहिणाबाईच्या काव्यसंग्रहात संग्रहित केलेल्या आहेत. या म्हणीच्या माध्यमातून आहिराणी भाषेचे वैभव पाहता येते. मराठी भाषा वाक्प्रचारानी अधिक समृद्ध झाली आहे, असे बहिणाबाईचे काही वाक्प्रचार,काही म्हणी त्यांच्या जीवनातील अनुभवाबरोबर स्त्री अनुभवाचे एक दर्शन घडवितात. सहज बोलता बोलता प्रसंगानुसार सुचलेल्या या बहिणाबाईच्या म्हणी आहेत. यातील उत्स्फूर्तपणा प्रामुख्याने लक्षात घेतला पाहिजे. म्हणी म्हणजेआजची वात्रटिका होय.आज वात्रटिकेचे जे स्वरूप आपणास दिसते त्यावात्रटिकेचा मूळ आत्मा अशा म्हणींचा आहे.( डॉ.यादव स. ग., निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी,प्रचार प्रकाशन, पहिली आवृत्ती,१९८२ जानेवारी,पृ.९०)म्हणी विषयी डॉ. स. ग. यादव यांचा अभिप्राय महत्वपूर्ण आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या या म्हणीनी अहिराणी भाषा व काव्य अधिक समृद्ध झालेले आहे.अशा प्रकारे निसर्ग,शेती, ग्रामीण समाजव्यवस्था, प्रादेशिकता, अध्यात्म, जीवनविषयक तत्त्वज्ञान, मानवी मनाचं अवलोकन,सहज आणि सर्जनशील भाषाशैली इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त बहिणाबाईची कविता म्हणजे मराठी ग्रामीण कवितेचा परिपूर्ण असा आविष्कार आहे.( डॉ.सार्वेकर कैलास,मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग, प्रथम आवृत्ती, पुनर्मुद्रण जुलै २०१७पृष्ठ क्र.१०८)असे सार्वेकर म्हणतात. यापुढे जाऊन असे म्हणावे लागेल की, खानदेशी कवितेचा परिपूर्ण अविष्कार व आत्माच बहिणाबाईचे काव्य आहे.

**निष्कर्ष:–**

१) अस्सल लेवापाटीदारी व वऱ्हाडी भाषेचे संमिश्र रूप बहिणाबाईच्या कवितेत पहाता येते.
२) बहिणाबाईला आलेले अनुभव त्यांच्या जाणिवा त्यांनी बोलीभाषेतूनच व्यक्त केल्यामुळे त्यांच्या काव्यात कृत्रिमता कोठेच आढळत नाही.
३) बहिणाबाई अशिक्षीत जरी होत्या तरी भाषाशास्त्रीय दंत, तालव्य,ओष्ठ्य वर्ण यांचे महत्त्व त्यांना माहीत होते त्यामुळेच या दंत, तालव्य, ओष्ठय वर्णोच्याआधारे कौटुंबिक नातेसंबंध त्यांना दाखवता आले.
४) रोजच्या जगण्यातून आलेले शहाणपण बहिणाबाईच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा महत्त्वाचा भाग आहे याच अनुषंगाने जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगताना अनेक प्रतिमांचा वापर अगदी सोप्या भाषेत केला आहे.
५) बहिणाबाई चौधरी यांच्या म्हणीमुळे खान्देशी काव्य व भाषा अधिक समृद्ध झाले आहेत.
६) बहिणाबाईंचे काव्य म्हणजे खानदेशी काव्याचा परिपूर्ण अविष्कार व आत्माच आहे.

**संदर्भ सूची :**

१) बहिणाबाईची गाणी,बहिणाबाई चौधरी, प्रस्तावना– आचार्य अत्रे, सुचित्रा प्रकाशन पृष्ठ क्र.१
२) निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी, डॉ.स.ग. यादव, प्रचार प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९८२ जानेवारी,पृष्ठ क्र. ८
३) मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, डॉ कैलास सार्वेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस,प्रथम आवृत्ती, पुनर्मुद्रण जुलै, २०१७, पृष्ठ क्रमांक १०६
४) बहिणाईची गाणी, बहिणाबाई चौधरी, प्रस्तावना– प्र के अत्रे, सुचित्रा प्रकाशन, पृष्ठ क्रमांक २८
५) निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी, डॉ.स. ग. यादव, प्रचार प्रकाशन, पहिली आवृत्ती १९८२ जानेवारी, पृष्ठ क्रमांक ९०
६) मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, डॉ. कैलास सार्वेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती पुनर्मुद्रण जुलै २०१७ पृष्ठ क्र.१०८

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खानदेशातील सण-उत्सव विषयक लोकगीते

प्रा.डॉ. हिरालाल सोमा पाटील

**उद्देश**

खानदेशातील सण-उत्सव निमित्ताने आविष्कार होणाऱ्या लोकगीतांचे संकलन करुन त्यांचा लोकतत्वीय अभ्यास करुन त्याबाबत तटस्थ निष्कर्ष मांडले.

**गृहीतके**

खानदेशातील सण-उत्सवविषयक लोकगीताचे संशोधन करतांना खानदेशातील कोण-कोणत्या सण उत्सवातून खानदेशातील रुढी, परंपरा, लोकगीतातून व्यक्त होतात ती लोकगीते समजतील.

**संशोधन पध्दती**

खानदेशातील सण-उत्सव विषयक लोकगीताचा अभ्यास करतांना पुढील संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे. प्रारंभी लोकगीताचे संकलन, संपादन आणि अभ्यास करण्यासाठी 'क्षेत्रीय आणि स्तरीय' पध्दतीचा वापर करुन प्रस्तुत शोधनिबंध लिहिला आहे.

**विषय विवेचन**

खानदेशाला भव्य अशी वैभवशाली परंपरा आहे. पुराणकाळ, इतिहासपूर्वकाळ, मध्ययुगीनकाळ, अर्वाचीनकाळ या कालखंडात खानदेश हा प्रदेश ऋषिक असकि, अश्मक, स्कंददेश, अभीरदेश, गोपराष्ट्र, अहिराष्ट्र, खांडवदेश, कानदेश आणि खानदेश अशा विविध नावांनी संबोधला गेला आहे. अनेक संशोधकांनी आपापल्या परीने खानदेश या शब्दाची उत्पत्ती मांडली आहे. कानबाई ही खानदेशची प्रमुख लोकदेवता आहे. अहिराणीत क चा ख होण्याची उदाहरणे असल्याने कानबाईचा देश तो खानदेश ही उत्पत्ती स्वीकारली आहे.

अहिराणी ही खानदेशातील कष्टकरी जनांची मायबोली आहे. ही भाषा साहित्यांच्या सर्व अंगानी समृध्द आहे. अहिराणातील लोकगीतं जीवनाच्या तालासुरांशी अतूट नात जोडणारी आहेत. खानदेशातल सण उत्सव प्रसंगी म्हटली जाणाऱ्या लोकगीतांमध्ये विविध प्रकारचे अलंकार, रस, छंद, गंध आहे. त्यामुळे लोकगीतामध्ये एक प्रकारची गोडी आहे. या सण उत्सवांच्या निमित्ताने ग्रामीण भागातील लोक एकत्र येतात. आनंद उपभोगतात दैनंदिन जीवनातील मानसिक ताण-तणाव दु:ख बाजुला सारुन लोकांनी एकत्र यावे हा विचार या सण-उत्सवामागे आहे. सण उत्सव ही वर्ष भरात ठरावीक काळात येत असतात. भारतीय संस्कृती ही कृषीप्रधान संस्कृती आहे. शेतीची कामे आटोपल्यानंतर सण उत्सव येतात. या संदर्भात डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात, ''आपल्या घरातील वातावरणा प्रसन्न रहावे, आपले नित्याचे व्यवहार सुरळीतपणे पार पाडले जावेत आणि आपले आयुष्य सुखी जावे यामधील माणसाचे समाधान सणासुदीच्या निमित्ताने आणखीनच फुलून जाते.''१ खानदेशात सण उत्सवांच्या निमित्ताने काही लोकगीते गायली जातात. यातून मन प्रसन्न होते. तुकाराम महाराजांनी म्हटले आहे, 'मन करारे प्रसन्न सर्व सिध्दीचे कारण' माणसांच्या मनातील हा आनंद सतत जागता राहावा या गोष्टीचे एक साधन म्हणजे हे सण आणि उत्सव होय. आजच्या धावपळीच्या युगात माणसांनी एकत्र यावे, विचार विनिमय करावा, सहभोजन करावे, सहश्रवण करावे असे सामाजिक संघटनेचे उद्दिष्ट यातून साधले जाते. घराघरातून सतत प्रसन्न वातावरण, आनंद निर्माण होत राहिला पाहिजे. सण-उत्सव या मागची धारणा आहे. असे खोले ग.शं. या लोकसाहित्याच्या अभ्यासकाने ही आपल्या भारतीय तीर्थक्षेत्र या ग्रंथात प्रतिपादन केले आहे.''२

खानदेशात अनेक सण-उत्सव, साजरे केले जातात. त्या-त्या उत्सवांमध्ये प्रासंगिक स्वरुपाची गाणी म्हटली जातात. अहिराणी लोकगीतात जात्यावरील ओव्या, झोक्यावरील गाणी, आखाजी, दिवाई यासारख्या उत्सवातील गाणी, कुळाचार गीते, स्त्री-पुरुषाची गाणी, कानबाईच्या वह्या, गुलाबाई, गौराई, कानबाई यांची गाणी अशी विविध प्रकारची लोकगीते आहेत. अहिराणी लोकगतीतांमध्ये मराठीतील नाद, माधुर्य यांचा संगम अनुभवायाला मिळतो. अशी खानदेशातील महत्वाची काही सण उत्सवातील लोकगीते या शोध निबंधातून थोडक्यात मांडली आहे.

**आखाजी विषयक लोकगीते**

अक्षय तृतीया या सणाला खानदेशात 'आखाजी' असे म्हटले जाते. खानदेशात आखाजी सणाला फार महत्व दिले जाते. खानदेशात आखाजी आणि दिवाळी या सणाला सासुरवाशिण मुलीना माहेरी आणले जाते. दिवाळीच्या सणाच्या वेळेस हंगामाचे काम असल्यामुळे सासुरवाशिण मुलीला माहेरी जास्त दिवस राहाता येत नसे. परंतु आखाजीच्या सणाला मात्र माहेरी हमखास आणले जाते. या सणाच्या निमित्ताने मुली गौराईसाठी नदीच्या काठावर पाणी घेण्यासाठी जातात. बरोबर टिपऱ्या असतात. सर्व मुली एकत्र होऊन फेर धरतात, नृत्य

करतात ते गीत पुढील प्रमाणे आहे.

*''आथाना आंबा तथाना आंबा कैरी झोका खाय व*
*कैरी पडनी, खडक फुटना पानी झुय झुय वाहाय व*
*झुय झुय पानी वाहाय तठे रतन धोबी धोय व*
*रतन धोबी धोये व तठे तठे कसाना बाजार व''*

असे हे कल्पना विलासांनी नटलेले विस्तृत लोकगीत मुली आनंदाने गात असतात.

अक्षय तृतीया या सणाच्या निमित्ताने सासुरवाशिण बहिणीला भाऊ घ्यायला जातो. यासाठी बहिण भावाची आतूरतेने वाट पाहात असते. काबाड कष्ट करुन ती थकून गेलेली असते. या निमित्ताने माहेरी जाता येईल, टिपऱ्या, झोका खायला मिळेल, मैत्रिणींमध्ये मनसोक्त गप्पा मारता येतील, विश्रांती मिळेल, आनंदाला उधाण येईल या संबंधीच्या आपल्या भावना प्रकट करतांना खानदेशात पुढील लोकगीत म्हटले जाते.

*''आखाजी सारखा सण नि सण उना टिपरी खेवाले*
*गया भाऊ मना, बहिणीसले लेवाले ।।धृ।।*
*माय कशी म्हणे, उनी मनी आखाजी खेवाले*
*आप्पा कश म्हणे, उनी मनी टिपरी खेवाले*
*भाऊ गया, गया बहिणीसले टिपरी लेवाले ।।२।।*
*भवजाई कशी म्हणे, उनी मन्या चुगल्या लावाले*
*आखाजी सारखा सण नि सण उना टिपरी खेवाले*
*भाऊ गया, गया बहिणीस्ले लेवाले.'' ।।३।।*

आखाजी हा सण वर्षातून एकदाच येत असल्यामुळे बहिणीला घ्यायला जाणे ही खानदेशातील एक लोकरुढी परंपरा आहे. या सणाच्या निमित्ताने सासुरवाशिण बहिणीला झोके खाता येईल, टिपऱ्या खेळता येतील घरातील सर्व मंडळीना आनंद होतो. परंतु वहिनीला नणंद माहेरी आलेली आवडत नाही. कारण ती आपल्या विषयी सासूबाईकडे चुगली करेल अशी चिंता तिला वाटते. आनंद आणि चिंता मानवी जीवनात अनुभवायाला मिळतात. नणद माहेरी आल्यानंतर वहिनीने नणदेचे डोक्याचे केस धुतले पाहिजे, पाठ घासली पाहिजे, पाहुणचार केला पाहिजे. अशी लोकरुढी खानदेशात असल्यामुळे वहिनी हे सर्व करणारी नसली तर नणंद तिच्यावर रुसते वेळ आली तर आईकडे चुगल्या ही करते. उना टिपरी खेवाले यांच्यातून भावजाईला वाटते की नणंद आपल्यासाठी टिपरी खेळण्यासाठीच आली आहे. असा व्यंग्यार्य या लोकगीतातून सूचित होतांना दिसतो.

सासरवाशीण स्त्रियांना माहेरचा लळा असतो. माहेरी फुलासारखी वाढलेली पोर सासरी आल्यावर गुराढोरासारखी राबत असते. त्यामुळे सहाजिकच माहेरची अनावर ओढ तिला असते आणि माहेरी जाण्यासाठी अशा सणावराचे निमित्त तिला मिळत असते. अशिक्षित पण प्रतिभेच दैव देणं लाभलेल्या बहिणाबाई चौधरी आपल्या 'आखाजी' या कवितेत म्हणतात

*''आखाजीना आखाजीना मोलाचा सन देवाजी*
*निंबावरी निंबावरी बांधला छान झोकाजी*
*गेला झोका गेला झोका चालला माहेरालाजी*
*आला झोका आला झोका पलट सासरालेजी.''*

**पोया (पोळा) सण विषयक लोकगीते**

खानदेशात या सणाला फार महत्वाचे स्थान आहे. पोळा हा सण कृषी संस्कृतीचे प्रतिक आहे. बैलांना दैवत मानून त्यांची पूजा करुन त्यांच्याविषयी श्रध्दा व्यक्त करुन त्यांचे ऋण मान्य केले जाते. पोळ्याचा सण श्रावण आमवस्येला साजरा करतात. त्या दिवशी बैलाच्या मानेवर जू (दुशेर) ठेवली जात नाही. या सणाविषयी प्रा.डॉ.हिरालाल पाटील यांनी आपल्या शोध निबंधात या सणाविषयी पुढील ओवीतून भावनाा व्यक्त केल्या आहेत.

*''सणामधी सण सण पोयाना आजी गाजी*
*भाऊ लेक मना नंदी राजाले तेल पाजी*
*पोया पोया करु बैल खानदेशना आसरा*
*नंदीले ववायले सण नही ना दुसरा''४*

बैलाचे ऋण व्यक्त करण्यासाठी या सारखा दुसरा सण नाही असे वरील गीतातून सूचित होताना दिसते. तर खानदेशकन्या बहिणाबाई

चौधरी पोळा सणाबाबत म्हणतात

*''आज पुंजारे बैलाले*
*फेडा उपकाराचं देनं*
*बैला, खरा तुझा मान*
*शेतकऱ्या तुझं रीन !''५*

अशी या सणाच्या दिवसी बैलाची पूजा करायची. बैल आयुष्यभर शेतकऱ्यावर जे उपकार करतात त्यांची परत फेड या सणाच्या निमित्ताने करायची आहे. म्हणूनच खानदेशातच नाही तर महाराष्ट्रात या सणाला महत्वाचे स्थान आहे.

**दसरा–दिवाळी विषयक लोकगीते**

दसरा–दिवाळी हा सण संपूर्ण भारतात ज्या प्रमाणे साजरा केला जातो त्याचप्रमाणे खानदेशात मोठ्या उत्साहाने साजरा करतात. दसरा या सणाच्या दिवशी आपट्यांची पाने–सोन्याची संबोधून गावातील प्रत्येकाच्या घरी द्यायला जातात. लहान थोरांचा पाया पडतात. आणलेले सोने देवाला आणि मित्रानाही देतात. यांच्यातून बंधूभाव, स्नेह, श्रेष्ठ–कनिष्ठ असा कोणताही भेदभाव राहात नाही.दसराहा खर तर लोकोत्सव आहे. या सणाविषयी पं. महादेव शास्त्री जोशी म्हणतात, ''दसरा हा एक कृषिविषयक लोकोत्सव आहे. पावसाळ्यात पेरलेल्या शेतातले पहिले पीक घरात आल्यावेळी शेतकरी हा उत्सव साजरा करीत. नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी ह्या धान्याचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात या गोष्टी या उत्सवाचे मूळ कृषी स्वरुप व्यक्त करणाऱ्या आहेत.''६ दसऱ्याच्या सणाबाबतची कृषी जीवन विषयक असणारी भूमिका खानदेशातही वरील प्रमाणेच आहे. या सणाच्या संदर्भात डॉ. हिरालाल पाटील यांच्या विद्या वाचस्पती प्रबंधातील संकलीत गीतात म्हणातात,

''सण मधी सण आपट्याना पाला
*शेलांगण खेयी उना जांभोयी घोडीवाला*
*सणामधी सण सण दुसरा उनारे घातकी*
*आबेरी तलवार पडी हेलानी मस्तकी.''७*

अशा या सणाला दुष्ट रावणाचा संहार दसऱ्याला केला. याची हर्षता कायम ठेवतांना मनातील रुष्टता खंतच्या स्वरुपात लोकगीतातून मांडलेली आहे. त्याचप्रमाणे पूर्वी दसऱ्याला रेड्याचा बळी खानदेशातील ग्रामीण भागात दिला जाई याचा उल्लेख वरील लोकगीतातून व्यक्त होतांना दिसतो.

दसरा या सणाप्रमाणेच दिवाळी या सणाला खानदेशात महत्वाचे स्थान आहे. प्रभूरामचंद्र चौदा वर्षाचा वनवास संपून आपल्या आयोध्या नगरीत परत आलेत. त्यावेळी समस्त प्रजेने दिप लावून आनंद साजरा केला. रामायणापासून आजगायतपर्यंत हा लोकोत्सव साजरा केला जातो. या उत्सवाची सुरुवातच 'वसुबारस' सणापासून प्रारंभ होतो. गाय आणि वासारच्या अंगी असणारी उदारता, प्रसन्नता, शांतता त्याचबरोबर ज्यांच्यावर संपूर्ण शेतीची मशागत अवलंबून असते. अशा बैलाची व जिच्या पोटात छत्तीस कोटी देव असतात अशा गोमातेची पूजा ही याच दिवशी केली जाते. खानदेशातील ग्रामीण भागातील स्त्री लोकगीततून या सणाचे महत्म्य पुढील लोकगीतातून व्यक्त करतात.

*''कर करात रे रेडू गाय शी माडीला खेडू*
*खेड पुतीत रे नांद्या बैल डकारे पांड्या*
*पांड्या बेलाचे लासन नी घोडीन बासण*
*नि घोडीन्या खराडा गाई आणल्या पराडा''*

अशा प्रदीर्घ लोकगीतेतून वसूबारसचे महात्म्य सूचित केले आहे. त्याचबरोबर वसुबारस नंतर धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, दिवाळी, पाडवा आणि भाऊबीज याविषयी खानदेशात अनेक लोकगीते गायली जातात. विस्तार अभावी टाळलेले आहे.

**समारोप**

खानदेशातील लोकवाङमयाचा फार मोठा ठेवा आहे. खानदेशातील लोकगीतातून लोकजीवन सुकर करण्यासाठी सण उत्सवाला फार महत्वाचे स्थान आहे. या निमित्ताने लोक सामूहिकरित्या एकत्र येऊन आनंद साजरा करतात. लोकाचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टीने लोकगीतातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अक्षय तृतीया (आखाजी), पोळा (पोया), दसरा–दिवाळी यासारखे लोकोत्सव खानदेशात आनंदाने साजरे करतात. कारण दिवाळीच्या सणाच्या वेळेस सुगीचे दिवस असतात. शेतातील अन्न धान्य घरात येवून समृध्दी अलेली असते. आखाजी सारख्या सणाच्या माध्यमातून सासुरवाशीण स्त्री आपल्या मनातील भाव–भावनांचा आविष्कार लोकगीताच्या माध्यमातून व्यक्त करतांना जाणवतात.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**निष्कर्ष**

१) खानदेशातील सण-उत्सव विषयक लोकगीते ही अंत:करणातून व्यक्त होतांना त्यात लोकसमूहाचा उत्स्फूर्त आविष्कार दिसतो.

२) खानदेशातील सण-उत्सव विषयक लोकगीत ही श्रमपुर्ण असून कंठातून बाहेर पडणारा हुंकार असतो.

३) खानदेशात लोकगीते हे सण उत्सव प्रसंगी म्हटले जात असले तरी त्यातून तिथला प्रदेश चाली-रिती, रुढी, परंपरा, समाज जीवनाचा प्रभाव यातून स्पष्ट होतांना दिसतो.

४) लोकगीत हे लोकांनी निर्माण केलेले असते. म्हणजेच त्यांच्या बोलीभाषेतून निर्माण होते. म्हणून खानदेशातील सण-उत्सव विषयक लोकगीतांवर खानदेशी बोली भाषेचा प्रभाव दिसतो.

**संदर्भ सूची :**

१) डॉ. बाबर सरोजिनी, श्रावण भाद्रपद, प्रस्तावना, महाराष्ट्र लोकसाहित्यमाला पुष्प २५ वे, प्र.आ. १९८५, पृ.क्र.१५

२) खोले ग. शं., 'भारतीय तीर्थ क्षेत्र', इंद्रायणी प्रकाशन, पुणे, १ ऑगस्ट १८८५, पृ.क्र. ४४६

३) सोपान देव चौधरी, 'बहिणाबाईची गाणी', सुचित्रा प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती १९९८-२०००, पृ.क्र. ४८

४) डॉ. हिरालाल पाटील, धुळे जिल्ह्यातील हाटकर जमातीतील लोकगीते (शोध निबंध) अक्षर वैदर्भी, अमरावती २००७

५) सोपान देव चौधरी, 'बहिणाबाईची गाणी', सुचित्रा प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती १९९८-२००० पृ. क्र. ४६

६) संपा. जोशी महादेव शास्त्री, 'भारतीय संस्कृती कोश', खंड-४, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे १९६७

७) प्रा. डॉ. हिरालाल पाटील, धुळे जिल्ह्यातील 'हाटकर' या भटक्या जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास, (विद्यावाचस्पति प्रबंध) पृ. क्र. १३२

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील वृत्तपत्रांच्या माध्यमातून झालेल्या समाज सुधारणा

**प्रा.डॉ. सुनिल चंद्रकांत अमृतकर**
सहाय्यक प्राध्यापक,
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

**प्रास्ताविक**

'श्रध्दावान लभते ज्ञानम्' असे म्हटले जाते. पण श्रध्दा आणि अंधश्रध्दा यांच्यातला फरक ओळखायचा कसा? श्रध्देने ज्ञान मिळते आणि ज्ञानाने अंधश्रध्दा दूर जातात, ज्ञान हा बुध्दीचा प्रांत तर श्रध्दा-अंधश्रध्दा हा मनाचा प्रांत असे आपण समजतो. श्रध्दा काय किंवा अंधश्रध्दा काय बुध्दीच्या कसोटीवर घासून ठरत नसतात. कारण बौध्दिक समाधानापेक्षा माणूस मानसिक समाधानावर अधिक विसंबून असतो.

एकोणिसाव्या शतकात खानदेशात सुधारणांच्या दृष्टीने निश्चित असे कार्य घडत नसले तरी मुंबई इलाख्यातील सामाजिक सुधारणांचे पडसाद खानदेशात उमटत होते. खानदेश वैभव, प्रबोधचंद्रिका, दलित सेवक, मुमुक्षु, कलादर्श, भारत यासारख्या खानदेशातील वृत्तपत्रांच्या माध्यमाने जागृती होऊन हळूहळू येथील सामाजिक बदलाची पार्श्वभूमी तयार होत गेली. या पार्श्वभूमीचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे. सामाजिक प्रबोधनात खानदेशातील वृत्तत्रांनी अंधश्रध्दा दूर करण्याकरिता केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतलेला आहे. बुवाबाजी, जप तप, बळीप्रथा, धार्मिक कर्मठपणा इत्यादी मुद्यांच्या अनुषंगाने अंधश्रध्दा दूर करण्याकरिता केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतलेला आहे.

**उद्देश :**

१. खानदेशातील वृत्तपत्रांच्या माध्यमातून झालेल्या समाज सुधारणा चळवळीचा आढावा घेणे.
२. अंधश्रध्दा नष्ट करण्याकरिता समाज सुधारक म्हणून वृत्तपत्रांच्या भूमिकेचे मूल्यांकन करणे.
३. वृत्तपत्रे हे प्रबोधनाचे अग्रदूत आहेत हे सिध्द करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता तथ्यांची मांडणी करून संशोधकाच्या मतप्रतिपादनासाठी निगमन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्याबरोबरच प्रस्तुत विषयासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा देखील वापर केला असून त्याकरिता समकालिन अनेक वृत्तपत्रांचा याकरिता प्राथमिक साधन म्हणून वापर करण्यात आला आहे. तसेच इतर दुय्यम साधनांचा देखील उपयोग केला आहे.

**विषय विवेचन**

जगातील प्राचीन संस्कृत्यांपैकी हिंदू संस्कृती ही एक असून प्रगत व आदर्श संस्कृती होती. परंतु कालपरत्वे तिच्यात काही मूलभूत बदल होत गेले. श्रध्देची जागा अंधश्रध्देने घेतली. पूजा-पाठाची जागा कर्मकांडांनी घेतली. मानवाच्या कल्याणाकरिता पशूबळी देण्यास सुरुवात झाली. प्रत्येक वाईट घटनेमागे मग ती घटना निसर्गाशी संबंधित असो वा व्यक्तिच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित असो. त्यामागे दैववादाला स्थान मिळू लागले आणि यातून मुक्ततेकरिता अनेक धार्मिक कर्मकांडे केली जाऊ लागली. उत्तर वैदिक काळानंतर यांचे प्रमाण फार वाढले. समाज पूर्णत: पुरोहित वर्गाच्या आहारी गेला. अशा कर्मकांडांवर आधारित समाज परिवर्तन करण्याचे, त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य इ.पू. सहाव्या शतकात भगवान गौतम बुध्द, भगवान महावीर यांनी केलेले दिसून येते. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर काही वर्षातच जैसे थे परिस्थिती निर्माण होऊ लागली. हिच परिस्थिती मध्ययुगीन काळात देखील अस्तित्वात असलेली आपणास दिसून येते.

आधुनिक काळात ब्रिटिश शिक्षण पध्दतीमुळे कर्मकांड, अंधश्रध्दा यांना तडे जाऊ लागले. अंधश्रध्देला आळा घालण्याचा प्रयत्न अनेक समाजसुधारकांनी व सामाजिक सुधारणा चळवळींनी केलेला दिसतो. समाजसुधारकांच्या प्रयत्नांना, विचारांना वृत्तपत्रांनी देखील प्रोत्साहन व पाठबळ दिले. आपल्या वृत्तपत्रातून जनतेचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. यात खानदेशातील वृत्तपत्रेही मागे नव्हती. खानदेशातील वृत्तपत्रांनी समाजप्रबोधनाचे कार्य करुन खानदेशी समाजाला एकत्र आणण्याचे महान कार्य केले.

खानदेश म्हणजे बहुतांशी आदिवासी व मागास जाती-जमातींचे वास्तव्य असलेला भूप्रदेश होय. या वर्गात साक्षरतेचा अभाव असल्यामुळे हा वर्ग अंधश्रध्दांना मोठया प्रमाणावर बळी पडलेला होता. आर्थिक व सांस्कृतिक दृष्टयाही हा वर्ग मागासलेला होता. खानदेशातील बहुसंख्य जनता ही शिक्षणापासून वंचित होती. कारण धुळे, अमळनेर, जळगाव या शहरां व्यतिरिक्त शिक्षणाची फारशी सोय नव्हती. ग्रामीण भागातील बहुसंख्य जनता बुवाबाजी सारख्या गोष्टींना बळी पडत असे. म्हणूनच या अशिक्षित, भोळया जनतेला अंधश्रध्दांच्या श्रृंखलातून बाहेर काढण्याचे महत्वपूर्ण सामाजिक कार्य खानदेशातील वृत्तपत्रांनी केलेले दिसून येते. जनतेच्या भोळवट, स्वभावाचा फायदा काही बुवा लोक घेत. अशाप्रकारच्या बुवाबाजीला आळा घालणारे व खानदेशी जनतेचे प्रबोधन करणारे लेख कलादर्श या वृत्तपत्रातून वाचावयास मिळतात.

''...अंधश्रध्दा ठेवू नका असे कितीही सांगितले तरी ज्या अर्थी संसारातली दु:खनिवृत्ती होत नाही आणि दु:खे सहन करण्याची पात्रता माणसाने जोपर्यंत अंगी आणली नाही तोपर्यंत तो कमकुवत राहणार आणि याचा फायदा ढोंगी लोक घेणारच....आत्मविश्वासाची जाणीव जोपर्यंत झाली नाही परप्रत्ययनेच बुध्दी जोपर्यंत आमच्यामध्ये आहे तोपर्यंत फसव्या व ढोंगी गुरूंचे फावणारच!...''[१] मनुष्य परावलंबी होतो तो त्याच्यात असलेल्या आत्मविश्वासाच्या अभावामुळेच. जोपर्यंत त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होत नाही तोपर्यंत तो असल्या साधू-संतांच्या बुवाबाजी, चमत्कार यावर विश्वास ठेवणार. यामुळेच कलादर्श वृत्तपत्र हे लोकांमध्ये आत्मविश्वास जागवण्याचा प्रयत्न करतांना दिसून येते.

उद्योगधंद्यांचा व औद्योगिकरणाचा अभाव असल्याने खानदेशातील जनतेचा प्रमुख व्यवसाय हा शेती व शेती संलग्न दुय्यम व्यवसाय हेच होते. यामुळे जनतेला निसर्गावर अवलंबून रहावे लागे. नैसर्गिक कालचक्रातील बदलांमुळे जनतेच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण होत असे. त्यातून ते अंधश्रध्दांना बळी पडत असते. नैसर्गिक आपत्या ह्या मनुष्याच्या पाप-पुण्यांमुळे निर्माण होत नसून तो निसर्गचक्राचा एक भाग आहे. याबाबत दलित सेवक हे वृत्तपत्र लिहिते की, ''...ज्यांना आपण नैसर्गिक आपत्ति म्हणतो, त्या निसर्गाच्या घडामोडी आहेत....अवर्षण, वादळ, महापूर, भूकंप किंवा ज्वालामुखी स्फोट यांचा तडाखा केवळ माणसांनाच भोवतो असे नाही, तर जनावरे व जंगलातील पशुपक्षी यांनाहि भोवतो. माणसांनी बरी-वाईट कामे केली असतील, पण जनावरे,पशु,पक्षी यांनी तर केली नाहीत ना? मग त्यांना तडाखा का?...''[२]

खानदेशात परंपरागत समाजात बळी देण्याची प्रथा बऱ्याच पूर्वीपासून रुढ असलेली दिसून येते. आपल्या अपेक्षित आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, केलेला नवस फेडण्यासाठी बळी देण्याची प्रथा पिढयांपिढया खानदेशातील समाजात रुढ झालेली दिसते. यासंबंधी सुधारणावादी भूमिकेतून बाळूभाई मेहता यांनी साप्ताहिक भारत ह्या वृत्तपत्रात आपली भूमिका मांडलेली दिसते. ''...कोणत्याही प्राण्याची हिंसा करणे त्या देवतेला किंवा संताला कधीही मान्य होणे शक्य होणार नाही...स्वत:ला भक्त म्हणवून घेणाऱ्या क्रूर आणि तामसी लोकांनी धर्माचे खरे रहस्य न ओळखता आपल्या जिव्हा लवल्यासाठी ही हत्या चालू राहावी, ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. या हत्येला कायद्यानेच बंदी घातली पाहिजे...''[३] याठिकाणी बळीप्रथा बंद करण्याकरिता कायद्याचा आधार घेण्यावर भर दिलेला दिसून येतो.

पुरोहितांनी जर ठरविले तर समाजाचे मतपरिवर्तन होऊ शकेल. पुरोहितांनी जर पशुबळी अनैतिक असल्याचे सांगितले तर लोकही त्याला अनैतिक मानतील आणि पशुबळी सारखी वाईट प्रथा दूर होईल असे जनप्रबोधनपर लिखाण मुमुक्षु या साप्ताहिकात ल.रा.पांगारकर दिसून येतात. ''...यज्ञांत पशुवध करू नये तर आलभनविधि करावा, म्हणजे देवतोद्येशाने पशूचे अंगस्पर्श करून त्यास सोडून द्यावे, किंवा पिठाचा पशु करून त्याचे हवन करावे, पण हिंसा करू नये अशी आमची येथील दीक्षितांस नम्रतेची प्रार्थना आहे...''[४]

व्यक्तिच्या वैयक्तिक लाभापायी अस्तित्वात आलेल्या खुळचट धार्मिक कल्पना, अनिष्ट सामाजिक प्रथा, वाईट चालीरिती अशा अनेक कारणांमधून अनेक निरपराध प्राणीमात्रांची धार्मिक अंधश्रध्देपायी हत्या केली जाते हे नैसर्गिक नितीनियमांना धरून नाही. अशाप्रकारे प्राणीहत्या करून व्यक्तिचा विकास होऊ शकत नाही. ह्या केवळ मनाच्या समजुती आहेत. तेव्हा आपल्या उन्नतीकरिता आपण जे पशूबळी देतो ते अयोग्य आहे. हे स्पष्ट करण्याकरिता दलित सेवकात काकासाहेब बर्वे लिहितात, ''...जत्रा मुख्यत: देवीच्या उत्सवानिमित्त भरतात आणि तेथे नवस फेडण्यासाठी शेकडो जीव बळी दिले जातात! ...देवीच्या नावाने कोंबडी-बकरी अर्पण केली जाते म्हणजे देवी प्रसन्न होते, ही एक खुळी कल्पना आहे. प्राचीन काळी भौतिक ज्ञान फारसे झालेले नव्हते, सृष्टीतील चमत्कारिक वाटणाऱ्या घटनांचा शास्त्रीय अर्थ कळत नव्हता. परंतु भौतिक सुधारणेच्या हल्लीच्या काळात हजारो लोकांनी क्षुद्र गोष्टींसाठी एखाद्या मूर्तीशी करारमदार करावेत आणि ते पुरे करण्यासाठी धर्माच्या नावावर गरीब जीवांची हत्या करावी, ही गोष्ट शोभणारी आहे काय?...''[५]

धार्मिक कर्मठपणा, अंधश्रध्दा, बुवाबाजीवर आपल्या लिखाणातून हल्ला चढविण्या बरोबरच खानदेशातील वृत्तपत्रांनी दांभिकपणा, पांडित्य दर्शन, बाह्य अवडंबर यांना फाटा देऊन, अगदी साधे जीवन जगण्यावर भर दिलेला दिसून येतो.

**सारांश**

खानदेशातील वृत्तपत्रांनी केवळ राजकीय चळवळीलाच प्रोत्साहन दिले असे नाही तर सामाजिक चळवळीला देखील पोषक असे वातावरण निर्माण केले. केवळ राजकीय प्रबोधनाला अग्रक्रम दिला असे नाही तर सामाजिक प्रबोधनाला देखील अग्रक्रम दिला हेच आपल्याला वरील काही मुद्यांचा आधार घेऊन स्पष्ट झालेले दिसून येते. एकंदरीत विचार करता खानदेशातील वृत्तपत्रांनी अंधश्रध्दा, बुवाबाजी अशा सामाजिक विषयांसंदर्भातील लिखाण आपल्या वृत्तपत्रातून करुन खानदेशातील जनता ही महाराष्ट्रातील तसेच भारतीय सामाजिक सुधारणेच्या चळवळीत बरोबरीने वाटचाल करु शकली आणि खानदेशातील जनतेला अनेक वाईट अशा सामाजिक चालीरिती, रूढी-परंपरांपासून मुक्त करू शकले.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची :**

१. कलादर्श, १५ जून १९३३, 'कलादर्शाची स्पष्टोक्ती' या सदरातील पृ.२८.
२. दलित सेवक, १ एप्रिल १९५३, 'एक नम्र मतभेद' या लेखात वि.न.बर्वे, समाजरचना व विवेकनिष्ठा–दलितसेवक मधील लेखांचा दुसरा खंड पृ.५९
३. भारत, ५ डिसेंबर १९३९, पृ.५
४. मुमुक्षु, वर्ष १, अंक २, 'यज्ञ' या लेखात ल.रा. पांगारकर, मुमुक्षुचे उद्‌गार अर्थात 'मुमुक्षुंतील निवडक लेख', भाग १, लॉ प्रिंटिंग प्रेस,पुणे १९०८ पृ.२७–२८.
५. दलित सेवक, १५ एप्रिल १९४९, 'यात्रा व जत्रा यांची गर्दी' या लेखात वि.न.बर्वे, समाजरचना व विवेकनिष्ठा–दलितसेवक मधील लेखांचा दुसरा खंड पृ.६८

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# धुळे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्याचा आर्थिक जीवनावर पडलेला प्रभाव - एक ऐतिहासिक अभ्यास (१९६५-१९९८)

**प्रा. किशोर शिवलाल पाटील**
धनदाई कला आणि विज्ञान महाविद्यालय, अमळनेर.
**प्रा.डॉ. डी.एन. वाघ**
प्रताप महाविद्यालय, अमळनेर.

**प्रस्तावना**

प्रत्येक देशाच्या विकासात सहकारी क्षेत्राचे अनन्यसाधारण असे योगदान आहे. तद्वतच भारताच्या विशेषत: महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रात साखर कारखानदारीला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. अजून साखर कारखाने सहकार चळवळीचे मानदंड ठरले आहेत. त्यामुळे या उद्योगाच्या माध्यमात आर्थिक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आला आहे. सहकारी साखर कारखान्यांमुळे महाराष्ट्राचा केवळ आर्थिक विकासच झाला नाहि तर ग्रामीण भागाची मानसिकता बदलली, या कारखान्यांमुळे आर्थिक सुबत्ता, आधुनिक जिवन शैली, राहाणीमानातील बदल, रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी, आधुनिक शिक्षण या सारखी फळे चाखावयास मिळाली त्यात धुळे जिल्हाही अपवाद राहीला नाही.

**उद्दिष्टे**

१) सहकारी साखर कारखान्यांचा आर्थिक जीवनावर पडलेल्या प्रभावांचा अभ्यास करणे.
२) ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासात सहकारी साखर कारखान्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

१) ऐतिहासिक व सामाजिक संशोधन पद्धती
२) सर्वेक्षण पध्दती
३) विषयाशी संबधीत व्यक्तींच्या मुलाखती

**विषयाची व्याप्ति – धुळे जिल्हा**

महाराष्ट्रात साखर उद्योगाला स्वातंत्र प्राप्तीनंतर चालना मिळाली. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी १९५०-५१ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे प्रथमच सहकारी तत्वावर साखर कारखाना सुरु केला. या कारखान्याच्या यशाने राज्यात सहकारी साखर कारखाने सुरु करण्यास चालना मिळाली.

ग्रामीण भागाची कायापालट घडवून आणण्यामध्ये सहकार चळवळीचे मोठे योगदान आहे. सहकाराच्या चळवळीच्या माध्यमातून धुळ्यासारख्या विकासापासून वंचित राहिलेल्या सहकारी साखर कारखान्यां मार्फत औद्योगिक क्रान्ति घडून आली त्यामूळे धुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळून ग्रामीण भागास झळाळी मिळाली. १९६० नंतरच्या दशकात धुळे जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील काही मंडळींनी सहकारी साखर कारखाने उभारण्यास प्रयत्न सुरु केले त्यातूनच धुळे जिल्ह्यात १९६५ नंतरच्या कालखंडात श्री. सातपूडा तापी परिसर सहकारी साखर कारखाना लि. , शहादा पुरुषोत्तम नगर , श्री. पांझरा कान सहकारी साखर कारखाना लि. भाडणे, शिरपूर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिवाजीनगर, दहिवद, श्री. संजय सहकारी साखर कारखाना विजयनगर यासारखे सहकारी साखर कारखाने उभे राहीलेत.या कारखान्यांनी आपापल्या परिसरात आर्थिक चैतन्य निर्माण करण्याची कामगिरी बजावली. या कारखान्यांमुळे शेतकरी , कामगार व ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास घडून आला.

महाराष्ट्र राज्य सहकारी बॅकेचे उपाध्यक्ष निलेश सरनाईक म्हणतात की, राज्यातील रोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी साखर कारखायांनी मोठया प्रमाणात हातभार लावला असून एक मध्यम आकाराचा कारखाना सुमारे पाच-सहा हजार व्यक्तींना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळवून देतो१ वरील विधानाचा संदर्भ घेतला असताना धुळे जिल्हयातील या चार कारखान्यांनी २४ हजार लोकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार मिळवून दिला त्यातून धुळे जिल्हयाच्या आर्थिक विकासात मोठया प्रमाणात हातभार लागल्याचे दिसून येते.

साखर कारखान्यासाठी आवश्यक असणारी मुख्य गोष्ट म्हणजे उसाचे क्षेत्र व उत्पादन वाढविण्यासाठी श्री पांझर कान सहकारी कारखान्याने शेतकऱ्यांना चागल्या प्रतीचे बेणे उपलब्ध व्हावे म्हणून पाडेगाव येथून बेणे आणून कारख्यान्याने नर्सरी सूरू केली.२

आपापल्या कार्यक्षेत्रात ऊ स पिकाची उपलब्धता होण्यासाठी जवळजवळ सर्वच कारख्यान्यानी प्रयत्न केले त्यातून मोठया प्रमाणात उत्पादन वाढून शेतकऱ्यांचा मोठया प्रमाणात फायदा झाला.

ऊस पिकासाठी पाण्याची मोठया प्रमाणात आवश्यकता असल्यामुळे सर्वच कारख्यान्यानी मोठया प्रमाणात प्रयत्न केलेत त्यात श्री सातपुडा तापी परिसर सहकारी कारख्यान्यानी उपसा जलसिंचन योजनेतुन कोरीर सुजाळपूर, प्रकाशा-वाफेरा,हाट मोहीदा, आराळे ओसर्ली सुरू केल्यात त्यातून बागायतीचे क्षेत्र पुढील प्रमाणे वाढले.३

ISSN : 2348-7143
Dec. 2018

| अ.न. | योजनेचे नाव | बागायत क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|
| | | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ |
| | | एकर-गुंठे | एकर-गुंठे | एकर-गुंठे |
| १ | कोरीर सुजाळपूर | २०३.०० | ४३४.३२ | ६१४.०२ |
| २ | प्रकाशा-वाफेरा | १७७.०३ | ३५३.०९ | ४५१.०३ |
| ३ | हाट मोहीदा | १५८.०७ | १७०.१९ | ३१२.०० |
| ४ | आराळे ओसर्ळी | ६७.३८ | ६२.३४ | ७६.०५ |

उपसा सिंचन योजनेमुळे शेतकऱ्यांना इतर पीकांसाठी देखील मोठया प्रमाणात फायदा होवून त्यांचा आर्थिक उत्पन्नात मोठया प्रमाणात भर पडली. शिरपूर शेतकरी सहकारी कारखाना, दि संजय सहकारी कारखाना यानी देखील आपल्या कारखान्याचे क्षेत्र ओलीताखाली येण्याच्या दृष्टीकोनातुन बोअरिंग,उपसाजल सिंचनाच्या माध्यमातुन मोठया प्रमाणात प्रयत्न केले.

शिरपूर सहकारी कारखान्याने ऊसावरील कीड प्रादुर्भाव रोखण्यासाठी सभासदांना मोठया प्रमाणात मदत केली त्याचप्रमाणे माती परीक्षण,युरीया खत वाटप या सारख्या योजना राबवन्यात आल्या.४ त्यातून शेतकऱ्यांचा मोठया प्रमाणात फायदा होवून उत्पादनात वाढ झाली.

अदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी त्यांना ऊस वहातुकीसाठी मोठया प्रमाणात टायरगाडया पुरवण्यात आल्यात.५

श्री सातपुडा-तापी परिसर कारखान्याचे चेअरमन सहकार महर्षी आण्णासाहेब पी.के.पाटील यांनी गरीब अदिवासी समाजाला देखील रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीकोनातून सवलती मध्ये ऊस वहातुकीसाठी टायरगाडया पुरविल्या त्यातून अदिवासी बांधवांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले. सभासद बंधूना शेतीसाठी ट्रॅक्टर खरेदी करता येणे शक्य व्हावे या साठी स्टेटबॅक ऑफ इंडियाच्या सहकार्याने कर्जा साठी श्री पांझरा कान सहकारी साखर कारखान्याने प्रयत्न केलेव त्यातून सभासद बांधवांनी १९७७-७८ मध्ये वीस ट्रॅक्टरसाठी कर्जपुरवठा मंजूर करून घेतला.६

शेतकऱ्यांना आधुनिक शेती करता यावी व ऊसवहातूकी साठी ट्रॅक्टर्स उपलब्ध व्हावेत या दृष्टीकोनातून सर्वच कारखान्यांनी प्रयत्न केलेत त्यातून शेतकऱ्यांच्या विकासास मोठया प्रमाणात हातभार लागला. सभासदांना दु?यम रोजगाराचे साधन असावे म्हणून सातपुडा तापी, पांझरा कान, दि शिरपूर सहकारी कारखाना, या सहकारी कारखान्यांनी सभासदांना पशुपालनासाठी गाय,म्हशी घेण्यासाठी आर्थिक सहकार्य केले. सभासदांना सर्वच कारखान्यांनी वर्षा अखेरीस ५० किलो साखर सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली.

सहकारी साखर कारखान्यांमुळे कर्मचारी कामगारांना नियमित पगार मिळून मुलांच्या उच्च शिक्षण, सामाजिक प्रतिष्ठा, चांगली जीवनशैली प्राप्त होवून परिसरातील बाजारपेठेत चलन फिरण्यास मदत झाली.७

सहकारी साखर कारखान्यांमुळे फक्त शेतकऱ्यांचा नाही तर कामगारांना व कर्मचाऱ्यांना देखील जीवनावश्यक वस्तुबरोबर मुलांच्या शिक्षण आरोग्यावर खर्च करता आला तसेच कारखान्यांमुळे मोठया प्रमाणात व्यापाराला चालना मिळाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

१) ग्रामीण भागाचे जीवनमान समृध्द करण्यात सहकारी कारखान्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.
२) सहकारी कारखान्यांमुळे शेती सिंचनाखाली येण्यासाठी मोठया प्रमाणात मदत झाली.
३) सभासद शेतकरी बांधवांना पशुपालनया दु?यम व्यवसायासाठी मदत झाली.
४) ग्रामीण अदिवासी बाधवांना रोजगारासाठी संधी उपलब्ध झाल्यात.
५) सभासदांबरोबर कामगार-कर्मचारी यांना देखील आर्थिक लाभ मिळाला.
६) सहकारी साखर कारखान्यांमुळे व्यापाराला चालना मिळाली.

**संदर्भ सूची :**

१) निलेश सरनाईक (संपा) सतफलाह सहकारिता, डी.एम.मोहोळ आक्टोंबर २०१० पृष्ठ क्रं.१८८ मदर्स ग्राफीक मुंबई
२) पांझरकान सहकारी कारखाना लि.भाडणे अहवाल १९७०-७१ जयसिंग अहिरराव,पृष्ठ क्रं.५
३) श्री.सातपुडा तापी परिसर सहकारी कारखाना लि.पुरूषोत्तम नगर अहवाल १९७४-७५ पी.के.पाटील पृष्ठ क्रं.४
४) सुरेश बाबुराव पाटिल (मुलाखत) दि.८/०५/१८
५) श्री सातपुडा तापी परिसर सहकारी कारखाना लि.पुरूषोत्तम नगर अहवाल १९७४-७५ पी.के.पाटिल पृष्ठ क्रं.३
६) पांझराकान सहकारी कारखाना लि.भाडणे अहवाल १९७७-७८ रामराव जिताराम पाटील पृष्ठ क्रं.१४
७) अहिराव प्रकाश सोनू मुलाखत दि.१०/६/१८

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील धरणगावमधील रथोत्सव : एक सांस्कृतिक इतिहास

**प्रा. संजय बी. शिंगाणे**
इतिहास विभाग प्रमुख, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
धरणगाव, जि. जळगाव.

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्राच्या इतिहासात धरणगाव कसब्याला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. मोगलांच्या काळात व्यापारासाठी प्रसिद्ध हे केंद्र होते.[१] कापूस व धान्य असलेली ही बाजारपेठ होती. इतिहासाचार्य वि.का. राजवडे मंडळाच्या संग्रही असलेल्या एरंडोल कागदपत्रावरुन सामाजिक आणि आर्थिक इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या अनेक बाबी स्पष्ट होतात.[२] ब्रिटिशांची व्यापारी वखार धरणगावला होती.[३] ब्रिटिश काळातील खानदेशात धरणगाव हे धुळे शहरानंतर महत्त्वाचे शहर होते. बारा बलुतेदार पध्दती अस्तित्वात होती. एरंडोल परगणा स्वयंपूर्ण होता. एरंडोल परगण्यातील धरणगाव व्यापाराचे प्रमुख केंद्र होते तसेच हे केंद्र पारोळा, भडगाव, अमळनेर व चोपडा या व्यापारी केंद्राशी जोडले गेले होते. धुळे जिल्ह्याच्या ठिकाणावरुन खानदेशचा कारभार पाहिला जात होता. पूर्व खानदेशातील कायदा व सुव्यवस्था धुळयावरुन पाहणे कठीण जात असल्यान्ने धरणगाव हे सर्व दृष्टीने सोयीचे व मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे धरणगावची व्यापारी वखार व आर्मी हेडकॉर्टर स्थान म्हणून्न निवड केली.[४] अंतर्गत परदेशी व्यापार भरभराटीला आला होता. नावाच्या कापडाला मागणी होती.[५] त्यामुळे दळणवळण व व्यापारात वाढ झाली होती हे आतापर्यंतच्या इतिहास संशोधनातून स्पष्ट होते म्हणन या बाबत अधिक शोध घेवून खानदेशातील धरणगावमधील जातीय सलोखा व सर्व धर्म समभाव जोपासणाऱ्या सांस्कृतिक इतिहासाला चालना देणाऱ्या धरणगावातील रथोत्सव हा विषय शोध निबंधसाठी निवडला आहे.

खानदेशात बालाजी या देवतेचे अस्तित्व आणि तिची उपासना मोठ्या प्रमाणात दिसून येते. यालाही प्राचीन परंपरा दिसते. बालाजी हे भालदेव या नावाने रुढ आहे. महाराष्ट्रात या देवतेची प्रतिमा काही असली तरी ते खान्नदेशात मात्र धन्नधान्य, दुधदुभत्या व विपूल जंगलांची देवता म्हणन शेतकरी वर्गात मानली जाते व त्याची पूजा केली जाते.[६] परंपरागत रुढीमध्ये त्याचे प्रतिबिंब दिसून येते. ही देवता वैदिक विष्णू आणि सुर्य या दोन्ही देवतांच्या अस्तित्वाचे एकत्रित दर्शन येथे घडते. दुधदुभत्याची देवता म्हणुन मान्यता पावलेल्या या देवतेला दुभत्या जनावराच्या एका दिवसाचा दुधाचा नैवेद्य दाखविला जातो. त्याला कटाह प्रसाद म्हणतात. तसेच शेतातील खळ्यातही या देवतेची पूजा बांधतात. होणाऱ्या धान्यराशीतून सव्वाशेर, अडीचशेर धान्याचा वेगळा ढीग करतात. त्याला बालाजी करणे म्हणतात.[७]

नवरात्र हा देवीचा उत्सव तरीही त्या देवतेत या देवतेच्या प्रथेने शिरकाव केला. नवरात्रच्या पहिल्या दिवसापासून भालदेव बसला असे म्हणतात. त्या दिवसापासून दुधदुभते शेतकरी विकत नाही. दारापुढे गोमयाचा भालदेव करुन त्याची पूजा करतात. काही संशोधकांनी या देवतेचे साम्य असीरियन व बाबिलोनियत लोकांच्या 'बाडल' या देवतेशी दर्शविले आहे.[८] प्राचीन संस्कृतीतील कृषी समृद्धीची साम्यता असावी असे म्हणावयास हरकत नाही यावरुन खानदेशातील प्राचीन देवता व रुढीचा मागोवा आजच्या बालाजी रथापर्यंत येवून पोहोचतो हे मात्र खरे.

खानदेशमध्ये रथ यात्रांची, रथोत्सवाची पद्धत मोठ्या प्रमाणावर आहे. एक दोन अपवाद वगळता सर्व रथयात्रा ह्या बालाजी मंदिरांच्याच काढल्या जातात. बहुसंख्य बालाजी मंदिराच्या रथयात्रा खानदेशात काढल्या जातात. रथयात्रा हे खानदेशाचे वेगळेपण आहे. रथयात्रांची परंपरा साधारणः गेल्या २००-२५० वर्षातीलच आहे. यापेक्षा त्यांचा जुना उल्लेख मिळत नाही. सध्या ज्या मंदिराच्या रथयात्रा निघतात त्यात धरणगांवच्या बालाजी रथयात्रा १२५ वर्षा पासुन अखंड चालू आहे. अश्विन शुद्ध एकादशीस धरणगावचा रथ निघतो तसेच जळगांव, पारोळा, चोपडा, शेदुर्णी ,अमळनेर, पिंप्राळा, पिंपळगाव हरेश्वर, देवप्रिंप्री नगरदेवळे, बहादरपूर इ. गावात रथ निघतात जळगांव जिल्ह्यात बारा रथ निघतात.

धरणगावातील बालाजीचा रथोत्सव गावकऱ्यांचे श्रद्धास्थान्न आहे. नवरात्रात या रथ यात्रेची सुरुवात होते.[९] स्वातंत्र्य पूर्व काळात धरणगाव येथील प्रतिष्ठित श्रीमंत कै. वेडू नारोबा वाणी या दानशुर व धार्मिक वृत्तीच्या वाणी समाजातील व्यक्तीस स्वप्नात दृष्टांत बालाजी देवाने दिला. त्यानंतर बालाजी मुर्तीची प्रतिष्ठापना केली गेली. कै. शंकर इच्छाराम वाणी यांनी दानशुर पणे स्वत: श्री बालाजी महाराजाची मुर्ती बनवून तिची प्रतिष्ठापना करुन मोठे मंदिर बांधून दिले. तसेच मंदिरास मोठा भुखंड म्हणजे २४ बिघे जमिन बालाजी मंदिरास दिली. या जमिनीच्या उत्पन्नातून मंदिराचा खर्च भागविला जात होता. कै. शंकर इच्छाराम वाणी यांनी लाकडी रथ करण्यासाठी मंदीरास देणगी दिली. कै. रामचंद्र शिरसाठ व त्यांच्या परिवाराने रेखीव देवदेवता असलेला रथ तयार केला तसेच कै.अमृत नथ्थु शिरसाठ यांनी राजहंस, गणपती, दुर्गादेवी, पांडव, सभा इ. च्या मूर्ती घडविल्या.[१०]

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या मंदिराचे बालाजी संस्थान ट्रस्ट तयार करण्यात आले. या संस्थानाच्या माध्यमातून दरवर्षी नवरात्र उत्सवात बालाजीचा रथ निघतो. धरणगांवात एकूण १४ वहन निघतात. त्याचा क्रम असा गणपती, हत्ती, सुर्य, मोर, शेष, घोडा, दुर्गादेवी, मारुती, राजहंस, दसऱ्यास पालखी, गरुड, अंगद, पांडव सभा इ.११ भारतीय स्वातंत्र्या पूर्वी बालाजीची मुर्ती 'भोई' लोक डोक्यावर घेवून धरणगावातून मिरवणूक काढत होते. यावेळी प्रकाशासाठी न्हावी समाज मशाली धरण्याचे काम करीत होता तसेच मिरवणुकीत तुतारी, ढोल, ताश्या वाजविण्याचे काम गुरव समाज करीत होता. नंतरच्या काळात रथाची निर्मिती झाली व लाकडी मोगऱ्यांचा वापर करत होते. रथ ओढण्यासाठी पूर्वी सर्व समाजातील लोक ओढत होते. परंतु कालक्रमानुसार रथ ओढण्यासाठी बैलाचा वापर करण्यात येवू लागला. रथ ओढणाऱ्या बैलासाठी गावात प्रतिष्ठित लोक बोली लावतात. लिलाव होतो त्यामध्ये जो जास्त बोली लावेल त्याचे बैल बालाजीचा रथ ओढतो म्हणजेच हा मिळालेला पैसा बालाजी संस्थानात जमा होतो. गावाच्या प्रमुख रस्त्यांवरुन बालाजीचा रथ निघतो तसेच गावातील प्रत्येक गल्लीतून वेगवेगळ्या वहनाचा रथ काढला जातो. हे रथाचे वैशिष्ठ मानले जाते. धरणगाव व परिसरातील आठरा पगड जातीचे लोक व स्थानिक सरकारी अधिकारी या रथ यात्रेत परंपरेने सामील होतात. हे या रथयात्रेचे वेगळेपण आहे. काही रथयात्रांतून विशिष्ठ मुस्लीम समाजाच्या घराण्यालाही परंपरेने मान्य आहे. सर्व समाजाचे या रथयात्रेत योगदान असते त्यामुळे ही रथयात्रा एक लोकउत्सव होते म्हणून यास अधिकच महत्व प्राप्त झाले आहे. या रथाच्या परंपरेंने खानदेशी संस्कृतीत एक आगळेवेगळे महत्व प्राप्त झाले आहे.

१) **गणपती (ध्वजा)** – शुभ कामाची सुरुवात गणपती पूजनाने आपण करतो तसेच बालाजी वहनाची सुरुवात गणपती वहनाने होते. त्यास ध्वजा वहन असे म्हणतात. सर्व गावकऱ्याना संदेश देण्यासाठी ध्वजा फिरविला जातो.
**गणपती** – बालाजी मंदिर, जांजी बुवा, लोहार गल्ली, धरणी चौक, बालाजी मंदिर



२) **हत्ती** – बालाजी मंदिर, मराठे गल्ली, बजरंग चौक, बालाजी मंदिर



३) **सुर्य** – खानदेशात सुर्य उपासना होती. त्याचे अवशेष वाघळी येथील सुर्यमंदीर, सुर्यकन्या – तापी नदीला म्हणतात. सुर्यपत्नी राणुबाई-कानूबाई दिसते. यावरुन सुर्य हा प्रकाश देणारा व पिकांना जिवन देणारा म्हणून शेतकऱ्यांची भावना आहे.



४) **मोर** – बालाजी मंदिर, लोहार गल्ली, मोठा माळीवाडा, खत्री गल्ली, भाटिया प्रोव्हीजन धरणी चौक, बालाजी मंदिर



५) **शेष** – बालाजी मंदिर, मराठे गल्ली, धरणी चौक, कोट बाजार, बालकवी चौक, परिहार चौक, नेताजी रोड, धरणी चौक, बालाजी मंदिर



६) **घोडा** – बालाजी मंदिर, मराठे गल्ली, गुप्ता वाडा, मातोश्री कॉम्प्लेक्स, जैन्न गल्ली, धरणी चौक, कोट बाजार, धरणी चौक, बालाजी मंदिर



७) **दुर्गादेवी** – बालाजी मंदिर, धरणी चौक, भाटिया प्रोव्हीजन, जैन गल्ली, महाविर चौक, मातोश्री कॉम्पेक्स, पारधीवाडा, बालाजी मंदिर



८) **मारूती** – बालाजी मंदिर, जांजीबुआ, मोठा माळीवाडा, पाताल नागरी, लहान माळी वाडा, जयहिंद व्यायाम शाळा, कोट बाजार, धरणी चौक, बालाजी मंदिर



९) **राजहंस** – बालाजी मंदिर, महाविर चौक, मातोश्री कॉम्पलेक्स, धनगर गल्ली, हनुमान नगर, बालाजी मंदिर



**१०) दसऱ्यास पालखी –**



**११) गरुड –**



**१२) अंगद –**



**१३) पांडव सभा –**



**१४) रथ –**



**संदर्भ सूची :**

१) खानदेश गॅझेटिअर. १८८० पृष्ठ -४३९
२) डॉ.प्र.न.देशपांडे ,एरंडोल कागदपत्रे,राजवाडे संशोधन मंडळ हरिकमहोत्सव अंक, जानेवारी १९८८,पृ.४९
३) जळगाव जिल्हा गॅझेटीअर, १९९४, पृ.७७२
४) शतसांवत्सरी महोत्सव ग्रंथ, धरणगाव नगरपालिका,१९६६ पृ.१०
५) William Faster,The English factories in india(1618-1621), Page 93
६) खानदेशचा सांस्कृतीक इतिहास, संपादक डॉ.मु. ब. शहा, खंड ३ पृ.८९
७) उपरोक्त पृ.८९
८) खानदेशचा सांस्कृतीक इतिहास, संपादक डॉ.मु.ब.शहा,खंड ३ पृ.९४
९) The Development plan of Dharangaon,Report 1976, Page 20
१०) संकलन, हरी चत्रू महाजन (पहेलवान), धरणगाव.पृ.१ व २
११) डॉ.सर्जेराव भामरे, लोकदैवते व रथोत्सव, पृष्ठ-१६६

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खान्देशातील जैन समुदायाचा राजकिय आणि आर्थिक इतिहास

**प्रा.डॉ. विजय साहेबराव तुंटे**
संशोधन मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग, प्रताप महाविद्यालय, अमळनेर.
**प्रा. रघुनाथ कौतिक सोनवणे**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब पी.एस. वाडीले कला महाविद्यालय, थाळनेर.

**प्रस्तावना :-**

खान्देशामध्ये प्रामुख्याने आधुनिक काळामध्ये धुळे, नंदुरबार, जळगांव या तीन जिल्ह्यांचा समावेश होत असतो. या तिन्ही जिल्ह्यांमध्ये सर्व जाती, धर्माचे अनुयायी वास्तव्य करुन असतात. यामध्ये जैन संप्रदायाचे अनुयायी वास्तव्य करीत असतात. खर तर खान्देशामध्ये जैनधर्माचा प्रवेश प्राचीन काळातच झाला आहे. चंद्रगुप्त मौर्य यांच्या सत्ताकाळामध्ये उत्तर भारतात मोठा भयंकर असा दुष्काळ पडला. यामुळे जैनसंघाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न जैन आचार्य यांना भेडसावू लागला. त्यामुळे भद्रबाहु या जैन आचार्याने आपल्या जैनसंघातील अनुयांयासह स्थलांतर करण्यास सुरुवात केली. त्यासोबतच स्थुलभद्र नावाचे जैन आचार्य यांनीही नेपाल या देशाकडे प्रस्थान केले. तसेच भद्रबाहु यांनी आपला जैनसंघ दक्षिण भारताकडे नेण्याचा निर्णय घेतला, जेणे करुन जैनसंघातील अनुयायांची उपसमार होणार नाही. त्याच वेळेस जैनसंघाचा प्रवास खान्देशातुनच झाल्याने त्यांच्याकडून प्रबोधन झाल्याने काही व्यापारी वर्गातील लोकांनी जैनधर्माची दिक्षा घेतली. तेव्हापासुन तर आजपर्यंत खान्देशात जैनधर्म वाढतच राहीला.

आधुनिक काळात झालेले जैनधर्मियांचे आगमन हे राजस्थान या राज्यातुन झालेले आहे. या स्थलांतरालाही दुष्काळ ही एक मोठी गोष्ट कारणेभुत ठरली. खान्देशातील भंवरलाल जैन यांच्या घराण्याचे अठराव्या शतकातील आगमन हे एक त्याचे प्रमुख कारण होते. त्यानंतर हुमड दिगंबर समाजाचे आगमन मात्र गुजरात राज्यातील सतत अस्थिर राजकारणाचे वातावरण यामुळे झाले. खान्देशामध्ये आर्थिक आणि सामाजिक बाबतीत सक्षम असलेला हा समाज व्यापार, उद्योग यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतलेला आहे. शैक्षणिक क्षेत्रातही या समाजाने फार मोठी प्रगती केली आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये कायदा करुन या समाजाला अल्पसंख्याकांचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे या समाजाला शैक्षणिक संस्था, नोकऱ्या यामध्ये आरक्षण देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मात्र हे आरक्षण संस्था स्तरापुरते मर्यादित आहे. अल्पसंख्याकाचा दर्जा प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त होऊ लागली आहे. त्यामुळे समाजातील आर्थिक दुर्बलघटक शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करीत आहे. राजकिय क्षेत्रातही या समाजाची स्थिती खान्देशस्तरावर लोकसंख्येच्या प्रमाणात बऱ्यापैकी स्थिती भक्कम दिसुन येते. यामध्ये महिलांचे प्रमाण अल्पस्वरुपात आढळून येते. तरीही हा समाज संघटनात्मकदृष्ट्या भक्कमरित्या संघटीत असल्याने व्यापार, उद्योग, व्यवसाय यामध्ये एकजुटीचा फायदा या समाजाला झालेला आहे.

**उद्दीष्ट्ये :-**

प्रस्तुत संशोधन लेखाच्या माध्यमातुन जैन समुदायाच्या राजकिय व आर्थिक स्थिती बाबतचे अध्ययन केले जाणार आहे. लोकसंख्येच्या मानाने अल्पसंख्याक असलेल्या या समाजाचे व्यापार, उद्योग आणि इतर व्यवसाय यावर भक्कम अशी पकड आहे. जैन समुदायाच्या आर्थिक संपन्नतेचा फायदा खान्देशातील इतर समुहाना झालेला आहे. खान्देशातील तिन्ही जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक, राजकिय स्थितीचे अध्ययन करण्याचे उदिष्ट राहणार आहे.

**गृहीतके :-**

पंचायतराज संस्थेत पुरुष व महिला याचे राजकिय सहभागाचे स्वरुप अल्प आहे. यामध्ये लोकसंख्या अल्प असल्याचे कारण आढळुन येते. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिला पुरुष यांचे प्रमाण बऱ्यापैकी आढळुन येते. विधानसभा, विधान परिषद, राज्यसभा तिन्ही सभागृहात जैन समाजाचे प्रतिनिधीत्व आढळून येते. कायद्याने अल्पसंख्याकाचा दर्जा प्राप्त असल्याने शैक्षणिक व इतर शासकिय योजनाच्या बाबतीत लाभान्वीत झालेले आढळून येतात.

**१) पंचायतराज व स्थानिक स्वराज्यसंस्थेतील जैन समुदायाचा सहभाग :-** प्रामुख्याने लोकसंख्येच्या बाबतीत जैनधर्मिय अल्पसंख्याक आहेत. ग्रामीण भागामाध्ये जातीचे राजकारण मोठ्याप्रमाणावर होत असल्याने, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद यामध्ये पाहीजे त्याप्रमाणात प्रतिनिधीत्व प्राप्त होत नाही. कारण जातीवर आधारित मतदानाची प्रक्रिया मोठ्याप्रमाणात होत असल्याने त्याचा परिणाम निवडणूकीतील निकालांवर होत असतो. आपल्या राजकिय कौशल्याचा बळावर जैन समाजाने ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, पं.स.सदस्य, जि.प.सदस्य या पदांवर प्रतिनिधीत्व केल्याचे दिसुन येते.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेत बऱ्यापैकी केंद्रीत स्वरुपात या समाजाची लोकसंख्या वास्तव्य करुन राहत असल्याने, या समुदायाचे बऱ्यापैकी वर्चस्व प्रस्थापीत झाल्याचे दिसुन येते. नगरसेवक,नगराध्यक्ष , उपनगराध्यक्ष, उपमहापौर या पदांवर या समाजाने प्रतिनिधीत्व

ISSN : 2348-7143
Dec. 2018

यशस्वीपणे केले आहे.

**२) संसदिय स्तरावरील प्रतिनिधीत्व :–** मा.ईश्वरबाबुजी जैन यांनी आपल्या राजकिय जीवनाची सुरुवात जळगांव विधान सभा मतदारसंघापासुन सुरु केली. इ.स.१९७८ मध्ये त्यांनी प्रथम कॉग्रेस पक्षाकडुन विजयी झालेत. व महाराष्ट्र विधानसभेवर पोहचले. इ.स.१९८० जामनेर विधानसभा मतदार संघातुन त्यांनी आपले नशिब आजमावले व ते विजयी झालेत. काही कारणास्तव ते राजकारणापासुन बाजुला सारले गेलेत मा.शरद पवार यांनी जेव्हा कॉग्रेसपासुन अलग होऊन स्वतंत्र्य राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली. तेव्हापासुन ईश्वरबाबुजी जैन जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय झालेले दिसुन येतात. त्यांनी राष्ट्रवादी कॉग्रेसपक्षाला जळगांव जिल्ह्यामध्ये बऱ्यापैकी यश प्राप्त करुन देण्यात महत्वाची भुमिका पार पाडली. त्यामुळे त्यांना राष्ट्रवादी पक्षाच्या कोट्यातुन राज्यसभेवर पाठवण्यात आले. त्यामुळे जैन समुदायाला ईश्वरबाबुजी जैन यांच्या रुपाने राज्यसभा खासदार पदावर आरुढ होता आले.

**३) विधीमंडळातील प्रतिनिधित्व :–** विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहाच्या प्रतिनिधीत्वाच्या रुपात या समुदायाने आपल्या नावाची मोहर उमटवली आहे. यामध्ये सुरेशदादा जैन यांचे नाव प्रामुख्याने घेता येईल. सन १९८० पासुन महाराष्ट्र विधानसभेवर सातत्याने २००९ पर्यंत निवडून आलेत. सतत नऊ वेळा विजय संपादन करण्याचा विक्रम त्यांच्या नांवावर आहे. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीत त्यांचा प्रथम पराभव घडून आला. त्यांनी आपल्या राजकिय जीवनात मोठ्याप्रमाणावर शैक्षणिक संस्था, व्यापार, उद्योग यांना चालना दिली. तसेच मंत्रीपदाच्या कार्यकाळात अनेक योजनाच्या माध्यमातुन राज्यस्तरावर ठसा उमटवला, जळगांव शहराच्या विकासात सुरेशदादा जैन यांनी फार मोठी भुमिका पार पाडली आहे. खान्देशात अनेकांना आमदार, खासदार नगरसेवक, नगराध्यक्ष अशी अनेक पदे त्यांनी आपल्या कार्येकर्त्यांना मिळवून दिली. तसेच नेते व कार्येकर्ता घडणारा नेता म्हणुन सुरेशदादांचा नावलौकिक आहे.

**४) विधानपरिषद :–** मनिषदादा जैन व मधुभाभी जैन यांनी विधान परिषद सदस्य पदावर प्रतिनिधीत्व केले आहे. मनिषदादा जैन यांनी स्थानिक स्वराज्य संस्था या मतदारसंघातुन अपक्ष उमेदवारी करुन सुरेशदादा जैन यांच्या नेतृत्वाखाली यश संपादन केले होते. तर मधुभाभी जैन यांना कॉग्रेस पक्षाच्या कोट्यातुन विधानपरिषदेवर पाठवण्यात आले होते.

**५) संघटनात्मक जैन समुदाय :–** आज जवळजवळ सर्वच जाती, धर्माच्या संघटना स्थापन झाल्या आहेत. काही संघटना राजकिय दबाव गट निर्माण करण्यासाठी स्थापन झालेल्या आहेत. जैन समुदायाच्या संघटना धार्मिक, समाजसेवेसाठी अस्तित्वात आल्या आहेत. यामध्ये खान्देशस्तरावर खालील संघटना कार्यरत असलेल्या दिसुन येतात.

१) भारतीय जैन संघटना, २) अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृती रक्षक संघ. ३) जैन नवयुवक मंडळ जळगांव ४) तेरापंथी युवक परिषद ५) श्रविका महिला मंडळ. ६) अखिल भारतीय श्वेतांबर जैन कॉन्फरन्स ७) अखिल भारतीय श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स ८) जैन महिला मंडळ.

समाज सेवेसोबत शासनाच्या विविध मदत कार्यात या संघटना मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

**६) जैन समुदायाची आर्थिक स्थिती :–** लोकसंख्येच्या मानाने जरी अल्पसंख्याक असला तरी आर्थिक बाबतीत मात्र संपन्न अशा स्वरुपाचा समाज आहे. उद्योगाच्या बाबतीत विचार केला तर प्रसिध्द उद्योगपती स्वर्गीय भवरलाल जैन यांनी जैन इरिगेशनच्या माध्यमातुन भारतासह जगात ठसा उमटवला आहे. आर.सी. बाफना ज्वेलर्स यांच्या संपुर्ण भारतात ज्वेलर्सच्या शाखा आहेत. राजमल लखीचंद जैन ज्वेलर्सच्या माध्यमातुन संपुर्ण भारतात स्वर्णपेढी आहेत. जिनींग प्रेसिंग या व्यवसायातही मोठ्याप्रमाणावर हा समुदाय आहे. वैद्यकीय, वकिल, मेडीकल, शिक्षक, बँक यामध्ये मोठ्याप्रमाणावर हा समुदाय आपले योगदान देत आहे.

**समारोप :**

सामाजिक, आर्थिक, राजकिय बाबतीत भक्कम अशा स्थितीत असलेला हा संप्रदाय आहे. खान्देशाच्या इतिहासात मौलाची भूमिका या समाजाने पार पाडली आहे. खान्देशातील अनेक उद्योग, व्यवसाय, सहकारी बँक यांच्या विकासात मोठी भर या संप्रदायाने पार पाडली आहे. म्हणुन आधुनिक खान्देशातील इतिहासात जैन धर्मियाच्या उल्लेख आर्वजुन करावाच लागतो.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.श्रीनिवास साठे, च्मरुभुमीतुन बाहेरछ पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २५ मार्च २०१२ पृ.क्र.१२७
२) श्री शरद मधुकर कुलकर्णी चविधान सभा कामकाजात जळगांव जिल्ह्यातील विधानसभा सदस्यांचा सहभाग – एक चिकित्स अभ्यासछ (१९९५–२००४) अप्रकाशित पृ.क्र.५४.५५
३) प्रा.ए.पी.चौधरी, चआपला जळगांव जिल्हाछ प्रशांत पब्लिकेशन जळगांव, प्रथमावृत्ती २६ जानेवारी २०१६ पृ.क्र.४४.
४) दैनिक लोकमत च्संथाराव्रतावर राजस्थान हायकोर्टाची बंदीछ ११ ऑगस्ट २०१५ पान क्र.१

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# मिरला : खानदेशातील ग्रामीण जाणिवांचा वास्तव आकृतीबंध

**प्रा. निलेश एकनाथ पाटील**
एस.एस.व्ही.पी.एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
देवपुर, धुळे.

प्रा.संजीव गिरासे यांची कथा खानदेशातील अचूक ग्रामवास्तवाला अधोरेखित करते. त्यांनी साहित्याच्या विविध प्रकारात लेखन करत असताना खानदेशातील निसर्ग, तेथील शेती, शेतकरी, शेतमजूर यांचे जीवन चित्रण केलेले आहेच, पण त्याचबरोबर तेथील रूढी-परंपरा ,राजकारण ,मनोरंजनाची साधने आणि वृद्धांच्या समस्या यांनासुद्धा त्यांनी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते स्वतः खानदेशातील असल्याने त्यांनी विविध ग्रामीण समस्या आपल्या साहित्यातून उपस्थित करत असताना आपल्या अहिराणी बोलीलासुद्धा न्याय देण्याचा देण्याचा प्रयत्न केलेला आहे .

आपली लेखन विषयक भूमिका स्पष्ट करताना प्रा. संजीव गिरासे म्हणतात की,आपल्या बोली भाषेचे संवर्धन व्हावे असे प्रत्येक जाणकार अभ्यासकांना वाटणे सहाजिकच आहे. त्यात बोलीभाषा जर समृद्ध असेल ,तर सर्वच पातळ्यांवर तिच्या संवर्धनासाठी प्रयत्न व्हायला हवेत. प्रत्येक भाषा स्वयंपूर्ण नसते. इतर भाषांचा तिच्यावर प्रभाव असतो ,परंतु अहिराणी बोली याला अपवाद आहे .अहिराणी बोलीवर इतर भाषांचा प्रभाव आढळत नाही. ती स्वतः समृद्ध बोली आहे.प्रा.संजीव गिरासे यांनी पळतं बी चावतं बी, क्षितिज, मिरला,डफडंअसे वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह लिहून खान्देशी जाणिवा अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे.त्यांची कथा प्राचीन गावगाडा बरोबरच,बारा बलुतेदारी, कृषिकेंद्रित समाज यांच्या चित्राला सुद्धा महत्त्व देते.ग्रामीण समाजरचनेवर आधुनिकतेच्या होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करते. २०१५मध्ये संजीव गिरासे यांचा मिरलाहा कथासंग्रह प्रकाशित झाला.या कथासंग्रहातील प्रत्येक कथेत परिवर्तनाची नांदी प्रस्थापित होताना दिसतात. मिरला मधील कथा आशय-विषय दृष्ट्या चित्तवेधक तर आहेतच, पण निवेदनासाठी प्रमाण मराठी भाषा आणि संवाद योजना ही मात्र खानदेशी अहिराणी बोलीतून करून लेखक एकाच वेळी आपली भाषा व प्रदेशाविषयी अस्मिता व्यक्त करताना दिसतात.

मिरला मधील कथांविषयी डॉ. शशिकांत पाटील लिहितात की,'ग्रामीण व्यक्ती रचनेचे विविध कंगोरे हळुवारपणे संजीव गिरासे यांच्या कथेमधून उलगडतात. भावभावना, स्वप्न, अपेक्षा आकांक्षा,निष्ठा,प्रेम आणि संवेदना अशा अनेक मानवी मनाच्या तंतूंची वीन या कथांमध्ये आढळते.साहित्याला प्रादेशिक चेहरा असतो. मिरला या कथासंग्रहाला खानदेशचा चेहरा प्राप्त झालेला आहे.अहिराणी भाषेच्या सौंदर्याला कुठेही धक्का न लावता ही भाषा या कथासंग्रहात वापरली आहे . मिरला खानदेशचे प्रतिनिधित्व करतो. प्रस्तुत कथासंग्रहात ज्येष्ठांच्या वेदना मांडल्या आहेत .दौलत ,कृतार्थ, चिपटं या कथा ज्येष्ठांच्या वेदना लवचिक शब्दात मांडतात .येसू ,तांबडं फुटलं,मशीन ,कलंक,जत्रा या कथा स्त्रीत्वाचा सन्मान करीत जगण्याची धडपड करतात .तर पेट्रोल पंप सारखी कथा आजच्या ग्रामीण व्यवहाराची सद्यस्थिती सांगते.मानवी मनाच्या भावनांच्या कल्लोळातून प्रकट होणाऱ्या कथा वाचकांना खिळवून ठेवण्यात यशस्वी होतात. वास्तवतेच्या पातळीवरून प्रवास करीत विषयातील नाविन्य व लेखनातील प्रयोगशीलता यामुळे बिरला कथासंग्रह ग्रामीण साहित्यात महत्वाचा टप्पा गाठू शकेल, आणि वाचकांना अंतर्मुख करेल असा विश्वास वाटतो'.

मिरला या कथासंग्रहातील मिरला ही कथा सुरुवातीला शेतजमिनीत वाढत्या कूपनलिकांच्या प्रभावामुळे पक्ष्यांच्या घटत्या प्रमाणावर भाष्य करते,व नंतर धडगाव जवळील जामन्या पाडा येथील आदिवासी माणसाच्या परिवर्तनाला शब्दांकित करते. या कथेतून आपण लेखकांवर असणाऱ्या वारकरी सांप्रदायाच्या प्रभावाचा अभ्यास करू शकतो. लेखक वैशाखच्या उन्हात लग्न लावून घरी परतत असताना तहान लागल्यामुळे एका झोपडीत जातात. झोपडीत सर्व संतांचे फोटो आणि वारकरी सारखा एक माणूस दिसतो .त्याचे व्यक्तिमत्व पाहून लेखक भारावून जातात .तो माणूस म्हणजे मिरला जंगल्या पावरा होय. या आदिवासी माणसाच्या विकासाची कहाणी म्हणजेच मिरला ही कथा मिरलाची कृतज्ञ वृत्ती वाचकांना अचंबित करते.

मिरला या कथासंग्रहातील पेट्रोल पंप, चिपटं या कथा बदलत्या ग्राम व्यवस्थेवर भाष्य करत असताना जुन्या पिढीतील काळी आई वर निरातिशय प्रेम करणारा शेतकरी व आधुनिक तरुणाईतील वैफल्यग्रस्तता व व्यसनाधीनता यांच्यामधील द्वंद्व साकार करते. पेट्रोल पंप या कथेतून बदलती ग्रामव्यवस्था साकार होते. या कथेचा नायक कैलास हा महाविद्यालय शिक्षण घेणारा ग्रामीण तरुण वाईट संगतीमुळे व्यसनाधीन बनतो.त्याचे वडील त्यांच्याकडे मोजकीच जमीन असते.कैलास आपल्या वाईट इच्छांमुळे आपली जमीन विकतो.आणि वर्तमान उध्वस्त करून घेतो .प्रस्थापित काळात ग्रामीण भागात राजकीय प्रक्रियेला राजकारणाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे राजकारणात पैसा खूप खूप लागत असतो. याच राजकारणात कैलास स्वतःची प्रतिष्ठा ,पैसा आणि जमीन विकून स्वतःला उध्वस्त करून घेतो. संतोषच्या जीवनाची दयनीय झालेली अवस्था म्हणजेच पेट्रोल पंप या कथेचे कथानक होय.सध्याच्या काळात ग्रामीण भागातील तरुण राजकीय इच्छाशक्तीच्या पूर्तीसाठी

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

आपल्या उदरनिर्वाहाचे महत्वाचे साधन असणाऱ्या शेतीकडे सुद्धा दुर्लक्ष करतो याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल.अस्सल ग्रामीण साहित्य विषयी डॉ.किसन पाटील लिहितात की, निसर्गाधिष्ठीत शेती, नातीगोती, बोलीभाषा ,अशिक्षित परंतु भाव साक्षर माणसं, सुष्ट- दुष्ट प्रवृत्तींचा संघर्ष आणि अनादी काळापासून ची पारंपरिक जडणघडण याचे वास्तव चित्रण करणारे साहित्य हेच खरे ग्रामीण साहित्य म्हणता येईल.१९९० नंतर महागाई वाढली.पारंपरिक शेती परवडत नाही. ग्रामीण भागात आधुनिकीकरणाची चिन्हे दिसू लागली. व्यसनाधीनता वाढली राजकारणाला विकृती प्राप्त झाली. पेट्रोल पंप ही कथा या सर्वांनाच अचूकरित्या शब्दबद्ध करते.

चिपटं ही कथा भयानक अशा ग्राम वास्तवाकडे आपले लक्ष वेधून घेते. सुरुवातीची ग्रामीण कथा गाव गाडा,बारा बलुतेदारी ,निसर्ग केंद्रित समूहजीवन व या भागातील अद्भुतरम्य घटना-प्रसंगांची मालिका साकार करीत होती, पण वास्तवात सामान्य शेतकरी आपली शेती करत असताना त्याच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्या फक्त शेतीशी निगडित नसतात.उतारवयात कामाने रापलेले हात फुटलेले पाय व अंधुक झालेली नजर या शारीरिक मर्यादा एका बाजूला शेतकऱ्याला अस्वस्थ करतात,तर दुसऱ्या बाजूला मुलांची व्यसनाधीनता त्यांना शांती मिळू देत नाही. अशा परिस्थितीत जर एखाद्या मुलाने आत्महत्या केली,तर या शेतकऱ्याचे भावविश्व उद्ध्वस्त होत असते. एवढे सहन करूनही आयुष्याच्या सायंकाळी तो शेतात राबतो .शारीरिक क्षमता नसताना कष्ट करतो. मरेपर्यंत मुलाच्या आयुष्याची घडी बसवण्याचा प्रयत्न करत असताना पत्नीला घेऊन समाजात वावरताना दिसतो.कथेचा शेवटची वाक्य देशातील शेतकऱ्यांचा यातनांना शब्दबद्ध करतात. कथेचा नायक पांडू अण्णा म्हणतो की, पाय हे हेटेणी जमीन दखात नव्हती,मी औत सोड . तीना बी वक्खर पुरा व्हयना, मी गाडं जुप आणि घरणा रस्ता धरा.आम्ही एक शब्दं बोलणू नहीत. छाती धडपड करी रहायंती... घर काय वाढी ठेयेल से ,परमेश्वरले माहिती .आम्हले असं वाटस का घर यवोच नई. गाव मा दिवाबत्ती लागेल व्हती.बैल एक-एक पाय ऊचली रहायांतात आणि आम्ही विठ्ठलनी आराधना करि हर्यान्तुत.

माणूस जेव्हा कष्ट करू शकतो, तेव्हा विश्रांतीसाठी तो घराकडे धाव घेतो.पण च चिपटं कथेचा नायक दिवसभर कष्ट करतो ,तरी आपण घरी पोहोचू नये. असे त्याला वाटते.कारण त्याचा लहान मुलगा रम्या हा फक्त व्यसनाधीन नाही, तर तो आत्महत्येचे कारण दाखवून आई-वडिलांना सदैव त्रास देतो त्यातूनच या कुटुंबात उदासीनता संक्रमित झालेली दिसते. १९९०नंतरच्या साहित्यातील ग्रामवास्तव साकार करताना डॉ.प्रल्हाद लुलेकर लिहितात कि,आजही ग्रामीण भागातील प्रश्न कायम आहेत .नवे प्रश्न निर्माण झाले आहेत आणि त्यात पुन्हा भर टाकण्याचे काम नवी व्यवस्था करते आहे.शेती आणि शेतकरी यांच्यात येणारे परिवर्तन केवळ प्रश्नांचेच नाही ,तर शेती क्षेत्राशी संबंधित शेतकरी ,शेतमजूर या सर्वांच्या जीवनाशी संबंधित आहे .परिवर्तन झाले असेल तर रस्ते बदलले,पाणी आटले, घरे जुनी झाली, विजेचे लोड शेडींग मोजावे लागले. शेतीवर उद्योगपती व्यापारी सावकार या सर्वांचे डोळे लागून राहिल्याने ते सर्वसामान्य शेतकऱ्याला लुटत गेले. रोजगारासाठी ग्रामीण भागातील माणसे विस्थापित झाली, हे परिवर्तन कसे नाकारणार.मात्र हे परिवर्तन स्वाभिमान ,आत्मसन्मान हिरावून घेणारेआणि आत्मनाश ओढवून घेणारे आहे. हे भान साहित्यात ९० नंतर च्या दशकात अविष्कृत झाले आहे.

पेट्रोल पंप कथेतील धनबा आणि चिपटं कथेतील द्वारका व पांडवा या दाम्पत्यांचा प्रमुख व्यवसाय शेती असला, तरी धनबाला मुलाच्या हट्टापायी जमीन विकावी लागते, तर द्वारका व पांडबा यांना वयानुसार श्रवणदोष व दृष्टिदोष हे विकार झाले,तरी स्वतःसाठी काहीही न करता त्यांचा मुलगा रम्याच्या व्यसनासाठी पैसे देतात .ग्रामीण साहित्याची समीक्षा करताना शेतकरी व जमीनदारअसा संघर्ष उभा केला जातो.पण शेतकऱ्यांच्या जीवनात आपल्या कुटुंबियांमुळेसुधा बऱ्याच समस्या येतात. हा दुर्लक्षित विषय या कथांमधून प्रा.संजीव गीरासे यांनी मांडलेला आहे. मीरला कथासंग्रहातील दौलत, श्राद्ध, पाहुना,कृतार्थ,व्यथा एका स्थितप्रज्ञाची या कथांमधून वयोवृद्धांच्या व्यथा लेखक मांडताना दिसतात.' व्यथा एका स्थितप्रज्ञाची'या कथेत बन्सीलाल महिपत मराठे या प्राथमिक शाळेच्या गुरुजींची व्यथा लेखक वास्तव पूर्ण मानतात.आयुष्यभर गुरुजी निष्काम कर्मयोग्याप्रमाणे जीवन जगतात. धमाने गावातील शिक्षक म्हणून कार्यरत असताना ते अडल्यानडल्यांना मदत करतातच, बऱ्याच लोकांना सन्मार्ग दाखवतात.अनिष्ठ रूढी आणि प्रथांविरुद्ध आवाज उठवितात,आणि उतारवयात गुरुजींवर उपासमारीची वेळ येते. त्यांच्या मदतीला कोणीही धावून येत नाही.गुरुजींना पाहिल्यानंतर आपल्याला बनगरवाडी ची आठवण आल्याशिवाय राहत नाही. दौलत ही कथा स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत आयुष्य घालवणार्या आणि त्याच संघर्षानंतर श्रीरामकृष्ण परमहंस अनाथ आश्रमाचे निवृत्त व्यवस्थापक असणाऱ्या प्रल्हाद रामचंद्र जोगळेकर यांच्या जीवनावर भाष्य करते.आजन्म अनाथ मुलांच्या संगोपनात घालवणार्या या काकांचे जीवन निस्वार्थी वृत्तीचे आहे.त्यांची निस्वार्थी हीच दौलत आहे असे लेखकांना वाटते ही कथा मानवी जीवनातील नातेसंबंधांवर भाष्य करते या कथेत वयोवृद्ध भटजी आयुष्यभर पूजाविधीत येणाऱ्या पैशांनी आपल्या एकत्र कुटुंबाला आधार देतात. आपल्या पत्नीचे निधन झाल्यानंतर आपण श्राद्ध घालावे, असे त्यांना वाटते पण त्यांची ही इच्छा त्यांच्या कोणत्याही नातलगाकडून पूर्ण होत नाही.

'पाहुणा' ही कथा धडगाव च्या महसूल कचेरीत कारकून म्हणून काम करणाऱ्या चव्हाण साहेबांच्या मनोवृत्तीवर भाष्य करते. महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी धुळ्याला जाऊन आपल्या कुटुंबियांना भेटून आपली मानसिकता व्यवस्थित करणाऱ्या या चव्हाण साहेबांचे जीवन एखाद्या उपन्यासारखे असते. आता त्यांच्या निवृत्तीला फक्त सहा वर्षे बाकी होती,म्हणून या काळात कोणत्याही मार्गाने बदली करून ठेवून आपल्या कुटुंबाजवळ आपण राहावे,असे त्यांना वाटते.यासाठी काहीही करायची पाळी आली,तरी आपण मागे व्हायचे

ISSN : 2348-7143
Dec. 2018

नाही असे त्यांना वाटते. पण बदलीसाठी पैसा देण्यापेक्षा त्यांपैशांनी घरात फ्रिज घेता येईल,असे बायकोला वाटते. तर मुलीला स्कूटी घ्यावी असे वाटते, मुलाला शिमालाची ट्रीप महत्वाची वाटु लागते.हे ऐकल्यावर चव्हाण साहेब चकित होतात,यानंतर त्यांची बदली विनापैशांनी झालेली होती तरीसुद्धा ते बदली करत नाही.आणि पाहुण्यासारखे आपले उपऱ्याचे जीवन जगू लागतात.'कृतार्थ' ही कथा माणूस वृद्ध झाला की त्याची मुलगा, सून, नातवंडे यांच्याकडून वारंवार अवहेलना होते.जिवंतपणी त्याला नरक यातना भोगाव्या लागतात.वास्तवात ज्येष्ठांच्या अनुभवाचा समाजाला फार मोठा फायदा होऊ शकतो.असा लेखक तरुणांना सल्ला देतात. माणूस शरीराने वृद्ध झाला तरी मनाने सदैव तरुणच असतो. हेसुद्धा ते कथेतील नानांच्या जीवना वरून सिद्ध करतात.वृद्धापकाळात एका वृद्धाश्रमाची संकल्पना साकार नाना साकार करतात,आणि त्या संकल्पनेमुळे त्यांच्यातील तारुण्य आपल्याला प्रत्ययास येताना दिसते. लेखक ग्रामीण समस्यांच्या निरीक्षणाबरोबरच महानगरीय जीवन दर्शनाचे ही वास्तव चित्रण करताना दिसतात.त्यांच्या चिपटं, पेट्रोल पंप, एका स्थितप्रज्ञाची,कृतार्थ, पाहुना या कथा विविध जीवनजाणिवा अभिव्यक्त करणाऱ्या आहेत. त्यांच्या कथेतील संघर्ष हा विषम परिस्थितीत निर्माण झालेला असून नव्या पिढीच्या विकृत वर्तन, व्यसनाधीनता यामुळे तो जास्त गतिमान झालेला आहे .तरुण पिढी आज भावनाशून्य झालेली दिसते तसेच व्यसनाधीनतेमुळे समस्या निर्माण करताना दिसत आहे.पारंपरिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे, प्रसारमाध्यमे व इलेक्ट्रॉनिक मीडिया समोर येऊ लागल्या आहेत म्हणूनच या काळात माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना जास्त घडताना दिसत आहेत. किशोर घोरपडे यांची घुसमटनी ही दलित कथा एका दलित तरुणाच्या जाणिवाहीन वर्तनाकडे वाचकांचे लक्ष आकर्षित करते.

मिरला या कथासंग्रहातील येसू,जत्रा,अंतिम सत्य,कौसल्या, मशीन,शापवाणी,कलंक या कथा स्त्रीवादी जाणीवांनी ओतप्रोत भरलेल्या आहेत.तसेच या कथांमधील नाईका वारंवार स्वत्वाचा शोध घेताना दिसतात. आजपर्यंत पुरुष लेखकांनी स्त्रियांचे अनुभव कल्पनेने मांडलेले आहेत. यामुळे स्त्रीवादी जाणिवांशी वास्तव अभिव्यक्ती झालेली दिसत नाही. पुरुषांना स्त्री विषयी अनुभव मांडताच येणार नाहीत अशी स्त्रीवादाची भूमिका असली तरी लेखक या भूमिकेला अपवाद आहेत.स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होऊन,तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्थ कळणे स्त्रीने आपल्यावर होणार्या अन्यायाविरुद्ध पेटून उठणे. स्त्रीने आपले स्त्रीत्व ल,गुलामी विरुद्ध बंड करणे,या स्त्रीवादाला साजेश्या घटना आपल्या कथांमधून लेखक खान्देशच्या पार्श्वभूमीवर निर्माण करताना दिसतात.त्यांनी पति पत्नी यांच्या संघर्षातून स्त्रीवाद साकारला नाही तर ते त्याहीपुढे जाऊन मुलगा व आई, स्त्री व तीचे अंतर्मन, स्त्री व समाज,स्त्री व नातेसंबंध या संघर्षात अडकलेल्या आधुनिक स्त्रीवादी नायिका साकार केल्यामुळेच मिरला हा कथासंग्रह म्हणजे खान्देशी माती चा मुकुटमणी आहे असेच म्हणावे लागते.

संजीव गिरासे यांची कलंक ही कथा स्त्रीत्वाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा मानावी लागते कथेची नायिका शलाका शिक्षण चालू असताना तिचा विवाह दयानंद ची होतो.त्यांना एक मुलगा होतो.तो अडीच वर्षाचा असताना दयानंद चा अपघाती मृत्यू होतो. तिच्यावर अकाली संकट आल्याने ती खचते.सासू नणंद,नातलग यापैकी कोणी तिच्या मदतीला येत नाही.शेवटी उभी राहते अनुकंपा खाली नोकरी मिळवते.मुलाचे शिक्षण नोकरी आणि त्याचे लग्न सुद्धा करते. मुलगा फायनान्स कंपनीत कामाला लागतो.त्याला एक मुलगी होते.त्याची इच्छा असते की आता आईने धुळ्यातील घर विकून मला पुण्यात एक फ्लॅट घेऊन द्यावा.या गोष्टीला ती तयार होत नाही. ती आपल्या मरेपर्यंत त्या घर विकण्यास तयार नाही हे ऐकल्यावर मुलगा आणि सून तिच्याविरोधात वागतात.तिला भेटायचे टाळतात.तिने ठेवलेला ठेवलेल्या पूजेला येत नाही. ती शेवटी त्रस्त होते.आणि पूजेला ते येत नसल्याने ती स्वतः पूजा करायला सिद्ध होते याप्रसंगी शलाका च्या आत असणारा स्वाभिमान वाचकांना अंतर्मुख केल्याशिवाय राहत नाही. स्त्रीवादी जाणिवांचा अस्सल स्वरूपाचा अविष्कार म्हणजेच या कथेतील शलाकाचे स्वगत होय. अंतिम सत्य या कथेतील प्रतिभा बेन आपल्या शेवटच्या काळात हसत हसत मृत्यूला सामोरे जाऊन आपल्या घराची घडी विस्कळीत न होऊ देता आपल्या पतीला दुसरं लग्न करण्याचा सल्ला देते. शापवाणी कथेतील कोकिळा सुद्धा पुरुषी दांभिकतेवर कडाडून टीका करताना दिसते.अस्सल अहिराणी शब्दातील संवाद वाचकांना अंतर्मुख करतात.ती प्रस्थापित समजाविरोधात लढण्यास सिद्ध होते.येसू ही कथा वाचकांना एका वेगळ्याच वेगळ्याच विश्वात घेऊन जाते. वेश्या म्हणून समाजात कलंकित ठरलेल्या स्त्रीयांच्या जीवन जाणिवांना अधोरेखित करताना लेखक आपल्यासमोर येशूच्या मनातील विविध तरंग साकार करतात. वेश्याव्यवसाय करणारी येसू मातृत्व प्रेरणेसाठी आसुसलेली असते. आपली ही प्रेरणा ती वेगवेगळ्या मार्गांनी पूर्ण करण्याचा प्रयत्न करते व प्रचलित समाज व्यवस्थेच्या विरोधात लढताना तिच्या जीवनाची शोकांतिका झालेली दिसते.

संजीव गिरासे यांच्या कथांमधून वैशिष्ट्यपूर्ण अशा खानदेशी संस्कृतीचा अविष्कार तर प्रकट होतोच पण याशिवाय सामान्य भागात जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या आचरणातून,कृतीतून संवादातून ते स्वाभाविक रित्या स्त्रीवादाची मांडणी करतात.प्रस्तुत कथासंग्रहात लेखक एकाच वेळेस शेतकऱ्यांच्या समस्या, शेतमजुरांच्या जीवन जाणिवा, वृद्धांच्या समस्या अशा वैविध्यपूर्ण विषय आपल्यासमोर मांडतात. निवेदन प्रमाण मराठीतून तर संवाद योजना अस्सल अहिराणी तून करत लेखक प्रस्तुत कथासंग्रह साकार करतात.लेखकांची सर्जनशक्ती कमालीची असल्याने ते आपल्या जीवन जाणिवांना अचूकरित्या शब्दबद्ध करताना दिसतात. खानदेशातील वास्तव मांडत असताना ते वाचकांना भावनिक सुद्धा करतात यातच त्यांच्या लेखणीचे यश मानावे लागेल.

**संदर्भ सूची :**

१) प्रा.संजीव गिरासे- मिरला, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
२) प्रा.संजीव गिरासे- आगरी,सुधा प्रकाशन,जळगाव
३) डॉ. प्रल्हाद लुलेकर- साठोत्तरी साहित्य प्रवाह,सायन पब्लिकेशन, पुणे
४) गोकुळ बागुल- काळी माय,कस्तुरी प्रकाशन, अमळनेर
५) डॉ. शशिकांत पाटील- खानदेशचे साहित्यविश्व.
६) डॉ.तुषार चांदवडकर- नव्वदोत्तरी मराठी साहित्य आणि समाज, कुसुमाग्रज प्रकाशन, नाशिक

# १८५७ च्या स्वतंत्र लढयातील खानदेशातील आदिवासींचे योगदान

**प्रा.डॉ. दिनकर बी. जाधव**
दादासाहेब रावल महाविद्यालय,
दोंडाईचा, जि. धुळे.

खानदेशातील क्रांतीकारकांचा इतिहास हा देशाचे भाग्य घडविण्याचा इतिहास आहे.ब्रिटीशांच्या गुलामगिरीतुन मुक्त करण्याचा इतिहास आहे.हा सुमारे दिडशे वर्ष भारतावर परकियांची सत्ता होती त्या परकिय सत्तेला जर कोणी हदरा दिला असेल तर तो म्हणजे खानदेशातील क्रांतीकारकांनी यापुर्वी कोणत्याही युध्दात सर्वसामान्य जनतेचा सहभाग नव्होता. परंतू १८५७ च्या स्वतंत्र युध्दात क्रांतीकारकांनी प्रथमच सामन्य जनतेला सहभागी करुन घेतले. परंतू त्यात खानदेशातील आदिवासी क्रांतीकारकांचा व सर्व सामान्य जनतेचा सहभाग हा वाखान्य सारखा आहे.

महाराष्ट्रात आदिवासी जमाती भिल समाजाची संख्या जास्त होती. या जमाती घाटमाथा,पुर्वखानदेश,पश्चिम खानदेश व नाशिक या भागात आदिवासी जमातीची संख्या मोठया प्रमाणात होती. आजही ती जास्त आहे. या जमातीची बोली भाषा राहणीमान व रुढी परंपरा या इतरापेक्षा भिन्न आहेत. हे आदिवासी वर्णाने काळे आणि उंचीने खुजे आहेत. ते अत्यंत कमी कपडे परिधान करतात. व सरंक्षणासाठी नेहमी धनुष्यबाण वापरतात. पेशवे काळात भिल हे पहारेकऱ्याचे काम करित असत गावाची व शेताची रखवाली करणे लुटमारीला आळा घालणे गावात शांतता राखणे अशी कामे भिलांना करावी लागत असे १.परंतु इ.वी.सन १८१८ मध्ये खानदेशात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर मराठयांचा सेनापती त्र्यबंकजी डेगळे याला ब्रिटीशांनी अटक केली तेव्हा त्यांने मोठया युक्तीने आपली सुटका करुन घेतली आणि त्याने भिलांना ब्रिटीशा विरुध्द संघर्ष करण्यास प्रवृत्त केले तेव्हा खानदेशचा पहीला कमिश्नर कॅ.ब्रिग्झ याने भिल्लाचा प्रतिकार मोडण्यासाठी मोठी मोहिम चालवली त्यांने ४८ भिल्ल नायकांना गोळया घालुन ठार केले. ०७ संप्टेबर १८१८ रोजी कॅ.ब्रिग्झ हा मंबईच्या गव्हर्नरला पत्र लिहीतो की भिल्लांचे हे हल्ले जर आपण मोडुण काढले नाही तर ते खानदेशातील आपले दळणवळण बंद पाडतील १८५७ च्या उठावाच्या समकालीन कागद पत्रांचा व ग्रंथाचा व त्यावेळच्या इंग्रज अधिकाऱ्यांने आपल्या गुप्त अहवालात खानदेशातील आदिवासी क्रांतीकारकांनी ब्रिटीश कंपनी सरकारला जबरदस्त अव्हान दिले. या लढयात प्राणाची बाजी लावुन भारत मातेला स्वतंत्र करण्यासाठी हौतांतत्म पतकारले जन्मठेप,काळयापाण्याची शिक्षा बंदुकीच्या गोळया छातीवर झेलने, तोफेच्या तोंडी जाणे , फासावर लटकणे यातच क्रांतीकारक स्वत:ला धन्य मानीत असत.२.

**भिमा नाईकचा उठाव :–** खानदेशात सप्टेबर १८५७ मध्ये ब्रिटीश कंपनी सरकार विरुध्द उठावाला सुरवात झाली. त्यात खाज्या नाईक (काझी सिंग) व भिमा नाईक यांनी उठावाला प्रत्साहन दिले. भिमा नाईकने कंपनी सरकारचा इंग्रज अधिकारी लें.केनडी च्या तुकडीवर हल्ला करुन त्याला पराभुत केले. व इंग्रज पोलीस अधिकाऱ्यांना धमकी दिली की घ्तुम्ही आम्हाला येऊन मिळा अन्यथा त्याचे वाईट परिणाम होतीलङ . कारण भिमा नाईक हा स्वत:ला दिल्लीच्या बादशाहाचा खानदेशातील प्रतिनीधी समजत होता. भिमा नाईक च्या हया धमकीला इंग्रज सरकार घाबरले. आणि त्याला पकडुन देण्यासाठी इंग्रजांनी एक हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले. यावरुन ब्रिटीशंनी भिमा नाईकच्या ताकदीची येवढी धास्ती घेतली आणि तो पुढे कोणालाही सापडत नाही.

खानदेशच्या जवळ मध्यप्रदेशच्या सिमेवर भिमा नाईकने इंग्रजावर प्रचंड दहशद बसवली होती त्याने २६ ऑगस्ट १८५७ रोजी आपल्या सहकाऱ्यंच्या मदतीने ब्रिटीश सैन्यावर धनुष्यबाणाचा सहाय्याने हल्ला चढवीला त्यात २०० इंग्रज सैनीक ठार झाले व कित्तेक जखमी झाले. आजुबाजुच्या प्रदेशातील लुटालुट केली. यात काही भिल क्रंतीकारकांना विर मरण आले. इंग्रजांनी भिमा नाईक ला पकडण्यासाठी खास मोहीम काढली. परंतू त्यात त्यांना यश आले नाही. पुढे २९ ऑक्टोबर १८५७ रोजी शिरपुर शहरावर भिमा नाईक आणि काझीसिंग यांच्या नेतृत्वा खाली हल्ला करुन लुटालुट केली या वेळी कॅ.बर्थ ने २६ मे पर्यत भिमा नाईक च्या टोळीचा पाटलाग केला. परंतू गनिमी काव्याच्या माध्यमातुन भिमा नाईकची टोळी जंगलात पसार झाली . आणि कॅ.बर्थ ला निराश होऊन परतावे लागले. १ नोव्हेंबर १८५७ रोजी खानदेशचा कलेक्टर जेथे मुक्कमाला होता त्याच्या सहा मैलावर भिमा आणि काझी नाईकच्या क्रांतीकारकांनी दोन खेडी लुटुन कलेक्टरला अव्हान दिले. थोडक्यात भिमा नाईक हा स्वांतत्र्य लढयातील आदिवासींचा प्रभावी नेता होता त्यांने इ.स १८६८ पर्यत ब्रिटीशाशी एकाकी लढा दिला त्याने खानदेश,नाशिक, नगर या भागातील आपल्या आदिवासी तरुणांना एकत्र करुन त्यांच्यात देशप्रेम निर्माण करुन इंग्रजापुढे अव्हान निर्माण केले होते.३.

**काझीसिंग ऊर्फ खाज्या नाईक चा उठाव :–** काझीसिंग हा भिल्लांचा नायक होता. इ.स.१८३१ ते १८५१ या काळात तो ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीत नोकरी करीत होता. खानदेशात शिरपुर ते सेधंवा या चाळीस मैलाचा रस्ता त्याच्या देखरेखी खाली होता.

घनदाट अरण्य व पर्वत रांगा होत्या त्यामुळे या रस्तावर अनेक गुन्हे घडत असत. म्हणुन इंग्रज सरकारने या रस्त्याचा बंदोबस्तीसाठी काझिसिंग नाईक ची नेमणुक केली होती तेव्हा काझीसिंगने येथे एकही गुन्हा घडु दिला नाही. व ब्रिटीश अधिकारी कॅ.ग्रॅहॅम,मेजर मोरिस,कॅ.रोझा,मेजर केट यांना अनेक भिल्ल गुन्हेगारांना पकडुन देण्यासाठी मदत केली. परंतू एका प्रकरणात ब्रिटीशांनी काझीसिंग ला गुन्हेगार ठरवीले आणि त्याला १० वर्षाची कैदेची शिक्षा दिली. परंतू काझीसिंगने ब्रिटीशांची प्रामाणीक सेवा केल्याने त्यांची शिक्षा पाच वर्षानी कमी केली पुढे सुटका झाल्यावर तो पुन्हा ब्रिटीशांच्या सेवेत दाखल झाला परंतू कंपनी च्या नोकरीत असतांना इंग्रज अधिकारी कॅ.बर्थ आणि रिसालदार यांनी काझीसिंग ला अपमानीत केले आणि येथे मात्र काझीसिंग चा स्वाभीमान जागृत झाला .आणि त्यांने क्षणाचाही विलंब नकरता ब्रिटीश कंपनीच्या नोकरीचा राजिनामा दिला. तेव्हा त्यांने आपली माणसे गोळाकरुन ब्रिटीश सरकार विरोधी बंडाचा झेंडा उभारला गावेच्या गावे लुटण्यास सुरवात केली. त्यामुळे सेंधवा घाट बंद झाला आणि या परिसरात एकच धुमाकुळ माजला या वेळी त्याला होळकरांच्या सैन्यातील काही सैनीक येऊन मिळाले तसेच झाशी,कोटा,येथील सैनीकी भिल्लांचा उठावात सामिल झाले आणि खानदेशात स्वतंत्र्य युध्दाला सुरवात झाली.४.

**सात लाखाची लुट :–** इ.स.१८५७ मध्ये काझीसिंग व भिमा नाईक ये दोन्ही भिल्ल नेते एकत्र आलेत त्यांनी दिड हजार भिल्लांची पलटण उभी केली अनेक ठिकाणी छापे टाकुण लुटमार केली. १७ नोव्हेंबर १८५७ रोजी ब्रिटीशंना खजीना इंदौर येथुन मुंबई येथे जाणार होता त्या खजिन्याचा संरक्षणासाठी धिग्रज आणि चतुरभुज हे दोन अधिकारी नेमले होते. आणि २०० ब्रिटीश सैनीकी ही त्यांच्या मदतीला होते. हा खजीना बैल गाडीतुन मुंबई कडे निघाला होता भिमा नाईक आणि काझीसिंग यांनी सेंधवा घाटात आपल्या तिनशे भिल्ल सहकार्यासह त्यावर छापा टाकुण सात लाखाचा खजीना लुटला या वेळी भिल्लांच्या हल्यामुळे ब्रिटीश सैनिक पळुण गेले या खजीना लुटीमुळे ब्रिटीश सरकारला प्रचंड धक्का बसला येथुन पुढे काझीसिंग ने आफुच्या गाडीची लुट केली, पोस्ट ऑफीस लुटले, सेंधवा घाटातील टेलीग्राफ तारा तोडल्या, या सर्व कारास्थानात इंदोरचा राजा होळकरांचा हात असावा अशी शंका इंग्रजांना वाटु लागली तेव्हा सॅम्युअल मेन्सफिल्ड ने मुंबईच्या सरकारला ३० नोव्हेबर १८५७ रोजी एक पत्र पाठवीले. आणि सेंधवा येथील किल्ल्यावर खानदेशच्या इंग्रज अधिकाऱ्याची नेमणुक करुन मुंबई आग्रा वाहतुक सुरळीत ठेवता येईल. या वरुन सेंधवा घाटात काझीसिंग चा दरारा कसा होता ये लक्षा येते. ऐवढेच नव्हेतर काझीसिंग चे वास्तव्य सेंधवा येथेच होते .परंतू इंग्रज सरकार त्याला अटक करु शकत नव्होती. कारण त्याचा दरारा आणि भिल क्रांतीकारकांचा पाठींबा हा प्रचंड होता. याच वेळी नगर, नाशिक भागातुन भागोजी नाईक याने भिमा नाईक आणि काझीसिंग यांना मदत केली त्यामुळे भिल्ल क्रांतीकारकांनी सातपुडयाच्या रांगेतुन ब्रिटीशांना आव्हान दिले याच वेळी सुल्तानपुर , शाहदा या भागातही अक्रमण होते कि काय असे ब्रिटीशांना वाटु लागले तसेच २००० पेंढारी आणि पठाण खानदेशातील भिल्लांना येऊन मिळाले व त्यांनी मुंबई आग्रा रस्ता अडवीला या क्रांतीकार्यात खानदेशच्या सिमेवरील बडवानीचा राजा भिलांना शशास्त्रे आणि दारु गोळा पुरवीतो यामुळे ब्रिटीशांची झोप उडाली तेव्हा मेजर .ईव्हान्सने भिल क्रांतीकारकांशी वाटाघाटी करुन संमजोता करण्याचा प्रर्यत्न केला परंतू उपयोग झाला नाही. ५. तेव्हा मेजर इव्हान्सने क्रांतीकारकांवर आक्रमक धोरण स्विकारुन ११ एप्रिल १८५८ रोजी इंग्रजांनी शशास्त्र प्रशिक्षीत सैन्य घेऊन आंबापाणीच्या डोंगरात भिलां विरुध्द युध्द पुकारले या वेळी भिल्ल क्रांतीकारकांनी ब्रिटीश सैन्याला घेरले डोंगर माध्यावर गोफण व तिरकामठयाच्या साहाय्याने हल्ला चढवुण ते ब्रिटीश सैन्याशी प्राणपणाने लढत होते. ग्रॅरीसन हा ब्रिटीश अधिकारी शैत्र्याने लढला कॅ.बर्थ व ले. बेसरी हे घायाळ झाले .शत्रु सैन्याकडे सर्व साधणे असुनही त्यांचे १६ सैनिक मारले गेले कित्येक जखमी झाले या युध्दात भिल विरांगनाही पुरुषांना मदत करीत होत्या ही गोष्ट खानदेश वासियानसाठी गौरवास्पद आहे. मे. हसन वुड याने आपल्या पत्रात उल्लेख केला आहे की खाज्या नाईक ची पत्नी, बहीण, भिमा नाईक ची पुतणी,भाऊ व त्याची पत्नी यांना अटक केली. आंबापाणीच्या युध्दात आदिवासींचा पराभव झाला .परंतू भारताच्या स्वंतत्र्यासाठी बंडखोरी , संघर्ष आणि प्राणपणाने लढुन बलीदानाची तयारी आणि त्यात आदिवासी स्त्री यांचा सहभागा अभिमानाने आणि गौरवाने म्हटले पाहिजे.६.

अशा रितीने १८५७ च्या स्वतंत्र्य युध्दात खानदेशचा सहभाग आणि त्यात आदिवासी भिल्लविर आणि भिल्लविरांगनांचा उल्लेख केल्याशिवाय भारताच्या स्वातंत्राचा इतिहास पुर्ण होणार नाही.

**संदर्भ सूची :**

१. प्रा.डॉ.शहा जी.बी., खानदेश मधील राष्ट्र वादाचा उदय आणि विकास, पृ.५८ प्रशांत पब्लिकेशन जळगांव २०१४
२. पुर्वाक्त पृ ६१
३. डॉ.भामरे सर्जेराव.ज., आदिवासींचे उठाव, पृ.४४ अप्रांत प्रकाशन ,पुणे २०१४
४. दिनानाथ मनोहर , भिल आदिवासींचा स्वतंत्र्य लढा पृ. २९ ,जनार्थ आदिवासी विकास संघा शहादा
५. प्राचार्य.डॉ. शहा,जी.बी. धुळे व नंदुरबार जिल्हयाचे स्वतंत्र्य चळवळीचे योगदान , पृ.४ प्रथमेश प्रकाशन, धुळे २००४
६. डॉ.भामरे .पुर्वाक्त पृ. ५२

‘RESEARCH JOURNEY’ *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# पश्चिम खान्देशातील भूमिगत चळवळ - एक दृष्टीक्षेप

**प्रा.डॉ. रमेश धनराज जाधव**
इतिहास विभाग प्रमुख, आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरपुर, जि. धुळे.

**प्रस्तावना**

दि. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे अखिल भारतीय कॉंग्रेस महासमितीचे अधिवेशन सुरु झाले आणि दुसऱ्या दिवशी म्हणजे ८ ऑगस्ट १९४२ रोजी ‘चलेजावचा‘ ऐतिहासिक ठराव या अधिवेशनात पास करण्यात आला. ब्रिटीश शासनाने म. गांधीजीसह अनेक नेत्यांना भारत स्वरक्षण कायद्याखाली दि. ९ ऑगस्ट १९४२ रोजी पहाटे अटक करुन तुरुंगात पाठविले. त्याचबरोबर स्वरक्षण कायद्याखाली प्रत्येक प्रांतातील व जिल्ह्यातील राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना अटक करुन क्रिमिनियल ॲक्ट अन्वये राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कमिट्या बेकायदेशिर ठरविण्यात आल्या त्याचप्रमाणे भारत स्वरक्षण कायद्यानुसार प्रातांत मिरवणूका व जाहिर सभांवर बंदी घालण्यात आली. त्यामुळे सर्व देशभर सहभागी लोकांची धरपकड, खटले व शिक्षा यांचे सत्र सुरु झाले. त्यामुळे सर्वत्र या घटनेचा निषेध करण्यात आला. त्यात प्रामुख्याने महाराष्ट्रात सातारा, सोलापूर, पुणे, ठाणे, नगर, पूर्व खान्देश व पश्चिम खान्देश व इतर शहरांमध्ये व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून कामगारांनी कामे बंद करुन हरताळ पुकारला.

चलेजाव चळवळीचे स्वरुप काय असावे यासंबंधी मार्गदर्शन करण्यास नेत्यांना सवडच मिळाली नाही. ब्रिटीश सरकारच्या दडपशाहीचे ते शिकार बनले. काही कॉंग्रेस कार्यकर्ते भूमिगत झाले. ब्रिटीश सरकार विरुद्ध सुरु केलेल्या लढा यशस्वी करण्यासाठी खेडोपाडी जावून प्रचार करणे आवश्यक होते. त्या प्रचारासाठी कॉंग्रेसचे कार्यकर्ते पोलीसांची नजर त्यांच्यावर पडू नये म्हणून रात्रीच्या वेळी खेडोपाडी जावू लागले. दिवसा शेतात, जंगलात आणि तळघरात लपून राहत असत किंवा वेशांतर करुन माहिती मिळवीत असत अशा प्रकारे चलेजाव चळवळ यशस्वी करण्यासाठी कॉंग्रेसचे कार्यकर्ते भूमिगत राहू लागले आणि यातूनच भूमिगत चळवळीचा उदय झाला.

**उद्देश**

१) धुळे जिल्ह्यातील भूमिगत चळवळीची माहिती मिळविणे.

२) भूमिगत चळवळीत कोणकोणत्या कार्यकर्त्यांनी कशा प्रकारे सहभाग घेतला याची माहिती मिळविणे.

**संशोधन पद्धती**

या विषयासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून हा विषय पूर्ण करण्यासाठी अप्रकाशित लघुशोध प्रबंध व उपलब्ध दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आलेला आपणास दिसून येईल.

**विषय विवेचन**

जयप्रकाश नारायण यांनी भूमिगत चळवळीचे नेतृत्व केले. कॉंग्रेसचे बरेचसे कार्यकर्ते भूमिगत झाले होते. या काळात जनतेच्या मनात ब्रिटीश शासनाच्या दडपशाही विरुद्ध, अधिकाऱ्याविरुद्धा असंतोष निर्माण झाला होता. मुंबई येथे गेलेले पश्चिम खानदेशचे नेते श्री बाळभाई मेहता मुंबईहून हे सुरतमार्गे विरदेल स्टेशनवर उतरले आणि दलवाडे येथील प्रमुख कार्यकर्ते देवमणदादा यांच्या शेतात रात्री पश्चिम खानदेशातील प्रमुख कार्यकर्त्यांची सभा घेतली. या सभेत चलेगाव चळवळीचा संदर्भात कॉंग्रेसचे धोरण आणि सरकारची निती यावर विचार विनिमय झाला. परंतु उघड बंडात मोडतोडीचे कार्यक्रम येतात का? याबाबत मतभेद झाले. त्यामुळे एक प्रश्नावली तयार करण्यात आली आणि म. गांधीजीचे शिष्य श्री. किशोरीलाल भाई मुश्रीवाला यांचे मार्गदर्शन घेण्याचे ठरले. त्यानुसार श्री. विष्णूभाऊ पाटील सेवाग्राम येथे गेले आणि चरखा संघाचे अध्यक्ष श्री. जाजूंजीच्या बंगल्यावर १६ ऑगस्ट १९४२ रोजी काही प्रमुख नेत्यांची सभा घेण्यात आली या सभेस श्री. विष्णूभाऊ उपस्थित होते. या सभेत विचार विनिमय होवून कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला. त्यानूसार –

१) भूमिगत राहून चळवळ चालविणे.

२) रेल्वे रुळ उघडणे आणि

३) दूरध्वनीच्या तारा ताडणे

इत्यादी कार्यक्रमांना मान्यता देण्यात आला आणि त्यानुसार भूमिगत चळवळ सुरु झाली.

**भूमिगत चळवळीची जबाबदारी**

श्री. बाळूभाई मेहतांच्या मार्गदर्शनाखाली धुळे जिल्ह्यात दौरे सुरु झाले. श्री. विष्णुभाऊ पाटील यांच्यावर धुळे, शिंदखेडा, शिरपूर व साक्री भागाची जबाबदारी दिली. तर शहादा, तळोदा, नवापूर, नंदूरबार आणि धडगाव या भागाची जबाबदारी श्री. नानासाहेब ठकार

यांच्याकडे सोपविण्यात आली. अशा रितीने संपूर्ण पश्चिम खानदेशच्या भूमिगत चळवळीचे नियोजन करुन श्री. बाळूभाई मेहता ग्रामीण भागात असलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पडद्याच्या लहान बैलगाडीतून फिरत होते. श्री. बाळूभाई मेहता हे मार्गदर्शनासाठी पिंपळनेर येथे गेले असता श्री. शंकरशेठ बोळे यांच्या माडीवर गुप्त सभा झाली. परंतु या गुप्त सभेची माहिती पोलिसांना लागल्याने पोलिसांनी घराला वेढा दिला आणि त्यांनी बाळूभाई मेहता यांना अटक करुन त्यांची रवानगी धुळे कारागृहात केली .

श्री. बाळूभाई मेहतांना अटक झाल्यामुळे या चळवळीची संपूर्ण जबाबदारी श्री. विष्णूभाऊ पाटील आणि नानासाहेब ठकार या दोघांवर आली. परंतु अवघ्या चार महिन्यातच नानासाहेब ठकार यांना पोलीसांनी पकडले. त्याचप्रमाणे श्री. मुरलीधर भावसार, श्री. नवलभाऊ पाटील, श्री. चुडामण आनंदा पाटील यांनाही ब्रिटीश सरकारने ताब्यात घेतले.

**भूमिगत चळवळीचे नेतृत्व आणि सहकारी नेते**

श्री. बाळूभाई मेहता व ठकार यांना अटक झाल्यानंतर पश्चिम खान्देशच्या भूमिगत चळवळीची सुत्रे श्री. विष्णूभाऊ पाटील यांनी स्विकारुन कृष्णा दादा, देवमण दादा, गुलाबराव भावसार, फकिरा आप्पा, बाबूराव गुरव, शिवराम आबा, व्यंकटराव तानाजी धोबी, शंकर पांडू माळी, माणिकराव भिल, रंगनाथ टोणगांवकर, सु.गो. मदाणे, नरोत्तमभाई, शंकर एकोबा पाटील इत्यादींच्या मदतीने भूमिगत चळवळ सुरु ठेवली.

**कार्यकर्त्यांच्या गुप्त सभा**

भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांच्या गुप्तपणे सभा प्रामुख्याने कापडणे, विटाई, वडजई, बोरकुंड, दलवाडे, नावरा नवरी, देवूर, डांगूर्णे, सवाई मुकटी, मोहाडी, कमखेडे, चिरणे आणि पाठारे या गावांच्या जंगलात घेतल्या जात होत्या. या सभेत गुप्त पत्रकांचे वाटप करुन चलेजाव चळवळीचा संदेश कार्यकर्त्यांपर्यंत पोहचवला जात असे. त्यात प्रामुख्याने दुरध्वनी सेवा निकामी करणे, सरकारी इमारतींना आगी लावणे, इत्यादी कार्यक्रमाचे नियोजन गुप्त बैठकातून केले जाई. सभेमध्ये घेतलेल्या निर्णयाची कार्यवाही गुप्तपणे केली जात असे. धुळे येथील खादी भांडार हे या भूमिगत चळवळीचे मुख्य केंद्रे होते.

भूमिगत चळवळीत धुळे येथील राष्ट्रसेवा दलाच्या स्वयमसेवकांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली दिसते. ॲडव्होकेट रेगे यांचे घर भूमिगत कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान होते. बंडू कुळकर्णी, रतनलाल गुजराथी, लिंगायत, माणकलाल छाजेड, दशरथ माळी, राजाराम माळी या कार्यकर्त्यांच्या गुप्तसभा येथे होत असत. योजना आखून त्याची गुप्तपणे अंमलबजावणी केली जात असे त्याचप्रमाणे कापडणे येथील गावकऱ्यांनीही महत्वाची भूमिका बजावली.

**भूमिगत चळवळीतील कार्य**

**रेल्वेरुळ उखडणे :** नंदुरबार–सुरत या मार्गावर नंदूरबारहून सहा मैल अंतरावर असलेल्या ढेकवद या गावी तरुणांच्या एका टोळीने रेल्वेचा रुळ उखडण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात पोलीसांनी १५ तरुणांना पकडले.

**सरकारी बंगल्यांना आग :** काही सत्याग्रहींनी चिमठाणा येथील एक बंगल्यास १० ऑगस्ट १९४२ रोजी आग लावली. या आगीत जवळपास २५०० रुपयाचे नुकसान झाल्याची नोंद आढळते.

धुळे शहरात दि. १५ ऑगस्ट १९४२ रोजी सकाळी साडेचार पाचच्या सुमारास कोर्टातील इमारतीत लाकडी जाळ्यातून पेटते बोळे फेकून आग लावण्याचा प्रयत्न झाला. या आगीत कोर्टाचा मागील दरवाजा व काही कागदपत्रे नष्ट झालीत. यात व्यंकट धोबी, गजानन कानडे, रामराव सिताराम पाटील आणि लहू पाटील या तरुणांचा सहभाग होता. ९ सप्टेंबर १९४२ रोजी नंदूरबार शहरातील रनाळा इन्स्पेक्शन बंगल्याला आग लावण्याचा काही अज्ञात व्यक्तींनी अयशस्वी प्रयत्न केला.

२० डिसेंबर १९४२ रोजी नंदूरबार येथील 'हिलबंगला' या रेव्हेन्यू खात्याच्या बंगल्याला काही अज्ञात व्यक्तींनी आग लावली.

पिंपळनेर येथील पोलीस स्टेशनच्या इमारतीवर भूमिगत कार्यकर्त्यांचे लक्ष होते. त्यांनी २३ मार्च १९४३ या दिवशी रात्री ७.३० ते ८.०० वाजता भूमिगत कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनच्या इमारतील आग लावली. या आगीमध्ये पोलीसस्टेशन मधील सर्व कागदपत्रे व इतर सामान जळून खाक झाले या प्रकरणी पिंपळनेरचे श्री. जगन्नाथ दामू वाणी व श्री. शिवराम नथ्थू वाणी यांना अटक करण्यात आली व त्यांना सक्तमजूरीची शिक्षा सुनावण्यात आली.

**टेलीफोनच्या तारायंत्राच्या तारा तोडणे :** १५ ऑगस्ट १९४२ रोजी शहादा–खेतिया रस्त्यावर दूरध्वनीच्या तारा तोडण्यात आल्या. ही घटना मलोणी व ब्राह्मणपूरी या गावाजवळ घडली त्यामुळे या गावांवर ब्रिटीश सरकारने प्रत्येकी ५०० रु. दंड ठोठावला.

डी.एस.पी. पश्चिम खानदेश यांनी आपल्या अहवालात असे नमूद केले आहे की, ७ सप्टेंबर १९४२ रोजी कापडणे येथील युवकांनी धमाणे येथे जावून मिरवणूक काढली. त्याचप्रमाणे कापडणे गावाजवळ असलेल्या सरवड, गावाच्या परिसरातील त्याचप्रमाणे आग्रारोडवरील सोनगीर येथील दूरध्वनीच्या तारा चोरीला नेल्यात.

३ ऑक्टोबर १९४२ रोजी आग्रारोडवर नरडाणा येथे पहाटेच्या वेळी तार कापत असतांना श्री. डी.टी. माळी शिरपूर आणि श्री.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

डी.एन. भंडारी धुळे या दोघांना पोलीसांनी पकडले या आठवडाभरात धुळे, शिंदखेडा, सोनगीर आणि धुळे हद्दीतील ११ जागी टेलीग्रामच्या तारा तोडण्याच्या घटना घडल्या.

**तलाठ्याचे दप्तर लुटणे :** कापडणे येथील तलाठ्याचे घर दि. २६ नोव्हेंबर १९४२ रोजी फोडून घरातील सर्व दप्तर भूमिगतांनी पळविले. या गोष्टीबाबत कापडण्याचे श्री. छगनवीर बुवा यांना पकडण्यात आले.

**भूमिगत कार्यकर्त्यांना आर्थिक मदत :** भूमिगत नेत्यांना आपला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पैशाची गरज भासत होती श्री रामेश्वर शेठ यांनी श्री. विष्णूभाऊ पाटील यांना भेटीस बोलावून ७०० रु त्यांना दिले. त्यानंतर श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी धुळ्याला भेट देवून श्री. विष्णूभाऊ पाटील यांनी २००० रु. भूमिगत चळवळीसाठी दिले.

**चिमठाणा खजिना लुट –** भूमिगत चळवळीला प्रांतिक कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन मिळणे बंद झाले होते. कारण सानेगुरुजी, श्री.एस.एम.जोशी श्री. ना.ग. गोरे व आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यासारखे प्रांतिक नेते पकडले गेले होते. पैशाचा ओघ बंद झाला होता. त्यामुळे चळवळीसाठी पैसा पाहिजे होता. म्हणून नंदूरबार येथे साडेपाच लाखाचा खजिना जात आहेत अशी बातमी कळाली त्यानुसार एकूण पंधरा लोक खजिना लुटीसाठी निघालीत त्यात प्रामुख्याने जी.डी.लाड, नायकवाडी, कठके, धोंडीराम माळी, श्री. उत्तमराव पाटील, श्री. शंकर पांडू माळी व इतर सहकारी यांनी योजना आखून दि. १४ एप्रिल १९४४ रोजी चिमठाण्याजवळ साडेपाच लाखाचा खजिना लुटला.

**समारोप**

अशा रितीने धुळे जिल्ह्यात (पश्चिम खानदेशात) चलेजाव चळवळीचा प्रस्ताव जाहिर केल्यानंतर कॉग्रेसच्या नेत्यांची धरपकड केली. ब्रिटीश सरकारने विविध कायद्यान्वये तुरुंगात डांबणे, खटला भरणे, शिक्षा ठोंठावणे सुरु केले त्यामुळे अराजकता निर्माण होवून हिंसाचार सुरु झाला. त्याचे पडसाद धुळे जिल्ह्यातही उमटले धुळे जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे अनेक नेते भूमिगत झाले आणि त्यांनी भूमिगत चळवळ सुरु केली.

**संदर्भ सूची :**

१) पाल बिपीनचंद्र : भारत का स्वतंत्रता संघर्ष, दिल्ली–२००१, पेज नं. ३६७, ३६८.
२) ग्रोवर बी.एल. : आधुनिक भारताच्या इतिहास, नवी दिल्ली, २०३३, पेज नं. ४४४.
३) (डॉ.) पांडे मधूकर एन. : धुळे जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, मुंबई.
४) पाटील मधुकर व्ही : धुळे जिल्ह्यातील चले जाव चळवळ अप्रकाशित लघुशोध प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे. १९९१.
५) पाटील उत्तमराव : क्रांतीपर्व, धुळे, १९८७.

‘RESEARCH JOURNEY’ *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# मराठाकालीन खानदेशातील उद्योग व व्यापार : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. ए.जी. सोनवणे**
अर्थशास्त्र विभाग, आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरपूर जि. धुळे.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यानंतरखानदेश परगणाहा महाराष्ट्र राज्याचा एक महत्वाचा भाग बनला असून आजच्या प्रगत खानदेशामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाहतुकीतील वेगवान साधनांमुळे उद्योग व व्यवसायांची महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत वाढ होत असून लोकांचे उत्पन्न, राहणीमान व आरोग्य सुविधेत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. मात्र खूप वर्षापूर्वी १८ व्या शतकातमध्ययुगीनकाळातखानदेशची राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थिती वेगळी होती. मध्ययुगीनखानदेशची अर्थव्यवस्था मुख्यत: स्वयंपूर्ण होती आणि त्यामानाने लोकांच्या गरजाकमीहोत्या. उच्चकुलीन आणि सत्ताधारी लोक मात्र लोक चैनीचे आयुष्य जगत.भारी पोशाख, मसालेदार रूचकर खाद्यपदार्थ, कलाकुसरीच्या वस्तू आणि चैनीच्या वस्तूंना या वर्गाकडून मोठी मागणी असे.ज्यात मलमल आणि रेशीमकापड, मौल्यवान रत्ने, मोती, हस्तदंत, हत्ती यांचा समावेश असे.खांडववन, कन्हदेश, स्कंददेश, सेऊणदेश, दानदेशअशा विविध नावाने प्रचलित खानदेश दख्खनच्या पठारात मोडतहोता. व अत्यंत सुपीक प्रदेश म्हणून विशेषत: कापसासाठी प्रसिध्द होता. या पीकाला पांढरेसोनेसमजले जाई. मात्र प्रमुख व्यवसाय कृषी असला तरीखानदेशच्या आर्थिक जीवनात उद्योगधंद्यांना अतिशय महत्वाचे स्थान आहे.वाढलेल्या उद्योगधंद्यांनी रयतेच्या कल्याणात भर पडली.रयतेचे जीवन प्रगत केले.या दृष्टीकोनातून प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने मराठाकालीनखानदेशातील उद्योग यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१) मराठाकालीनखानदेशातील उद्योग व व्यापारावर प्रकाश टाकणे.
२) मराठाकालीनखानदेशातील उद्योग व व्यापारात कोणकोणत्या वस्तूंचा समावेश केला जात होता यावर प्रकाश टाकणे.
३) मराठाकालीनखानदेशातील उद्योग व व्यापारात कोणकोणत्या दळणवळण साधनांचा वापर केला जात होता याचा अभ्यास करणे.
४) मराठाकालीनखानदेशातील उद्योग व व्यापाराला सरकारच्या धोरणाची चिकित्साकरणे.

**संशोधनाची गृहीते**

१) मध्ययुगीनकाळात आजच्या सारखे प्रगत तंत्रज्ञान असलेले उद्योग व व्यवसाय अस्तित्वात नव्हते.
२) खानदेशलासमुद्र किनारा लाभला नसल्याने मध्ययुगीनकाळात व्यापारासाठी जलमार्गाच्या वापरावर मर्यादाहोती.

**संशोधनाची पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधात दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे.यात विविध लेखकांची पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, लेख, इंटरनेट इत्यादी प्रकाशित सामग्रीचा अवलंब केला आहे.

**खानदेशचे भौगोलिक स्थान व सीमा**

खानदेशचा भूभाग हा २०.८०ते २२.७० उत्तर अक्षांशावर आणि ७३.४२०ते ७६.२८० पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे.इ.स. १८७२ च्या सर्वेक्षणावरून या प्रदेशाचेक्षेत्रफळ एकूण १०,४३१ चौ.कि. एवढे आहे.खानदेशच्या उत्तरेकडील सीमेवर सातपूडा पर्वताच्या रांगा पसरलेल्या आहेत.या रांगेची लांबी ४८ ते ६४ कि.मी.एवढी आहे.खानदेशच्या भूभागात मध्यभागी सुपीक असेतापीचेखोरे आणि दक्षिणेकडे व नैऋत्य दिशेकडे अजिंठा व सह्याद्रीच्या रांगा आढळतात.खानदेशचा पश्चिम भूभाग हागुजरात राज्याच्या सीमेपर्यंत पसरलेला असून १९०६ सालीखानदेशचे प्रशासकीयसोयीसाठी विभाजन करण्यात आले आणि पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश अशी नावे देण्यात आली. आज खानदेशचे एकूण ३ जिल्हे आहेत. पूर्वकडील जळगाव, पश्चिमेकडे धुळे आणि नंदुरबार. मात्र मराठाकाळातखानदेशहा सुभा होता.खानदेशमध्ये मध्ये भडगाव, अमळनेर, भुसावळ, चोपडा, शहादा, शिरपूर, नंदुरबार, तळोदा, विरदेल इत्यादी परगणेहोते.

**मराठाकालीनखानदेशातील उद्योगधंदे**

खानदेशमध्ये अनेक प्रकारचे उद्योगधंदे प्रचलित होते. आज ज्या प्रमाणे मोठे उद्योगधंदे महाराष्ट्रात आढळतातततसे मध्ययुगात नव्हते. खानदेशातील असे उद्योग पुढील प्रमाणे –

**१) कापड उद्योग**

मोमीन, साळी व खत्री जमातीचे लोकांची वस्ती धुळे, कासोदा, धरणगाव, एरंडोल, सावदा, फैजपूर, वरणगाव, नशिराबाद, जळगांव, नशिराबाद येथे जास्त होती.खानदेशातीलकापडाला पुण्याला चांगली मागणीहोती.बऱ्हाणपुरचे शालू प्रसिध्द होते. थिवेने हा फ्रेंच प्रवासी १७

ISSN : 2348-7143
Dec. 2018

व्या शतकात भारतात आल्यानंतरतोखानदेशच्या कापड व्यवसायाबद्दल म्हणतो कि, ह्या प्रांतात सुती वस्त्रांची निर्मिती जेवढी विपुल प्रमाणात होते तेवढी हिंदूस्थानच्या इतर प्रांतात माझ्या मतेहोत नसली पाहिजे.

**२) घोंगड्यातयारकरणे**

घोंगड्यातयारकरण्यासाठीखानदेश आघाडीवर होता. घोंगड्यांसाठी लागणारे वुलन खानदेशातून मुबलक मिळत असल्यामुळेहा व्यवसाय धुळे, नशिराबाद, जामनेर, अमळनेर, सोनगीर व विरदेल येथे मोठ्या प्रमाणात तयारहोई व यात्रेच्या ठिकाणी विकला जाई.

**३) साखर आणि गुळ व्यवसाय**

ज्या भागात शेतीला चांगला पाणी पुरवठा होत असे त्या भागात ऊसाची लागवड करण्यात येत असे.खानदेशात ऊसापासूनगुळ आणि साखरतयारकरण्याचा व्यवसाय पेशवे काळातखुपहोता.पिंपळनेर आणि गाळणा परगण्यातसाखर आणि गुळतयारकरण्याचा प्रमुख व्यवसाय होता.

**४) तेल व्यवसाय**

तेलही जीवनावश्यक वस्तू असल्यानेतेलाचा व्यवसाय हा सर्वत्र विखूरलेला होता.या व्यवसायात २००० हिंदू–मुसलमान कुटूंब गुंतलीहोती.तेलतयार झाल्यानंतरते बाजारात विक्रीसाठी घेऊन जात.तीळ, भुईमूग, खोबरे, एरंडी इत्यादी पासूनतेलतयारहोत असे.

**५) पादत्राणेतयारकरणे**

धुळे, एरंडोल, चोपडा, नंदुरबार येथील पादत्राणे विशेष महत्वाची होती.

**६) बैलगाड्या तयारकरणे**

बैलगाड्या तयारकरणेहाखानदेश मधील प्रमूख व्यवसाय होता.कारणबैलगाडी हे वाहतूकीचे प्रमुख साधन होते.शिवाय उत्तम आणि स्वस्त लाकूड मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते.दोंडाईचा, तळोदा, नवापूर, सोनगीर, चोपडाही बैलगाडी तयारकरण्याची प्रमुखकेंद्रेहोती.

**७) अलंकारतयारकरणे**

सोन्या चांदीची दागिनेतयारकरण्याचा व्यवसाय खानदेश मधील बहूतेक सर्व गावातून सुरूहोता.धुळे आणि नंदुरबार हे अलंकारतयारकरण्याच्या बाबतीत विशेष प्रसिध्द होते.

**८) धातुपासून भांडी तयारकरणे**

तांब्या व पितळ या धातूपासून भांडी तयारकरण्याचा व्यवसाय सोनगीर व फैजपूर येथे चालत असे.

**९) विटा व मातीची भांडी तयारकरण्याचा व्यवसाय**

कुंभार हे घागर, डेरा, फुलदाणी, माठ, जार इत्यादी वस्तू मातीपासूनतयारकरीत. सावद्याचे कुंभार हे मातीच्या भांड्यावर रंगीतकामकरीत. मातीच्या भांड्यांना खानदेशमध्ये चांगली मागणीहोती.

**१०) खाण व्यवसाय**

खानदेशच्या भागात कोणतीही नैसर्गिक खनिजेसापडत नाहीत्यामुळेतेथेकसल्याच प्रकारच्या खाणी नाहीत.याला अपवाद फक्त दगडांच्या खाणीचा आहे.या दगडाचा वापर ईमारती बांधण्यासाठी केला जाई. धरणगाव, चोपडा आणि धुळे येथीलकाही कुटूंबे या कामात वाकबगार मानली जात असे.

**११) जंगलावर आधारीत व्यवसाय**

जंगलावर आधारीत असे व्यवसाय मराठा राज्यात खानदेश सुभ्यात प्रचलित होते.महुआची फुले व फुलांपासून दारूगाळण्याचा व्यवसाय होता.जंगलातीलडिंक व रोशा गवतापासून तेलकाढले जाई. त्यामुळे रोशा गवत गोळाकेले जाई.

**१२) बंदुका तयारकरणे**

खानदेशमध्ये चांगल्या प्रतीच्या बंदुकाही तयारहोतहोत्या.त्यासाठी जैनाबाद हे गाव प्रसिध्द होते.

**खानदेशमधील प्रमुख व्यापार केंद्र**

खानदेश सुभा जसा उद्योगधंद्यांच्या बाबतीत आघाडीवर होता तसाच तो व्यापाराच्या बाबतीतही आघाडीवर होताकारणग्रामीण भागात अनेक जीवनोपयोगी वस्तुंची निर्मितीहोत असे व त्या भागात व्यापार सुरू असे.

खानदेश सुभ्यातील बऱ्हाणपुर, नंदुरबार, मालेगाव, सोनगीर आदि काही शहरेही हमरस्त्यावर व मोक्याच्याठिकाणी वसली असल्याने या शहरात व्यापार वाढला तसेच धरणगाव, बऱ्हाणपुर, पारोळा, सोनगीर आदि शहरे उद्योगधंद्यांच्या बाबतीत प्रगत होती. या शहरात ज्या वस्तूंचे उत्पादनहोई. त्याला राज्यातून व राज्याच्या बाहेरून चांगली मागणी असे म्हणूनखानदेश सुभ्यात व्यापार वाढीस मदत झाली.काही शहरांचा इतिहास पाहता सातवाहन काळात बहाळ, प्रकाशेही प्राचीन नगरे असल्याचा उल्लेख आढळतो.ती नगरेखानदेशातील विविध भागात उत्पादित झालेल्या मालांसाठी बाजारपेठ म्हणून उपयोगीहोती.ती नगरेखानदेशात आयात होणाऱ्या मालासाठी व खानदेशातून निर्यात

होणाऱ्या मालासाठी व उद्योगधंद्यांसाठी महत्वाची केंद्रेहोती.प्रकाशेहे ठिकाण बांगड्या तयारकरण्याच्या उद्योगाचेकेंद्रहोत.प्रकाशे येथे स्त्रियांची कर्णभुषणे, अलंकार, शंख, शिंपले, यापासून कलाकसुरीच्या विविध वस्तु तयारकरणाऱ्या कारागीर वर्गाचे निवासाचे ठिकाणहोते.तर पाटणे येथे प्राण्यांच्या हाडांपासून व शंखापासून विविध अलंकार व हत्यारे बनविण्याचे उद्योगधंदे असल्याचे उत्खननावरून आढळते.पिसांपासून शोभेसाठी वस्तु बनविणे इत्यादी.

व्यापारात पुढील वस्तूंचा अंतर्भाव असल्याचे दिसून येते.:- अन्नधान्य, कापड, मसाल्याचे पदार्थ, फळफळावळे आणि इतर पदार्थ यात केळी, आंबे, भाजीपाला, मध, खारीक, साखर, पेढे, चारोळी, गूळ, तंबाखू, तांबे, पितळ, लोखंड, शिसे, इत्यादी इतर वस्तूं मध्येकणीक, पीठ, मैदा, तेल, तूप, मेण, सूतधागा, विड्याची पाने, पशुमध्ये बैल, शेळ्या, मेंढ्या इत्यादी

**व्यापारासाठी दळणवळणाचे मार्ग**

व्यापार आणि उद्योगधंदे वाढीसाठी रस्तेहे महत्वाचे असतात.रस्तेहे विकासाच्या वाहिन्या असतात.राज्यात तयार झालेला माल योग्य ठिकाणी पोहोचविणे, कच्चा माल वाहून आणने, नवीन बाजारपेठा शोधणे, अन्नधान्याची इच्छित ठिकाणी वाहतूक करणे इत्यादी अनेकगोष्टी दळणवळणाच्या मार्गावर अवलंबून असतात.खानदेशातून देशातील बहुतेक भागात दळणवळण होतहोते.खानदेशच्या पश्चिम बाजूला गुजरात जोडला जातो.उत्तर भागाला मध्यप्रदेश, दक्षिणकडे हैद्राबाद व नैऋत्य बाजूला बऱ्हाणपुर असल्यानेखानदेशची बहुतेक प्रातांत वाहतुक सुरू झालीहोती.बऱ्हाणपूर ते गोवलकोंडा हा महत्वाचा मार्ग जसा खानदेश मधून जात होता.तसा सुरतते आग्रा हा महत्वाचा मार्ग ही बऱ्हाणपूरहून जात होता.खानदेशातून नाशिक व पुणे येथे जाता येतहोते.खानदेशला जवळ असणारे महत्वाचे बंदर सुरतहोते.त्याला साक्रीहून नवापूर सुरत असा मार्ग होता.खानदेशलासमुद्र किनारा जरी लाभला नसला तरीखानदेशमध्ये गिरणा, तापी या सारख्या मोठ्या नद्या होत्या.या नद्यांमुळे अंतर्गत जलवाहतूक बोटीच्या सहाय्यानेसुरूहोती.अशी अंतर्गत जलवाहतूक अमळनेर, भुसावळ, एरंडोल, चोपडा, शहादा, शिरपूर, विरदेल, नंदुरबार, तळोदा इत्यादी ठिकाणीहोत असे.वाहतुकीला लागणाऱ्या बोटी प्रकाशे, सारंगखेडा, बऱ्हाणपूर इत्यादी सुभ्यातील गावात तयारकरीत असत.वाहतूकीसाठी बैल, उंट, घोडे, गाढव, रेडा, बैलगाडी, पालखी इत्यादीचा वापर होत असे.तथापि बैल हे वाहतूकीचे प्रमुख साधन होते.कापूस वाहण्यासाठी तसेच बैलाच्या पाठीवरून मीठ, किराणा माल, कापड, सूत, गूळ, खोबरे, खारीक, भुसार माल इत्यादी अनेक प्रकारच्या वस्तू वाहून आणत.नारोगणेश यांच्या एका पत्रावरून खानदेशमध्ये सात-आठहजार बैलांचे तांडेहोते.याचा अर्थ खानदेशमध्येखूप मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे.खानदेशमध्ये मराठाकाळातकाही गावात यात्रा भरत.या यात्रा तीन दिवसापासून तीन महिन्यांपर्यत चालत असत.तात्पर्य मराठाकाळातखानदेशातून मालाची आयात निर्यात उपरोक्त पध्दतीनेहोत असे.

**निष्कर्ष**

मराठ्यांनंतर पेशव्यांनीही राज्यात व्यापार वाढविण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते.सामान्यपणेखानदेश सुब्यात कसबे व पेठहोती.उदा.रनाळे, नंदुरबार यासारखी पेठहोती.कसब्यात आठवडा बाजार भरायचा.मात्र पेठही वर्षभर व्यापारासाठी उघडी असे.व्यापार पेठेचेसंरक्षण आणि प्रगती या संबंधीची जबाबदारी व्यापारपेठेचा प्रमुख शेठेवर असायची.तात्पर्य खानदेशमध्येसमृध्दीहोती व हीसमृध्दी फक्तकृषी मुळेच नव्हती तर व्यापार आणि उद्योगधंदे यांनीही मोठा हातभार लावला होता.नानासाहेब अर्थात बाळाजी बाजीराव यांनी अनेक व्यापाऱ्यांना राज्यात येण्याचे आमंत्रण दिलेहोते. जेव्यापारी खानदेश सुभ्यात आहेत त्यांच्या अडचणी दूरकरून त्यांना अनेक प्रकारच्या सवलती दिल्या. माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दितही बऱ्हानपूरहून पळून गेलेल्या व्यापाऱ्यांना अभयदान देऊन परत बोलविले.त्यांना करातसुट दिली.त्यामुळेचखानदेशमध्ये व्यापार हा मोठ्या प्रमाणात वाढला व हजारो व्यापारी बैलावर माल वाहून खानदेशच्या कानाकोपऱ्यात पोहोचू लागले.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.जगताप पी.डी., 'खानदेश इतिहास', गणेश ऑफसेट जळगांव, १९९७
२) डॉ.महाजन टी.टी., 'प्राचीनखानदेशचा इतिहास आणि संस्कृती' दिलीपराज प्रकाशन पुणे, २००५
३) डॉ.शहा जी.बी. , 'मध्ययुगीनखानदेश (आर्थिक, प्रशासकीय व सांस्कृतिक)' प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव, २०१५
४) चिटणीसकृ.ना., 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, व्यापार व उद्योगधंदे' भाग-३, पुणे, १९८२
५) विविध मासिके, वर्तमान इत्यादी मधील लेख
६) www.wikipedia.

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# सुफी संप्रदायाचे अनुयायी खानदेशातील फारूकी राजे

**प्रा.डॉ. एच.आर. चौधरी**
इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती एच.आर. पटेल महिला कला महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.
**प्रा. बोरसे सतिष मधुकर**
इतिहास विभाग प्रमुख, कै.अण्णासाहेब पी.एस. वाडिले कला महाविद्यालय, थाळनेर, ता. शिरपूर, जि. धुळे.

**सारांश**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात ज्या प्रमाणे हिंदु धर्मात भक्ती चळवळीचा उदय घडून आला तसाच इस्लाम धर्मात सुफी संप्रदायाच्या उदय व विकास घडून आलेला दिसतो.भारतात प्रथम महंमद कासीमच्या सिंध स्वारीने इस्लामचा भारतात प्रवेश झाला.गजनी काळात पंजाबात सुफी संप्रदायाचा उगम झाला. शेख दातारगंज बक्ष हा भारतातील सुफी पंथाचा जनक होय. त्याच्या मृत्युनंतर कादरी, चिश्ती, सुऱ्हावर्दी नक्शाबंदी इत्यादी संप्रदाय उदयास आलेत आणि त्याचा प्रभाव तेराव्या शतकात दक्षिण भारतात पडलेला दिसतो.

दक्षिणेत अल्लाउद्दीन खिलजीची देवगिरी स्वारी, मुहम्मद तुघलकाने दिल्लीहून देवगिरी येथे केलेले राजधानीचे स्थलांतर या घटनांमुळे सुफी संत दक्षिणेत दौलताबाद येथे स्थायिक झालेत. तजकीर–अवलीया–ए–दख्खन या ग्रंथात मध्ययुगात दक्षिण भारतात सुमारे तिनशे सुफी संताचे वास्तव्य होते.पैठण, खुलताबाद, अहमदनगर, थाळनेर, बऱ्हाणपूर, सुलतानपूर इत्यादी सुफी संप्रदायाची महत्वपूर्ण केंद्रे होती.त्यातील खुलताबाद केंद्रातील जैनउद्दीन व बुऱ्हानउद्दीन यांचे अनुयायी फारूकी राजे होते.नंतर गादीवर आलेल्या सर्व फारूकी राजांनी सुफी संताना राजाश्रय दिला.सुफी संताच्या नावांनी नवीन शहरे वसविली.त्यांनी दिलेल्या पोशाखाची परंपरा टिकविली.सोबत सुफी गुरूंची सर्वधर्म सहिष्णुता, नैतिक मुल्यांची जपवणूक, सेवा, त्याग, साधी राहणी, कला व स्थापत्य इत्यादी गोष्टीत हिंदु शैलीचे कमळ, पक्षी, नक्षी, संस्कृत लेख इत्यादी समानता टिकवून ठेवली.

थोडक्यात मध्ययुगात सुलतानशाही, मुगलशाही काळात उत्तरेत सुफी संताना राजाश्रय मिळाला.त्यांचा आदर्श दक्षिणेत फारूकी राजांनी टिकविलेला दिसतो.त्याचा परिणाम आजही हिंदु व मुस्लीम समाज ही दर्गावर श्रध्दा काही प्रमाणात ठेवतात, प्रार्थना करतांना दिसुन येतात.

**प्रस्तावना**

सुफी या शब्दाचा अर्थ धार्मिकदृष्ट्या भगवंताच्या भक्तीत पूर्ण तल्लीन झालेली व्यक्ती अथवा गुढवादी संन्यासी म्हणजेच सुफी संत होय. जगात सुफी पंथाचा उगम हा अरबस्थानात मक्का आणि मदीना येथे जरी झाला असला तरी भारतात इस्लामी राजवटीच्या आगमनासोबत हा पंथ उदयास आला तर दक्षिण भारतात विशेषत: खानदेशात तेराव्या शतकात विकशीत झालेला दिसून येतो. ज्या खानदेशात फारूकी राजवटीत सुफी पंथ विस्तारला त्या खानदेशाला कन्हदेश, कानुबाईचा देश, खांडवन आणि फारूकी राजांना मिळालेली खान या पदवी वरून खानदेश इत्यादी नावांनी ओळखले जाते. अशा या महान प्रांताची थाळनेरी नगरी ही वैभवशाली राजधानी होती. तसेच थाळनेर हे व्यापारी, सांस्कृतिकदृष्ट्या प्राचीन ते मध्ययुगीन काळापर्यत दौलताबाद, अहमदनगर, विजापूर, माळवा, गुजरात, बिरद, दिल्ली, आग्रा, बऱ्हाणपूर इत्यादी शहर व प्रांत जोडले गेल्यामुळे भारतातील सुफी संप्रदायाचे मुख्य ठिकाण होते. थाळनेर नगरीत फारूकी काळात दरवर्षी भव्य व दिव्य अशा पध्दतीने साजरा होणारा ऊरूस (ताजिया) महोत्सवात भारतातून विविध प्रांतातील लोक एकत्रित येऊन सहभागी होत असत.म्हणुन आजही थाळनेर येथे अनेक सुफी संताचे दर्गे अथवा पिर, कबर पहायला मिळतात. खरं पाहिलं तर पिर म्हणजे अध्यात्मीक गुरू होय. फारूकी राजे सुफी संप्रदायाचे अनुयायी असल्यामुळे सुफी संताना त्यांनी राजकीय, धार्मिक, राजाश्रय दिल्यामुळे सुफी संत थाळनेरलाच स्थायीक होऊन थाळनेर सुफी खानकाह केंद्रात मृत्यू पावले म्हणून त्यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणून मी सदर विषयाची निवड केली आहे.

**संसोधनाचा उद्देश**

१) खानदेशातील विविध फारूकी राजांची माहिती जाणुन घेणे.
२) फारूकी राजे विविध संप्रदायाचे अनुयायी होते यावर प्रकाश टाकणे.

**संशोधनाची गृहीतके**

१) खानदेशातील थाळनेर येथील फारूकी राजांवर सुफी संप्रदायाचा मोठा प्रभाव होता. ते सुफी संताचे अनुयायी होते.
२) सुफी संतामुळे फारूकी राजांना सर्वधर्मसमभाव तत्वाचे पालन केल्याचे दिसून येते.

**संशोधन पध्दत**

प्राथमिक, दुय्यम साधनासोबत इंटरनेट, मुलाखती, सर्वेक्षण, गॅजेटिअर, विविध ग्रंथ इत्यादी मार्फत संशोधन केले जाणार आहे.

**खानदेशातील फारूकी राजे आणि सुफी संप्रदाय संबंध**

**१) राजा अहमद अथवा मलीक राजा फारूकी –** मुहम्मद ख्वाजा जहान या दिल्ली दरबारातील मुख्य पदावर असणारी व्यक्तीचा

राजा मलिक फारूकी हा मुलगा होता. या विषयी डॉ.चौधरी जळगांव जिल्हा गॅझेटिअर मध्ये लिहितात फारूकी राजा मलीक हा दिल्लीत उच्च पदावर होता.मात्र दरबारातील कटकारस्नाला कंटाळून राजा मलीक दक्षिणेत आला. यावेळी दक्षिणेत काही काळ राहिल्यानंतर दौलताबाद येथील सुफी संत शेख झैनुद्यीन यांनी मलीक राजास तत्कालीन दिल्लीचा सुलतान फिरोजशहा तुघलक याच्या कडून सन १३७० ला थाळनेर व करवंदची जहागिरी मिळवून देण्यास मदत केली होती. तसेच राजा अहमद फारूकी म्हणून सन्मानही केला होता. त्याच्या विपरित फेरिस्ता हा समकालीन लेखक सांगतो फिरोजशहा तुघलक एकदा जंगलात शिकारीसाठी गेला असता, राजा अहमद याने सुलतानाची तहान व भूक भागविली म्हणून उपकाराची परतफड म्हणुन सुलतानने मलीक राजास थाळनेर व कुरांडे (करवंद) या जिल्ह्याची जहागिरी मलीक राजास बहाल केली होती.

थोडक्यात राजा मलीक फारूकी यास फिरोजशहा पेक्षा जैनउद्यीन या सुफी संताच्या कृपाप्रसादाने थाळनेरची जहागिरी मिळाली होती.म्हणुन मलीक राजा फारूकीने सुफी संत जैनउद्यीन याचे गुरू-शिष्यत्व संबंध होते.जैनउद्यीन याने राजा मलीी यास एक पोशाख दिला होता.या पोशाखाविषयी फेरिस्ता सांगतो कि, राजा मलीक हा गुरू जैनउद्यीन कडून सप्रेम भेट म्हणुन मिळालेला पोशाख दरबारात खास समारंभ प्रसंगी घालीत असे.एवढेच नव्हे तर मृत्यूपूर्वी नवीन वारसदारकडे हा पोशाख सुपुर्द करण्याची परंपरा फारूकी घराण्याचा अंत होईपर्यंत अखंडपणे सुरू होती.

**२) राजा नासिरखान फारूकी –** फारूकी घराण्याचा हा दुसरा राजा होय. राजा नासिरखान सत्तेवर येताच त्याने कपटनितीने राजा अहिर या गवळी राजाकडून असिरगढ जिंकून घेतला.त्यावेळी सुफी संत जैनउद्यीन याने खानदेशात येऊन नासिरने मिळविलेल्या विजयाबद्दल त्याचे अभिनंदन केले होते.म्हणुन राजा नासिरखान फारूकी याने जैनउद्यीन याच्या नावाने तापी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर जैनाबाद हे शहर वसविले.तर तापी पश्चिम किनाऱ्यावर दौलताबादचा लोकप्रिय सुफी संत शेख बुऱ्हानुद्यीन अवलीया याच्या नावाने बुऱ्हाणपूर या शहराची स्थापना केली.नासिरखान नंतर आदिलखान पहिला, मुबारकखान अल्पकाळ गादीवर आल्यामुळे सुफी संप्रदायाचा प्रचार अल्पकाळ ठरला.

**३) राजा आदिलखान दुसरा –** फेरिस्ता म्हणतो, आदिलखान फारूकी घराण्याचा एक उत्साही आणि सर्वश्रेष्ठ सुलतान होय. त्याने आपल्या साम्राज्यात झारखंड, छोटा नागपूर भाग जोडला होता. तसेच बिदर व गुजरात प्रांताना भेटी देऊन मैत्रीपूर्ण संबंध निर्माण केले होते.त्याने कला, स्थापत्य या क्षेत्रात प्रगती केली.राजा आदिलखानच्या काळात बऱ्हाणपूर, थाळनेर येथे सुफी संप्रदायाचे कार्य जोरात सुरू होते.शेख निजामउद्यीन शाह भिकारी या सुफी संताला तसेच गुजरातचा सुफी संत शहाबाज या दोन सुफी संताना आदिलखान गुरूस्थानी मानीत.पुढे आदिलखानाचा वध बऱ्हाणपूर येथे झाला.त्याच्या इच्छेनुसार त्याला थाळनेर येथे पुरण्यात आले.तर काही ग्रंथात राजा आदिलखान दुसरा यास बऱ्हाणपूर येथे दौलतवाड्याजवळ पुरण्यात आले.तर आदिलखान दुसरा याने गुरू शहाबाज बाबा यालाही त्याच्या अंतीम इच्छेनुसार थाळनेरला पुरण्यात आले आहे असे म्हटले आहे.

राजा आदिलखान फारूकी दुसरा यांनी खानदेशात अनेक सुफी संताना राजाश्रय दिला होता. या विषयी थाळनेर येथील जेष्ठ नागरिक अमृत पुंडलिक पाटील दिलेल्या मुलाखतीत सांगतात कि, थाळनेर मध्ययुगात सुफी संप्रदायाचे प्रमुख केंद्र होते म्हणून थाळनेरला एकूण चार महत्वपूर्ण सुफी संताचे दर्गे आहेत ते पुढीलप्रमाणे –

**अ) शाह बाबा –** हा प्रथम दर्गा प्रसिध्द सुफी संताचा असून तो संगमरवरी दगडाचा आहे. आणि फारूकी राजांच्या कबरी समोर तो आज आहे. याच दर्गात थाळनेर येथीलच रहिवासी सियासउद्यीन व खरोजउद्यीन काझी हे चादर चढविण्यासाठी आणि दर्शनाला रोज जात होते.याचा अर्थ फारूकी राजांनी राजाश्रय व दरबारात सुफी संतांना गुरू मानल्यामुळे थाळनेरला सुफी संप्रदायाचा प्रचार झालेला दिसून येतो.

शाह बाबास थाळनेर येथील कालू बशीर खाटीक शाहउद्यीन बाबा असे म्हणतात. आणि या शाहउद्यीन बाबा विषयी एक चमत्कारी अख्यायिका ही ते सांगतात. शाहउद्यीन बाबास एका जादुगाराने आव्हान दिले मला जो माझ्या दैवी शक्तीच्या जोरावर हरवून दाखवेल मी त्याचा शिष्य बनुन त्यांच्या समाधी समोरच जिवंत समाधी घेईल. पुढे शाहउद्यीन बाबांनी त्या जादुगाराला हरविले म्हणुन आजही थाळनेरला शाहउद्यीन बाबा शेजारीस त्याची कबर आहे. आजही फारूकी राजांच्या कबरी समोर सुफी संताची कबर व एक दुसरी कबर आहे. निश्चित पुरावा अभावी सांगणे अवघड असले तरी मध्ययुगातील शहाबाज बाबा म्हणजे आजचा शाहउद्यीन बाबा असू शकतो.

**ब) नुराग मियाँ बाबा –** हा फारूकी कालीन थाळनेर येथील दुसरा दर्गा होय. तो किल्ल्याच्या उत्तरेस व जमादार वाड्याच्या पश्चिमेस उंच अशा एका मातीच्या टेकडीवर आहे.या सुफी संताच्या नावानेही ऊरूस भरत होता.साधारणत: १९६८-७० मध्ये बाहेरून कवाल बोलवून आम्ही कवाली गायणाचा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.नुराग मिया एक लोकप्रिय सुफी संत होते.

**क) ताजउद्यीन बाबा –** आज थाळनेर येथील जमादार पाडाच्या पश्चिमेस ताजउद्यीन बाबाची दर्गा आहे.गावात साथीचे रोग, संकट प्रसंगी येथील लोक पांढरे निशान फिरवितात.त्यातून रोग व संकटे नष्ट होतात.अशी या बाबा विषयी श्रध्दा आजही कायम

आहे.ताजउद्दीन बाबास गुळ साखराचा नैवेध देतात. तसेच एखादा लहान मुलगा लवकर चालत नसेल तर बाबा मुलाला तर घोड्यासारखा पळायलाचालवशील. तर तुला कापडी घोडे चढविन म्हणुन कापडी घोडे चढविण्याची परंपरा ही आज दिसून येते. या बाबांची कबर उंच अशा मातीच्या टेकडीवर असुन एका दगडात वाघ गाईला खात आहे असे एक शिल्प असुन बाबाच्या पादूका ही पहावयास मिळतात.

ड) **नुरबक्षी बाबा –** थाळनेर येथील जमादार पाड्याजवळ नुरबक्षी बाबाचा दर्गा आहे.या दर्गा शेजारी एका कडूलिंबाचे झाड असून एका बाजूला लिंबाची पाने कडू लागतात तर बाबाच्या बाजुची पाने खाल्ली तर गोड लागतात.अशी एक चमत्कारीक श्रध्दा या बाबा विषयी लोकांमध्ये आहे.

**५) थाळनेर परिसरातील इतर सुफी संत –** वरील सुफी संत व्यतिरिक्त पिरपाखर बाबा, औनउद्दीन बाबा, थाळनेर ग्रामपंचायत जवळील पिर बाबा, थाळनेर जवळील होळनांथानंतर आढे येथील रस्त्याला लागुन असलेल्या मध्ययुगातील जुन्या उंच टेकडीवरील शाहंशाह चाँदवली बाबा. या चाँदवली बाबास गावातील लोक चाँद सूर्या बाबा म्हणुनही ओळख सांगतात.इत्यादी सुफी संताचे दर्गे महत्वपूर्ण होते.

**६) आदिलखान फारूकी तिसरा उर्फ आलमखान –** आदिलखान फारूकी हा गुजरात सुलतान महम्मद बेगडा याच्या सहकार्याने थाळनेरचा राजा झाला होता.त्याने काही काळ वास्तव्य केल्यामुळे अनेक सुफी संत त्याच्या दरबारी होते.तो सुफी संताचा मोठा आदर करणारा असल्यामुळे कदाचित थाळनेर येथील वरील संत आदिलखान काळातले असावेत.परंतु ठोस पुरावा अभावी सांगणे जरा धाडसाचे होणार नाही.मात्र आदिलखान फारूकी याच्या काळात शाहरियर मुल्लाना शाह भिकारी, बाबा फरीद, बुऱ्हाणपुरासह थाळनेला लोकप्रिय संत होऊन गेलेत.

**७) इतर फारूकी राजे आणि सुफी संप्रदाय संबंध –** राजा दाऊदखान फारूकी नंतर राजा मुहम्मदशहा फारूकी दुसरा हा सत्तेवर आला. त्याच्या काळात गुजरात मधून हजरत शाह धाऊस घोरी हे सुफी संत खानदेशातील बुऱ्हाणपुरला आले यावेळी राजा मुहम्मदशहा याने त्यांचे मोठे स्वागत केले आणि हजरत शाह घोरीच्या प्रभावाने प्रभावित होऊन त्याचे शिष्यत्व मुहम्मदशहा फारूकीने पत्करले. हजरत शाह घोरी हे सतारी पंथाचे अनुयायी होते.थाळनेरसह बुऱ्हाणपुरात सतारी पंथाचा प्रचार, प्रसार करण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान होते.

या नंतरचे काही फारूकी राजे सैयद महम्मद कादरी, मियान कादरी या सुफी संताचे अनुयायी होते.शेवटी कद्रखान उर्फ बहादुरखान या शेवटच्या फारूकी राजाच्या काळात खानदेश १६०१ ला अकबराने जिंकल्यामुळे खानदेशात फारूकी सत्तेचा शेवट होऊन मुघलशाही सुरू झाली.

**समारोप**

थोडक्यात खानदेशात एकूण १४ फारूकी राजांनी राज्य केले. ते सर्व सुफी संताचे अनुयायी असल्यामुळे फारूकी राजांवर त्यांचा धार्मिक प्रभाव पडला म्हणुन फारूकी राजांनी थाळनेरसह बऱ्हाणपूर सुलनातनपरू इतर शहरात निर्माण केलेले स्थापत्य कलेत हिंदु-मुस्लिम मिश्र शैलीत वास्तु निर्माण केल्यात, धार्मिक सहिष्णुता टिकवली. उदा.अरबी व संस्कृत शिलालेख, समाजातील वाईट प्रथा, गुलामगिरी, जातीयवाद, धर्मवाद या नष्ट केल्यात त्यामुळे सामाजिक सलोखा निर्माण करून आपल्या राज्याची प्रगती केली. थाळनेर येथील फारूकी राजांचे सुफी संप्रदायाचे कार्य मोठे असल्यामुळे मध्ययुगात थाळनेर येथील ताजिया महोत्सवासाठी संपूर्ण भारतातून सुफी संत थाळनेर केंद्रात येऊन दरवर्षी या महोत्सवाचा आनंद घेत होते म्हणुन फारूकी राजे जरी सुफी संताचे अनुयायी असल्यामुळे त्यांनी सर्व सुफी संतांना गुरूस्थानी मानून त्यांचा मानसन्मान केलेला दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१) Sufism - Wikipedia.org
२) Khandesh District Gazetteer - The Government photo zinco press pune, vol-xii 1983
३) डॉ.टी.टी.महाजन – खानदेशचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९८
४) डॉ.चौधरी कि.का. – म.रा.गॅझेटिअर जळगांव जिल्हा, सा.का.वि.म.शा., १९९४
५) डॉ.कुंटे भ.ग. – गुलशने इब्राहिमी, म.राज.सा.सं.मं.मुंबई, १९८२
६) डॉ.कुंटे भ.ग. – मध्ययुगीन महाराष्ट, म.रा.गॅझेटिअर, द.वि.म.सा.मुंबई, २०१४
७) थाळनेर येथील जेष्ठ नागरीक श्री अमृत पुंडलीक पाटील यांची दिनांक २१/११/२०१८ रोजी घेतलेली मुलाखती वरून नोंद
८) दि.३०/११/२०१८ रोजी थाळनेर येथील कालू बशीर खाटीक यांची घेतलेली मुलाखती नुसार नोंद
९) प्रत्यक्ष आढे येथील स्थानिक लोकांची माहिती व सर्वेक्षण नोंद दि.२९/११/२०१८

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील ओवींचे अनुभव विश्व

**डॉ. सी.एस. करंके**
मराठी विभाग प्रमुख, कला महाविद्यालय,
बामखेडा, त.त. ता.शहादा, जि. नंदुरबार.

भारतातील १४ प्रमाण भाषा लोकगीतांनी समृध्द आहेत. त्यात ६०० पोटभाषा ह्या लोकगीतांनी समृध्द आहेत. मराठी भाषेच्या पोटभाषांपैकी खानदेशातील अहिराणी भाषा' त्याला अपवाद नाही. अहिराणी लोकगीतांमध्ये लग्न प्रसंगी म्हटली जाणारी गीते, सण, उत्सव संबंधी वेळोवेळी म्हटली जाणारी गीते तसेच ऋत ुमानानुसार म्हटली जाणारी लोकगीते त्याच प्रमाणे पहाटेच्या वेळी जात्यावर म्हटल्या जाणाऱ्या जात्यावरील ओव्या या अहिराणी भाषेत विशेष महत्वाच्या आहेत.

जात्यावरील अहिराणी ओव्या ह्या सुरस, गोड आणि सकस असून त्यात भावनेचा ओलावा आहे तसेच परस्पर प्रेमाचा जिव्हाळा आहे. साहित्यातील नवरसांचा व भक्तीरसाचा उत्कट, उत्स्फूर्त अविष्कार ओव्यात आढळतो.

अहिराणी जात्यांवरच्या ओव्यांमध्ये स्त्रीच्या बाल्यावस्थेपासून ते वृध्दावस्थेपर्यंत जीवनाचा चलचित्रपट ओव्यातून दिसून येतो. त्यात माहेर आणि सासर या द्वंदात्मक अवस्थेत पहाटेच्या प्रसन्न वातावरणात जात्यावर बसल्याबरोबर मनातील अगतिक भाव सहज उत्कटतेने बाहेर पडतो.

*पहिली मनी ओवी जन्मना माता-पिताले*
*मग मायसू सखा गोतले*

आई आणि वडिल दोन अव्यक्त रूपे. जसे सर्व मंगलांचा मंगल श्री गणेशाचे रूप आहे. त्या सर्व तीर्थाविषयी कृतज्ञस्ता व्यक्त करते. त्यांच्याच आशीर्वादाने लेकीचा संसार फुला-फळाला आला.

*माय-माय करू माय से सोनानी परात*
*मायबिगर माले गमेना घरात*
*नवमास मनं ओझं वागणी कुशी*
*माय तुना उपकार सांडू कशी*

सासरवाशीणीच्या मनात आई विषयी प्रेमाची कदराची, आदराची भावना तर दुसरीकडे आपल्याला लहानाची मोठी केली, त्याचे उपकार सांगतांना गहिवर दाटतो.

*माहेरनी मले रोज येस आठवण*
*माय माले कधी धाडशी बोलावणं*

आईच्या आठवणींनी लेकीचा जीव व्याकुळ होतो. म्हणून आई भावाला सासरी घेण्यासाठी कधी पाठवणार, असा सारखा विचार करते. कारण त्याच्यामागे काहीतरी घेण्या-देण्याची, रूसण्याची किंवा मागणी आहे तर -

*जरीना लुगडानी घडी फाटनी बोरबाभुईवर*
*मना रूसवा जन्मदेत्या मायवर*

कधी आई-वडिलांपासून दूर गेलेली, पण सासरी गेल्यावर वातावरण बदलते. त्याचप्रमाणे -

*गीता नी भागवत मना गयान सोन*
*पितानी दौलत माले शिकाडे शहाणपन*

गीता आणि भागवत हे लेकीच्या गळ्याचे सोन आहे. सासरी लेकीने कसे राहावे हीच खरी आई-वडिलांची शिकवण आहे. सासरचे सौभाग्याचे कृत्य पार पाडण्यासाठी तुझे बळ दे. तुझ्या आशीर्वादामुळे गृहस्वामिनीचे कर्तव्य पार पाडण्यासाठी उभी आहे.

*सादले देये साद, साद देणार चतुर*
*लेक मायनी पातर*

आईचा वारसा सांभाळीत मी माझ्या संसारात पात्र आहे. आईने वडिलांचा संसार धन्य केला तसा मी माझ्या पतिदेवांचा करणार. तुझ्या नावाला तीर्थरूप देईन.

*सासु आत्याबाई सुखदेवनी चांदणी*
*सासरी बोलाजी सूर्या डोलस अंगणी*

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

सासु-सासरे म्हणजे देव्हारातील देवच आहे. सासु शुक्राची चांदणी आणि सासरे जणू प्रतिसूर्यच आहेत. पण हे सारे स्वप्नच असते. कधी न गेलेली लेक ज्यावेळी सासरी जाते, त्यावेळी दळण कांडण, स्वयंपाक उरकून पुन: शेतीची कामे करण्यासाठी जावे लागते. त्यावेळी स्त्री जन्माविषयी सहजगत्या...

*असतोरीना जलम देव घालीसन चुकना*
*रातदिन बैल जसा घानाले जुपना*

एवढेच नव्हे तर

*काया वावरमा शेंदोंडी करे मात*
*रांड जमीन कमजात मारे भवजाईले लात*

बैलांचे बळ अंगात घेवून दिवसभर शेतीत राबणारी, परत घरी आल्यावर सासूचा आणि नणंदेचा शब्दाचा मार तिला सहन करावा लागतो. आईच्या संस्कारात वाढलेली ती लेक नकळत म्हणते

*माय माय करू माय मनी चंदननी खाप*
*मना नशिबले काय करी जन्म देता मायबाप*

काही झाले तरी आता एकमेकांना सोडता येणार नाही. ह्यातर जन्माच्या गाठी आहेत. अशावेळी तिला माहेरची आठवण येते.

*काय सांगू बाई माहेरनी बढाई*
*घाटात मडक नी चाटूनी लढाई*

त्यावेळी नकळत माहेरचा ओढा लागतो. कारण दिवाळी जवळ आलेली असते. आता माहेरी जावयास मिळेल. आईच्या कुशीत क्षणभर डोके टेकून मातेची ऊब पुन:श्च आपणास लाभेल अशी तिला सुखस्वप्ने पडतात.

*दिवायीना रोज धाबे-धाबे दिवा*
*भाऊ कसा मने आज बहिणीना येवा*

दिवाळी आली म्हणजे बहीण येणार असे वाटते. कारण तो पत्नीच्या मुठीत गेलेला असतो. तिच्यापुढे त्याचे काहीच चालत नाही. घरातले सासुसासरे जग सोडून गेल्यामुळे आपला अधिकार गाजवते म्हणून पत्नीचा शब्द म्हणजे लक्ष्मणरेषा मानतो.

*दिवाळी दसरा शेती बाडीना पसारा*
*भाऊ कसा म्हणजे बहीण दिवाई विसरा*

शेवटी मनातले दु:ख मनात असते ते कोणापुढे सांगता येत नाही. उलट भाऊ ही बोलत नाही. म्हणून भावजाईला सांगते, दोन दिवस भाऊबिजेसाठी मी जास्त दिवस राहणार नाही. कारण

*सीता भवजाई नको करू नसनस*
*ननीननी जात नही रास बारीमास*

आई वडील गेल्यावर मी माझ्या भावाचा संसार कसा सुखाचा आहे ते मी पाहण्यासाठी आली आहे. उलट माझ्या आई-वडिलांनी तुम्हा दोघांना आयुष्यभर कधी न संपणारे धन दिले आहे.

*सुन्य भवजाई नको करू तुनमन*
*शेरभर सोन तुना हवाली करीदिन*

पण शेवटी बहिणीने रक्ताचे नाते तोडून टाकले.

*भाऊनी बहिण एक येलन वाईक*
*सुन्य भवजाई कुजात तोडीसनी करालोक*

अनेक स्वप्न मनाशी धरून आलेली, जेव्हा आपला भाऊ आणि बहीण यांच्यात झालेल्या बेमानावामुळे ती काहीच करू शकत नाही. म्हणून मनातील दु:ख सांगण्यासाठी बालपणाच्या मैत्रीण जवळ जाते तिच्याजवळ सांसारिक जीवनाचा भार हलका करते. त्यावेळी आपला पती कसा आहे असे सहजगत्या सांगताना

*घरनी असतोरी जशी पलगना मोर*
*पराय रांडसाठे पैसा दिसनी झाया चोर*
*घरनी असतोरी जशी कपाशीन बोंड*
*परायनी रांडसाठे यान उतरन तोंड*

एकीकडे पतीचे सांसारिक दु:ख तर दुसरीकडे माहेरी आल्यावर होणारा अपमान आणि पती बाहेरच्या रखेलीचा झाल्यामुळे

समाजात होणारी कुचंबणा. मग आपला भाऊ कसा आहे. याचा प्रत्यय सहज व्यक्त करते.

*आते नही रायना भाऊ बहिनीना*
*खिसामा घाले चोयी, वाडा पुसे मेवनीना*

तो पूर्णपणे भावजाईचा मुठीत आहे. स्वत:च्या गणगोतापेक्षा बायकोच्या गणगोताकडे त्याचे लक्ष आहे. मग देवाला विनवणी करते की हा स्त्री जन्म कसा आहे.

*असतोरीना जलम नको घालू श्रीहरी*
*रात्रदिन परायनी ताबेदारी*

अशाप्रकारे जात्यावरील ओव्यातून सहज प्रकृतीने मनातील भाव-भावनांच्या उदात्तीकरणाला हातभार लागतो. जात्यावरील ओव्यातून स्त्रियांच्या अनुभव विश्वाचा अविष्कार होतो. आवडीचे, नावडीचे सासर, माहेर, दागिने, घराण्यांविषयी अभिमान, पती विषयक भावना जात्यावरच्या ओव्यातून दिसून येतात.

भारतीय पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्री ही सोशिक आहे. पतीची विनवणी करणे हे तिच्या पाचवीला पुजलेले आहे. माहेरच्या आणि सासरच्या इतरांच्या मर्जीचा कौल सांभाळणे या द्वंदात्मक अनुभूतीची किती तरी रूपे, उपमा दृष्टांतातून सहज प्रकट होतात.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.सी.एस.करंके - खानदेशी जात्यावरील ओवी, अप्रकाशित ग्रंथ

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील अहिराणी बोली भाषेचे सांस्कृतिक वैभव

**प्रा.डॉ. डी.ए. पाटील**
मराठी विभाग, आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे.

**प्रास्ताविक**

अहिराणीहीभाषा खानदेश या भू प्रदेशातील बोली म्हणून ओळखली जाते.महाराष्ट्रातील जळगांव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांचा मिळूणहोणाऱ्या प्रदेशास आजहीखानदेश म्हणून ओळखतात.खानदेश या शब्दाची उत्पत्ती कान्हदेव, कान्हेरदेव, कान्हांचा देश, कानबाई, या शब्दात शोधण्याचा आजवर प्रयत्न झाला आहे.कान किंवा खान या शब्दाचा अर्थ खान, खदान, मध्येखोल असणारा भाग, खनि किंवा उत्पत्ती स्थान, सातपुड्याच्या रांगा, सह्याद्रिच्या रांगा, चांदवडचे डोंगर, वाघुर नदी व परिसरातील डोंगर रांगा यामुळेहा परिसरखोलखदानीसारखा, खाणीसारखा आहेच. गिरणा, तापी, नर्मदा, खोऱ्यांचा भाग, दाट अरण्यांचागुरांसाठी विपूल गवत असणारा प्रदेश, चौफेर नैसर्गिक तटबंदी शुध्दा व शुध्द वंश (खानदानी) होती म्हणूनखानीचा प्रदेश, चांगल्या वंशाचा खानदानीचाकानन देश या वरून खानदेशहे नामाभिधान झाले असावे. अशा व्युत्पत्तीचाही विचार करण्यासारखा आहे.अशा खानदेशातील बोलली जाणारी भाषा अहिराणी या अहिराणी बोलीभाषेचे सांस्कृतिक वैभव काय आहे याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केलाआहे.

**विषय विवेचन**

खानदेशात अहिरांचे वास्तव्य होते.अहिरांनीसूपिक जमिनीवर गुरे चारण्यासोबतच शेती व्यवसाय केला.शेती व्यवसायाला पुरक असे विविध व्यवसाय करणारे इतर लोक अहिरांशी सततच्या संपर्कात येवू लागले.अहिरांच्या भाषेचे वर्चस्व हे खानदेशावर वाढल्याने अहिराणीही प्रदेशाच्या नावाने म्हणजेचखानदेशी बोली या नावाने ओळखली जाऊ लागली.ती एका जातीची भाषा न राहताती त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांची प्रदेशाची भाषा झाली.अहिरांशी इतर भाषिकांचा संपर्क आला.बोलींचा उल्लेखकरतांनाती त्या प्रदेशाची बोली खानदेशची बोली म्हणूनखानदेशी या नावाने गणलीगेली.खानदेशी बोली हीसंकल्पना अहिराणी बोली या संकल्पनेपेक्षा विशाल आहे.खानदेशी व अहिराणीहे दोन शब्द अर्थभेदक कधीहीठरले नाहीत.अहिराणीहीखानदेशची मध्यवर्ती बोली आहे.

खानदेशातील बोलीभाषा अहिराणी असल्याने लोकगीतेही त्याच भाषेत दिसून येतात.लोकगीतेही प्रामुख्याने मौखिक आहेत.लोकगीतेही निरक्षर लोकांमध्ये प्रचलित असल्याने मौखिक रूपातच आढळतात.एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडेसंक्रमित होणाराहा मौल्यवान ठेवा मौखिक स्वरूपात दिला जातो.विशेष म्हणजे स्त्रिया या अशिक्षित असूनही त्यांच्या तोंडपाठ दिसून येतात.कारण याला अंतरीचा जिव्हाळा, प्रेम, अतुट भावबंध व माणूसकी दिसून येते.आज शिकलेल्यांनाही शक्य होणार नाही.

खानदेशातील लोकगीतांचा संबंधजसा क्रियांशी असतो तसा विधिशींही असतो.लोकजीवनातून अनेक धार्मिक, सामूहिक व कौटूंबिक विधी असतात.खानदेशात कानबाईचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजराकेला जातो.कार्यक्रम प्रसंगी कानबाईच्या संदर्भातील गीते –

*नऊ रोजनी नवरी व माय मनी कानबाई*
*भांग गुलालना भरी व माय मन्ही आंबाबाई*
*डोयेकाजय झिरीमिरी व माय मन्ही कानबाई*
*पिवया पिंताबर नेसनी व माय मन्ही कानबाई।*

वरील गीतांवरून कानुबाईच्या वस्त्रांलकार देवतेच्या स्वरूपाचे वर्णन केल्याचे दिसते.खानदेशातील प्रमुख उत्सव कानुबाईच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहतात व हा उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजराकरतात.

भारतीय संस्कृतीत शब्दांना आपण शब्द ब्रम्ह म्हणजो, नादब्रम्ह म्हणतो.मंत्र श्रध्दास्थान आहे, ओंकार स्वरूप आहे.काही लोकगीतांना मंत्राचा दर्जा प्राप्त झाला आहे.खंडोबाचा गोंधळ, तळी भरणे, कानबाई, गौराईहीगीते मंत्राइतकी प्रभावी समजली जातात.

*कावया कोकायना कावयाला कायगुन*
*भाऊ शे पावना सोनाना लागे दिन*

खानदेशात कावळ्याचे ओरडणेहा एक शुभ संकेत मानला जातो.घराच्या गच्चीवर जर कावळा ओरडत असेलतरकोणीतरी पाहुणा घरी येईल असा शुभ संकेतहा कावळा देतो अशी समज आहे.हेतर संत ज्ञानेश्वरांनीही मान्य केले आहेकी – पैलतो जेकाऊकोकताहे। शकून ग माये सांगत आहे असे शकून लोकगीतातही आहेत.अशा लोकगीतांच्या माध्यमातून शुभ संकेतस्पष्टहोतो.

लोकगीतात सभोवतालचा निसर्ग, समाज भाषा यांचा संस्कार झालेला दिसून येतो.तसेच लोकगीतेहीस्थलांतरक्षम आहेत.दळणवळणाची

साधने वाढली.लोकगीतात पुरूषपेक्षा स्त्रियांचा सहभाग जास्त आहे.स्त्री जीवनात संघर्ष हा अधिक असल्यामुळेत्या तात्काळ भाऊक होतात व त्यांच्या जीवनाची गथा हुंकारातून बाहेर पडते.नकळत शब्द ओठांवर येतात.संवेदनशीलतेमुळे कवीमनाचे वरदान तिला लाभले आहे.खानदेशातील मराठीस्त्रीगीतांमध्ये प्रेमाचा अविष्कार संवेदनशिलता, सहानुभूती, माया, ममता यांची अनुभूती प्रकर्षाने जाणवते.स्त्रीगीतातसंस्कार संपन्न अनुभवशील मनाचा अविष्कार स्त्रीगीतात आढळतो.ज्यानेहातले घटात्याले देव भेटा हाकर्मयोग व हीश्रमाची पूजा याची अनुभूती येते.कळत नकळत बदलत्या काळाचेसंस्कार लोकगीतांवर होतात.

खानदेशातीलस्त्रीही आपले दु:खहलकेकरण्यासाठी जात्यावर गीतगाते. मनावरचा ताण कमीकरते. जात्यात भरडले जाणारे दाणे व तिचे भरडले जाणारे जीवन या साम्यातून दळण दळतांना आपले दु:ख व्यक्त करायलाती जात्याशी जवळीक साधतांना दिसून येते. आपले दु:ख उंबरठ्याबाहेर जाऊ नये म्हणून माजघरात व जात्याच्या घरघर आवाजात ती आपले दु:ख जात्यावरच व्यक्त करीत असते. तसेच आपले श्रम हलकेकरणेहाहेतू असतो.पहाटेच्या शांत वेळी जात्या इश्वराशी हितगुजकरायला तिला वेळ मिळतो. आपल्या आईबापाचे नाव राखण्यासाठी व खानदानाचे नाव व्हावे म्हणून आशीलनी बेटी व घरंदाजानीसूनसुखना सवसार करणारीहीखानदानी नार आहेहे या गीतांतूनस्पष्टहोतेतसेचखानदेशातअहिराणी भाषेत इतरही अनेककार्यक्रमाच्या माध्यमातूनगीतेगायीली जातात. मुलीच्या जातीने लग्न झाल्यानंतर आपल्या सासरीचसुखाने नांदावे अशी आईवडिलांची अपेक्षा असते.त्या संदर्भात अहिराणी भाषेत त्या मुलीच्या बाबतीत म्हटले जाते.कीआंडेरनी जात नांदती बरी का मरती बरी असे म्हटले जाते.यावरून स्त्रीयांच्या बाबतीत ग्रामीण भागात आजही जी मानसिकता दिसून येते.त्यात प्रामुख्याने अहिराणीगीतातूनही व्यक्त होतांना दिसून येते.

पहाटेच्या प्रभात समयी कोंबडा आरवल्यापासून तिच्या दिवसाची सुरूवात होत असते.अशा प्रसंगी तिचे उद्‌गार मनाला चेतना देतात.

*थकना जीव लागना डोया टाकता अंग*
*कायकरू बाई कोंबडा वैरीनी दिन्ही बांग।*

पहाटेचे स्वागत ती वैभवशाली शब्दांनी व्यक्त करते.तसेच सासरवाशीन स्त्री आपल्या सासरबद्दलची कथा, व्यथा सांगतांना तीकोणत्यागोष्टी प्रकर्षाने टाळतेते पुढील ओवीतून स्पष्टहोते.

*सासरनीगोष्ट माहेरीसांगु नही*
*धनी नांदती मातापिता त्यासनं मन मोडू नही*
*सासरनीगोष्ट माहेरीसांगो नही*
*नांदती भाऊ भासा त्यासनं मन मोडू नही।*

एक सासरवाशीन म्हणतेसासरी घडणारे बरे वाईट प्रसंग माहेरी आईवडीलांना सांगू नयेकारणत्यामुळे उगीचच आईवडिल हे दु:खीहोतात. भाऊ व त्यांची मुलेहे देखील नाराजहोतात.माहेरच्या कोणाचेही मन आपल्या सासरीहोणाऱ्या जाचामुळे व्यथीत होऊ नये असे तिला वाटते.एकंदरीतचसासरी असणाऱ्या स्त्रीला आपल्या जीवनात काही नियमांचे पालन करावे लागतेहे या प्रसंगातून दिसून येते.एकंदरीतखानदेशातील अहिराणी बोली भाषेचे वेगळेपण भाषेचा गोडवा, भाषेची प्रतिमा ही जनमानसांवर ठसा उमटविते. भाषेचा गोडवा हाठळकपणे दिसून येतो.

**निष्कर्ष**

१) खानदेशातील अहिराणी बोली भाषेचे वेगळेपण ठळकपणे जाणवते.
२) खानदेशात अहिराणी बोलीभाषा बोलणारा जनसमूह मोठ्या प्रमाणात असल्याने बहुसंख्य लोकहे रोजच्या दैनंदिन व्यवहारात अहिराणी भाषा बोलतात.
३) खानदेशात विविध सणसमारंभ प्रसंगी व लग्नाचीगाणीही अहिराणी भाषेतून गातांना दिसून येतात.
४) अहिराणी लोकगीते लोकसमूहाची मानली जातात.
५) अहिराणी भाषेतील गीतांनाकाळाचे बंधन नाहीतीकालातीत आहेत. अहिराणी लोकगीतातून आभीरांची जीवन व्यवहाराचे रूढी परंपरासंकेत या लोकतत्वाचे दर्शन घडते.
६) अहिराणी लोकगीतामधून अडाणी लोकांच्या प्रतिभेचे दर्शन घडते.
७) अहिराणी लोकगीतांवर लोकसमूहाचा प्रभाव जाणवतो.
८) खानदेशातील अहिराणीगीतांच्या माध्यमातूनस्त्री आपले दु:ख जात्यावरच्या गीतांच्या माध्यमातूनहलकेकरण्याचा प्रयत्न करते.

**संदर्भ सूची :**

१) खानदेशातील अहिराणीस्त्रीगीते – प्रा.डॉ.उषा सावंत, प्रतिमा प्रकाशन पुणे
२) अहिराणी बोली व लोकसाहित्य – डॉ.सुशिलकुमारशिंदखेडकर, झरोका पब्लिकेशन्स, जळगांव
३) अहिराणी बोलीचा पहिला शब्दकोश – डॉ.रमेश सुर्यवंशी, अभ्यासिका प्रकाशन, कन्नड
४) अहिराणी लोकसाहित्याचे दर्शन – कृष्णा पाटील, मेहता प्रकाशन, पुणे
५) खानदेशातील ग्रामदैवते आणि लोकगीते – स.नी.पगार, का.स.वाणी मराठी संस्था धुळे

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# पश्चिम खानदेशातील अश्ययुगीन मानवाची हत्यारे व आयुधे

**प्रा.डॉ. कविता धनंजय धर्माधिकारी**
संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग प्रमुख,
एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.

**प्रस्तावना**

आपल्या अंतर्गत असलेल्या नैसर्गिक शक्तीला भोवतालच्या पदार्थांची, गोष्टींची जोड देऊन स्वत:ला अधिककार्यक्षम बनविणे हाकोणत्याही मानवी तंत्रज्ञानाचा प्राथमिक उद्देश असतो. अश्मयुगात मानवाने लाकडे, हाडे, दगड यांच्या साहाय्याने आपल्याला उपयोगी पडतील अशी उपकरणे व आयुधे घडविण्यास प्रारंभ केला.त्यातुनचकुऱ्हाडी, विळे, बाण, सुऱ्या तसेचक्षेपणायुध्दात भाला, भालाफेकीची काठी, धनुष्यबाण व गोफणही सर्व प्राणघातक आयुधेतयारहोऊ लागलीत.१ शस्त्र, अस्त्र, हत्यारे, आयुधे यांचा उपयोग चढाईकरण्यासाठी व शत्रुपासून स्वत:चा बचाव करण्यासाठीकेला जातो. अश्मयुगीन मानवाने स्वरक्षणासाठी, शिकारकरण्यासाठी, उपजिवीकेची साधने प्राप्त करण्यासाठी विविध प्रकारच्या दगडापासून आयुधे, हत्यारेआपल्या गरजेनुसार निर्माण कलीतती आयुधेकशा पध्दतीचीहोतीहे पुरातत्ववेत्यांनी केलेल्या उत्खननावरून अभ्यासता येते. प्रस्तुतसंशोधन पेपरमध्ये पश्चिम खानदेशातील अश्मयुगीन मानवाची हत्यारे व आयुधे या दृष्टिने विचार केलेला आहे.पुरातत्ववेत्यांनी खानदेशात केलेल्या उत्खननांवरून अश्ययुगातील मानवासंबंधी बरीच माहिती उपलब्ध झाली आहे.त्यातूनखानदेशातील मानवाचे अस्तित्व पाच लाख वर्षापूर्वीचे असल्याचेस्पष्ट झाले आहे.

**उद्देश**

अश्मयुगाचाकालखंडाचा परामर्श घेऊन पश्चिम खानदेशातील अश्मयुगीन मानवाची हत्यारे व आयुधांचा अभ्यास करणेहा प्रमुख उद्देश आहे.

**गृहितके**

१) अश्मयुगीनकालखंडातीलपुराणश्मयुग आणि मध्यश्ययुगातीलमानवी जीवन अस्थिरहोती.
२) अश्मयुगीनकालखंडातील विविध हत्यारे, आयुधे, अस्त्र दगडाचीहोती.
३) पश्चिम खानदेशातील अश्ययुगीन मानवाची हत्यारे व आयुधही प्रामुख्याने धारधार, त्रिकोण, चंद्रकोर, गोलाकार स्वरूपाची होती.
४) हातकुऱ्हाड, छिन्नी, टोकदार शस्त्र, कोयता, सुऱ्या, तासण्या, टोची, बारीक दगडी पात्याची उपकरणे मानव उपयोगात आणीत असे.

**संशोधन पध्दत**

प्रस्तुतसंशोधन पेपरसाठी ऐतिहासिकसंशोधन पध्दती, वर्णनात्मक संशोधन पध्दती, व्यष्टी अध्ययन पध्दतीचा अवलंब करून विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**अश्मयुग**

मानवी इतिहासातील अतीप्राचीनकालखंडहासुमारे पाच लाख ते दहाहजार वर्षापूर्वीपर्यनत साधारणत: मानण्यात येतो. माणसाला लेखनकला अवगत होण्यापुर्वीच्या इतिहासात, प्रागितिहास म्हणतात.या काळापैकी एकासांस्कृतिक अवस्थेस म्हणजे जेव्हा प्रामुख्याने दगडाचाच उपयोगहत्यारांसाठीकेला जात होता.त्या काळास अश्मयुग असेम्हटले जाते.या काळातील मानव त्याच्या भोवती असणाऱ्या लाकडे, हाडे, दगड इत्यादींचाहत्यारे व उपकरणे बनविण्यासाठी उपयोगकरीतहोता.अश्मयुगातील माणुस सर्वत्र एकाच प्रकारची आयुधे वापरीत होता किंवा जीवन व्यतीत करीतहोता असे नाही.त्याच्या जीवनात प्रगती निश्चितच होती.२ही मानवी प्रगती पुढील प्रमाणे अभ्यासता येते.



**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

| | पूर्व पुराणाश्मयुग | मध्यपुराणाश्मयुग | उत्तर पुराणाश्मयुग |
|---|---|---|---|
| १ | हातकुऱ्हाड (बदामी आकाराचे टोकदार हत्यार) | गारगोटी दगडाच्या छिलक्यांपासून लहान आकाराची धारदार हत्यारे | गारगोटीच्या दगडाचे पातळ व धारदार पाती असलेलेयुक्त आयुधे |
| २ | कोयत्यासारखे छिन्न कुऱ्हाडीसारखे धारदार हत्यार | इतर साधने तासण्या, टोचे, बाणाच्या टोकासारखी लहानहत्यार | पानाच्या आकाराची बाणाची टोके, तासण्या, टोचे |
| ३ | चपटी छिलक्यांपासून विविध हत्यारे व साधने | | लाकूड व हाडे यापासून आयुधे |

२ मध्याश्मयुग

↓

सूक्ष्मपाषाण नावाने ओळखली जाणारी

गारगोटीच्या दगडाची त्रिकोण, चंद्रकोर आकाराचीहत्यारे

३ नवाश्मयुग

↓

१) बारीक घडवलेली हत्यारे वापरणे
२) घासून गुळगुळीत व धारदार केलेल्या दगडीकुऱ्हाडी
३) छिन्नी
४) धान्य पिकविण्याची कला अवगत
५) शेतीचा शोध
६) स्थिर स्वरूपाच्या वसाहती
७) नागरी संस्कृतीची उभारणी

अश्मयुगाची विभागणी व मानवी प्रगतीचा आढावा घेतल्यानंतर महाराष्ट्रातील विशेषत: पश्चिम खानदेशातील अश्मयुगीनमानवी हत्यारे व आयुधांचे सविस्तर अध्ययन पुढीलप्रमाणे अधोरेखितहोते.

**पश्चिम खानदेशातील अश्मयुगीन मानवाची हत्यारे व आयुधे**

पुरातत्ववेत्यांनी खानदेशात केलेल्या उत्खननांवरून खानदेशात अश्मयुगातील मानवासंबंधी बरीच माहिती उपलब्ध झाली आहे.खानदेशातीलसुमारे एकते दीड लाख वर्षापूर्वी हवामान दमटहोते.नद्यांच्या उगमस्थानाकडील भागात दगड-गोटे, गाळ यांचा साठा वाढल्यामुळे नद्यांची पात्र भरून निघाली.उदा.कान नदीकाठी भाडणे येथे नदीचे पात्र, दगड-गोटे व गाळ इत्यादींनी भरून आल्याचे पुरातत्वविद्येच्या तंज्ञाना आढळून आले.अशा परिसरात अश्मयुगीन मानवाच्या अस्तित्वाबद्दलची चिन्हे दाखविणारी स्थळे आढळून आलीत.३ आदि अश्मयुगातील मानवाला शिकारीसाठी दगडीहत्यारांचा वापर करावयाची गरज भासली असावी.त्यातुनच दगडापासूनसपाट, चपटी व धारदार लांबट प्रकारचीहत्यारे आयुधेत्यानेतयारकेली असावीत. दगडीहातकुऱ्हाडीसारखीहत्यारे (यात गोट्याच्या दोन्ही बाजुंचे टवके उडवून हत्यारे, आयुधेकरण्यात येत) कान नदीकाठी भाडणे परिसरात आढळून आली आहेत. इ.स.१९६१-६२ या वर्षाच्या उत्खननाच्या आढाव्यात भाडणे परिसरात पूर्वाश्मयुगातील सापडलेल्या आयुधांची नोंद आहे. त्यात दुधीगारगोटीच्या छिलक्यांपासून धारधार अशी पाती आणि छिन्यासारखीहत्यारे, गोलाकार आकाराचीहातकुऱ्हाड, फरशा, लहान आकाराच्या कुऱ्हाडी किंवा सुरी इत्यादीहत्यारांचा समावेश होतो.४ येथील परिसरात मानव जीहत्यारेतयारकरीतहोता. ती बेसाल्ट व डोलेराईट या खडकांपासून निर्माण होत असत.त्यात प्रामुख्याने तासण्या, टोचे, वेधण्या, चाकू, सुऱ्या, दाते असणारी आयुधे, छिन्नी, फरशी (हातकुऱ्हाड) तोंडीचीहत्यारे उल्लेखनीय आहेत. आद्य अश्मयुगीन व मध्य अश्मयुगीनकाळात पश्चिम खानदेशातीलतापी व कान नद्यांच्या खोऱ्यात ॲश्युलियन संस्कृतीतील मानवाचे वास्तव्य होते. हेतेथील उत्खननातील पुराव्यांवरून लक्षात येते.५

पश्चिम खानदेशातील नंदुरबार जिल्ह्यातील कुंभारपाडा व उमरज या दरम्यान रंकानाला या तापी नदीच्या उपवाहिनीच्या ठिकाणी अश्मयुगीनखानदेशातील मानवाची आयुधे उपलब्ध झाली आहेत.६ अशा हत्यारांसाठी आयुधांसाठी लागणारा दगडगारगोटी दगड असतो. धुळे जिल्ह्यात भाडणे येथेकान नदीपरिसरात दुधी रंगाच्या गारगोटीचे छिलके बऱ्याच प्रमाणावर सापडतात.७ रंकानाला या परिसरातसपाट चपट्या दगडापासूनहातकुऱ्हाडी, तासण्या, खाकी रंगाच्या गाठाळकुदळी यासारखीहत्यारंतयार केलीत.८ उमरज, जैताणे, निझामपूर याठिकाणी लघुपाषाणहत्यारांचे नमुनेसापडले त्यात मोठी पाती असलेलीहत्यारे आढळून आलीत.

अश्मयुगीन मानवाने भाडणे, पाटणे, रनाळे इत्यादी ठिकाणच्या वसाहतीसाठी स्थळांची निवड करताना भौगोलिक रचना, बारमाही पाणी पुरवठा, आयुधंतयारकरण्यासाठी लागणाराखडक, शिकारीची ठिकाणे इत्यादी घटकांचा विचार केलाहोता.

नन्द्वान येथे पूर्वपाषाणयुगीन हत्यारे मिळाली आहेत.भाडणे येथील उत्खननात लांब प्राण्यांच्या सांध्यांची जोडहाडे देखील मध्य अश्मयुगीन हत्यारांबरोबर आढळून आलीत.

धुळे जिल्ह्यातील छडवेल, पेराजपूर येथेही मध्यअश्मयुगातीलहातकुऱ्हाडी, फरशी, लहानसुऱ्या, तासण्या, लहान आकाराच्या कुऱ्हाडी, जाड व जड वजनाच्या गोलाकारहस्तकुऱ्हाडी आढळल्यात.९

मालखड, न्याहली, असना, अष्टणा, धंधाणे, धनेरकारली, खोक्राला, मालेगाव, पाडा, निभेळ, रनाळा, सतुर्खा, वडबारा, बंकूट, वरवाड इत्यादी ठिकाणी मध्ययुगीन लघुपाषाणाच्या वस्तू आढळून आल्यात.१० चाळीसगाव जवळील पाटण येथील मंदीराच्या उत्तरेकडील टेकड्याआणि नदीपात्रातुन पुरातत्वशास्त्रज्ञ, रसायन चिकित्सकांनीसूक्ष्म पाषाणापासूनतयारकेलेली आयुधे, उपकरणेगोळाकेली आहेत. हत्यारांमध्ये छिलके आणि छिलक्यांपासून बनविलेली हत्यारे, टणकमणी, काचेमणी इत्यादीचा अंतर्भाव होता.

प्रकाशे येथील उत्खननात ताम्रपाषाणयुगीन व नवाश्मयुगीन काळातीलसहाशेहत्यारं व त्यांची पाती मिळालीत.पुरातत्ववेत्यांनी केलेल्या उत्खननांवरून खानदेशात अश्मयुगातील मानवासंबंधी त्यांचीहत्यारे व आयुधासंबंधी माहिती प्राप्त होऊन अभ्यासकांना एक नवी दिशा मिळाली आहे.

**सारांश**

प्राचीनकाळात धातूचा शोध लागला नव्हता तेव्हा मानव दगडाचा शस्त्र म्हणून उपयोगकरीतहोता.दगडाला टोकदार आकार देऊन त्या दगडालाकाठीच्या टोकास बांधुन कुऱ्हाड किंवा भाल्यासारखा उपयोगकरीत.कालपरत्वे पाषाणाची शस्त्रे कालबाह्य ठरली असलीतरी आधुनिककाळातही दगडांचा वापर शस्त्र म्हणुन मोठ्याकल्पकतेनेकेला जातो. अंबापाणीच्या लढाईत आदिवासी विरांगणांनी गोफणीच्या दगडांच्या माऱ्याने इंग्रज सेनेची धुळदाण उडविली. खानदेशातील आदिमानव वसाहतीच्या अवस्था लक्षात घेता पूर्वअश्मयुगापासुनते मध्यअश्मयुगापर्यतच्या कालखंडात दगडापासूनहत्यारे–आयुधे बनविण्याच्या तंत्रपध्दतीत बरीच प्रगती झाली.प्रगत हत्यांरांच्या वापरामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा, सुखी व सोयीचे जीवन जगण्यासाठी मानव उपयोगकरू लागला आणि मानव समाजाच्या वसाहतीचेही विस्तार घडून आले.

**निष्कर्ष**

१) अश्मयुगात मानवाने लाकडे, हाडे, दगड यांच्या सहाय्याने विविध हत्यारे, उपकरणे आयुधे घडविण्यास सुरूवात केली.

२) कुऱ्हाडी, विळे, बाण, सुरा, भाला, भाला फेकीचीकाठी, बोला, धनुष्यबाण, गोफण अशी विविध प्रकारचीहत्यारे, आयुधे अश्मयुगाततयारहोऊ लागलीत.

३) खानदेशात केलेल्या उत्खननावरून अश्मयुगातील माणसाचे अस्तित्व पाच लाख वर्षापूर्वीचे असल्याचेस्पष्टहोते.

४) प्रागतिहासकाळापैकी एकासांस्कृतिक अवस्थेत जेव्हा प्रामुख्याने दगडांचाच उपयोगहत्यारांसाठीकेला जात होता. त्या काळास अश्मयुग म्हटले जाते.

५) अश्मयुगाचे पुराणाश्मयुग, मध्याश्मयुग व नवाश्मयुग असे वर्गीकरण करता येते.

६) अश्मयुगाच्या प्रत्येक युगातहत्यारे व आयुधांची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. त्यात हातकुऱ्हाड, धारधारहत्यारे, तासण्या, टोचे यासारखी अनेकहत्यारे उल्लेखनीय आहेत.

७) खानदेशात अश्मयुगीन मानवाच्या अस्तित्वाबद्दलची चिन्हे दाखविणारी स्थळे आढळून आली आहेत. उदा. भाडणे, कुंभारपाडा, उमरज, छडवेल, पेराजपूर, मालखड, न्याहली, अष्टाणा, धनेर, कारली इत्यादी

८) कान, तापी या नदी परिसरात अश्मयुगीनखानदेशातील मानवाची आयुधे उपलब्ध झाली आहेत. गोलाकार आकाराचीहातकुऱ्हाड, फरशी, सुरी, तासण्या, गारगोटी, दगडाच्या छिलक्यापासूनहत्यारे, आयुधे, उपकरणे व लघुपाषाणहत्यारांचे नमुने उल्लेखनीय आहेत.

९) अश्मयुगीन मानवाने वसाहतीसाठी स्थळांची निवड करतांना भौगोलिक रचना, बारमाही पाणीपुरवठा, आयुधतयारकरण्यासाठी लागणाराखडक, शिकारीची ठिकाणे या सारख्या घटकांचा विचार केलाहोता.

यावरून तत्कालीन मानव आपल्या अस्तित्वासाठी सजग असल्याचे निदर्शनास येते.

**संदर्भ सूची :**


१) Mate M.S., Misra V.N., Indian Prehistory, Poona, 1964
२) Clark, Gramhame, World Prehistory - An outline, Cambridge, 1961
३) सांकलिया ह.धी. व माटे म.श्री., महाराष्ट्रातील पुरातत्व, पृ.१६
४) डॉ.महाजन टी.टी., प्राचीनखानदेशचा इतिहास, पृ.७१
५) डॉ.पाठक ए.एस., महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, इतिहास, प्राचीनकाळ, खंड-१, पृ.३७
६) Indian Archaeology 1959-60 A Review, p.33
७) सांकलिया ह.धी. व माटे - उपरोक्त, पृ.११
८) Indian Archaeology 1959-60 A Review, p.33
९) सांकलिया ह.धी. व माटे - उपरोक्त,
१०) Indian Archaeology 1959-60 A Review, p.33
११) डॉ.महाजन टी.टी.- उपरोक्त, पृ.८६

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# ईस्ट इंडिया कंपनीकालीन खानदेशातील आदिवासी भिल्ल जमातीचा संघर्ष

**प्रा.डॉ. रमाकांत अंबादास चौधरी**
इतिहास विभाग, आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे.

**प्रस्तावना :–**

ईस्ट इंडिया कंपनी सरकारने खानदेशवर आपले वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर आपल्या फायद्यासाठी खानदेशातील आदिवासी भिल्ल जमातींचे जंगल बळकविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आपल्या संस्कृतीला, परंपरेला बाधा उत्पन्न होईल व आपले स्वातंत्र्य नष्ट होईल या भितीपोटी खानदेशातील आदिवासी भिल्ल जमातींनी कंपनी सरकारविरूध्द ठिकठिकाणी उठाव केलेले दिसतात.

ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता खानदेशवर प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी आपला हक्क सांगण्यास सुरूवात केली. ही गोष्ट खानदेशातील आदिवासी भिल्ल जमातीला मान्य नव्हती. जंगलावरील त्यांचा पूर्ववार चालत आलेला अधिकार संपुष्ठात आल्यामुळे त्यांनी कंपनी सरकारविरूध्द ठिकठिकाणी उठावे केले. ब्रिटिशांचा जंगलावर अंमल प्रस्थापित झाल्यामुळे जमीन महसुलीसाठी महसूल अधिकारी जास्तीचा महसुल गोळा करून आदिवासी भिल्ल जमातीवर जुलूम करू लागले. महसुल भरला नाही तर त्यांचे घर, जमीनी जप्त करीत असत. त्यामुळे आदिवासी भिल्ल जमात चिडली व त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात बंड करण्यास सज्ज झाले. आदिवासींच्या मते कृषी व्यवसाय हा पोट भरण्यासाठी आहे, तो संपत्ती मिळविण्यासाठी नाही. याउलट ब्रिटिशांनी कृषीला व्यावसायिक स्वरूप दिल्याने आदिवासी भिल्ल जमातींची कृषी व्यवस्था उध्वस्त झाली. ही व्यवस्था उध्वस्त करण्यात ब्रिटिशांचा हात आहे असे त्यांना वाटले म्हणुन त्यांनी उठाव केलेले दिसताता. कंपनी सरकारच्या खानदेशवर अंमल प्रस्थापित झाल्यामुळे मिशनरी लोकांना धर्म प्रचार व प्रसार करण्यास रान मोकळे मिळाले. मिशनरी लोकांनी आदिवासी लोकांमध्ये जाऊन ख्रिश्चन धर्माचा प्रचार प्रसार करण्यास सुरूवात केली. मिशनरी आपलीसंस्कृती नष्ट करू पाहत आहे याचा राग आदिवासींना आला म्हणून त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात बंड पुकारले. आदिवासी नेत्यांनी असा दावा केला की आपण देवाचे प्रतिनिधी आहोत, देवाने आपल्याला लढण्याची आज्ञा दिली आहे. देव स्वत: या रणसंग्रामात सहभाग घेणार आहे त्यामुळे आपला विजय निश्‍चित आहे म्हणुन आदिवासींनी ब्रिटिशांच्या विरोधात महान उठाव घडून आणला.

दुसरा बाजीराव पेशवा यांचा विश्वासू त्र्यंबकजी डेंगळे हा इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन खानदेशकडे पळाला. त्याने खानदेशातील जळगाव, नाशिक, नगर तसेच मध्यप्रदेशातील सेंधवा भागातील भिल्लांना संघटित करून ब्रिटिशांच्या विरूध्द उठाव केले. भिल्ल जमातीचे नेतृत्व खाज्या नाईक, भीमा नाईक, भागोजी नाईक, काळू भिल्ल, कान्हू भिल्ल, इत्यादींनी केले. भिल्ल जमातीच्या उठावाचे स्वरूप म्हणजे ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार मारणे, सरकारी खजिना लुटणे अशा प्रकारचे होते. कंपनी सरकारने आधुनिक शस्त्रास्त्रे व लष्करी बळाचा वापर करून भिल्ल जमातीचा उठाव मोडून टाकला.

**उद्दिष्ट्ये :–**

१) खानदेशतील भिल्ल जमाती आणि कंपनी सरकार यांच्यातील संघर्षाच्या कारणांचा शोध घेणे.
२) खानदेशातील भिल्ल जमाती विषयक कंपनी सरकारच्या धोरणांचा शोध घेणे.
३) खानदेशातील भिल्लांच्या नेत्यांची कामगिरीवर प्रकाश टाकणे.

**गृहितके**

१) १८५७ च्या क्रांतीमध्ये खानदेश प्रमुख केंद्र होते.
२) खानदेशातील भिल्ल जमातींनी सन १८५७ च्या क्रांतीत सहभाग नोंदविला होता.
३) खानदेशातील भिल्ल जमातींनी राष्ट्रीयत्वाची भावना जनमाणसात रूजविली होती.

**संशोधन पध्दत :–**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणीसाठी प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम साधनांचा संदर्भ घेतला आहे. मुळ साधने, ऐतिहासिक ग्रंथ, गॅझेटिअर्स, त्रैमासिके, संशोधन पत्रिका, स्मरणिका, अप्रकाशित शोधप्रबंध इत्यादी साधनातून माहिती संकलित करून त्याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे.

**खानदेश नावाची व्युत्पत्ती :–**

दख्खन पठाराच्या अति उत्तरेस असलेला आणि महाराष्ट्र राज्यात समाविष्ट असलेला भू–भाग म्हणजे खानदेश होय. खानदेश या

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

नावाचे मूळ शोधण्याचा आजवर बरेच प्रयत्न झालेले आहेत. खांडनवन कन्हदेश, स्कंददेश, खाणदेश, खानाचा देश अशी विविध प्रकारे या नावाची व्युत्पत्ती सांगण्याचा संशोधकांनी प्रयत्न केला आहे. रामायण, महाभारत, दशकुमारचरित इत्यादी ग्रंथातुन या भू-भागचा ऋषिक असा उल्लेख महिषक आणि विदर्भ यांच्या समवेत आला आहे. यादवांच्या काळात सेणूचंद्र या कुळातील राजाच्या नावावरून सेऊणदेश असे या देशाचे नाव पडले. मध्ययुगात १३ व्या शतकापासून या प्रदेशावर मुसलमानी सत्ता रूढ झाली आणि गुजरातच्या राजाने या प्रदेशावर अंमल गाजविणाऱ्या फारूखी घराण्यांना खान ही संज्ञा दिली आणि तेव्हापासून खानदेश हे नाव या प्रदेशाला दिले गेले ते आजतागायत आहे.

**भिल्ल शब्दाची व्युत्पत्ती :-**

भिल्ल म्हणजे धनुर्धारी. द्रविड भाषेमध्ये बिल म्हणजे धनुष्य होय. बिल या शब्दावरून भिल्ल शब्दाची व्युत्पत्ती झाला असावी असे तज्ञांचे मत आहे. रामायणात भिल्ल शब्दाचा उल्लेख आलेला आढळतो. महाभारतातसुध्दा निषाद, किरातपुत्र एकलव्य यांचा उल्लेख भिल्ल असा आहे. रामायणात शबरी हिचा उल्लेख भिल्ल असा आहे. म्हणजे महाभारत व रामायणपूर्वीच्या कालावधीपासून भिल्ल हे मुळ निवासी आहेत असा निष्कर्ष निघतो. भिल्ल हे साधारत: उत्तरेकडे अरवली टेकड्या, राजपुताना, त्याचप्रमाणे गुजरात, मध्यप्रदेश, खानदेश या भागात मोठ्या संख्येने आढळतात.

**विषय विवेचन :-**

खानदेशावर ईस्ट इंडिया कंपनी सरकारचे वर्चस्व प्रस्थापित होण्याअगोदर खानदेश होळकरांच्या ताब्यात होता. सन १८१७ मध्ये इंग्रजांनी होळकरांचा पराभव करुन होळकरांना खानदेशातील सर्व मुलूख कंपनी सरकारकडे सुपूर्द करावा लागला. मात्र खानदेशातील अनेक किल्लेदारांनी इंग्रजांना प्रचंड विरोध केला. सन १८१८ मध्ये इंग्रजांनी दुसऱ्या बाजीराव पेशवाचा पराभव करुन संपूर्ण मराठा राज्य कंपनी सरकारमध्ये विलीन करुन घेतले. त्यांनी महाराष्ट्रातील पेशव्यांचा प्रदेश चार विभागात विभागून प्रत्येक विभागावर स्वतंत्र एकेक अधिकारी नियुक्त केले. ते चार विभाग म्हणजे अनुक्रमे खानदेश, अहमदनगर, पुणे आणि धारवड. या प्रत्येक विभागावर नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याला पोलिटिकल एजंट म्हणून ओळखण्यात येत असे. एलफिन्स्टनला पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या विश्‍वासातील अधिकाऱ्यांची गरज होती. प्रशासकीय आणि लष्करी ही दोन्ही कामे यशस्वीपणे पार पाडू शकतील यासाठी व या प्रदेशाची माहिती असणारा अधिकारी वर्ग एलफिन्स्टनला हवा होता. त्याकरिता खानदेशसाठी कॅप्टन जॉन ब्रिग्ज याची पोलिटिकल एजंट म्हणून निवड एलफिन्स्टनने केली होती.

**ब्रिटीश आणि भिल्ल जमातींचा संघर्ष :-**

इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांनी खानदेशवर पुर्ण ताबा मिळविला. खानदेशातील सातपुडा पर्वतरांगामधील आदिवासींनी मराठशाहीच्या पतनापासून ब्रिटीशांच्या विरोधात उठाव केलेले दिसतात. ३० नोव्हेंबर १८१८ रोजी अमळनेरच्या लढाईत ब्रिटीशांनी विजय मिळविला पण त्याच वर्षी चाळीसगांव येथे त्र्यंबकजी डेंगळेच्या नेतृत्वाखाली ४००० भिल्ल एकत्र आले व त्यांनी ब्रिटीशांविरूध्द रणशिंग फुंकले व त्यानंतर भिल्लांनी सातत्याने उठाव केले. खानदेश विभागातील कमिश्नर पदाची सुत्रे जॉन ब्रिग्जने हाती घेतल्यानंतर त्याच्या समोर राजकीय व सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले. या समस्यांवर मात करुन स्थानिक भिल्ल जमातींच्या जीवनात स्थैर्य आणण्याचा त्याने प्रयत्न केलेला दिसतो. इंग्रजांचे कायद्याचे राज्य खानदेशातील स्वच्छंदी आदिम जमातींना मानवण्यासारखे नव्हते. या आदिम जमातीत भिल्लांची संख्या फार मोठी होती. यांचे अधिष्ठान रानात, डोंगरकपारीत, सह्याद्री-सातपुड्याच्या अगदी कुशीत यांची वस्ती होती. इंग्रज लोकांनी या प्रदेशाचा ताबा मिळविण्यापूर्वी या प्रदेशावर अनेक राजवटींनी संहारक आक्रमण करुन संपूर्ण प्रदेश उध्वस्त केला. वारंवार येणाऱ्या संहारक संकटामुळे भिल्ल जमात फारच हवालदील झाली असल्यामुळे या नवीन आंग्ल राजवटीबद्दलही त्यांच्या मनात संशय, तिरस्कार व घृणाच उत्पन्न झाली. त्यामुळे ते राजीखुशीने या राजवटीपुढे झुकायला तयार झाले नाही. त्यांनी इंग्रजांना धडा शिकविण्याचे ठरविले. यासाठी सातपुडा,सातमाळा आणि अजिंठाच्या कुशीत वावरणारे सर्व भिल्ल एकत्र आले त्यांचे नेतृत्व बत्तीस भिल्लांनी स्वीकारले. सन १८१८ मध्ये गुंगा नाईक व रामजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली खानदेशात भिल्लांनी इंग्रजांविरुध्द पहिला उठाव केला. कान्हा भिल्ल व पेंढारी नेता शेखदुला यांनीही लुटालुट केली. मेजर बीन व मेजर गार्डन यांच्या नेतृत्वाखालील इंग्रज तुकडीने त्यांचा पराभव केला.

इंगजांच्या नाकेनऊ आणणाऱ्या भिल्लांच्या बाबतीत एल्फिन्स्टनने सहानुभूतिची नीति अंगीकारली. काट्याने काटा काढण्यासाठी काही भिल्लांना वेतन देऊन त्यांच्याच लोकांपासून घाटात वाटसरुंचे संरक्षण करण्याचे काम त्यांच्यावरच सोपविले. घाटात चोरी झाल्यास त्यांनाच जबाबदार धरण्याची प्रथा सुरु केली. तरीही भिल्ल इंग्रजापुढे झुकायला तयार झाले नाही. १८२१ मध्ये अंकूश व डग्गर नाईक यांनी खानदेशात लुटालुट आरंभिली. अडावद परगणा हे त्यांचे प्रमुख कार्यक्षेत्र बनले होते. रसुलीया नाईक यानेही खानदेशात धुमाकूळ घातला पण १८२३ मध्ये कॅप्टन ब्राऊनकडून पराभूत झाला. वारंवार पराभूत होवूनही भिल्लांचा उत्साह मावळत नव्हता. नवीन

ISSN : 2348-7143
Dec. 2018

नेते तयार होत व इंग्रज विरुध्द संपूर्ण खानदेशात बंड सुरुच ठेवले.

गुमानसिंग नाईक हा थाळनेर परिसरातील सातपुडा पर्वतरांगामध्ये लुटमार करत होता. तर सातपुड्यातील सातमाळा रांगामध्ये चिल्या भिल धुमाकूळ घालीत होता म्हणून लेफ्टिनंट ऑड्राम यांची भिल्लांचा उपद्रव थांबविण्यासाठी नेमणुक करण्यात आली. लेफ्टिनंट ऑड्राम भिल्लांच्या बाबतीत अनुभवानेच शहाणा झाला होता. त्यामुळे त्याने त्यांच्याशी औदार्याचे धोरण स्विकारले. परंतु गुमानसिंग नाईक याने लेफ्टिनंट ऑड्रामच्या माफीच्या जाहिरनाम्याला भीक घातली नाही. त्याने १८२४ मध्ये थाळनेर परिसरात लुटालुट केली. गुमानचा बंदोबस्त करण्यासाठी लेफ्टिनंट लिग्टिगस्टन यांची भिल्लांच्या बंदोबस्तासाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्याने भिल्लांची ३५ घरे जाळून टाकली त्यात ४ पुरूष आणि २ स्त्रिया ठार मारले गेले. आणि भिल्लांवर दहशत निर्माण केली होती. १९२७ च्या सितरामाचे बंड वगळता इ.स. १८२८ या भिल्ल प्रदेशात शांतता नांदु लागण्याची चिन्हे दिसू लागली . या वर्षीच्या पहिल्या ६ महिन्यात २० वर्षानंतर त्या भागात शांतता होती असे वर्षाच्या रिपोर्टमध्ये आढळते. तडवी भिल्ल (१८३९) व बिंदिया नाईक (१८४४) या खानदेशातील आदिवासी भिल्लांनी पुन्हा कंपनी सरकारविरूध्द बंड पुकारले परंतु हे बंड मोठ्या शर्थीने ब्रिटीशांनी चिरडून टाकले.

उत्तर भारतातील १८५७ च्या उठावाच्या बातम्या खानदेशातील भिल्लांच्या कानावर पडताच त्यांनीही उठावाची सिध्दता केली. काजीसिंग, भिमा नाईक, मेवासिया नाईक, खाज्या नाईक आदि भिल्ल नेत्यांनी खानदेशात इंग्रजांविरुध्द बंडाचे निशान उभारले. भिल्लांच्या उठावामुळे सारा खानदेश त्रस्त झाला. इंग्रज सैनीक भिल्लांचा पाठलाग करण्यास यशस्वी झाले नाही. भिल्लांचे उठाव वाढतच राहिले. इंग्रजांचा खजिना सेंधवा घाटातून जात असतांना काझीसिंग भिमा व इतर सर्व भिल्लांनी एकत्र येवून सेंधवा घाटातील जांभूळी चौकात लूट केली. त्यानंतर तारा तोडल्या, पोस्ट ऑफिस लुटले व महसूल गोळा करण्यास सुरुवात केली. ही घटना म्हणजे भिल्लांनी घोषित केलेले स्वातंत्र्य युध्द होते.

सात लाखाच्या लुटीनंतर भिल्लांकडे इंग्रजांना विशेष लक्ष द्यावे लागले. दरम्यान सर्व भिल्ल एकत्र आलेलेच होते. त्यांना अक्राणीचा राजपूत सरदार कालूबाबा व दौलतसिंग येवून मिळाले. नगरचा प्रबळ नेता भागेजीही त्यांना येवून मिळाला. ११ एप्रिल १८५८ ला मेजर इव्हास, मेजर बर्च, कॅप्टन सिली, हॉगस्टान इत्यादी इंग्रज अधिकाऱ्यांनी अंबापाणी येथील भिल्लांच्या छावणीवर हल्ला केला. या लढाईत भिल्लांची प्रचंड हाणी झाली. या लढाईत ६५ भिल्लांना वीरगती प्राप्त झाली. भिल्लांचा पराभव झाला असला तरी त्यांचा उत्साह, स्वातंत्र्यभावना तीव्र असल्याने विरोधही कडवा होता. त्यांनी दाखविलेला बाणेदारपणा, देशप्रेम व जिद्द या सर्व गोष्टी पुढील पिढीला उत्साहवर्धक ठरल्यात. इंग्रजांविरुध्द लढा देवून विजय मिळविणे आता शक्य नाही याची स्पष्ट जाणीव झाल्यामुळे भिल्लांना अगतिकता प्राप्त झाली.

**निष्कर्ष :-**

१) १८५७ च्या महान उठावात खानदेशमध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या विरोधात प्रथम उठाव करण्याचे श्रेय आदिवासी भिल्ल जमातीला दिले पाहिजे.

२) ब्रिटीशांनी आदिवासींच्या जल, जंगल, जमीन या त्यांच्या मुख्य उदरनिर्वाह साधनांवर कडक नियम लादल्याने खानदेशातील भिल्लांनी ब्रिटीशांविरोधी वेळोवेळी दंड थोपाटले दिसून येतात.

३) भिल्लांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी कॅप्टन ब्रिग्जचे प्रयत्न काही अंशी कामी आलेले दिसतात.

४) अंबापानीच्या लढाईनंतर भिल्लांनी ब्रिटीशांशी आपला लढा सुरूच ठेवलेला दिसून येतो.

५) खाज्या नाईक यांच्यानंतर भिमा नाईक, बिरसा मुंडा, तंट्या भिल यांनी अविरतपणे लढा दिलेला दिसून येतो.

**संदर्भ सूची**

1) Simcox, A.H.A. (1912) A Memoir of the Khandesh Bhil Corps, Thackere and Company Limited, Bombay.
2) Kayande, Shyam (1998) Popular Resistance To British Rule In North Maharastra (1818-1885), Kasab Prakashan, Jalgaon,
3) Gazetteer of India - Maharashtra state Dhule District (Revi Edi) 1974
४) खोबरेकर, वि.गो. (१९९४) महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (इ.स. १८१८ ते १८८४), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
५) ओक, प्रमोद (१९९९) एलफिन्स्टन, राजहंस प्रकाशन, पुणे,
६) कुलकर्णी, अ.रा. (२००४) कंपनी सरकार, (ईस्ट इंडिया कंपनी), राजहंस प्रकाशन, पुणे.
७) पाटील मधुकर (२००७) कंपनी सरकारकालीन खानदेश, शिवम प्रकाशन, नंदुरबार,
८) पांडे मधुकर (१९९२) धुळे जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती, मुंबई
९) कुलकर्णी, अ.रा. (१९९४) खानदेशाच्या इतिहासाच्या दिशा भाग १, त्रैमासिक भारतीय इतिहास आणि संस्कृती, वर्ष ३०, पुस्तक १२१, एप्रिल-जुन
१०)चौधरी रमाकांत अंबादास (२०१८) खानदेशातील लोकसंस्कृतीचा ऐतिहासिक अभ्यास, अप्रकाशित शोध प्रबंध, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# कोकणी बोली भाषेतील लोककथा साहित्य एक समृध्द वाङमय

**प्रा. अहिरे रवींद्र महारु**
मराठी विभाग, श्री. पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय,
सिरसाळा, ता. परळी वै., जि. बीड.

**प्रस्तावना :–**

खानदेशातील पश्चिमेस असलेला धुळे, नंदुरबार जिल्हयातील आदिवाशी जमात कोकणी या जमातिची स्वतंत्र अशी संवाद साधण्यासाठी कोकणी बोली भाषेचा वापर करतात खरतर समाज कोणताही असो त्या समाजाला त्या समाजातिल रुढी परंपरा सण,उत्सव आणि त्या त्या समाजाची लोक संस्कृती जिवंत ठेवण्याचे महत्वाचे कार्य त्या त्या समाजातिल, बोली भाषा किंवा प्रमाण भाषा करु असते. अशा वेगवेगळया समाजातील बोली भाषेतुन लोकगीतातुन त्या त्या समाजाची समृध्द अशी संस्कृतीचे जतन करताना दिसुन येते.

कोकणी समाजाची बोलीभाषा कोकणी समाजातीलल सर्वच वाङमय ज्यात आपण लोकगीत, कथा, वाक्यप्रचार, म्हणी, उखाने मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. मात्रते मौखीक स्वरुपात आहे. एका पिठीकडुन दसऱ्या पिढीकडे संक्रमित होत जाताना दिसुन येत आहे. अलिकडच्या काळात १९६० नंतर मराणे लोक साहित्यान आदिवासी साहित्याची नविन प्रवाह आला.

कथा म्हणजे काय? तिची लक्षणे यासंदर्भात सविस्तार चर्चा भारतीय पाश्च्यात लोकसाहित्य विशारकांनी केलेली आहे.

१. बोआस यांच्या मते, Folktale is the autogiro graphy of the tribe .
२. हर्टर्लड म्हणतो, the folktale van not be separated from the folksongs with which in its origin and development, it is colossally connecder.१

आदिवासी लोककथा प्रस्तावना पे.नं.८ कथा म्हणजे सांगणे असा धातु सावीन शब्द आढकतो कहाणी सांगीतली तर पुण्य मिळते अशी भावना आहे. पण कुठलिही गोष्ट सांगीतली तरी कुशलाचा लाभ होतो. असाही समज रुढ आहे. डॉ. दुर्गा भगवत २.

आदिवासी लोककथा प्रस्तावना पे.नं. ९ लोकसाहित्याची रुपरेखा या ग्रंथान म्हटले आहे. आदिवासी लोककथा म्हणजे आदिवासी लोकसाहित्यांच्या महानगरातील एक भव्य गगनकुंबी व चित्रवेधक मिनार होय, आदिवासी साहित्याच्या लोककथा ३.

प्रस्तावना पे.न. ९ आदिवासी लोकसाहित्य आदिवासी कोकणी समाजाचे कुलदैवत डोंगरी देवाची कथा पाहु.

**डोंगरी देवाची कथा**

ज्या वेळी डोंगरी देव पृथीवर आला त्यवेळी महादेवाने ते स्वर्गातुन पाहिले. महादेवाने मंत्राने गाय माऊली तयार केली व ती डोंगर देवाकडे पाठवली. डोंगरदेवाने दिलो चमकुन दिले. त्यामुळे गाय माऊली चिडली. तिने डोंगरी देवाची वश्र पायााखाली चुरधकली. डोंगरी देवाला त्याचा खुप राग आला रागाच्या भरात त्याने दगड उचलुन गाय माऊलीच्या पायावर मारला त्यामुळे गाय माऊलीचा पाय मोडला. गाय माऊली दुखी झाली. तिचं गाऱ्हाण सांगण्यासाठी ती महादेवाकडे गेली व रडु लागली. महादेवाला तिची दया आली. त्याने ङोंगरी देवाला बोलाविली व सांगीतले देवा गाय माऊलीचा पाय जसा होता तसा करुन द्या. डोंगरी देव म्हणलाला गाय माऊलीचे किती नुकसान झोले आहे. त्याची नुकसान भरपाई मी देतो. माझी डोंगरात राहण्याची सोय करा मग महादेव ठाकाराला घेऊन निघाला. डोंगराजवळ गेला त्याने डोंगराला एक टेका काढले गडद बांधली डोंगरी देवाला डोंगरात राहण्याची कायमची सोय केली. डोंगरी देव मग कायमचा तेथे राहु लागला. डोंगरी देवाने गाय माऊलीला कणसारिला घांगळी भगतांना सांगीतले तुमच रक्षण आता मीच करीण. माझ्यासाठी फुलं फुलजाई निशाण नारळ सुपारी खारका दाळया घेवुन यो वाघ्य हाके सर, भाग सर व धोंडयाची काळी घोंगडी यांना इथ जमवुन आणा गाय माऊलीचा पाय पुर्ववत होईल गायतरी वाढेल धरतीवर धनधान्ये भरपुर पिक तील वाघ्या वनदेव गाईगुराचे रक्षण करील. समृध्दी होईल तेव्हा पासुन डोंगरी देवाचा उत्सव कोकणी अदिवासी साजरा करु लागले व तो सण आजही मोठया उत्साहात साजरा करतात. आ.लोककथा पे.नं.२१ ४.

**आदिवासी लोककथा :–** वरील कथे वरुन आपणास असे लक्षात आले असेल की आदिवासी कोकणी समाज हा दऱ्याखोऱ्यात राहणारा निसर्गाच्या कुशीत वास्तव्य करीत असणारा लोक समुह आणि त्याचे देव दैवत सुध्दा डोंगर कपारीत राहणारे असे डोंगरीदेव आहे. डोंगरी देवाला घरधनी माऊली जर संकटात असेल तर तो डोंगरदेवाला नवस बोलतो व त्याला डोंगरीदेव मदत करतो किंवा त्या व्यक्तीवर आलेल्या संकटातुन त्याची सुटका होते. असा आदिवासीचा डोंगऱ्यादेवावर विश्वास आहे. श्रध्दा आहे.

श्रध्देने डोंगरी देवाचा सण साजरे करत असतांना महत्वाचा दुवा म्हणुन कार्य करणारा मुदानी माऊली भगत घरधनी माऊली भोपा माऊली टापरा माऊली पावरकर माऊली आणि इतर सदस्य माऊली हा सण उत्सव नोंव्हेबर आणि डिसेंबर महिण्यात कार्तीक शुध्द पोर्णीमेला साजरा करतात. या सणाचे आणखी एक वैशिष्टे सांगता येईल या उत्सच प्रसंगी रात्रीच्या वेळी पावरीच्या तालावर सर्व पुरुष मडंळी नृत्य

करतात व पुरुष मंडळीच गाणी गातात या कार्यक्रमात महिलांना सामाविष्ट करुन घेतले जात नाही.

**घांगळीचा जन्म**

कोथऱ्या कुणबी नावाचा शेतकरी होता. त्यान मेहणतीने डोंगरी शेत केलं हांत परंतु पिक हाती येण्या अगोदरच शेतावार मोठी रोगराई आली. कोथऱ्या चिंतातुर झाला ढवळेगिरीचा महादेव आला. त्यांन सांगीतल कोथच्या चिंता करु नकोस सांगीतल्या प्रमाणे कामाला लाग होय महादेव.

कोथऱ्य सकाळी उठल्या बरोबर आंघोळ करुन जंगलान जा. मानेली जाळीची एक दांडी घेऊन ये तिची पुजा कर त्या कडीला दोन दोधी (दुधी) भोपडे लावु भोपळे मधमाशीच्या मेणाने पक्के बसवं दांडीकर तील खांबे आणि घोडा कर. त्यांना तारा जोड दांडीच्या एका टोकाला मोराच पिस लाव आणि कवडीने बनविलेले ते वाद्य तु वाजव त्याच नाव घांगळी ठेव घांगळी वाजुन डोंगऱ्या देवाची गाणी म्हणजे व पुजा कर म्हणजे माझ्यावर आलेली संकठे दुर होतील आशा रीतीने ढपळे गिरीच्या महादेवाच्या सांगण्यावरुन कोथऱ्या कुणबीच्या हातातुन घोंळीचा जन्म झाला. तेव्हा पासुन डोंगरी देवाच्या पुतेची आणि घांगळीची प्रथा कोकणी आदिवासी रुढ झाली ती आज तागायत चालु आहे.५.

डोंगऱ्या देवाच्या उत्सवात आशा प्रकारे पावरी वाद्य घांगळी वाद्य उपयोग सुरु झाला साधारणपणे ५० ते ६० माणंस आणि दाहा दिवस रात्री डोंगरी देवाची गाणी म्हणंत पावरी वाद्ययाच्या तालावर नृत्य करतात गाणी म्हणतात

**श्रेष्ठ कोण**

एकदा दोन राजे आपआपल्यामध्ये कोण श्रेष्ट आहे हे दाखविण्यासाठी एकमेंकाशी भांडत होते. त्यावेळी रस्त्यावरुन जाणाऱ्या एका धनगराने हया भांडणाची चौकशी केली. भांडणाचे कारण जेव्हा त्याजा समजले तेव्हा तो त्याला म्हणाला तुमच्या पैकी कुणीही श्रेष्ठ नाही. मेघ हाच सर्वात श्रेष्ठ आहे. मेघाने पाऊस पाडला नाही तर कार परिणाम होतील याचा जरा विचार करा. कापसाचं झाड वाढणार नाही. तर तुम्हाला कपडे मिळणार नाही. पाऊस जय पडला नाही तर पिके येणार नाहीत व तुम्ही उपाशी मराल. म्हणुन पाऊस हा श्रेष्ठ आहे व पाऊस देणारा तो श्रेष्ठ आहे. धनगराचा हा उपदेश ऐकल्यनंतर त्या दोन राजांने आपले भांडण थांबवीले.६.

**तात्पर्य :-**

पाऊस पडला तर धरती वरील पिके पिकतील म्हणुन निसर्गापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. म्हणुनच वारली आदिवासी निसर्गातील प्रत्येक घटकास देव मानतो कणसरीमाता, धरती माता, इतेसर,ढगेसर, पावसदेव, गाय यांना श्रेष्ठ स्थान आहे.

वरिल कथेवरुन आपणास असे लक्षात येते की, मानवाने कितीही प्रगती केली तरी मानव निसर्गावर मात करु शकत नाही. निसर्ग श्रेष्ठच आहे म्हणुन की काय आदिवासी समाज हा निसर्गाशी नाती जोडजो निसर्गाला भजतो पुजतो निसर्गांशी एकरुप होतो.

**होलोच्या गळयातील हार**

लंकेचा राजा रावण सितेला पळवुन नेण्यासाठी सिता गुंफेच्या शेजारच्या झाडीत लपुन बसला आहे. हे एका होली पक्षाच्या लक्षात आले. आणि तिने गुंफेच्या बाहेर बसलेल्या सीतेला उठ  सीता भिंतीचोर भिंती चोडर असे ओरडण्यास सुरुवात केली सितेने ते ऐकुण ही त्याच्या इशाऱ्या कडे दुर्लक्ष केले कारण जेथे राम आहे तेथे चोर म्हणुन येणाचे धाडस कोण करणार असा तिला पक्का भरवसा होता म्हणुन तिने फळाची भिक्षा मागणार हा चोर नसुन एक तोगडा साधु आहे. तो काय करणार या कल्पनेवर विसंबुन त्याला भिक्षा देण्यासाठी ती जवळ गेली. तर त्याने तिला उचलुन तो पळु लागला आणि मग सितंवर मोठे संकट आले आता काय कराचे हे तिला सुचेना. पण अशाही प्रसंगी आपणला इशारा देणाऱ्या पक्षाला उपकार स्मरुण सीतेने आपल्या गळयातील हार होली पक्षाला देण्यास फेकला तो हार नेमका होलीच्या गळयात बसला आहे.

वरिल कथा ही रामायणमधील सीतेचे हरण यावर भाष्य करताना दिसते सितेला पळवुन नेण्यासाठी रावण झाडा झुडुपात लपलेला आहे. याची कुणकुण जणु होगला होली पक्षाला लागली आणि तो पक्षी सितेला आपल्या वाणीच्या माध्यमातुन सजग करण्याचा प्रयत्न करतांना दिसतो माय सितंला वाटंत की ज्या ठिकाणी प्रभुराम आहेत. त्या ठिकाणी चोर कुठुन येणार आणि म्हणुन सितेच्या मणात कसलिच भिती वाटली नाही उलट फळ मागणारा जोगडा साधु आहे त्याला भिक्षा वाढतांना माय तो साधु सितेच हरण करतो उचलुन पळु लागतो तेव्हा सितेला लक्षात येते आणि उपकारची परत फेड म्हणुन की काय तिने आपल्या गळयतील हार खाली फेकला तो हार नेमका होली पक्षाच्या गळयात बसला त्यवरुन सितेचा शोध घेतांना त्या पक्षाच्या गळयातील हाराचा उपयोग झाला असा संदर्भ आपणास रामायणात दिसुन येतो.७.

वरवर पाहता आदिवासीच्या हया कथा वाचतांना कथेतील आशय, वास्तु कथेतील पात्र हेजर पाहिले तर देवी देवता निसर्गातील पशु पक्षी नाग देव वाघदेव अशी पात्रे दिसुन येतात मात्र अशाही कथेच्या माध्यमातुन जो संकेत किंवा इशारा दिला आहे. तो मोलाचा आहे. 'महुची गोष्ट' ही मैत्री कशी असावी यावर भाष्य करणारी कथा आहे. मित्रासाठी प्रसंगी जिवही द्यावा लागतो तोच खरा मित्र आसतो. अशीच दुसरी

कथा सांगता येईल वाघ 'मांजरीचे हाडवैर' या हाडवैर असु शकते यावर भाष्य करणारी ही कथा आपणास सांगता येईल

**संदर्भ सूची :**

१. आदिवासी लोककथा संपादक डॉ. गोविंद गारे, महत्वपुर्ण आनिरुध्द कुलकर्णी कॉन्टिनेटक प्रकाशन विजयानगर पुणे ४११०३०
२. बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा सं.प्रा.डॉ. म.सु. पगारे, डॉ. आशुतोष पाटील, प्रशांत पब्लीकेशन प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदीर रोड नुतन मराठा महाविद्यालय जवळ जळगाव
३. आदिवासी कोकणाच्या कथा, सौ. विजया सोनार ,गोदावरी प्रकाशन औरंगाबाद
४. लोकसाहित्य संशोधन आग्रिा समिक्षा डॉ. विधनाय शिंदे, एस. के. अतकरे ,कैलास पब्लीकेशन औरंगपुरा औरंगाबाद

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# आधुनिक खान्देशातील आर्थिक परिस्थिती : एक अभ्यास

**श्री. ललित बी. गुजराथी**
अर्थशास्त्र विभाग, कै.पी.एस. वाडीले कला महाविद्यालय,
थाळनेर, शिरपुर, जि. धुळे.

खान्देश पुर्वी पश्चिम खान्देश म्हणून ओळखला जात होता. या प्रदेशाचे प्राचिन नाव रसिका होते. त्याच्या पुर्वेस बेशर म्हणजे प्राचीन विदर्भ व उत्तरेस नेमाड व दक्षिणेस मुलका म्हणजे औरंगाबाद हे भाग होते.

ह्यापुढे जावुन हा प्रदेश यादव वंशाचा राजा घ्सेउनचंद्रङ यांच्या नावावरून सेउनदेश या नावाने ओळखला जावू लागला. गुजरातचा राजा सुलतान पहिला अहमद याने फारुकी राज्यांना खान ही पदवी दिली होती व त्यावरून साजेसे घ्खान्देशङ असे या प्रदेशाचे नामकरण केले गेले. आर्यांचा विस्तार होतांना अगस्तिऋषी यांनी प्रथमच विंध्य पर्वत पार करून दख्खनच्या पठारावर गोदावरी नदिच्या किनारी स्थायीक झाले व हा प्रदेश सम्राट अशोकच्या अधिपत्याखाली देखील होता. पूष्पमित्र या संग राज वंशाच्या संस्थापकाने मौर्य वंशाचा पाडाव केला. पुढे या प्रदेशावर सातवहन राज्यांनी राज्य केले. सुमारे इ. स. २५० मध्ये पश्चिम महाराष्ट्रात सातवहनांची जागा अभिरांनी घेतली. बंड केलेल्या अभिरांचा उल्लेख गुजरातमधील कलचरा येथील ताम्रपटावर आढळतो व त्याचप्रमाणे अजींठा येथील गुफा क्र. १२ मध्ये देखील आढळतो.

इ.स. १३४५ मध्ये देवगिरीचे राज्य बहामनी वंशाच्या संस्थापक हसन गंगु यांच्याकडे गेली इ.स. १३४५ मध्ये फिरोजशहा तुघलक याने फरूकी वंशाचा संस्थापक मलिक राजा फारुकी याला थाळनेर व करवंद हे परगने सुपूर्द केले. त्याचे कुटुंब खलीफा उमर फारुक चे वंशज असल्याचा दावा करीत असत. मलीक राजा फारुकी यांनी थाळनेर येथुन राज्याचे व्यवस्थापन केले. गुजरातचे सुल्तान पहिला अहमद याने मलिक राजा यांना घ्खान्देशाचा शिपा-इ-सालारङ अशी पदवी बहाल केली. यावरुन या प्रदेशाचे नाव खानाचा देश म्हणजे खान्देश असे पडले.

त्यानंतर यादवांनी खान्देशावर सत्ता स्थापन केली. इ.स. १२९४ मध्ये उल्लाउद्दीन खिलजीने खान्देशावर आक्रमण करून यादवांची सत्ता संपविली. इ.स. १३१८ मध्ये हिंदु देवगिरी साम्राज्याचा अंत झाला. इ. स. १३७० पर्यंत खान्देश खिलजीच्या अधिपत्त्याखाली राहीला. याच वर्षी थाळनेर व करवंद सुबा सुलतान फिरोज तुघलक याने मलिक रझा फारुकिला बहाल केले. त्याच दरम्यान देवपुर व जुने धुळे या ठिकाणी दोन गढ्यांचे काम पूर्ण करण्यात आले. इ. स. १६२९ पर्यंत अकबर बादशहाने खान्देशवर आपले अधिपत्य स्थापित केले.

इ.स. १८०३ च्या दुष्काळात खान्देश प्रांताचे रुपांतर वाळवंटात झाले. त्याच्या पुढे बाळाजी बळवंत यांच्यावर सोनगीर व लळिंग या जिल्ह्यांची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांनी इ.स. १८१८ पर्यंत ब्रिटीश राजवट लागु होईपर्यंत त्यांनी त्यांची जबाबदारी निभावली.

इ.स. १९०६ साली प्रशासकीय सुविधेसाठी खान्देशचे पुर्व खान्देश व पश्चिम खान्देश असे दोन विभाग करण्यात आले. पश्चिम खान्देशमध्ये धुळे सहीत नंदुरबार, नवापुर, पिंपळनेर, शहादा, शिरपूर, शिंदखेडा व तळोदा तालुके समाविष्ट करण्यात आले. १८८७ साली पिंपळनेर तालुक्याचे मुख्यालय साक्री येथे हलवून त्याचे नाव साक्री तालुका ठेवण्यात आले. १९५० साली अक्कलकुवा हा नविन तालुका अस्तित्वात आला. १५ ऑगस्ट १९०० रोजी धुळे, चाळीसगांव रेल्वेसेवा सुरु झाली.

१ जुलै १९९८ रोजी धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदुरबार हा नविन जिल्हा अस्तित्वात आला.

**आधुनिक खान्देश कृषी परिस्थिती :**

खाजगीकरण, उदारिकरण, जागतीकीकरणाच्या आधुनिक युगात खान्देशातील शेतकऱ्यांनी आधुनिकीकरण करुन सेंद्रीय शेतीवर भर देत आपला नावलौकीक उंचावलेला आहे. खान्देशात कापुस, ज्वारी, बाजरी, भुईमुग, मका, सोयाबीन हि प्रमुख पिके घेतली जातात. खान्देशात साक्री तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात भात पिक घेतले जाते. रब्बी हंगामात गहु, हरभरा ही पिके घेतली जातात. याशिवाय ऊस, केळी, मिरची ही नगदी पिके घेतली जातात. खान्देशातील सेंद्रीय शेतीद्वारे उत्पादीत केलेल्या मिरचीचा तिखटपणा साता समुद्रापलीकडे परदेशीयांनाही रुचला आहे. जिल्ह्यातुन उत्पादीत केलेला कापुस आणि मिरची युरोपासह अन्य देशातही निर्यात करण्यात येत आहे.

खान्देशात सेंद्रीय शेतीची मुहूर्तमेढ काही शेतकऱ्यांनी गेल्या १५ ते २० वर्षापासून केली आहे. परंतु सेंद्रीय शेतीचा पाया खान्देशात रोवला गेला तो २००२ मध्ये. सेंद्रीय शेतीचे नियोजन व कार्यान्वरण खान्देशातील सेंद्रीय शेती करणारे शेतकरी व कृषी विभाग यांचे नियोजन हे तिन महिन्याआधी तयार होते. त्यानुसार सेंद्रीय शेतीसाठी लागणारे बियाणे व पिक घेण्यासाठी आवश्यक खते तयार करणे, पिक संरक्षणासाठी लागणारी औषधे तयार करणे यासारखी कामे हाती घेतली जातात.

**गहू महोत्सव :**

सन २००४-०५ मध्ये खान्देशात गहू महोत्सव भरवला जातो. सेंद्रीय शेतीमध्ये पिकवलेला गहू एप्रिल २००५ मध्ये ह्या महोत्सवाद्वारे

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

७८० क्विंटल गहू एका दिवसात विकण्यात आला होता. तसेच एप्रिल २००६ मध्ये ५०० क्विंटल गहू व १५० क्विंटल ज्वारी फक्त दोन दिवसात विकण्यात आली होती. खान्देशातील प्रत्येक तालुक्यात सेंद्रीय माल विक्रीसाठी विक्री केंद्र उभारण्यात आले आहेत.

**आधुनिक खान्देशची औद्योगिक परिस्थिती :**

खान्देशातुन मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ जातो. या मुंबई आग्रा महामार्गा लगत बाभळे शिवारात येणारी नरडाणा औद्योगीक वसाहत या परिसराला कायापालट करणारी ठरेल. त्यामुळे खान्देश व खान्देश परिसरातील उद्योग व्यवसायाला नविन दिशा व चालना मिळेल. उद्योजक व कुशल, अकुशल मजुरांच्या उज्वल भविष्यासाठी ही सोनेरी सुरूवात ठरत आहे. ह्या वसाहतीपासून अवघ्या २०० कि.मी. वर सुरत व नवसारी सारख्या मोठ्या बाजारपेठा उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे या वसाहतीमधुन जाणारी पश्चिम रेल्वेची वाहतुकही अत्यंत सोयीची ठरणार आहे. इंदौर, प्रितमपुर, नाशिक, अंबरनाथ आदी औद्योगिक वसाहतींच्या जवळ ही औद्योगिक वसाहत आहे. या वसाहतीत वस्त्र उद्योगनगरी स्थापन झाली तर संपुर्ण खान्देशाचा कायापालट होईल. खान्देशात दरवर्षी मोठ्या प्रमाणत कापसाचे उत्पादन घेतले जाते, हजारे क्विंटल कापुस याच महामार्गावरून मध्यप्रदेश व गुजरात राज्यात पाठविला जातो. परंतु ह्या वसाहतीतील वस्त्र द्योगामुळे जवळच्या भागातील कापुस ह्याच ठिकाणी विकला जाई व त्याला जास्त भाव मिळेल. त्याचप्रमाणे या भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतील.

खान्देशातील धुळे शहराच्या दक्षिणेस मालेगांव रोडवर लळिंग, अवधान येथे एकूण २९५ हेक्टर क्षेत्रापैकी २९४ हेक्टर जागा ताब्यात घेवुन त्यात औद्योगिक वसाहतीची स्थापना केली गेली आहे. खान्देश हा भाग शेतीप्रधान असल्याने ह्या भागात शेतीपुरक उद्योगांची स्थापना केली गेली आहे. ह्याच भागात भतवाल परिवाराने इलेक्ट्रॉनिक वजनकाटे निर्मितीच्या क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यांनी स्थापन केलेल्या नितीराज इंडस्ट्रीजने आंतरराष्ट्रीय स्तरावर खान्देशाचे नाव उंचावले आहे. त्यांनी निर्माण केलेले वजनकाटे साता समुद्रापार निर्यात केले जात आहेत.

खान्देशातील एक तालुका शिरपूर हा ही उद्योगांची रेलचेल असलेला तालुका म्हणून नावारुपाला आलेला आहे. शिरपुर तालुक्यातील सुतगिरणी, जिनींग प्रेसिंग याबरोबर कापड उद्योगालाही स्थान देऊन कापसावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची एक साखळी द्वेता गारमेंट व डिसान टेक्सटाईल या माध्यमातून उभारली गेली आहे. हे सर्व उद्योग एकाच परिसरात उभे करून टेक्सटाईल पार्कच तयार झाला आहे. येथील उत्पादन शंभर टक्के निर्यात होते. या दोन्ही उद्योगातुन कोट्यावधी रुपयांचे परकीय चलन देशाला मिळत आहे. याच उद्योगांना पुरक असा रंगीत कापड उत्पादनाचा डाईंग उद्योग प्रकल्प उभारला गेला आहे.

याच परिसरात विठ्ठल टेक्सटाईल हा खाजगी उद्योग सुरू झाला असून, या उद्योगातुन सतरंजी, चादरी तयार केल्या जातात. याच परिसरात परम टेक्सटाईल हि नवी उद्योग संस्था जन्माला आली आहे.

मनमाड-धुळे-इंदौर रेल्वेमार्ग खान्देशातील औद्योगिक विकासाची भाग्यरेषा ठरणार आहे. गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबीत प्रश्न व मागणी असणाऱ्या मनमाड-धुळे-इंदौर रेल्वेमार्ग होणे आवश्यक होते. त्यालाही आता शासनाने मंजुरी दिली आहे. हा रेल्वे मार्ग संपूर्ण उत्तर महाराष्ट्राची औद्योगिक विकासाची भाग्यरेषा ठरु शकतो. या रेल्वे मार्गामुळे दिल्ली ते मुंबई, चेन्नई, कलकत्ता या चार महानगरांचे परस्परांमधील रेल्वे वाहतुकीचे अंतर कमी होणार आहे. त्यामुळे माल वाहतुकीचा मोठा फायदा होणार आहे.

सहाजीकच भौगोलिक दृष्ट्या मुंबई वगळता या तिघं महानगरांपासून खान्देशाचे अंतर कमी होणार आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील गुंतवणक वाढण्यास निश्चितच मदत मिळणार आहे.

या सर्व बाबींचा परामर्श घेता असे दिसून येते की, प्राचिन खान्देश व आधुनिक खान्देश यात बरेच बदल घडुन आले आहेत. आधुनिक खान्देश जागतिक स्पर्धेशी तोंड देण्यास उत्सुक असलेला आपणास दिसून येत आहे.

**संदर्भ सूची :**

१) डॉ. टी. टी. महाजन, च्खान्देश राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासछ.
२) डॉ. जी. बी. शहा, च्खान्देशातील राष्ट्रवादाचा उदय आणि विकासछ.
३) डॉ. श्रीनिवासन सातभाई, च्आधुनिक भारताचा इतिहासछ.
४) डॉ. सुधिर बोधनकर, च्श्रम अर्थशास्त्रछ, साईराज प्रकाशन, नागपूर.
५) प्रा. एन. एल. चव्हाण, च्भारतीय अर्थव्यवस्थाछ, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव
६) डॉ. मुकूंद महाजन, च्व्यापारी अर्थशास्त्रछ, निराली प्रकाशन, नागपूर

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खान्देशातील आदिवासींच्या आरोग्य समस्या

**प्रा.डॉ. जी.एच. निकुंभ**
प्रताप महाविद्यालय, अमळनेर.
**प्रा. उपेंद्र धगधगे**
ग.तु. पाटील महाविद्यालय, नंदुरबार.

**प्रस्तावना :**

सातपुडा पर्वत रांगा या मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गुजरात राज्यातून जातात. महाराष्ट्रात त्या अमरावती, औरंगाबाद जळगाव, धुळे आणि नंदुरबार मधून पुढे गुजरात मध्ये गेल्या आहेत. महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे आणि जळगाव या तीन जिल्ह्यातुन त्या गेल्या आहेत. या तीन जिल्ह्यानां खान्देश म्हणून ओळखले जाते. या परिसरात वास्तव्य करणाया विविध आदिवासी जमाती आहेत, त्या अनेक शतकापासून सातपुड्यातील दुर्गम भागात राहिल्यामुळे त्या विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दुर राहिल्या आहेत, त्यामुळे त्या मागासलेल्या आहेत. त्यांचे अनेक प्रश्न आहेत. त्यापैकी आरोग्याचे प्रश्न जटील स्वरुपाचे आहेत. त्यात कुपोषण, हिवताप, क्षयरोग, कुष्टरोग, सिकलसेल, संसर्गजन्य रोगांच्या साथी यामुळे होणारे अकाली मृत्यू, बाल मृत्यू, माता मृत्यू ,दुषित पिण्याचे पाणी अश्या अनेक समस्या आहेत. त्यामुळे येथील आदिवासी समाजाची परिस्थिती दयनीय आहे. हा प्रश्न सुरक्षेच्या चौकटितून बघणे गरजेचे आहे.

**उद्दिष्ट:** खान्देशातील आदिवासीच्या आरोग्य समस्या अभ्यासणे.

**गृहितक :** खान्देशातील आदिवासींना आरोग्य समस्या भेडसावतात.

**खान्देशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

प्राचीन काळापासुन खान्देश हा भौगोलिक प्रदेश अस्तित्वात असून त्याच्या भौगोलिक सीमा ह्या इतिहासात कालानुरूप बदलत गेल्या आहेत. स्वातंत्र्य पुर्वी अनेक संस्थाने या भागात अस्तित्वात होती. धुळे , नंदुरबार,नासिकचा काही भाग आणि जळगाव या तीन जिल्हयांचा मिळुन खान्देश हा प्रदेश मध्ययुगीन काळापासुन ओळखला जात होता. धुळे, जळगाव आणि नंदुरबार तिघांचा मिळुन धुळे हा एकच जिल्हा होता. धुळे या मुख्यालयातुनच इथला कारभार चालत असे. खान्देश हा १९०६ पुर्वी एकच जिल्हा होता. पण १९०६ सालापासून खान्देशाचे पूर्व व पश्चिम असे दोन जिल्हे करण्यात आले आहेत. पूर्व खान्देशाचे क्षेत्रफ़ळ १९१५ साली ४५२५ चौरसमैल व पश्चिम खान्देश क्षेत्रफ़ळ ५५२५ चौरस मैल होते. १९२१ साली पूर्व खान्देश लोकसंख्या १०,७५,८३७ व पश्चिम खान्देश ६४१८४७ होती.१ कालांतराने जळगाव, धुळे आणि नंदुरबार असे तीन जिल्हे अस्तित्वात आलेत. तरी देखिल या प्रदेशातील विशेष अश्या संस्कृती ने या भूप्रदेशास एका धाग्यात बांधून ठेवले आहे. तीन जिल्ह्यांची भौगोलिक स्थिति ही खालील प्रमाणे :

नंदुरबार : ५९५५ चौरस किलोमिटर इतके भौगोलिक क्षेत्रफ़ळ आहे.२०११ च्या जनगणेनुसार १६,४८,२९५ इतकी लोकसंख्या आहे.

धुळे : ७१९५ चौरस किलोमिटर इतके भौगोलिक क्षेत्रफ़ळ आहे. २०११ च्या जनगणेनुसार २,०५०,८६२ इतकी लोकसंख्या आहे.

जळगाव : ११७६५ चौरस किलोमिटर इतके भौगोलिक क्षेत्रफ़ळ आहे.२०११ च्या जनगणेनुसार ४२,२९,९१७ इतकी लोकसंख्या आहे.

**खान्देशातील आदिवासी :**

नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातील भिल्ल जमातीच्या अनेक शाखा आहेत. त्यात काही प्रादेशिक गटही आहेत. नंदुरबार, धुळे जिल्ह्यात भिल्ल (वळवी, वसावे, पाडवी, नाईक इत्यादि), गावित तथा मावची, पावरा, ढाणका, तडवी भिल्ल, बरडे भिल्ल ह्या प्रमुख शाखा असून त्यात काही प्रादेशिक गटही आहेत. २ हि भिल्ल जमातीतील कुळे आहेत. त्यात भिल्ल,वसावे, वळवी, पाडवी, गावित, मावची,तडवी आणि पावरा इत्यादी चा समावेश होतो.

या जिल्ह्यातील आदिवासी जनतेची लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे. २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या नंदुरबार जिल्ह्यात ११४१९३३ इतकी असून एकूण लोकसंख्येच्या ६९.२८ ट्क्के आहे.३ म्हणून तो आदिवासी जिल्हा म्ह्णुन ओळखला जातो. धुळे जिल्ह्यात ६४७३१५ इतकी आहे. त्याची एकुण लोकसंख्येशी ३१.६ टक्केवारी आहे.४जळगाव जिल्ह्यात ६०४३६७ आदिवासी लोकसंख्या आहे, त्याची एकूण लोकसंखेशी १४.३ टक्केवारी आहे.५

तिन्ही जिल्ह्यात आदिवासि लोकसंख्या हि त्या त्या जिल्ह्यातील एकुण लोकसंख्येच्या दहा टक्क्यापेक्षा जास्त आहे. तर नंदुरबार जिल्ह्यात ती पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त आहे. म्हणुन या जिल्ह्यास आदिवासी जिल्हा असे म्हणतात.

**आरोग्याची संकल्पना :-**

आरोग्याची संकल्पना समजुन घेताना ब-याचदा शारिरिक आजार नसण्याची स्थिती म्हणजे आरोग्य अशी समजुत आहे. मात्र शास्त्रीय

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

दृष्टया आरोग्य ही त्यापेक्षा अधिक व्यापक संकल्पना आहे. म्हणुन नेमके आरोग्य म्हणजे काय ? हे आधी समजुन घेणे महत्वाचे आहे.

**आरोग्य :-** मानसिक आणि शारिरीक अवस्था चांगली असण्याची स्थिती म्हणजे आरोग्य होय.

शारिरिक, मानसिक किंवा आत्मिक अवस्था चांगली असण्याची स्थिती म्हणजे आरोग्य होय.

**रोग :-** आरोग्याविषयी ऊहापोह करताना त्यातुन समोर आलेले वैशिष्टय म्हणजे आरोग्य हे अनेक पैलूवर आधारीत आहे. त्याच्या मुख्य तीन घटकांना महत्व आहे ते म्हणजे शरीर, मन आणि समाज होय . यातील असंतुलन रोगास कारणीभूत ठरते म्हणुन रोग म्हणजे काय? समजुन घेणे गरजेचे आहे. मेरिमयम वेबस्टर शब्दकोषानुसार जिवंत प्राणी, वनस्पती किंवा त्यांच्या शरीराचा एखादा अवयवाच्या सामन्यपणे काम करण्याच्या स्थितीस अपाय करणे आणि विशेषत: वेगळे चिन्ह आणि लक्षणे प्रकट करणे अश्या स्थितीस रोग असे म्हणतात.

**खान्देशातील आदिवासींच्या आरोग्य समस्या:**

अनादी काळापासून आदिवासी समाज डोंगर दर्यात रहातो. तो निसर्ग पूजक असल्यामुळे तो जंगलात रहाणे पसंत करतो. खान्देशातील आदिवासी हा देखील जंगलात वास्तव्य करणारा आहे. पर्यायाने या भागात सातपुडा पर्वत रांग हि अतिशय दुर्गम असल्याने तेथील भाग हा जंगलमय आहे. त्यामुळे या तीन जिल्ह्यातील आदिवासी या भागात मोठ्या प्रमाणात वास्तव्य करतात. हा भौगोलिक प्रदेश डोंगराळ भाग असून तो उंच सखल आणि दया खोयांचा आहे. त्यामुळे तिथे वास्तव्य करणे आणि ये जा करणे सोपे नाही. अश्या परिस्थितीत तिथे आदिवासी वास्तव्य करतो, म्हूनू तिथे मुलभूत सोयी सुविधांचा अभाव आहे.

एका संस्कृतीच्या सामाजिक, आर्थिक ,धार्मिक, साहित्य, संगित, कला इत्यादी अंगाप्रमाणेच आरोग्य हे संस्कृतीचे अंग आहे. म्हणुनच आरोग्याविषयीच्या कल्पना व वैद्यकिय संघटना वेगवेगळया समाजात वेगवेगळया असतात. लोकांच्या शरिराविषयक कल्पना म्हणजे शरीराची – मनाची ,जडण घडण कोणत्या तत्वापासुन झाली आहे. रोग म्हणजे काय, कोणकोणत्या प्रकारचे रोग असतात. व ते कशाने बरे होतात. मृत्यू – मोक्ष – पुनर्जन्मविषयक कल्पना , दैवी शक्तींचा रोग होण्यात व बरा होण्यात हात, सामाजिक नीती– नियमांचे उल्लंघन व त्यामुळे उद्‌भवणाऱ्या आरोग्यसमस्या , पाप–पुण्याच्या कल्पना इत्यादी अनेक विचार आरोग्याशी निगडीत आहेत. तसेच पर्यावरण ,वनस्पती , लोकसंख्येचे घनत्व,नात्यागोत्यात होणारे विवाह, विवाहाचे वय, दारिद्रय , शक्तिवर्धक अन्नाबद्दलच्या कल्पना अशा अनेक गोष्टींचा आरोग्याशी संबंध येतो. वेगवेगळया समाजात भगत देवर्षि , दाई (सुईण) ,हाडे जोडणारे असे अनेक प्रकारचे शिक्षित – अशिक्षित वैद्क असतात. यामुळेच आरोग्यविषयक कल्पना व चालीरीती या केवळ तांत्रिक स्वरूपाच्या नसुन संस्कृतीच्या इतर अंगाशी ती बांधलेल्या आहेत हे उमजते.७

यावरुन आदिवासींच्या संस्कृती आरोग्याला प्रभावित करते. आजारी पडल्यास दवाखान्यात जाण्याएवजी ते भगत, भगतीण, वैदु, हाड वैदू आणि मांत्रिक अश्या लोकांकडे जाऊन आपला आजार बरा करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतात. त्यात प्रसंगी आपला जीव गमावतात.यावरुन सातपुड्यातील आदिवासींची संस्कृतीमुळे देखील त्यांचे आरोग्याचे प्रश्न हे गंभीर आहेत.

आदिवासी समाजात आधुनिक शिक्षण घेवून नवविचार रुजलेली पिढी तयार झाली आहे. जी आधुनिक वैद्यकशास्त्रात विश्वास ठेवते आणि आपल्या आप्तजणांना त्या उपचारा साठी प्रवृत्त करते. परंतु सातपुड्यातील भौगोलिक परिस्थिती याला अवरोध निर्माण करतांना दिसते. कारण उंच सखल भाग असल्यामूळे प्राथमिक आरोग्य केंद्र हि दुरवर आहेत. व तेथे जाण्यासाठी पक्या रस्त्यांची सोय नाही. या परिसरात सरकारी आरोग्य सेवेवर अवलंबुन रहावे लागते. तसेच या सुविधा घेण्यासाठी त्यांना मैलोनमैल पायपिट करावी लागते. प्रसंगी तेथे अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध नसतात किंवा या प्रवासादरम्यानच रोग्याचा मृत्यू होतो. यामुळे या भागात बालमृत्यू, मातामृत्यू चे प्रमाण जास्त आहे. तसेच कुपोषण मोठ्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे संसर्गजन्य आजार व त्यांच्या साथी या देखील आढळतात.

**खान्देशातील आदिवासींचा आरोग्य दर्जा :**

| जिल्हा | प्राथमिक आरोग्य केंद्र | जन्म | | मृत्यू | | बालमृत्यू | | अर्भकमृत्यू | | मातामृत्यू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | |
| नंदुरबार | ५८ | १५३५४ | ५५७७ | ६०४४ | ४४११ | ३१७ | ४१ | ४०७ | ११८ | ४१ |
| धुळे | ४१ | २२०४३ | १६०६७ | ८९८४ | ४९०४ | ४२० | ३९८ | ३६७ | ६४४ | ६१ |
| जळगाव | ७७ | २०५६२ | ६२८९५ | १७७०२ | २९३०४ | ५०२ | १०५ | २२७ | १०५ | ०१ |
| एकूण | १७६ | १४९,२९१ | | ७३.२९३ | | २.४७१ | | २.०५८ | | ८२ |

*स्त्रोत : १) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५, जिल्हा नंदुरबार, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, नंदुरबार, अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन. २) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५, जिल्हा जळगाव, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, जळगाव, अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन. ३) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५, जिल्हा धुळे, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, धुळे, अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन.*

रोगराई, रोगांच्या साथी व आरोग्य सेवेच्या अभावी अकाली मृत्यू पावणारी माणसे, बालमृत्यू, मातामृत्यू, एड्स, क्षयरोग, कुष्टरोग, मलेरिया इत्यादि वेगाने पसरणारे आजार यामुळे निकानी होणारी माणसे तसेच मृत्यूमुखी पडणारी माणसे यासंदर्भात आपण आरोग्य दर्जा खालावला आहे असे म्हणतो. यासाठी काही सूचकांनुसार आपण आरोग्य दर्जा अभ्यासू शकतो.

वरील तक्त्यामध्ये खान्देशातील तीन जिल्ह्यातील आरोग्य दर्जा दर्शवणाया काही ठळक आरोग्य सूचकांद्वारे अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात ही दुर्गम भाग हा शासकीय संज्ञे नुसार ग्रामीण या प्रवर्गात मोडतो म्हणून ग्रामीण आणि नागरी अशी विभागणी केली आहे.त्यानुसार नंदुरबार, मधील जन्म १५३५४ ग्रामीण, ५५७७ नागरी आणि एकुण २०९३१, धुळे मधील जन्म २२०४३ ग्रामीण, १६०३७ आणि एकुण ३८०८०, जळगाव मधील २७३६९ ग्रामीण, ६२८१३ नागरी आणि एकुण ९०१८२ अशी आहे. यावरुन असे दिसते कि, नागरी भागा पेक्षा ग्रामीण भागात जन्मा चे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागात कुटूंब नियोजना विषयी जनजागृती चा अभाव आणि कुटूंब नियोजनाच्या साधनांची अनुपलब्धता आहे असे म्हणता येईल.

मृत्यू ची आकडेवारी नंदुरबार मध्ये ६७४४ ग्रामीण, २२९९ नागरी, एकुण ९०४३, धुळे मध्ये ८१७२ ग्रामीण, ४१७२ नागरी आणि एकुण १२३४४, जळगाव मध्ये १४७०२ ग्रामीण, ११२०४ नागरी आणि एकुण २५९०६ अशी आहे. नागरी भागापेक्षा ग्रामीण भागात मृत्यूचे प्रमाण हे जास्त आहे. कारण ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात आरोग्य सेवेची उपलब्धता हि जास्त आहे. त्यात ही नंदुरबार सारख्या आदिवासी बहूल भागात जन्माच्या प्रमाणात मृत्यूची सरासरी हि इतर दोन जिल्ह्यांपेक्षा जास्त आहे.

बालमृत्यू म्हणजे ० ते ५ वर्षाच्या आतील बालकाचा होणारा मृत्यू म्हणजे बालमृत्यू दर होय. बालमृत्यू ची आकडेवारी नंदुरबार मध्ये ७९७ ग्रामीण, ४२ नागरी, एकुण ८३९, धुळे मध्ये ८४० ग्रामीण, ३९४ नागरी आणि एकुण १२३४, जळगाव मध्ये ३०१ ग्रामीण, १०५ नागरी आणि एकुण ४०६ अशी आहे. ग्रामीण भागात बालमृत्यू चे प्रमाण नागरी क्षेत्राच्या तुलनेत जास्त आहे. अर्भक मृत्यू म्हणजे एक वर्षा दरम्यान मृत्यूमुखी पडणाया अर्भकांची संख्या म्हणजे अर्भक मृत्यू होय. अर्भकमृत्यू ची आकडेवारी नंदुरबार मध्ये ४७७ ग्रामीण, २९८ नागरी, एकुण ७७५, धुळे मध्ये ३१७ ग्रामीण, ३४४ नागरी आणि एकुण ६६१, जळगाव मध्ये २२७ ग्रामीण, १०५ नागरी आणि एकुण ३३२ अशी आहे. इतर जिल्ह्यांपेक्षा नंदुरबार म्ध्ये ती सर्वात जास्त ७७५ इतकी आहे. माता मृत्यू देखिल नंदुरबार ४९ असून तो इतर जिल्ह्यांच्या तुलनेत जास्त आहे.

यावरून ग्रामीण भागासहित दुर्गम भागात वास्तव्य करणारा आदिवासी समाजाची वरील आरोग्य सूचकांवरून खालावलेली आरोग्य स्थीती लक्षात येईल. डॉक्टरांची अनुपलब्धता, आरोग्य सेवांचे विरळ जाळे, दळणवळणासाठी रस्ते आणि वाहनांची अपूरी उपलब्धता यामुळे तेथील आरोग्य सेवा आणि आरोग्य स्थिती प्रभावीत होते. त्यामूळे विहित वयोमर्यादे आधीच येथील माणसांचा मृत्यू होतो. यामुळे कमावत्या व्यक्तिच्या निधनामुळे त्यावर विसंबून असणारा त्याचा परिवार हा आर्थिक दृष्ट्या अधिकच खचतो. तसेच आजारी आणि कुपोषित माता आणि बालकांमुळे तेथिल भावी पिढी हि अकार्यक्षम आणि अनुत्पादक होते, पर्यायाने तेथिल विकास खुंटतो. त्यामुळे त्यांच्या मनात मागासलेपणाची जाणीव निर्माण होते व तिचे रुपांतर हे सरकार विषयी असंतोषा मध्ये होऊन पुढे त्याला हिसंक वळण लागून राष्ट्रांतर्गत परिस्थिती स्फ़ोटक बनते. त्यामुळे राष्ट्राची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येते. यामुळे अश्या बिनलष्करी प्रश्नांकडे मानवतावादि दृष्टीकोनातून बघणे गरजेचे आहे.

**उपाययोजना :**

१) वैद्यकिय शिक्षण घेणाया विद्यार्थांना दुर्गम भागात सेवा देण्याची सक्ती करणे.
२) दुर्गम भागातील आरोग्य केंद्र आणि अंगणवाडी केंद्राना पक्क्या इमारती बांधणे.
३) बार माहि पक्के रस्ते बांधुन तेथील दळणवळण जाळे अधिक विस्तारीत करणे.
४) आदिवासी बहूल भागात सेवा देणाया अधिकारी आणि कर्मचारी यांना स्थानिक भाषेचे ज्ञान अवगत करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करणे.
५) पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करणे.
६) आदिवासी समाजामध्ये असणारी व्यसनाधीनता कमी करण्यासाठी जागरुकता निर्माण करणे.

**निष्कर्ष :**

खान्देशातील तीन जिल्ह्यातील आरोग्य सुचकांच्या आकडेवारी वरुन लक्षात येते की, ग्रामीण भागातील विविध मृत्यूंची आकडेवारी वरून लक्षात येईल की, तेथे आरोग्याचा खालावलेला आरोग्याचा दर्जा लक्षात येतो. भारताला स्वातंत्र्य मिळुन आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती हौऊन अनेक दशके लोटून देखील सातपुड्यातील आदिवासी आज देखील मुलभूत सुविधांपासून वंचित आहे. आपात्कालीन परिस्थितीत रस्ता, वाहन आणि पैश्या अभावी रुग्णास बांबुची झोळी करुन दवाखाण्यात नेले जाते. अतिसार, न्युमोनिया, हिवताप, क्षयरोग यासारख्या उपचाराने बया होऊ शकणाया आजरांमुळे त्यांना जीव गमवावा लागतो. हेच दाहक वास्तव आहे. यातुन मार्ग काढण्यासाठी सरकार अनेक

योजना राबवित आहे. त्याचे सकारात्मक परिणाम बघावयास मिळतात मात्र आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर ठरविण्यात आलेले आरोग्य सूचकांची ध्येये गाठण्यात मात्र अपयश येते. यामुळे खान्देशातील आदिवासींचा आरोग्याच्या समस्यांवर गांभिर्याने विचार करावयास हवा.

**संदर्भ सूची :**

१) http://ketkardnyankosh.com/index.php/2012-09-06-10-42-09/6738-2013-02-05-05-13-23
२) गारे गोविंद डॉ, सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कान्टिनेन्ट्ल प्रकाशन, पुणे,पान १३
३) https://www.censusindia.co.in/district/nandurbar-district-maharashtra-497
४) https://www.censusindia.co.in/district/dhule-district-maharashtra-498
५) https://www.censusindia.co.in/district/jalgaon-district-maharashtra-499
६) http://www.merriam-webster.com/dictionery/health
७) हाकारा ,महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ,एप्रिल – जुन १९८१, पुणे , पान.०२
८) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५, जिल्हा नंदुरबार, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, नंदुरबार, अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन.
९) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५, जिल्हा जळगाव, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, जळगाव, अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन.
१०) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५, जिल्हा धुळे, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, धुळे, अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खानदेशातील सण आणि उत्सव - पोळा

**प्रा. अनिल प्रभाकर निकम**
कै.म.दि. सिसोदे कला, वाणिज्य महाविद्यालय,
नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

सण आणि उत्सव ही भारतीय संस्कृतीच्या अविभाज्यतेचे दर्शन घडविणारी घटीते आहेत. ऋतु परिवर्तनाशी आणि कृषिसंस्कृतीनिष्ठ हंगामाशी हे सण बांधले जोडले गेले असल्यामुळे सण आणि उत्सव साजरे होतात. भारत हा कृषिप्रधान देश आहे. कृषी हा भारतीय जीवनाचा मूलधर्म आहे शेती आणि धर्माला अधिष्ठीत तत्त्वज्ञान या दोन खांबांवर भारतीय संस्कृती कला उभी आहे. हे स्तंभ भरभक्कम आहेत. खानदेशात पोळा हा सण अतिशय उत्सवात साजरा केला जातो.

श्रावण अमावस्येला पोळा हा सण साजरा करतात. पोळा हा बैलांचा सण आहे आपला भारत कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतकरी समाजजीवनात या सणाचे महत्त्व आणि माहात्म्य मानव आणि प्राणी यांच्या एकरूपतेचे प्रतीक आहे. पोळा म्हणजे बैलांच्या रूपात श्रमदेवतेची पूजा करण्याचा दिवस होय. या दिवशी शेतीच्या कामासाठी उपयुक्त नांगर, खोटं, माटे, विळी, कोयता इ. साधनांची प्रामुख्याने बैलांची पूजा करण्याचा महिमा आहे.

पोळ्याची प्रभात प्रसन्नता घेऊन उजाळते झाडझुड व सडासंमार्जन केलेल्या अंगणात दरवाज्याच्या दोन्ही बाजूला पळसाच्या डहाळ्या ठेवून त्यांच्या मुळाशी मुरूम घालून व त्या सभोवताल रांगोळी घातली जाते दाराला आंब्याचे तोरण बांधून घर सजविले जाते. सकाळीच बैलांना नदी ओढा किंवा गाव तलावावर नेऊन धुतले जाते किंवा विहिरीच्या पाण्याने आंघोळ घातली जाते. त्यानंतर त्यांना लाल हिरव्या रंगाच्या ठिपक्यांनी रंगवून सजवायला सुरूवात होते त्यांच्या अंगात हिंगुल व रंगविलेल्या लाल शिंगांना बेगड लावतात. गळ्यात संदा मण्याच्या माळ आणि घंटा बांधतात. काही ठिकाणी पायाला देखील घुंगरू, कपाळावर जहात्या आणि शिंगांना बाशिंगे बांधतात. यांना गोंडे असेही म्हणतात. पाठीवर झुली घालून शेतकरी आपापल्या परीने बैलांना सजवितात. त्यांची वाजत गाजत मिरवणूक शोभायात्रा काढतात. असा हा उत्सवाचा अनोखा असतो.

प्रत्येक गावाच्या वेशीवर मारूतीरायाचे मंदिर स्थान असते. मारूती हे बुध्दी व चपळतेचे दैवत असल्यामुळे हे गुण माझ्या श्रमकरी बैलामध्ये सतत बसू देत. त्यांना कुणाचीही दृष्टबाधा लागू नये. ही मनोभावना असल्यामुळे बैलांना मारूतीच्या देवळात नेण्याची प्रथा आहे. त्याठिकाणी नेल्यावर ग्रामपंचायतीने व्यवस्था केलेल्या देवळात बसलेल्या मान्यवरांना व तोरणातील बैलांना अक्षता लावून नमस्कार केला जातो. बैलांना अक्षता लावून नमस्कार केल्याशिवाय कोणाचाही पोळा पूर्ण होत नाही. यावेळी जोडीचा मालक, जातपात धर्मपंथ इत्यादी बंधने कधी आड येत नाही. हा सोहळा दोन तीन तास चालतो एक मोठी ज्योत पेटविली जाते तिला मशाल म्हणतात. देवळात पेटविलेले मशाल पोळ्यातून फिरविल्यानंतर आल्या मार्गाने जोड्या आपापल्या घरी निघून जातात. याला पोळा फुटणे असे म्हणतात.

जोडी घरी आल्यावर घरमालकीण त्यांचे पाय धुवून आरतीने ओवाळते अक्षता लावून नमस्कार करणे त्यानंतर बैलांना पुरण पोळीचा पाहुणचार पानाच्या पात्रात खाऊ घातला जातो. जोडीधारकास दक्षिणा दिली जाते. ज्यांच्या घरी जोडी नाही असे लोक आतुरतेने घरी जोडी येण्याची वाट पहात असतात.

आता यंत्रयुग आले असले तरी बैलाच्या श्रमाला पर्याय नाही. ट्रॅक्टर सारखी महाग अवाढव्य यंत्रसामुग्री सधन शेतकरीव घेऊन वापरू शकतो गरीब कष्टकरी शेतकऱ्याला ते शक्य नसते म्हणून शेतकऱ्याचा बैल आणि गरीबीची बायको आजारी पडू नये. अशी एक म्हण आहे ते त्याच्या जीवनाचा मुलाधार आहे. बैलाचे ऋण हे आपण कधीच फेडू शकत नाही. काही प्रमाणात का असेना शेतीच्या कामाने थकलेल्या बैलास एक दिवस सुटी देऊन त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आत्मियतेने व प्रेमभावाने पोळा हा बैलाचा सण साजरा केला जातो.

नंदी म्हणजे भक्ती प्रेम सेवा त्याग व पराभूत यांची नांदी होय. बैल याचे प्रतीक आहे. पोळा या शब्दाचा मुळ शब्द पोळ आहे. पोळ म्हणजे देवाला वाहिलेला खोड असा अर्थ शब्द कोशात आहे देवाचे वाहन व परिश्रमाची देवता या भावनेने बैलाकडे पाहिले जात असल्यामुळे श्रावण अमावस्येला उत्सवातील बैलांच्या समुहाला पोळा म्हणजे गेले असावे.

या सणाला बेंडूर किंवा बेंडर असेही म्हणतात. कृतज्ञ माणूस बैलाचा सण साजरा करण्यात कोठेच कुचराई करीत नाही. जीवनभर साथ देणाऱ्या बैलांना एक दिवसासाठी का होईना कृतज्ञ भावनेने पुजन असतात. नंदीने शिवाची पोळ्याने श्रावणाची तद्दल बैलाने मानवी जीवनाची एक प्रकारे पुर्णता होते.

आज कृषी संपली नसली तरी कृषियुग संपत आहे. नांगरणी, वखरणी ट्रॅक्टर यांच्याद्वारे केली जाते. त्यामुळे बैलाची उपयुक्तता कमी होऊ लागली आहे. गावातील बैलांची संख्या कमी होऊ लागली आहे. शिकलेली पोर शेतीकडे दुर्लक्ष करून नोकरीच्या पाठीमागे धावत

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

आहे. बैलपाठी मागच्या पवित्र भावना लोप पावत असून आर्थिक दृष्टीचा पशु म्हणून पहात आहेत. जन्मभर त्याच्या कडून कष्ट करून वृध्दापकाळात त्याच्या कसाई कत्तलखान्यात पाठविले जाते. भौमर्षी आचार्य विनोभाने गाय बैलांची उपयुक्तता शेतीच्या सप्रमाणात मांडून त्यास मरेपर्यंत पाळणे मानवाच्या दृष्टीने कसे हिताचे आहे हे पटवून दिले बैलाच्या म्हातारपणी विकणे म्हाताऱ्या आई बापाच्या वाऱ्यावर सोडून देण्यासारखे आहे राष्ट्रीय  दृष्ट्याही बैल हा अत्यंत उपयुक्त प्राणी आहे.

तरी तरूणपणी बैलांकडून शेतीची कामे करून घेतल्यानंतर त्याच्या म्हातारपणी त्याला मरेपर्यंत घरीच पाळावे त्याचे शेणमूत्र व संबंधित माती शेतीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहेत. तरी माणसाने त्याला विनाकारण मारझोड न करता म्हातारपणी कत्तलखान्यात पाठविण्याचे पाप करू नये. कृतज्ञता सुद्धा शे्वटपर्यंत शाबूत ठेवावी. मानव व प्राणी यांच्या एकरूपतेचे पोळा हे प्रतीक आहे.

पोळा या सणाचे सामाजिकरण झाले असल्यामुळे समाजाने बैलाच्या रक्षणासाठी पुढे येऊन त्याच्या विरोधात आवाज उठविणे हे त्याचे कर्तव्य आहे. कष्टदात्याशी कृतघ्न होऊ नका कृतज्ञ रहा हाच पोळा या सणाचा संदेश आहे.

**संदर्भ सूची :**

१. महिमा सणांचा – गणेश स.केळकर
२. तुमचे आमचे सण – साम्य. सांस्कृतिक कार्यक्रम – द.सा.कोरकर
३. सणाच्या गोष्टी – माधुरी भिडे.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील भटकी पांचाळ जमातीची आर्थिक स्थिती : एक अभ्यास

**प्रा.डॉ. बी.ए. साबळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री. पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय,
सिरसाळा, ता. परळी वै., जि. बीड.

**१. प्रस्तावना :–**

खानदेश हा महाराष्ट्राचा उत्तर सीमावर्ती प्रदेश आहे. तापी –पूर्णा खोऱ्यात खानदेश हा प्रादेशीक विभाग समाविष्ट आहे. खानदेशावर विविध संस्कृतीचा संमिश्र प्रभाव पडलेला दिसुन येतो. खानदेशात अहिर, कोळी, ठाकुर, तेली, धनगर, धीवर, न्हावी, बारी, भावसार, भिल्ल, कुणबी, वाणी इत्यादी जाती जमाती प्रामुख्याने आढळुन येत असल्या तरी अल्प प्रमाणात इतर ही अनेक जाती आढळुन येतात त्यात खानदेशात भटकी पांचाळ ही जमात आठवुन येते परंतु की जमात दुर्लक्षित आहे. या जमातीचे खानदेशामध्ये स्वतंत्र अस्तित्व आहे.

खानदेशातीन भटकी पंचाळ जमात उपेक्षित, पिडीत जमात असुन त्या लोंकाच्या अनेक आर्थिक समस्या असल्याचे दिसुन येते. म्हणुन प्रस्तुत संशोधना साठी खानदेशातील भटक्या पंचाळ जमातीच्या अर्थिक स्थितीचा अभ्यास हा विषय घेण्यात आला आहे.

**२. संशोधनाची उद्दिष्टे :–**

१. खानदेशातील पंचाळ जमातीच्या लोंकाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. भटक्या पंचाळ जमातीच्या लोंकाच्या आर्थिक संमस्यावर उपाय योजना सूचविणे.

**३. संशोधनाचे गृहितके:–**

प्रस्तुत संशोधन लेखाचे गृहितकृत्ये पुढील प्रमाणे आहेत

१. खानदेशातील भटकी पंचाळ जमातीचा आर्थिक विकास होऊ शकला नाही.
२. भटकी पंचाळ जमात ही विविध संधी व सुविधा पासुन वंचित असल्याचे दिसुन येते.

**४. संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत संशोधन लेखात खानदेशातील भटकी पंचाळ जमातीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. हा संशोधन लेख पुर्ण करण्यासाठी द्वितीयक सामुग्रीचा म्हणजे विविध संदर्भग्रंथे, प्रकाशित साहित्य नियतकालिके अहवाल यांचा आधार घेण्यात आला आहे. विविध तथ्यांच्या आधारे विश्लेषण करुन त्या आधारे निष्कर्ष काढण्यात आली आहेत.

**५. संशोधनाचे महत्व :–**

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये खानदेशातील भटकी पंचाळ या जमातीचा आर्थिक अभ्यास केल्यामुळे त्या लोंकाची आर्थिक परिस्थिती काणत्या प्रकारची आहे. हे समजते त्यांचे आर्थिक मागसलेपणाची कारणे, त्याचे परिणाम याची माहिती होती व त्यावर उपाय योजना सुचविण्यात आल्यानंतर धोरण कत्यांना अंदाजपत्रकात उपाय योजना करण्यासाठी निश्चित दिशा प्राप्त होऊ शकते.

**खानदेशातील पंचाळ जमातीची अर्थिक स्थिती :–** खानदेशातील भटकी पंचाळ जमातीतील लोकांचा मुख्य व्यवसाय लोहारी काम हा आहे. शेती व्यवसायासी निगडीत लोखंडी अवजारे, घरगुती वस्तु, ग्रामीण भागात इतर व्यवसायात लागणारी विविध लोखंडी आवजारे तयार करणे व त्यांची दुरुस्ती करणे ही कामे ती करत असतात. या जमातीची लोकसंख्या अत्यंत विरळ प्रमाणात असुन मोठया प्रमाणात या जमातीचे लोक महाराष्ट्रभर भटंकती करतात. त्यांचे घरे ही सामान्यपणे पत्राचे व कच्च्या स्वरुपाचे आहेत. त्यांची भाषा ही बोलीभाषा स्वरुपाची आहे. त्यांचा पोशाख महाराष्ट्रीन स्वरुपाचा आहे. त्यांच्यात सामाजिक चालिरीती परंपरा यांचा मोठा प्रभाव दिसुन येतो. तसेच अज्ञान – अंधश्रध्दा, यांचा प्रभाव त्यांच्यावर झालेला दिसुन येतो. या जमातीकडे शासन – प्रसारमाध्यम सामाजीक संस्था यांनी लक्षात घेतलेले नाही त्यामुळे त्यांची अर्थिक स्थिती अतिशय मागासलेली असल्याचे दिसुन येते. या जमातीविषयीचे आर्थिक स्थिती संबंधी काढण्यात आलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे सांगता येतील.

**निष्कर्ष :–**

१. खानदेशातील भटकी पंचाळ जमातीतील ६६% लोंकाचे प्राथमिक शिक्षण सुध्दा पुर्ण झालेली नाही. ७% व्यक्ती माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आहेत. ०.५% पेक्षा कमी व्यक्तीचे पदवी शिक्षण झालेले आहे.
२. खानदेशातील भटकी पंचाळ जमाती मध्ये साक्षरतेचे प्रमाण ४३% असुन साक्षरता व शैक्षणिक स्थरातवर या जमातीचे मागासलेपण अधोरेखित होते.
३. भटकी पंचाळ या जमातील ७५% लोकानी आपले पिढीजात पारंपारीक व्यवसाय स्विकारले आहेत. तर १४% लोकांनी

पिढीजात व्यवसायाला आधुनिक स्वरुप देऊन त्यात नविन तंत्रज्ञानाचा वापर सुरु केला आहे. ८% लोंकानी पारंपारीक व्यवसाय सोडुन पर्यायी इतर व्यवसाय स्विकारलेली आहेत. ३% लोक हे सरकारी किंवा खाजगी क्षेत्रात नौकरी करतात.

४. भटकी पंचाळ या जमातीच्या पारंपारीक व्यावसाय पुरुषांच्या बरोबरीने ८८% महिलांचा पुर्ण कालिन सहभाग असल्याचे दिसुन येते तर १०% महिलांचा अर्धवेळ अशंत: सहभाग असल्याचे दिसुन येते.

५. प्रामुख्याने कुटुंबाची आर्थिक स्थिती रोजगारावर अवलंबुन असते पंचाळ या जमातीतील १०% लाकांना बारमाही रोजगार मिळतो तर ९०% लोकांना हंगामी स्वरुपाचा रोजगार प्राप्त होतो.

६. जीवन जगण्यासाठी उत्पन्न हा महत्वाचा घटक असतो व उत्पन्नावरुन राहणीमान निर्धारित होते. उत्पन्नावरुन प्राथमिक स्तरावर आर्थिक स्थिती लक्षात येते. खानदेशातील भटकी पंचाळ जमातीतल ५०% लोकांचे वर्षिक उत्पन्न ४०,०००/- रुपयापेक्षा कमी आहे. तर फक्त १% लोकाचे उत्पन्न एक लाखापेक्षा अधिक असुन ४९% लोकांचे उत्पन्न ५०,००० ते १ लाख या दरम्यान आहे. असे दिसुन येते.

७. या जमातीत ३९% कुंटुबे हे दारिद्य रेषेखालील जीवन जगत आहेत असे दिसुन येते.

८. या जमातीतील कुंटुबाला मिळणारे उत्पन्न हे प्राधान्या क्रमाने खर्च करण्यात येणाऱ्या बाबी म्हणजे अन्न धान्य आणि व्यसन यावर सर्वधिक खर्च होतो. त्यानंतर वस्त्र, निवास, शिक्षण, आरोग्य व मनोरंजन होय. म्हणजेच व्यवसाधिनता या समाजात सर्वाधिक आहे. त्यावर आळा घाल्याण्यासाठी स्वंयेसेवी संस्थानी पुढे येऊन काम करणे गरजेचे आहे.

९. आवश्यक गरजाशिवाय इतर गरजावर देखील माठया प्रमाणात खर्च केला जातो उदा. धर्मिक विधी, लग्नासमारंभ यात देवाण घेवाण पाहुणचार आणि प्रवास या बाबीवर देखील उत्पन्न खर्च केले जाते.

१०. या जमातीतील व्यक्ती उत्पन्नातील सर्वच भाग दैनदिंन गरजावर खर्च करतात बचत करणारांचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे ४०% कुंटुंबे आहेत ते सुध्दा अल्प प्रमाणात बचत करतात. त्यांची बचत ही दागदागीने रोख पैसा किंवा व्यावसायासाठी लागणारा कच्चा माल यावर खर्च करतात.बँकेत खाते उघडुन त्या ठिकाणी पैसे ठेवणारे फक्त ७% कुटुंबे आहेत.

११. मिळणाऱ्य उप्तान्नातुन काही पैसे बचत केले तर त्याची गुंतवणुक विविध बाबीवर केली जाते. विशेष करुन पशुधन खरेदी केली जाते. त्याच बरोबर व्यवसाय मध्ये लागणारी साधने यावर खर्च केला जातो. या जमातीतील कुटुंबाकडे स्थावर मालमत्ता फारसी आढळुन येत नाही.

१२. या जमातीतील कुटुंबाकडे निवासाकरीता पक्के घरे नाहीत ३७% लोंकाकडे पक्के घर आहे. तर ५०% लोकांकडे कच्चे किंवा अर्धकच्चे घर आहेत तर ४७% लोंकाकडे गवताचे छप्पर आहेत.

१३. शिक्षण घेण्याविषयी प्राधान्यक्रम देणारी कुटुंबे फक्त ३५% आहेत तसेच आरोग्याची काळजी घेणारी ४०% कुटुंबे आहेत. आजारी पडल्यानंतर खाजगी वैद्य तसेच मंत्र - तंत्र करुन घेणारे ६०% कुटुंबे असल्याचे दिसुन येत.

१४. देशातील मागास घटकांचा आर्थिक विकस करण्यासाठी शासनाची महत्वाची भुमिका असते. शासन उप्तन्नावृध्दी करीता स्वयंरोजगार प्रशिक्षण किंवा इतर सुविधा सवलती पुरवित असते. या जमाती तील लोकाना घरकुला करिता मदत, शैक्षणिक सुविधा, राखिव जागेवर नौकरी, निराधारांना मदत, व्यवसाय प्रशिक्षणा करिता मदत आरोग्याची सुविधा, रॅशन पुरवठा या सारख्या सुविधा ४०% कुटुंबापर्यंम पोहचल्या आहेत परंतु आजही ६०% कुटुंबापर्यंत शासनाची मदत किंवा सवलती पुरेशा प्रमाणात पाहेचल्या नाहीत.

१५. स्वातंत्र्याच्या ७२ वर्षानंतरही खानदेशातील भटकी पंचाळ या जमातीतील लोकांना स्वातंत्र्याचा किफायतशोर लाभ मिळाला नाही. त्यामुळे न्याय, समता प्रस्थापित करावयाची असेल तर या मागास जमाती बरोबरच महाराष्ट्रतील दुर्गम भागातील सर्वच मागास जमातीतील लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व स्तरावर मोठया प्रमाणात ध्येय धोरण आखुन त्याची ठोस अमलबजावणी करणे महत्वाचे आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने भारत हे एक समृध्द राष्ट्र बनेल.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. दिलीप चव्हाण :- खानदेशातील भटकी पंचाळ जमात, शिक्षण सेवा प्रकाशन नाशिक रोड ,२०११
२. आत्रे त्रंबक नारायण :- गावगाडा, वरदा बुक्स, पुणे, १९८८
३. कांबळे उत्तम:- भटक्यांचे लग्न, मेहता पब्लिशिंग ,पुणे ,१९८८
४. चव्हाण रामनाथ:- जाती आणि जमाती, मेहता पब्लिकेशन, पुणे, १९९०
५. राठोड मोतीराम :-भटक्या विमुक्तांचा जाहिरनामा, औरंगाबाद
६. माने लक्ष्मण :- पालावरच जग, श्री विद्या प्रकाशन ,पुणे, १९९०
७. बावने लिनकुमार :- भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती सिंगम, प्रकाश चंद्रपुर, मुंबई, १९९२

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खान्देशातील सण उत्सवाचे बदलते स्वरूप

**प्रा. दिपाली आर. पाटील**
इतिहास विभाग प्रमुख, सहाय्यक प्राध्यापिका
श्रीमती प.क. कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ.

मानवी संस्कृती निर्माण होण्यापूर्वी आश्मयुग हे होते. हे युग संपून मानवी संस्कृतीची वाढ झाली. संस्कृती विकासात मातीची भांडी, लोखंडाची शस्त्रे, कापड, नदीचे बांध, शेतीकाम इ. गोष्टीचे शोध लागलेत. पशूपालन शेती यांना महत्त्व प्राप्त झाले. तसेच देवदेवता, भूमी, पंचमहाभूते, वारूळ पूजन, वीरपूजा होऊ लागली. माणस एकत्र येवू लागलीत. आणि सण उत्सवांना सुरूवात झाली. प्राचीन काळापासून सण उत्सवांना साजरे करण्याची परंपरा रूढ झाली. भारतीय सण उत्सवांची परंपरा म्हणजे एक अद्भूत संशोधित दूरदृष्टीतील विज्ञान होय. विविध ऋतु विचारात घेवून सण उत्सव साजरे करण्याच्या पध्दतीत आहार विहाराचा विचार रूजविला आहे. त्या पध्दतीत निश्चितपणे फलदायी ठरणाऱ्या असल्यामुळे आज पर्यंत पिढ्यान–पिढ्या तशाच सुरू आहोत. भारतीय परंपरेनुसार तीन ऋतूंमधील बारामासातील वेगवेगळ्या सण उत्सवामध्ये सर्वोतोपरी विविधता दिसून येते. प्रत्येक मासातील सण उत्सवांचा विचार केल्यास आध्यात्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासीक बाबींची अनुभूती येते. भारतात काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत विविध सण उत्सव त्या त्या प्रादेशिक रूढी परंपरेने साजरे केले जातात.

भारतात असलेल्या विविध घटक राज्यातील एक घटक राज्य महाराष्ट्र या महाराष्ट्रातील जळगांव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांचा प्रदेश खान्देश म्हणून ओळखला जातो. हा प्रदेश समृध्द व शांत आहे. खान्देशाचा अर्थ आणि व्याप्ती या संदर्भात विविध मतांचा गलबला आहे. काण्हदेश अशी एक तर खानाचा देश–खानदेश अशा टोकाच्या भूमिका आढळतात. इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकासाठी मात्र खानाचा ही देश आणि कान्हाचा आभीर संस्कृतीचा देश अशी समन्वयकाची भूमिका आढळते. या खान्देशात विविध प्रकारचे सण उत्सव साजरे केले जातात. काही सण उत्सवांवर फक्त खान्देशी लोकसंकृती प्रभाव दिसतो. पर्यावरणाचे संवर्धन, निसर्गाशी समन्वय, प्राणीमात्रा विषयी कृतघ्नता, आदारातिथ्य, सामाजिक जागृती, जनसंपर्क, ही लक्षणे दिसतात. हा सांस्कृतिक ठेवा एका पिढी कडून पुढच्या पिढी पर्यंत पोहचविणे त्याचे जतन करणे हा हेतू समोर ठेवून प्रस्तुत शोध निबंधाचे लिखाण करण्याचा प्रयत्न करीत आहे. पंरतु यात काही वैशिष्ट्येपूर्ण खान्देशी सणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :–**

१. खान्देशातील सण उत्सवांचे सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व समजवून घेणे.
२. खान्देशातील सण उत्सवाची निर्मिती व प्रेरणा अभ्यासणे.
३. सण उत्सवामुळे पर्यावरण संवर्धन होण्यास मदत होते.
४. सण उत्सवांचे नाविन्य राहिले नाही हे अभ्यासणे.

**संशोधनाची गृहतके :–**

१. खान्देशातील सण उत्सवात लोकसंस्कृती चे प्रतिबिंब दिसते.
२. संस्कृतीचे जतन व पर्यावरण समातोल राखण्यास मदत होते.
३. खान्देशातील उत्सवांना धार्मिक अधिष्ठान आहे.
४. खान्देशातील उत्सवांमुळे नविन प्रेरणा व उत्साह मिळतो.
५. धकाधकीच्या जीवनात सण उत्सवांचे स्वरूप बदलत आहे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य सामुग्रीचा आधार घेतला आहे. शोध निबंधाची मांडणी करण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच संदर्भ साधने, वृत्तपत्रे, स्मरणिका, ग्रंथ, पुस्तके, विविध लेख, मौखिक चर्चा आदि पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**विषय विवेचन :–**

सांस्कृतिक आध्यात्मिक किंवा धार्मिक कारणांनी साजऱ्या होणाऱ्या दिवसांना सण असे म्हणतात. सण शब्द क्षण या संस्कृत धातूपासून तयार झालेला आहे. सणाची क्षण–छण–सण अशी व्युत्पत्ती दिली जाते. संस्कृत कवी हेमचंद्राने रचलेल्या व्याकरणात छण म्हणजे उत्सव असा अर्थ आलेला आहे. खान्देशातील सण उत्सवाला स्वत:चा एक सांस्कृतिक ऐतिहासिक वारसा आहे. हा वारसा पंरपरेने प्राप्त झाला असून त्यातून त्यांचे जीवन मूल्य, सामाजिक वर्तन, सामाजिक परंपरा यांचे दर्शन होते. काळ व वेळेनुसार एका पिढी कडून

दुसऱ्या पिढी पर्यंत संक्रमित होणाऱ्या या जीवन मूल्यांचे अस्तित्व व त्यांचा वारसा हा खान्देशात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सण उत्सव यात्रेतून दिसतो. बदलत्या जीवन शैलीतून यात काही बदल झालेले दिसतात.

खान्देशतील मानवी जीवन हे कृषी व्यवसायावर आधारित आहे. हा श्रमजीवी मानवी समूह निसर्गाशी एकरूप झालेला आहे. खान्देशातील विविध सण हे ऋतुनुसार साजरे केले जातात. यात गौराई, रानबाई, कानबाई, गुलाबाई भालदेव, चक्रपूजा, गणेश उत्सव , नागपंचमी, पोळा, अक्षयतृतीया रथोत्सव, गुडीपाडवा, रक्षाबधंन , मरीआई, बहिरंम बुवा, म्हसोबा, मुंजोबा यांच्या यात्रा, मेळावे साजरे केले जातात. या सर्वच सण उत्सवात ग्रामीण समाज विशेष रस घेतो. ऋण काढून सण साजरा करतो या सण उत्सवांतून लोकमानसाची अभिव्यक्ति अनेक प्रकारे होत असते. सण उत्सवावे विवेचन करतांना खान्देशात कोण कोणते सण उत्सव साजरे केले जातात त्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१. नागपंचमी :–** श्रावण महिना म्हणजे मनाला धुंद करणारा महिना आषाढातला मुसळधार पाऊस संपलेला असतो. ऊन पाऊसाचा पाठशिवणीचा खेळ सुरू होतो. इंद्रधनुष्य दिसते. धरती हिरवा शालू पांघरलेला असतो. श्रावण म्हणजे हिरव्या रंगाचे मुक्त प्रदर्शन ! अनके फूले पक्षी असतात. गाईगुरे तृप्त झालेली असतात. सर्वत्र उत्साह आनंदाचे वातावरण असते. हे वातावरणांच्या माणसांच्या मनावर परिणाम करणारे असते. आपले पूर्वज रसिक, निसर्गप्रेमी होते. त्यांनी या श्रावण महिन्यात विविध सणांची आणि उत्सावाची गुंफण करून ठेवली आहे. श्रावणाच्या सुरूवातीस गारूड्याची पुंगी वाजू लागते. आणि नागपंचमीचा सण येतो. मुर्ती पुजेला मुळात सुरूवात वारूळ पुजेपासून झाली. स्त्रिया दूध व लाह्याचा नैवदय दाखवून वारूळाची पर्यायाने नागाची पूजा करतात. घरा बाहेर पडल्याने मन प्रफुल्लीत होते.

खान्देशातील संस्कृती सर्वांवर प्रेम करायला शिकविते. नाग हा विषारी प्राणी चावला म्हणजे मरण ! म्हणून त्या तेजस्वी धगधगीत, स्वच्छ, संयमी अशा नागाची पूजा म्हणजे त्यांच्या गुणांची पूजा. नाग शेतकऱ्यांचा मित्र. उंदिर वैगरे शेताला लागू देत नाही. त्यांची पूजा म्हणजे . विषारी सर्पातला ही चांगुलपणा पहावयास आपली संस्कृती शिकवते. नागपूजेच्या अनेक कथा आहेत. मोठा इतिहास आहे. महाभारतात आर्य लोक व नागवंशीय यांच्यातील संघर्षाचे वर्णन आहे. यांचात पुढे सलोखा निर्माण होवून रोटी बेटी व्यवहार होवू लागलेत. उदा. अर्जुनाचा विवाह नागकन्या उलुपीशी झाल्याचा उल्लेख आहे.

आज नाग पंचमीचे नाविन्य राहिले नाही. शहरात जवळ जवळ या सणाचा लोप होत आहे. ग्रामीण भागात देखिल सिमेंटची जंगल वाढत आहेत. यामुळे वारूळ दिसत नाही. लोकामध्ये सर्पाविषयी गैर समज कमी होऊन सर्प मित्र तयार होत आहेत. आणि प्राणीमात्रा विषयी प्रेमभाव वाढतांना दिसत आहे परंतु नागची भिती कमी झाली नाही.

**२. कानबाई :–** खान्देशातील मुख्यग्राम देवता म्हणून कानबाई ओळखली जाते. ही एक अधिष्टात्री देवता असून खान्देशातील कुटुंबीयांची कुलस्वामीनी आहे. कानबाईच्या पूजेची परंपरा खान्देशात प्राचीन काळापासून चालत आलेली असावी. असे तिच्या गाण्यामधून दिसते. कानबाईची गाणी मौखिक परंपरेने चालत आलेली असल्यामुळे नोद मिळत नाही.

दरवर्षी मोठ्या भाटामाटात कानबाईचा उत्सव खान्देशात साजरा केला जातो. संशोधक भा.इ. कुलकर्णी यांनी अहिराणी भाषा आणि संस्कृती या पुस्तकात कानबाईच्या विवाहाचे वर्णन केले आहे. कानबाई ही वेदात उल्लेखलेली आहे. रण्णा किंवा सरव्यू देवता असावी असा उल्लेख आहे. श्रावणातल्या नागपंचमी नंतरच्या पहिल्या रविवारी कानबाई चा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होतो. तीची स्थापना करण्यासाठी भावकीच्यां लोकांना बोलविले जाते. भावकीत कितीही वितृष्ट असले तरी सर्व भावकीचे लोक आप आपसातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येतात. गाववेशीवर असणाऱ्या पारावरून कन्हेरास वाजत गाजत घरी आणले जाते. कृष्णाचे प्रतीक म्हणून कन्हेर या झाडाची फांदी बसवून तीची कानबाई जवळ स्थापना करतात. स्थापना करीत असतांना स्त्रिया अहिराणी गाणी म्हणतात. कानबाई देवी संदर्भात प्रा.डॉ.सौ. पुष्पालता करनकाळ म्हणतात, या कानबाईच्या गाण्यामध्ये केवळ शब्द वाङ:मय नाही तर त्यात समाजातील रूढी, परंपरा, आचार–विचार यांचा समावेश आहे. या देवतेचे गुणवर्णन व अलंकारवर्णन असून समाजातील कुंभार, वाणी , सूतार , सोनार, माळी, कासार, बाम्हण अशा सर्व लोकांच्या जातींचा सहभाग असल्याचे दिसून येते.

या उत्सवाच्या आधी घराची साफ सफाई करून रंगरगोटी होते. रोटासाठी घरातील लहान मोठ्या पुरूषांना मोजून प्रत्येकी एक मूठ धान्य घेतले जाते. यात गहू, चण्याची डाळ इ. कानबाईमुळे घरातील ईडापीडा टळते अशी समजूत आहे. कानबाई उत्सवामुळे घरा घरातील स्वच्छता पयार्याने स्वच्छ होते. रोगराई पासून मुक्त होते. आजच्या काळात परिस्थितीचा विचार करता या सणाचे साजरे करण्याचे स्वरूप बदलले आहे. लोक कामधंद्यां निमित्ताने नोकरीसाठी गावापासून दूर पर प्रातांत राहू लागलेत. नोकरी व्यवसायामुळे गावी येणे शक्य होत नाहीत विभक्त कुटुंब पध्दती म्हणून ते कानबाई आपल्या बरोबर घेवून गेलेत. व तेथे कानबाईची विधिवत् पूजा सुरू केली. त्यामुळे कानबाई उत्सव खान्देशात पुरता मर्यादित न राहता भारताच्या अनेक प्रांतामध्ये पोहचला. उत्सवाच्या मागे शास्त्रीय कारणे पाहता पावसाळ्यात अनेक रोगांच्या साथी येतात. त्यामुळे घराची, परीसाराची, साफ सफाई होणे आवश्यक असते. धार्मिक कारणामुळे लोक एकत्र येतात. आणि अनेक विधायक कामे करु शकतात.

**३. बैलपोळा :–** श्रावणी अमावस्येला पोळ्याचा सण साजरा करतात. कुठलाही मोबदला न घेता निस्वार्थ भावनेन शेतकऱ्यासाठी काम करतो म्हणून या दिवशी शेतकरी बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. आज ही शेतकऱ्यांच्या जीवनात बैलाचे स्थान फार मोठे आहे. शेतीसाठी यंत्राचा वापर बराच होत असला तरी सामान्य गरीब शेतकऱ्याला तो परवडत नाही. शिवाय त्याच्यापासून शेणखत ही मिळते अशा उपयोगी, उपकारक, साह्यकर्त्या बैलाला शेतकऱ्यांने आपले दैवत मानून वर्षातून एकदा विश्रांती देणे, पूजा करणे त्याच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे अगदी योग्य आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून बैलाच्या उपासनेची प्रथा दिसते. मोहनजोदरो संस्कृतीच्या उत्खनना बैलाची चित्रे सापडली आहेत. शंकराचे वहान नंदी. आपल्या देशात सिंधी, खिलारी, डांगी अशा बैलांच्या अनेक जाती व वेगवेगळी वैशिष्टे आहेत. या सणामुळे कृषि जीवनातील महत्त्वाचा घटक शेतकऱ्यांचा मित्र असलेली बैलजोडी घेणे व तिचे पालन करणे, पोषण करणे शेतकऱ्यास परवडत नाही. शेती ही निसर्गावर अवंलबून आहे. त्यावेळी शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. त्याला स्वत:च्या कुटुंबांचा उदरनिर्वाह करता येत नाही. तो कर्ज बाजारी झाला आणि त्याच्याकडे आत्महत्ये शिवाय पर्याय दिसत नाही. बैलपोळा ग्रामीण भागात साजरा होत असला तरी बैलांची सख्या कमी होत आहे. कृतज्ञता प्राणीमात्रावर दया करणाऱ्या या सणाचे अस्तित्व शहरी भागातून लुप्त झाले आहे. ग्रामीण भागात ही लोकांचा उत्साह फारसा दिसत नाही. परिणामी समाजातील कृतज्ञाता भाव घटत चालला आहे. त्यांचे जतन व्हावे, शेणखताचा वापर कमी प्रमाणात होत असल्यामुळे जमिनाची प्रतीवारी निकृष्ट दर्जाचा होत आहे

**४. रथोत्सव :–** खान्देशातील सण उत्सवात रथोत्सवाचे विशेष महत्त्व आहे. जळगांव जिल्ह्यातील प्रिपांळा, चाळीसगांव, पाचोरा, पारोळा, बहादरपूर, धरणागांव, चोपडा, जळगांव, धुळे जिल्ह्यातील धुळे शहर, शिरपूर, बेटावद, कापडणे, शिंदखेडा, नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा, या ठिकाणी रथोत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होतात. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी जळगांव येथील श्री राम रथोत्सवाचे वर्णन आपल्या कवितेत केले आहे.

दाही सरता वहन आली एकादशी मोठी, मग सावरता रथ झाली गावामंधी दाटी, दहा दिवसां पासून अविरतपणे सुरू असलेले वहन, रथोत्सव करीता तेलपाणी रंगरंगोटी करण्यात येते. जळगांव नगरीचे ग्रामदैवत व वारकरी साम्प्रदायाची थोर परंपरा लाभलेला श्री राम मंदीराचा रथोत्सव साजरा होतो. यात्रा भरते, अनेक लोग सहभागी होतात.

खान्देशातील प्रकाशे येथे एक चाक सापडले त्यावरून इ.पूर्व १७०० च्या सुमारास आऱ्याची चाके बनविण्यास प्रारंभ झाला असावा. रथ यात्रेच्या दिवसी देव देवतांच्या मुर्ती रथात बसवून मिरवून काढली जाते. खान्देशातील रथ यात्रेची परंपरा अडीच हजार ते तिनशे वर्षापासून अजायात सुरू आहे. दरवर्षी अश्वीन शुध्द एकादशीला बालाजी, श्री राम, विठ्ठल पालखी, मुक्ताईच्या पादूका यांची मिरवणूक काढतात.

**५. गौराई :–** खान्देशातील ग्रामदैवत गौराई आहे. गौराईला बोली भाषेत गवराई असे म्हणतात. तीची स्थापना चैत्र महिन्यात करतात.या सणाला ग्रामीण भागत विशेष महत्व आहे. लग्न होऊन सारसरी गेलेल्या मुली सणा निमित्त माहेरी येतात. या काळात वसंत ऋतु असल्यामुळे उत्साहाचे वातावरण असते. या प्रसंगी मुली गौराई गाणी गातात. खान्देशात हे सण बलुतेदार आणि अलूतेदार सर्वच साजरे करतात. गौराई पार्वतीचे रूप आहे. तीचा नदी काठचा संबंध आहे. तीचे विर्सजन अक्षय तृतेयेच्या दूसऱ्या दिवशी करतात. विर्सजना पूर्वीच मिरवणूक वाजत गाजत गावा बाहेर जाते. सामूदायीक गौराईची गाणी व झिम्मा फूगडी खेळतात. त्यामुळे स्त्री मन आनंदी होते.

नदी पलीकडच्या काठावर दूसऱ्या गावच्या मुली हाच कार्यक्रम पार पाडत असतात. त्यानंतर दोन गावातील दोन काठावरील स्त्रीया परस्परांना शिव्या देतात, परस्परांना दगड फेक करतात. स्त्रियांचे हे दोन गटातील लाडीक युध्द बराच बेळ चालते. अंधार पडण्यापूर्वी त्या आपल्या घराकडे येतात. अलीकडे ही प्रथा बऱ्याच गावातून कमी होत आहे. आजची स्त्री स्वतंत्र वाटत असली तरी तीच्या वर अनेक दडपणे आहेत. तीला दैनदिंन जीवनात तारेवरची कसरत करावी लागते. ती घर सांभाळून नोकरी करते. घरी राहणाऱ्या गृहिणी देखील मुलाची शाळा, क्लास इतर जबाबदाऱ्या ओझ्या खाली बुडून गेल्या आहेत. विभक्त कुटुंब पध्दती नोकरी व्यवसायामुळे वेगळे राहणे यामुळे जबाबदारी वाटली जात नाही. त्यामुळे आजच्या स्त्रिया आनंद घेवू शकत नाही. शहरी भागात अर्पाटमेंट संस्कृती कुठेही व्यक्त होण्याची जागा नाही. त्यात भर सोशल मीडियाची पडली आहे. त्यामुळे निर्सगाच्या सानिध्यात जाणे स्वतंत्रपणे, समूहात सहभागी होणे, तीच्या वाटेस येत नाही. म्हणून गौराई सारख्या खान्देशी सणाचे महत्व विशेष आहे. काही स्त्रिया मनातील विचार मुक्तपणे व्यक्त करू न शकल्यामुळे मनोरुग्ण झाल्याचे उदाहरणे आहेत. आखजीच्य सणातील लाडीक युध्दामुळे त्याचे मानसिक आरोग्य जपले जात होते. सण, उत्सवात त्या एकत्र येवून सुख-दु:खाची देवाण घेवाण करीत होत्या.

**६. आखजी :–** स्त्री वर्गाला माहेरची ओढ लावणारे अनेक सण महाराष्ट्रात साजरे केले जातात. त्यात विदर्भातील आखाडी मराठ वाड्यातील नागपंचमी, खान्देशातील आखजी या सणाचा समावेश करता येईल. खान्देश आपली बोली, सण , उत्सव या बाबतीत आपले वैशिष्ट जपून आहेत. वैशाख शुध्द तृतीयेला खान्देशात आखाजी म्हटले जाते. याच दिवशी कृतयुगाचा प्रारंभ होतो असे मानले जाते. या दिवशी केलेले दान व हवन क्षयाला जात नाही. देवाच्या व पितरांच्या नावाने केलेले कोणतेही कर्म अक्षय होते. या सोबत अनेक अख्यायिका आहेत. खान्देशात शाळा, महाविद्यालयांना लाभलेली उन्हाळ्याची सुटी आखाजीची सुटी म्हणून ओळखली जाते.

खान्देशात आखजीच्या दिवशी सालदार, बलुतेदार नवीन सुरूवात करतात. या दिवशी स्त्री पुरूष, शेतकरी, शेतमजूर, अबालवृध्दा या सर्वांना पुर्ण स्वातंत्र्य लाभते. प्रत्येक जण बंधमुक्त होतो. स्त्रिया माहेरी मुक्तपणे झोके खेळत गाणी गातात या दिवशी पूर्वजां श्राध्दाविधि करून स्मरणाचा दिवस आहे. बलुतेदारांचा ही महत्वाचा दिवस आहे. बलुतेदार शेतकऱ्यांसाठी वर्षभर राबतो. त्यांचे बलुत ठरल्या प्रमाणे या दिवशी दिले जाते. बलुतेदाराच्या हिस्साला किंवा रकमेला गव्हाई असे म्हणतात. या दिवशी सालदार ठरविला जातो. जो आपल्या मालकाकडे संपूर्ण वर्षभर कामासाठी बांधील असतो. आता ही परंपरा बंद झाली. या सणातील अनेक विधिचा गाण्याचा, वेगवेगळ्या खेळाचा, नृत्य परंपराचा अभ्यासासाठी ही आखाजी सण पर्वणी आहे.

आखाजीचे स्वरूप बदलेले आहे. यांत्रिक जीवन, नोकरी, धंदयामुळे, गाव सोडावे लागणे, वृक्षतोड, कुटुंबाचे विभाजन, बदलेले कायदे, गावांची रचना, पर्यावरणाचा ऱ्हास यामुळे या सणाचे स्वरूप बदलले आहे.

**निष्कर्ष :–**

सण उत्सव यांना पारंपारिक, धार्मिक सण आणि उत्सव यांच्यात काही प्रमाणात परिवर्तन झालेले दिसते. त्याच बरोबर काही नवीन सण उत्सवांना प्रारंभ होऊन त्या पुढील काळात महत्व येईल. काही सण उत्सव जनसंपर्कासाठी साजरे केले जात होते. उदा. सक्रांत, दसरा, गणेश उत्सव इ. लोकमान्य टिळकांनी जनसंपर्कासाठी गणेश उत्सव व शिव जयंती सुरू केली परंतु आजचे गणेश उत्सवांचे स्वरूप बदलले आहे. गणेश मंडळांवर राजकारण्याचा प्रभाव दिसतो. गणेश मुर्तीची उंची वाढत आहे. नद्या मध्ये विर्सजनासाठी पाणी नाही. अनेक पर्यावरणाच्या समस्या आहेत. त्याकडे दुर्लक्ष होत आहे. समाजाभिमुख उपक्रम राबविले जात नाहीत. आजच्या धकाधकीच्या जीवनात आम्ही अनेक गोष्टी विसरत आहोत. आजची पिढी रोजचा अभ्यास, क्लास, खेळणे, एकत्र येणे, निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालविणे हे विसरत आहोत. कधीतरी हे सारे बुडवून टी. व्ही. पाहणे, मोबाईल हे आमचे जीवन झाले आहे. कशाचे ही अप्रुप राहिले नाही. माणसातले नाते जिव्हाळा राहिला नाही निसर्गाचा तर नाही. सण उत्सवात मागिल शास्त्रीय कारण, वैज्ञानिक दृष्टिकोण, पर्यावरण संवर्धन, मानसिक व सामाजिक कारणे, समजवून आमचे जीवन सुखकर होईल. संस्कृतीचे संवर्धन व पर्यावरणाचा समतोल राखता येईल. खान्देशातील सण उत्सवात विविधता असलर तरी समाजनियमाचे अस्तित्व आढळून येत. हा वारसा जतन करून पुढच्या पिढीला देणे आमचे कर्तव्य आहे परंतु त्याचा आम्हाला विसर पडला आहे.

**संदर्भ सूची :**

१. जोशी लक्ष्मणशास्त्री –मराठी विश्वकोष खंड, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई.
२. भोसले दत्ता – संस्कृतीच्या पाऊल खुणा, पद्मगंधा प्रकाशन पुणे.
३. अहिरराव प्र.अ– भारतीय मुर्तीपुजेचा इतिहास – वरदा बुक पुणे.
४. पुष्पलता कारंकाळ– खान्देशातील लोकद देवता– गोदावरी प्रकाशन औरंगाबाद.
५. बाबर सरोजनी– सण उत्सव– संपा. महाराष्ट्र राज्य लोक साहित्य माला पुणे.
६. ओक सुमन–सणांचे कुळ व उत्सवांचे मुळ– साधना प्रकाशन पुणे.
७. चेंदवणकर सदानंद–भारतीय सण आणि उत्सव निर्णय, सागर बुक प्रकाशन
८. कृष्णा इंगोले–लोकसंस्कृतीतील स्त्री रूपे –प्रकाशन सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
९. संपा. मु.ब. शहा – खान्देशचा सांस्कृतिक इतिहास भाग– १ व २ –का.स.वाणी प्रगत अभ्यास मंडळ पुणे.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खानदेशची जीवनदायिनी तापी : एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. जाधव भाग्यश्री शंकर**
इतिहास विभाग,
प्रताप महाविद्यालय, अमळनेर.

**गोषवारा**

खानदेशला स्वतंत्र अशी संस्कृती असून त्या संस्कृतीला हजारो वर्षांची वैभवशाली सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. खानदेश हा प्रदेश तापी, नर्मदा या दोन नदयांच्या खो–यात वसला आहे. सांस्कृतिक माहात्म्या बरोबरच तापी व तिच्या उपनदयांचा प्रदेश हा प्रागैतिहासिक स्थळांनीही समृध्द आहे. आजवर तापी खो–यात झालेल्या उत्खननातून विविध पैलू नव्याने समोर आले. गंगा नदी इतकेच महत्व असणा–या तापी नदीकाठी प्रकाशासारखे 'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाणारे स्थान, प्रागैतिहासिककाळापासून मानवी वसाहतीचे स्थलही आहे.

आचार्य कालेलकर नदीला 'लोकमाता' म्हणतात. तापी खो–यात राहणा–या जनांसाठी तापी ही त्यांची माताच आहे. ही कृतज्ञतेची भावना लोकगीतांतून व्यक्त होते. १

**प्रस्तावना**

नदी हे तिच्या परिसरातील भूमीचे आभूषण असते.२ या आभुषणामुळे भूमीला शोभा येते. भारत हा नदयांनी समृध्द असलेला प्रदेश आहे. जनतेचे पालनपोषण करणा–या या नदयांच्या परिसरात भारतीय संस्कृतीचा विकास झाला. भारतात नदयांना देवतेचा मान असल्याने भारतीयांच्या भावजीवनात नदयांना फार मोठे स्थान आहे.

**संकेतशब्द :–** खानदेश, तापी नदी, सांस्कृतिक पैलू ऐतिहासिक पैलू.

**उद्दीष्टे :–**

१) तापी नदी विषयी अभ्यासणे
२) तापी नदीचे सांस्कृतिक पैलू अभ्यासणे.
३) तापी नदीचे ऐतिहासिक पैलू अभ्यासणे.

**संबधित साहित्याचा आढावा :–**

खानदेशची जीवनदायिनीतापी एक ऐतिहासिक अभ्यास हा शोध निबंध तयार करत असतांना संशोधिकेने 'नदी आणि स्त्रीत्व', 'भारतीय सरिताकोश' इ. ग्रंथाचा अभ्यास केला पण प्रस्तुत ग्रंथात ऐतिहासिक दृष्टीकोनातून लेखन आढळून येत नाही.

**संशोधन पध्दती :–**

संशोधिकेने प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केला आहे.

**तापी नदी :–**

भारतातील प्रमुख नदयांपैकी एक तापी नदी आहे. मध्यप्रदेशातील बेतुल जिल्हयातील मुलताई येथील तलावातून तापी नदी उगम पावते.३ मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांतून वाहत अरबी समुद्राला मिळते. तापी नदीची एकूण लांबी ७२५ कि.मी. आहे.४ नर्मदा नदी शिवाय तापी नदीच पश्चिमवाहिनी आहे. तापी नदीच्या प्रमुख उपनदया पूर्णा, गिरणा, पांजरा, वाघूर, बोरी, अनेर इत्यादी आहेत.

**सांस्कृतिक पैलू :–**

तापी नदीचे महत्व गंगा नदीच्या समकक्ष मानले जाते.

*गंगा स्नाने पवित्र करी । तापी करी स्मरणे पवित्रता ।५*

असा उल्लेख श्री तापीमाहात्म्यात येतो. तापी नदीला सुर्यदेव व छाया यांची कन्या म्हणजेच सुर्यपुत्री म्हणुन ओळखले जाते.६ तापी माहात्म्यानुसार सुर्याने स्वत:चा ताप अर्थात उष्णता कमी करण्यासाठी तिला निर्माण केले. नदीमाहात्म्यांमध्ये नदीदेवतेला आपत्य प्रसव झाल्याची फक्त एकच आख्यायिका आढळते. या कथेत तापी देवता म्हणजे नदी संवरणाशी विवाह करते. ७ संवरण म्हणजे वरुणाचा राजा म्हणून झालेला पुर्नजन्म. तापीला त्याच्यापासून कुरु हा पुत्र होतो. महाभारतातल्या कौरव–पांडवांचा पूर्वज हा.

तापी माहात्म्यात तापी नदीच्या २१ नावांचा उल्लेख मिळतो.८ तापी माहात्म्य हा स्कंद पुराणाचा भाग आहे.९ १०८ प्रसिध्द तीर्थक्षेत्र या नदीवर आहेत.

**जन्मोत्सव :–**

भारतात नदयांचे जन्मोत्सव साजरे केले जातात. तापी नदीचा जन्म आषाढ शुध्द सप्तमीला मधान्ही झाला,असे तापी महात्म्यात म्हटले

आहे. १० प्रतीवर्षी या दिवशी तापीचा जन्मोत्सव साजरा करण्याची प्रथा तापीच्या तीरावरील तीर्थक्षेत्रात आजही रुढ आहे. या उत्सवकालाला 'पदमक' असे म्हणतात. आषाढ महिन्यात तापी नदीवर दिपदान करुन लाभलेले पुण्य कुरुक्षेत्रावर केलेल्या स्वत:च्या सुवर्णतुलेच्या बरोबरचे आहे. ११ यावरुन कुरु व तापी यांचा संबंध उलगडतो.

**प्रकाशा :–**

तापी–गोमई संगमस्थळावरील प्रकाशा हे दक्षिण काशी म्हणुन ओळखले जाते. १२ भारतातील कुंभमेळयाप्रमाणे दर १२ वर्षांनी येथे कुंभमेळा भरतो. केदारेश्वर व संगमेश्वर ही शंकराची मंदिरे येथे आहेत.

**एदलाबाद :–**

येथे तापी–पूर्णा संगमावर चांगदेवाचे मंदिर आहे. १३

**ऐतिहासिक पैलू :–**

प्राचीन काळी विविध संस्कृतींचा उदय हा नदीच्या खो–यात झाला. तापी नदीही याला अपवाद नाही. तापी खोरे उत्कृष्ठ सुपीक जमिनीने समृध्द असल्याने तापीच्या खो–यात वसाहती करण्यास लोक प्राचीनकाळापासून आकृष्ट झाले. १४ भौगोलिक रचना, योग्य पाऊस आणि तापी व तापीच्या उपनदयांचे बारमाही पाणी, व्यापारास उपयुक्त यामुळे येथे मानवी वसाहती निर्माण झाल्या.

**प्रकाशा :–**

इ.स.१९५५ साली झालेल्या उत्खननामध्ये या ठिकाणी ताम्रपाषण युगापासून ११ व्या शतकापर्यंत विविध कालखंडात झालेल्या वस्त्यांचा पुरावा उपलब्ध झाला आहे. १५ प्रकाशाच्या उत्खननामुळे महाराष्ट्रातील ताम्रपाषणयुगीन आणि गुजरात, मध्यप्रदेश विभागातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती यांचा संपर्क आल्याचे स्पष्ट झाले.

**बहाळ :–**

तापीला मिळणा–या गिरणा नदीच्या काठावरील जळगाव जिल्हयातील बहाळ येथे इ.स. १९५२ आणि इ.स. १९५६–५७ साली उत्खनन करण्यात आले. उत्खननात ताम्रपाषण युगापासुन ते मराठाकाळापर्यंत निरनिराळया वस्त्यांचे अवशेष उपलब्ध झाले.

**सावल्डा :–**

नंदुरबारच्या ईशान्येस सावल्डा येथील इ.स. १९५९–६० साली उत्खनन करण्यात आले. यात नविन त–हेच्या खापरांचा पुरावा उपलब्ध झाला व तापी खो–यातच उत्तर हडप्पा संस्कृतीचे अस्तित्व असल्याचे स्पष्ट झाले.

**टेकवडा :–**

बहाळजवळील टेकवडा येथील इ.सं. १९५६–५७ मधील उत्खननात मानवी दफनाचा पुरावा उपलब्ध झाला.

**कवठे :–**

तापीच्या कान उपनदीवर इ.स. १९८४–८५ ला करण्यात आलेल्या उत्खननात दगड किंवा तांब्याच्या वस्तूऐवजी हाडांपासून बनवलेल्या सुया, छोटया छिन्न्या आणि कोरके सापडले. अशा त–हेचा पुरावा महाराष्ट्रात इतरत्र सापडला नाही.

**थाळनेर :–**

तापी नदीकाठील थाळनेर येथे ब्रम्हगिरी आणि बहाळप्रमाणे राखी रंगाची मडकी, काळया आणि तांबडया रंगाची खापरे, गारगोटीच्या छिलक्याची हत्यारे आणि नवाश्मयुग निदर्शक असून धारदार केलेली दगडी हत्यारे सापडली.

अशी विविध प्रागैतिहासिक स्थळे तापी खो–यात आढळतात.

**सारांश :–**

तापी नदी ही खानदेशची जीवनदायिनी आहे. सांस्कृतिक वैशिष्टयांनी परिपूर्ण असलेल्या या नदीचे महत्व फक्त माहात्म्यापुरते किंवा तीर्थक्षेत्रापुरते सीमित नसून जनमनात रुजलेले आहे. याचा प्रत्यय जन्मोत्सवातून येतो. समृध्द भौगोलिक वैशिष्टयांमुळे प्रागैतिहासिककाळापासून येथे मानवी वसाहती आढळतात व तेथील उत्खननातून मानवी इतिहासाचे विविध पैलू समोर आले.

**संदर्भ सूची :**

१) गावीत पुष्पा यशवंत, पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती २०११, पृ–६८
२) भालेराव श.म.भारतीय , भारतीय सरिताकोश खंड–१, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती २९ नोव्हेंबर २००७ पृ–५
३) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक) मराठी विश्वकोश खंड–७, महाराष्ट्र राज्य साहित्यसंस्कृती मंडळ, मुंबई, पृ–३०५
४) Gazetters of India, Maharashtra State, Dhulia District, Revised Edition-1974 PP-6
५) श्री तापीमाहात्म्य ग्रंथ, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, हस्तलिखित ई. प्रत पृ–९
६) DandekarParineeta, Maharashtra State of Indian Rivers, for India Rivers Week-2016 PP-26

७) फेल्डहाऊस ॲन, अनुवाद देव विजया, नदी आणि स्त्रीत्व महाराष्ट्रातील नदयांचे धार्मिक महत्व, पदमगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ११ जुलै २०१४ पृ-१५१
८) श्री. तापीमाहात्म्य ग्रंथ, उनि. -११
९) DandekarParineeta, ibid-26
१०) भालेराव श.म., भारतीय सरिताकोश खंड-३, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती-२९ नोव्हेंबर २००७ पृ-२०६२
११) फेल्ड हाऊस ॲन, उनि-१२५
१२) DandekarParineeta, ibid-27
१३) भालेराव श.म.खंड-३ उनि-२४४१
१४) देव शांताराम भालचंद्र, महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र खंड पहिला भाग १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती-२००२ पृ-५
१५) देव शांताराम भालचंद्र, उनि-४४-४६
१६) देव शांताराम भालचंद्र, उनि-५९-६०

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# शिरपुर (जि. धुळे) तालूक्यातील ग्रामनामे एक अभ्यास

**दिपक बाबुलाल शिरसाट**
मु. पो. गोंदेगांव, ता. जामनेर,
जि. जळगांव.

**१.१ प्रस्तावना :-**

धुळे महाराष्ट्रातील महत्वाचा जिल्हा असून, धुळे जिल्ह्यात धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर या चार तालूक्यांचा समावेश होता. शिरपूर धुळे जिल्ह्यातील तालूका असून, ते २१ ० २१० उत्तर ५२० ४३छ अक्षांश पूर्व वसलेले आहे.१ अरूणावती आणि तापी नदी शिरपूर शहरातुन वाहते. १९६० च्य दशकाच्या सुरुवातीला सुभाष कॉलनी सर्वातप्रथम सर्वात मोठी लोकसंख्या असलेली कॉलनी होती. १९९० नंतर ती आदर्श नगरामध्ये विभागली गेली. भारताचे महान स्वातंत्र्य सेनानी सुभाष चंद्रबोस यांच्या नावावरुन हे नाव पडले असे म्हटले जाते. सुमारे ४.२ लाख लोकसंख्या असलेले शिरपुर तहसील धुळे जिल्ह्याचे दुसरे लोकसंख्या असलेला उपजिल्हा आहे. शिरपुर तालूक्यातील थाळनेर ११,००० लोकसंख्या असलेले मोठे गाव तर देवसिंग पाडा २३० लोकसंख्या असलेले सर्वात लहान ग्राम आहे.२ थाळनरे हे सर्वात जास्त लोक संख्या असलेले गाव आहे शिरपुर पासून ५० कि. मी. अंतरावर आशियातील सर्वात मोठी आणि भारतातील पहिली सोन्याची रिफायनरी आहे.३ शिरपुर हे राष्ट्रीय महामार्ग ०३ वर स्थित आहे.

शिरपुर तालूक्यात १६३ गावे येतात.४ प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालूक्यातील ग्रामनामांच्या उत्पत्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**१.२ पूनरुक्त पध्दतीत ग्रामनामे :-**

ग्रामनाम उत्पत्ती संदर्भात पुराणात काही संदर्भ मिळतात.

*तभासूद्रजप्राया सुसमृध्दकृषीवला ।*
*क्षेत्रोपभोगभूमध्ये वसतिर्गामिसंज्ञिता ।।५*

जिच्या भोवती कीर्दसार वहितीला योग्य जमीन आहे आणि जीच्या मध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहे अशा वस्तीला चगावछ म्हणतात.६

शिरपूर तालूक्यात गावाची नावे बुद्रक, खुर्द, अशी दोनवेळा आलेली आहेत. बूद्रक म्हणजे मोठे गावे खुर्द म्हणजे छोटे गाव यात एकुण ०७ गावांचा समावेश होतो अंजदे, अर्थे, भाटपूरा, हिंगोणी, खर्दे वाडी, विखरण, अशा गावांच्या समावेश होता. शेकडा प्रमाण ४.२९ टक्के आहे.म्हणुन एक गावाची दोन किंवा चार होवून सीमा निम्मपट तृतियांश, किंवा चतुर्थशांश, झाला खूर्द - बूद्रक सीम, चहारम् मोठे लहान, तिसरे किंवा पंचम पाचवे अशी विशेषणे पोट गावांना मिळाली.७

**१.३ अक्षर वर्णानुसार गावाची नावे :-**

शिरपूर तालूक्यातील नावे घअङ स्वरात १४, आ - स्वरात ४, आणि ऊ - स्वरात ५ अशी येतात. या शिवाय घकङ व्यंजनात ७, ख व्यंजनात ०६, ग व्यंजनात ०५, च मध्ये ७, ज मध्ये ०८, झ, थ, ध, अनुक्रमे प्रत्येकी ०१ ग्रामनामे ट मध्ये ०४ त व्यंजनात ०६, द मध्ये ०४, न मध्ये ०६, प मध्ये ०६, फ मध्ये ०१, ब मध्ये १० भ मध्ये १०, म मध्ये १०, र मध्ये ०२, ल, ०३, व मध्ये १७, श मध्ये ०४, स मध्ये ०८, ह मध्ये ०९ येतात.

सर्वात जास्त ग्रामनामे घ्वङ व्यंजनात येतात त्यांची संख्या १७ आहे. सर्वात कमी ग्रामनामे घ, झ, थ, ध, या व्यंजनात येतात त्यांची संख्या अनूक्रमे ०१ आहे.

१२ स्वरापैकी ०३ स्वरात (अ, आ, उ) ग्रामनामे येतात, ०९ स्वरात (इ, ई, ए, ऐ, ओ, औ, अं, अं :) येत नाहीत.

**१.४ झाडावरुन, वनस्पतीवर, वेल दर्शक गावाची नावे :-**

शिरपुर तालूक्यात ग्रामनामे झाडांवरुन तथा वृक्षावरुन पडलेली दिसतात. या गावांच्या नावावरुन तेथील - वृक्षांचे प्रमाण, पर्यावरण, औषधी, गुणधर्म, माती यांची ओळख होते.८

अंजदे ग्रामनाम - अध्यंदा घ्धध्यडकङ या वनस्पती दर्शक आहे. त्याची संख्या दोन आहे. ती अंजदे बूद्र व खूर्द, अशी आहे. अजनाड ग्रामनाम घ्अजंनवाटङ या वृक्षदर्शक - नामावरुन पडलेली आहे. अंजनगाव - ग्रामनाम घ्अनंतपूर पल्लीङ वनस्पती दर्शक आहे आंबेगाव ग्रामनाम आंबेझाड वृक्ष फळदर्शक नावावरुन पडलेले आहे. वरझडी ग्रामनाम वर व झडी उंचावरील झाडाच प्रमाण दर्शविते.

बोरमळी ग्रामनाम वदरमलम या संस्कृत बोरदर्शक - वृक्षनामावरून पडलेली आहे. म्हणजेच बोर व मळी पूर्वपद बोर व उत्तरपद मळी

ISSN : 2348-7143
Dec. 2018

या दोन शब्दापासून बनलेली आहे बोरगांव – बदर – बोर दर्शक आहे. बाभुळदे ग्रामनाम घ्बर्बुरङ या वनस्पती दर्शक आहे. बावळदे ग्रामनाम बदरवाट म्हणजे – बोरी वृक्षांचे प्रमाण दर्शविते. बोराडी ग्रामनाम – बोर वृक्षांचे प्रमाण दर्शविते बोर पाणी ग्रामनाम बोर व पाणी पूर्वपद बोर व उत्तर पद पाणी वृक्षवजल दर्शक आहे. बलकुळे ग्रामनाम बला वृक्षदर्शक आहे.

हिगाव हिंगविन वनस्पती दर्शक आहे. हिंगोली हिंजूवनी वनस्पती दर्शक आहे. दुरखळी ग्रामनाम कोरकखळी वनस्पती दर्शक आहे. काळापाणी ग्रामनाम कालपर्णिका (नगर) वनस्पती दर्शक आहे. कळम सरे ग्रामनाम घ्कलंबसरसङ वनस्पती दर्शक आहे. करवंद उष्णकटिबधीय डोंगराळ प्रदेशात वाढणारे वनस्पती दर्शक आहे. त्याला घ्डोंगराची काळीमैनाङ असे देखील म्हणतात. खर्दे ग्रामनाम – क्षुरपद्र या वनस्पतीपासून पडलेली आहे खैरखुटी ग्रामनाम – खादीर सुटी वनस्पती दर्शक आहे जापोरे ग्रामनाम जपा (जास्वंद) दर्शक आहे. जवखेडे ग्रामनाम जव – यव व यवखेडे असा अपभ्रंश होवून जवखेडे वनस्पती दर्शक आहे. लोंढरे ग्रामनाम लोंध्र वनस्पतीदर्शक आहे. नांदर्डे – ग्रामनम नंदक – नांदूर्खी – नंदवाट – खानदेश वनस्पती दर्शक आहे. निंम झरी – ग्रामनाम –निबंझरी – वृक्षदर्शक आहे. पळासनेर – ग्रामनाम – पळसनिवर हे नामविधान दर्शविते म्हणजे जेथे पळसवृक्षाचे प्रमाण जास्त आहे. असे क्षेत्र पिंपळे ग्रामनाम – पिप्पलक – पिंपळ वृक्षदर्शक आहे. पिंपरिका वृक्षदर्शक – नावावरुन पिंप्री विखरण ग्रामनाम – निक्षीर वन – बिशीर (रुई) वनस्पती दर्शक आहे. हिवर खेडा ग्रामनाम – हिवश्रम वनस्पती दर्शक आहे. साकवद ग्रामनाम शाकर (साग) वृक्षदर्शक आहे. सावळदे ग्रामनाम श्यामल्लालिपद्र, वनस्पती दर्शक आहे. सावेर श्याम (तमाल) वनस्पती दर्शक आहे. तांडे ग्रामनाम – ताटक वनस्पती दर्शक आहे तऱ्हाडी ग्रामनाम तर – तरवाटीका वनस्पती दर्शक आहे. तोंडे ग्रामनाम घ्तुंडिकाङ या वनस्पतीदर्शक नाम सुचित करते चक्र वनस्पतीवरुन चाकडू ग्रामनाम. उंदावली / उंटावत ग्रामनाम उष्ट्रिका (कुइली) आवर्त वनस्पतीनाम दर्शविते. अखळवाडी ग्रामनाम त्याला (मुरा) तृणविशेषण दर्शविते. उमर्दा ग्रामनाम उंदुबर ओंदूवर उंबर – वृक्षदर्शक आहे उपर पिंड ग्रामनाम उत्पलपिंड – वनस्पती दर्शक आहे. न्यू बरोडी ग्रामनाम – नवी बोराडी – बोरवृक्ष दर्शक तरडी ग्रामनाम तरट (तरवडा) तरटीका खानदेश वनस्पती दर्शक आहे. धवडीविहीर ग्रामनाम धवडी म्हणजे (धावडा) खानदेशातील वनस्पती व विहिरनाम प्रत्यय दर्शविते एकंदरी, अभ्यास केल्यास ग्रामनामे – ५३ नामे ही वृक्ष वनस्पती दर्शक, गटात येतात त्यांची शेकडा प्रमाण ३२.५ टक्के आहे. त्यांचे सर्व प्रकारात त्यांची संख्या जास्त आहे.




(www.google map.com)

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

**अक्षरवर्णानुसार ग्रामनामे**

| स्वर/व्यंजन | ग्रामनामे | संख्या |
|---|---|---|
| अ | अभानपुर, अहिल्यापुर, अंजननाड, अजंदे बु. खू. अंजमपाडा, असली, अंजूली, अर्य बू. खू. अरूणापुरी | १४ |
| आ | आढे, आंबेगांव, आमोरे आसारी | ०४ |
| उ | उंदावस्ती, उरजवाडी, उमर्दा, उंटावद, उपरापिंड | ०५ |
| क | कुरखळी कोडीद, काकडकल, काळापाणी, कळमसरे, करवंदे | ०७ |
| ख | खैरकुटी, खंबाळे, खामखेडा, खर्दे बू. खू. खारीखान | ०५ |
| ग | गभडदेव, गरताड, गिधाडे, गोदी, गुऱ्हाडपाणी | ०५ |
| घ | घोडसगाव | ०१ |
| च | चाकळू, चांदसे, चेंदीपाडा, चांदपूरी, चांदसूर्या, चिलारे, चोंदीपाड | ०७ |
| ज | जैतपूर, जळोद, जामन्यपाडा, जापोरे, जातोदे जवखेडे, जोमदा, जूने भामपूर | ०८ |
| झ | झेंडेअंजन | ०१ |
| ट | टेकवाडे, टेंभेबू ।। टेभेपाडा | ०४ |
| त | ताजपूरी, तांडे तरडी, तऱ्हाड, तऱ्हाडी तोंदे | ०६ |
| थ | थाळनेर | ०१ |
| द | दहिवद, देविसिंगपाडा, दोंदवाडा, दुर्बड्या | ०४ |
| ध | धवळी विहीर | ०१ |
| न | नांदर्डे, नाथे, नटवाडे, नवेभामपूर, न्यू बारोडी, निमझटी | ०६ |
| प | पळासनेर, पनाखेडे, पाथर्डे, पिळोदे, पिंपळे, पिंप्री | ०६ |
| फ | फत्तेपुर | |
| ब | बोरमळी, बोरगांव, बभळाज, बाभुळदे, बाळदे, बालकुळे, बोराडी, बोरपाणी, बुडकी विहीर | १० |
| भ | भरवाडे, भटाणे, भाटपूरा, भावेरे, भिलर देवपाडा, भिल टपाडा, भोईटी, भोरखेडा, भोरटके | १० |
| म | महादेव दोंधवाडा, मालापूर, मालकातर, मामने, मंडळ, मांजरबर्डी, मांजरादे, मोहिदा, मुखेड | १० |
| र | रोहिणी, रुदावली | ०२ |
| ल | लाकड्या हनूमान, लौकी, लोढरे | ०३ |
| व | वाठोडा, वासर्डी, वाळपाडा, वाघबर्डी, वाडी खू, बू. वडलेखगाव, वाघाडी, वकनाड, वनावले, वरुळ, वरझडी, वाठोडे, विखरण खू. बू. | १७ |
| श | शेमल्या, शिंगावे, शिरपूर वारवडे, | ०४ |
| स | सजगरपाडा, साळवद, सामऱ्यापाडा, सांगवी, सावळदे, सावेर, सुभाषनगर, सुळे | ०८ |
| ह | हाडाखेडे, हातेड, हैंद्रयापाडा, हिंगाव, हींगोणी बू, हीसाळे, हिवरखेडा, होळ | ०९ |
| | एकुण गावे | १६३ |

**१.५ आदिवासी शब्द दर्शक ग्रामनामे :-**

शिरपुर तालूक्यात आदिवासी शब्द प्रभाव असलेली ग्रामनामे आढळतात. त्यातशेमल्या ग्रामनाम - एक वेलांचा प्रकार किंवा आपट्याच्या झाडाला देखिल आदिवासी भाषेमध्ये शेमला म्हणतात. देविसिंगपाडा ग्रामनाम आदिवासी मनूष्य नाम व पाडा - मुख्य व्यक्ती नाम दर्शविते घ्सामऱ्या पाडाङ ग्रामनाम - काटेरी वनस्पती साबसू - वरुन सामया व पाडा आदिवासी शब्द समूहदर्शक यावरुन सातऱ्या पूर्वपद व पाडा प्रत्यय पद नामविधान पडलेले दिसते. टेभेपाडा टेभे दक्षकन्या दर्शक तरपाडा ना प्रत्यय दर्शविते जामन्यापाडा ग्रामनाम - जांभूळाच्या झाडाला जांभूळ म्हणतात. यावरुन त्या परिसरात घ्जांभूळङ झाडाचे प्रमाण जास्त असावे व पाडा शब्द प्रत्यय यावरुन जामन्यापाडा ग्रामनाम दिसते. हिसावे ग्रामनाम - काटेरी कंपून घालण्यासाठी जे काटे उचलविण्यासाठी ज्या लाकड्या फाटकांचा उपयोग करतात त्याला घ्हिसूकङ म्हणतात परंतू तेथील परिस्थिवरून ते लोकनाम असावे हेद्रया जोमदा, मामने हे आदीवासी ग्रामनाम लोकनाम दर्शक आढळत भिलरदेवपाडा, भिलपट पाडा वनवासी, आदिवासी दर्शक नाम दर्शविते सजगार हे ग्रामनाम - पक्षीदर्शक आहे. आदिवासीमध्ये आकाशात उंच उडणाऱ्या घारीलाघार पक्ष्यांचे प्रमाण जास्त असावे. चंदीपाडा नाम आदिवासी नाम एकंदरीत विचाी केल्यास आदिवासी शब्द प्रभाव असले ग्रामनामे शिरपूर तालूक्यात १५ आढळतात ज्यांचे प्रमाण ९.८० टक्के आहे.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

**१.६ मनुष्यत्तेर प्राणी नामांपासूनची नावे :–**

मनुष्यत्तेर प्राणीमात्रांवरुन झालेल्या ग्रामनामांवरुन त्या भागातील प्राणी सृष्टीचा बोध होतो. या प्राण्यांमध्ये सिंह, वाघ, घोड, सर्प, उंदीर, माकड, कोल्हा इ प्राण्यांचा समावेश होतो.९दोंदवाडा ग्रामनाम दंदूभ सर्प दर्शक आहे. चिल्लारे ग्रामनाम चिरीपोपट दर्शक आहे. गोंधी ग्रामनाम घ्घोरपडङ प्राणी दर्शक आहे. घोडसगांव घाटेकर्षग्राम – घोडा प्राणी दर्शक सूचविते भामपूर ग्रामनाम माशी दर्शक आहे. नटवाडे ग्रामनाम नट म्हणजे व्रात्य क्षत्रिय वाडे – प्रत्यय नाम वाडे दर्शविते.

महादेव दोंदवाडा ग्रामनाम महादेव देवता दर्शक खेदवाडा सर्व नाम – दर्शविते मांडळ ग्रामनाम सर्पविशेष मंडलक नाम दर्शविते मांजरादे ग्रामनाम मर्जारीकोंद मनुष्येत्तर नाम दर्शक आहे. होळ ग्रामनाम एडका प्राणी दर्शक आहे. त्यांचा उगम हुंड होळ – ऐडका होडूल असा झाला असावा. जळोद ग्रामनाम जल्यूकाप्रद मनूष्येत्तर प्राणीजन्म नाम दर्शविते यतीपूर वरुन जैतपूर नामाविधान लागलेले आहे. शिरपुर तालूक्यातील काकडमल ग्रामनाम कर्कट खेकडा – अभयचर प्राणीदर्शक आहे पिळोदे ग्रामनाम – पिल्लू पद, पिल्लू हत्ती – पिल्लू दर्शक नाम दर्शविते. वासर्डी ग्रामनाम वत्सतर वासरु वत्सर वाटीक नाम दर्शविते. वाघबर्डी ग्रामनाम वाघ – वाघ प्राणीदर्शक बर्डी उंच – टेकडी ठिकाण नामदर्शविते यावरुन वाघबर्डीस वाघाडी ग्रामनाम वास प्राणी दर्शक आहे. रोहिणी ग्रामनाम वास प्राणीदर्शक आहे. रोहिणी ग्रामनाम – रोहीणी – रोहीवनी (रानघोडा) नामदर्शक आहे सुळे ग्रामनाम शूलिक ससा – प्राणीदर्शक आहे. गिधाडे ग्रामनाम गृध (गिधाड) वाट गिधाड प्राणी वास्तव्य सूचक आहे. मनुष्यत्तेर प्राणी दर्शक एकुण गावे १८ आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ११.०४ टक्के आहे.

**अक्षरवर्णानुसार ग्रामनामाची सांख्यिकीय वर्गिकरण**

| अ.क्र. | ग्रामनामाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुनरुक्त पध्दतीतील ग्रामनामे | ०७ | ४.२९% |
| २ | झाडावरुन वनस्पती ग्रामनामे | ५३ | ३२.५ % |
| ३ | आदिवासी शब्ददर्शक ग्रामनामे | १५ | ९.८०% |
| ४ | मनुष्येत्तर प्राणीजन्य ग्रामनामे | १८ | ११.०५% |
| ५ | निर्जिव सृष्टपदार्थ दर्शक ग्रामनामे | ११ | ६.७४% |
| ६ | लोकनाम दर्शक ग्रामनामे | १७ | १०.४२ % |
| ७ | व्यक्ती,देवता नाम दर्शक ग्रामनामे | १० | ०६.१३% |
| ८ | उंच सखल, भौगोलिक प्रदेश दर्शक ग्रामनामे | ०४ | ०२.४५% |

**१.७ निर्जिव सृष्ट पदार्थापासुन निघालेली ग्रामनामे :–**

नदी, संगम, पत्थर (दगड) डोंगर, नाल, दही, दुध, श्रीखंड इ. घटकांवरुन गावास नाव पडलेली असतात.१० शिरपुर तालूक्यात निर्जिवसृष्ट पदार्थापासुन निघालेली ग्रामनामे आढळतात.

अभानपूर ग्रामनाम – अभ्र – अभ्रवन खानदेशातील निर्जिव सृष्टपदार्थदर्शक नाम आहे. अर्थे बु. ग्रामनाम अर्थ्य (गेरु) दर्शक आहे. गरमाड ग्रामनाम गर्तावाट – नाम – दर्शविते दहिवद ग्रामनाम दहि, दध्यावर्त नाम दर्शविते हाडाखेडा नाम हाटकखेड वरुन तर लौकी ग्रामनाम राके (खांच) नाम दर्शविते प्रस्तरवाट वरुन पाथर्डे ग्रामनाम तार्य तरीच्या नावावरुन ताजखेडे ग्रामनाम दर्शविते. चांदसे ग्रामनाम निर्जिवसृष्टी पदार्थ नाम दर्शविते प्रस्तरवाट वरुन पाथर्डे ग्रामनाम. तार्थ तरीच्या नामावरुन ताजखेडे ग्रामनाम दर्शविते. चांदसुर्य, चांदपूरी नाम निर्जिवसृष्ट पदार्थ दर्शक आहे.

गुऱ्हाडपाणी ग्रामनाम गुऱ्हाड व पाणी असपीक दर्शविते निर्जिव सृष्टपदार्थपासुन निघालेली ग्रामनामे ११ आढळतात त्यांचे प्रमाण ६.७४ टक्के आहे.

**१.८ लोक नाम दर्शक नामे :–**

शिरपूर तालुक्यात काही ग्रामनामे लोकनामदर्शक आढळतात. मामने, मोहिंदा, मुखेड, ही गावे लोकनाम दर्शक आढळतात. झेंडे अंजन ग्रामनाम लोकनाम दर्शक आहे.

फत्तेपुर ग्रामनाम मुस्लिम – बांधवाची वस्ती स्थळ दर्शविते भरवाडे ग्रामनाम लोकनाम दर्शक आहे. भटाणे नाम – भाट – नामदर्शक आहे. आसली ग्रामनाम लोकनामदर्शक आहे. भोईटी ग्रामनाम लोकनाम दर्शक आहे बुडकी विहीर ग्रामनाम लोकनाम दर्शविते गधडदेव नाम लोकमान दर्शक आहे. वाठोडा, वडलेखगांव वकवाड, वनावल, वरुळ, वाठोडे हे ग्रामनाम लोकनामदर्शक आढळतात १७ गावे आढळतात त्यांचे प्रमाण १०.४२ टक्के आहे.

**१.९ उंचा सखल भौगोलिक प्रदेश दर्शक ग्रामनामे :–**

मालापूर, ग्रामनाम माळ, मैदान दर्शक आहे. आजही हे गांव मैदाजी प्रदेशपर उंचावर आढळते. माळ शब्द पूर्वपद तर पूर नाम प्रत्यय

यावरुन मालापूर मालका तर ग्रामनाम मैदानी प्रदेश दर्शक आहे. खारीखाण ग्रामनाम खारी (चूनखडक) मातीदर्शक आहे.११

थाळनेर ग्रामनाम घ्स्थालिनिवरङ१२आतील मार्ग स्थलि – नाम दर्शविते एवढेच नव्हे तर हे गांव मध्ययुगीन कालखंडातखानदेशातील फारुखी राजवटीचे राजधानीचे ग्राम होते. सांगवी ग्रामनाम संगम – जेथे दोन नद्यांचा संगम ते सांगवी नाम नाविण्यता दर्शविते ०४ गावे आढळतात त्यांचे प्रमाण २.४५ टक्के आहे.

**१.१० व्यक्ती, देवता नाम दर्शक ग्रामनामे :–**

शिरपूर तालूक्यातील ग्रामनामांचा अभ्यास करतांना व्यक्ती, देवता, दर्शक नावे आढळतात. शिरपूर ग्रामनाम श्रीग्राम पूर श्री (देवता) पूर प्रत्यय – नाम देवता दर्शक आहे

भोरटेक ग्रामनाम भौर भूरी ऋषीच्या पूत्र, नाम दर्शविते भोर (भुरी) टेक उत्तरपद लागलेली आहे. नाथे ग्रामनाम घ्नायकङ प्रमुख नाम दर्शविते लाकड्या हनूमान ग्रामनाम देवता दर्शक आहे. खामखेडा स्कंभ ग्राम स्कंभ्र ग्रामनाम वैदिक देवता दर्शक आहे कोंडीद ग्रामनाम कुंड नावाची जातीनामदर्शक आहे भोयरे ग्रामनाम भर्व (शिव) देवता दर्शक आहे. अहिल्यापुर, अरुणापुरी ग्रामनाम स्त्री नामदर्शक आहे टेभे ग्रामनाम दक्षकन्या, नामसूचविते. या प्रकरात एकुण १० गावे आहेत त्यांचे प्रमाण ०६.१३ टक्के आहेत.

**निष्कर्ष :–**

शिरपुर तालूक्यात एकुण १६३ गावे आहेत. गाव हे प्रत्ययपद ०३ गावांना लागलेले आहे ०४ गावांना पूर शब्द लागलेला आहे (शिरपूर, फत्तेपूर, अदिलापूर, अरुणपूरी) सर्वात जास्त ग्रामनामे व व्यंजनात असून त्यांची संख्या १७ आहे. सर्वात कमी ग्रामनामे घ, य, फ, थ, झ, या ५ व्यंजनात येते त्यात प्रत्येकी ०१ गावे आहे. शिरपुर तालूक्यातील ग्रामनामे अ, भा. ऊ, या ३ स्वरात अनूक्रमे १५, ०४, ५ येतात व ०९ स्वरात ग्रामनामे येत नाहीत. (इ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अं, अं :) बूद्रक व खुर्द असलेले ग्रामनामे व ७ आहेत पेठ असलेली ग्रामनामे शिरपूर तालूक्यात आढळत नाहीत. खेडे – प्रत्यय ०५ गावांना लागलेले आहे २४ व्यंजनात ग्रामनामे येतात. १० व्यंजनात ग्रामनामे येत नाही. (छ, ठ, ड, ढ, ण, य, ष, ळ, क्ष, श) सर्वात जास्त ग्रामनामे, वृक्षदर्शक, झाडावरुन पडलेला ग्रामनामावरुन दिसतात त्यांची संख्या ५३ असुन शेकडा प्रमाण ३२.५१ टक्के आहे. शिरपुर तालूक्यातील सर्वात महत्वाचे वैशिष्टे म्हणजे या तालूक्यातील आदिवासी नाम दर्शक ग्रामनामे आढळतात त्यांची संख्या १५ असून शेकडा प्रमाण ९.८० टक्के आहे. ग्रामनामाच्या आभ्यासातुन स्थानिक इतिहास ( ) लेखनात भर पडते. ग्रामनामाचे स्थळ काही वैशिष्टे दर्शविते. प्रस्तुत संशोधनात स्थलनाम (), इतिहास (), वनस्पती शास्त्र (), व्याकरण (), समाजशास्त्र (), आदि आंतरविद्या शाखांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ सूची :**

१. www.Dhule district wikipidia. 2/12/2018 4.00 P.M
२. Dule Cansus 2011, Director of Cansus Operation Maharashtra 2011 Page 12
३. wwwdhule history com 04/12/2018 2.00 P.M
४. शिरपुर तहसिल ग्रामनाम सूची शिरपूर.
५. शिरसाठ दिपक ; पाचोरा तालुक्यातील ग्रामनामांचा अर्थ बोध एक अभ्यास अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद २७ वे अधिवेशन, म. के. गांधी महाविद्यालय कडा जिल्हा बिड प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१८ पृ. ११७
६. अत्रे त्र्य. ना.; गावगाडा वरदा बुक्स प्रकाशन पुणे, कृतीआवृत्ती १९८९ पृ. क्रं. ४६
७. ठोसर एच. आर. हिस्टोरिकल जिओग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा, इफिग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया म्हैसुर २००४ पृ.क्रं. ३३
८. नाईक वा. ना. महाराष्ट्र वनस्पती वनसंपदा महाराष्ट्र राज्य ग्रॅझिटियर दार्शनिक विभाग प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती २००६ पृ. ३९७
९. राजवाडे वि. का. महाराष्ट्र इतिहास मासिक श्रावण शके १८२६ पृ. ८७
१०. शहा. मु. भ. (संपा) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, साहित्य मंडळ प्रकाशन, धुळे १९९८ पृ. ३५७
११. जो. शी. शं. भा, जोशी वसंत, (संपा) मऱ्हाठी संस्कृती काही समस्या व्हिनस प्रकाशन पुणे द्वितीयआवृत्ती१९८० पृ. ३१
१२. जो. शी. प्र.न आदर्श मराठी शब्दकोश विदर्भ कंपनी प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती १९७० पृ. ९०२

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

# खान्देशातील सांकेतिक बोलींचा अभ्यास

**प्रा.डॉ. माधव कौतिक कदम**
पदव्युत्तर मराठी विभाग,
जी.टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार.

भाषा वैज्ञानिक गिअरसनने भारतीय भाषांचे सर्वेक्षण केले. त्यात मराठी भाषेच्या ३९ बोलींचा उल्लेख आला आहे. तरी अनेक समाजाच्व्या विशेषत: आदिवासी, भटके विमुक्त आणि समाज व्यवहारात व्यवसायाच्या निमित्ताने वापरल्या जाणाऱ्या सांकेतिक बोलींचा फारसा उल्लेख दिसत नाही. त्यामुळे समाजात अशा विशिष्ट बोली बोलणाऱ्या समाजाची जीवन विशेषांची पाहणी होणे, त्यांच्या जीवनसरणीचा अभ्यास होणे, त्यांच्या संबंधीच्या मानववंश, शास्त्रीय व समाजशास्त्रीय संशोधनाला चालना मिळणे यासाठी प्रस्तुत शोध निंबंधासाठी खान्देशातील सांकेतिक बोलींचा अभ्यास हा विष निश्चित केला आहे.

भारतात सांकेतिक गुप्त भाषा आणि लिपी यांचे प्रयोग फार प्राचीन काळापासून रुढ आहेत वुभासरित्सागर ग्रंथात सांकेतिक लिपीचा उल्लेख येतो. या लिपींना मिताक्षरी म्हटले जाते असा उल्लेखही याच ग्रंथात आला आहे. सांकेतिक शब्दांचा संख्या दाखविण्यासाठीही उपयोग करण्याची प्राचीन प्रथा आहे. शतपथ ब्राम्हण, तैतरीय ब्राम्हण, अशा ब्राम्हण ग्रंथात आणि प्राचीन भारतीय लिपिमाला या रावबहादूर पंडित गौरीशंकर, हिराचंद ओझा यांनी लिहीलेल्या ग्रंथातही तसा उल्लेख आला आहे. असे डॉ. प्रभाकर मांडे आपल्या सांकेतिक आणि गुप्त भाषा-परंपरा व स्वरुप या आपल्या ग्रंथात नमूद करतात. मात्र सांकेतिक लिपींची विकसित परिपूर्ण रूपे महानुभावीय सांकेतिक लिप्यांमध्ये दिसून येतात. कलगीतुऱ्याच्या शाहीरीतील सांकेतिक भाषा, करपल्लवी सारखी गांधळयांची भाषा लोक धर्माच्या जडणघडणीत महत्वाची ठरली आहे हे विसरुन चालणार नाही.

खान्देशात जळगाव, धुळे, नंदुरबार या तीन जिल्हयांचा समावेश होतो. या जिल्हयातील जळगाव जिल्हयात वासुदेव, गोपाळख वडार, वैदू, कैकाडी या जमातीची, धुळे जिल्हयात गोपाळ, भरवाड, शिकलगर, वैदू, वडार, खाटकी, दलाल, व्यापारी या जमातीची तर नंदुरबार जिल्हयात आदिवासी, भिल्ल, वैदू, गवळी, खाटीक, शिकलगर, कंजरभाट अशा जमातीची वसतीस्थाने आहेत. या साऱ्यांची विशिष्ट बोली असून जात पंचायतीत सांकेतिक बोलींचा वापर केला जातो. याशिवाय नंदीबैल वाल्यांची भाषा, गोंधळयांची करपल्लवी, वाघाभाषा, मुलांची सांकेतिक बोली, भविष्यकथन, व्यापारी, दलालांची गुप्त बोली या साऱ्यांचे संशोधन व अभ्यास महत्वाचा आहे. त्यांच जतन, संवर्धन होणे आपल्या संगणकीय काळात आवश्यक आहे. कारण गेल्या काही वर्षात सर्वच समाजात उपेक्षीत जमातींमध्ये शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार होऊ लागला आहे. सारे मिळून शिकू या, सर्वांसाठी शिक्षण, सर्व शिक्षा अभियान, शिक्षणाचा अधिकार या माध्यमातून शिक्षणासंदर्भात जनजागृती झाली. उपेक्षित समाजाला नागरी जीवनाचा परिचय झाला, त्यांच्या त नागरी जीवनाविषयी आढे निर्माण होऊन गावखेडयापासून शिक्षण, व्यवसाय, व्यापार, नोकरी निमित्त शहरात येऊ लागले, त्यामुळे त्यांचे सामाजिक मूल्ये बदलू लागली. राहणीमान, जीवनाच्या आशा-आकांक्षा, विचार पध्दती, जीवनमूल्ये, बोली यात आमुलाग्र बदल होऊ लागलेत. पारंपारिक समाजाजीन आणि बोलीभाषा यात बदल होऊ लागलेत; आजच्या पिढीत तर पारंपारिक बोलीही नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, म्हणून ती बोली समजून घेणे तीचे सर्वेक्षण करणे, सांकेतिक बोलींचा अर्थ समजून घेणे, त्या नामशेष व्हायच्या आधीच त्यांचे सर्वेक्षण होऊन पुढील पिढीला हा वारसा सुपूर्द करणे महत्वाचे आहे. यासाठी सदर संशोधन पेपर मध्ये खान्देशातील सांकेतिक बोलींचा अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

आमच्या लहाणपणी प्रचलीत व्यवहार भाषेतील शब्दांच्या वर्णांमध्ये बदल करुन व त्यात एखादा वर्ण वाढवून ही भाषा तयार केली जायची. या वर्णीय बदलामागे एक समान सूत्र उच्चाराच्या दृष्टीने निश्चितपणे पाळले जायचे. हे सूत्र कळले की सांकेतिक भाषा सहज कुणालाही कळू शकते अशी तिची स्थिती होती. उदा. एखाद्या शब्दाच्या प्रारंभी च हा वर्ण लावून व त्यातील वर्णांची उलटापालट करुन म्हणजे मुळ शब्दातील प्रारंभीचा वर्ण शेवटी उच्चारुन ही भाषा बोलली जायची. जसे

च ची भाषा - चरेका चतु चठेको चयाग चताव्ह?

अहिराणी अर्थ- कारे तू कोठे गया व्हता?

मराठी अर्थ- काय रे तू कुठे गेला होता?

- चमी चळामाशा चयतुग भू
- मी शाळामा गयतु भू
- मी शाळेत गेलो होतो
- चतुचयका चवणजे चरक?

- तू काय जेवण करं?
- तू काय जेवण केले?

अशा पध्दतीची च ची सांकेतिक भाषा बोलली जायची. आज ही भाषा कुठेही बोलताना खेडेगावात दिसत नाही. असेल तर ती नाममात्र आहे. म्हणून अशा सांकेतिक भाषेचे जनत, संवर्धन होणे गरजेचे आहे.

आमच्या लहानपणीच गोंधळी अथवा नंदीबैलवाले परंपरागत चालत आलेल्या 'करपल्लवी' या गुप्त भाषेचा वापर करुन संकेताच्या आधारे समोरच्याचे नाव बरोबर सांगत असत. समोर उभ्या असलेल्या आपल्या सहकार्याला हातांनी खुणा करुन, वस्तु वा नावाचा बोध होईल अशी ती खुण वापरुन अचूक नाव सांगितले जायचे. अर्थात त्यासाठी त्यांनी खाणाखूणांची एक स्वतंत्र वर्णमाला तयार केलेली असते. उदा. द म्हणजे दऊत, दोन बोटे वाकडी केली म्हणजे ल व त्यावरुन सिंग हा शब्द ओळखला जायचा. एक वाकडे बोट केले की-२ हे वर्ण समजले जायचे व त्यावरुन असलेली नाव पुढील खुणांवरुन अचूक सांगत असत. हाताचे आळे करुन सांगितले म्हणजे ळ हे वर्ण व त्यावरुन सुपडू या नावासारखे नाव सूचित करत.

नंदीबैलवाले गुबूगुबू असा ढोलकी, नालच्या माध्यमातून आवाज करत बैलाला विशिष्ट प्रकारे मानेची हालचाल करण्याचे शिकवतात. उदा. सरळ जा, मागे ये, पुढे जा, डाव्याबाजूला वळसा घे, उजव्या बाजूला जा या सुचनांसाठी विशिष्ट ठैवण्याचा उपयोग करुन संकेत देतात.

गोपालाची भाषा ही कृषीजीवन आणि पशुपालन व्यवसायाशी निगडीत असून त्यांच्या सांकेतिक भाषेत स्त्रीला जनावर, वगार, जमीन किंवा शेत म्हटले असून त्यासंबंधी सर्व सांकेतिक भाषा जातपंचायतीत वापरतात. उदा. बरड जमीन- वांझोटी स्त्री, जमीनीचा मालक म्हणजे- नवरा, जनावर खुटयावर आहे. म्हणजे स्त्रीला नवरा आहे, जनावर रानात आहे- म्हणजे स्त्री स्वैराचारी आहे, आणि जनावर दावणीला आहे- म्हणजे स्त्री नवऱ्याच्या घरी आहे. जातपंचायतीत असे शब्द वापरल्याने तिथे बसलेल्या नवनी माणसाला जमीन/जनावर विषयी चर्चा सुरु आहे असे वाटते. म्हणून गुप्त, सांकेतिक भाषेमुळे इतरांना माहिती कळत नाही. खान्देशात सर्वत्र गुरांचे बाजार भरतात. या बाजारात गुरांची खरेदी-विक्री व्यवहारात दलाल लोकांची विशिष्ट सांकेतिक भाषा आहे. व्यवहार करण्यासाठी बऱ्याचदा ते रुमालाखाली हात टाकून बोटांच्या सहाय्याने बोली सांगतात. गुप्त भाषेतून व्यवहार होतो पण इतरांना ते कळत नाही. शिवाय व्यवहार करताना रुपयाला विशिष्ट नावाने वापरतात. उदा. ५० रु. निमा, १०० रु, शिकारा, २०० रु. डुबरा, ३०० रु. टिपरा, ५०० रु. कपडा, १००० रु. ठोकणी, ११ हजार घागर, १२ हजार, जोड आकार, १५ हजार खम्मस, १६ हजार रोला अशी सांकेतिक भाषा वापरल्याने आपल्याला व्यवहार कळत नाही. शिवाय बस्तरी करु नको कल्लक चालनी जाई सारख्या वाक्यातून सौदा घडवून टाक नाहीतर गिऱ्हाईक चाललं जाईल असे सुचीत होते.

वैदू आणि वडार सारख्या जमातीची भाषाही सांकेतिक स्वरुपाची वाटते ते तेलगू भाषा बोलत असले तरी तेलगूपेक्षाही निराळी गुप्त भाषाही ते बोलतात. त्याला पारसी भाषा म्हणतात. वडार बोली आपल्याला कळत नाही. उदा १ = आकटी, २= रोड, ३= मुळ, ४= नालग, ५= आलंद, १०= फदी, २०= इस्वाय, ३०= पुपाय १००= नुर या सारखे संख्या वाचक शब्द आपल्याला कळत नाहीत. शिवाय मुलगा- मोगाबीडा, मुलगी- आनबुडा, बाप- आरया, आई-अम्मा, भाऊ-तम्मूड, बहिण- शेल्याल अशी भाषा वापरल्याने आपल्याला नातेसंबंधाचा उलगडा होत नाही.

अर्थात या साऱ्या भाषांचे जतन आणि संवर्धन झाले पाहिजे. त्यातील अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुढच्या पिढीपर्यंत या सांकेतिक भाषा पोहचल्या पाहिजेत. याचा उजाळा करण्यासाठी हा खटाटोप आहे.

**उद्देश:-**

१) पारंपारिक बोली लुप्त होऊ नयेत.
२) सांकेतिक भाषा पुढच्या पिढीपर्यंत पोहचल्या पाहिजेत व त्यातील अर्थभेद कळला पाहिजे.
३) आपल्या जातीतील, समाजातील काही गुप्त व्यवहार टिकवून ठेवण्यासाठी, गुप्तता पाळण्यासाठी सांकेतिक भाषा म्हत्वाच्या आहेत.
४) अशा भाषांचा अभ्यास केल्यास समाजशास्त्रीय संशोधनाला चालना मिळेल.

**संदर्भ सूची :**

१) सांकेतिक आणि गुप्त भाषा- परंपरा व स्वरुप, डॉ. प्रभाकर मांडे, सविता प्रकाशन, औरंगाबाद
२) लोक सरितेच्या अमृतधारा- श्री. डॉ. दा.गो. बोरसे, गिरीजा साहित्य प्रकाशन, नागपूर
३) महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती- डॉ. एस.जी. देवगावकर, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
४) अधिकार कौतिक पाटील- मु. पो. तऱ्हाडी ता. शिरपूर
५) सुकलाला प्रभू गायकवाड- मु. पो. खामगाव ता.जि.नंदुरबार
६) विकास संतोष गायकवाड- मु. पो. मुक्ताईनगर, ता. एदलाबाद

‘RESEARCH JOURNEY’ *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# भारताच्या संरक्षणात खान्देशचे योगदान महत्त्वपूर्ण

**प्रा.डॉ. देवेंद्र विसपुते**
प्रमुख, संरक्षण आणि सामरिक अभ्यास विभाग,
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

**प्रस्तावना :**

खान्देशातील धुळे व जळगाव हे जिल्हे आपली भूमिका बजावितांना दिसत आहेत. संपूर्ण उत्तर महाराष्ट्राचा विचार करता नाशिकचा हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडचा लढाऊ विमान निर्मितीचा कारखाना, देवळाली येथील आर्टिलरी सेंटर, अहमदनगरचे रणगाडा प्रशिक्षण केंद्र याबरोबरच वरणगांव व भुसावळ येथील आयुध निर्माणी हे शस्त्रनिर्मिती करणारे कारखाने आणि उत्तर महाराष्ट्रातून जाणारे रस्ते आणि लोहमार्ग भारताच्या संरक्षण व्यवस्थेत मेरुदंडाची भूमिका बजावितांना दिसत आहेत.

नाशिकच्या भोसला मिलिटरी स्कूलसह मोराणे, अमळनेर, भुसावळ व अहमदनगर येथील सैनिकी शाळा देशाच्या संरक्षण दलांना नीडर आणि प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करुन देताना दिसत आहेत. धुळ्याजवळील कापडणे, चाळीसगावजवळील वाडे–गुढे ही गावे राष्ट्र रक्षणासाठी प्रसंगी प्राण अर्पण करण्यास तयार असलेली तरुणांची फळी राष्ट्रासाठी अर्पण करीत आहेत. मुंबई या औद्योगिक नगरीला उत्तर भारताशी जोडणारा मुंबई आग्रा महामार्ग क्र. – ३, भारताची पूर्व – पश्चिम टोके जोडणारा नागपूर – सुरत महामार्ग क्र. – ६ त्याचप्रमाणे पुणे – मुंबई – मनमाडमार्गे दिल्लीकडे आणि सुरत – नागपूरला जाणारा रेल्वेमार्ग यामुळे खान्देशला राष्ट्ररक्षणाच्या मानचित्रात सामरिक महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

**उद्देश :**

१. भारताच्या संरक्षणात खान्देशच्या भूमिकेचे अध्ययन करणे.
२. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील खान्देशच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्य :**

१. भारताच्या भूराजकीय व भूसामरीक स्थान तसेच दळणवळणाचा विचार करता भारताच्या संरक्षण व्यवस्थेत खान्देशचे स्थान अनन्यसाधारण असेच आहे.
२. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील खान्देशच्या योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**नाशिकचे स्थान मोलाचे –**

लढाऊ विमानांचा कारखाना व विमान चाचणी केंद्र, तोफखाना प्रशिक्षण केंद्र आणि कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूल यामुळे नाशिकला देशाच्या संरक्षणाच्या दृष्टिने असाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. देशाच्या फाळणीनंतर देवळाली येथे सुरु झालेल्या तोफखाना प्रशिक्षण केंद्र व ओझर येथील ‘एच्. ए. एल्.’चा विमानोद्योग यामुळे हे गाव आणखीनच प्रकाशात आले. १९६२ चीन युध्दात झालेल्या दारुण पराभवामुळे देशात संरक्षणाबाबत जागरुकता निर्माण झाली. संरक्षणमंत्री बनलेल्या यशवंतराव चव्हाण यांनी देशाची सरंक्षण व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टिने अनेक महत्त्वाकांक्षी पाऊले उचलली. त्याअंतर्गत सोव्हिएत रशियाच्या सहकार्याने नाशिक येथे १९६४ मध्ये हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड या कारखान्याची उभारणी करण्यात आली. मुंबई – आग्रा महामार्गावरील नाशिकजवळील ओझर येथे हा महत्त्वपूर्ण प्रकल्प सुरु करण्यात आला.

गेल्या चाळीस वर्षात ओझर मिग कारखान्यातून ७०० पेक्षा अधिक लढाऊ विमानांचे उत्पादन करण्यात आलेले आहे. त्यात मिग श्रेणीच्या विविध प्रकारच्या विमानांचा समावेश आहे. यामध्ये मिग –२१ एफ. एल., मिग –२१ एम्., मिग –२१ बिस ही बहुउद्देशीय इंटरसेप्टर विमाने तसेच भूवेधी हल्ल्यासाठी उपयुक्त असलेले मिग –२७ विमानांचा समावेश आहे. वर्षाला सुमारे तीस विमाने बनविण्याची क्षमता या सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्याची आहे. याच्याच जोडीने के –१३ क्षेपणास्त्रांची निर्मितीही येथून केली जाते. एकविसाव्या शतकात भारतीय वायुसेनेचा कणा ठरलेल्या सुखोई – ३० एम. के.– १ या विमांनांची निर्मिती येथून केली जाते.१

मिग –२९ विमानांची दुरुस्तीदेखील येथे करण्यात आली. ओझर मिग कारखान्यात केवळ विमानांची निर्मितीच केली जात नाही, तर विमानांची दुरुस्ती, जुळणी व सुट्या भागांचा पुरवठादेखील केला जातो. कालबाह्य होत जाणाऱ्या विमानांचे आधुनिकीकरण करण्याचे कामही येथे केले जाते. सोबतच आजवर सुमारे १३०० विमानांची दुरुस्ती व देखभालही येथे करण्यात आलेली आहे. मेटॅलिक ड्रॉप इंधन टाकी, पायलटचे इजेक्शन सिट, विमानाची कॅनोपी आदी बाबीही येथे बनविल्या जातात. दर्जेदार कामातून या कारखान्याने – ९००१ हा दर्जाही प्राप्त केलेला आहे. ते विमानांची चाचणी घेणे व नागरी वाहतुकीबरोबरच भारतीय वायुसेनेचा बेस रिपेअर डेपोचीही भूमिका बजावितात.

भारतीय वायुसेनेला सुसज्ज ठेवण्याच्यात खूप मोठी भूमिका ओझर मिग बजावितो.

**तोफखाना प्रशिक्षण केंद्र देवळाली –**

देवळाली येथील तोफखाना प्रशिक्षण केंद्र आशियातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे तोफखाना प्रशिक्षण केंद्र आहे. स्वातंत्र्यापूर्वी क्वेटा येथे तोफखाना प्रशिक्षण केंद्र होते. १९४१ मध्ये देवळाली येथे गनर्सची स्थापना करण्यात आली. त्याचे मुख्यालय देवळाली बनले. स्वातंत्र्यानंतर देवळाली हे भारतीय स्थलसेनेच्या तोफखाना विभागाचे मुख्य प्रशिक्षण केंद्र बनले. १०५ मिमी इंडियन फिल्ड गनपासून विविध प्रकारच्या उखळी तोफा, १३० मिमी तोफ, १५५ मिमी बोफोर्स हॅवित्झर गन या सर्व प्रकारच्या तोफा चालविण्याचे प्रशिक्षण तोफखानादलातील जवान व अधिकाऱ्यांना येथे दिले जाते.

**हेलिकॉप्टर प्रशिक्षण केंद्र–**

नाशिकरोड येथे स्थलसेनेच्या वायुशाखेचे हेलिकॉप्टर प्रशिक्षण केंद्रही (      – .....) आहे. स्थलसेनेच्या वायुशाखेच्या दृष्टीने ते अतिशय महत्त्वपूर्ण आहे. स्थलयुध्दात हेलिकॉप्टर खूप महत्त्वपूर्ण कामगिरी बजावू शकते. शत्रूच्या रणगाडा दलाला रोखणे, आपल्या तोफखाना तसेच चिलखती दलांना मार्गदर्शन करणे याशिवाय सैनिक व कमांडोंना गुंतागुंतीच्या मोहिमांसाठी नेणे व वाहतूक यासारखी कामगिरी ते करतात. हे सर्व प्रशिक्षण येथे दिले जाते.

**आयुध निर्माणी –**

खान्देशातील दोन आयुध निर्माणी (ऑर्डनन्स फॅक्टरीज) देशाच्या संरक्षण व्यवस्थेचा कणा आहेत. सैन्य पोटावर चालते आणि दारुगोळ्याच्या मदतीनेच लढते. या दारुगोळ्याच्या निर्मितीचा बराच मोठा भार जळगाव जिल्ह्यातील वरणगावच्या ऑर्डनन्स फॅक्टरीत (आयुध निर्माणीत) उचलला जातो. वरणगावच्या आयुध निर्माणीत भारतीय स्थलसेना, इतर सेनादल, अर्धसैनिक दल व पोलिस दलासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या छोट्या शस्त्रास्त्रांचा दारुगोळा – म्हणजेच कार्टरिज् बनविल्या जातात. त्यात ७.६२ मिमी, ५.५६ मिमी, एके –४७ व एके – ५६ बंदुकीच्या गोळ्या, ए–७ मार्क–२, १२.७ मिमी, १६ मिमी सिग्नल बुलेटस् व ट्रेसर बुलेटस् अशा नानाविध गोळ्यांची निर्मिती केली जाते.२ तापी नदीच्या काठावरील भुसावळ हे भारतातील रेल्वेचे प्रमुख केंद्र म्हणून भारतभर प्रसिध्द असून तेथेही आयुध निर्माणी आहे. येथील आयुध निर्माणीत वेगवेगळ्या दारुगोळ्यांचे कव्हर्स बनविली जातात. याबरोबरच पिनाका या क्षेपणास्त्राचे पॉडही येथे बनविले जाते.३ वरणगाव व भुसावळ येथील या आयुध निर्माणी भारतातील ४१ आयुध निर्माणींपैकी महत्त्वपूर्ण अशाच आहेत. महाराष्ट्रात एकूण १० कारखाने आहेत. उत्तर महाराष्ट्राचे देशातील मध्यवर्ती स्थान ध्यानात घेऊनच या आयुध निर्माणींची येथे उभारणी करण्यात आलेली आहे. येथेही स्व. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानावे लागेल

**सैनिकी शाळा –**

सैन्याला दारुगोळा किंवा इतर शस्त्रसाधनांसोबतच सर्वाधिक गरज असते, ती कुशल मनुष्यबळाची. नागरिकांमधूनच शूर व पराक्रमी सैनिकांची व अधिकाऱ्यांची भरती होत असते. सैनादलांची गरज पूर्ण करण्यासाठी अशा प्रकारचे कुशल मनुष्यबळ उत्तर महाराष्ट्रातील काही सैनिकी शाळांमधून बाहेर पडते. भारतीय स्थलसेना व इतर सेनादल तसेच सीमा सुरक्षा व अंतर्गत सुरक्षा चोख ठेवणारी अर्धसैनिक दले, पोलिस दलातील निधड्या छातीचे जवान व अधिकारी घडविण्याचे काम या सैनिकी शाळा करतात. डॉ. बा. शि. मुंजे यांनी १९३५ मध्ये राष्ट्रजीवनातील सशस्त्र दलांचे महत्त्व ओळखून सेन्ट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीची स्थापना नाशिक येथे केली. दोनच वर्षात १२ जून १९३७ ला या संस्थेने नाशिकला भोसला मिलिटरी स्कूलची स्थापना केली. मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर सर रॉजर लम्ले यांच्या हस्ते या सैनिकी शाळेची पायाभरणी करण्यात आली. ही देशातील पहिली सैनिकी शाळा होती. या संस्थेने कालांतराने भोसला मिलिटरी कॉलेज सुरु केले. या संस्थेत छात्रांना एन.सी.सी. व संरक्षण शास्त्र विषय अनिवार्य असतो.

धुळ्याजवळील मोराणे येथील राजे संभाजी मिलिटरी स्कूल, भुसावळचे बियाणी मिलिटरी स्कूल आणि अमळनेर येथील विजय नाना आर्मी स्कूल, नंदूरबारजवळील पथराई येथील के. डी. गावित सैनिकी विद्यालय व अहमदनगर येथेही मिलिटरी स्कूल आहे. देशाच्या संरक्षण दलांमध्ये मोठी कामगिरी बजाविण्याची उर्मी मनात घेऊन येथून अनेक विद्यार्थी बाहेर पडतात. देशाची अंतर्गत सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था कायम राखण्याची जबाबदारी पोलिस दलावर असते. महाराष्ट्र पोलिस दलाच्या नकाशात नाशिकची महाराष्ट्र पोलिस अकादमी व धुळ्याचे राज्य राखीव पोलिस दलाचे प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र पोलिसांच्या प्रशिक्षणाचा कणा मानला जातो. एस. आर. पी. चे जवान व पी.एस.आय.पासून पोलिस उपअधीक्षक रँकच्या अधिकाऱ्यांना येथे प्रशिक्षण मिळते.

**सामरिक महत्त्वाचे रस्ते आणि लोहमार्ग –**

युध्दात व सामरिक डावपेचांमध्ये रस्ते तसेच लोहमार्गांना खूपच महत्त्व असते असते. वाहतूक व दळणवळाच्या साधनांमुळेच युध्दाची गती () वाढते. भारताचा नकाशा बारकाईने बघितल्यास त्यात उत्तर महाराष्ट्राला मध्यवर्ती किंवा केंद्रीय स्थान असल्याचे सहज लक्षात येते. प्राचीन काळापासून उत्तरेकडून दक्षिणेत जाण्यासाठी आसिरगढ (बऱ्हाणपूर) आणि बिजासनी घाट हे दोनच मार्ग होते. त्यामुळे उत्तर

महाराष्ट्रातील या दोन्ही मार्गांचा उपयोग खूपच प्राचीन काळापासून होतो आहे.

भारताची पूर्व – पश्चिम व उत्तर – दक्षिण टोके जुळवण्याचे कामही या क्षेत्रातून जाणाऱ्या महामार्ग व लोहमार्गामुळे होते. त्यात सुमारे दोनशे वर्षांपासून म्हणजे ब्रिटिश काळापासून संपर्क व दळण-वळणाचे काम चोख बजाविणारा मुंबई – आग्रा महामार्ग खूपच महत्त्वपूर्ण ठरतो. प्रख्यात आग्रा महामार्ग मुंबईला उत्तर भारताशी व देशाची राजधानी दिल्लीला जोडतो. आर्थिक व औद्योगिक दृष्टिने आणि देशातील सर्वात महत्त्वाचे बंदर म्हणून मुंबईला महत्त्व आहे. त्या अनुषंगाने मुंबई – मनमाड – भुसावळ – भोपाळ व झाशीमार्गे दिल्ली हा लोहमार्गही खूप महत्त्वाचा आहे. तोही उत्तर महाराष्ट्रातूनच जातो. याच मार्गे थेट काश्मीरपर्यंत व पंजाब सीमेपर्यंतही जाता येते.

भारताचे पूर्व – पश्चिम टोके जोडणारा महामार्ग क्र – ३ त्याचप्रमाणे अहमदनगर – औरंगाबाद – जळगावमार्गे मध्यप्रदेशमध्ये जाणारे मार्ग, सुरत – भुसावळ ते कलकत्ता हा लोहमार्ग याच क्षेत्रातून जातात. दक्षिणेकडून गुजराथ व राजस्थानात जाणारे मार्गही उत्तर महाराष्ट्रातूनच जातात. देशाच्या उत्तर, दक्षिण व पूर्व पश्चिम सीमांवर आणि सागरी किनाऱ्यांवर जाण्यासाठी हे मार्ग खूपच महत्त्वाचे आहेत. एकंदर देशाच्या दळणवळण व संपर्क प्रणालीतही उत्तर महाराष्ट्राची भूमिका पाठिच्या कण्याप्रमाणेच आहे.

खान्देशवर १३७० ते १६०० फारुकी घराण्याने राज्य केले. त्यानंतर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण होईपर्यंत मोगलांचे राज्य होते. १८१८ पासून इंग्रजांची राजवट सुरु झाली. भिल्लांचीही राज्ये येथे होती. परंतु कोणीही येथे शस्त्र निर्मिती केली नाही. दळवळणाचे मार्ग मात्र येथूनच होते. दिल्ली किंवा उत्तरेकडून दक्षिणेकडे आसीरगड व बिजासन या मार्गाने तर सुरतहून बऱ्हाणपूर अशी पश्चिम पूर्व वाहतूक मोठ्या प्रमाणात या क्षेत्रातून होत असे. प्रामुख्याने बंजारा जातीचे लोक ती करीत.४ होळकरांनी किंवा शिंदे यांनीही या भागात शस्त्र निर्मिती केली नाही. यशवंतराव होळकरांनी १८१५ च्या सुमारास तोफा व दारुगोळा बनविला, पण तो मध्य प्रदेशात.

खान्देशात मोठ्या प्रमाणात मध्य प्रदेश सीमेवर व सीमेपलीकडे अवैध शस्त्रास्त्र निर्मिती चालते. चोपडा तालुक्यात मध्य प्रदेशच्या सीमेपलीकडे उमर्टी या गावी आज आधुनिक शस्त्रेही मिळू शकतात. प्रामुख्याने शिकलकर समाजाचे लोक ती बनवितात.५ खान्देशातील आदिवासीही त्यांची शस्त्रे प्रामुख्याने मध्य प्रदेशातूनच आणतात. शिकलकर, लोहार व पांचाळ जातीचे लोक सामान्यपणे शेतीची अवजारे व शस्त्रे बनवितात. खान्देशातील शस्त्रनिर्मितीविषयी ठोस अशी माहिती संशोधकाला मिळू शकली नाही. कॅ. जॉन ब्रिग्जने भिल्लांचे बंड मोडून काडतांना ते सातत्याने उठाव करीत राहतील म्हणून मन वळविण्याच्या धोरणानुसार भिल्ल कोअरची स्थापना केली.६ पण इंग्रजांकडूनही येथे कोणतीही शस्त्रनिर्मिती झाली नाही.

**निष्कर्ष :**

भारताच्या संरक्षण व्यवस्थेत व संपर्क व्यवस्थेत प्राचीन काळापासून खान्देशला महत्त्वाचे स्थान आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात ब्रिटिशांनी भुसावळ येथे लष्करी साधानांच्या निर्मितीला सुरुवात केली. परंतु त्यांचे हे प्रयत्न शस्त्रनिर्मितीसाठी फारच अपुरे होते. चीन युध्दानंतर संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रयत्नांची खऱ्या अर्थाने उत्तर महाराष्ट्रात शस्त्रनिर्मिती सुरु झाली. देशाच्या संपर्क व दळणवळण प्रणालीत मात्र खान्देशला महत्त्वाचे स्थान आहे. देशाची चारही टोके येथील रस्ते व लोहमार्गांनी जोडली जातात. फारशी माहिती मिळत नसली, तरी खान्देशातील प्राचीन व ऐतिहासिक काळातील शस्त्रनिर्मितीवरील संशोधनास मात्र आजही बराच वाव आहे.

**संदर्भ सूची :**

१. www.hal.gov.in
२. www.ofbindia.gov.in.units/indext
३. कित्ता.
४. झेंडे संजय, खान्देश विषयाचे अभ्यासक व पत्रकार धुळे. (मुलाखत, दि. २९/११/२०१८)
५. पाटील अनिल, पत्रकार, जळगाव. (मुलाखत, दि. २९/११/२०१८)
६. Kayande Shyam, Popular Resistance to British Rule in North Maharashtra (1818-1885), Kasb Publication, Jalgaon. 1998. P. 46-47.

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# भोई समाजातील संस्कार पद्धती : समाजशास्त्रज्ञानाच्या परीप्रेक्ष्यातून

**वैशाली अशोकराव निकम**
संशोधक विद्यार्थी,
कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

**प्रास्ताविक**

आजपर्यंत माहित असलेल्या सर्वच संस्कृतीमध्ये प्रत्येक व्यक्तीचा मृत्यू व मृत्यूसंस्कारांशी संबंध आलेला आहे. प्रत्येक माणसाला हा कल्पनांचा वारसा मृतात्म्याच्या संस्कारासबंधी असणाऱ्या क्रिया व कल्पना व कर्तव्य या सबंधित ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेल्या दिसून येतात. सर्व प्रकारच्या समाजामध्ये असणाऱ्या अंत्यसंस्काराच्या बाबतीत विविधता आढळून येते. सर्व प्रकारच्या संस्कृती मृतसंबंधी कर्तव्याच्या मर्यादा बांधलेल्या असतात. अंत्यविधी व अंत्यसंस्कार यांच्या मुळाशी मानसिक व सामाजिक कारणे असतात. मानवी जीवनाचा शेवट म्हणजे मृत्यू हा मनावर खोल परीणाम करणारा घटक आहे. मृताची विल्हेवाट लावण्याचे साधारण सहा प्रकार आस्तित्वात आहे.

१. स्वत:च्या घरात, अंगणात, शेतात, स्मशानभूमीत, दगडी गुहेत, झाडाच्या ढोलीत मृतास बसवून किंवा निजवून पुरतात.
२. काही रानटी जमातीत मृताचे नातेवाईक शरीराचे मांस भक्षण करून संपवितात. उदा. आस्ट्रेलिया, आफ्रिका , द.अमेरिका वन्य जमातीत ही पद्धत आढळते.
३. जलात विसर्जन करण्याची पद्धती
४. मृतदेह जसाच्या तसा टिकविण्याची प्रथा, पाऊसपाणी नसलेल्या वाळवंटी प्रदेशात जमाती कोरडया वाळूत खा खणून मृत देहाला ठेवतात.
५. मृतदेह जाळण्याची प्रथा
६. मैदानात, विहीरीत, जंगलात वा रचलेल्या वेदीवर मृत देहाचे विसर्जन करण्याची प्रथा.१

अंत्यक्रियेलाच संस्कृतमध्ये 'और्ध्वदेहीक' म्हणतात. प्रेत घरातून बाहेर काढण्यापासून या क्रियेचा प्रांरभ होतो. प्रेतवहनासाठी प्रयोगकार शिबीका सांगतात. शिबीका म्हणजे पालखी होय. सध्या प्रेत तिरडीहून नेतात ते उताणे निजवतात. प्रेतापुढे अग्नी नेण्याची वहिवाट बहुतेक जातीत आढळतो. जो क्रिया करणारा असतो तो अग्निचे मडके हातात धरतो.

'शव प्रच्छादिनमुखं प्राकशिरस् दाहदेशं नयेयु:' म्हणजे प्रेताचे मुख आच्छादित करून व मस्तक पुर्वेकडेस करून श्मशानात न्यावे. असे धर्मसिंधू सांगतो. पण रूढी मात्र यापेक्षा वेगळया आढळून येतात. पुरूषाचे, सवाष्णीचे तोंड उघडे ठेवून नेतात ते कारण उघडया तोंडाने स्मशानात जाणे हे पुरूषार्थाचे लक्षण मानले जाते. पुत्र वा आप्त क्षौर करतात. अग्नी मडक्यात ठेवून ते मडके शिंक्यात ठेवून प्रेतयात्रेत अग्रभागी चालतात. श्राद्धाचा अधिकारी आप्त नसल्यास संमत्रक दहन न करता अमंत्रक अग्नी देतात त्यास 'भडाग्नी' म्हणतात.२ अशा सर्वसामान्य पद्धती अंत्याविधीच्या आढळून येतात. खान्देशात अनेक जाती-जमाती आढळून येतात त्यात साधारणता धुळे, नंदूरबार, जळगाव जिल्हयात आढळून येणाऱ्या भोई या जातीतील अंत्यसंस्कार पद्धतीचा अभ्यास समाजशास्त्राच्या परीप्रेक्ष्यातून केलेला आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा-**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने ना.गो.चाफेकर Cultural Heritage of India (1958) Bendann Effie : An Analytical Study of Burial Rites, New York (1930) Polson C.J. The Disposal of the Dead : New York (1959) भीमराव चव्हाण : उपलाणी (२००९) जाधव रमेश भटक्या विमुक्तांचे परिप्रेक्ष्य (२०१३) यांनी अभ्यास केलेला आहे व अंत्यविधीच्या बाबतीत वर्णने नोंदविलेली आहे.

**गृहीतके -**

१. अंत्यविधीसंबंधी प्राचीन परंपरांची माहिती जाणून घेणे.
२. भोई व जातीतील अंत्यविधीची पद्धत जाणून घेणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी मुलाखत व ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अनुषंगाने संदर्भ पुस्तके, संशोधने यांचा अभ्यास करण्यात आला आहे. भोई ही जात भारतभर आढळते. त्यांना मेणा किंवा पालख्या वाहणारे लोक असेही म्हटले जाते. पूर्वी संदेशवहनाच्या कार्यातही त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. धनिकांचे व राजेमहाराजांचे निरोप देण्याचे काम करत असल्यामुळे त्यांना बक्षिसेही दिली जात. डोली वाहून नेण्याऱ्या भोईंना राजभोई असे म्हणतात. मुंबई इलाख्यात साधारणता पाच गट

पाडले जातात.३ यात खारे भोई, मच्छिंदर, पालेवार, मल्लाह, अनार, कहार, बेंदारे, झिंगा भोई, नावाडी भोई, राजभोई, केवट, दिगोरे या पोटजाती आढळतात.४ वेगवेगळया राज्यात त्यांना वेगवेगळी नावे आहेत. उदा. मध्यप्रदेश (केवट) आंध्र प्रदेश (तारू) भोई ही सर्वस्वी हिंदू धर्मीय रितीरिवांजाचे पालन करतांना आढळून येते. महादेव, मारूती, विठोबा या देवांची पूजा ते करतात.५ शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाल्यामुळे महाराष्ट्रात पुणे, नगर, सातारा, सोलापूर या जिल्ह्यात आस्तित्व आढळून येते.

| | | |
|---|---|---|
| | १.मराठा भोई | खास (खुद्द भोई) |
| | | वराधी (वऱ्हाडी भोई) |
| | | काड (कडू भोई) |
| | २.खानदेशी भोई | मयायर्ता |
| | | तरक्षा |
| | | धिमार |
| मुंबई इलाख्यातील भोईचे पाच गट ६ | ३.कर्नाटकातले | कोळी |
| | | कार |
| | | मसंदे |
| | | परतगी |
| | ४.कानडातले भोई | बकोरिया |
| | ५.गुजराथी भोई | गुडिया |
| | | कार |
| | | धिमार |
| | | भेला |
| | | पुरविया |

यांचे वरील पोटभेद व त्या अनुषंगाने रोटीबेटी व्यवहाराबाबत सामाजिक निर्बंध आढळून येतात. भोई समाजात मृतात्म्यावर अग्नी संस्कार केला जातो. यातील खानदेशी भोई अहिराणी भाषा बोलतात. पालख्या वाहण्या बरोबर शेंगदाणे, चणेफुटाणे भाजणे, शेतमजूरी , अल्पभूधारक शेतकरी असणारे भोई शेतजमीनही कसतात. खानदेशी भोई आपली गोत्र  सांगतात देवक एक असेल तर विवाह टाळतात.७ अत्यंविधिच्या बाबतीत जाळणे व पुरणे या दोन पद्धती आढळून येतात.

लहान मुलांना पुरतात. प्रेत ताटीवर नेतात. तिसऱ्या दिवशी श्राद्धविधी करतात. अस्थीचे विसर्जन जलाशयात करतात. राख सावरण्याचा विधी करतात. तेराव्याच्या दिवशी आप्तेष्टांना जेवण देतात. ८ वर्षातून दोन वेळा पितरांची पूजा केली जाते. त्यावेळी मृतात्म्यांचे आवडते जे कोणतेही पदार्थ असतील ते बनविले जातात. ९ विवाहित पुरूष वारल्यास त्या महिलेच्या जोडव्याचे पतीच्या नावाने टाक बनवून ते घरात ठेवतात. १० भोई समाजात भूत, प्रेत, पुनर्जन्म यावर या जातीतील लोकांचा विश्वास आढळून येतो. मृतदेहाचे चितेत पूर्ण दहन झाल्यावर श्मशानात गेलेले आप्तेष्ट परत फिरतात ते मागे वळून पाहत नाहीत. बाहेरचे लोक पुनश्च मृताच्या घरात येतात मरणाच्या जागी जातात व मगच आपापल्या घरी जातात. प्रेताबरोबर गेलेल्या सर्व लोकांनी स्नान करून वस्तुंना स्पर्श करावा असे साधारणता म्हटले जाते. ११

प्रेतदहनानंतर पहिल्या दिवसापासून दहा दिवस तिलांजली व पिंड देण्याची पद्धत जूनी आहे. पहिल्या दिवसाची तिलांजली अग्नीमुळे प्रेताला दहणामुळे उत्पन्न झालेल्या तृष्णेच्या शमनार्थ व पुढे दहा दिवस हाच संकल्प केला जातो. नऊ दिवसांच्या पिंडानी प्रेतात्म्याच्या शरीरा-शरीराचा एकेक अवयव बनावा नवव्या दिवशी पिंडाने शरीर पूर्व तयार व्हावे व दहाव्या दिवशी तहान भूक शमावी अशी त्या दहा पिंडाची कल्पना आहे. गरूडपुराणात वरील कल्पनेचा उल्लेख आढळतो. दशपिंडानी आत्म्याला नवे शरीर मिळते व तो स्वर्गसुख प्राप्त करतो अशी कल्पना आढळते.

वरील विवेचनातून लक्षात येते की,

१. प्रत्येक संस्कृतीत व स्थलपरत्वे समाजात अंत्यविधीच्या वेगवेगळया पद्धती आढळतात.
२. भोई समाजात दहन अपवादात्मक प्रसंगी पुरणे या पद्धतीचे आस्तित्व आढळून येते.
३. अंत्यविधीत संस्कृतीमधील विविधता अनक श्रद्धा-अंधश्रद्धांचे वैशिष्टयपूर्ण मिश्रण असते.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची :**
१) विश्वकोष मराठी खंड-१
२) जोशी महादेवशास्त्री (संपा.) भारतीय संस्कृतीकोश खंड-१
३) चव्हाण भीमराव -उपलाणी, स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.-२००९ पृ.१६२
४) जाधव रमेश- भटक्या विमुक्तांचे परिप्रेक्ष्य, हरणाई प्रकाशन, नांदेड प्र.आ.-२०१३ -९७८८१-९०९८१२-७-९
५) कित्ता पृ.५०
६) उपरोक्त पृ.१६२
७) कित्ता पृ.१६५
८) जाधव रमेश-भटक्या विमुक्तांचे परिप्रेक्ष्य पृ.५२
९) कित्ता-५२
१०) चव्हाण भीमराव -उपलाणी पृ.१६४
११) उपरोक्त पृ.१६५

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# राष्ट्रवादाचे विविध पैलु आणि त्यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान

**जी.डी. चौधरी**
कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,
चोपडा, जि. जळगांव.

**प्रस्तावना :-**

भारतीय इतिहास हा विस्तीर्ण व व्यापक स्वरुपाचा आहे. म्हणून अध्ययनाच्या अनुषंगाने, इतिहासाला तीन विभागात समान्यपणे विभागण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधक विद्यार्थी या शोधनिबंधात आधुनिक कालखंडातील बहुचर्चीत, सर्वदुर प्रचलित अशा संकल्पनेवर प्रकाश टाकण्याचा या शोधनिबंधातुन प्रयत्न करत आहे.

प्राचीन काळापासुन तर आतापर्यंत इतिहासात विविध संकल्पना उदयासआल्या त्या संकल्पनांवर विचार मंथन देखील झाले पण आजही अशा काही संकल्पना इतिहासात अनावधानाने किंवा सहजपणे दुर्लक्षित राहुन गेल्या आहेत. त्या संकल्पनांना उजाळा देण्यासाठी अनेक संशोधक झटत आहेत मी या शोधनिबंधाच्या माध्यमातून राष्ट्रवाद आणि राष्ट्रवादाचे विविध पैलु या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करत आहे.

वास्तविकपणे पाहिले असता, राष्ट्रवाद संकल्पना ही बहुचर्चीत आहे तिच्यावर बरेच मोठे मंथन देखील झालेले आहे. आणि आजही होत आहे परंतु या शोधनिबंधाच्या माध्यमातुन राष्ट्रवादातील असे काही पैलु दुर्लक्षित राहिले आहेत, त्यांच्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करत आहे.

**विषय विवेचन :-**

राष्ट्रवाद ही संकल्पना मुळातच आधुनिक भारताच्या इतिहासात ब्रिटीश साम्राज्यवादामुळे नावारुपास आली. राष्ट्रवादाला मुर्तरुप ब्रिटीश साम्राज्यवादामुळे प्राप्त झाले पण राष्ट्रवाद भारतीय समाजात कसा रुजला त्याचे विविध पैलु कसे तयार झालेत. आणि भारतात त्यामुळे राष्ट्रीय भावना निर्माण कशी होवू लागली. हे पाहणे आवश्यक आहे.

भारतीय इतिहास कारांनी राष्ट्रवादाचे विविध प्रकार पाडलेत सामाजिक राष्ट्रवाद, आर्थिक, राजकिय, धार्मिक, सांस्कृतीक, शैक्षणिक, वंचित राष्ट्रवाद असे नानाविध प्रकार इतिहासात दिसून येतात. परंतु हे राष्ट्रवादाचे विशिष्ट अंग आहे. आणि त्या विशिष्ट अंगाच्या आघारेच राष्ट्रवादाचा विचार केला जातो. आणि तिच चौकटीत राष्ट्रवाद चपखलपणे बसविण्याचा प्रयत्न काही मंडळी करत असते. पण यापलीकडे जावून जर विचार केला तर राष्ट्रवादाचेवेगवेगळे पैलु आपणास पहावयास मिळतात. या शोधनिबंधात जमिनदार, शेतकरी, दलित आणि आदिवासी या चार घटकांतील राष्ट्रापादावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे.

साधारणपणे या चार घटकांमध्ये निर्माण झालेल्या राष्ट्रवादाचे स्वरुप मुलत: भिन्न आहे. तसेच प्रत्येक घटकांचे स्वरुप परस्पर विरोधक देखील आहे परंतु अंतीम उद्दीष्टपुर्ती भारत स्वतंत्र्य असल्यामुळे परस्पर विरोधक भावना या कालांतराने परस्परपुरक बनलेल्या दिसतात.

ब्रिटीशांनी भारतात आपला साम्राज्य विस्तार करण्यास प्रारंभ केला आणि तदनंतर भारतीय राजकिय क्षेत्रात नियंत्रण प्राप्त केले तेव्हा भारतातील परंपरागत व्यवस्था समुळ उध्वस्त केली आणि आपल्या साम्राज्याला पोषक व अनुकूल अशी व्यवस्था उभारणीस प्रारंभ केला. त्यावेळी ब्रिटीशांनी - सामाजिक, आर्थिक , राजकिय, धार्मिक, सांस्कृतिक, कृषी, जमिनदारी, अशा सर्वत्र क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन आरंभले. त्यामुळे ब्रिटीश आणि त्या-त्या क्षेत्रातील घटकांत खटके उडणे साहाजिक होते. परस्परांच्या हितसंघांची जपणुक करतांना परस्परांत विरोध स्पष्ट झाला. हा विरोधच पुढे राष्ट्रवादात परावर्तीत झाला.

१) ब्रिटीशांनी कृषी क्षेत्रात साम्राज्याच्या हिताच्या अनुषंगाने परिवर्तन करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे परंपरागत कृषी व्यवस्था ढासळु लागल्या व या व्यवस्थेतील घटक उध्वस्त होवु लागले. परंपरागत कृषी व्यवस्थेतील घटक ब्रिटीश साम्राज्याच्या विरोधात उभे राहीलेत.

ब्रिटिशांच्या नुतन धोरणामुळे परंपरागत जमिनदार देशोधडीला लागले ब्रिटीशांच्या या धोरणामुळे नविन जमिनदारांचा वर्ग उदयास आला आणि जुने जमिनदार अधिकारहीन बनले. अशा अधिकारशुन्य जमिनदारांचा वर्ग हा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील एक घटक होता. अशा आधिकारशुन्य जमिनदारांचा वर्ग हा राष्ट्रवादाचा एक पैलुंच होता. आणि हे पैलु राष्ट्रवादी विचार प्रवाहात दुर्लक्षित आहे. ब्रिटीश साम्राज्याच्या विरोधात या वर्गाने जो लढा पुकारला ती राष्ट्रवादाचाच भाग होता. हे नाकारता येणार नाही.

त्याचप्रमाणे शेतकरी वर्गात निर्माण झालेल्या ब्रिटिश साम्राज्य विरोधी भावना या भारतीय राष्ट्रवादाचेच प्रतिक होत्या, ब्रिटीशांनी शेतकऱ्यांच्या संदर्भात घेतलेले निर्णय आणि नविन धोरणांची केलेली आखणी व यातुन शेतकरी वर्गाचे झालेले शोषण हे राष्ट्रवाद निर्मितीचेच चिन्हे आहेत. शिवाय ब्रिटीशा प्रमाणेच त्यांचे नवनियुक्त हस्तक (जमिनदार) महसुल अधिकारी यांनी शेतकरी वर्गावर उगारलेला बडगा हा

शेतकरी वर्गात असंतोष निर्माण करणारा होता. या ठिकाणी शेतकरी वर्गातील असंतोषातुन निर्माण झालेले संघटन भारतीय राष्ट्रवादाची नांदी होती शेतकरी वर्गाप्रमाणेच आदिवासी दलित या वर्गात निर्माण झालेला राष्ट्रवाद हा ब्रिटीशांचे असलेले भारतीय हस्तकामुळेच निर्माण झाला. कारण ब्रिटीशांनी बनविभागाची निर्मिती करुन आदिवासींचे हक्क अधिकार हिरावुन घेतले शिवाय आदिवासींना अधिकार हीन केल्यामुळे, ब्रिटीशांसह त्यांच्या हस्तकाविषयी जो असंतोष आदिवासी वर्गात निर्माण झाला तोच आदिवासी वर्गातील राष्ट्रवाद होय. दलितासंदर्भात परिस्थीती ही काही फारशी वेगळी नव्हती.

अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भारतीय समाजात निर्माण झालेला राष्ट्रवाद हा एकांगी नसुन त्याला विविध पैलु आहेत. त्यापैकी या शोधनिबंधात वरील पैलुंचा उल्लेख करण्यात आला आहे.

**सारांश :–**

राष्ट्रवाद हा भारतीय समाजात कसा उदयास आला हे जाणुन घेणे जेवढे महत्वाचे आहे. तेवढेच त्या राष्ट्रवादाला किती पैलु निर्माण झालेत आणि त्यांना कशा प्रकारे विकसीत होण्यास पोषक वातावरण प्राप्त झाले हे या शोध निबंधात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ब्रिटीशांचे भारतीय हस्तक हे जमिनदार शेतकरी व आदिवासी दलीत याच्यात राष्ट्रवाद वाढीस लावण्यात अग्रेसर दिसतात.

**संदर्भ सूची :**

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास–शं.गो.कोलारकर
२) भारत का इतिहास–सव्व्यासाची भट्टाचार्य
३) भारत मे उपनिवेशवाद औ राष्ट्रवाद–बिपीन चंद्र
४) आदिवासीचा इतिहास–गोविंद गारे
५) भिल्लांचा (जमातीचा) सामा, आर्थिक विकास–प्रा.डॉ.डी.आर.चौधरी
६) भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास–डॉ.जयसिंगराव पवार

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# आसिरगड किल्ल्याचे ऐतिहासिक आणि सामरिक महत्त्व

**प्रा.डॉ. के.बी. पाटील**
सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख, संरक्षण व सामरिक शास्त्र
श्रीमती एच.आर. पटेल कला महिला महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.

**गोषवारा :–**

मुघल बादशहा अकबराने इ. स. १६०१ मध्ये असिरगडावर चढाई करुन फारुकी घराण्याचा शेवटचा राजा बहादूरखान फारुकी याचा पराभव करुन खानदेशवर मुघल सत्ता प्रस्थापित केली. कालांतराने औरंगजेबच्या मृत्युनंतर, इ. स. १७०७ नंतरच्या राजकीय संघर्षामुळे खानदेशचा प्रदेश मोठ्या प्रमाणावर उद्धस्त झाला होता. इ. स. १७६० मध्ये मराठ्यांनी निजामांचा पराभव करुन बऱ्हाणपूर आणि असिरगड जिंकले. व संपूर्ण खानदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आला. इंग्रज–मराठा युद्धात हा किल्ला इंग्रज सैन्याने ताब्यात घेतला.

**प्रस्तावना :–**

मध्यप्रदेशातील बऱ्हाणूपर जिल्ह्यातील असिरगड हा दख्खनमधील मजबूत व सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा किल्ला होता. मुघल बादशहा अकबराने इ. स. १६०१ मध्ये असिरगडावर चढाई करुन बहादूरखान फारुकीचा परावभ करुन खानदेशावर मुघल सत्ता प्रस्थापित केली.१

**उद्देश :–**

विविध काळातील राजवंश, त्यांचे साम्राज्य, साम्राज्याच्या सुरक्षेसाठी किल्ल्यांची उभारणी, किल्ल्यांची भौगोलिक रचना, स्थान, सामरिक महत्त्व यासंदर्भांत सविस्तर अभ्यास करुन मध्यप्रदेशातील बऱ्हाणूपर जिल्ह्यातील असिरगड किल्ल्याचे ऐतिहासिक व सामरिक महत्त्व अभ्यासणे हा मुख्य उद्देश आहे.

**गृहितक :–**

१) प्राचीन काळातील खानदेशच्या इतिहासाचा प्रारंभ असिरगड व तोरणमाळ या डोंगरी किल्ल्यांच्या संदर्भापासून सुरु होतो.
२) असिरगडावर फारुकी राजवंशाचे अधिपत्य होते.
३) इ. स. १६०१ मध्ये मुघलांचे असिरगड किल्ल्यावर अधिपत्य.
४) फारुकी घराण्याचा शेवट खानदेशावर मुघलसत्ता प्रस्थापित.
५) १७६० मध्ये असिरगडावर मराठ्यांचे वर्चस्व.
६) १८०३ मध्य असिरगड ब्रिटीशांच्या ताब्यात.

**संशोधन पद्धती :–**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धती त्याचबरोबर विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, आंतरजालिका यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

कोणत्याही प्रदेशाचा भूगोल हा तेथील लढाईचे स्वरुप निश्चित करतो. भौगालिक परिस्थितीनुसार युद्ध योजना, युद्ध डावपेच निश्चित करुन युद्ध जिंकले जाते. खानदेश हा मध्ययुगातील काळात दख्खनच्या पठारातील अत्यंत सुपीक प्रदेश म्हणून ओळखला जात असे. भारताच्या इतिहासात खानदेशच्या भौगोलिक स्थितीचे महत्त्व अनन्यसाधारण होते.२ हा प्रदेश सुपीक तर होताच परंतु डोगर दऱ्यांनी व्याप्त न होता भौगालिक परिस्थितीचा उपयोग करुन याठिकाणी विविध प्रकारचे किल्ले बांधले होते. असे किल्ले रसद व विविध साधनसामग्रीने युक्त असत.

**असिरगड किल्ल्याचे भौगोलिक स्थान :–**

मध्यप्रदेश राज्याच्या बऱ्हाणूपर शहराच्या उत्तरेकडे वीस कि.मी. अंतरावर सातपुडा पर्वत रांगेत वसलेला असीरगड या गडामुळे उत्तरेकडील भारतातील सर्वात महत्त्वाचे मार्ग म्हणजे दख्खन, नर्मदा व तापी नद्यांच्या खोऱ्यांनी जोडले गेले आहेत. या किल्ल्याला 'दख्खनची किल्ली' म्हणूनही ओळखले जाते. दक्षिणेकडील साम्राज्यातील महत्त्वाचा किल्ला व प्रवेशद्वार म्हणून ऐतिहासिक महत्त्व आहे.

**ऐतिहासिक महत्त्व :–**

प्राचीन काळातील खानदेशच्या इतिहासाचा प्रारंभ असिरगड व तोरणमाळ या किल्ल्यांच्या संदर्भापासून सुरु होतो. १५ व्या शतकाच्या सुरुवातीस आसा अहिर या जमिनदाराने हा किल्ला बांधला होता.३ किल्ल्याची वास्तुकला मुघल, इस्लामिक, फारसी, तुर्की आणि भारतीय शैलीने एकत्रीत आहे. याठिकाणी पाणीपुरवठ्याचे तीन तलाव होते.४

ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या जोडणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण भूभागाने भारताचे उत्तर भारत व दक्षिण भारत असे दोन भाग पडतात. या दोन्ही

विशाल भूभागांना जोडणारे प्राचीन महामार्ग खान्देशच्या भूमीतूनच जात होते. थेट रामायण-महाभारत काळापासून या प्रदेशाचे उल्लेख आढळतात. अश्मक: पांडुराष्ट्रातच गोपराष्ट्र: करीयतम:५ या श्लोकातला अश्मक प्रांत म्हणजे वर्तमान खानदेश होय. इ. स. १२९४ मध्ये खान्देशावर मुसलमानी अंमल होण्यापुर्वी त्या प्रदेशाचे खांडववन, खांड, खिंड या धर्तीची विविध नांव होती, परंतु पुढे फारुकी राजांनी आपल्या 'खान' या पदवीला अनुरुप असे 'खानदेश' नाव रुढ केले.६

**असिरगड किल्ल्याचे सामरिक महत्त्व :-**

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात किल्ल्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. राजाने आपल्या राज्याच्या सीमेवर युद्धाच्या व संरक्षणाच्या दृष्टीने योग्य अशा किल्ल्यांची निर्मिती करावी.७ सुरक्षेच्या दृष्टीने कौटिल्याने किल्ल्यांचे-जलदुर्ग, पर्वतदुर्ग, धान्वन दुर्ग, वनदुर्ग, अशाप्रकारे वर्गीकरण केले होते. त्यातही जलदुर्ग व पर्वत दुर्गास अधिक महत्त्व दिले होते. कोणत्याही नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्तीपुर्वीच अशा प्रकारच्या किल्ल्यांमध्ये पुरेशी शस्त्रास्त्रे उपकरणे अन्नधान्य रसद आणि इतर युद्धोपयोगी साधन सामग्री एकत्रित करावी असे नमूद केले आहे. राज्याच्या रक्षणासाठी किल्ल्यांचे महत्त्व असल्यामुळे किल्ल्यांच्या रक्षणासाठी तटबंदी करणे त्या तटबंदीवर आक्रमणासाठी जागा तेथे धनुर्धारी सैनिकांची नियुक्ती करणे, खंदक खोदणे, खंदकात पाणी व मगरी सोडणे, किल्ल्याकडे येणारे मार्ग रोखण्यासाठी काटेरी झाडे, त्रिशुल, लोहकंटक यासारख्या टोकदार अस्त्रांचा वापर करावा. असे नमुद केले आहे. सुरक्षेसाठी किल्ल्यांचे महत्त्व अभ्यासतांना असिरगडचे सामरिक महत्त्व दृष्टीस पडले.

असिरगड हा डोंगरी किंवा पर्वत दुर्ग आहे. अशा प्रकारचे किल्ले उंच डोंगरावर, पर्वतावर किंवा मोठ-मोठ्या दगडापासून निर्मित असतात. असिरगड संरक्षणाच्या दृष्टीने उंच डोंगरावर असून दख्खनमधील मजबूत किल्ला म्हणून प्रसिद्ध होता. अशा स्वरुपाचा मजबूत किल्ला ताब्यात घेण्यास अकबर उत्सुक होता.

अकबराने दूरदृष्टी, साहस, सैन्यशक्ती आणि मुत्सद्देगिरीच्या जोरावर हिंदुस्थानावर आपले अधिपत्य प्रस्थापित करण्यास सुरुवात केली होती. हिंदूस्थानातील सर्व प्रातांच्या सुलतानांच्या अकबर बादशहाच्या अफाट शक्तीपुढे टिकाव लागला नाही. अकबरास सर्वत्र आपले सार्वभौमत्व हवे होते. म्हणून उत्तरेकडील राजपूत राजांप्रमाणेच दख्खनमधील राज्यांनीही आपले स्वामीत्व स्विकारावे अशी त्याची इच्छा होती. त्यातूनच त्याने अहमदनगर, विदर्भ व बालघाटचा प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणला. विजापूर, गोवळकोंडा व अहमदनगरच्या एकत्रित फौजांचाही मोघलांनी पराभव केला. दख्खनमध्ये असा साम्राज्यविस्तार होत असतांनाच अकबर माळवा मार्गाने खानदेशात येवून पोहचला राजा अलीखान फारुकी नंतर त्यांचा मुलगा बहादूरखान फारुकी हा खानदेशच्या गादीवर आला. अकबरास खानदेशच्या या राजाने आपला मुलगा शहाजादा दानियल याचा योग्य तो सन्मान केला नाही असे कळले. त्याचा बदला म्हणून अकबर बऱ्हाणपूर कडे, असिरगडच्या दिशेने निघाला हा किल्ला दख्खनमधील मजबूत किल्ला म्हणून प्रसिद्ध होता. मुघल फौजेने एप्रिल ते नोव्हेंबर १६०० पर्यंत असिरगडला वेढा दिला. परिणामी बाहेरुन प्राप्त होणारी रसद विस्कळीत झाली. त्याचदरम्यान किल्ल्यावर रोगराई सुरु झाली. अशा कठीण परिस्थितीत बहादूरशहाला अकबरास शरण गेला. आणि असिरगड मुघलांच्या ताब्यात आला आणि अशारितीने खान्देश मोघल साम्राज्यात विलीन झाले. पुढे १७६० मध्ये उद्गीरच्या युद्धात निजामाचा पराभव करुन मराठ्यांनी बऱ्हाणूपर आणि असिरगड जिंकले व संपूर्ण खानदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आला. अखेर १८०३ मध्ये इंग्रज मराठा युद्धात असिरगड इंग्रजांच्या ताब्यात गेला.

**निष्कर्ष :-**

१) मुघल बादशहा अकबराने इ. स. १६०१ मध्ये असिरगडावर चढाई करुन फारुकी घराण्याचा शेवटच्या राजा बहादूरखान फारुकीचा पराभव करुन खानदेशवर मुघल सत्ता प्रस्थापित केली.
२) इ. स. १७६० मध्ये मराठ्यांनी निजामाचा पराभव करुन बऱ्हाणपूर आणि असिरगड जिंकले.
३) इ. स. १८०३ मध्ये असिरगड ब्रिटीशांच्या ताब्यात गेला.
४) प्राचीन काळातील खानदेशच्या इतिहासाचा प्रारंभ असिरगड व तोरणमाळ या डोंगरी किल्ल्यांचा संदर्भापासून सुरु होतो.
५) कोणत्याही प्रदेशांचा भूगोल हा तेथील लढाईचे स्वरुप निश्चीत करतो.
६) भौगोलिक परिस्थीतीनुसार युद्धयोजना, युद्ध डावपेच निश्चित करुन युद्ध जिंकले जाते.
७) असिरगड या किल्ल्यामुळे उत्तरेकडील भारतातील सर्वात महत्त्वाचे मार्ग म्हणजे दख्खन, नर्मदा व तापी नद्यांच्या खोऱ्यांनी जोडले गेले आहेत.
८) मोघलांचा दक्षिणेकडील साम्राज्यातील महत्त्वाचा किल्ला व प्रवेशद्वार म्हणून या किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे.

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

**संदर्भ सूची :**

१) Radhey Sham, The Kingdom of Khandesh Idrah - I, Adabiyat - I, Delhi 1981
२) ग. ह. खरे, अ. रा. कुलकर्णी (संपा), मराठ्यांचा इतिहास खंड, तिसरा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे., पृ. ३१९
३) http://wikipedia. Org
४) शैलेंद्र सेन, मध्ययुगीन भारतीय इतिहास, पृ. क्र. १६४
५) महाभारत ग्रीष्म पर्व, अध्याय ९ वा, श्लोक क्र. ४४.
६) मो. रा. जोशी, खानदेश नावाचे मुळ, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, संशोधक त्रैमासिक वर्ष २२ वे, अंक ४२८, १९५४, पृ. १६०.
७) डॉ. लल्लनजी सिंह, भारतीय सैन्य इतिहास, प्रकाश बुक डेपो, बरेली, १९७६, पृ. ८३
८) D. M. Torgal (Ed) Ceazetter of Bombay Presidency, Vol. XII, Khandesh District, 1880, P. 247.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# खानदेशातील ऐतिहासिक वाड्मयीन अभिलेखागार श्री समर्थ वाग्देवता मंदीर, धुळे

**श्री. विठ्ठल केशवराव साळूंखे**
संशोधक विद्यार्थी, कला व विज्ञान महाविद्यालय,
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे.

**प्रस्तावना**

श्री समर्थ वाड्मयाचे अभिलेखागार म्हणूनश्री समर्थ वाग्देवता मंदीरखानदेशात धुळे येथे प्रसिध्द आहे. खानदेशात इतिहास लेखन व संशोधनाचा पाया वि. का. राजवाडे यांनी रचला. त्यांनीसंकलित केलेले ऐतिहासिककागदपत्रांचेसंरक्षण व्हावे म्हणून धुळे येथेश्री नानासाहेब देव व तात्यासाहेब भट यांनी राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना केली. त्यांच्याच प्रेरणेनेश्री. नानासाहेब देव यांनी १८९३ पासूनश्रीसंप्रदायाची असंख्य मौल्यवान हस्तलिखित ग्रंथ, पोथ्या, सनदा, बखरी व इतरकागदपत्रेगोळाकेली. या श्री समर्थ वाड्मयाचे चिरकालसंरक्षण, संवर्धन व संशोधन व्हावे म्हणून धुळे येथेश्री समर्थ वाग्देवता मंदीर या ऐतिहासिक अभिलेखागाराची उभारणी सव्वाशे वर्षापूर्वी केली.

**गृहितके**

१. खानदेशातश्री समर्थ वाड्मयाचे भांडार म्हणूनश्री समर्थ वाग्देवता मंदीर महत्त्वाचे आहे.
२. श्री समर्थ रामदास स्वामी व त्यांनी स्थापन केलेल्या मठातील शिष्य गणांनी लिहिलेलीहस्तलिखितेश्री समर्थ वाड्मयाचा ठेवा आहे.
३. मध्ययुगातश्री समर्थ रामदास स्वामींनी उभारलेली समाज जागृतीची चळवळ व प्रबोधन या वाड्मयाद्वारे आजहीसुरक्षित आहे.
४. समर्थ वाड्मयाचा हा ठेवा जतन करण्यातश्री नानासाहेब शंकरश्रीकृष्ण देव यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

**संशोधन पध्दती**

सदर लघुसंशोधन विषयासाठी सर्वेक्षण व ऐतिहासिकसंशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. तसेच या शोध लेखात प्राथमिक व द्वितीय साधन सामुग्रीचा वापर केला आहे. वस्तुनिष्ठसंशोधनासाठी जास्तीत जास्त प्राथमिक साधनांचा वापर केला आहे.

**श्री समर्थ वाग्देवता मंदिराची स्थापना :**

श्री समर्थ भक्त, खानदेशातील स्वातंत्र्य सेनानी व खानदेशाचे टिळकश्री शंकरश्रीकृष्ण देव व त्यांच्या देवगणांनी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर श्री रामदास स्वामी व त्यांच्या शिष्यांचे जेवढे मठहोते त्यांना भेट देवून मौल्यवान हस्तलिखित, ऐतिहासिकहस्तलिखिते असंख्य अडचणीसहनकरून स्वत:ची पदर मोडकरून धुळे येथे जमविली होती.

पन्नास वर्षापेक्षा जास्त काळही ऐतिहासिक वाड्मयीन हस्तलिखित दिर्घकाल अभ्यागतांना व संशोधकांना अभ्यासता यावी म्हणूनश्री देवांनी आपल्या स्वत:ची साडेतीनहजार चौरस फुट जागा या संग्रहाच्या इमारतीसाठी बक्षीस पत्र करून दिली व सन १९३४ च्या शिवराज्याभिषेक दिनी या जागेचे भूमिपूजन केले. आर्थिक जुळवा जुळव करून अवघ्या काही दिवसात या संग्रहासाठीश्री समर्थ वाग्देवता मंदिराचीसंपूर्ण दगडाची बांधलेली दुमजली इमारत उभारली. शके १८५६ च्या आषाढातश्री समर्थ शिष्य कल्याण स्वामींच्या पुण्यतिथीच्या दिवशी भूमिपूजन झालेल्या या मंदिराचे उद्घाटन शके १८५७ च्या जेष्ठ शुध्द १३ च्या शुभ मुहूर्तावर म्हणजे १४ जून १९३५ रोजीश्री समर्थ भक्त श्रीमंत महाराणी इंदिराबाई साहेब होळकर यांच्या हस्तेकरण्यात आले.

**संग्रहाची वैशिष्ट्ये :**

श्री. शंकरकृष्ण देवांनी या अभिलेखागारात संग्रहीतकेलेला ह्या हस्तलिखितांचे वैशिष्ट्य म्हणजेतेश्री समर्थ संप्रदायाची असून त्यात इतरसंतांचांहीसंग्रह आहे. तसेचश्री समर्थ मठांचे स्वरूप, मठांचा जमाखर्च, मठपतींचा व्याप, वंशपरंपरा, सनदा व बखरी इत्यादी माहिती मिळविण्यासाठी महत्त्वाचे आहे. श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील दैवत म्हणून समर्थांच्या मुखातील लिहिलेलेश्रीमंतग्रंथराज दासबोध ठेवण्यात आले आहे.

**अभ्यागताश्रमाची स्थापना**

ह्या संग्रहाच्या संशोधनासाठी अभ्यासासाठी व मंदिराला भेट देण्यासाठी येणाऱ्यांना काही दिवस येथे राहता यावे म्हणून मंदिरा शेजारील जागा विकत घेवून अभ्यागताश्रमाची उभारणी करण्यात आली आहे.

**श्री समर्थ वाग्देवता मंदिराचे न्यास पत्र व घटना**

मंदिराच्या उद्घाटनावेळी श्री नानासाहेब देवांनी नोंदविलेल्या न्यास पत्रात तेरा जणांच्या विश्वस्त मंडळाकडे १४ जून १९३५ रोजी मंदिराची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी सोपविली. आज अकरा विश्वस्थ मंदिराची व्यवस्था पाहतात. या न्यास पत्रानुसारकोणतेहीहस्तलिखित मंदिराबाहेर जाणार नाही. कोणत्याही जातीधर्मातील अभ्यासकाला पाहण्याचा, फोटोकाढण्याचा व संशोधनकरण्याचा अधिकार राहील.

कोणताही ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी विश्वस्थांची परवानगी घ्यावी लागेल. एखादा विश्वस्थ कमी झाल्यास सभासदामधून योग्य व्यक्ती निवडला जावा. सत्कार्योत्तेजक सभेचा चिटणीस विश्वस्थ मंडळाचाकायम सभासद राहिल. इत्यादी शर्ती या न्यास पत्रात आहेत.

विश्वस्थ मंडळाच्या सभेत २० ऑक्टोबर १९३५ रोजी मंदिरासाठी एक घटनातयारकरण्यात येवून त्यात मंदिराचे ध्येय व उद्दिष्ट्ये, नियम, भावी कार्य, संग्रहाचे स्वरूप इत्यादीगोष्टी नमूदकरण्यात आलेल्या आहेत.

**श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील बांडाचे वर्गवार विश्लेषण**

श्री समर्थ वाग्देवता मंदिरातीलसंशोधित बांडाचे व ग्रंथसंपदा आणि हस्तलिखित कागदपत्रांचे विश्लेषण श्री. देवांनी मिळविलेल्या मठांच्या नावाने बांड क्रमांक देवून लोखंडीकपाटाच्या क्रमानुसारकेलेले आहे.

५. कपाटक्रमांक अकरा मध्ये १ ते २५० बांड असून त्यात १ ते ५० उध्दव स्वामींच्या टाकळी मठातील, ५१ ते ११३ कल्याण स्वामींच्या डोंमगाव मठातील, ११४ ते १२९ सावळाराम बुवा, १३० ते १३३ नाना बुवा, १३४ ते १४६ दुर्गाबाई, १४७ ते १५३ केज देसाई, तळवले मठातील आहे.
६. कपाटक्रमांक बारा मध्ये २५१ ते ५५० पर्यंतचे बांड असून त्यात रामजी बुवांचा पांधरी मठ, चाफळखोऱ्यातीलसंग्रह, श्री समर्थ जन्मभूमी जांब येथील, त्रिंबक राज यांच्या भालगाव मठ येथीलसंग्रह आहे.
७. कपाटक्रमांकतेरा मध्ये ५५१ ते ७४० पर्यंतचे बांड असून त्यात उध्दव स्वामींच्या इंदूरबोधन मठ, उम्रज कुलकर्णीचासंग्रह, कल्याण बंधू दत्तात्रय यांचा शिरगाव मठ, मसुर येथील मठ, कण्हेरी मठ, पासरणी मठ, बोरगाव मठ, मर्ढेमठ, मिरजमठ, बिड मठ इत्यादी मठांमधील आहे.
८. कपाटक्रमांक चौदामध्ये ७४१ ते ११०९ पर्यंतचे बांड असून त्यात दोदेगांव मठ, परळीखोरे, तिसगाव मठ, केज अंबेजोगाई मठ, माजलगाव मठ, निलंगा मठ, कल्याणी बेदड, दोडड मठातील आहेत.
९. कपाटक्रमांक पंधरामध्ये १११० ते १५०० पर्यंतचे बांड असून शिवराम यांचा आपचंद मठ, तंजावर प्रांत, विदर्भ प्रांत मठांमधील आहेत.
१०. कपाटक्रमांकसोळामध्ये १५०६ ते १५९० पर्यंतचे बांड असून यात ज्ञात अज्ञात अशा व्यक्तींनी स्वहस्ताक्षरातील हस्तलिखिते आहेत. त्यात चांदोरकर, वि. का. राजवाडे, अनंतबुवा नेने दप्तर, लाड साहेबांचे दप्तर, बारामती, कारंजे मठ इत्यादीकडून आलेलासंग्रह १५०६ ते २२८६ पर्यंतचे बांड आहेत.
११. श्री समर्थ वाग्देवता मंदिरातसंस्कृत भाषेचा संग्रह स्वतंत्र असूनतो आप्पासाहेब साकुर्डीकरांकडून आलेला आहे. या संग्रहाला स्वतंत्र बाडांक देण्यात आलेले असूनत्याची संख्या १ ते ८६३ पर्यंत आहे.

अशाप्रकारे श्री समर्थ वाग्देवता मंदिर या खानदेशातील धुळे येथील ऐतिहासिक अभिलेखागारात एकूण ३१४९ बांड रूमालात बांधलेले असून त्यात असंख्य ग्रंथ आहेत. त्यांची पृष्ठ संख्या लाखोंच्या संख्येत आहे. त्याचे स्वरूप व बाडांकाची सूची आद्याक्षरानुसार आहे.

**इतरसंग्रह**

श्री समर्थ वाग्देवता मंदिरात वरिल संग्रहाबरोबरच श्री छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी राजे, शाहू महाराज इत्यादींचीताकीद पत्रे, बक्षिस पत्रे, दानपत्रे, भगवतगीता, जुनी नाणी, ताम्रपट, ताडपत्रे, चित्रे इत्यादी ऐतिहासिक ठेवा सुरक्षित आहे.

**निष्कर्ष**

श्री समर्थ वाग्देवता मंदिरहेखानदेशातीलश्री समर्थ भक्तांचे अभ्यासकांचे महत्त्वाचे वाङ्मयीन अभिलेखागार असूनश्री नानासाहेब शंकरश्रीकृष्ण देव यांच्या अथक प्रयत्नांचे फळ आहे. ज्यामुळेखानदेशाचे त्यात धुळे शहराचे नाव सातासमुद्रापार पोहोचले आहे.

**संदर्भ सूची :**

१२. देव स्मृती ग्रंथ, प्रकाशक देव रघुनाथगणेश, वर्ष १९७१
१३. सत्कार्योत्तेजक सभा, शताब्दी महोत्सव अंक, संत प्रमोद, समर्थ सेवा मंडळ, नागपूर, जानेवारी १९९३
१४. नाना सुकृताचे फळ, लेखक शरद कुबेर, वर्ष शके १९२३
१५. श्रीरामदासीसंशोधनखंड १ ते ४, श्री शंकरश्रीकृष्ण देव
१६. श्री. समर्थ वाग्देवता मंदिरातीलकपाटक्रमांक ११ ते १७ तीलसंशोधित बांड

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# ब्रिटीशांचे खानदेशातील सुरवातीच्या काळातील महसुल विषयक धोरण

**प्रा. सतीश ज. निकम**
विद्यावर्धीनी महाविद्यालय,
धुळे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संस्कृतीची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. मनुष्य व्यक्तीश: व समुदायश : जी जीवनपध्दती निर्माण करतो आणि जीवनसाफल्यार्थ स्वत:वर व बाहय विश्वावर संस्कार करुन जे आविष्कार करतो, ती पध्दती वा तो अविष्कार संस्कृती होय यावरुन मानवाच्या उतक्रांतीपासूनच तो संस्कृतीशी अविभाज्यसपणे जोडला गेला आहे, असे म्हणता येईल. परंतु ज्याअर्थि संस्कृती ही शांततेच्या काळात जन्मास येते, त्याअर्थी ख-या संस्कृतीचा प्रसवण्याचा काळ हा मानवास शेतीचा शोध लागल्यानंतरचाच आहे. शेतीचा शोध मानवी जिवनास दीर्घकालीक शांतता प्रदान करणारा ठरला. त्यामुळे जगभर विविध संस्कृतीचे अविष्करण घडुन आले. शेतीचा शोध स्त्रीयांनी लावला असल्यामुळे स्त्रीसत्ताक संस्कृतींचा उगम मोठया प्रमाणावर झाला. शेतीचा शोधलागल्यापासून आजतागायत मानवाचे सामाजिक – आर्थिक जीवन शेतीच्या पायावर उभे असल्याचे दिसते. राजसत्ता जरी बदलल्यात तरी शेतीवर आधारीत समाज-अर्थव्यवस्था मात्र बदलत नसे.

तापी, गिरणा, पांझरा या नद्यांच्या खो-यातील प्रदेश हा खानदेश म्हणून ओळखला जातो. तापी सारखी प्रमुख नदी आणि गिरणा, पांझरा, बोरी, बुराई अशा उपनद्यांनी समुध्द खो-यात प्राचीन संस्कृतीच्या खुणा आढळतात. अश्मयुगीन आणि ताम्रपाषाणयुगीन समृध्द संस्कृती या ठिके णी वसत होती. हे पुरातत्वीय उत्खणनातून पुढे आले आहे. सातवाहन, वाकाटक, गुप्त,चालुक्य, राष्ट्कुट , यादव,सुलतान, मोगल आणि ब्रिटीश अशा अनेक राजवटींचे अधिपत्य या प्रदेशावर होते. भारतात प्राचीन काळापासूनच कोणत्याही राजवटीचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत हा जमीन महसुलच राहीला आहे. त्यामुळे प्रत्येक शासनकाळात शेती आणि जमीन महसुलच्या संदर्भात विशेष धोरणे राबविली गेली आहेत. भारतात ब्रिटीशानीही शेती व्यवस्थेकडे विशष लक्ष दिलेले आहे. प्रस्तुत लेखात ब्रिटीशकालात शेती व्यवस्थेच्या संदर्भात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

ब्रिटीशांचा वसाहतवाद हा प्रामुख्याने आर्थिक वसाहतवाद होता. म्हणुन भारता सारख्या खंडप्राय देशातुन प्रदीर्घकाल आर्थीक फायदे कसे मिळविता येतील किंवा अर्थिक लुट कशी करता येईल हा विचार त्यामागे असणे स्वाभावीक होते. शेती व्यव्यस्थेची किंवा महसुल व्यवस्थेची पुनर्रचना करण्यामागे केवळ आर्थिक हेतु होता असे नाही. तर त्यामागे सामाजिक हेतु ही होता. भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यात बहुसंख्य जनता खेडयातुन वास्तव्यास आहे. ग्रामीण गावगाडयाचा सर्व व्यवहार शेती व्यवसायावरच आधारीत होता. सामाजिक चलन वलन शेतीधारीत असल्याने शेती विषयक धोरण राबवितांना ब्रिटीशांचा पवित्रा सुधारणात्मक असाच होता. ब्रिटीश धोरणामुळे शेती महसुलात वाढ झालेली असली तरी शेती क्षेत्रात महत्वाच्या सुधारणाही त्या योगे घडून आल्या.

खानदेशचा प्रत्यक्ष अंमल ब्रिटीशांकडे पेशवाई बुडविल्यानंतर आला. सन १८१८ मध्ये पेशवा बाजीरावाच्या शरणागतीनंतर महाराष्ट प्रदेश कंपनी सरकारच्या ताब्यात गेला. एलफिस्टन् या कर्तबगार अधिका-याची गव्हेनर म्हणून नेमणूक करण्यात आली. प्रशासकीय सोयीसाठी त्याने महाराष्टाचे चार विभागात विभाजन केले. अहमदनगर, पूणे, खान्देश आणि धारवाड असे ते चार विभाग होत. यापैकी खान्देश विभागाचा कलेक्टर म्हणून कॅप्टन जॉन ब्रिग्ज याची नेमणुक झाली. ब्रिटीशांनी भारतीय प्रदेश आपल्या कब्ज्यात येत असता १७६७ सालीच सर्वे ऑफ इंडियाची स्थापना करुन भारतातील जमिनीचे शास्त्रोक्त पध्दतीने मोजमाप करण्याचे काम सुरु केले होते. तोच कित्ता गिरवत कॅप्टन ब्रिग्जने जमीनीचे मोजमाप करुन आणि तिचा दर्जा निश्चित करुन शेतसारा निश्चित केला. मातीचे परीक्षण करण्यासाठी एक ते तीन फुट खोल खोदुन माती काढुन त्याची प्रत ठरवुन त्यानुसार जमीनीचे वर्गीकरण करुन शेतसारा निश्चित केला जात असे. ब्रिग्जने खानदेशातील जमीनीचे परीक्षण करुन तिचे आठ प्रकारात विभागणी केली. त्याप्रमाणे उत्त्तम काळी जमीन, मध्यम काळी जमीन, चिकन किंवा बारीक रेती मिश्रीत, बुरुड किंवा रेताड, लाल रेताड, पिवळी रेताड, मुरमाड, जिरायत इत्यादी.

एलफिस्टन्ने आपल्या सर्व अधिका-यांना दहा वर्ष पुर्वीपासुनच्या जमीनी महसुलाची माहिती गोळा करुन कायमस्वरुपी योग्य अशी सारा आकारण्याची सुचना केली होती. त्याप्रमाणे कॅप्टन ब्रिग्जने खान्देशातील माहिती गोळा करण्यास प्रारंभ केला. परंतु ब्रिग्जला पूर्वीच्या जमीनी महसुलाच्या नोंदी मध्ये प्रचंड अनियमितता आढळली. एकतर मागील सर्व नोंदी मिळण्याची अडचण होती. आणि जेवडया नोंदी उपल्ब्ध झाल्यात त्या विश्वासनीय नसल्याचे स्पष्टमत कॅप्टनब्रिग्जने नोंदविलेले आहे. त्यांच्यामते कुळकर्णीनी पुरावा म्हणुन दिलेल्या जमा खर्चाच्या नोंदीकडे एक मिनिटभर चौकसपणे पाहिले तरी त्यावर समाधान होणार नाही. किंवा त्यावर अवलंबून राहता येणार नाही यावरुन तत्कालीन केंद्रंसत्तेचा राज्यकारभारातील ढिसाळपणा लक्षात येतो. त्यामुळे ग्रामप्रशासनातील भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोलवरूजलेली दिसतात. ग्रामप्रशासनातील भ्रष्ट आधिका-याची शिरजोरी वाढुन शेतक-याची प्रचंड लुबाडणूक त्याकाळी होत असल्याचे सिद्ध होते. भ्ष्टाचाराची समस्या असो वा

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

शेतक-यांच्या लुबाडणीचा प्रश्न असो हि समस्या आजची नाही. ही बाब ठळकपणे लक्षात येते.

कॅप्टन ब्रिग्जने अनेक अडचणीना तोंड देत खान्देशातील जमीनीचे मोजमाप पुर्ण केले. ' जमीनीची मोजणीकेल्यावर सिंचनाच्या सोयी आणि पिकांचे प्रकारावर आधारीत जमीनी च्याप्रतवारी नुसार आकारणी करण्यात आली. ब्रिटीशांच्या अशा धोरणामुळे किमान अन्याय्य वसुलीपासुन सामान्य शेतक-याची सुटका झाली. कारण ब्रिटीशांनी सारा आकारतांना ज्या बाबी लक्षात घेतल्या त्यावरुन किमान ची संकल्पना काय असु शकते याचे एक उदाहरण आपणांस त्यात दिसते. जमीनीचे जे प्रकार होते त्यात जिरायत, मोटस्थळ, पाटस्थळ त्या – त्या प्रकारानुसारच त्यातील उत्पादनावर कर आकारण्यात आला होता.

शेतीवरील सारा निश्चित करताना ब्रिटिशांचे धोरण कसे होते हे पुढील उद्धृत उताऱ्यावरुन स्पष्ट होते. ६ शेतसारा निश्चित करताना आधीच्या वर्षापेक्षा जास्त किंवा कमी क्षेत्रावर पेरणी केली गेली आहे. हे जून – जुलै मध्ये दिलेल्या भेटीवरुन मामलेदारांना कळत असे. मागील वर्षाचे हिशेब पाहून येणाऱ्या हंगामाची स्थिती लक्षात घेऊन पाटलाला बरोबर घेऊन शेतसारा निश्चित करावयाचा असे. त्याकरिता शेजारच्या खेडयातील लोकांशीही चर्चा करत. त्यामुळे तुलनात्मक शेतसारा लक्षात घेऊन शेतसारा निश्चित केला जाई. मामलेदार शेतसाऱ्याचा कराराचा मसूदा तयार करुन त्यावर पाटील व कुलकर्णीची सही घेत. त्यानंतर गावकऱ्यांसमक्ष प्रत्येक शेतकऱ्याने भरावयाच्या शेतसाऱ्याची रक्कम पाटलाच्या मदतीने निश्चित करुन ती ग्राम कार्यालयासमोर वाचून दाखविण्यात येई अशारितीने ब्रिटिशांनी शेतसारा आकारणी आणि वसूलीसाठी कोणत्याही प्रकारची दंडेलशाही न दाखविता अगदी लोकभिमूख अशी पध्दती राबविली असल्याचे लक्षात येते. याउलट यापूर्वीच्या शासनकालात त्यांच्यावर अन्याय, जुलूम-जबरदस्तीने या साऱ्या गोष्टींची आकारणी आणि वसूली होत असायची. त्यामुळे भ्रष्ट ग्रामशासकांकडून शेतकऱ्यांची मुक्ती होण्यास मदतच झालेली दिसते.

शेती उत्पादनात कधीही एकसारखेपणा आढळत नाही दुष्काळ, अतिवृष्टी अशा नैसर्गिक आपत्तींनी बऱ्याचदा उत्पादनात घट होत असते. तेव्हा ब्रिटिश आमदानीत शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सवलत दिल्याच्या अनेक नोंदी उपलब्ध आहेत. सन १८२२-२३ मध्ये वाईट हंगामामुळे उत्पादनावर परिणाम झाला. शिवाय धान्याच्या किमतीही कमी झाल्या होत्या तेव्हा जॉन ब्रिग्ज यांनी पंचवीस टक्के शेतसारा कमी करण्याची सूचना केली होती. ब्रिटिश वसाहतवादी सत्ता आपली आर्थिक वसाहतवादी धोरण पुढे रेटत असता, त्यांनी संबंधित ठिकाणी केलेल्या सुधारणा त्या त्या क्षेत्रातील अनियमितता, भ्रष्टाचार आणि गोंधळ कमी करणाऱ्या ठरल्या. त्यांचा अंतिम उद्देश आर्थिक लूट असला तरी त्यांच्या धोरणांना अल्प प्रमाणात का असेना परंतू माणूसकीची किनार जोडलेली दिसते, हे वर उद्धृत उदाहरणावरुन स्पष्ट होते. अर्थात सर्वच ब्रिटिश आधिकाऱ्यांनी या प्रकारे धोरणं राबविली असेही नाही. अनेक कट्टर, साम्राज्यवादी अधिकाऱ्यांनी प्रजेवर अन्याय अत्याचार केल्याचीही उदाहरणेही आपणांस आढळतात.

कॅप्टन ब्रिग्ज याची खानदेशचा अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यापासून खानदेशचा कारभार तो धुळयाहून नियंत्रित करत होता. त्यामुळे त्याने धुळयात अनेक बांधकाम सुरु केलीत. त्यात विविध कार्यालये, इमारती, पूल, रस्ते इ. चा समावेश होता. यातूनच पुढे धुळे शहरांची नविन वसाहत अतिशय नियोजनबध्द पध्दतीने वसविण्यात आली. ब्रिग्जने निर्माण केलेल्या इमारतीपैकी काही इमारती आजही आपणांस धुळे शहरात पहावयास मिळतात. खान्देश हा भौगोलिक विविधतेने संपन्न असलेला प्रदेश आहे. त्यामुळे संपूर्ण प्रदेशात वातावरणही भिन्न प्रकारचे आढळते. खान्देशात अनेक वेळा दुष्काळ पडलेला आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे खान्देशातील लोक शेजारच्या प्रदेशांमध्ये स्थलांतरीत होत. अशावेळी कॅप्टन ब्रिग्ज यांचे प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले आहेत. येथील जनता गावे सोडून जवळच्या गुजरातमध्ये स्थलांतरीत झाली होती तेव्हा कॅप्टन ब्रिग्जने नंदुरबार, कुकरमुंडा, नवापूर भागातील खेडयांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न केले व त्यासाठी पटेल व देशमुखांना प्रोत्साहन दिल्याचे तत्कालीन पत्रव्यवहारातून वाचावयास मिळते.

ब्रिटिशांचे शेतीव्यवस्थेतील सुधारणांचे प्रयत्न आणि नैसर्गिक आपत्ती प्रसंगी रयतसाठी दिलेला मदतीचा हात. यामुळे खान्देशातून सरकारला नियमित आणि मोठा महसूल मिळू लागला घब्रिटिश सरकारला खान्देशातून १८२४-२५ यावर्षी सवीत जास्त महसूल प्राप्त झालाङ खान्देश वातावरण कापूस उत्पादनासाठी अनुकुल असल्याने ब्रिटिश अधिकाऱ्यांना खान्देशात कापूस उत्पादनासाठी प्रयत्न केले होते. सन १८४६ साली सिम्पसन यांना गुजरात व खान्देश या दोन प्रांताचे कापूस अधिक्षक म्हणून नेमण्यात आले होते आणि त्यांच्यासोबत प्राईस यांना खान्देशचे सहाय्यक कापूस अधिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले होते त्यांनी पूर्व खान्देशात एरंडोल नसिराबाद या ठिकाणच्या शेतकऱ्यांना पाच रुपये प्रति बिघा प्रमाणे पैसे देऊन व उपकरात सवलत देऊन अमेरिकन न्युअर्लिन्स या नवीन कापसाच्या वाणाची ९९ एकर मध्ये लागवड केली होती. ब्रिटिशांच्या अशा प्रयत्नांनी खान्देशात शेतीमध्ये नवनविन बियाणे आणि शेतीपध्दतीत प्रायोगिक तत्वावर उत्पादन घेण्याच्या धोरणांमुळे खान्देशात शेती उत्पादनात वाढ झालेली दिसते.

**संदर्भ सूची :**

१. Mahajan Dr. T. T. Khandesh Linder the Mughals (1601- 1707), Galaxy publications, New Delhi, 1991
२. शहा डॉ.मु.ब. खान्देशातील एक ऐतिहासिक घराणे कानुगो-देसाई, आंतरभारती अध्ययन अनुसंधान केंद्र, धुळे,
३. पाटील डॉ.सुभाष , डॉ. अनिल बैसाणे, डॉ अनिल कठारे, शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाच्या इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार,२०११
४. पाटील डॉ. भी. ना. खान्देशातील समाजप्रबोधनाची चळवळ प्रकाशक- श्री. भूषण पाटील, पाचोरा,२००५
५. पाटील डॉ. मधुकर, कंपनी सरकारकालीन खान्देश, शिवम् प्रकाशन, नंदुरबार, २००७
६. पाटील डॉ. संजय, ब्रिटिशकालीन खान्देश आणि दुष्काळ, सम्यक्ता प्रकाशन, धुळे,२०१२
७. पाटील डॉ. संजय, ब्रिटिशकालीन खान्देशातील कापूस उत्पादन, सम्यक्ता प्रकाशन, धुळे, २०१३

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशी लोकसाहित्य

**डॉ. राखी सलगर**
प्राध्यापिका (मराठी) नाट्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

लोकसाहित्य लोकसंस्कृतीचा, लोकजीवन शैलीचा एक अविभाज्य भाग असल्याने या लोकवाङ्मय प्रकाराला कुणीही कर्ता नसतो. म्हणून हा वाङ्मय प्रकार इतर वाङ्मय प्रकारापेक्षा थोडासा निराळा आहे. या लोकसाहित्य वाङ्मय प्रकाराचा निश्चित असा कालखंड सांगता येत नाही. लिखित वा मुद्रित सहिंता नसलेला समाजाच्या सर्वच घटकाचे प्रतिनिधीत्व करणारा, कष्ट, विधिकर्म, सण, उत्सव प्रसंगी लोकाकडून लोकभाषेच्या माध्यमातून उत्स्फूर्तपणे प्रकट होणारा, गेयता, कथनशैली, नाट्यगुणसंपन्न अशा लोक आविष्कारातून निर्माण झालेला लोकसाहित्य हा वाङ्मप्रकार आहे. फार प्राचीन कालखंडापासून लोकसाहित्याची परंपरा साहित्यामध्ये आली. 'लोक' या शब्दाला विशिष्ट असा अर्थ त्याप्रमाणेच 'साहित्य' शब्दाला आहे.

मुलत: जन्मानंतर आपली हळूहळू वाढ होते. प्रारंभी आपण सभोवतालच्या वातावरणामध्ये वावरतो. लहान असताना आपण आजी आजोबा जेष्ठ व्यक्तींकडून अनेक गोष्टी, गाणी ऐकवयास मिळालेले असतात. सामाजिक जीवनामध्ये लग्न, सण, उत्सव, समारंभ, विधि तसेच धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी गाणी म्हणी, वाक्प्रचार, विधिविधाने लोककला हे अपणास ऐकावयास मिळतात. गावातील जत्रा उत्सवाच्या प्रसंगी, तमाशा बोहाडा कलाप्रकार सातत्याने आपणास पहावयास मिळतात. विधीप्रसंगी, सण उत्सव प्रसंगी गीताबरोबर नृत्य, नाट्य आविष्कार पहावयास मिळतो. लोकसंस्कृतीचे उपासक, गोंधळी, वाघ्यामुरळी वासुदेव, पांगुळ, धनगर, बहुरूपी, डहळा, स्मशानजोगी इत्यादीच्या गीतामधून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. परंपराने चालत आलेल्या कला लोकजीवनावर धर्मावर आधारीत असते. लोकसाहित्य अभ्यासावरून धर्माचे तत्त्वज्ञान, आचारण संस्कृती या विषयीची माहिती मिळते.

लोकसाहित्य हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत असते. विविध प्रांत, प्रदेशपरत्वे लोकसाहित्य, लोककला ही टिकवून आहे. त्यामध्ये खानदेशातील लोकसाहित्याचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. महाराष्ट्र प्रदेशाचं वर्णन कवी गोविंदाग्रजानी आपल्या महाराष्ट्र गीतातून केले आहे. मराठवाडा, माणदेश, कोकण आणि खानदेश असे स्वाभाविक भाग पडतात. या सर्व प्रदेशाचे नैसर्गिक, प्रादेशिक, तेथील बोलीभाषा व लोकभाषा, चालीरीती, रूढी, परंपरा, सण वार, उत्सव, समारंभ, लोककथा, लोकगीते इ. वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे संपुर्ण महाराष्ट्र लोकसंस्कृती, लोककलामध्ये, गुंतलेला आहे. त्यामध्ये लोकसंस्कृतीचा, लोकसाहित्य, लोककलाचा समृद्ध वारसा खानदेशाला लाभला आहे.

**खानदेशी बोली :**

खानदेशाची बोलीभाषा किंवा लोकभाषाचा विचार करता ही भाषा अहिराणी स्वरूपाची आहे. याविषयी लोकपंरपरा लोकघाटी या ग्रंथामध्ये असे संबोधले की, ''भरत अभिरी भाषेला विभाषा म्हणून संबोधते. इ. स. ६०० ते ११०० या काळात या अभिरी भाषेपासून खानदेशातील अहिराणी भाषा विकसीत झाली असावी. असे प्रा. डॉ. भगवान ठाकूर म्हणतात. बोलीभाषा म्हणजे त्या त्या प्रदेशाचे वैशिष्ट्ये असते. जळगाव, धुळे, नाशिक जिल्ह्याची मायबोली ही अहिराणी आहे. जगप्रसिद्ध भाषातज्ञ जार्ज ग्रिअर्स ने नमुद केलेल्या भारतातील ८७२ बोली भाषा व उपभाषा पैकी अहिराणी एक जुनी बोली भाषा आहे.''२

या भाषेमध्ये असलेला गोडवा लोकसाहित्य परंपरा टिकवून ठेवून आपले एक अस्तित्व निर्माण करताना दिसत आहे. या भाषा बोलण्याविषयी सुर्यवंशी रमेश यांनी 'अहिराणी बोली भाषा वैज्ञानिक अभ्यास या ग्रंथात म्हणतात की, ''जुन्या खानदेश परिसरात म्हणजे अजिंठ्याचे डोंगर सातपुड्याचे डोंगर, चांदवडचे डोंगर आणि वाघुर नदी या खोल खाणी खदाणीत वास्तव्यास असलेले अहिर लोक अहिराणी बोलतात.''३

मुलत: या खानदेश प्रदेशात राहणाऱ्या सर्व जातींची बोली ही अहिराणीची छाप असणारी बोली आहे. अहिराणी बोली भाषेच्या अनेक उपभाषा आहेत. त्यामध्ये १. मध्यवर्ती अहिराणी – धुळे, अमळनेर परिसरात ही भाषा बोलली जाते. २. बागळण – याला बागगलाणी म्हणतात ही सटाणा भागात जास्त प्रमाणात आढळते. त्याचबरोबर नंदुरबारी, डांगी, नेमाडी, लाडशिळी, पावरी भिल, भिल्ली, भावसरी, लोकापतीदारी, गुजराऊ, तडवी, मावची या उपभाषा अहिराणीत आढळतात. गुजरात प्रांत व खानदेश त्यातील जिल्हे या अनुषंगाने या भाषा बोलल्या जातात.

''अहिराणी भाषा ही मराठीची पोटभाषा नाही किंवा गुजरातची पोटभाषा नाही तर अहिराणी ही स्वातंत्र्य भाषा होती असे दिसते.

अहिराणी, गुजराती, मराठी या एकाच अपभ्रंषातून विकास पावलेल्या भाषा आहेत.''४

या भाषेने आपआपल्या पद्धतीने आपले भावनिक नाते निर्माण करून आपली एक लोकसाहित्यात छाप निर्माण केली आहे. अहिराणीत खानदेशातील जनजीवनाचे दर्शन घडविणारे विपूल आणि उदंड लोकवाङ्मय उपलब्ध आहे. अहिराणी बोली बोलणाऱ्या लोकांचे लोकजीवनाचे विविधांगी स्वरूपाचे दर्शन खानदेशी लोकसाहित्यातून, लोककलेतून दिसते.

पारंपरिक लोकजीवनामध्ये परंपरा पिढ्यान पिढ्यापासून येणरे अगळेवेगळे मनाल भावणारे, कलात्मक स्वरूपाचे साहित्य म्हणून लोकसाहित्याकडे पाहिले जाते. लोकगीते, लोककथा, कहाण्या उखाणे, म्हणी, वाक्प्रचार, लोकप्राचीन तंत्र आणि अलिखित प्रयोगसिद्ध संहिताचा समावेश यामध्ये होते. खानदेशी लोकसाहित्यामध्ये लोकसंस्कृती, लोकविधी, लोकाचार, लोक द्वैत, यावरून खानदेशी समाजजीवनही चित्रित होते. खानदेशी लोककथा, लोकगीते, लोकवाङ्मय म्हणी, कोडीचा समावेश होतो.

**खानदेशी लोककथा :**

प्राचीन कालखंडापासून लोक जीवनामध्ये मौखीक परंपरेने प्रचलित असलेल्या साहित्यामध्ये, कथावाङ्मयात लोककथांचा समावेश होताना मानवाच्या जन्माबरोबर लोककथेचा जन्म झाला असे मानले जाते. दैवतकथा उत्पत्ती कथा, नक्षत्रकथा, परिकथा, किंव अदभूत कथा, वीरकथा, पराक्रम कथा, व्रतकथा (कहाण्या) अनुभव कथा, सकीर्ण कथा इ. प्रकार लोककथामध्ये असतात. गद्य, पद्य, मिश्रीत कथा असे आविष्काराच्या अगाने या लोककथा आढळून येतात.

दैवत कथा या ग्रामदैवता वीर, मुंजोबा, म्हसोबा, खंडोबा, वाघदेव, पीर या ग्रामदेवता सह कानाबाई, रानबाई, गौराई, गुलाबाई, सप्तश्रृंगी, आसरा माया, मरीआई शीतल देवी, वडदाखान, सटवाई, पारमादेवी, एकवीरा दैवतांवर आधारित दैवतकथा वर आधारित आहेत.

**खानदेशामधील लोककथा गीते :**

खानदेशातील लोककथा गीते ही द.गो. बोरसे यांनी लोकसाहित्याचा अभ्यास या ग्रंथामध्ये मांडले आहेत. गिरजा ही कथांमध्ये 'गिरजा' ही प्रतीकात्मक सासुरवाशीण आहे तिचे माहेर, बालपण, आई, वडील, भाऊ इत्यादीचा प्रेमळपणा मांडला आहे. लग्न सासर, सासरचे नवरा, सासू-सासरा, दिर, जेल, ननंद, जावा इत्यादीच्या प्रमाणे खानदेशतील पुष्कळ स्त्री गीत एका कथासूत्रात गुंफलेली आहेत. या प्रमाणेच मेधसावळी, अहिराणी, लोकरामायण इत्यादी कथा दिसतात. या प्रमाणे अनेक लोक कथागीते खानदेशामध्ये दिसून येतात.

**खानदेशातील लोकगीते :**

खानदेशातील अहिराणी भाषेतून गीत निर्मितीच्या खुणा ज्ञानेश्वर न मादेवा च्या गीतातून दिसून येतात. या खानदेशी लोकगीताची सुरूवात अहिर संस्कृती खानदेशात स्थिर स्थावर झाल्यापासूनच झालेला दिसतो. खानदेशातील बहुतेक लोकगीते ही दैवत गीते आहेत. खानदेशातील कानबाई, रानबाई, गौराई, गुलाबाई या स्त्रियांच्या ग्रामदेवतांच्या कुलाचार, उत्सव, सणाच्या निर्मित्याने बहुतेक लोकगीते रचली. अध्यात्मपरगीते, विधी गीते, क्रिडागीते, नृत्य, स्फुटगीते, श्रमगीते, नाते संबंधीचे स्त्रीगीते असे प्रकार ही खानदेशी लोकगीतात आढळतात.

**खानदेशातील म्हणी :**

खानदेशातील लोकसाहित्यामध्ये काही म्हणीचा अंर्तभाव दिसतो. त्यामध्ये ''शेंदूर सांगा त मारूती उखळी' आना, 'गाव बळे त हनुमान बेंबी चोये', 'जानं झायं जेजुरी त संगे लेवा शिदोरी', या पद्धतीच्या अनेक म्हणी आपणास खानदेशामध्ये सापडतात.

**वाक्प्रचार :**

खानदेशातील लोकसाहित्यामध्ये एक पाट तीन ठिकणे करणं खूप आदर सत्कार गठाया होणं (तगमग होणे) वाटहेल (वाया गेले) तोफाड करणं (नाटक करणे) आधी वाक्प्रचार आपणास खानदेशी साहित्यामध्ये पहावयास मिळतो.

**उखाणे :**

विविध प्रांतामध्ये लग्नामध्ये उखाणे घेतले जातात. मराठीप्रमाणे अहिराणीतही पुष्कळ उखाणे आहेत. ''भाजी म्हा भाजी मेथीनी' रजनी, म्हणी पोरतीनी'ञ या पद्धतीचे उखाणे बहिणाबाई चौधरी यांच्या गीतात काही अहिराणी वऱ्हाडीच्या म्हणी रचल्या. त्या लोकसाहित्याला पुरक आहेत.

**आहाणे :**

आहाणे हा कोंड्याचा प्रकार कल्पनाशक्तीला बुद्धीमत्तेला अव्हान करणारा आहे. आवढंस झाड त्याला घुंगरूखभार (भुईमुगाचा शेंगाचे झाड, हरबऱ्याचे ही होऊ शकते) अशा आहाणे साहित्यात दिसतात याचा उपयोग लोक साहित्यात आढळून येते.

सर्वसाधारणपणे अहिराणी लोकसाहित्याचे महत्त्व पहाता खानदेशी स्त्री गीताची ओळख निर्माण होते. या खानदेशी लोकसाहित्याचे जतन आणि सर्वधन होणे गरजेचे आहे. आहिराणी लोकसाहित्यामध्ये अनेक प्रयोगसिद्ध लोककला प्रकाराचे सादरीकरणही होताना दिसते. त्यामध्ये खानदेशी तमाशा हा प्रामुख्याने प्रसिद्ध लोककला प्रकार आहेत. ह्या व्यतीरिक्त अनेक लोककला प्रकार आज खानदेशामध्ये सादर

होत आहेत. त्यामुळे अनेक लोककला लोकसाहित्य आज टिकवणे महत्वाचे आहे. त्यासाठी अनेक शिबीरे आयोजित करने गरजेचे आहे, विविध महोत्सवाचे आयोजन करुण लोककलावंताना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे

**संदर्भ सूची :**

१. संपा, गिमेकर, वाडकर, देवरे, बिराजदार, लोकपरंपरा लोकघाटी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. २००२
२. कृष्ण पाटील, अहिराणी लोकसाहित्य दर्शन – खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
३. रमेश सुर्यवंशी अहिराणी बोली भाषा वैज्ञानिक अभ्यास, अक्षय प्रकाशन पुणे.
४. संपा, गिमेकर, वाडकर, देवरे, बिराजदार, लोकपरंपरा लोकघाटी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. २००२

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*

**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

# कर्मवीर अण्णासाहेब पुनाजी लळिंगकर यांचे खान्देशातील दलित मुक्ती चळवळीतील योगदान

**प्रा. राजेंद्र बी. निकुंभे**
सिनियर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा.
**प्रा. ज्ञानेश्वर ईश्वर गवळे**
सिनियर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा.

**संशोधनाची उददीष्टे –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलितोध्दाराचा सामाजिक चळवळीतील खान्देशातील खंदे शिलेदार पुनाजी लिंगाजी लळिंगकर ऊर्फे अण्णासाहेब लळिंगकर आंबेडकर चळवळीतील खान्देशातील कार्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन कार्याचे् काही उद्‌देश समोर ठेवले आहेत.

१) अण्णासाहेब पुनाजी लळिंगकर यांच्या प्रारंभिक जीवनाचा आढावा घेऊन त्यांच्या कौटुबिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.
२) अण्णासाहेब पुनाजी लळिंगकर यांच्या दलित मुक्ती चळवळीतील योगदानाचे परीक्षण करणे .
३) अण्णासाहेब पुनाजी लळिंगकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत सहभाग घेतलेल्या सत्याग्रह विविध चळवळीतील कार्याचे अध्ययन करणे.
४) अण्णासाहेबांच्या दलितांच्या उध्दारासाठी खान्देशातील केलेल्या सामाजिक, राजकीय , सांस्कृतिक कार्याचा आढावा घेणे.
५) अण्णासाहेबांच्या दलितांच्या उध्दारासाठी खान्देशातील चळवळीतील त्यांच्या सोबत असलेल्या पुढारी नेते जनसहभातील अध्ययन करणे.
६) अण्णासाहेबांच्या दलितांच्या उध्दारासाठी खान्देशातील सहकारी ज्ञात अज्ञात वंचिताचा सहभाग शोधणे.
७) अण्णासाहेबांनी खान्देशातील दलित शोषितांचे प्रश्न वर्तमानपत्र, सभा, सत्याग्रह, मोर्चा याव्दारे कशा पध्दतीने मांडले याचे अध्ययन करणे.
८) अण्णासाहेबांनी दलित मुक्ती संग्रामात वापरलेले वर्तमानपत्रे साप्ताहिक मासिके इ. चा अभ्यास करणे.

**प्रस्तावना :–**

मानवी संस्कृतीच्या प्रगतीचा अभ्यास करीत असतांना इतिहासाला अनन्य साधारण महत्व आहे. त्यादृष्टीकोणातून इतिहासाची व्यापकता वाढत चाललेली आहे. केवळ धर्म, प्रशासन, कायदा याचा विचार न करता मानवी समाजामध्ये ज्या घटना घडत असतात त्याचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून दिवसेंदिवस इतिहासाची उपयोगिता वाढत चालली आहे. मानवाने सिध्द केलेल्या प्रगतीच्या अनेक क्षेत्रातील घटनांचा अभ्यास इतिहासात केला जातो. मानवी इतिहासामध्ये त्याच्या वाटचालीमध्ये सामाजिक चळवळीचा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो. एखादी चळवळ उभी राहते. तिच्यातून नवीन व्यक्ती उदयास येते. तिचे नेतृत्व जडणघडण याचा अभ्यास अधिक परिणामकारक होणे गरजेचे आहे. त्यातील भारतातील दलित चळवळ महत्वपुर्ण मानली जाते. संपूर्ण भारतात किंबहुना जगात या चळवळीकडे आशेने पाहिले जाते. तिचा विविध पैलूंचा यथायोग्य अभ्यास होणे गरजेचे आहे. प्राचीन भारतातील उत्तर वैदिक काळात वर्ण व्यवस्था जन्मावर आधारीत झाली. त्यात शुद्रांची सामाजिक स्थिती फारच खालावलेली होती. शूद्रांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारण्यात आला. आधुनिक भारतात पाश्चात्य शिक्षणाने प्रभावित होऊन अनेक भारतीय समाजसुधारक पुढे आले. आणि समाजात जनजागृती घडवून दलितांना गुलामगिरीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. दलितांना इंग्रजाच्या काळात शिक्षण व नोक–यांची संधी मिळाल्याने अस्पृश्याना गुलामगिरीची जाणीव होऊन ते अमानुष्य प्रथेला विरोध करु लागले. त्यातूनच संघर्षाची बीजे पेरली गेली.

**दलित मुक्त चळवळीची थोडक्यात पार्श्वभूमी –**

१९ व्या शतकाच्या सुरवातीला महाराष्ट्रात दलित चळवळ मोठया प्रमाणात विकसित होऊ लागली. त्या चळवळीचे साधारणपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपुर्वींची दलित चळवळ महात्मा ज्योतीराव फुले, विठठ्ल रामजी शिंदे, छत्रपती शाहूमहाराज, सयाजीराव गायकवाड, गोपालबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसनराव बनसोडे यांनी समाजाच्या कृतीशीलतेवर भर देऊन समाज सुधारणेसाठी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरानी दलित मुक्तीचा लढा खंबीरपणे चालविला. दलित, पददलित उपेक्षितांना सामाजिक समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी जीवनभर लढा दिला. सामाजिक, आर्थिक समतेची जोड मिळाल्याशिवाय राजकीय भक्कमपणा येणार नाही. यासाठी जागृती केली.

**आंबेडकरोत्तर खान्देशातील दलित चळवळ –**

अस्पृश्यांच्या हक्कांना मान्यता मिळवण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपला लढा तीव्र केला. दलितांवर होणा–या अन्याय,

अत्याचार विरुध्द संघर्ष करणे, त्याच्यात शिक्षणाचा प्रचार करणे, इत्यादी सर्व कार्यातून डॉ. बाबसाहेबांची चळवळ जात,वर्ग, आणि वर्ण यांचा शेवट करणारी होती, डॉ.बाबासाहेबांच्या नंतर महाराष्ट्रात विशेषत: खानदेशात त्यांचे कार्यांची नौका पुढे नेण्याचे कार्य कर्मवीर दादासाहेब गायकवाड, शांताबाई दानी, मेढे गुरुजी, भीमराव कर्डक, रामदास वीजर रामराजे, भिकाजी पवार, बी.पी.साळवे, अमृतराव रणखांबे, विठठलराव रणखांब, आणि अण्णासाहेब लळिंगकर इ. मंडळींनी केले.

**पुनाजी लिंगाजी लळिंगकर उर्फ अण्णासाहेब लळिंगकर –**

आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी ठरावे असे आंबेडकर चळवळीतील महत्वपूर्ण व्यक्तीमत्व म्हणजे खानदेशातील दलित चळवळीचे सिंह सेनापती आणि किल्लेलळिंग धुळे येथील निष्ठावंत भिमसैनिक खानदेशचा वाघ डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीतील खानदेशातील खंदा शिलेदार म्हणजे कर्मवीर पुनाजी लिंगाजी लळिंगकर ऊर्फे अण्णासाहेब लळिंगकर होय. अण्णासाहेब लळिंगकर हे मुळचे धुळे जिल्हयातील आर्वी या गावाचे रहिवाशी होते. परंतु त्यांच्या इदाईस परिवाराने धुळयाच्या दक्षिणेस १० कि.मी. अंतरावर लळिंग गावात वास्तव्य केले. पुनाजी लळिंगकर हे बालपणापासून अतिशय संघर्षशील वृत्तीचे होते. आपल्या किशोर वयापासूनच त्यांनी अन्याय, अत्याचारा विरुध्द बंडखोरी करण्यास सुरवात केली. अण्णासाहेबांचे औपचारिक शिक्षण फारसे झाले नव्हते. म्हणून त्यांच्या भाषाशैलीवर आपल्या बोली भाषा अहिराणीचा प्रभाव जाणवतो. अण्णासाहेब लळिंगकर यांच्या वडिलांचे नाव लिंगाजी शिवराम इंदाईस असे होते. पुढे लळिंग या गावाच्या नावावरुन लोकांनीच लळिंगकर हे कुल प्रचलित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली दलित मुक्ती चळवळीचा झेंडा सातपुडयाच्या पायथ्याशी रोवणारे रणवीर म्हणजे अण्णासाहेब लळिंगकर होते. बाबासाहेबांच्या हाकेला धावून जाणारे गोर–गरिबांच्या कल्याणासाठी सर्वस्वाचा त्याग करणारे निस्वार्थी जीवनाचा आदर्श अण्णासाहेबांनी समाजापुढे ठेवला.

एका जाहीर सभेत अण्णासाहेब लळिंगकरांना उददेशून डॉ. बाबासाहेबांनी लळिंगकर माझा उजवा हात आहे. असे संबोधले. डॉ.बाबासाहेबांनी सामाजिक लढयासाठी रणशिंग फुंकले त्या लढयात साधे सैनिक म्हणून अण्णासाहेब सामील झाले. समाजाच्या कल्याणासाठी बाबासाहेबांच्या सामाजिक लढयात अण्णासाहेब प्रत्येक हाकेला धावून गेले. आपल्या सर्वस्वाची होळी करुन त्यागी निस्वार्थ जीवनाचा आदर्श त्यांनी आपल्यासमाजापुढे ठेवला.

अण्णासाहेब लळिंगकरांचे संपूर्ण आयुष्य सामाजिक न्यायासाठी संघर्षाने व्यापलेले आहे. त्यांचा जीवनाचा रोमहर्षक, पराक्रमी त्यागी, आणि निस्वार्थी जीवनपट पाहत असतांना सामाजिक समतेच्या लढयात उडी घेण्याची प्रत्येकाला स्फूर्ती प्राप्त होते. अण्णासाहेब लळिंगरांचे संपूर्ण आयुष्य पुनाजी लिंगाजी लळिंगकर ऊर्फे अण्णासाहेब लळिंगकर अनेक चित्तथराक,धाडसी, व महत्वपूर्ण घटनांनी भरलेले आहे.

**काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात सहभाग –**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य गणल्या गेलेल्या समाजाला मानवतेचा अधिकार मिळावा म्हणून सत्याग्रह मार्ग अवलंबिला. अस्पृश्यांच्या मनावरील न्यूनगंड गळून आत्म सन्मानाची भावना वाढीस लागण्यासाठी २० मार्च १९२७ रोजी नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह केला. त्यांची व्दाही संपूर्ण महाराष्ट्रात पसरली. यावेळी नाशिकमध्ये भाऊराव कृष्णराव ऊर्फे दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अण्णासाहेब सत्याग्रहात सामील झाले सोबत श्री.रंगनाथ भालेराव, पतिंग पावनदास, संभाजी रोकडे, वस्ताद रुपाजी रोकडे, पुंजाजी नवसाजी जाधव, सुभेदार घाडगे, भास्कर इंद्रेकर, देवराम नाईक, डी.व्ही.प्रधान, ग.नी.सहस्त्रबुध्दे, शिवणकर आर.डी.आदी कायेकर्ते सहभागी झाले येथील सत्याग्रहींना अटक करुन धुळयाच्या कारागृहात आणले जात असे. सत्याग्रहाच्या छावणीत अण्णासाहेब पुनाजी लळिंगकर यांच्याकडे खेडा–पाडयातून जनतेने पाठवलेली मदत आणि आणलेल्या धान्याची पोते वैगेरे व्यवस्था लावण्याचे काम सोपविले. कर्मवीर दादासाहेब गायकवाड श्रीमान अमृतराव रणखांबे, सावळेराम बापुजीदाणी हरिभाऊ पगारे श्री. शिरोळकर इ. सोबत अण्णासाहेब पुनाजी लळिंगकर यांनाही अटक करण्यात आले. सभेला मुंबई, पुणे, महाराष्ट्राच्या खेडयापाडयातून लोक आले होते.

**डॉ.बाबासाहेबांचे खान्देश भेटीत लळिंग बंगल्यात संरक्षकाची भूमिका –**

डॉ. बाबासाहेब कोर्टाच्या कामानिर्मित धुळयाला येत होते , अण्णासाहेबांची इच्छा होती जो पर्यंत डॉ.बाबासाहेब धुळयाला येत नाही तो पर्यंत आपण दाढी काढणार नाही असा निश्चय पुनाजी लळिंगकर अण्णांनी केला . परंतु कामाच्या व्यापात बाबासाहेबांचे येण्याचे जमत नव्हते. काही दिवसांनी दि. २९ जुलै १९३७ रोजी डॉ.बाबासाहेब धुळयाला मुक्कामी आले. त्यांची राहण्याची व्यवस्था लळिंग परिसरात लांडोर बंगल्यात करण्यात आली. लांडोर बंगल्याचा परिसर घनदाट वनराईने नटलेला होतो. शेजारी गवळी राजाचा किल्ला होता. तेथे २९,३०,३१ जूलै १९३७ या तीन दिवसात संरक्षणांची जबाबदारी अण्णांनी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या सोबत अर्जुन रायाजी सावंत, सखाराम केदार, सुखदेव केदार कप्तान भिमराव सांळुखे इ. मंडळी होती.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या सत्याग्रह चळवळीतील धुळे जिल्याचे नेतृत्व –**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड नेतृत्त्वाखाली राज्यभर भूमिहीन सत्याग्रहाच्या चळवळीने जोम घरला जिल्हया जिल्हयातून हजारो स्त्री – पुरुष आणि तरुण सत्याग्रह चळवळीत सहभागी झाले. १९५९ मध्ये भूमिहिनाच्या सत्याग्रहाला नंदुरबारात सुभाष चौकात कर्मवीर दादासाहेब

गायकडांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन अण्णासाहेबांनी चळवळीचे रणसिंग फुंकले. १९६४ सालच्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहात कर्मवीर दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली अण्णासाहेबांच्या सोबज हजारो बौध्द व आदिवासी बांधवानी तुरुंगवास पत्करला.

नगर देवळे जि. जळगाव येथील सभेत अण्णासाहेबांनी महात्मा गांधी व काकासाहेब बर्वे वगैरे नेते मंडळीवर टीका केली असता त्यांच्यावर सरकारने खटला भरला होता. त्या खटल्याचे काम माजी राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील यांचे वडील व त्याकाळचे सुप्रसिध्द कायदे पंडित श्री पाटील साहेब यांनी पाहिले व अण्णासाहेबांना आरोपातून मुक्त केले.

**धुळे जिल्हयातील सार्वजनिक विहीर सत्याग्रह –**

अस्पृश्यता चळवळीचा एक भाग म्हणून मांग, चांभार, भंगी, महार बौध्द बांधवाना एकत्रित व संघटीत करण्यासाठी गरताळ देवभाने इ. गावी यशस्वी प्रयत्न केला. धुळे जिल्हयातील मोहाडी, जुन्नर, लळिंग देवभाने इ. गावात लोकल बोर्डाच्या सार्वजनिक विहिरीवर अस्पृश्यांना पाणी भरण्यासाठी खुल्याव्हाव्या म्हणून सत्याग्रह केला. बाबासाहेबाच्या कामगार चळवळीचे लोन खेडोपाडी पसरवण्यासाठी युनियन फंड उभारण्यात अण्णासाहेबांनी तिसरा क्रमांक मिळवून बाबांची शाबासकी मिळवली. नंदुरबारला संमिश्र कॉ–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी काढुन त्यात अनेक आदिवासी भिल , मांग, चांभार, व बौध्द समाजातील मंडळीला सभासद करुन जाती रहित समाज रचनेकडे वाटचाल केली.

डॉ.बाबासाहेबाच्या आंदोलनात अण्णासाहेबांनी स्वत:ला झोकुन दिले डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी स्थापन केलेल्या दलित फेडरेशनचे धुळे जिल्हयाचे कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर सन १९२७ साली पहिले अध्यक्ष झाले आणि संपूर्ण जिल्हयात चळवळीचा प्रसार केला.

**समतावादी दलित मंडळाचे अध्यक्ष –**

१९३२ साली धुळे जिल्हयात सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीसाठी समतावादी दलित मंडळ स्थापन केले. कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर हे त्या मंडळाचे पहिले अध्यक्ष होते. सिध्दार्थ विधी महाविद्यालयाचे प्राचार्य व मुंबईचे माजी महापौर आप्पासाहेब बोराळे त्यांचे जनरल सेक्रेटरी होते. अण्णासाहेब पुनाजी लळिंगकरांनी सायकलीवर फिरुन धुळे जिल्हयात पक्षाचा प्रचार केला.

**दलित शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष –**

डॉ. बाबासाहेबांचा आदेशावरुन दादासाहेब घोगरे व काकासाहेब बर्वे यांचे प्रमाणेच धुळे जिल्हयात अनेक शाळा व वसतीगृह, छात्रालये काढली. ६ जुन १९३९ साली दलित शिक्षण प्रसारक मंडळ या नावाने एक मध्यवर्ती संस्था कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर यांनी काढली. त्यामाध्यमातून अक्राणी (धडगाव) तळोदा, नवापूर, शहादा, नंदुरबार येथील निराश्रीत गरीब विदयार्थी ,विदयार्थीनीसाठी नंदुरबार येथे छात्रालयाची स्थापना केली. अनेक निराधार मुलां– मुलींना दोनवेळचे जेवण आणि शिक्षणाची सोय केली. हरिजन छात्रालयाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर छात्रालय असे नामकरण करुन म.ज्योतिबा फुले हायस्कुलची स्थापना केली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई असतांना राज्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीने मोठा जोम धरला. चळवळीत १०५ सत्याग्रहींना निर्दयीपणे बंदुकीच्या गोळीने मारले गेले. अशा राज्य हिताच्या बहुजन चळवळीत जिल्हयातून दलित सत्याग्रहींचे नेतृत्व कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर यांनी केले.

**धुळे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष –**

दुस–या महायुध्दाच्या काळात ठिकठिकाणी महार बटालियन काढण्यात आल्या. त्यावेळी सातारचे माजी आमदार श्री सावंत साहेब यांच्या आदेशानुसार अण्णासाहेब धुळे जिल्हयात एक्स्ट्रा रीकुटींग ऑफिसर म्हणून काम करुन हजारो दलित बांधवाना सैन्यात सामील होण्यास उत्तेजन दिले. बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य धुळे जिल्हयातील खेडोपाडी पोहचवण्याचे कार्य अण्णासाहेबांनी मोठया जोमाने व जिददीने केले. त्यांचे रुपांतर शेडयूल कास्ट फेडरेशन मध्ये झाल्यानंतर अण्णासाहेबांनी संपूर्ण जिल्हयात त्याचे लोन पसरविले. शेडयूल कास्ट फेडरेशनचे रुपांतर रिपब्लिकन पक्षात झाल्यानंतर पक्षाचे पहिले अध्यक्ष कर्मवीर दादासाहेब भाऊराव गायकवाड (नाशिक) झाले. दादासाहेबांनी भारतभर पक्ष्याच्या शाखा स्थापन केल्या. १९५७ पासून धुळे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष व डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीतील एकमेव नेते म्हणून अण्णासाहेब उदयास आले. व मोठया उत्साहाने आणि जोमाने कामाला लागले.

**समता सैनिक दलाचे कार्य –**

धुळे जिल्हा समता सैनिक दलाचे पहिले अध्यक्ष कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर होते. पार्टीचे जिल्हाभर प्रचार प्रसाराचे कार्य अण्णासाहेब सायकलीवर फिरुन करीत असत. सनातनी काळातही बैठका / सभाच्या माध्यमातून निर्भिडपणे केले. त्याच्या जोडीला कप्तान पदी धुरा सांभाळणारे भिमराव चांगदेव सांळुखे (वस्ताद) होते. अण्णांनी चितोड येथील कचरु डोके, हिवजी गायकवाड यांच्याकडे आखाडा सुरु करण्याचे काम सोपविले. आखाडयामध्ये दलित तरुण अस्पृष्य दलितांचे संरक्षण करणेसाठी छडीपटटा, दांडपटटा लाठीकाठी फिरवण्याचे प्रशिक्षण देण्याचे काम सोपविले. अण्णांच्या नेतृत्वाखाली धुळे जिल्हयाचा आखाडा महाराष्ट्रात अग्रेसर होता.

कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर यांच्या प्रखर वकृत्व आणि धाडसीपणाच्या बाणेदार नेतृत्वामुळे खानदेशच्या तमाम दलितांनी त्यांना खान्देशचा सिंह पदवी बहाल केली. अण्णासाहेबांचा बुलंद आवाज कणखर ध्वनीमुळे खानदेशची मुलूख मैदान तोफ असे म्हटले जाते. खान्देशच्या भूमीत अण्णासाहेबांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे दलित प्रगतीच्या नि:स्सीम प्रेमाने अविरतपणे कार्य केले. यासाठीच महाराष्ट्र

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

सरकारने २० जुन १९७४ साली त्यांना दलित मित्र पुरस्कार देऊन सन्मानित केले. ३१ जाने १९७६ रोजी कर्मवीर पुनाजी लिंगाजी लळिंगकर ऊर्फे अण्णासाहेब लळिंगकर यांचा बौध्दवास झाला.

**निष्कर्ष –**

१) कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर यांच्या प्रखर वक्तृत्व आणि धाडसीपणाच्या बाणेदार नेतृत्वामुळे खान्देशच्या आंबेडकर चळवळीला नवी दिशा देण्याचे कार्य केले.

२) धुळे जिल्हयातील सामाजिक, राजकीय, आथिक, शैक्षणिक प्रगतीसाठी समातावादी मंडळ स्थापन केले. त्या अण्णासाहेबांचे या कार्याचा समाज सुधारकांना निश्चितच लाभ होईल.

३) कर्मवीर दादासाहेब गायकवांडाच्या नेतृत्वाखाली राज्यभर भूमिहीन सत्याग्रहाच्या चळवळीने हजारो बौध्द व आदिवासी बांधवासोबत अण्णासाहेबांच्या तुंरुगवास पत्करला. त्यामुळे समाजकार्य करणा-या उदयोन्मुख समाजसुधारकांना अण्णासाहेबाच्या नि:स्सिम त्यागाची व प्रामाणिकपणे समाजकार्य वृत्ती दिशा दर्शक आहे.

४) धुळे जिल्हा समता सैनिक दलाचे पहिले अध्यक्ष कर्मवीर अण्णासाहेब लळिंगकर म्हणून पार्टीचे जिल्हाभर प्रचार प्रसाराचे कार्य अण्णासाहेब सायकलीवर निर्भिडपणे केले. या कार्याचा नवा आदर्श निर्माण ठेवला.

५) डॉ. बाबासाहेबआंबेडकराच्या प्रेरणेने अण्णासाहेब पुनाजी लळिंगकरांनी अनेक शाळा, वसतीगृह, छात्रालये, काढली. त्यामुळे समाजातील निराश्रीतांना शिक्षणाची सोय झाली.

६) महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, भूमिहिनांची चळवळीतील सहभाग इ . सर्व चळवळीत अण्णासाहेबांनी उल्लेखनीय कार्य केले. दलित प्रगतीच्या नि:स्सिम प्रेमाने अविरतपणे कार्य केले.

७) खान्देशच्या भूमित अण्णासाहेबांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे म्हणून महाराष्ट्र सरकारने २० जून १९७४ साली त्यांना दलित मित्र पुरस्कार देऊन सन्मानित केले. या कार्याचा जनतेसमोर आदर्श निर्माण होईल.

**संदर्भ सूची :**

१) डॉ. भिमराव रामजी आंबेडकर : ( समग्र चरित्र, खंड १ ते १५ ) चांगदेव भवानराव खैरमोडे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
२) आंबेडकरांचे सत्याग्रह आणि ब्रिटीश सरकार – डॉ. सी.एच. निकुभ
३) आंबेडकरी जलसे – डॉ. भगवान ठाकुर
४) आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी – कृष्णा मेणसे लोक वाडमय गृह प्रकाशन
५) डॉ. आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह संकलन – य.दि. फडके
६) डॉ. आंबेडकर आणि समकालीन संपादक : सुहास सोनवणे
७) आंबेडकरवादी मराठी साहित्य : यशवंत मनोहर युगसाक्षी प्रकाशन, नागपुर प्रथमावृत्ती १९९९
८) डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास शेषराव मोरे राजहंस प्रकाशन पुणे १९९८
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर पोप्युलर प्रकाशन १९५४ (डॉ.आंबेडकर हयातीत प्रकाशित)
१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र – विजय जाधव – मनोरमा प्रकाशन
११) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे – क्षीतिज पब्लिकेशन नागपुर– २००२
१२) डॉ. भिमराव रामजी आंबेडकर : अस्पृशांचा उध्दारक – चांगदेव भगवानराव खैरमोडे
१३) समकालीन सहका-यांच्या आठवणीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर – लोकवाड्मय गृह प्रकाशन
१४) विद्रोहाचे पाणी पेटले आहे – गंगाधर पानतावणे
१५) सत्याग्रही दादासाहेब गायकवाड – प्रा. जे.जे. खैरनार

नियतकालिके –

१) सुगावा प्रकाशन – संपादक विलास वाघ
२) अस्मिता दर्श – संपादक – गंगाधर पानतावणे
३) साप्ताहिक शहिद भूमी – दिवाळी विशेषांक ज्ञ् २००५
४) पद्मश्री दादासाहेब गायकवाड – लेख पांडव प्रताप – भावना भार्गवे
५) स्मरणिका : भिमस्मृती यात्रा – फुले, आंबेडकर, स्टडी सर्कल, संपादक पप्पु पाटोळे

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# ब्रिटीशकालीन खानदेशमधील दळणवळणाच्या क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम खात्याचे ( P.W.D. ) योगदान

**डॉ. संजय जीभाऊ पाटील**
इतिहास विभाग, क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय,
नवलनगर, ता.जि. धुळे.

**प्रास्ताविक :**

इ.स.१८१८ मध्ये मराठा सत्तेचा अस्त होऊन संपूर्ण भारतभर ब्रिटीश सत्तेचा अंमल सुरु झाला मराठा सत्तेच्या काळात लष्कराच्या हालचाली परचक्रे नैसगिाक आपत्तींनी खानदेश बेचीराख झाला होता. ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर खानदेशातही स्थीर प्रशासन निर्माण होऊ लागले होते. खानदेशाच्या विकासात ब्रिटीश काळात स्थापन झालेल्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते. इ.स. १८५४ मध्ये लॉर्ड डलहौसी हया गवर्नर जनरलने सार्वजनिक बांधकाम खात्याची निर्मिती केली होती. या खात्यामार्फत खानदेशात रस्ते, पूल, रेल्वेमार्ग सरकारी कचेऱ्या दवाखाने इ.ची बांधकामे झाली ही कामे करीत असतांना नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या खानदेशातील रयतेला रोजगार उपलब्ध होत होता. सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत खानदेशात मोठया प्रमााणात रस्ते तयार करण्यात आले. खानदेशातून भारतात इतरत्र जाणाऱ्या रस्त्यांना ते जोडण्यात आले त्यामुळे खानदेशातील दळणवळण क्षेत्रात फार मोठी प्रगाती घडून आली. त्यामुळे खानदेशात पुढील काळात मोठया प्रमाणात आर्थिक प्रगती घडून आल्याचे लक्षात येते. प्रस्तुत शोध निबंधातून सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत करण्यात आलेल्या कामांचा सन १८५४ ते १८७२ या काळातील अल्पसा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्ता काळात भारतात इ.स. १८५४ पुर्वी सार्वजनिक बांधकाम खाते P.W.D. हे लष्करी बोर्डाच्या नियंत्रणाखाली होते. लष्कराशी निगडित असलेल्या बहुविध कामांमुळे अन्य कोणत्याही बाबीकडे लक्ष देणे अशक्य होते. लष्कराच्या गरजेनुसार कामे केली जात होती असे असले तरी लॉर्ड डलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आल्यानंतर त्याने आपल्या कार्याची जबाबदारी क्षमतेने पार पाडल्याचे दिसून येते त्यासाठी त्याने इ.स. १८५४ मध्ये स्वतंत्र अशा सार्वजनिक बांधकाम खात्याची निर्मिती केली होती. लॉर्ड डलहौसीने प्रत्येक प्रांतात स्वतंत्र कमिशनची निर्मिती केली या नियुक्त केलेल्या कमिशनला त्या त्या प्रातांत कोणती सार्वजनिक बांधकामे करावीत हे ठरविण्याचे स्वातंत्र्य दिले होते. त्यासाठी प्रत्येक प्रांतामध्ये सार्वजनिक बांधकाम खाते निर्माण करण्यात आले होते मुंबई प्रांतातही सार्वजनिक बांधकाम खाते निर्माण करण्यात आले या खात्याचा प्रमुख म्हणुन चीफ इंजिनिअर (मुख्य अभियंता) नेमण्यात आला. त्याच्या मदतीला कार्यकारी अधिकारी नेमले महत्वाचे म्हणजे या खात्यातील सर्वच अधिकारी हे इंग्रज होते. सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत प्रामुख्याने रस्ते तयार करणे, पुल बांधणेची कामे दिली जात असत. याशिवाय कालवे, बंधारे तळे यासारखी सरकार व रयत या दोघानांही उपयुक्त ठरतील अशी कामे केली जात होती ब्रिटीश आमदानीच्या प्रारंभीच्या काळात खानदेश पुर्णतः बेचिराख झाला होता; परंतु सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत खानदेशात अनेक रस्ते व पुलांची बांधकामे करण्यात आली त्यामुळे खानदेशातील दळणवळणाच्या क्षेत्रात प्रगती घडून आली होती अंतराची अडचण दूर झाल्यामुळे देशातील निरनिराळ्या भागांशी खानदेशचा संपर्क सुरु झाला होता. यामुळे एक राष्ट्रीयत्वाची भावना खानदेशातही रुजण्यास मदत झाली होती. तसेच ब्रिटीश सत्तेची पकड घट्ट होण्यासही मदत झाली होती म्हणूनच गव्हर्नर जनरल डलहौसी याची भारतातील आठ वर्षाची (१८४८ ते १८५६) कारकिर्द अत्यंत महत्वपूर्ण मानली गेली त्याच्या आठ वर्षाच्या कारकिर्दीत भारतावरील ब्रिटीश साम्राज्याचा विस्तार पूर्ण झाला होता त्याने निर्माण केलेल्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे महत्व निश्चितच महत्वपूर्ण होते. डलहौसीने आपले साम्राज्यवादी धोरण हिंदुस्थानात राबविताना आधुनिकीकणाचे धोरणही राबविल्याचे दिसून येते. तो आक्रमक साम्राज्यवादी गव्हर्नर जनरल होता त्याने हिंदूस्थानातील अनेक प्रदेश काबीज केले होते. जिंकलेल्या या नवीन प्रदेशांमध्ये याने कार्यक्षम अशी प्रशासकीय यंत्रणा राबविली होती. त्यासाठी त्याने शासनाचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केला होता. त्याने केलेल्या सुधारणांविषयी समकालीन इंग्रज अधिकारी रॅम्से मूर याने म्हटले आहे की "The distinctive features of modern India have been fore more influenced by Dalhousies work than by the mutiny itself or by the Constituitional adjustment which followed it" [2]

लॉर्ड डलहौसीने निर्माण केलेल्या स्वतंत्र अशा सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्य (P.W.D.) हे मुंबई इलाख्या बरोबरच खानदेशातील कार्यही महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. सन १८५३-५४ मध्ये या विभागामार्फत खानदेशात जवळपास १६१ किलोमिटर अंतराचे हंगामी रस्ते तयार करण्यात आले होते. यावर जवळपास ९,८८० रुपये खर्च करण्यात आले होते [३]

सन १८६२ मध्ये खानदेशातील मालेगाव ते मनमाड या रस्त्याचे काम P.W.D. मार्फत केले होते. त्याचप्रमाणे खानदेशातून जाणाऱ्या मुंबई-आग्रा महामार्गाचे काम सुरु करण्यात आले होते. या कामावर ५०,००० रुपये खर्च झाल्याची नोंद सरकारी अहवालात आढळते [४] तसेच कोंडाईबारी घाटातील रस्ता तयार करण्याचे काम P.W.D. या विभागामार्फत करण्यात येवुन त्यावर १९,००० रुपये खर्च झाल्याची नोंद

ISSN : 2348-7143
Dec. 2018

ब्रिटीश दप्तरात आढळते[५] या कामामुळे खानदेशातील रस्ते वाहतुक सुरळीत होण्यास मदत झाली होती. दिनांक २९

ऑगास्ट १८६१ रोजी भारत सरकारचे सचीव कर्नल यूल यांच्या पत्र क्र ३१२२ वरुन मुंबई प्रांतासाठी रस्त्याच्या कामासाठी २,५०,००० रुपयांची वार्षिक तरतुद करण्यात आली होती त्यापैकी सर्वाधिक म्हाजे ७२,००० रुपये खर्च एकटया खानदेशातील रस्ते कामांवर झाल्याची नोंद वाचावयास मिळते.[६] खानदेशच्या जिल्हाधिका-यांच्या देखरेखी खाली मुंबई आग्रा महामार्गावरील नरडाणा ते तापी नदीच्या पर्यंतचा ५ मैल लांबीच्या महामार्गाचे काम हाती घेण्यात आले होते. त्याचप्रमाणे खांडबारा घाट धुळे-सुरत महामार्गाचे कामही सुरु करण्यात आले होते या काळात ब्रिटीश सरकारने १,०५,३५५ रुपये खर्च केले होते.[७] सन १८६२ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत चाळीसगांव ते सुरत, मनमाड ते मालेगांव नांदगाव ते बऱ्हाणपूर, तापी ते बोरघर इत्यादी कामे केली होती.[८] वरील कामांप्रमोच सन १८६४ मध्ये पिंपळनेर जवळ बांधकाम शिरपुर व तोरखेडा रस्त्यांची कामे केली तसेच मुंबई आग्रा महामार्गावरील चांदवड ते बोरघर हा रस्ता तयार करण्याचे काम करण्यात आले यासाठी ३९,३२५ रुपये निधी खर्च करण्यात आला होता.[९] सन १८६२ मध्ये धुळे ते चाळीसगांव रस्ता व त्यावरील पुलांची बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आली होती धुळे ते तळवाडे, मेहुणबारे ते चाळीसगांव असा एकूण ४२ मैलाचा रस्ता तयार करण्यात आला होता. बोरी नदी वरील पुलाचे बांधकामही याच काळात केले होते. या कामावर हजारो लोक काम करीत होते. या कामांवर १,२७,७८१ रुपये एवढा खर्च करण्यात आला होता.[१०] खानदेशातील कोंडाईबारी घाटातील रस्ता देखील या विभागामार्फत याच वर्षी तयार करण्यात आला होता. या कामावर ४,०९० रुपये खर्च झाल्याची नोंद वाचावयास मिळते.[११]

खानदेशात ब्रिटीश सरकारने सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत रस्त्यांची कामे केली होती धुळे ते चाळीसगांव रस्ता व त्यावरील पुलांची बांधकामे केली गेली या कामावर ९८,५६८ रुपये खर्च केले होते.[१२] तसेच नांदगांव ते औरंगाबाद रस्ता तयार करण्यात आला या कामासाठी ब्रिटीश सरकारने ७,२३४ रु.इतका निधी उपलबध करुन दिला या कामांवर १६,८८९ रुपये खर्च करण्यात आला होता.[१३] .

एवढेच नव्हे तर खानदेशात ब्रिटीश सरकारने सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत सन १८६८-६९ या काळात अनेक रस्ते तयार करण्याचे काम हाती घेतले होते. याच काळात खानदेशातुन जाणाऱ्या मुंबई आग्रा महामार्गाचे दुरुस्तीचे काम केल्याचे वाचावयास मिळते

त्यावर ६९९९ रुपये खर्च केले होते.[१४] याच वर्षी चाळीसगांव रेल्वे स्टेशनपासून कन्नड घाटापर्यंतच्या रस्त्याचे काम करण्यात आले होते या कामावर ३,००० लोक काम करीत होते त्यासाठी ४९१९४ रुपये एवढा खर्च करण्यात आला होता.[१५] तसेच भवरबारी घाट तयार केला व त्यावर सरकारने ५७,५८४ रुपये मंजूर केले होते.[१६] याच वर्षी ब्रिटीश सरकारने खानदेशातील भुसावळ जंक्शन रेल्वे डेपोचे काम हाती घेतले होते. जवळपास आठ ब्लॉक ट्रॅफिक विभागाशी बांधण्यात आले होते सरकारी अधिकांऱ्यांच्या निवास व्यवस्थेसाठी व मुख्य अभियंत्यांच्या निवासासाठी इमारतीची बांधकामे करण्यात आली होती. तसेच एक प्रवासी बंगला देखील बांधण्यात आला होता. या सर्वासाठी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी तापी नदी मधुन पाईप लाइनचे काम करण्यात आले होते.[१७]

खानदेशात सन १८६८-६९ मध्ये ब्रिटीश सरकारने लष्करासाठी स्थानिक पायदळाच्या इस्पितळ निर्माण करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले त्यासाठी ४०,१८६ रुपये सरकारने खर्च केल्याची नोंद कागादपत्रातून वाचावयास मिळते.[१८]

याच काळात खानदेशातील चाळीसगाव येथे P.W.D. मार्फत मामलेदार कचेरी चे बांधकाम केले होते हे काम सन १८७१ पर्यंत पूर्ण करण्यात आले होते.[१९] सन १८७१ -७२ मध्ये खानदेशातील धुळे -साक्री -पिंपळनेर रस्ताही तयार करण्यात आला होता [२०] तसेच कजगांव पारोळा रस्ताही तयार करण्यात आला होता. सरकारने या कामावर १,८४,१६० रुपये मंजुर केले होते. याच काळात औरंगाबाद-चाळीसठ्ठांव रस्त्यावरील औट्रॅम घाटाचे काम सुरु केले होते. त्यासाठी ब्रिटीश सरकारने २०,००० रुपये खर्च केले होते [२१] सन १८७७ मध्ये मुंबई प्रांतात दुष्काळाने थैमान घातले होते त्यामुळे लाखो लोक मृत्यमुखी पडले होते तेव्हा ब्रिटीश सरकारने खानदेशातील अनेक ठिकाणी सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत कामे सुरु केली होती एप्रिल १८७७ मध्ये P.W.D. मार्फत ३३७८ सार्वजनिक बांधकाम खात्या मार्फत ३३७८ कामे सुरु होती.[२२] ऑगस्ट १८७७ मध्ये P.W.D. ची ९६९८ कामे सुरु होती व त्यायोगे लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला होता[२३] नोव्हेंबर १८७७ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत १३०९ कामे सुरु केली होती व लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला होता[२४]

ब्रिटीश सरकार P.W.D. मार्फत सुरु केलेल्या कामावर जाणाऱ्या मजुरांना व कारागिरांना मजुरी पोटी धान्य व रोख रकम देत असे पुरुष व स्त्रिया तसेच १४ वर्षाखालील मुलांना मजुरीच्या रोख रकमेबरोबर धान्ही दिले जात होते त्यायोगे उपासमारीचे होणारे मृत्यू रोखण्यास मदत होत असे[२५] सरकारने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामावर जाणाऱ्या मजुरांची त्यांच्या श्रमाच्या कामाच्या श्रमानुसार कामाच्या प्रकारारानुसार चार भागात विभागणी केली होती याबाबत प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने श्रमपरिक्षणावर मते व्यक्त केली होती अधिक्षक अभियंता मिस्टर हार्ट याच्या मतानुसार व्यक्तीला क्षमतेनुसार काम देणे, दिलेल्या कामाचा ७५ टक्के कामाच्या व्यक्तीने पूर्ण करणे आवश्यक मानले जात होते. त्यासाठी कामावरील निरीक्षक व उपपर्यवेक्षक दररोज संध्याकाळी कामाची चौकशी करीत असत. नेमलेले काम जर पूर्ण केले नसेल तर मजुरीत कपात केली जात असे[२६] सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामावर म्हणजे रस्ते, रेल्वे, कालवे, धरणे, बंधारे या सारख्या कामांवर साधारात: १०० घनफुट खोदकाम करणे प्रतिदिन आवश्यक असे जर ७५ टके काम पूर्ण झाले असेल तर ते काम सार्वजनिक बांधकाम

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

खात्याच्या अखत्यारीतले समजले जात असे. मध्य विभागातील अधिक्षक अभियंता कर्नल जेनकिग जोन्स याचे असे मत होते[२७]

खानदेशातील जिल्हाधिकाऱ्याने वरिल गोष्टी लक्षात घेऊन मजुरांची चार गटात विभागणी केली होती.

१) पहिल्या गटात सुदृढ धडधाकट मजुरांचा समावेश होता.
२) दुसऱ्या गटात थोडे अशत परंतु घरापासुन काही अंतरावरील कामांवर जाऊ शकतील अशा मजुर व कारागिरांचा समावेश होता.
३) तिसऱ्या गटात जे मजूर शेजारच्या गावापर्यंत जाण्यास असमर्थ होते अशा लोकाचा यांत समावेश होता
४) चवथ्या गटात अंध, निराधार म्हाजे ज्यांना कोणाचाही आधार नाही अशा निराश्रीत मजुरांचा समावेश होता.[२८]

वरील चार प्रकारच्या गाटातील मजुरांना व कारागिरांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे खालील प्रकारच्या कामावर पाठवले जात असे.

१) पहिल्या गटातील मजुरांना P.W.D. मार्फत सुरु करण्यात आलेल्या कामावर पाठविले जात असे
२) दुसऱ्या गटातील मजुरांना मुलकी खात्यामार्फत सुरु असलेला कामावार पाठविले जात असे
३) तिसऱ्या गटातील मजुराना गावातच काम उपलब्ध करुन दिले जात असे
४) चौथ्या गटातील अंध अपंङ्खा निराश्रीत अश्या मजुरांना सरकार प्रत्यक्ष मदत करीत असे

अशा प्रकारे मजुरांना त्यांच्या क्षमते नुसार काम दिले जात असे[२९]

सरकारने दुष्काळाच्या काळात P.W.D. मार्फत व मुलकी खात्यामार्फत जी कामे सुरु केली होती या कामावरील मजुरीचे दर ही ठरविलेले होते ते पुढील तक्त्यातुन लक्षात येईल[३०]

| अ.नं. | कामाचा प्रकार | प्रौढ व्यक्ती | प्रौढ स्त्रिया | मुले/मुली |
|---|---|---|---|---|
| १. | P.W.D. | १शेर धान्य + आणा | १ शेर धान्य + १/२आणा | १ शेरधान्य १/२आणा |
| २ | CIVIL | १शेर धान्य + १/२आणा | १ शेर धान्य १/४ आणा | १ शेरधान्य १/४ आणा |

ब्रिटीश सरकार मार्फत P.W.D. च्या कामावर मजुरांप्रमाणेच कामगारांना देखील रोजगार दिला जात होता या कामगारांचेही चार गटामध्ये विभागणी केली होती.

१. पहिल्या गटात व्यावसायिक कामगार किंवा सुदृढ व्यक्ती जो कुशल कामगार असेल अशा व्यक्तींचा समावेश होता.
२. दुसऱ्या गटात जी व्यक्ती सुदृढ असेल परंतु अकुशल कामगाार असेल अशा व्यक्तीचा समावेश होता.
३. तिसऱ्या गटात सुदृढ व्यक्ती परंतु कामाची सवय असलेल्या व्यक्तींचा समावेश होता.
४. चौथ्या गटात ज्या व्यक्तींची प्रकृती ठीक नसेल अथवा अपंग असेल व ती व्यक्ती हलकी कामे करु शकेल अशा व्यक्तींचा समावेश होता [३१]

या पैकी फक्त पहिल्या गटातील व्यक्तींनाच P.W.D. च्या कामावर घेतले जात होते. P.W.D. च्या कामावरील कामगार व मजुरांची भरती युरोपियन अधिकारी कर्मचारी व ओव्हरसियर पद धारा केलेल्या व्यक्तींकडूच केली जात असे त्यामुळे कामे जलदगतीने होण्यास मदत होत असे.

**निष्कर्ष :**

एके काळी बेचिराख होऊन निमृनुष्य झालेल्या खानदेशात त्याचे त्याने पुनर्वसन करण्याचा कार्यात सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. या खात्यामार्फत विविध कामे करण्यात आल्यामुळे खानदेशातील रस्ते ,घाट,धरणे,पूल इ.निर्मिती झाली. त्यायोगे खानदेशातील दळण-वळण क्षेत्रात मोठी प्रङ्खाती होऊन खानदेशाच्या सार्वजनिक प्रगतीस त्यांचा मोठा हातभार लागला होता.

**संदर्भ सूची :**

१. सूमन वैद्य (डॉ) शांता कोठेकर (डॉ) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १८५७) श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती १९९८ पृ ६६
२. जालिंदर भोसले (डॉ) सीमा भोसले, आधुनिक भारत (इस १७५७ ते १८५७) मुरलीधर पब्लीकेशन पुणे प्रथम आवृत्ती २००३ पृ २४६
३. संजय जि. पाटील (डॉ) ब्रिटीशाकालीन खानदेश आणि दुष्काळ -सम्यकता प्रकाशन धुळे प्रथम आवृत्ती २०१२ पृष्ठ क्रमांक १८८
४. General Report of the Administration of the Bombay Presidency, Annual Report for the Year 1866-67 Govt. Central Press Bombay P- 52
५. तत्रैव
६. तत्रैव

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

७. तत्रेव पृ ६६-६७
८. संजय जि. पाटील (डॉ.) उपरोक्त पृ. १८८
९. A.T.Etheridge Report on Past Famines in the Bombay Presidency, Byculla Press Bombay 1867 P 153-154
१० General Report of the Administration of the Bombay Presidency, Annual Report for the Year 1865-66 Govt. Central Press Bombay, P -189
११. तत्रैव पृ १९०
१२. General Report of the Administration of the Bombay Presidency, Annual Report for the Year 1866-67 Govt. Central Press Bombay P-241
१३ तत्रैव, पृष्ठ क्र. २४२
१४ General Report of the Administration of the Bombay Presidency, Annual Report for the Year 1868-69 Govt. Central Press Bombay P-194
१५. तत्रेव पृ १९७-९८
१६. तत्रेव पृ १९८
१७. तत्रेव पृ २४१
१८. General Report of the Administration of the Bombay Presidency, Annual Report for the Year 1869-70 p -93-94
१९ तत्रेव पृ १८२
२० General Report 1871-72 P 104-105
२१ तत्रेव पृ १०४-१०५
२२ Revenue Diaries, vol 50, 1876, p 186 Unpublished Mumbai Archives Mumbai
२३. तत्रेव पृ १८६-८७
२४. तत्रेव पृ १८७-१८८
२५. Public works Dkepartment, Manuscript, vol. 1060 1878 Mumbai Archives Mumbai. P 104
२६. तत्रेव पृ १०४
२७. तत्रेव पृ १०५
२८. Public works Department manuscript vol 1701 1877 mumbai Akrchives Mumbai P-62 Revenue Diaries vol 50 1876 P 601 Unpublished Mumbai archives Mumbai
२९. तत्रैव
३०. Report of the Indian Famine Commission Part III London 1885 page 173 Revenue Diaries VOL 50, 1876 P 270 Unpublished Mumbai Archives Mumbai
३०. Revenue Department Manuscript vol 66 1881 Maharashtra state Archieves Mumbai P 71

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# खानदेशातील शेतकरी चळवळीतील साने गुरूजींच्या योगदानाचा अभ्यास

**प्रा.डॉ. महेंद्र व्ही. पाटील**
उपप्राचार्य व राज्यशास्त्र विभागप्रमुख,
एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.

आधुनिक भारताच्या इतिहासात शेतकरी चळवळींना महत्त्वपूर्ण स्थान आहे. या चळवळी स्वातंत्र्य आंदोलनाचाच एक उपप्रवाह वा आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेचा एक भाग म्हणूनही या चळवळींचा विचार केला जातो. स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी नेतृत्वाने चळवळींना वैचारिक मार्गदर्शन आणि नेतृत्व पुरविलेले आढळते. सरकारच्या जुलूमशाहीस विरोध करण्याची भूमिका चळवळींनी पार पाडलेली दिसते. या चळवळींमुळे ग्रामीण भागात राजकीय जागृती घडून आलेली दिसते. चळवळीतील नेत्यांवर गांधीप्रणित अहिंसात्मक मार्गाचा प्रभाव असल्याने काँग्रेस प्रति निष्ठा चळवळीतील सहभागी शेतकऱ्यांमध्ये विकसित झालेली होती. या चळवळीतून विकसित झालेल्या आत्मविश्वासामुळे श्रमिकामध्ये सरकारी अधिकारी व पोलिसाविषयीची अनामिक भीती नष्ट झाली. शेतकऱ्यांतील वाढता आत्मविश्वास आणि राजकीय जागृतीमुळे सविनय कायदेभंग व जंगल सत्याग्रहात शेतकऱ्यांचा राजकीय सहभाग वाढत गेला. या चळवळीतून विकसित झालेल्या नेतृत्वाने काँग्रेस नेते व कार्यक्रमास पाठिंबा देण्याची भूमिका घेतल्याने शेतकऱ्याचा वाढता पाठिंबा काँग्रेसला मिळू लागला. गांधींच्या ग्रामप्रणित रचनात्मक कार्यक्रमामुळे शेतकरी चळवळीला चालना मिळाली. गांधींजीच्या प्रेरणेने काँग्रेसमधील अनेक नेतेमंडळी शेतकरी चळवळीचे नेतृत्व करू लागली. त्यात साने गुरूजींचा देखील समावेश होता.

**खानदेशातील शेतकरी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

खानदेशात महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांची खोरी असल्यामुळे हा प्रांत शेतीच्या दृष्टीने सधन मानला जात असे. राज्यकर्त्यावर्गाने तापी, पांझरा आणि गिरणा नदीच्या पाण्यात बांध बाधून कालव्यामार्फत शेतीला पाणीपुरवठयाची सोय केल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले होते. इंग्रजांनी पेशवाई नष्ट करून खानदेशावर आपले राज्य स्थापन केले. इंग्रज राजवटीच्या काळात अन्यायकारक शेतसारा बसविला होता. इंग्रजांच्या अन्यायकारक धोरणाचा निषेध म्हणून शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांनी वसूल केलेल्या शेतसाराची लूट केली. खानदेशात इंग्रजांनी सुरू केलेल्या जमीन मोजणी कार्यक्रमात जोरजबरदस्ती वा अन्यायकारक तरतुदीमुळे शेतकऱ्यांनी विरोध केलेला होता. इ.स.१८५२ मध्ये जेव्हा सर्वेक्षण अधिकारी शेती मोजणीसाठी सावदा, रावेर व चोपडा येथे पोहचले.त्यावेळी शेतकऱ्यांनी प्रचंड संख्येने एकत्र येऊन अधिकाऱ्यांना घेराव घातला. डेव्हीसन नावाच्या सर्वक्षकाला काम करू दिले नाही. १ यावरून खानदेशातील शेतकऱ्यांमध्ये पूर्वीपासूनच अन्यायकारक कृतीस विरोध करण्याची मानसिकता होती. परंतु इंग्रजांनी दडपशाहीचा अवलंब सुरू केला. त्यासाठी खानदेशातील कलेक्टर मॅन्सफिल्ड स्वत:च मोठया लष्करी बळासह आला होता. त्याची प्रतिक्रिया म्हणून फैजपूर व एरंडोलच्या लोकांनी इंग्रज अधिकाऱ्याशी असहकार पुकारला होता. शेतकऱ्यांच्या मनातील अंसतोष कमी करण्यासाठी इंग्रजांनी काही सकारात्मक उपाययोजना जाहीर केल्या. त्यामुळे खानदेशात इ.स.१८७६ मध्ये जमीन मोजणीचे कार्य पुन्हा सुरू होऊन इ. स. १९०४ मध्ये संपले.

कापड व्यवसायाच्या वाढत्या विस्तारामुळे इंग्रजांनी २० व्या शतकाच्या प्रारंभापासून कापूस शेतीला महत्त्व देण्यास सुरूवात केली. इ. स. १९०३- ०४ च्या दरम्यान धुळे येथे 'कापूस संशोधन केंद्र' सुरू केले. शेतकऱ्यांची सहानुभूती प्राप्त करण्यासाठी दुष्काळी भागात सरकारने आर्थिक सहाय्य व कर्जवाटप केले. तत्कालीन काळात बहुसंख्य शेतकरी सावकाराकडून कर्ज घेत असत. सावकाराच्या कर्जावरील जबरदस्त व्याजामुळे कर्जबाजारी बनले होते. शेतकऱ्यांना कमी व्याजात आणि कायदेशीर मार्गाने पतपुरवठा करण्यासाठी इंग्रजांनी १९०४ मध्ये भारतात सहकारी सोसायटी कायदा संमत केला. सावकारी पद्धतीचे निमूर्लन आणि शेतकऱ्यांना आर्थिक पत सवलत उपलब्ध करून द्यावा, हा कायदयाचा प्रमुख उद्देश होता. इ. स. १९१२ साली दुसरा सहकार कायदा संमत झाला. या कायदयाने वेगवेगळया सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या. खानदेशात सर्वप्रथम १९०६ मध्ये बोदवड ता. भुसावळ येथे पूर्व खानदेशात सहकारी सोसायटी स्थापन झाल्याचे जिल्हा गॅझेटियरमध्ये नोंद दिसते. या संस्थामार्फत शेतकऱ्यांना अल्प मुदती व दीर्घ मुदतीचा पतपुरवठा केला जात असे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सरकारी प्रोत्साहन आणि राजकीय व सामाजिक कार्यकर्त्याच्या परिश्रमामुळे ही चळवळ यशस्वी होत होती. या चळवळीच्या विकास व प्रसारासाठी सहकारी संस्था कार्यकर्त्यांच्या परिषदा ही भरविल्या जात होत्या. खानदेशात शिरपूर, धुळे, जळगांव येथे परिषदा भरलेल्या होत्या. पतसंस्थेतून शेतकऱ्यांनी सुलभ पतपुरवठा होऊ लागल्यामुळे दिलासा प्राप्त झाला. इ. स. १९०१ ते १९३५ पर्यतच्या कालखंडात खानदेशात शेतकऱ्यांची मोठी चळवळ झाल्याचे दिसून येत नाही. इ. स. १९३७ साली दोंडाईचा येथे शेतकऱ्याच्या मालाच्या मोजमापात व्यापारी करत असलेल्या फसवणूकीच्या विरोधात शेतकरी नेते अण्णासाहेब टोणगांवकर व व्यापारी यांच्यात संघर्ष निर्माण झाला होता. हा अपवाद वगळता खानदेशात मोठी शेतकरी चळवळ झालेली दिसून येत नाही.

ISSN : 2348-7143
Dec. 2018

**खानदेशातील शेतकरी चळवळीत साने गुरूजींचे योगदान**

खानदेश ही गुरूजींची कर्मभूमी होती.या भूमी कार्य करत असतांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव गुरूजींना झाली. गुरूजींचे बहुसंख्य विद्यार्थी शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेले असल्याने त्यांच्या सहवासात गुरूजींना शेतकऱ्यांच्या समस्यांशी जवळून परिचय झाला. ते शेतकरी आणि कामगारांना राष्ट्राचे प्रमुख घटक मानत होते. समाजातील दीनदुबळया आणि श्रमजीवी वर्गाविषयी त्यांना बालपणापासून आत्मीयता आणि सहानुभूती वाटत होती. या मनोधर्मातून शेतकऱ्यांचा समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. भारतात सामाजिक व क्रांती घडवून आणावयाची असेल तर भांडवलशाहीसोबत जमीनदारीही नष्ट केली पाहिजे. आणि ती नष्ट करण्यासाठी जमिनीची पुनर्वाटणी आणि सामूहिक शेती या संकल्पनेचे ही समर्थन केलेले आढळते. साने गुरूजी खालील चळवळीत शेतकऱ्यासाठी खानदेशात केलेल्या होत्या.

**शेतकरी परिषद :–** पश्चिम खानदेशात पडलेल्या अवर्षणामुळे पाणी टंचाई, चारा टंचाई निर्माण झाली होती. या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि अवर्षणग्रस्त भागात रोजगार नसल्याने दुष्काळी कामे सुरू करावीत या मागणीसाठी पश्चिम खानदेशातील प्रमुख नेत्यांनी पारोळे, एरंडोल, असोदे येथे शेतकरी परिषदा भरविल्या होत्या. प्रांतीय काँग्रेस मंत्रिमंडळानेही सुरूवातीच्या काळात शेतकऱ्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी प्रांतभर विविध ठिकाणी शेतकरी परिषदा भरविल्या होत्या. ११ ते १३ ऑगस्ट १९३७ दरम्यान पूर्वखानदेशात साने गुरूजींनी शेतकरी परिषदेच्या निमित्ताने नांदेड, अंधेरी, थोरगव्हाण, हातेड, अडावद, अमळनेर, जळगांव येथे सभा घेतलेल्या आढळतात. १९३७ साली ऑक्टोबर महिन्यात चाळीसगाव तालुक्यात शेतकरी परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्षस्थानी गुरूजी होते. शेतकरी परिषदेच्या विचारमंथनातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची वास्तविकता गुरूजींच्या लक्षात येऊ लागली. त्यामुळे ते शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याकरिता काँग्रेसच्या धोरणात्मक निर्णयात परिवर्तनाची मागणी करू लागले. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत काँग्रेस नेतृत्वाच्या मर्यादा गुरूजींना जाणवू लागल्या होत्या. परिणामत: शेतकरी चळवळीत कार्य करत असतांना काँग्रेस नेतृत्व आणि गुरूजीमध्ये राजकीय संघर्ष होऊ लागला. काँग्रेस नेतृत्वानेही गुरूजींचा शेतकऱ्यामधील वाढता प्रभाव कमी करण्यासाठी राजकीय डावपेचाचा वापर करून त्यांच्या कार्यात अडचणी निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले.

**टोल टॅक्स प्रकरण:–** अमळनेरच्या नगरपालिकेने खेडयातून शहरात येणाऱ्या बैलगाडयावर टोल टॅक्स लागू केला. या नव्या टॅक्समुळे खेडयातील जनतेवर कराचा आर्थिक भार पडणार होता. खेडयाची आर्थिक अवस्था बिकट असतांना अमळनेर म्यूनिसिपालिटीचा टोल टॅक्स शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितील पेलवणारा नव्हता. त्यामुळे शेतकऱ्यांनी टोल टॅक्सला विरोध सुरू केला. शेतकऱ्याबद्दलच्या सहानुभूतीतून गुरूजींनी टॅक्सला विरोध केला. साने गुरूजींनी आपल्या 'काँग्रेस' नामक वृत्तपत्रात अमळनेरच्या म्यूनिसिपालिटीला जबाबदारीची जाणीव करून देतात लिहिले की, अमळनेला येणारी सारी संपत्ती खेडयातील आहे. व्यापारी, वकील, डॉक्टर, कारखानदार सर्वाची संपत्ती खेडयातूनच आली आहे. त्यांच्या पैशावर श्रीमंत झाला आहात व तो शेतकरी मात्र भिकारी झाला. तुमचे रस्ते झिजतात म्हणून खेडयातील गाडयांवर कर! २ समाजातील महत्त्वपूर्ण स्थान लाभलेल्या वर्गाला न्याय देण्याऐवजी अन्यायकारक कर लादणाऱ्या राजकीय नेतृत्वाचा समाचार घेतला. गुरूजींनी शेतकऱ्यांची बाजू आग्रहीपणे मांडून समाज जीवनातील शेतकऱ्यांचे महत्त्वपूर्ण स्थान राज्यकर्त्यांच्या निर्दशनात आणून दिले.

गुरूजींच्या टॅक्स रद्द करण्याच्या मागणीकडे म्यूनिसिपालिटीच्या नेतृत्वाने दुर्लक्ष केले. म्यूनिसिपालिटीतील सत्ताधारी काँग्रेस पक्षामुळे हा टॅक्स लागू झाला असा विरोधकांनी प्रचार सुरू केला. दि. २९ एप्रिल १९३८ मध्ये तालुका ॲग्रिकल्चर असोशिएशनच्या सभेत टॅक्सबाबत विचारविनिमय झाला. त्यात शेतकऱ्याचे प्रतिनिधी असल्याचा देखावा उभा करून काँग्रेसवर टीका करणाऱ्यांचा गुरूजींनी समाचार घेतला. त्यावेळी अमळनेरमध्ये वातावरण तणावपूर्ण होते. टोल टॅक्सचा प्रश्न चिघळत चालला होता. टोल टॅक्स निवारण कमिटी स्थापन करून टॅक्स रद्द करण्यासाठी गुरूजी व उत्तमराव पाटील इ. कार्यकर्ते खेडयापाडयात प्रचार अभियान राबवू लागले. अमळनेर येथे १३ मे १९३८ रोजी टोल टॅक्स रद्द करण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रचंड मोर्चा काढला. मोर्चाचे रूपांतर सभेत करण्यात आले. टोल टॅक्स संबंधी धोरणाचा विचार करण्यासाठी तेरा जणाची एक कमिटी नेमली गेली. टोल टॅक्स निवारण समितीने जोरात हालचाली सुरू केल्या. खेडया– पाडयात टॅक्स विरोधी लोकमत तयार होऊ लागले. हा टॅक्स रद्द करण्यासाठी सत्याग्रह करण्याची तयारी होऊ लागली. खेडयापाडयातील प्रतिष्ठित मंडळी अमळनेरच्या नाक्यानाक्यावर थांबून 'टॅक्स देऊ नका' , ' टॅक्स देऊ नका' म्हणून पिकेटिंग करायला लागली. पेरणीच्या दिवसात बी–बियाण्यांची अडचण पडू नये म्हणून व्यापाऱ्यांनी नाक्याबाहेर तात्पुरती दुकाने उभारली. मिल कामगारांनी शेतकऱ्यांना पाठिंबा दिला. ३० जूनला सर्व अमळनेर तालुकाभर निषेध दिन पाळण्याचा निर्णय घेण्यात आला. या दिवशी एकही गाडी अमळनेर शहरात येणार नाही असे प्रयत्न सुरू झाले त्यासाठी प्रचार अभियान राबविण्यात आले. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शंकरभाऊ काबरा प्रश्न सोडविण्यासाठी अमळनेरच्या म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांना भेटले. परंतु त्यांनी चर्चा करून शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती व्यक्त केली पण निर्णय दिला नाही. त्यामुळे स्थिती अधिक तणावाची झाली. टोल टॅक्स कमिटीने अधिक जोरदार हालचाल करण्यास सुरूवात केली. २३जानेवारी १९३८ च्या सोमवारी बाजाराच्या दिवशी नाक्यानाक्यावर पिकेटींग केले. बाजीराव पाटील, उत्तम पाटील, नारायण मिस्तरी, धनजीभाऊ चांभार, गोखले गुरूजी, तानकू पाटील, शंकर

शिंपी, पुसाळकर कार्यकर्ते आणि स्वयंसेवक आणि कामगार यांनी पिकेटिंग केले. स्वयंसेवकांनी काँग्रेसचे झेंडे लावलेल्या बैलगाडयातून शेतकऱ्यांच्या मालाची नाक्यापासून ने–आण केली.गाडया नाक्याबाहेर सोडल्या. तिथून लोक गावात गेले. कोणावरही या बाबतीत जबरदस्ती झाली नाही. ३ दि. २ जून १९३८ ला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत टॅक्स प्रकरणावर सर्वांगीण चर्चा होऊन तोडगा काढण्यासाठी सभेने तालुका काँग्रेस कमिटीच्या सल्लाने ठरविण्याचा सर्वाधिकार जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांना देण्यात आला. त्यांनी म्यूनिसिपालिटीच्या अध्यक्षांची भेट घेतली. दि. १२ जून १९३८ रोजी भरलेल्या म्यूनिसिपालिटीच्या सभेत रिकाम्या गाडया व ओझी असलेली जनावरे यांच्यावर अर्धा आणा आणि भरलेल्या गाडीवर दीड आणा कर घेण्यात यावा हा ठराव संमत केला. सरकारने त्यास मान्यता दिली. शेतकऱ्यांच्या चळवळीला अल्पप्रमाणात यश मिळाले होते पण संपूर्ण अन्याय दूर झालेला नव्हता. या यशाने गुरूजी आणि शेतकरी नेत्यांचे समाधान झाले नाही.

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या सासवड येथील सभेत गुरूजी, गोखले, पुसावळकर आणि उत्तम पाटील यांनी हा प्रश्न मांडला पण वेळे अभावी चर्चा होऊ शकली नाही. शेतकऱ्यांवर बसविलेला हा टॅक्स अन्यायकारक होता. कोणत्याही परिस्थितीत त्यांचे समर्थन होणे शक्य नव्हते. शहरी पुढाऱ्यांकडून केले जाणारे आरोप, काही व्यापारी व राजकारणी आणि म्यूनिसिपालिटीचे सभासद खेळत असलेले राजकारण, काँग्रेस वरिष्ठ नेत्यांची चालढकल इत्यादीने हे प्रकरण चिघळत चालले होते. हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी गुरूजींनी आपल्या 'काँग्रेस' साप्ताहिकात 'उपवास' या शीर्षकाचा अग्रलेख लिहून आपल्या उपोषणाचा निर्णय जाहीर केला. या निवेदनात गुरूजी सांगतात की, अमळनेरच्या म्युनिसिपालिटीने हा कर बसवू नये म्हणून येत्या आषाढी एकादशीपासून मी उपवास सुरू करण्याचे निश्चित केले आहे. मला माहीत आहे की या गोष्टीची काहीजण टर उडवतील, काहीजण टिंगल करतील... अमळनेरच्या म्यूनिसिपालिटीने हा कर न्याय्य व धर्म्य आहे असे प्रामाणिकपणे वाटत असेल तर तिने माझ्या उपवासाकडे यत्किंचितही लक्ष देऊ नये. हा त्रागा आहे, मूर्खपणा आहे असे म्हणून उपेक्षा करावी... ४ टोल टॅक्स प्रकरणी सुरू असलेल्या राजकारणाने गुरूजी व्यथित झाले होते. सनदशीर मार्गाने आंदोलन करूनही म्यूनिसिपालिटीचे सदस्य लोकमताचा आदर करण्याऐवजी राजकारणाला महत्त्व देत होते. त्यामुळे गुरूजींनी उपोषणाचा निर्धार व्यक्त केला. त्यांनी उपोषणाचा निर्णय जाहीर केल्याने टॅक्स रद्द करण्याचा निर्णय घेण्याच्या दिशेने वेगवान प्रयत्न सुरू झाले. वातावरण तणावपूर्ण होऊ लागले.साने गुरूजींच्या काँग्रेस अंकाने टोल टॅक्सबाबत प्रश्नोत्तरांद्वारे शंकाचे स्पष्टीकरण केले. साने गुरूजींनी आषाढी एकादशी दि. ८ जुलै शुक्रवार पासून उपवास करण्याचा निर्णय जाहीर केला. ४ जुलैला म्यूनिसिपालिटीने जादा सभा भरवून गुरूजींची सूचना मान्य केली. गुरूजींच्या मागणीनुसार टॅक्स चालू वर्षी निम्मे कमी करण्यात येऊन मार्च १९३९ या पुढील वर्षापासून हा टॅक्स पूर्ण रद्द करण्याचे वचन दिल्यावर गुरूजींनी उपोषण रद्द केले. शेतकऱ्यावरील राजकर्त्यावर्गाने लादलेला अन्यायकारक कर गुरूजीसारख्या लढवय्या राजकीय नेतृत्वाच्या प्रयत्नाने रद्द झाला. गुरूजींच्या नेतृत्वाखालील शेतकरी लढयाला यश मिळाले.

**किसान मोर्चा:–** १९३८ साली पूर्व खानदेशात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पीक नष्ट झाले. ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांची स्थिती दयनीय बनली होती. गुरूजींनी जिल्हयात काही ठिकाणी दौरे केला. आपल्या 'काँग्रेस' पत्रात दुष्काळाच्या बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. इ. स. १८३८ च्या ऑक्टोबर– नोव्हेंबर महिन्यात जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे दौरे काढण्यात आले. दुष्काळी भागात दौरा करून जिल्हा काँग्रेस कमिटीने चार आणे देखील पीक आले नाही व पिकांची आणेवारी अतिशय कमी असल्याचे जाहीर केले. मात्र कलेक्टरने सहा आणे पीक आणेवारी जाहीर केली. कामगार परिषदेत गुरूजींनी ठराव करून दुष्काळी काळात शेतसारा वसूल न करता सारामाफी द्यावी ही मागणी शेतकऱ्यांच्या वतीने केली होती. शेतकऱ्यांनी आपआपल्या गावाची परिस्थिती अर्जाद्वारे कलेक्टरला कळविली होती. त्यात गावाच्या पीक आणेवारीची माहिती कळवून शेतसाऱ्यांची माफी द्यावी ही मागणी केली होती. कलेक्टरने गावांच्या एकत्र अर्जाची दखल न घेता प्रत्येक शेतकऱ्यांने वैयक्तिरीत्या अर्ज करावा हा आदेश दिला. अज्ञानी व गरीब शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा निर्णय त्रासदायक होता म्हणून तो रद्द करण्याची गुरूजींची मागणी होती. शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत जनजागृती आणि शेतसारा माफ करण्यासाठी जिल्हयात ठिकठिकाणी शेतकरी परिषदा आयोजित कराव्यात. शेतकऱ्यांच्या मागण्या काँग्रेस मंत्रिमंडळाच्या पुढे मांडावा असा कार्यक्रम गुरूजींनी तयार केला. या कार्यक्रमास जिल्हा काँग्रेस कमिटी, कामगार युनियन, किसान सभा आणि नागरिक इत्यादी कडून गुरूजींनी सहकार्य अपेक्षिले.

२८ डिसेंबरला पारोळा तालुक्यातील देवगांव गावात कॉ. डांगेच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत गुरूजीचे प्रभावी भाषण झाले. या सभेत गुरूजींनी येत्या स्वातंत्र्यदिनी २६ जानेवारी १९३९ रोजी पूर्व खानदेशातल्या हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा जळगांवला कलेक्टरच्या बंगल्यावर नेऊ या; त्यासाठी तयार रहा!अशी हाक दिली. ५ गुरूजींच्या आवाहनाचा प्रभाव खानदेशभर पडला. शेतकऱ्यामध्ये जागृती करण्यासाठी त्यांनी तीन आठवडे गावोगावी प्रचार अभियान राबविले. प्रचारासाठी गाणी रचली होती.तेव्हा 'येथून तेथून सारा पेटू दे देश,पेटू दे देश।' हे किसान गीत विशेष गाजले. किसाने मोर्चासाठीही गुरूजींनी गीते तयार केली होती.

*आता उठवू सारे रान ।आता पेटवू सारे रान।*
*शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण।*

गुरूजींच्या गीतांनी शेतकऱ्यात नवीनच जागृती निर्माण झाली. दि. २३ व २४ जानेवारीपासूनच खेडयापाडयातील शेतकरी तिरंगा झेंडे फडकावित जळगावच्या दिशने रवाना झाले. साने गुरूजींनी सुरू केलेल्या आंदोलनाबद्दल बहुतेक स्थानिक कॉंग्रेस नेत्यांत नाराजी होती. या नाराज मंडळीत देवकीनंदन नारायण, अण्णासाहेब दास्ताने, धनाजी नाना, शंकरभाऊ काबरे, हरिभाऊ पाटसकर, राजमल लखीचंद इत्यादी पूर्व खानदेशातील प्रमुख नेते होते. कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते शंकरराव देव व इतर प्रांतिक आणि खानदेशच्या पुढाऱ्यांनी आपल्याच पक्षाचे सरकार सत्तेवर आहे, मोर्चा काढून त्यांच्या कार्यात संकटे आणणे बरोबर नाही असे सांगून मोर्चास विरोध केला. मोर्चाच्या गीताबद्दलही आक्षेप घेतले गेले. अहिंसेचा पुरस्कार करणारे साने गुरूजी देश पेटवायची भाषा करीत आहेत, अशीही टीका सुरू झाली. कलेक्टरने मोर्चाच्या दिवशी जळगांवला हजर राहणार नाही अशी तार गुरूजींना केली. कलेक्टरच्या या सहानुभूतीशून्य भूमिकेचा गुरूजींनी 'कॉंग्रस' साप्ताहिकात 'कलेक्टरसाहेबांचे कर्तव्य' नामक लेख लिहून कलेक्टरवर टीका केली. आपल्या दारी जनता गाऱ्हाणी घेऊन येत असतांना भेट नाकारणे याचा अर्थ इंग्रज अधिकाऱ्यामध्ये सेवाभाव वृत्तीच्या अभावाचाही उल्लेख केला. याच दिवशी कलेक्टरांचा मुक्काम चाळीसगांव तालुक्यातील जामदे या गावी होता. जळगावातील कॉंग्रेस विरोधी 'बातमीदार' साप्ताहिकाने देखील साने गुरूजी सत्ताधारी पक्षात राहून विरोधकांचे काम करीत आहे अशी टीका करून कॉंग्रेस वरिष्ठ नेतृत्वाला त्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रोत्साहित केले.

कॉंग्रेसच्या प्रांतिक आणि स्थानिक श्रेष्ठींनी साने गुरूजींच्या वाढत्या राजकीय प्रभावाचा धसका घेतला होता. शेतकऱ्यांमध्ये त्यांची वाढती लोकप्रियता कॉंग्रेस श्रेष्ठींना सलत होती. त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी मोर्चा रद्द करण्याची निकड वरिष्ठ नेतृत्वाला भासू लागली. साने गुरूजींनी आयोजित केलेला किसान मोर्चा रद्द करण्यासाठी कॉंग्रेसी नेतृत्वाने हीन पातळीवरचे राजकारण केले या संदर्भाची आठवण प्रकाशभाई मोहाडीकर यांनी 'लोकसत्ता' वर्तमानपत्रात सांगतात की, साने गुरूजी आणि अन्य कार्यकर्ते हिंसेला पोषक आणि शांतता भंग होईल अशी भाषणे देत आहेत. कलेक्टर कचेरीवर मोर्चा आल्याने तेथे जाळपोळ झाल्याशिवाय राहणार नाही. कॉंग्रेसच्या नालस्तीचा त्याचा डाव आहे. आमचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे असे गांधींजींच्या कानावर घालून दिले. गांधींजींनी दुसरी बाजू न ऐकता मोर्चा नेण्याची कल्पना मुर्खपणाची ठरवून तो रद्द करण्याचा आदेश दिला. गांधीजींच्या निर्णयाने गुरूजींना असहय दुःख झाले. ६ वरिष्ठ कॉंग्रेसी नेतृत्वाने गुरूजींच्या प्रामाणिक कार्याला कॉंग्रेसच्या बदनामीचा डाव समजून त्यांचे कार्य नाकारण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या मनात गुरूजींच्या कार्याविषयी गैरसमज निर्माण करून दिले.

गांधींजी सेवाग्रामला मुक्कामी असतांना आंदोलनाबाबतची विपर्यास करणारी माहिति देऊन गुरूजींबद्दलची तक्रार केली. गांधीजींनी गुरूजींना तार पाठविली. त्या तारेत गांधीजीं म्हणतात, ' . ७ गांधीजींच्या तारेने गुरूजींना अतोनात दुः ख झाले. गांधीजींच्या सल्ल्याने मोर्चा रद्द करण्याचा निर्णय घेतला. गांधीचा मोर्चा रद्द करण्याचा हेतू अधिक व्यापक व वेगळा असला तरी स्थानिक नेत्यांना साने गुरूजींना माघार घ्यावी लागली यातच आनंद होता. मोर्चा रद्द झाला तरी जळगावला येणाऱ्या शेतकऱ्यांना परत गावी पाठवून राजकीय नाराजी ओढवून घेण्याऐवजी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस अध्यक्ष केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद भरवावी ही तडजोड कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी गुरूजीं व इतर कार्यकर्त्यांशी केली. २६ जानेवारीच्या मोर्चाचे परिवर्तन शेतकरी परिषदेत झाले. शेतकरी परिषदेत श्री. केशवराव जेधे, शंकरराव देव व इतर कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांची भाषणे झाली. परंतु गुरूजींना परिषदेत बोलण्यापासून वंचित करण्याचा राजकीय डावपेच वरिष्ठ नेत्यांनी केला होता. शेतकऱ्यांनी गुरूजींचे भाषण होत नाही म्हणून घोषणा सुरू केल्या. गुरूजींच्या नेतृत्वाचा शेतकऱ्यावरील प्रभाव आणि सभेतील घोषणाबाजीने त्यांना भाषण करू दिले. गुरूजींचे अत्यंत प्रभावी भाषण परिषदेत झाले. परिषदेत गुरूजींच्या नेतृत्त्वाचे खच्चीकरण करण्याचा वरिष्ठ नेतृत्वाचा प्रयत्न शेतकऱ्यांनी यशस्वी होऊ दिला नाही. वरीष्ठ नेतृत्वाच्या असहकारामुळे गुरूजींसारखा सच्चा कॉंग्रेसप्रेमी पक्षापासून दूरावू लागला होता.

साने गुरूजींनी काढलेल्या किसान मोर्चाचे मूल्यमापन करतांना मधु लिमये आपल्या 'आत्मकथा' नामक पुस्तकात लिहितात की, खानदेशातील साने गुरूजींची विराट मोर्च्याची योजना देवकीनंदन यांच्या संकुचित व अरेरावी धोरणामुळे आणि त्यात भाग घेणाऱ्या कम्युनिस्टांच्या भाषाशैलीमुळे व कार्यपद्धतीमुळे अत्यंत वाद्ग्रस्त बनली! ८ कॉंग्रेसच्या अधिकृत दे- दे- दे- दे नेतृत्वाने (देव, देशपांडे, देवगिरीकर, देवकीनंदन) यांनी साने गुरूजी कम्युनिस्टांचे सहकारी बनले आहेत आणि त्यांचा हिंसाचारी मार्ग वापरू लागले आहेत अशी तक्रार गांधीजीं व विनोबा यांच्याकडे केली. किसान मोर्चाच्या काळात गुरूजींना कॉंग्रेसचे वरिष्ठ नेतृत्वाच्या राजकीय नाराजी व रोषाचा सामना करावा लागला. त्यामुळे त्यांना वरिष्ठ नेतृत्वाचे समर्थन व पाठिंबा मिळू शकला नाही.हे किसान मोर्चाच्या वेळेस कॉंग्रेसच्या प्रांतिक व स्थानिक नेत्यांनी नाराजी सहन करूनही गुरूजींनी आपल्या'कॉंग्रेस' साप्ताहिकात 'मंत्र्याच्या चरणी' नावाचा अग्रलेख लिहून खानदेशातील शेतकऱ्यांना सारा माफीसाठी प्रयत्न करण्याची विनंती केली. यातून कॉंग्रेस नेतृत्वाप्रती असलेला आदरभाव व्यक्त केला. गुरूजींच्या विनंतीचा फारसा उपयोग झाला नाही. ६ फेब्रुवारीला कलेक्टरने आदेश काढून २ आणे पीक आणेवारी कमी केल्याचे घोषित केले. तरी शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. जळगांव, चाळीसगांव, पाचोरा, चोपडा, जामनेर, यावल, रावेर, भडगांव या तालुक्यात व पेठांत सरकारने रूपयाला दोन आणे सूट दिली. जी दोन आणे सूट मिळाली तिचा अतिवृष्टीशी संबंध नव्हता. १९२९ साली नंतर ज्या ठिकाणी रिव्हिजन झाली तेथेही

ही सूट देण्यात आली. ही सूट मुंबई इलाख्यात विविध ठिकाणी दिली होती. साने गुरूजींनी महसूल मंत्री मोरारजी देसाई यांची भेट घेऊन सारामाफीची मागणी केली. मोरारजींनी सारा माफी बाबत नकारात्मक उत्तर दिले.

**सारांश**

साने गुरूजींच्या शेतकरी वर्गावर असलेल्या प्रभावाची आठवण श्री. गोपीनाथ तळवळकर यांनी 'स्मुति- सुंगध' नामक पुस्तकात पुढील शब्दात व्यक्त करतात, डॉ. राजेंद्रप्रसाद कॉंग्रेसचे अध्यक्ष असतांना खानदेशात आले होते. एके ठिकाणी गुरूजी आणि राजेंद्रबाबू बोलणार होते. सभा सुरू झाल्यानंतर गुरूजींनी सांगतिले की, 'आपल्या आजच्या पाहुण्यांना दम्याचा विकार आहे तेव्हा कोणीही मध्ये उठू नये. राष्ट्राध्यक्ष जाईपर्यंत एकही माणूस जागचा हलला नाही. बिहारात सुद्धा इतकी शिस्त मी पाहिली नाही' असे उद्‌गार राजेंद्र प्रसादांनी काढले होते. ९ राजकीय पद वा सत्ता नसतांनाही शेतकरी व बहुजनावर असलेल्या गुरूजींच्या राजकीय प्रभावाचे दर्शन वरील उदाहरणावरून दिसून येते. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी गुरूजींनी आंदोलने आणि चळवळीसोबत वैचारिक योगदानही दिलेले आहे. त्यांनी खानदेशात शेतकऱ्यांकरिता सुरू केलेल्या चळवळीमुळे मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांचे राजकीय सामाजिकीकरण झालेले दिसते. अनेक शेतकऱ्यांनी चळवळीत सहभाग घेतलेला होता. या चळवळीमुळे राजकीय जाणिवा विकसित होण्यास हातभार लागलेला दिसतो. तसेच चळवळीमुळे शेतकरी निर्भयपणे अन्यायास तोंड देण्यास तत्पर झाला. शेतकऱ्यांच्या चळवळीमुळे त्यांच्या प्रश्नाकडे राजकर्त्यावर्गाचे लक्ष वेघण्याचे आणि निर्णय केंद्रावर दडपण आणण्याचे कार्यही गुरूजींच्या प्रयत्नामुळे शक्य झालेले दिसते. गुरूजींसारख्या प्रभावशाली राजकीय नेतृत्वाने शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतल्याने त्यांच्या प्रश्नांना सरकार दरबारी चालना मिळू शकली.

**संदर्भ सूची :**

१. ............
२. साने, पां.स. (१९३८, एप्रिल ११). अमळनेर: साप्ताहिक कॉंग्रेस
३. मंगळवेढेकर, राजा. (१९७५). साने गुरूजींची जीवन- गाथा (प्रथमावृत्ती). पुणे:साधना प्रकाशन, पृ. २४५
४. साने, पां. स. (१९३८, जून २७). अमळनेर: कॉंग्रेस साप्ताहिक
५. मंगळवेढेकर, राजा., उपरोक्त, पृ. २५७
६. मोहाडीकर, प्रकाश (२०१०, जून ११). मुंबई: दैनिक लोकसत्ता
७. मंगळवेढेकर, राजा., पूर्वोक्त, पृ. २६१
८. लिमये, मधु (१९९६). आत्मकथा मधु लिमये (प्रथम आवृत्ती). पुणे: अक्षर प्रकाशन, पृ. १०६
९. तळवळकर, गोपीनाथ (२०११).स्मृति- सुगंध (संपूर्ण साने गुरूजी: खंड ४) (प्रथमावृत्ती). पुणे: वरदा प्रकाशन, पृ. २०९

‘RESEARCH JOURNEY’ International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# थाळनेर येथील स्थालेश्वर शिवमंदिर

**प्रा. सतीश मधुकर बोरसे**
इतिहास विभाग प्रमुख, कै. अण्णासाहेब पी.एस. वाडिले कला महाविद्यालय,
थाळनेर, ता. शिरपूर, जि. धुळे.

**प्रस्तावना**

खानदेशातील धुळे जिल्हा हा आकाराने लहान असला तरी तो खानदेशात ऐतिहासिक दृष्ट्यातरी अनेक वैशिष्ट्यांनी नावाजलेला आहे. वास्तविक पाहता धुळे, जळगांव व इतर प्रदेश प्राचीन व मध्ययुगीन काळापासून खानदेश या नावाने ओळखला जाई. ब्रिटिश राजवटीत प्रशासनाच्या दृष्टीने या प्रदेशाचे पूर्व आणि पश्चिम खानदेश असे दोन जिल्हे झाले. पूर्व खानदेशात जळगांव आणि पश्चिम खानदेशात धुळे जिल्ह्याचा समावेश झाला.

याच धुळे जिल्ह्यातील चार तालुक्यापैकी एक तालुका म्हणजे शिरपूर होय. या तालुक्यातील थाळनेर हे सुर्यकन्या तापी नदीच्या काठावरील ऐतिहासिक गाव होय. थाळनेर खानदेशातील प्राचीन काळात कुंभकर्ण व अहिर गवळी घराण्याचे राजधानीचे ठिकाण होते. कारण तेथे असलेली प्राचीन मंदिरे, किल्ला, पाषण, मातीची भांडी, खंडीत पाषाणाचे सिंहाचे शिल्प, हात तुटलेल्या योध्दाचे चित्र, मूर्ती, शिल्पे इत्यादी ऐतिहासिक गोष्टी त्याची साक्ष देतात. थाळनेर येथे प्राचीन असे स्थालेश्वर महादेवाचे मंदिर आहे. या स्थालेश्वर मंदिराच्या नावावरून या गावाला थाळनेर हे नाव मिळाले आहे. प्रस्तुत मंदिर उपेक्षित असुन त्याची इतिहासात माहिती मिळत नाही म्हणुन या शिवमंदिराचा मी प्रत्यक्ष सर्वेक्षण करून हा शोध निबंध तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**थाळनेरची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

धुळे पासुन उत्तरेस ४७ किलोमिटर अंतरावर सातपुडा पर्वताच्या नजदीक थाळनेर हे गाव आहे. प्राचीनकाळात इ.स.पाचव्या व सातव्या शतकात कुंभकर्ण घराण्यातील भानुषेन राजाची सत्ता असल्याचा पुरावा थाळनेर येथील ताम्रपटावरून समजतो. नंतर चालुक्य पाटण येथील निकुंभ, अहिर, गवळी, देवगिरीचे यादव इत्यादी राजघराण्यांनी थाळनेरवर राज्य केल्याचा उल्लेख मिळतो. त्यात कुंभकर्ण, चालुक्य, गवळी, निकुंभ, यादव इत्यादी राजवटीच्या काळात खानदेशात बरीच शिवमंदिरे बांधली गेलीत कारण हे सर्व राजे शैवपंथी व वैदीक धर्माचे पुरस्कर्ते होते. यांच्याच कालखंडात थाळनेर येथे शिवमंदिरे बांधली गेली असावीत.

**थाळनेरचे पुरातत्वीय महत्व**

पुरातत्वीय दृष्ट्या थाळनेर गाव व परिसराला महत्व आहे. थाळनेरच्या किल्ल्यात प्राचीन अशी काळ्या पाषाणाची सुमारे ४ फुट उंच व २ रूंद अशी सुंदर विष्णुची मुर्ती शिल्प मिळाले आहे. थालेश्वर मंदिरा शेजारी प्राचीन सुंदर असे नर्तकीचे अर्धवट मूर्ती शिल्प जैन मुर्त्या, शिवलिंग इत्यादी आढळुन येतात.

**थाळनेर येथील स्थालेश्वर शिवमंदिर**

थाळनेर येथील भुईकोट किल्ल्याच्या पायथ्याशी एक प्राचीन स्थालेश्वर शिवमंदिर आहे. मंदिराच्या आतील भागात शिवलिंग आहे. अगदी प्रारंभीच्या काळात शिवपार्वतीची पूजा शिवप्रतिमा ऐवजी शिवलींग स्वरूपात केली जात होती. यावरून या मंदिराची प्राचीनता सहज लक्षात येते. या मंदिराचे बांधकाम चालुक्य राजा सोमेश्वर यांच्या काळात झाले असावे. इ.स.९७५ पासून इ.स.११९० पर्यंत खानदेशात चालुक्याची सत्ता होती. चालुक्याच्या राजवटीत दक्षिण भारत व खानदेशात बरीच सिध्देश्वर, पाताळेश्वर, रब्बेश्वर अशा नावाची मंदिरे बांधली गेलीत.

**स्थालेश्वर मंदिराचे बांधकाम –** स्थालेश्वर शिवमंदिराचे बांधकाम हे प्रत्यक्ष दर्शनी पाहिले असता, दोन टप्प्यात झालेले दिसून येते.प्रथम मंदिराचा अर्ध्या भागाचे बांधकाम काळा चौकोनी दिड फुट रूंद व दोन फुट लांबीच्या घडीव दगडात झालेले दिसुन येते. मंदिराचा अर्ध्या भाग हेमाडपंथीय सारखा व नंतर वरचा भाग नगर शैली अथवा द्रविड शैलीसारखा वाटतो.मंदिराचे शिखर मात्र चुना, विटा, दगडगोटे यांनी बांधलेले आहे. मंदिराचे शिखर हे एकुण ३ टप्प्याने गोलाकृत असुन त्याची उंची साधारणत: ३५ फूट एवढी असावी. या शिखराच्या पहिल्या टप्प्यात २० कोनाडे (देवळ्या) दुसऱ्या टप्प्यात १६ तर तिसऱ्या टप्प्यात १२ कोनाडे (देवळ्या कोरलेले असुन, नक्षीदार कमळासारखे चहुबाजूंनी १० पाकळे वरती ६ पाकळे असून शिखराच्या उंच भागावर मोठी गुलाबी रंगाचे कमळाचे फुल आहे.) शिखरावरील नक्षीकाम उत्कृष्ठ आहे. मात्र शिखरावर कोणत्याही प्रकारे मानवी अथवा जनावरांच्या प्रतिमा कोरलेल्या नाहीत.

**सभा मंडप –** थाळनेर येथील स्थालेश्वर शिवमंदिर हे पूर्व भिमुख असून याला सभा मंडप नाही. मात्र सद्या ट्रस्ट मार्फत सभामंडप व तटबंदीचे काम लोकवर्गणीतून करण्यात आले आहे. या मंदिराचा पाया साधारणत: १५ ते २० फुटाचाखाली असावा. दरवर्षी तापीला येणाऱ्या महापुरामुळे, गाळामुळे आज हे मंदिर जमीन सपाट झाले आहे.

**गर्भगृह –** या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे गर्भगृहात जाण्यापूर्वी एक लहान सभामंडप, मुख्य दरवाज्यातून गर्भगृहात प्रवेश होतो. गर्भगृहाची उंची साधारणत: २५ फुटाची गोलाकार पध्दतीची आहे. गर्भगृहाचा आतील भाग हा चौकोनी काळ्या दगडांचा असुन शिखराचा भाग अष्टकोनी ३३ नक्षीदार तुऱ्यांनी सजविला आहे. गर्भगृहाच्या पश्चिमेस एक नैसर्गिक तिरकस ३ फुट उत्तराणची खिडकी ठेवलेली असुन तिचे वैशिष्ट्ये म्हणजे पावसाळ्यात येणारे वरूण देवाचे पाणीहे बरोबर शिवलींगावर पडते. मंदिरात गारवा व सुर्य प्रकाशासाठी सुध्दा या खिडकीचा उपयोग होतो. गर्भगृहात चारही बाजूंना दिवटी ठेवण्यासाठी दगडाचे आठ कोनाडे आहेत.

**शिवलींग –** स्थालेश्वर मंदिरात उत्कृष्ट शिवलींग आहे. ती अखंड पुरातन दगडात कोरलेले असुन तिच्या दोन्ही बाजूला शंखु शिल्प कोरलेले आहे. ही शिवलींग साधारणत: दीड फुट उंच व ३ फुट लांब आकाराची आहे. सुंदर घडीव शिवलिंग म्हणून तिचा उल्लेख करता येईल.

**शिल्पकला –** या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे या मंदिराचे स्तंभ शिखर बाह्य भिंत प्रवेशद्वार यावर कोरलेले शिल्प नक्षी व कोरीव काम होय. मंदिराच्या मुख्य प्रवेश द्वारावर ५ ते ६ फुट लांबीच्या अखंड दगडावर विविध फुलांची, चौकोनी पट्टीची कमळाच्या फुलांची, माळेची मनी इत्यादी स्वरूपात सुंदर कोरीव नक्षीकाम केलेले आहे. दरवाजावर सुंदर फुलांचे तोरण गर्भगृहाच्या प्रवेश द्वारावर गणेशाचे उत्तम शिल्प कोरण्यात आले आहे.

**मुर्तीशिल्प –** मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उंबरठ्यावर पूर्वकडे तोंडकरून दोन मानवी चेहऱ्याचे मूर्ती शिल्प आहे. त्याचे कान प्राण्यासारखे असून डोळ्यावर हरीणासारखे शिंगे असुन डोळे खोल आहेत. मानवी राक्षसासारखे दिसणारे चेहरे शिल्पकलेतून छान कोरलेली आहेत. या शिल्पातूनही हे मंदिर प्राचीन असल्याचा पुरावा दिसतो. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावरच उत्तर व दक्षिण भागात ६ फुट उंच व २ फुट रूंद अशा अखंड दोन दगडावर मूर्ती शिल्प कोरलेले आहे. दक्षिणेस मध्यभागी ४ भुजा असलेली मानवी प्रतिमा असून त्याच्या वरील दोनही हातात शस्त्रे आहेत. ही व्यक्ती धोतर सारखे वस्त्र नेसलेली असुन कानात मोठ मोठी कुंडले असून डोक्यावर राजासारखा टोप आहे. बहुदा ही मुर्ती विष्णूची असावी.या मूर्तीच्या दोन्ही बाजूस तशाच स्वरूपातील दोन मानवी मुर्त्या व दोन अलंकारी नृत्यकरणाऱ्या अप्सरांची शिल्पे आहेत.

उत्तरेच्या प्रवेश स्तंभावर सुध्दा मध्यभागी मानवी चेहरा असलेली मानवी शिल्प आहे. त्याच्या आजूबाजूला दोन अप्सरा अशी दोन जडाधारी साधुंची मुर्ती शिल्प कोरलेले आहे.बहुदा ही मुर्ती ब्रम्हदेवाची असावी.

**नंदीशिल्प –** मंदिराच्या समोर १५ ते २० फुटाच्या चौथऱ्यावर जुनी बांधणीनुसार सुंदर मोठे शिवाचे वाहन नंदीशिल्प आहे. या मंदिराचे वैशिष्ट्ये म्हणजे तो पूर्वाभिमुख बसलेल्या अवस्थेत असून तो साधारणत: ४ फुट उंच व अडीच फुट रूंद अशा एका अखंड दगडावर कोरण्यात आला आहे. गळ्यात मोठ्या घुंगराच्या कंठमाळा व अंगावर झालर, तोंडावर कासदा, मोरकी, गोंडा इत्यादी नक्षीकाम सुंदर कोरलेले आहे. आज सुदैवाने त्याची दोन्ही शिंगे थोडीशी तुटलेली आहेत. उत्कृष्ट नंदी शिल्पाचा नमुना म्हणून या परिसरात या शिल्पाला ओळखले जाते.

**निष्कर्ष**

थाळनेर येथील स्थालेश्वर शिवमंदिर प्राचीन आहे. हे मंदिराच्या वरील पुराव्यामुळे सिध्द होते हे मंदिर चालुक्य राजवटीतच बांधले गेले असावे. इ.स.९ व्या ते १३ व्या शतकाच्या दरम्यान या मंदिराचे बांधकाम झाले असावे असा एक निष्कर्ष आहे. तर दुसरा खानदेशात निकुंभ व गवळी या राजांची राजवट होती. ते राजेही शैव पंथीय असल्यामुळे खानदेशात त्यांनीच बरीच शिवमंदिरे बांधली. त्यांनी काही काळ थाळनेर येथेही राज्य केले म्हणून त्यांच्या काळातही या मंदिराची निर्मिती झाली असावी हे नाकारता येणार नाही.

थोडक्यात मंदिरावरील शिल्पकला, मूर्तीकला, कोरीव काम, नक्षीकाम इत्यादी दृष्टीने विचार केलातर थाळनेर येथील इतर शिवमंदिरापेक्षा हे मंदिर उत्तम स्थापत्य कलेचा नमुना ठरतो.

**संदर्भ सूची :**

१) प्रा.बोरसे एस.एम. – दिनांक २८ एप्रिल २००९ दैनिक गावकरी अंक (ऐतिहासिक लेख)
२) संपादक – प्रा.व.ग.वाकनीस, स्मृती शलका १९९२, प्रकाशक इतिहासचार्य राजवाडे संशोधन मंडळ धुळे
३) प्रा.डॉ.टी.टी.महाजन – प्राचीन खानदेशचा इतिहास आणि संस्कृती, दिलीपराज प्रकाशन पुणे, २००५
४) प्रत्यक्ष परिसर सर्वेक्षण
५) ShasrtiNilakanta - A History of South India, London Oxford University, 1976

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor -** (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh
**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

# खानदेशातील कला आणि स्थापत्य - भोनगाव येथील हेमाडपंथीय मंदिर

**कु. पुनम देवेंद्र चौधरी**
इतिहास विभाग, प्रताप महाविद्यालय,
अमळनेर.

**गोषवारा :-**

साक्री तालुक्यातील भोनगाव येथील भोजेश्वराचे मंदीर हे हेमांडपंथी मंदीर शैलीचे एक अप्रतिम नमुना आहे. या मंदिराबाहेरील नदीकिनारी अप्रतिम अशी झुल आहे तसेच या मंदीराचे प्रवेशद्वार भव्य अशा स्वरूपात आहे. आतील मंदीराचे छत बाहेरील बाजुस उतरंडी स्वरूपाचे आहे. मंदीराचा गाभारा चार भिंतीस्तंभांनी युक्त आहे. मंदीरातील शिवपिंडावर वेटाळेधारक सर्पकृती आहे. तसेच मंदीराच्या चंद्रिकेला स्पर्श न करता ध्वजारोहणासाठी एक दगड रोवलेला आहे. या मंदीराचे खास वैशिष्टये म्हणजे यात लोखंडाचा वापर केला गेला आहे. तत्कालीन राजे शिवभक्त असल्याने शंकराची मंदीरे या परिसरात आढळतात.

**प्रस्तावना :-**

इ.स. १२ व्या शतकात कान नदीच्या परिसरातील भोनगाव येथे हेमांडपंथी मंदीराच्या समुहाने प्राचीन वारसा लाभला आहे.

भोनगाव हे धुळे-सुरत महामार्गावर साक्री पासुन १८ कि.मी. अंतरावर कान नदी, उताविळ नाला व शिरळवण नाला यांच्या त्रिवेणी संगमावर आहे. भोनगाव हे प्राचिन काळी भोजपुर या नावाने संबोधले जायचे, या गावावर गवळी घराण्याची पाटीलकी इंग्रजांच्या काळापर्यत चालत आली नंतर कामधंद्याच्या निमित्ताने इतर ठिकाणी स्थलांतरीत झाले.

मोगल काळात व शिवकाळात हा परिसर अतिशय सुजलाम सुफलाम असावा. कारण मोगल काळात कान नदीकिनारी भोनगाव दहिवेल या गावांच्या दरम्यान एक मोठा बंधारा बांधण्यात आला होता तो आज देखील सुस्थितीत आहे. तसेच हा परिसर आज देखील संपुर्ण बागायती खाली आहे. या ठिकाणी मुबलक पाणी आढळते, म्हणजेच ज्या काळात मंदीराची बांधकामे झालीत त्याकाळी सुद्धा मंदीर बांधणाऱ्यांनी हया परिसराचा विचार केला असावा.

**उद्देश :-**

१) हेमांडपंथीय मंदीर माहिती अभ्यासणे.
२) यादवकालीन मंदीर स्थापत्याचा अभ्यास करणे.
३) हेमांडपंथी शिल्पकृती अभ्यासणे.
४) ग्रामिण भागातील हेमांडपंथी शिल्पकृती अभ्यासणे.

**संकेत शब्द**

भोनगाव, कान नदी, हेमांडपंथी, नागरशैली, नंदी, गढी, छत, गाभारा शिवपिंड

**१) मंदीराच्या नावाचा इतिहास**

प्राचिन काळी भोजपुर या नावाने हे गाव वसलेले होते, त्याचे आता अपभ्रंश होवुन भोनगाव हे नाव पडले. या भोजपुर नावावरून मंदीरालाही भोजेश्वराचे मंदीर असे म्हटले जाते. हे मंदीर यादवांच्या काळात म्हणजे १२ व्या शतकात बांधले गेले.

भोनगाव येथील मुख्य मंदीर हेमांडपंथीय नगरशैलीतील महादेवाचे मंदीर आहे. आज भग्न अशा गढीमध्ये वसलेले आहे. या गढीचा कोट जवळ जवळ अर्धा कि.मी. पर्यत विस्तृत होता. परंतु आज नामशेष होत चालला आहे. तसेच या गढी भोवती चार मोठे बुरुज होते, त्यापैकी दोन बुरुजांचे अवशेष आढळतात. या बुरुजामुळे गावाच्या परीसीमा निश्चित होत असतं, त्यातला महत्वपूर्ण पहिला बुरुज आज पूर्वेकडे धोडद्याच्या बंधाऱ्याजवळ असुन आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. तर दुसरा बुरुज पश्चिमेकडे तलंग हया ठिकाणी मुख्यगढीपासुन अर्धा कि. मी. परिसरात आहे. तर तिसऱ्या बुरुजाचे अवशेष उत्तरेकडे कालदर नाल्याजवळ सापडतात. चौथा बुरुज आज नामशेष झाला आहे. अशा एवढ्या मोठ्या क्षेत्रफळ असणाऱ्या गढीमध्मे भोजेश्वराचे मंदीर बांधले गेले आहे.

**२) मंदीराची कथा**

यादवांच्या काळात हेमाद्री हा एक महापंडीत धर्मशास्त्रकार होता, हा शुक्लयजुर्वेदी, वस्तगोत्री, पंचप्रवरी ब्राह्मण होता. देवगिरीचा महादेव कृष्ण व रामदेवराव या राजांच्या कारकिर्दीत हा मोठ्या हुद्यावर होता. यावरून राज्यकारभारातील त्याच्या जबाबदारीची कल्पना येते. रामदेव रावाचा हा प्रधान होता.

हेमाद्री हा स्मृती धर्मसुत्रे यातील आचार धर्माचा व व्रतादिकांचा तो पुरस्कर्ता होता. त्याच हेतुने त्याने चतुर्वगचिंतामणी नावाचा एक

**ISSN :** 2348-7143 **Dec. 2018**

मोठा ग्रंथ लिहीला, तसेच हेमाद्रीने एका यादव राजाला व्याधीतुन मुक्त केल्यानंतर संपुर्ण राज्यात ३०० मंदीरे मोबदल्यात बांधुन मागीतली, त्याकाळी शिवपंथाचा जास्त प्रसार झाला यादव राजेही शिवउपासक असल्या कारणाने हेमाद्रीने शंकराची मंदीरे बांधण्यास सांगीतले, हेमाद्रीच्या नावावरून या मंदीरांना हेमांडपंथी मंदीरे असे म्हटले जाते, या हेमांडपंथीय मंदीरांपैकी एक मंदीर भोनगाव येथे भोजेश्वराचे आहे.

**३) मंदीर स्थापत्य वैशिष्टये**

प्राचिन काळी जेवढे मंदीर बांधले गेलेत त्या प्रत्येक मंदीराची काही ना काही वैशिष्टये असतात, तसेच भोनगाव येथील भोजेश्वराच्मा मंदीराची काही वैशिष्टये पुढीलप्रमाणे –

**नंदी** – भोजेश्वराच्या मंदीराच्या प्रवेशद्वारावर नंदी अतिशय दिमाखात बसलेला आहे. ह्या नंदीच्या पाठीवर अप्रतिम अशी झुल आंधारलेली असुन पुढील एक पाय पोटाखाली घेवुन नंदी प्रवेशद्वारावर ऐटीत बसला आहे.

**गाभारा (गर्भगृह)** – गर्भगृहात प्रवेश केल्यावर आपणांस प्रथम शिवपिंड नजरेस पडते, गर्भगृह हे चार भिंतीस्तंभानी युक्त आहे भिंतींना दिवा लावण्यासाठी छोटासा दिपस्तंभ भिंतीत तयार करण्यात आलेला आहे. मंदीराच्या पूर्वेकडील भिंतीत गवाक्ष असुन सूर्याची किरणे शिवपिंडावर पडतील असा दृष्टीकोन मंदीर बांधणाऱ्या कलाकारांचा असावा. गाभाऱ्यातील पश्चिम दक्षिण बाजुस भिंतींना मोठी देवकोष्टे असुन ती आज शिल्प विरहीत आहेत.

**छत** – भोजेश्वराचे मंदीर नागरशैलीतील असुन या शैलीबाबत स्पष्ट करायचे झाल्यास मंदीराच्या वरील भागाकडे पाहिल्यास कळस गाठत असतांना असे स्पष्ट जाणवते की, दगडाचे एकावर एक भर रचत रचत उंच जातांना दिसतात याच बरोबर मंदीरामधील आकार देखील कमी कमी होत जातांना दिसतो. शेवटचा उंच भाग निमुळता होवुन तो एका दगडाने बंद होवु शकतो. म्हणजेच छपराला मजले निर्माण होतांना दिसतात. बाहेरील बाजुस उतरंडी छप्पर तयार होते. अशाच प्रकारची मंदीरे बलसाणे, सिन्नर, झोडगे इ. ठिकाणी आढळतात.

**प्रवेशद्वार** – ह्या मंदीराची प्रवेशद्वार मकारतोरणानी युक्त दुहेरी प्रवेशद्वार आहे ते द्विशाखांचे आहे. त्यामुळे दर्शन मंडप छोटासा तयार झाला आहे. दर्शन मंडपासारखे मोठ्या प्रवेशद्वारासमोर लहान प्रवेशद्वार आहे. गर्भगृहावरील पट्टी गणेश पट्टी असुन तिला ललाटपट्टी असे देखील म्हणतात. तिच्या मध्यभागी गणेशाचे सुंदर शिल्प कोरलेले आहे, तर प्रवेशद्वाराच्या आजुबाजुस रिकामी देवकोष्टे आढळतात, तेथे कोणत्या मुर्त्या होत्या हे समजु शकत नाही. प्रवेशद्वार साधे असुन भौमितीक आकृत्यांनी युक्त आहे.

**शिवपंड** – भोजेश्वराचे शिवपिंड अतिशय वैशिष्टयपूर्ण आहे. शिवलिंगाच्या मुखपृष्टावर नागसर्पाची वेटोळेधारक शिल्पे आहेत, तसेच शिवपिंडावर अभिषेक केल्यावर ते अभिषेकाचे पाणी बाहेर जाण्यास सुरेख अशी व्यवस्था केलेली आहे.

**दानपेटी** – ह्या मंदीराची दानपेटी अतिशय वैशिष्टयपूर्ण आहे. मंदीराच्या पुर्व बाजुस गवाक्षच्या डाव्या भिंतीला एक सलग मोठा दगड बसविलेला आहे. दानपेटी ज्या प्रकारे एक छिद्र असते त्या प्रमाणे सान्यामधील दगडी भेगेत दीड फुट पर्यत एक पोकळी असुन ह्या पोकळीत भेगेत जर पैसे टाकले तर त्याचा आवाज गुंजत असायचा म्हणजे मंदीराला एक तळघर असावे तेथे नाणे पडत असावेत, तेथुन गुंजण्याचा आवाज येत असावा, असे करण्याचे कारण म्हणजे त्यावेळी शत्रूंची आक्रमणे होत असतील म्हणुनच दानपेटी साठी तळघर निर्माण केले असावे. या तळघरात जाण्याचा मार्ग म्हणजे मंदीराच्या आवारात असलेल्या लहान विहीरीतुन तेथे जाण्यासाठी मार्ग आहे, असे स्थानिक लोक सांगतात. आज विहीर अस्तित्वात आहे परंतु मातीने भरली आहे.

**शिखर** – विमानावरून शिखर सुरु होते, पुढे वर गवाक्ष आहे. विमानाच्या वरच्या बाजुला जे गवाक्ष आहे त्यातुन मंदीराच्या वरील भागातील पोकळीत प्रवेश करता येतो. शिखराच्या उरलेल्या तिन्ही बाजुस गवाक्ष आकाराची देवळे तयार करण्यात आलेली आहेत. ती आज शिल्प विरहीत आहेत. मंदीराच्या विमानाकडील उत्तर बाजुच्या गवाक्षातुन आत प्रवेश केल्यानंतर गर्भगृहाच्या शिखराच्या खाली मधल्या बाजुला पोकळी आहे, ती पोकळी म्हणजे एक छोटेखाणी घरच आहे, तेथे निवासाची व्यवस्था असावी किंवा सुरक्षित लपण्याची जागा असावी. विमानाकडील चहुबाजुस व्हारांड्याच्या पद्धतीने जागा निर्माण केली आहे ती शिखर आहे.

तसेच शिखराची बाह्य रचना तयार करीत असतांना एकावर एक बारीक उर्वशिंगीची मोजना करुन शिखर कळसापर्यंत नेले आहे. शिखराला शिल्पपट्टी कुंभ आकाराची आहे. शिखराच्या वर चंद्रिका दर्शविली आहे वर कळस आहे, परंतु आज कळस भग्नअवस्थेत खाली पडलेला आढळतो. शिखराच्या तिन्ही बाजूस खांब असुन तिच्या बाजुस संपूर्ण गर्भगृहाच्या बाजुस शिल्पपट्ट्यांची योजना केलेली आहे. त्यामध्ये खुर, कुंभ आत सरळ अशी योजना केलेली आहे.

**ध्वजस्तंभ** – या मंदीराची वैशिष्टये म्हणजे शिखराच्या पाठीमागे देवकोष्टाच्या वरील शिखराच्या भागाला खांबण तयार केलेली आहे. ती अशा रीतीने तयार केलेली आहे की, चंद्रिकेला स्पर्श न करता ध्वजारोहणासाठी एक छिद्र असणारा दगड कोरलेला सुस्थितीत आहे.

**चौथरा आणि जागती** – भोजेश्वराचे मंदीर उत्तराभिमुख असुन पायऱ्या चढतांना दोन्ही बाजुस देवीच्या मुर्ती कोरलेल्या आहेत. मंदीर बांधतांना प्रथम दगडी चौथरा तयार केला असुन खालील चौथरा ते जागती यांच्यातील अंतर चार फुटाचे आहे. जागती ही अतिशय भक्कम असुन या जागेवर एक शिल्पपट्टी आहे. मंदीराचा चौथरा ते जागती दरम्यान मंदीराच्या पश्चिम बाजुस दोन धान्य कणिसाची चित्रे दगडावर

कोरलेली आहेत. त्यापैकी एक धान्य कणीस भग्न झालेले आहे तर दुसरे चांगल्या स्थितीत दिसते. तसेच मंदीराच्या दक्षिणेकडील बाजुस देखील दोन धान्य कणिसावर सुंदरपट्टी धान्य टिपतांना आढळतात हे ह्या मंदीराचे खास वैशिष्टये आहे.

**लोखंडाचा वापर –** हेमांडपंथी मंदीर हे चुन्याच्या दर्जा न भरता घडीव दगडांवर दगड रचुन तयार केलेली वास्तु हे ह्या मंदीराचे खास वैशिष्टये मानले जाते परंतु प्रथमत भोजेश्वराच्या मंदीरात लोखंडाचा वापर केलेला आहे. भोजेश्वराच्या मंदीराच्या शिखराकडील भागात लोखंडी आडवा खांब पुर्व पश्चिम लावण्यात आलेला आहे.

**इतर शिल्पकृती –** मंदीराच्या पायऱ्या चढत असतांना आजुबाजुस अतिशय सुरेख अशी देवीशिल्पे दगडामध्ये कोरलेली आहेत. विमान सुरु होते त्या बाजुस मंदीराच्या चौकोणी भागात अतिशय संदर अशी शिल्पपट्टी तयार करण्यात आली असुन पुर्व पश्चिम या दोन्ही बाजुस अतिशय सुबक अशी गजराजाची झुंज शिल्पाकिंत करण्यात आली आहे. तर दक्षिणेकडील बाजुस सुंदर असे राघु मैनेचे मिथुन शिल्पीत केले आहे.

मंदिराच्या शोभंकणासाठी शिखराच्या मध्यभागी चारही बाजुला आज आपण ज्याला रेडक्रास चिन्ह म्हणतो अशा चिन्हांचा शोभांकणासाठी उपयोग करण्यात आलेला आहे. हे एक शिल्पमय आगळेपण दृष्टीपथास पडते.

**४) इतर मंदीरे**

भोजेश्वराच्या मंदीरा बरोबरच अजुन पाच मंदीरे येथे अस्तित्वात आहेत.

**अ) शैव मंदीर –** उत्तराभिमुख मुळा वैष्णव मंदीर असलेले आज शैव मंदीर झालेले आहे. असे सुरेख मंदीर उत्तर यादव काळाची आठवण देते. ह्या मंदीराच्या पुर्वेकडील भिंतीस एक शिलालेख कोरलेला असुन त्याचे वाचन मात्र अद्याप झालेले नाही.

**आ) बाराखांबाची छत्री –** मंदीराच्या समोरच्या प्रांगणात असलेली अतिशय कलात्मक आणि शिल्पांकित अशी बाराखांबाची छत्री आहे. आज त्यामध्ये शिवपिंड विराजमान झाले आहे. स्थानिक लोक या १२ खांबी छत्रीस सुर्यनारायणाचे मंदीर मानतात. परंतु हे सुर्यनारायणाचे मंदीर नसुन हे समाधी मंदीर आहे. ह्या समाधी मंदीरावर दक्षिणेकडील भिंतीवर एक शिलालेख कोरलेला असुन तो ५०० वर्षापूर्वीचा असावा, मात्र त्याचे वाचन अद्याप झालेले नाही.

**इ) समाधी मंदीर –** या मंदीर परिसरात अनेक समाध्या आहेत, त्या आज भग्नावस्थेत पडल्या आहेत. ह्या समाध्या त्या काळातील शैलींमध्ये साधुंच्या असाव्यात, या समाध्या त्या काळातील संपन्नतेची लक्षणे दाखवितात.

**ई) ध्वनी नाद येणारी मंदीरे –** ह्या मंदीर समुहामध्ये दोन जोड मंदीरे चुना आणि दगडाच्या सहाय्याने बांधलेली आहेत. ह्या मंदीराच्या गर्भगृह हेच मंदीर आहे. त्यावर कळस बांधलेले आहेत. ह्या दोनही मंदीराच्या मध्ये उभे राहुन टाळी वाजविली किंवा दगडाच्या आवाज केला तर मंदीरामध्ये तंबो-याच्या ध्वनी नादात त्याचे रुपांतर होते.

**महाराष्ट्रातील इतर हेमांडपंथीय मंदीरे**

वेरूळचे घृष्णेश्वर मंदीर, रतनावाडीचे अमृतचे मंदीर, अंबरनाथचे शंकराचे मंदीर, गोदावरीच्या तिरावरील मंदीरे, शिखर शिंगणापूरचे महादेव मंदीर, तुळजापुरचे मंदीर, नाशकातील त्र्यंबकेश्वराचे मंदीर, ज्योतीबाची डोंगरावरील देवळे, गोदावरीच्या तिरावरील मंदीरे.

**निष्कर्ष**

हेमांडपंथी मंदीराचे खास वैशिष्टये म्हणजे चुनाच्या दर्जा न भरता दगडांवर दगड रचुन तयार केलेली वास्तु हे मंदीर हेमांडपंथीची शिल्पकलेची वैशिष्टये होय. तत्कालिन राजे शिवभक्त असल्याने महाराष्ट्रात हेमांडपंथीय बांधणीचे शिवमंदीर प्रामुख्याने दिसतात, भोनगाव हे हेमांडपंथीय मंदीरामध्ये वैशिष्ट्यूपर्ण आहे. येथील मंदीरात प्रथमता लोखंडाचा वापर करण्यात आला आहे. लोखंड हे सहजा-सहजी हेमांडपंथी मंदीरात वापरले जात नाही, ही दुर्मिळता भोजेश्वराच्या मंदीरात दिसुन येते.

**संदर्भ सूची :**

१. भारतीय संस्कृतीकोष, दहा खंड (वसंधी लोक ते ज्ञानेश्वरी) संपादक - पं. महादेवशास्त्री जोशी सहसंपादक - सौ.पद्मजा होडारकर, एम.ए.
२. खान्देशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास लेखक - प्रा. डॉ. टी.टी. महाजन
३. स्थानपोथी : एक पुरातत्व अभ्यास (यादवकालीन महाराष्ट्र) लेखक - डॉ. अरुण शं. पाठक

**ISSN :** 2348-7143
**Dec. 2018**

# महाविद्यालयीन ग्रंथालयात माहीती साक्षरता : काळाची गरज

**डॉ. हेमकांत एम. चौधरी**
ग्रंथपाल, श्रीमती एच.आर. पटेल कला महिला महाविद्यालय,
शिरपूर (धुळे).

**सार:–**

माहिती तंत्रज्ञानाच्या ज्ञान युगात नवनविन उपयुक्त माहितीचा होणारा प्रसार त्यासाठी उपयुक्त असणारी माहिती योग्य वेळी योग्य वाचकाला देता यावी याकरिता माहिती साक्षरता समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तुत लेखामध्ये माहिती म्हणजे काय? माहिती साक्षरता, ग्रंथालयाच्या दृष्टीकोनातून माहिती साक्षरतेचे आयोजन व त्या आयोजनामुळे होणारे फायदे याबद्दल माहिती देण्यात आली आहे.

**प्रस्तावना:–**

अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा मानल्या जातात. आजच्या युगात या तीन गरजा पुर्ण झाल्या म्हणजे मानवी जीवन सुसह्य झाले असे म्हणता येणार नाही. कारण आजच्या काळातील मानवाची पहिली गरज आहे घ्माहितीङ. आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येक दिवस नवनविन विषयात नवनविन माहितीची भर पडताना आढळून येते. आज आपण माहिती युगात वावरत आहोत. भारत प्रगतीशिल देश असल्यामुळे कालपरत्वे व त्या वेळच्या गरजेनुसार विशिष्ट क्षेत्रांना प्राधान्य दिल्यामुळे या देशात माहीती क्रांतीची सुरूवात होउ शकली. माहिती क्रांतीची सुरूवात होण्यास माहिती तंत्रविज्ञानातील दृतगतीने झालेली प्रगती व माहितीचे होणारे उत्सरण किंवा प्रसार हे प्रमुख कारण आहे. घ्माहितीङ ही त्यामागची प्रेरणशक्ती आहे. ही क्रांती व माहितीचा प्रसार समाजाच्या सर्व घटकामध्ये कमी जास्त फरकाने होत आहे व त्याची परिणती म्हणजे आजचा समाज घ्माहितीभिमुख समाजङ म्हणून ओळखला जात आहे.

ज्ञानाचा मुल गाभा म्हणजे माहिती. त्यासाठी माहितीची गुणवैशिष्टै तसेच माहितीच्याछटा लक्षात घ्याव्या लागतील. आज ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे नव्हे क्रांतीमुळे मोठया प्रमानात निर्माण होणारी माहिती त्वरीत उपलब्ध करूण देण्यात यावी याकरिता माहिती साक्षरता समजून घेणे आवश्यके ठरते. आजच्या स्पर्धात्मकयुगात माहितीची उपयुक्तता व महत्व व्यक्तिमत्व विकासाकरिता आवश्यक आहे. हे सर्वांना पटलेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विशेषत: इंटरनेटमुळे माहिती ही विविध मार्गांनी व विविध स्वरूपात मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्या माहितीतून नेमकी माहिती मिळविणे व ती योग्य प्रकारे वापरणे, यासाठी विशेष कौशल्य आत्मसात करणे अत्यावश्यक ठरते. त्यामुळे ग्रंथालयाच्या दृष्टीकोनातून ग्रंथालयात कोणकोणती माहिती उपलब्ध आहे, माहितीचा शोध कसा घ्यायचा, इंटरनेटच्या माध्यमातून जगातील माहिती कशी मिळवायची याबद्दल ग्रंथालयात वेगवेगळया उपक्रमाच्या माध्यमातून माहिती साक्षरता उपक्रम राबवून नॅकव्दारे प्रकाशित ग्रंथालयाच्या गुणात्मक विकासासाठी Best practices for college libraries या अंतर्गत ज्या १४ बाबींचा समावेश करण्यात आला. त्यापैकी Information literacy programmes ची पुर्तता होईल.

**माहीती म्हणजे काय?**

१. च भुत, वर्तमान व भविष्यातील सर्व घटनांचे, वाच्किक, शाब्दिक, लिखीत, चित्ररूप, संख्यारूप अथवा इतर कोणत्याही स्वरूपातील प्रगतीकरण म्हणजे माहिती होय. छ
२. Hopes यांच्या मते:- च्माहिती ही विधाने व सत्यगोष्टींची गोळाबेरीज असून माहितीचा अनुभव विचारांची प्रक्रिया, तर्क, कल्पना आणि इतर मनोवैचारिक गोष्टींमधून उद्भवते.छ

वरील व्याख्येवरून माहिती ही तिनही काळातील सत्य घटनेवर आधारीत मानवाच्या विचार, कल्पना आणि तके ावरील प्रक्रिया असून मनुष्य प्राण्याला स्वत:च्या विकासाकरिता, यशाकरिता, निर्णय घेण्याकरिता, संशोधनाकरिता, नवनिर्मितीकरिता, विश्लेषणाकरिता अत्यावश्यक असते. त्याकरिता वैज्ञानिक व तंत्रज्ञानाचा परिस्पोट लक्षात घेता प्रत्येके व्यक्ती माहिती साक्षर असणे आवश्यक असते. इंग्रजीत माहिती या शब्दास हा पर्यायी शब्द वापरला जातो. इंग्रजी–मराठी शब्दकोशामध्ये या शब्दाचा अर्थ–एखादी घटना, वस्तु इत्यादी विषयीच्या बाबी असा अर्थ दिलेला आहे. सामग्रीचे–सारांशीकरण म्हणजे माहिती होय

**साक्षरता म्हणजे काय?**

